

ओंकार ट्रस्ट

कल्याणी २०१३

योगी श्रीअरविंद विशेषांक






सर्व जीवन योग आहे

All Life Is Yoga








पाँडेचेरी येथील श्रीअरविंद आश्रमाचे प्रवेशद्वार




योगी श्रीअरविंदांची समाधी, पाँडेचेरी




आमच्या स्वामीचे भौतिक आवरण असलेल्या तुझ्याविषयी आम्हाला असीम कृतज्ञता वाटते. ज्यांनी आमच्याकरिता इतके काही केले, आमच्यासाठी कर्म केले, संघर्ष केले, कष्ट सोसले, आशा केली, इतके सहन केले, त्या तुमच्यासमोर, ज्यांनी सर्व गोष्टींचा संकल्प केला, सर्वांसाठी प्रयत्न केले, सिद्धता केली, आमच्यासाठी सर्वकाही साध्य केले, त्यांच्यासमोर आम्ही नतमस्तक होऊन अशी विनवणी करतो की, आम्हाला तुमच्या सर्व ऋणांचा कधीही क्षणभर देखील विसर न पडो.

९ डिसेंबर १९५०

श्रीमाँच्या योगी श्रीअरविंदांच्या समाधीवर कोरलेल्या भावना...


SRI AUROBINDO
ASHRAM

श्रीमाताजींचे प्रतीक





मधल्या वर्तुळानें भागवत चेतना दर्शविली आहे.

केन्द्रभागीं असलेल्या चार पाकळ्या मातेच्या चार शक्ती दर्शवितात.

मातेच्या कार्याकरतां प्रकट झालेल्या बारा शक्ती बाहेरच्या बारा पाकळ्यांनी दाखविल्या आहेत.

प्रतीकाचें केन्द्र म्हणजे 'अदिती', मधल्या चार पाकळ्या म्हणजे महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती आणि बाहेरच्या बारा पाकळ्या म्हणजे मन:पूर्वकता, विनम्रता, कृतज्ञता, प्रयत्न-सातत्य, अभीप्सा, ग्रहणशीलता, प्रगति, धैर्य, सद्‌भाव, उदारता, समता आणि शांति असा उल्लेख श्रीमाताजींनी केलेला आहे. यांपैकीं पहिल्या आठ गुणांनीं भगवंताप्रय काय वृत्ति असावी हें दर्शविलें जातें आणि उरलेले चार गुण मानवतेप्रत काय वृत्ति असावी हें दर्शवितात असेंहि म्हटलेलें आहे.

खाली अवतरित होणारा त्रिकोण हे सत्-चित्-आनंदाचे सूक्ष्मातील प्रतिक होय, तर वर आरोहित होणारा त्रिकोण स्थूलातील जीवन-प्रकाश व प्रेम (अभिप्सामय प्रत्युत्तराचे) यांचे प्रतिक होय! मधला चौकोन म्हणजे या दोहोंच्या मीलनाचा परिपूर्ण अविष्कार होय, आणि केंद्रस्थानीचे जल म्हणजे बहुरूपतेचे प्रतिक व त्यातील कमळ म्हणजे भगवंताचा अवतार होय

ॐ

उद्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी

ओंकार ट्रस्ट

(स्थापना २६ जुलै १९९१)

रजिस्टर्ड ऑफिस :

गुजरवाडी-निंबाळकरवाडी,

कात्रज, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४३.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

C/O **श्री. भा. वा. सातवळेकर**

७ चंद्रमा अर्पाटमेंट, नित्यानंद हॉल जवळ,

सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११०५१

☎ : ०२०-२४३४५०६१

मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था नोंदणी क्रमांक ई १५०५ दिनांक १० ऑक्टोबर १९९१

कलम ८० ग खाली आयकर सवलत

ओंकार ट्रस्ट २०१३ चा **''योगी श्रीअरविंद''** विशेषांक, संपादक सौ. कल्याणी अशोक शिवले (उज्वला काळे), ट्रस्टी यांनी प्रतिमा ऑफसेट, पुणे - २९ येथे छापून श्री. भालचंद्र वा. सातवळेकर, यांनी ७ चंद्रमा अर्पाटमेंट, नित्यानंद हॉल जवळ, सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११०५१ येथे प्रकाशित केला आहे.

टीप : १) सदरचा विशेषांक **फक्त खासगी वितरणासाठी** आहे.

२) या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनाशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

३) ईश्वर हा लेख डॉ. ल. ग. चिंचोळकर, नागपूर यांच्या श्रीअरविंद दर्शन या पुस्तकातून पुनर्मुद्रित करण्यात आला आहे.

४) अंकातील काही फोटो श्रीअरविंद सोसायटी यांच्या सहकार्याने अंतर्भूत केले आहेत.

अक्षरजुळणी आणि छपाई : प्रतिमा ऑफसेट, पुणे - २९. फोन : २५४६०२१६

अध्यक्षीय मनोगत

'थोर क्रांतिकारक ते योगी' असा जीवन प्रवास घडलेल्या '**योगी श्रीअरविंद**' यांच्यावर आमच्या ओंकार न्यासातर्फे या वर्षीचा 'कल्याणी' विशेषांक काढण्यात येत आहे. या अंकाचे प्रकाशन त्यांचे एक अभ्यासक प्रा. श्री. मिलिंद जोशी यांच्या शुभहस्ते ता. २१/२/२०१३ रोजी होत आहे. न्यासातर्फे प्रकाशित होणारा हा २२ वा वार्षिकांक आहे. दरवर्षी एका संतावर अंक काढला जातो. संत, त्यांचे जीवन व त्यांनी समाजासाठी केलेले कार्य व त्यांचे साहित्य हा या अंकांचा विषय असतो. मला येथे नमूद करण्यास आनंद होत आहे की, आमच्या अंकांना संदर्भ अंकाचे स्वरूप प्राप्त झाले आहे असे म्हटले तर वावगे होवू नये. आमच्या २००० साली प्रकाशित झालेल्या स्वामी श्री स्वरूपानंद विशेषांकास उत्कृष्ट आध्यात्मिक अंक म्हणून मुंबईवृत्त पत्रसंघाचा पांडुरंग भाटकर पुरस्कार प्राप्त झाला आहे. या वर्षीचा विशेषांक सर्व वाचकांना आवडेल याची मला खात्री आहे.

ओंकार न्यासाचे इतर उपक्रमांमध्ये १) शाळांमधून संस्कार वर्ग घेणे, विद्यार्थ्यांकरिता निरनिराळ्या स्पर्धांचे शाळांच्या सहकार्याने आयोजन करणे व प्रोत्साहनार्थ यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीसे देणे. २) सामाजिक क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या व्यक्तिस वा संस्थेस न्यासाच्या संस्थापिका कार्यवाह कै. वसुंधराताई सातवळेकर यांच्या नावे 'वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार' १९९७ सालापासून दरवर्षी दिला जातो. पुरस्काराचे सध्याचे स्वरूप रोख रक्कम रु. ११,०००, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे असते. ३) सामाजिक गरज लक्षात घेऊन २००० सालापासून अनाथ मुले दत्तक घेतली जातात. ज्याकरिता गुजरवाडी, निंबाळकरवाडी येथील न्यासाच्या जागेवर १६०० चौ. फुटाची स्वतंत्र इमारत बांधण्यात आली आहे. सध्या तेथे ५ मुले राहात आहेत. या मुलांचा राहणे, जेवण व शिक्षणाचा सर्व खर्च न्यासातर्फे केला जातो. त्याचबरोबर त्यांच्यावर चांगले संस्कारही केले जातात. मुलांची शैक्षणिक प्रगती समाधानकारक आहे.

न्यासाच्या जागेवर आणखीही उपक्रम सुरू करता येतील. ज्या उपक्रमांचा उपयोग समाजाला आध्यात्मिक शैक्षणिक, शारीरिक उन्नत्तीसाठी होवू शकेल. अर्थात याकरिता काही खर्चही करावा लागणार आहे. त्याकरिता समविचारी संस्थांबरोबर आमचा विचारविनिमय नुकताच सुरू झाला आहे.

अंकाबद्दलची माहिती आपणास अंकातील 'संपादकीय'मध्ये वाचावयास मिळेल तर २०१२-१३ मध्ये न्यासाने केलेल्या कार्याची माहिती 'वाटचाल' मध्ये मिळू शकेल.

आमच्यासारख्या छोट्या संस्था ज्या सरकारी अनुदानाशिवाय, थोडेफार सामाजिक कार्य मनापासून करीत आहेत ते लोकाश्रयामुळेच शक्य होवू शकते. आमचा न्यासही त्याला अपवाद नाही. माझे हे मनोगत पुरे करताना मी सर्व देणगीदारांचे मग ती पैशाच्या रुपात असो, धान्य वा कपडे किंवा अन्य कोणत्यातरी रुपात असेल त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो व त्यांच्याकडून यापुढेही अशीच मदत मिळत राहील अशी आशा व्यक्त करतो.

धन्यवाद.

म. वा. सरदेशपांडे

अध्यक्ष

Email: aurobindo@vsnl.com
Website: www.sriaurobindoashram.net

Phones: 26524810, 26567863
Fax: (011)26857449

Sri Aurobindo Ashram – Delhi Branch

Sri Aurobindo Marg, New Delhi 110 016

The Mothers 135th birth anniversary on 21st Feb 2013 is a special occasion and I am happy that Onkar Trust is bringing out a special issue on Sri Aurobindo on this day.
My best wishes and blessings are there with you all for carrying on this noble work in the service of Sri Aurobindo and his spiritual collaborator The Mother.
I do hope this special issue will reach out to many more people and further spread the work of uplifting the spiritual life of seekers and aspirants on the sunlit path of Sri Aurobindo's yoga.
Bliss!

Tara Jauhar

Tara Jauhar

Trustee
Sri Aurobindo Ashram
Delhi Branch

MANOJ DAS C/o SRI AUROBINDO INTERNATIONAL CENTRE OF EDUCATION PONDICHERRY 605 002 INDIA

21 January, 2013

Namaskar. It was so sweet of you to call on me with the good news of the Omkar Trust preparing to bring out a special number of their annual publication, *Kalyani*, devoted to Sri Aurobindo.

It is in fitness of things that the Omkar Trust, which organises numerous welfare activities at the practical field, should also pay attention to informing and enlightening the people on the works and visions of our great spiritual Master, through literature.

Way back in 1908, Sri Aurobindo paid his tribute to Maharashtra in these words: "It is worthy of notice that the Indian race in which the national idea attained its most conscious expression and most nearly attained realisation, was the Maratha people who drew their strength from the village democracies and brought them to interest themselves in the struggle for national independence." (*Bande Mataram*, 8 March 1908).

Sri Aurobindo's association with Lokmanya Bal Gangadhar Tilak gave that radical turn to the Indian nationalist movement without which the history of our nation would have been negatively different.

The first phase of Sri Aurobindo's life was devoted to the political emancipation of our nation. The second phase was devoted to the spiritual emancipation of humanity. His vision of a transformed future alone can sustain us and carry us forward through the dense darkness of ignorance that engulfs the entire globe today.

I hope, the special number of *Kalyani* will contribute in that direction.

With best wishes and warm regards,

(Manoj Das)

Phone. (0413) 2335488

संपादकीय

जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती असे वचन आहे. अवतारी पुरुष असूनही 'संत' आपल्यासारखेच सामान्य मानव म्हणून जन्मास येतात. भूतलावरील दुःख, यातना, अडचणी त्यांनाही सोसाव्या लागतात, परंतु अखंड अनुसंधानात असणारे संत ते सर्व भगवत् इच्छा म्हणून आनंदाने स्वीकारतात व आपले जगदोद्धाराचे कार्य चालू ठेवतात. जगदोद्धार हाच त्यांचा ध्यास असतो. अशा संताची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने गुरूपौर्णिमा १९९२ पासून 'कल्याणी' विशेषांकास सुरूवात झाली. ट्रस्टच्या संस्थापक कार्यवाह कै. सौ. वसुंधरा सातवळेकर यांनी सुरू केलेला हा उपक्रम गेली २१ वर्षे ईश्वरकृपेने व आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे कार्यरत आहे.

या वर्षीचा हा २२वा 'कल्याणी' विशेषांक महायोगी श्रीअरविंद यांच्या जीवनाची, कार्याची, शिकवणीची व तत्वज्ञानाची ओळख करून देणारा आहे. योगी श्रीअरविंदाचे जीवन अलौकिक, अद्भुत असे आहे. योगी अरविंदाचा जीवनकाळ १५ ऑगस्ट १८७२ ते ५ डिसेंबर १९५० म्हणजे अलीकडील काळातील आहे. त्यांच्या जीवन प्रवासाचे अवलोकन केले तर त्या प्रवासाचे टप्पे असे आहेत - इंग्लंडमध्ये वयाच्या ७व्या वर्षापासून १४ वर्षे शिक्षणासाठी केलेले वास्तव्य, मातृभूमीला परत आल्यावर बडोदा येथे व्यतित केलेला कालखंड व महाविद्यालयीन अध्यापन, ब्रिटीश सत्ते विरूद्धचा लढा, अलीपूर कारागृहातील एक वर्षाचा काळ तिथे झालेले भगवान श्रीकृष्णाचे दर्शन त्यामुळे जीवनाला मिळालेली कलाटणी, क्रांतीकारक ते महायोगी हा झालेला बदल, पाँडिचेरी येथे प्रयाण त्यानंतरचा तेथील एकांतवास व आध्यात्मिक साधना आणि महासमाधी. या त्यांच्या जीवन प्रवासाचा वेध या अंकात घेतलेला आहे.

भक्तीयोग, ज्ञानयोग, राजयोग, हठयोग इत्यादी योगांचा परिचय सर्वसामान्यपणे आहे. पण या सर्वांचा समन्वय साधून 'पूर्ण योगाची' संकल्पना श्रीअरविंदांनी सांगितली आहे. पशुकोटीतून विकास पावून 'मानव' अस्तित्वात आला. तसाच मानव कोटीतून 'अतिमानस' पुरुष (मानव) दिव्य मानव अस्तित्वात येईल असे श्रीअरविंदाचे सांगणे आहे आणि हेच त्यांचे 'वेगळेपण' आहे. या त्यांच्या शिकवणीचा परामर्श अंकात घेतला आहे.

त्यांचे बहुतांश साहित्य इंग्रजीमध्ये आहे. त्याची भाषा वैचारिक पातळी उच्चतम आहे. समजण्यास अवघड आहे. त्यांच्या या अक्षर वाङ्मयाचा परिचय करून देण्याचाही इथे प्रयत्न केला आहे. 'सावित्री' हे महाकाव्य, दिव्यजीवन, गीतेवरील निबंध, योग समन्वय इत्यादी ग्रंथामधील विचारांची ओळखही लेखांतून आपल्याला होते. त्यांच्या महासमाधीनंतर चालणारे अरविंद आश्रमांचे कार्य आणि पू. माताजींनी सुरू केलेल्या 'ऑरोविल'ची संकल्पना यांची माहितीही अंकात समाविष्ट केली आहे.

श्रीअरविंदांच्या शिष्या, अध्यात्म सहयोगिनी पू. माताजी श्रीअरविंदांचे विचार सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. त्या अभिमानाने आणि कृतार्थाने म्हणतात, ''माझ्याशिवाय ते अव्यक्त आहेत आणि त्यांच्याशिवाय तर मला अस्तित्वच नाही.'' आज २१ फेब्रुवारी पू. माताजींचा जन्मदिन. या शुभदिनी 'कल्याणी'च्या या 'योगी श्रीअरविंद' विशेषांकाचे प्रकाशन व्हावे ही केवळ श्रीअरविंद व श्रीमॉंचीच कृपा.

या विशेषांकास मूर्तरूप येण्यासाठी बहुमूल्य सहाय्य लाभले ते श्री. श्रीकृष्ण दिक्षित व त्यांच्या पत्नी सौ. मीरा दिक्षित यांचे ओंकार ट्रस्ट सदैव त्यांचे ऋणी आहे. नेहमीप्रमाणे अंकातील मान्यवर लेखकांनी लेख देऊन आम्हाला उपकृत केले आहे. जाहिरातदार, देणगीदार यांचे पाठबळ तर आहेच आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अंकाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवा.

धन्यवाद

सौ. कल्याणी शिवले
(उज्वला काळे)

श्रद्धांजली

ओंकार न्यासाचे
एक हितचिंतक व सर्वांगीण मदत करणारे
श्री. विवेक बाळकृष्ण काशिकर
यांचे १३-२-२०१३ रोजी अकस्मित निधन झाले.
ओंकार न्यासातर्फे त्यांना
भावपूर्ण श्रद्धांजली!

वाटचाल २०१२-१३




२६ जुलै १९९१, गुरुपौर्णिमा या दिवशी स्थापन झालेल्या ओंकार ट्रस्टच्या मागील कार्याची तसेच ट्रस्टतर्फे चालविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती आपल्याला अध्यक्षीय मनोगता-मध्ये वाचावयास मिळेलच. आता थोडासा मागोवा घेऊया चालू वर्षात झालेल्या कार्याचा.

१ मार्च २०१२ रोजी 'कल्याणी' 'महाराष्ट्रातील स्त्री-संत पंचक' विशेषांकाचे प्रकाशन मा. डॉ. सौ. कल्याणी नामजोशी यांच्या हस्ते झाले. त्याचवेळी पुण्याच्या 'वंचित विकास' या संस्थेस सन २०११-१२ चा 'वसुंधरा कृतज्ञता' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुरूवातीस संत मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई व वेणास्वामी या अंकातील पाच संत स्त्रियांच्या चरित्राचे थोडक्यात काव्यमय सादरीकरण सौ. शैला पटवर्धन यांनी लिहिलेल्या काव्याद्वारे सौ. आरती पटवर्धन व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. मंत्रमुग्ध करणारे हे सादरीकरण श्रोत्यांना खूपच भावले हे त्यांच्या अभिप्रायावरून कळले. 'शेवटच्या व्यक्तीचा विकास हाच आमचा ध्यास' हे ब्रीद वाक्य असणाऱ्या पुरस्कारार्थी वंचित विकासच्या संचालिका सौ. कुर्लेकर यांनी 'रेड लाईट' भागातील स्त्रिया व मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती आपल्या उत्तरादाखल केलेल्या भाषणांतून दिली. काम करताना येणाऱ्या अडचणीही त्यांनी सांगितल्या, त्या हृदय हेलावणाऱ्या होत्या.

सौ. कल्याणी नामजोशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भारतीय संस्कृतीतील स्त्रीचे स्थान तिच्या मर्यादा व तिची कर्तव्ये यावर अतिशय समर्पक मार्गदर्शन केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही १०वी च्या शालांत परीक्षेत संस्कृत व मराठीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस रोख बक्षीस देण्यात आले. यंदाच्या बक्षीसाचे मानकरी होते कु. तेजस सुदिव साजडा, कु. निशिगंधा विलास गुरूजी, कु. मृणाल राजगुरू.



स्व-रूपवर्धिनी व ओंकार ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर २०१२ मध्ये क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात स्व-रूपवर्धिनीच्या १७ शाखांतील इयत्ता ७वी ते महाविद्यालयापर्यंत वयोगटांतील ७०० मुलामुलींनी भाग घेतला.

ओंकार ट्रस्ट व योगाभ्यास शिकविणारी सोहम् योगसाधना ही संस्था या दोहोंच्यामार्फत कर्वे स्त्री शिक्षण संस्था हिंगणे येथे आठवड्यांतून एकदा योगासनांचा

वाटचाल २०१२-१३



वर्ग घेण्यांत येतो. गेले वर्षभर हा उपक्रम चालू आहे.

समाजप्रबोधनासाठी वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या प्रवचन व व्याख्यानमाला या उपक्रमांत यंदा पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले.

मार्च २०१२ मध्ये संस्थापक कार्यवाह कै. सौ. वसुंधरा सातवळेकर यांच्या स्मृतिदिना-निमित्त दरवर्षीप्रमाणे ३ दिवसांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. स्वामी विवेकानंदांच्या १५०व्या जयंतीवर्षाचे औचित्य साधून स्वामी विवेकानंदांचे कार्य व तत्त्वज्ञान या विषयावर समर्थभक्त मा. श्री. सुनीलजी चिंचोलकर यांची उद्बोधक व्याख्याने झाली.

गुरूपौर्णिमेला वेदांतील गुरुशिष्य-परंपरा सांगणारे प्रवचन डॉ. सौ. श्रद्धा परांजपे यांनी सादर केले तर दासनवमीला श्रीसमर्थ रामदास स्वामींचे जीवनावर आधारित प्रवचन श्रीमती पूजाधिकारी यांनी सादर केले. हनुमान-जयंती व श्रीमती कृष्णाबाई लिमये यांचे स्मरणार्थ दरवर्षी होणारे व्याख्यान ही दोन्ही व्याख्यानेही श्रीमती पूजाधिकारी यांनीच सादर केली. दोहोंचे विषय होते अनुक्रमे रामभक्त शबरी व श्री ज्ञानेश्वर महाराजांची संजीवन समाधी.

२४ नोव्हेंबर २०१२ ते २६ नोव्हेंबर २०१२ या तीन दिवसांच्या कालावधीत योगी श्रीअरविंद विचारमंच व ओंकार ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने महायोगी श्रीअरविंद यांचे जीवन, विचार, तत्वज्ञान व त्यांची अक्षरसंपदा या विषयावर व्याख्याने आयोजित केली होती.



अशी आहे न्यासाच्या कार्याची वर्षभरातील वाटचाल. यात आणखीही उपक्रमांचा समावेश असावा अशी इच्छा आहे. अर्थात् इच्छापूर्ती होण्यासाठी आपल्या सारख्यांचे सहकार्य सर्वतोपरी लागते, ते मिळतेच व पुढेही मिळत राहील, नव्हें त्यात वृद्धी होत राहील याची खात्री आहे.

■ ■ ■

''ओंकार'' न्यासातर्फे दरवर्षी ''वसुंधरा-कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात येतो.
सन २०११-२०१२ या वर्षासाठी **वंचित विकास, पुणे** या संस्थेस हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.
त्यावेळी प्रदान करण्यात आलेले मानपत्र सर्वांच्या माहितीसाठी या अंकामध्ये प्रसिद्ध करत आहोत.

वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार २०११-२०१२
वंचित विकास, पुणे
गुणगौरव

दिनांक : १ मार्च २०१२

'वंचित विकास' या संस्थेच्या नांवातून आणि **'त्या शेवटच्या व्यक्तीचा विकास हाच आमचा ध्यास'** या ब्रीद वाक्यातून संस्थेच्या कार्याची व ध्येयाची ओळख होते.

'मी बरा माझे बरे' ही सर्वसाधारण वृत्ती असते. या वृत्तीपेक्षा काहीतरी वेगळे करण्याचा ध्यास घेणारा तो 'वेडा' असा सर्वसाधारण समज असतो. 'लष्कराच्या भाकऱ्या भाजणारा' अशा शब्दांतही त्याची संभावना केली जाते. देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली तरीही देशात निरनिराळ्या स्तरांवर असणारी विषमता बघून अस्वस्थ झालेला व ती कशी कमी करता येईल? या विचारांनी त्रस्त झालेला एक सच्चा माणूस म्हणजे 'मा. श्री. विलास चाफेकर'. शिक्षण क्षेत्रांतील पी.एच.डी. पदवी प्राप्त केलेली असतानाही नावामागे ती उपाधी न चिकटवता ध्येयासाठी अचूक प्रयत्न करणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे विलास चाफेकर. २६ जानेवारी १९८२ रोजी आपल्या समविचारी माणसांना एकत्र करून त्यांनी 'जाणीव' संघटनेची स्थापना केली. यातूनच प्रशासकीय गरज म्हणून ८ सप्टेंबर १९८६ रोजी 'वंचित विकास' या न्यासाची स्थापना झाली. सर्व जाती-धर्मातील सर्व थरातील कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन सुरू केलेले हे कार्य त्यांनी आपल्या वयाची ६० वर्षे झाल्यावर स्वत:च्या कर्तृत्वाची झिंग चढू न देता 'पदां'च्या मोहात न पडता ती पुढील पिढीकडे सोपवली. सन २०११ हे या संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष. अध्यक्ष, श्री. विलास जावडेकर, संचालक श्रीमती मीना कुर्लेकर व सुनीता जोगळेकर तसेच इतर विश्वस्त आणि कार्यकारिणी मंडळाचे सदस्य यांच्या नेतृत्वाखाली 'वंचित विकास'चे संपूर्ण समाज परिवर्तनाचे कार्य चालू आहे.

कार्यकर्ते हा सामाजिक कार्याचा पाया आहेत. मानव निर्माण या प्रकल्पाद्वारे समाजोपयोगी कार्यकर्ते घडविण्याचे काम संस्थेच्या स्थापनेपासून सुरू आहे.

वंचित विकासचे मुख्य कार्य हे रेड लाईट एरियातील महिला व मुलांसाठी चालते. त्यांच्याच सन २०१०-११च्या वार्षिक अहवालावरून लक्षात येते की, या मुलांचे जीवन किती केविलवाणे व हृदय हेलावणारे असते. अतिशय दीनवाण्या व ओंगळवाण्या जिण्यामुळे या मुलांचे बालपण संपते. अशा मुलांचे बालपण जपण्यासाठी त्यांच्यात सकारात्मक भावना निर्माण व्हावी म्हणून 'फुलवा' या उपक्रमाद्वारे पाळणाघर बालवाडी चालविली जाते. अभिरुची वर्गातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून शिक्षण दिले जाते. हा प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रात राबविला जातो. रानवारा प्रकाशनद्वारे 'निर्मळ रानवारा' हे ४ ते १२ वयोगटांतील मुलांसाठी मनोरंजन व वैज्ञानिक माहिती देणारे मासिक चालविले जाते. नीहार या निवासी प्रकल्पातून शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या मुला-मुलींचे पुनर्वसन केले जाते. आत्तापर्यंत या प्रकल्पाद्वारे ६० मुला-मुलींचे पुनर्वसन करण्यात आले आहे. परित्यक्ता विधवा व गरजू महिलांसाठी लातूर येथील सबल महिला केंद्रातून ३५० स्त्रियांना आत्मनिर्भर बनविले गेले आहे. पाटणबोरी, जि. यवतमाळ येथेही आदिवासी मुलींच्या विकासासाठी चंडीकादेवी आदिवासी मुलींचे वसतिगृह आहे. पुण्यातील रेडलाईट एरियातील महिलांसाठी दवाखाना, मार्गदर्शन केंद्र, हॉस्पिटल व पॅथॉलॉजी लॅब चालविण्यात येते. 'वंचिता'चा विकास करण्याचे हे उपक्रम केवळ पुणे आणि महाराष्ट्रापुरतेच मर्यादित नाहीत तर मध्यप्रदेशातही संस्थेचे कार्य चालू आहे.

असे हे संस्थेचे असामान्य कार्य, त्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सेवक यांची ध्येयपूर्तीसाठीची धडपड पाहून ओंकार न्यासाचे विश्वस्त मंडळ प्रभावित झाले आहे. **'वंचित विकास' या संस्थेस २०१२ चा 'वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार' मा. सौ. कल्याणी नामजोशी यांच्या शुभहस्ते समारंभपूर्वक प्रदान करताना न्यासास अत्यंत आनंद व समाधान होत आहे.** आपल्या संस्थेस सुयश लाभो, आपल्या ध्येयाची पूर्तता होवो. आपल्या समाजात परिवर्तन घडून येवो. हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

आपले

म. वा. सरदेशपांडे
अध्यक्ष, ओंकार न्यास

भा.वा. सातवळेकर
उपाध्यक्ष, ओंकार न्यास

दि. १ मार्च २०१२

वाचकांच्या प्रतिक्रिया

अंकात माझे लेखही काव्यलेखन असते, तर तो आनंद काही वेगळाच! 'कल्याणी'चा हा स्त्रीसंतपंचक विशेषांक सर्व दृष्टींनी मोहक वाटला. सर्व लेखन जीवनचरित्र व काव्य यांनी युक्त असल्याने विभा-मांडीत लेखक-लेखिकांनी हा अंक समृद्ध केला आहे. सर्वच चित्रे आकर्षक. आदिशक्तीचे रंगीत चित्र मनोहर, तसेच संत कान्होपात्रेचे चित्र, तिच्या लावण्य-स्वरूपास साजेसेच आहे.

सौ. डॉ. आ. विश्वनाथ जोशी

श्री. भा. वा. सातवळेकर,
सदनिका-७, चंद्रमा अपार्टमेंट,
नित्यानंद भुवनाजवळ, रुपाली हॉटेलजवळ,
हिंगणे खुर्द,
सिंहगड रस्ता पुणे-५१
पिन PIN ४११०५१

॥ श्री ॥

H. M. Diwnale
स्वस्ती
दि. ७-५-२०१२

आदरणीय श्री. सातवळेकर यांना
स. न. वि. वि.

ओंकार ट्रस्ट कडून कल्याणीचा २०१२ चा "महाराष्ट्रातील स्त्री संत पंचक" विशेषांक मिळाला. वाचून अतिशय आनंद झाला. मी मागील काही विशेषांक वाचले आणि वाचनाची आवड निर्माण झाली. "महाराष्ट्रातील स्त्री संतपंचक" विशेषांक माहितीने परिपूर्ण आहे. आदिशक्ति मुक्ताई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, बहिणाबाई आणि संत वेणास्वामी यांनी कठिण परिस्थितीत राहून समाजासाठी मार्गदर्शन करणारे अभंग लिहिले. आपल्या मनाला प्रसन्न करणारे आणि उभारी देणारे असे साहित्य निर्माण केले. सर्व स्त्री संतांचा परिचय सर्व लेखकांनी करून दिला. त्याबद्दल त्यांचे आणि आपले मी आभार मानतो.

श्री

इचलकरंजी
नेत्र क्र. ७
संदेश-१९३४

माननीय श्री. भा. वा. सातवळेकर,
सप्रेम नमस्कार,

'नंदननामसंवत्सर' नव संवत्सराप्रीत्यर्थ, ओंकार ट्रस्टच्या आणि 'कल्याणी' नियतकालिकाच्या सर्व संबंधित कार्य-कर्त्यांना शुभ कामना!

'स्त्रीसंतपंचक' विशेषांक आणि 'वसुंधरा कलश पुरस्कार-समारंभाची पत्रिका वेळीच मिळाली. तसेच विशेषांकाची प्रतही मिळाली. माझे पुष्प त्यांत नसतानाही आपण अंक मला स्वखर्चाने पाठविला. आपणास मनोमन धन्यवाद देतो तसेच ओंकार ट्रस्टशी कृतज्ञता व्यक्त करतो. प्रवास वयोमानाप्रमाणे सुलभ राहिला नाही त्यामुळे समारंभास उपस्थित राहता आले नाही. विशेषांक पाहून आनंद वाटला. सर्वांना हा अंक आवडेल.

'ओंकार ट्रस्ट कडून प्रकाशित करण्यात आलेल्या कल्याणी विशेषांकांची माहिती आपण दिली. सर्वच अंक दर्जेदार असतील असे मला वाटते. फक्त तीन चार अंकच वाचण्याचे भाग्य मला मिळाले. आपल्या ओंकार ट्रस्टच्या कार्याची ओळख अध्यक्षीय मनोगत, संपादकीय, आणि वाटचाल, वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार या सदरातून करून दिली त्याबद्दल, आपल्या विश्वस्त मंडळाचे मी आभार मानतो आणि पुढेही आपले हे कार्य चांगले राहो अशी सदिच्छा व्यक्त करतो. [illegible]

To
श्री. भा. वा. सातवळेकर
७ चंद्रमा अपार्टमेंट, नित्यानंद हॉलजवळ, सिंहगड रोड,
हिंगणे खुर्द, पुणे
पिन PIN ४११०५१

टीप - जागेअभावी वाचकांकडून आलेल्या पत्रातील आवश्यक तेवढाच मजकूर प्रसिद्ध केला आहे.

वाचकांच्या प्रतिक्रिया

|| श्री ज्ञानेश्वर माऊली प्रसन्न ||

श्री ज्ञानेश्वरी जयंती उत्सव मंडळ, कराड

स्थापना : १९४९

।। दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।।

आवक क्रमांक :

दिनांक : 23/5/2012

अध्यक्ष
- डॉ. एस. जी. सबनीस (फोन नं. २७१२५२) (मोबा : ९४२११७७६७०)

सचिव
- डॉ. एम.बी. जोशी (फोन नं. २२८७०३)

सहसचिव
- प्रा. विश्वास कुलकर्णी (फोन नं. २२४०४५)

सहसचिव
- श्री. अशोक बोडस (फोन नं. २२४१८०) (मोबा : ९७६६०३९६६६)

खजिनदार
- प्रा. जी. व्ही. लगड (फोन नं. २७१२६१) (मोबा : ८०८७२६१५८४)

सदस्य
- श्री. मधुकर यादे (फोन नं. २७२३३८)
- श्री. सूर्यकांत कुलकर्णी (फोन नं. २२५९०५)
- श्री. अभय घोपाटे (फोन नं. २२४३९९) (मोबा : ९४२२४००४९८)
- श्री. दत्तात्रय पाणसरे (फोन नं. २७२७५८) (मोबा : ९८५०७०८८४८)
- श्रीमती अपर्णा करंदीकर (फोन नं. २२५६७२) (मोबा : ९६०४२५९३८४)

मा. संपादिका, सौ. कल्याणी शिवडे,
'कल्याणी' स्त्री संत पंचक विशेषांक,

स. न. वि.

आपण पाठविलेला 'कल्याणी स्त्री संत पंचक' विशेषांक मिळाला. अंक दर्जेदार व सर्वांगसुंदर आहे. स्त्री संतांची ओळख करून देणाऱ्या अभ्यासु साधकांना त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे विविधांगी दर्शन घडविणारा आहे.

ओंकार ट्रस्टने 'कल्याणी' या २९व्या अंकाचे प्रकाशन करून ओंकाररूपी वाङ्मय गणेशाची महापूजा केली आहे. या पूजेत आम्हा उभयतांना एकेक लेखनपुष्प समर्पित करण्यास सांगितलेत याबद्दल आपले आभार. अंकातील लेखांची निवड व त्यावरचे संपादकीय संस्कार यामुळे अंक निर्दोष होण्यास मदत झाली आहे. संपादिका सौ. कल्याणी ताई आपले विशेष अभिनंदन. ट्रस्टच्या माध्यमातून आपण सर्व विश्वस्त मंडळी करीत असलेले सामाजिक काम देशाच्या उज्वल भविष्यासाठी लाख मोलाचे आहे.

ओंकार ट्रस्टच्या ईश्वरीय कार्यास आम्हा उभयतांच्या हार्दिक शुभेच्छा. विश्वस्तांना सप्रेम नमस्कार कळावे.

आपले स्नेहांकित
श्री व सौ. विजया श्रीकांत सबनीस
'माऊली' कृष्णा कॅनॉल, विद्यानगर
कराड ४१५१२४

|| श्री || दि. 19/3/2012

आदरणीय संपादिका ताईस.
स. न. वि. वि.

ओंकार ट्रस्ट - कल्याणी 2012 चा महाराष्ट्रातील स्त्री संत पंचक विशेषांक दोन प्रतीत आणि सरस्वतीचे सुरेख मानचिन्ह प्राप्त झाले. प्रथम त्याबद्दल धन्यवाद.

अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा।
पंचकं ना स्मरेन्नित्यम् महापातक नाशनम् ॥

या पांच महासतींच्या स्मरणाने महापातकांचा नाश होतो. तर

मुक्ताई, जनाबाई, कान्होपात्रा, वेणा तथा बहिणाबाई।
पंचकं ना स्मरेन्नित्यम् संसार भय नाशनम् ॥ असे वाटते.

एकेका स्त्री संताचा एक पैलू घेऊन हे सर्वांनी पुरवणी पैठणीची घडी अलगद उलगडावी तसा तो पैलू उलगडून दाखविला आहे. प्रत्येक स्त्री संताचा लेख वाचतांना नोच अनुभव आला. या अंकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, व अंतरंग, तिन्हींचा ही त्रिवेणी संगम उत्कृष्ठ साधला आहे.

प्रत्येक घरा घरातून हा अंक वाचला जावा. विशेषत: सध्याच्या मुली - भावी माता, यांनी तर जरूर हा अंक वाचावा. जीवन कसे जगावे? हे या अंकातून प्रत्येकीला निश्चित समजेल व उमजेल.

याशिवाय एक विचार असा की, या पंच स्त्री संतांशिवाय महाराष्ट्रात बऱ्याचश्या स्त्री संत आहेत त्या विशेष परिचित नाहीत. त्यांचे हि जीवन चरित्र अंकातून प्रसिद्ध व्हावे ज्यामुळे जीवनआदर्श पुढील पिढीस कळतील व त्यांना त्यांचे जीवन जगण्यास अधिक उपयुक्त ठरेल.

आपल्या ट्रस्टचा सतत उत्कर्ष होत राहो ही सदिच्छा.

आपली विश्वासू
(सही)
श्रीमती पुष्पा नाईक
मो. 9867090114

P.T.O →

जय जय रघुवीर समर्थ

दासबोध अभ्यास मंडळ, मिरज.

(संलग्न - श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड)

द्वारा - शाम रघुनाथ साखरे

'सुमन निवास', खणीवरील विठ्ठल मंदिर, ब्राह्मणपुरी, मिरज फोन : (०२३३) २२२३८४३ मो. ९८५०३८०५३८

शाम रघुनाथ साखरे
अध्यक्ष
संपर्क ०२३३ २२२३८४३
मोबाईल : ९८५०३८०५३८

रामचंद्र यशवंत कांबळे
उपाध्यक्ष
मोबाईल : ९२२६०७३२७०

सौ. मेघा अविनाश भिडे
कार्यवाह
संपर्क ०२३३ २२२४९७४
मोबाईल : ९३७३७५८०००

|| श्री || 25-3-2012

श्री भा. वा. सातवळेकर
पुणे याना

ओंकार ट्रस्ट मार्फत कल्याणी 2012 महाराष्ट्रातील स्त्री संत पंचक विशेषांक मिळाला. अत्यंत आभारी आहे.

प्रतीवर्षाप्रमाणे आवर्जीना अंकही सर्वांगाने सुंदर व सुबक झाला आहे.

लेखकांचे लेख अभ्यासपूर्ण, माहितीपूर्ण असून ज्ञानात भर घालणारे आहेत यात शंकाच नाही.

उत्तरोत्तर अशीच प्रगती होत राहो ही श्री चरणी प्रार्थना.

सर्व सहकाऱ्यांना नमस्कार

आपला
(सही)

प्रेषक : डॉ. सौ. सुनंदा श्रीकृष्ण लोहकरे
'साकेत', ८९ स्नेहलनगर, वर्धा ४४२००१ दि. 27-03-12
(M) ९४२२१४३८८९, ९४२२९०४४४२

प्रति, वि. कार्यवाह, ओंकार ट्रस्ट, ७ चंद्रमा अपार्ट, नित्यानंद हॉल जवळ सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११०५१

स. न. वि. वि.

आपण आवर्जुन पाठविलेला, महाराष्ट्रातील स्त्री संत पंचक विशेषांक - 'कल्याणी' 2012 प्राप्त झाला. अंकातील लेख उच्च दर्जाचे असून माहितीने परिपूर्ण असल्याने संग्राह्य झाला आहे.

विविध विषयांवरील यापुढीलही कल्याणीचे अंक उत्तम दर्जाचे व संग्राह्य होतील, हीच सदिच्छा. धन्यवाद

भवदीय सौ. सुनंदा लोहकरे


ओंकार ट्रस्ट तर्फे प्रकाशित करण्यात आलेले कल्याणी विशेषांक

सन	विषय
१९९२	गुरुपौर्णिमा
१९९३	दासनवमी
१९९४	स्वामी विवेकानंद
१९९५	श्रीज्ञानेश्वर महाराज
१९९६	संत तुकाराम महाराज
१९९७	संत एकनाथ महाराज
१९९८	संत नामदेव महाराज
१९९९	श्रीगोंदवलेकर महाराज
२०००	श्री स्वामीस्वरूपानंद (पावस)
२००१	परमार्थपाणिनी श्री गुरुदेव रानडे
२००२	मधुराद्वैताचार्य श्री ज्ञानेश्वर कन्या श्री गुलाबराव महाराज
२००३	ब्रह्मीभूत परमहंस परिव्राजकाचार्य स्वामी प्रज्ञानंद सरस्वती
२००४	परमहंस परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज
२००५	परमपूज्य श्रीमंत बाबामहाराज आर्वीकर
२००६	परमहंस परिव्राजकाचार्य श्री सद्गुरू भगवान श्रीधर स्वामी महाराज
२००७	परमपूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद
२००८	श्री समर्थ रामदास स्वामी
२००९	भगवत् पूज्यपाद जगद्गुरू आद्य शंकराचार्य
२०१०	भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस
२०११	आधुनिक महिपती श्री दासगणुमहाराज
२०१२	महाराष्ट्रातील स्त्री-संत-पंचक

वसुंधरा कृतज्ञता पुरस्काराचे मानकरी

सन	नाव		कार्य
१९९७	डॉ. स्वर्णलता चंद्रशेखर भिशीकर	–	पंजाबमध्ये दहशती परिस्थितीत सामंजस्याचे वातावरण निर्मिती.
१९९८	प्रा. डॉ. अशोक प्रभाकर कामत	–	नामदेव अध्यासन (पुणे विद्यापीठ) द्वारे समाजप्रबोधन.
१९९९	श्री. सुनील गोपाळ चिंचोलकर	–	प्रवचन व व्याख्यानाद्वारे श्रीसमर्थ शिकवणीतून समाजप्रबोधन.
२०००	सौ. सिंधुताई श्रीहरी सपकाळ	–	अनाथ आश्रम- बालसंगोपन.
२००१	श्री. द्वा. वा. केळकर	–	पत्रद्वारा दासबोध अभ्यासक्रमाचे प्रर्वतक.
२००२	डॉ. सुनीलकुमार लवाटे	–	अनाथ आश्रम मुलांचे संगोपन व शिक्षण.
२००३	डॉ. पारस कपूरचंद शहा	–	मोफत नेत्रचिकित्सा शिबिराद्वारे रुग्णसेवा.
२००४	श्री. श्रीकांत मुंदडा	–	हृदयमैत्री चळवळ.
२००५	श्री. गिरीश यशवंत प्रभुणे	–	भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानद्वारे लोकसेवा.
२००६	मानव्य संस्था (संस्थापक - कै. विजयाताई लवाटे)	–	एच्.आय्.व्ही. पीडित मुलांसाठी कार्य.
२००७	श्री. राजा दांडेकर व रेणू दांडेकर	–	दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी शाळा व इतर उपक्रम.
२००८	श्री. विजय व सौ. साधनाताई फळणीकर	–	आपलं घर - अनाथ मुलांचे घर व वृद्धाश्रम
२००९	सौ. माधुरी प्रमोद अभ्यंकर (संचालिका- श्रीवत्स, सोफोश, पुणे.)	–	कुमारी माता व अनाथ मुलांचे पुनर्वसन.
२०१०	सौ. मृणालिनी भाटवडेकर	–	सावली सेवा ट्रस्ट, रेड लाईट एरियातील मुलांचे पुनर्वसनासाठी कार्य.
२०११	श्री. दिलीप कुलकर्णी	–	पर्यावरणासाठी कार्य.
२०१२	वंचित विकास संस्था	–	रेड लाईट एरियातील मुलांचे व स्त्रियांचे पुनर्वसन कार्यासाठी

अंतरंग



श्रीअरविंद वंदना

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम. बी. एड.
सेवानिवृत्त शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय

।। ॐ ।।

जे इहलोकीचे नवल गतकालाने अनुभवले,
वर्तमानसीमेने त्या नतमस्तक वंदन केले।
ते उद्याहि तेज असेल साधनदर्शन जगतासी
'योगीराज श्रीअरविंद' अर्घ्य हे दिव्य चरणांसी।।

वंदना तेजोमया, गुणगंभीरा, सर्वात्मका,
निर्मिका, संवर्धका, संरक्षका, तुज वंदना।
सच्चिदानंदा हरी, तू रूप घेसी मानवी,
बदलता मनु, रूप नूतन, साक्ष जगता ही नवी।।


विश्वव्यापी, अंशराशी, तेज दे उत्थापना
सत्य सुंदर मंगला ही 'पूर्णयोगी' साधना।।
सत्यमयी चैतन्यमयी हृदयेश्वरी शांतिप्रिये
सर्वसाक्षी आदिमाया शक्ति माँ, तुज वंदना।।

राष्ट्रउद्धारार्थ जे सामर्थ्य देते साधना
उत्क्रांतिदर्शी गुरूवरा, श्री अरविंदा, वंदना।
द्या प्रसादा शब्दसुमने होऊ द्या आराधना,
हृदयिच्या परमात्मतत्त्वा पूर्ण व्हावी अर्चना।।

।। तस्मै श्री गुरवे नमः ।।
।। हरिॐ तत् सत् ।। ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

विसाव्या शतकाची अमर देणगी-

महायोगी श्रीअरविंद



प.पू.स्वामी विद्यानंद

स्वामी विद्यानंद हे पावसच्या स्वामी स्वरूपानंदांचे शिष्य होत / आहेत., नाथ परंपरेतील संतपुरुष, श्रीअरविंदांचे अत्यंत गाढे अभ्यासक, त्यांनी सुमारे अध्यात्मिक अशा ४० ग्रंथांची निर्मिती केली आहे. श्रीअरविंदांच्या सावित्री या महाकाव्याचा गद्यात्मक अनुवाद- ''जगावेगळे जीवनपुष्प'' या द्वारे केला आहे.

ॐ

अध्यात्मरामायणात लोकविलक्षण अशी एक कथा आहे. एकदा श्रीरामप्रभूने हनुमंताला बोलाविले व सांगितले की, यज्ञाची सिद्धी करून राज्यारोहणविधीची तयारी करावी. यज्ञ कशाचा व राज्यारोहण कुणाचे, याचा हनुमंताला काहीच बोध होईना. कारण त्यावेळी नुकताच रावणाच्या नगरीचा व सीतेच्या वास्तव्याचा केवळ शोध लागला होता. खरा रणसंग्राम पुढेच व्हावयाचा होता. नवीन राज्यारोहण होण्यासारखी परिस्थिति कुठेच दिसत नव्हती. हनुमंताच्या मनांतील ती खळबळ जाणून, श्रीराम खुलासा करीत बोलले की, ''राज्यारोहण बिभीषणाचे व्हावयाचे आहे, योजना सिद्ध करावी.'' खुलासा होण्याऐवजी हनुमंताच्या मनातील खळबळ आणखीच वाढली. बिभीषण हा असुर व त्यांतही रावणाचा बंधू एवढीच त्याची कल्पना. त्यामुळे हे विपरीत भासणारे राज्यारोहण व तेही श्रीराम करणार आणि तोसुद्धा शत्रुपक्षाचा पराजय वा आपला विजय होण्यापूर्वीच. सगळाच चमत्कार. हनुमंत हा आज्ञाधारक सेवक असल्यामुळे, यज्ञास आवश्यक असलेल्या सर्व नद्यांचे तीर्थ, काष्ठे, समिधा आदि यज्ञसामग्री त्याने गोळा करून आणली, तसेच राज्यारोहणाची सर्व सिद्धता केली व बिभीषणाची प्रार्थना करून त्यालाही श्रीरामासमोर उपस्थित केले. मंगल वाद्यांसह यथोचित असा यज्ञ व राज्यारोहण समारंभ विधिपूर्वक साजरा झाला. बिभीषणाला आनंदाने भरते आले व श्रीरामाला त्याने कडकडून आलिंगन दिले. आनंदपूर्ण सोहळा, आनंदाश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी पहात हनुमंत शेजारीच उभा होता. सोहळ्याचा आनंद होता. परंतु या घटनांनी तो स्तिमित झाला होता. त्याचे मनांतील विचार व भावनांचा कल्लोळ जाणून श्रीराम उद्गारले, ''हनुमंता, सृष्टीत घडणारी प्रत्येक घटना सृष्टिदेवीच्या मनोपटलावर बराच काळ आधी साकार होत असते. प्रत्यक्षांत ती पुढे अवतरते. बिभीषणाचे राज्यारोहण हाही तसाच एक भाग आहे.'' पृथ्वीमातेच्या अंत:करणांत आकार घेणारा सोहळा हा फक्त श्रीरामाला दिसला व त्यानीच दिलेल्या दृष्टीमुळे, हनुमंताला कळू शकला. प्रत्येक जीवाचे बाबतींत असेच घडत असते. परंतु ते पाहण्याची दृष्टी मात्र क्वचितच एखाद्या दिव्यानुभूतिसंपन्न अशा व्यक्तीला लाभलेली असते. असा वैश्विक घटनांचा द्रष्टा तथा भारतमातेचा अनन्य सेवक, मुक्तिदाता आणि आधुनिक काळांतील महामानव म्हणजेच पूर्ण-योगी श्रीअरविन्द. विसाव्या शतकाने अवघ्या विश्वाला व विशेषकरून भारताला दिलेली ही अपूर्व अशी देगणीच होय.

ह्यालाच पुष्टीकारक श्री माताजींचेही एक विधान आहे. श्री माताजी देखील श्रीअरविंदांसारखेच एक साहसी व्यक्तिमत्त्व आहे. ज्यांनी श्रीअरविंदांच्या भौतिक तथा आध्यात्मिक महतीस तथा अफाट कार्याला गोंडस आकार दिला. तसेच अतिमानस अवतरणाला पूर्तताही आणली. त्यांनी श्रीअरविंदांविषयी उद्गार काढले ते असे.

"What Shri Aurobindo represents in world history is not a teaching, revelation but the direct action from the supreme"

जागतिक इतिहासात श्रीअरविंदांचे प्रतिनिधित्व केवळ प्रबोधनकार किंवा अवतारी महात्मा म्हणून नव्हे तर श्रीअरविंद ही त्या श्रेष्ठतम वैश्विक चैतन्याने निर्माण केलेली प्रत्यक्ष कृती आहे. किंबहुना श्रीअरविंदांनी घडवून आणलेल्या अति-मानसाचे अवतरणाकडे पाहून तथा त्यांनी निर्माण केलेल्या ऑरोव्हिलच्या जगडव्याळ संकल्पनेकडे पाहून असेही म्हणता येईल की सृष्टीच्या रचनाकारानेच श्रीअरविंदांच्या माध्यमातून नवसृष्टीची व त्या सृष्टीच्या उभारणीकरता नव-वंशाची सुरेख आखणी केली आहे.

महापुरूषांचे सर्वच कांही आगळे व वेगळे असते. एका ठराविक चौकटीत जन्माला येणारे, स्थितिबद्ध संस्कारांनी घोषित होणारे व चौकटीतलाच व्यक्तिगत वा सामाजिक प्रपंच सहसा महापुरूष करीत नाहीत. टाकीचे घाव स्वत: न तुटता सहन करण्याची क्षमता असणारे व आकारास आल्यानंतर देवकलादेखील स्वयंभूषणे प्रक्षेपित करण्याचे सामर्थ्य असणारेच महापुरूष होऊ शकतात. ती क्षमता व ते सामर्थ्य देखील ईश्वरदत्तच त्यांना लाभलेले असते. स्वामी विवेकानंदांनी एकदा उद्गार काढले होते,

"One, who chooses the Divine, has already been chosen by the Divine"

परमेश्वरप्राप्ती हे ज्याने जीवनध्येय म्हणून निवडलेले असते, त्याची निवड परमेश्वराने आधीच करून ठेवलेली असते. सर्वच सत्पुरूषांना लागू पडावे असेच स्वामी विवेकानंदांचे हे विधान आहे. श्रीअरविंद हे तर जणू काय या विधानाचा समूर्त पुतळाच होत.

वस्तुत: भारतीयत्वाचे कुठलेही संस्कार आपल्या बुद्धिमान व गोंडस बालकावर होऊ नयेत, अशीच श्रीअरविंदांच्या पित्याची इच्छा होती. आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असल्यामुळे, त्यांनी या मुलाला तत्कालीन उच्चभ्रू, सुधारलेल्या, प्रगत तथा सुशिक्षित गणल्या जाणाऱ्या व भारतीयांच्या जेत्या अशा आंग्लभूमीत, लहानपणापासूनच संस्कारित करण्याचा प्रयत्न केला. ते यशस्वीही झाले. वडिलांच्या इच्छेप्रमाणे, मुलावर आंग्लप्रदेशीय बाह्य संस्कार जरूर घडत होते. बालकाची मूळची प्रज्ञा अत्यंत तेजस्वी, चतुर व गुणग्राहक असल्यामुळे, त्याची प्रभा बालपणापासूनच फाकू लागली. कुशाग्र बुद्धीचा श्रेष्ठ स्तर, कधीच ढळला नाही. परंतु त्याच वेळी, विशुद्ध भारतीयत्वाने परिप्लुत असे अंतरंगही विकास पावत होते. पूर्वजन्मांचाच सूक्ष्म असा तो धागा असल्यामुळे पिता व पुत्र दोघांनाही नकळतच तो वाढत होता, गती घेत होता. बाह्याला अंतरीची जोड मिळत होती आणि दोन्ही प्रकारच्या वाती एकत्र येऊन, हळूहळू, न कळत, दिव्यत्वाची ज्योत मंदपणे तेवू पहात होती. विविध विषयांतील ज्ञानकुशलतेबरोबरच, साहित्यप्रेरणा मनांत प्रसवूं लागली होती. पुढे थोर साहित्यिकांनीही तोंडात बोट घालावे इतके सुंदर, प्रतिभासंपन्न, प्रासादिक व चिरंजीव सारस्वत श्रीअरविंदांकडून प्रस्फुरित झाले. अंतर्मनांतील दिव्य संस्कारांची वात, बाह्य संस्काररूपी वातीला जोडली गेल्यामुळे, विशुद्ध अध्यात्मिक तेजाचा प्रखर दीप म्हणूनच जगापुढे आला.

शिक्षण चालू असताना दिव्यत्वाचा स्पर्श लाभलेली साहित्यप्रेरणा बीजरूपाने अंतर्मनांत ठसत होती. त्याचवेळी भारत व आपण यांचे असलेले अजोड नाते, जणुं व्यक्तित्व धारण करत हृदयाच्या आंत कुठेतरी डोकावत होते. भारतमातेची परतंत्रता कधी मनाला अस्वस्थ करीत होती, तर कधी तिच्यावर परकीयांकडून होणारे अत्याचार हृदयाला रक्ताळून सोडत होते. आपला जन्म भारतमातेच्या मुक्तियज्ञाला वाहिलेले फूल म्हणून तर नसेल ना? असे ही कधी मनाला चाटून जात असे. आणि त्यांतून विश्वासगर्भ असेही कधी वाटे की, आपल्या जन्मदिन तोच तर नसेल ना, की ज्या दिवशी भारतमातेच्या पारतंत्र्य शृंखला तुटून, गळून पडतील! झालेही तसेच, ज्ञानोत्तर दशेत, ज्या काळांत भारतमातेचा आत्मा त्यांचेशी बोलूं शकत असे. त्या काळात त्यांनी सांगितले होते, ''भारत हा स्वतंत्र होणारच Decree has already been passed" आणि तो १५ ऑगस्टलाच स्वतंत्र झाला ज्या दिवशी प्रभातकाळी, सूर्योदयापूर्वी एक तास, श्रीअरविंदाचा जन्म झाला होता. सृष्टिदेवीच्या अंत:पटलावर आकारित झालेले, बिभीषणाचे राज्यारोहण असे श्रीरामाने पाहिले होते, तसेच भारतमातेचे स्वातंत्र्यही श्रीअरविंदांना दिसले होते. स्वामी विवेकानंदानाही ते दिसले होते. आपली युरोपची यात्रा संपवून आल्यावर १८९६ साली, मद्रासच्या एका भाषणांत ते म्हणाले होते की, आणखी ५० वर्षानंतर भारत स्वतंत्र होईल. ऋषिवाणी खरी ठरली. १५ ऑगस्ट १९४७ साली आपण स्वतंत्र झालो.

अध्यात्मदृष्ट्या आत्मस्वातंत्र्य तथा सामाजिक दृष्ट्या भारताचे स्वातंत्र्य या दोन्हींचे स्फुल्लिंग अंत:करणांत नकळत मिणमिणणाऱ्या दिव्य ज्योतींत समाविष्ट करूनच या लहानग्याने प्रवेश केला. इंडियन सिव्हिल सर्व्हिस ही त्या काळांतील परमश्रेष्ठ पदवी धारण करून भारतात कलेक्टर या उच्च पदावर आरूढ व्हावे ही पित्याची इच्छा. परंतु परमपित्याने मात्र वेगळीच इच्छा अंतर्मनांत सळसळत ठेवल्यामुळे श्रीअरविंद अस्वस्थ झाले. परीक्षेतच जर नापास झालों, तर परक्यांचे दास्य करून स्वकीयांवर अत्याचार करण्याच्या पापांतून आपण मुक्त होऊं अशा विचाराचा एक धागा घट्ट धरून श्रीअरविंदांनी तोच निर्णय घेतला. घोड्यावर बसण्यासारख्या सामान्य परीक्षेत आपणहून ते नापास झाले. कारण त्यांच्या बुद्धीची तेजोमय झेप इतकी विलक्षण होती की, इतर विषयांत मुद्दाम नापास होणे देखील त्यांना जमूं शकले नाही. कसे का होईना परंतु एका उच्च परिक्षेत नापासाचा शिक्का स्वत:हून घेऊन ते भारतात आले. एक अनामिक धगधग हृदयांत तेवत होती. तसे पाहिले तर व्यावहारिक दृष्ट्या डोळ्यासमोर अंधारच होता. परंतु त्यांचे नाते आतां व्यवहारांशी राहिले नव्हते. उलट एक दिव्य शक्तीच त्यांना त्यांचे व्यक्तिमत्व तथा देह या दोहोंसह आपल्या कक्षेत ओढू पहात होती.

भारतांत मुंबईला येतांच एक अद्भुत दर्शन घडले. तरल व सूक्ष्म अशा तेजलहरींना धूसर व कणयुक्त अशा मेघांचा आकार प्राप्त झाला. त्या मेघाने, आपल्या हळुवार लहरींनी श्रीअरविंदांना लपेटून घेतले आणि होता होता सर्व आसमंत अगदी क्षितिजापर्यंत त्या तेजाने झाकाळून निघाला. असाच दिव्यानुभव आणखी एकदा हिमालयाच्या दौऱ्यावर असतानादेखील आला होता. दिव्यत्वाची इतरांना न दिसणारी वलये त्यांना वेढून घेत असतानाच, भौतिक जीवनदेखील एका वेगळ्याच पद्धतीने आकारित होऊ लागले. बडोद्याचे नरेश श्री. सयाजीराव गायकवाड हे राजे असून लोकोद्धाराकरिता तळमळणारे होते. त्यातही विद्या व कला यांकडे विशेष लक्ष पुरविणारे होते. त्यांचे डोळ्यांत श्रीअरविंदांसारखा बुद्धिमान व तेजस्वी तरूण न भरला तरच नवल. त्यांचे विनंतीस मान देऊन, शिक्षक या संस्थेची उदात्त व मांगल्यपूर्ण आंतरिक जाण असल्यामुळे, श्रीअरविंद बडोद्याच्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून दाखल झाले. या ठिकाणी सरस्वतीचे दान व ग्रहण अशी दुहेरी उपासना चालू झाली.

ज्याप्रमाणे पतंग आकाशांत उंच झेपाऊं लागावा व त्याच वेळी वेगळ्याच वायूच्या जोरदार प्रवाहाने त्या पतंगाला वरच्यावर दुसरीकडेच अकस्मात् ओढून न्यावे त्याप्रमाणेच श्रीअरविंदांच्या जीवनांत घडले. भारत शृंखलामुक्त करण्याचे विविध प्रयोग भारतीय जनमानसांत कार्यरत झाले होते. सनदशीर वैधानिक मागण्यांपासून तो प्रखर क्रांतिकारक चळवळींपर्यंत सर्वच क्षेत्रांत एक प्रकारची जागृती दाटलेली होती. जो तो आपल्या परीने नेटाने, उत्साहाने व त्यागपूर्वक परिश्रम करीत होता. हे सर्व श्रीअरविंद चाणाक्षपणे पहात होते. त्यांचाही जीव स्वातंत्र्याकरितां तळमळत होता. आपल्याकडूनही भरघोस आहुति या यज्ञांत पडावी ही पूर्वीपासून मनात तेवत असणारी आस आतां अधिक प्रज्वलित होऊं पहात होती. तिची धग वाढूं लागली, तसें एकदम क्रांतिकारक चळवळीने त्यांना अधिक आकर्षित केले आणि त्या वेगवान प्रवाहात श्रीअरविंदांचा मनोरूपी पतंग जोराने खेचला गेला. लोकजीवनात स्वातंत्र्य चळवळीचे निखारे भारतीय अस्मितेची फुंकर घालून अधिक

तेजस्वी करण्याकरितां व संपूर्ण चळवळीचा स्तर आर्यत्वाच्या पातळीवर आणण्याकरिता विविध माध्यमांतून त्यांनी लेखमाला चालूं केल्या व स्वत:चेही साप्ताहिक चालूं केले. रणयज्ञाबरोबरच ज्ञानयज्ञही सुरू केला आणि भारतमातेच्या मुक्ति-आंदोलनाबरोबरच वेदोपनिषदांतून ध्वनित होणाऱ्या पुराणपुरुषाचे मुक्तिगान लोकजीवनांत गुंजित करण्याचा प्रयत्नही सुरू केला.

राजकीय चळवळीचा झंझावत प्रचंड वेग धरूं लागला. त्याबरोबरच सत्तेची दमनचक्रेही अधिक वेगाने फिरूं लागली. स्वातंत्र्य मिळविण्याची जिद्द वाढू लागली. त्याचबरोबर अनेकानेक मार्गांनी व विविध स्तरांवर देशभक्तांची गळचेपीदेखील अनेक आकार घेऊ लागली. या सगळ्यांची आच श्रीअरविंदांना उघडपणे व भेदकपणे बसत होती. सहनही करावी लागत होती. परन्तु हे सर्व करणे, करविणे म्हणजे शक्तिमाता भगवती देवीची प्रकट उपासनाच होय असाच श्रीअरविंदांचा भाव होता. भारतमाता व देवी भगवती म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असे ते मानीत आणि दोन्ही प्रकारच्या साधनेकरितां आवश्यक ती शक्ती प्राप्त व्हावी म्हणून व्यक्तिगत ध्यान व प्राणायामाची साधनाही चालू असे. त्यातूनच भरपूर लेखनाची प्रेरणाही मिळत असे, विविध पातळीवरील दृष्टांत दर्शने आदि अनुभवही प्राप्त होत असे आणि अत्यंत आकांतजन्य परिस्थितीतही चित्ताची शांतता ढळत नसे. अशा अंतर्बाह्य हेलकाव्यांच्या दडपणाखाली काळ पुढे सरकत असतानाच ते अलिपूर बाँब कटाच्या प्रकारणात गोवले गेले. तुरूंगवास झाला व पुढचा सगळाच जीवनौघ बदलला.

परिस्थिति एवढे रौद्र रूप धारण करून आली होती की, तुरूंगातून बाहेर पडण्याची सुतराम शक्यता दिसत नव्हती. राज्यकर्तेच न्यायाधीश, देशद्रोह तथा खून केल्याचा आरोप, ४०० च्या वर जमवून आणलेल्या साक्षी, आरोपींची निर्धन अवस्था, आणि खुनशीपणाने वागून दराराच निर्माण करायला हवा असाच सरकारी पक्षावर येत असलेला रेटा. अशा गडद अंधारात देखील श्री अरविंद शांत होते, निराशही झालेले नव्हते. तथापि जीवनाची आशा मात्र पूर्ण मावळली होती. वंदे मातरम्, आर्य, इंदुप्रकाश आदि साप्ताहिकांतून पुरविली गेलेली देशभक्तीची ज्योत म्हणजे आपल्या बाणेदार, विचारपूर्ण व सखोल तळमळीचा परिपाक असे आजवर वाटत होते. त्यांतून सहजच निर्माण झालेला अहंकारदेखील आतां लुप्त होऊ लागला होता. सर्व काही ईश्वरी सत्तेनेच घडते, आपण पूर्णत: निर्बल व जे काही बलपूर्ण दिसते त्याचे केवळ निमित्तमात्र आहोत. असाच विचार प्रभावी झाला होता. मनाच्या अंतर्बाह्य तगमगीच्या अवस्थेतसुद्धा, तुरुंगातदेखील होईल तितकी योगसाधना चालूच होती. अनुभूतीची झेप उंचावत होती. मृत्यू दिसत असला तरी मृत्यूची भीती वाटत नव्हती. कुठल्याही क्षेत्रांत मी करतो हा भाव नव्हता, परंतु कोण करतो हे जाणून घेण्याची मात्र तीव्र इच्छा होती. त्यांतून दिव्यानुभूतीची नवनवीन दालने उघडत होती आणि अशाच एका रात्री योगसाधनेत मग्न असताना, नेत्रांच्या आंत लख्ख प्रकाश दाटल्यासारखा अनुभवाला आला. डोळे उघडतांच, तुरूंगातील बलाढ्य भिंतींसह सर्व आवार प्रकाशलहरींनी जणू न्हाऊन निघत होते. त्यांत तरलता होती, कंपने होती, झळाळ होता आणि तिन्ही एकवटून नयनमनोहर, सगुण, साजिरी, मधुर घनाकृती मनुष्यरूप घेऊन अगदी समोर साकारत होती. दृश्य स्पष्ट झाले व साक्षात् भगवान् गोपालकृष्ण नेत्रद्वयासमोर तरंगू लागले. क्षणांत बोलके झाले. मानव केवढा बद्ध आहे आणि बद्धतेच्या कड्या तोडण्याचे सामर्थ्यही त्याच्यात नाही याची जाणीव देखील ते शब्द देऊन गेले. त्याचवेळी एक विश्वास व दिलासाही बोलका झाला. 'बद्धतेचे पाश तुझ्याकरिता मी तोडून टाकीन' अशी अभिनव वाक्‌संवेदना प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या मुखांतून आलेली श्रीअरविंदांना ज्ञात झाली. ते स्तिमित झाले. मृत्यूतून सुटका होण्याची सुतराम शक्यता नसताना श्रीकृष्णाचे भाकित खरे कसे होणार? ही अद्भुत किमया कशी घडणार ? इकडे डोळे लागले होते. दैनंदिन साधना अधिक कार्यक्षम होऊ लागली होती. तुरूंगाच्या आवारांत साधना, शक्ती, भक्ती आणि भगवान् श्रीकृष्ण तरंगाकार होऊन आसंमत वेढून टाकत होते व त्याचवेळी तुरुंगाबाहेर खटला सुरू झाला होता. रोज तेथेही न्यायालयात आरोपी म्हणून जावे लागत असे. तुरूंगाच्या आवारांत जाणवणारे दिव्य तरंग अधिक विकसित होऊन, त्यांनी न्यायालय देखील वेढून टाकल्याचा हृदयस्पर्शी अनुभवही अकस्मात् आला व विश्व झळाळून गेला. त्यांत आपण स्वत:, समोरील न्यायाधीश, बाजूचे वकील व शेजारील आरोपी हे सर्व जणु वासुदेवच होत असा प्रत्यय आला.-

'हे समस्तही श्री वासुदेवो । ऐंसा प्रतीतिरसाचा वोतला भावो । तो भक्तांमाजी रावो । आणि ज्ञानिया तोची ।।'

ही ज्ञानदेवांची उक्ती जणुं समूर्त झाली. ज्ञान, भक्ती, कर्म व योग या चार पायावर शांतीची मूर्ती अधिष्ठित झाली. मूर्तीच्या दृष्टीतून बाहेर पडणारी प्रत्येक शलाका ज्ञान, पावित्र्य, प्रेरणा, जिव्हाळा व आनंद एकवटूनच जणू बाहेर पडत होती व क्षणांत अवघे विश्व जणू वेधून टाकत होती. तपस्या फळाला आली होती. न्यायालयाने निर्णय दिला. श्रीअरविंद सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त झाले. अद्भुत घडून आले. श्रीकृष्णाचे दैवी भाकित खरे ठरले. अवघड पाश सहज तुटले. अशक्य तेच शक्य झाले.

राजकीय आरोपांतून सुटले असले तरी पोलिसांचा ससेमिरा चुकला नव्हता. राज्यकर्त्यांची वक्रदृष्टी सरळ झाली नव्हती व श्रीअरविंदांना कुठेतरी गोवण्याचा त्यांचा प्रयत्न चालूच होता. परंतु आतां त्यांना कशाचीच क्षिती वाटत नव्हती. विश्वातीत महाशक्ती आपल्या पाठीशी आहे याची त्यांना पूर्ण जाण होती किंबहुना तीच महाशक्ती म्हणजे आपण हा प्रेरणात्मक शुद्ध भाव प्रत्यक्षानुभूतीत कसा उतरेल याकरिताच आता सर्व धडपड चालू होती. भारतमातेचे स्वातंत्र्य आता डोळ्यासमोर दिसू लागले होते, त्याची चिंता नव्हती. तगमग नव्हती. अध्यात्माच्या प्रांगणातील एक नवीन विश्व मंद, धूसर किरणांनी डोळ्यासमोर येऊ पहात होते. त्याकरितांच आता शक्तिसर्वस्व वेचावे, प्रत्यक्ष बलिदानाची किंमत वेचावी लागत असेल तर त्याकरिताही अपूर्व त्यागाची त्यांची तयारी होती. याचीही सूक्ष्म जाण, एका त्यागी ईश्वरभक्ताच्या मनात निर्माण झाली. ईश्वरीय कार्य कित्येकदा अद्भुत स्तरावरून आकारास येते. तसाच प्रकार येथेही घडला. स्वामी विवेकानंदाच्या शिष्या भगिनी

निवेदिता यांनी त्यांना भारत सोडून जाण्याचे सुचविले. ईश्वरी प्रेरणेनेच एक दिवस श्रीअरविंद गुप्तपणे ब्रिटिशांचा अंमल नसलेल्या पाँडिचेरी या दक्षिणेकडील फ्रेंच वसाहतीत येऊन पोहोचले.

जे धूसर, अस्पष्ट दिसत होते, ते स्पष्ट करून घेणे एवढा एकच ध्यास आता श्रीअरविंदांना लागला होता. त्याकरिता आवश्यक असलेली अनासक्ती त्यांनी कधीच मिळविली होती. प्रत्यक्ष पत्नी आजारी असताना देखील ते तिच्या भेटीस गेले नव्हते. तिची विनवणी त्यांनी धिक्कारली. कारण त्याच सर्वंकष स्वरूपाचे असीम प्रेम सर्व प्राणिमात्रांविषयी त्यांच्या मनात निर्माण झाले होते. त्याचा संकोच करून एकाच व्यक्तीभोवती सीमित करणे त्यांना शक्य नव्हते. वैश्विक प्रेमाच्या विशाल जाळ्यांतील, पत्नी व पतीमधील प्रेम निरीच्छ स्तरावरील असले, तरी केवळ एक तंतू, एवढीच किंमत त्याला द्यावी लागत होती, हे समजून घ्यावे अशीच आर्जवपूर्वक विनंती त्यांनी आपल्या पत्नीला केली. स्वत:चा भाऊ रणचंडीच्या यज्ञांत आहुती देऊन अंदमानलाच मुक्त झाला होता. आई, वडील, सुहृद्, सोयरे इ. कुठलेच धागे बंधन स्वरूपात त्यांनी शिल्लक ठेवले नव्हते.

'देवाच्या सख्यत्वासाठी । साधाव्या प्रियजनांच्या तुटी ।
सर्वस्व अर्पावे शेवटी । प्राण तोही वेचावा ।।'

या समर्थांच्या उक्तीप्रमाणे ते मोक्षसिद्धीच्या उंबरठ्यावरच येऊन पोहोचले होते. आतां उरले फक्त मोक्षाच्या रमणीय, तेजस्वी व विशाल दालनांत प्रवेश करणे, त्याचा निरंतर आस्वाद घेऊन, त्यापुढील भव्य व दिव्य क्षितिजे न्याहाळून ती आत्मवत् करणे, एवढेच नव्हे तर अखिल मानवजातीकरितां या निखळ आनंदमय अवस्थेचा मार्ग सुगम करून ठेवणे.

याकरितां श्रीअरविंदांनी आपल्या तत्वज्ञानाची एक आखीव व रेखीव अशी बैठक तयार केली. त्याचप्रमाणे त्यांना अभिप्रेत असलेले विशाल उद्दिष्ट प्राप्त करण्याकरितां ठसठशीत व सुस्पष्ट असा साधन मार्गही नियोजित करून ठेवला. वेद व उपनिषदांतून जे ध्वनित होते, त्यांच्याशी कुठेही विरोध न होता, त्यांतही जेथे सुस्पष्टता नाही, तेथे ती करून तेवढ्यावरच मात्र ते थांबले नाहीत उलट स्वत: खडतर व दीर्घ तपस्या करून तेही त्यांनी हस्तगत करून घेतले, ज्याचा आद्य ऋषींनी केवळ संकेत करून ठेवला होता. त्या अतिमानसाचे दर्शन व त्या भूमातेच्या अंत:करणात महत्प्रयासाने करून घेतलेले अवतरण हा श्रीअरविंद जीवनात साकारलेला अभूतपूर्व असाच भाग म्हणावे लागेल.

असे म्हणण्यांत येते की, श्रीअरविंदप्रणीत खरी साधना मोक्षापासूनच सुरू होते. मोक्षप्राप्ती हेच अध्यात्मिक जीवनांतील उच्चतम उद्दिष्ट असेच सर्वसाधारपणे समजण्यात येते. कारण मोक्षप्राप्ती मुळात बरीच उच्च दशा असल्यामुळे तिथपर्यंत जाणारा विरळा. जो जातो त्याला मात्र जेवढे मिळविले त्यापेक्षाही कितीतरी अनंतपट पुढे उभे आहे याची कल्पना येते. अर्थात् जे मिळविले त्यामुळेच पुढचे मिळविणे शक्य असते हेही तो जाणतो. मोक्ष म्हणजे मुक्ती. मुक्ती म्हणजे बंधनांत नसणे. वस्तुत: आपण म्हणजे आत्मा परंतु लोकव्यवहारांत देहालाच आपण सर्वस्व मानतों. त्यामुळे देहाला निर्माण करणारा व त्यात चैतन्य प्रवाहित करणारा आत्मा आहे याची पुसटशी जाणही आपण गमावून बसतो. जो 'आपण', आत्म्याची जाण गमावून बसतो, त्यालाच जीव असे म्हणतात. त्या जीवावर मनादि विकाराची वलये निर्माण होतात त्यामुळे तो बंदिस्त होतो व आत्म्यापासून दुरावतो. जेव्हा जेव्हा भक्ती, कर्म वा ज्ञान अथवा योग यांच्याद्वारे जीवावरची वलये सैल होतात, म्हणजेच इंद्रिये व विषयप्रवृत्ती आणि त्यांच्या प्राप्तीकरिता धडपडणारे मन, बुद्धी आदि कांही काळ स्थिर, शांत होतात तेव्हा तेव्हा बंधनरहित असल्याचा म्हणजेच मुक्तीचा अनुभव येतो. सगुण अथवा निर्गुण ईश्वर जणु डोळ्यांनी पहावा; त्याच्या प्रभावाने आसमंत उजळून निघावा; तो व आपण वेगळे नसून एक दुसऱ्याचे रूप असा प्रत्यय यावा; अशा चढत्या वाढत्या अनुभूतीलाच सलोकता, समीपता व सरूपता मुक्ती असे संबोधले आहे. परंतु या सर्व मुक्तींना मर्यादा आहेत. हळुहळु मर्यादाही गळून पडतात व पूर्ण वासनाक्षय होऊन, आत्म्याशी साधलेल्या एकतेचा अखंड अनुभव येऊ लागतो. यालाच सायुज्यमुक्ती असे म्हणतात. सायुज्यमुक्तीनंतरच अनंताची अनंत दालने, तेज, स्वरूप, सौंदर्य, शिवत्व, विशालता, तरलता, आत्यंतिक सूक्ष्मता, विविधता आदींसह परम सत्त्याने युक्त होऊन अंतर्दृष्टीसमोर येतात. सायुज्यतेनंतरच खरी अंतर्दृष्टी उघडते आणि आत्मा व त्याचे कार्य स्पष्ट होऊ लागते. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी अंशरूपाने विद्यमान असलेले ईश्वरी तत्व म्हणजे आत्मा हे अनुभवाच्या टप्प्यात येते. त्याबरोबरच सर्व प्राणिमात्राच्या ईश्वरी तत्त्वाच्या एकत्रीकरणांतून विद्यमान होणारा तो परमात्मा तथा दृश्यादृश्य सर्व सृष्टी निर्माण करणारा तो विश्वात्मा अशी अतिप्रचंड व विशाल साखळी व तिचे सर्वव्यापी स्वरूपाचे कार्य प्रत्येक स्तरावर एकरूप होऊनच अनुभूतीला येते. अर्थात् हे सर्व सायुज्यमुक्तीनंतरच घडणे शक्य आहे म्हणून तेथूनच विश्वप्रचीतीची खरी योगसाधना सुरू होते, असे सयुक्तिकपणे श्रीअरविंदांचे सांगणे आहे.

वैश्विक प्रत्यय दृढ करण्याकरिता सर्व अनुभूतीचे माध्यम जे शरीर, त्याच्या स्थूल व सूक्ष्म अंगांसह शुद्धातिशुद्ध करणे प्राप्तच आहे. विविध अंगांना चिकटणारी अशुद्धी ही सहसा १. द्वंद्व, २. वासना, ३. आसक्ती, ४. अहंकार यांतूनच निर्माण होते. त्यांचे स्थूल व सूक्ष्म स्वरूप आकलन करूनच निर्हेतुक कर्मप्रवणतेतून, निरपेक्ष भक्तिभावनेतून, विशुद्ध सात्विक बौद्धिक तळमळीतून व संयमादि शरीरधारणेतून मन, बुद्धी व चित्त शुद्ध होत जातात व त्याचबरोबर अहंकार गळून पडतो. श्रीअरविंदांनी बंध व मुक्ती यासंबंधीचा आत्मप्रत्यय घेतला. मन, बुद्धी, चित्त व अहंकार यांचे विभक्त तथा एकत्रित स्वरूपही बघितले आणि त्यांची शुद्धीकरण प्रक्रियाही घडवून आणली.

आंतरिक सर्वंकष शुद्धी जशी घडून येते तशी एक विलक्षण सूक्ष्मावस्था प्राप्त होऊन मनादींच्या अतित होऊन खऱ्या अर्थाने अध्यात्माच्या प्रांगणांत प्रवेश होतो. यापुढे अनुभूतींत येणारे अत्यंत सूक्ष्म व तरल परंतु सुस्पष्टपणे संवेदित होणारे एकावर एक असे स्तर आहेत. त्यांच्या कार्यप्रणालीनुसार श्रीअरविंदांनी त्याला नांवेही दिली. सूक्ष्म मनाच्या त्या तरल पायऱ्या असल्यामुळे त्यांना १. उच्च मन Higher Mind, २. प्रकाशित मन Illuminated Mind, ३. सत्-प्रेरक

मन Intuitional Mind, ४. अपरोक्षानुभूत मन Over Mind, अशी स्वानुभूतिपूर्ण नांवे दिली आहेत. (मराठी अनुवाद त्या त्या अवस्थेनुसार लेखकाने केला आहे.) पहिल्या पायरीवर परमसत्याचा आविष्कार करणाऱ्या विशुद्ध अध्यात्मविचारांचे प्रकट दर्शन घडते. दुसऱ्या पायरीवरील मन अंतर्बाह्य सत्यज्ञानाने उजळून निघते व परमसत्य जणू साकार होऊन दृष्टीसमोर येते. तिसऱ्या पायरीवर परमसत्याशी तदाकारिता येते व सर्व वैचारिक प्रेरणा सत्यरूप होऊनच बाहेर पडतात. चौथ्या पायरीवर अपरोक्षाची अनुभूति संपन्न होऊन माया महत्-ब्रह्म सर्व बारकाव्यासह जणु अंकित होते. या दर्शनंतरच अखिल सृष्टीचा निर्माता व निर्मित सृष्टी यांमधील तत्वानुसार एकतेचा तसेच जड व सूक्ष्म अशा प्रकृतीनुसार विभक्तपणाचा आत्मप्रत्ययकारी बोध होतो. अतिमानसाच्या औत्सुक्याने धडपडणारे मन सर्व भावावेशासह उर्ध्वगामी होत असते. त्याला प्रतिसादही उच्च मनापासून अतिमानसापर्यंत खालून वर अशा पद्धतीने मिळत राहतो. एकूण सर्व प्रक्रिया उर्ध्वगमन व अवतरण ह्यांच्या वर्तुळातून ज्ञान, आनंद व उत्साह ह्यांची जनक ठरते. म्हणून एका अर्थाने सृष्टी ही पाण्यावरील कल्लोळाप्रमाणे भगवंताची लीला किंवा 'चिद्विलास' आहे तर दुसऱ्या अर्थाने ती भगवंतापासून विभक्त असल्याने यंत्रासारखी तिची विभक्त अशी कार्यप्रणाली आहे. त्यातून तिचे ठिकाणी जडता येते व तिच्यावर बसणारा मानव जरी चित्-स्वरूपी आत्मतेज घेऊन येत असला तरी त्याचा जीव सृष्टीच्या असत् स्वरूपाकडेच अधिक खेचला जातो. त्यामुळे तो अज्ञानी, अविद्यायुक्त, मायाभ्रांत व जड स्वरूपाचा होऊन बसतो. त्यामुळेच त्याच्या इंद्रियवृत्ती प्रबल होऊन दुर्दमनीय कामवासनेने तो घेरला जातो. क्षुद्र तमोगुणी वासनेच्या चिखलातूनच मानव-जन्माचे कमल उगवत असल्यामुळे खूप प्रयत्न करूनही वासनेतून बाहेर पडणे त्याला दुराराध्य होऊन बसते. परिणामी सृष्टिनिर्मात्या नारायणाप्रमाणे स्थूल व सूक्ष्म देहाची लवचिकता, पारदर्शकता व अमरता (Elastic, Transparent and Immortal) त्याला आत्मसात् करता येत नाही, म्हणून त्याचेवरील मृत्युमय दु:खाचे सावट कधीच दूर होत नाही. ते दूर करण्याचा एकच उपाय श्रीअरविंदांना दिसून आला.

सृष्टीदेखील एक विराट पुरूषच आहे. प्रत्येक जडवस्तूप्रमाणे तिलाही जीव व आत्मा आहे. तिचे वासनात्मक जीवकार्यातूनच जडता, घनता व मृत्यू थैमान घालतात. या जीवाच्या बीजकेंद्रातच, अपरा व परा यांच्या अतीत असलेला, अतिमानस जर प्रवेशित करता आला तर सृष्टीचे अज्ञान, अविद्या व वासनामय तथा जड रूपच पूर्णपणे बदलून जाईल. अशा प्रकारची कल्पना वेदकालीन ऋषींच्या मनात डोकावून गेली होती. श्रीअरविंदांनी मात्र ती प्रत्यक्षांत आणली. अत्यंत खडतर व उग्र तपश्चर्या करत भगीरथाप्रमाणे त्यांनी अतिमानस सृष्टिदेवीच्या हृदयरूपी गाभाऱ्यात आणून प्रतिष्ठित केले. पुढील परिणाम काळाच्या ओघातच दिसून येतील.

जो अनन्यशरण प्रामाणिक साधक असेल, त्याचे बाबतींत मात्र आता खुद्द अतिमानस, त्याच्या चारही स्तरावर बदल घडवून आणते. स्थूलदेह सत् मधे परिवर्तित होतो; प्राण, चित्मधे व जीव आनंदामधे परिवर्तित होतो आणि हे विशाल परिवर्तन एकसंधपणे तसेच वगेळेपणाने सहजच घडून येते. आवश्यकता आहे ती फक्त प्रामाणिक, संयमित, उत्कट, उल्हसित, विशुद्ध साधक वृत्तीचे व अनन्यशरणागत जीवन जगण्याची. जीवनाचे क्षेत्र कुठलेही असो. आस मात्र 'तो' जाणण्याची असावी व भावना 'तो' असल्याची असावी. त्यातूनच श्रीअरविंदांचा योग सिद्ध होतो. कारण समग्र जीवन हाच मुळी योग होऊन बसतो. प्रत्येक कर्मांतून कर्मयोग, प्रत्येक भावातून भक्तियोग व प्रत्येक विचारलहरीतून ज्ञानयोग आणि सर्व मिळून परमशांतिपूर्ण व आनंदब्रह्मयुक्त पूर्णयोग सिद्ध होतो.

पूर्णयोगाची सिद्धता ही श्रीअरविंदांच्या मते स्वर्गीय आनंद-कल्लोळात पृथ्वी न्हाऊन निघण्याची नांदी ठरते. त्यांची झेप फार मोठी आहे. दिव्यत्वाशी थेट संबंध जोडून दिव्य जाणीवा व्यक्तिगत तथा सृष्टिगत सर्व चेतनकेंद्राशी जोडणे हे त्यांना साधण्याचे आहे.

The object of this yoga is to establish direct contact with Divine alone and to bring down the divine consciousness into all the centers.

अर्थात् ही समग्र प्रक्रिया अवघड, गुंतागुंतीची, वेळ खाणारी व अनेक अडचणींनी भरलेली आहे हे त्यांनाही मान्य आहे. परंतु वैश्विक शांती व आनंदाकरता व्यक्तिगत मूल्य द्यायलाच हवे. स्वत:च्या त्यागातून प्रक्रियेत सोपेपणा येतो. दिव्य शक्तीचे व दिव्य कृपेचे अवतरण होते. आणि दिव्यत्वच स्वर्गातून पृथ्वीवर येते व पृथ्वीला स्वर्गमय करून टाकते. ते म्हणतात,

"To raise the world to God in deathless light. To bring God down to the world of earth. We came to change the earthly life to life Divine."


हेच सत्य प्रतिपादन करण्याकरता श्रीअरविंद ह्या पृथ्वीवर अवतीर्ण झाले. त्यांनी जगाला गर्जून सांगितले. चेतनेच्या उत्क्रांतीत मानवी जाणीव ही फक्त लहानसा व क्षणभंगूर असा टप्पा आहे. पण अंतिम ध्येय हे सत्यप्रचीती असून त्यात विहरणे व पृथ्वीला सत्यमय करून सत्याचे अधिराज्य मर्त्य, जड आणि दु:खी सृष्टीवर निर्माण करणे हे आहे.

त्यांनी केवळ स्वप्न कथन केले नाही तर सुनियोजित असा आराखडा तयार केला आहे. त्यानुसार कृतीला देखील प्रारंभ झाला आहे. केवढे आपण भाग्यवान् !

एवढ्या महायोगाची दीक्षा अखिल विश्वाला विसाव्या शतकाने दिली आहे आणि त्याचा आद्य तथा अनादि प्रणेता म्हणून योगिराज श्रीअरविंद यांच्या रूपाने भारतमातेच्या कुशीत अवतरित केला आहे.

– प. पू. स्वामी विद्यानंद
दिव्य जीवन वाटिकाश्रम
हडपसर-सासवड रोड, वडकी-पुणे.
संपर्क : द्वारा : श्री देवेंद्र पांडे - ९४२०४-८२३३०.

■ ■ ■



महायोगी श्रीअरविंद : जीवनवेध

श्रीकृष्ण माधव दीक्षित

बी. कॉम., एल. एल. बी., निवृत्त शाखा - प्रबंधक, बँक ऑफ इंडिया
श्रीअरबिंदो आश्रम, दिल्लीशी २२ वर्षांपासून संबंधित.
स्वाध्याय शिबिरांसाठी समन्वयक म्हणून गेले ८ वर्षे कार्यरत.

जागतिक इतिहासात १५ ऑगस्ट रोजी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. Free India was born on 15.8.1947 आणि Sri Aurobindo was born on 15.8.1872.

श्रीअरविंदांची धारणा होती की साक्षात् परमेश्वरालाही निर्माण करणारी कोणती तरी शक्ती असली पाहिजे. त्या चैतन्यशक्तीचा शोध आपल्या साधनेद्वारे त्यांनी घेतला. त्या शक्तीची उपासना त्यांनी केली. त्या चैतन्यशक्तीला त्यांनी आपल्या साधनेद्वारे अंकित केले व स्वत:च्या देहात सामावून घेतले. त्या चैतन्यशक्तीला मानव जातीच्या कल्याणासाठी पृथ्वीतलावर अवतरित केले आणि देहरूपात साठवलेली सारी शक्ती, सारे चैतन्य, सारी पुण्याई, देहत्याग करून या भूमीवर वितरित केली व त्याच चैतन्यशक्तीमध्ये विलीन झाले.

अशा या थोर महायोगी महर्षींचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्ता येथे झाला. तो श्रावण-महिना होता व तो दिवस ही गोकुळाष्टमीचा होता. पहाटेच्या ब्राह्ममुहूर्तावर चैतन्यशक्तीचे हे सगुणरूप श्रीअरविंद या नावाने जन्माला आले. भगवान् श्रीकृष्णाचा जन्मही याच तिथीचा! ज्ञानेश्वर माऊलींचा जन्मही गोकुळाष्टमीचा. १५ ऑगस्टलाच श्रीरामकृष्ण परमहंस समाधिस्थ झाले. अशा काही महत्तम घटना एकाच दिवशी / तिथीला घडाव्यात हेही एक आश्चर्यच होते. पण तो योगायोग नव्हता. तो योग होता, नियतीची काही योजना होती. भगवंत चैतन्याची ती एक निर्णायक कृती होती.


खरं तर श्रीअरविंदांच्या जीवनप्रवासाचा मागोवा घेताना एक लक्षात ठेवावे लागते. श्रीअरविंदांनीच म्हणून ठेवले होते की - No body can write about my Life, because I have not lived it on the surface for a man to see it! माझे जीवन चरित्र कुणी लिहू नये, कारण इतरांना दिसेल अशा पृष्ठभागावर मी ते जगलेलो नाही.

तरीही त्यांच्या माघारी, त्यांच्या जीवन-प्रवासातल्या काही ठळक घटना दृष्टीपुढे येतात व त्यांचे अलौकिकत्व जाणवते. ऋषीचे कूळ व नदीचे मूळ शोधू नये असं म्हणतात कारण मग हा धांडोळा घेताना आपण या थोरांच्या लौकिक जीवनातच अडकतो व त्यांच्या साधना मार्गापासून अपरिचित राहातो. तरीही थोडासा मागोवा घेताना कांही लखलखीत रत्ने गवसून आपले ज्ञानविश्व उजळून निघू शकते.

श्रीअरविंदांच्या तात्कालिन अनुयायांपैकी काहींना जवळून जे काही दिसले, जाणवले, भावले, आकलन झाले त्या वेळच्या कालखंडाचे शब्दांकन त्यांनी केले, त्यांच्या माध्यमातूनच श्रीअरविंदांच्या जीवनपटाकडे बघावे लागते.

कलकत्त्यामधील डॉ. कृष्णधन घोष व स्वर्णलतादेवी हे श्रीअरविंदांचे आईवडील आणि ही एकुणात ५ भावंडे (विनयभूषण, मनमोहन, श्रीअरविंद, सरोजिनी व धाकटा बारिंद्र) डॉ. कृष्णधन घोष हे स्वत: इंग्लंडमध्ये शिकून डॉक्टर होऊन परतले होते. भारतीय आचार, विचार, संस्कार इ. बद्दल त्यांना आत्मीयता नव्हती, या उलट ब्रिटीश राहाणीमान, चालीरीती याबद्दल ते खूप अभिलाषा बाळगून होते, शिवाय ते बरेचसे नास्तिकही होते.

बालपण : अरविंद म्हणजे कमख, सात्विकतेचे व सौंदर्याचे प्रतीक, दिव्यत्वाचे प्रतीक! त्यांचे बालपणीचे टोपण नाव म्हणजे 'ऑरो.' ऑरो अत्यंत लाजाळू व मितभाषी होता. त्याच्या डोळ्यात अप्रतिम तेज होते. त्याचे मौन हेच त्याचे बोलणे असायचे. त्यांच्यामध्ये प्रचंड स्थितप्रज्ञता व डोळ्यात काहीतरी शोध घेत असल्याचे गूढ भाव असायचे, आणि आश्चर्य म्हणजे हे सारे अगदी लहानपणापासूनच.



खरं तर ऑरोच्या आयुष्यातली बालपणीची फक्त पहिली ५ वर्षेच आई-वडीलांच्या समवेत गेली, त्या पलिकडे ऑरोचे बोट फक्त नियतीच्याच हाती होते. बालपणीचा अवखळपणा, खट्याळपणा हे सारे ऑरोपासून दूर होते. सतत विचारमग्न अवस्था. वडील डॉ. घोष अतिशय हट्टी व आग्रही. त्यांना आपल्या मुलांना भारतीय संस्कृतीचा वाराही लागू द्यायचा नव्हता. ह्या साऱ्यामुळे ओघाने ऑरोचे सगळे बालपण झाकोळून गेलेले होते. सारे बालपण वडिलांच्या इशाऱ्याप्रमाणे चालायचे. खरं तर ज्या वयात बॅट-बॉल किंवा विटी-दांडू खेळावे त्या वयात पाटी-पेन्सिल हाती आली. अर्थात् भविष्यात ह्या पाटीवर ऑरोने ज्ञान व बुद्धीची अशी अक्षरे कोरली की, त्या प्रत्येकांचा एकेक शिलालेख होऊन राहिला व त्यातील एकेक वाक्य पुढे ब्रह्मवाक्य झाले.

शिक्षण : ऑरोच्या वयाची ५ वर्षे जेमतेम पुरी होतात न होतात तोच त्याला वडिलांनी दार्जिलींगमधील उच्चभ्रूंच्या इंग्लीश शाळेत (convent) दाखल केले, कारण त्यांना एक पूर्णपणे आंग्लाळलेला इंग्लीश मुलगा हवा होता. दार्जिलिंगच्या दोन वर्षांच्या वास्तव्यानंतर डॉ. कृष्णधन घोषांनी ऑरोची रवानगी थेट इंग्लंडला केली. ऑरोचा अरविंद होण्याची ही सुरूवात होती. घरपण संपून एकटेपणाच्या वनवासाची पण ती सुरुवात होती. आई-वडिलांपासून दूर, घरादारापासून दूर, होस्टेलमध्ये राहाणं हे वाट्याला आलं, आणि मग अभ्यास, शाळा, पुस्तके व निसर्गातील एकांत हेच सारे अरविंदाचे सोबती झाले.

यामुळे अरविंदांना आपली मातृभाषा बंगालीही परकी राहिली. भारतीय आचार, विचार, संस्कृती इ. पासून त्यांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले, डॉ. घोष यांना अगदी हेच हवे होते.

इंग्लंडला शिक्षणासाठी गेल्यानंतर सुरुवातीला ऑरोला एका ख्रिश्चन कुटुंबात ठेवण्यात आले व त्यांना सक्त ताकीदही दिली गेली की ऑरोला कुणाही भारतीय व्यक्तीला भेटू द्यायचे नाही. ऑरोने हे सारे निमूटपणे वडीलांच्या इच्छेखातर स्वीकारले. मातृभूमि, मातृभाषा, मायभूमीच्या संपन्न संस्कृतीला पारखे होण्याची ती सुरुवात होती, पण त्यामुळे झाले काय की ऑरो अलिप्त होत गेला. मनन, चिंतनाच्या खोल गुहेत जाऊन अज्ञाताशी संवाद करीत राह्यला. सुरूवातीला ऑरोला ५ वर्षे मँचेस्टरला ठेवण्यात आले व नंतर पुढची ७ वर्षे लंडन येथे सेंट पॉल स्कूलमध्ये अध्ययन झाले. त्यानंतरची पुढची २ वर्षे केंब्रिज येथे आय. सी. एस. च्या अभ्यासक्रमामध्ये व्यतीत झाली. एकूणात श्रीअरविंदांना १४ वर्षे विलायतेमध्ये काढावी लागली. १४ वर्षांचा म्हटलं तर वनवासच तो. पण घरादारापासून, माता-पित्यापासून दूर राहिलेल्या अरविंदाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सोने केले. जिथे जिथे शिकले तिथले काही शिक्षकवृंदच त्यांचे विद्यार्थी बनून जायचे. त्यांच्या उत्तरपत्रिका वर्गात उदाहरण म्हणून दाखवल्या जायच्या. साहित्यविषयक अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. काही शिष्यवृत्तीही मिळाल्या. १४ वर्षांचा हा शिक्षणाचा कालखंड. सुरुवातीचा काही काळ सोडला तर बराचसा हालअपेष्टातच गेला. वडीलांच्या कडील आर्थिक मदत कमी कमी होत गेली होती. त्यामुळे बरेचसे शिक्षण पुरस्कार व शिष्यवृत्तीवरच झाले. या साऱ्या अडचणी व आपत्तींचे रूपांतर अरविंदांनी इष्टापत्तीमध्ये केले. सातत्याने अभ्यास, वाचन, मनन केले व व्यासंग वाढवला. इंग्लीश, ग्रीक, लॅटीन, इटालियन, फ्रेंच, स्पॅनिश भाषांवर प्रभुत्व मिळवले. एकीकडे लिखाण, काव्यरचना सुरू झाली. त्याचवेळेस साहित्यातले बटरवर्थ व इतिहासाचे बेडफोर्ड प्राईझ मिळाले, व दिवसागणीक बुद्धीची प्रगल्भता लखलखत गेली व व्यक्तिमत्व तेजोमय होत गेले.

श्रीअरविंदांचे केंब्रिजमधले आय. सी. एस. चे अध्ययन चालू असताना आता त्यांना भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थितीची व ब्रिटिशांच्या जुलमी व अत्याचारी शासन पद्धतीची कल्पना येत गेली. इकडे त्यांच्या वडिलांचाही ब्रिटीश अमदानीवरचा भ्रम दूर होत चालला होता. ऑरोचा झालेला अरविंद आता अस्वस्थ होऊ लागला होता. मनात काही वेगळेच विचार येऊ लागले होते, शिक्षण पूर्ण करून ब्रिटीश सरकारची चाकरी करण्यातली उदासीनता आकार घेऊ लागली. लंडनमधील समविचारी व क्रांतिकारी विद्यार्थ्यांच्या गुप्त-संघटनेचे अरविंद सदस्य व कार्यवाह झाले. क्रांतिकारी व जहाल भाषणे देऊ लागले. ही त्यांच्या देशकार्याची सुरूवात होती.

असेही शिक्षणादरम्यान १४ वर्षांत त्यांना भारतमातेच्या अंगणापर्यंत देखील येता आले नाही. परिस्थितीचे एकूणात भान येऊन त्यांच्या ब्रिटिशांच्या दडपशाहीबद्दलचा आंतरिक तिरस्कार इंग्लंडमध्येच उफाळून आला. आता त्यांनी काही ठरवले. आय. सी. एस. ची परीक्षा फर्स्ट क्लासमध्ये पासही झाले. पण अगदी शेवटच्या अशा एका अंतिम परिक्षेला ते मुद्दाम गैरहजर राहिले आणि इंग्लंडमधील शिक्षणाचा मानबिंदू असलेल्या आय. सी. एस. पदवीला त्यांनी जाणीवपूर्वक धुडकावून लावले व सिंहासनावर बसलेल्या राजलक्ष्मीचा मोह टाकून, भगव्या वस्त्रातील पूर्वेकडे बोट दाखवणाऱ्या संन्याशाचे बोट अरविंदाने पकडले, कारण त्यांना साक्षात् सरस्वतीने आदेश दिला होता की, मातृभूमीला परत जा, आणि अरविंदांना जाणवत गेले की भारत हा केवळ एक भूभाग नाही, ती प्रत्यक्ष माता आहे, देवादिकांची, संतांची, थोरांची भूमी आहे. ऑरो नंतर अरविंद व अरविंद नंतरचा बाबू अरविंद घोष शिक्षण संपवून एक अतिशय प्रगल्भ असे व्यक्तिमत्व घेऊन भारतात मातृभूमीच्या कुशीत यायला निघाला.

श्रीअरविंदांचे शिक्षण, राहाणीमान, निवास हे सारे पाश्चिमात्य वातावरणात झाले. तरीही त्यांचा अंतरात्मा भारतीय होता. पुढच्या कळत्या वयात त्यांना भारतमातेची प्रचंड ओढ वाटायला लागली. भारतामध्ये ब्रिटीश जुलमी सत्ता जशी वाढत गेली तसे श्रीअरविंद अधिकाधिक व्याकूळ होत गेले व एकीकडे तनमनात अंगारही फुलत गेला. त्यापायी त्यांनी आय. सी. एस. सारखी डिग्री सुद्धा धुडकावून लावली व मातृभूमीसाठी १८९३ ला ते मातृभूमीला परतले.

बडोदा व क्रांतिकार्य : श्रीअरविंदांच्या इंग्लंडमधील वास्तव्याच्या शेवटच्या काळात बडोद्याचे नरेश / राजे श्री सयाजीराव गायकवाड तिथेच होते. त्यांची व अरविंदांची भेट झाली व त्यांनी या कोहिनूर हिऱ्याला आपल्या दरबारात येण्याचे आमंत्रण दिले व श्रीअरविंदांनी या दक्ष व प्रजाप्रेमी नरेशाच्या संस्थानात आपली सेवा

बहुमुखी प्रतिभेच्या माध्यमातून सुरू केली.

श्रीअरविंद भारतात पोहोचण्याच्या अगोदर काही दिवसांपूर्वी डॉ. कृष्णधन घोष यांचे आपल्या मुलाची वाट बघत बघत निधन झाले. तोही एक दैवदुर्विलास होता, पण सारे दुःख, शोक बाजूला ठेवून श्रीअरविंद नोकरीवर रुजू झाले. श्रीअरविंदांना वयाच्या सातव्या वर्षी वडिलांचे शेवटचे दर्शन झाले होते.

इंग्लंडमध्ये जशी श्रीअरविंदांनी १४ वर्षे व्यतीत केली तशीच आपल्या आयुष्यातली पुढची १४ वर्षे त्यांनी बडोदा येथे दिली. पगार दरमहा रू. २००/- सन १८९३. बडोदा कार्यालयात त्यांनी विविध विभागांत कामे केली. महसूल, सेक्रेटरीएट विधी, जमीनजुमला, डॉक्युमेंटस् इ. शिवाय सयाजीराव गायकवाडांचा पत्रव्यवहार व भाषणे सुद्धा श्रीअरविंद लिहून देत असत. नोकरीचा हा कालखंडही त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत अतिशय मोलाचा होता तसाच तो राष्ट्राच्याही चेतनाजागृतीच्या दृष्टीने महत्वाचा होता कारण याच काळात भारताचे भविष्य श्रीअरविंदांच्या हातून लिहिले गेले असे म्हणायला पाहिजे. १८९३ ते १९०६ या काळात नियमाप्रमाणे वर्षातून १ महिना सुट्टी घेऊन ते कलकत्यास जाऊन सगळ्यांना भेटत असत. नोकरीच्या दरम्यान एकीकडे प्रचंड वाचन, लेखन सुरू होते. सावित्री या महाकाव्याची मुहूर्तमेढही याच वास्तव्यात झाली होती. तिथेच त्यांनी गुजराथी, मराठी, बंगाली व संस्कृत या भाषा आत्मसात् केल्या. सुरूवातीच्या काही काळातच बडोदा मुक्कामी त्यांना भारतातील राजकीय परिस्थितीचा नेमका अंदाज येत गेला आणि आता त्यांनी ब्रिटीश राजसत्तेविरूद्ध जोरकस आवाज उठवायला सुरूवात केली.

सयाजीराव श्रीअरविंदांना अत्यंत आदरपूर्वक वागवीत. अशातच त्यांनी बडोदा कॉलेजमध्ये त्यांची फ्रेंच व इंग्लिश शिकवण्यासाठी नियुक्ती केली. कधी कलकत्ता तर कधी बडोदा असे चालू झाले. कॉलेजमधील अध्यापन, लिखाण, वाचन, विविध ठिकाणी दौरे, सभा, भाषणे, विविध वार्तापत्रातील व नियत कालिकातून लिखाण इ. एकाच वेळेस सुरू झाले. त्यांच्या ज्वलंत क्रांतिकारी व हृदयस्पर्शी लेखमालांनी लोकजागृती होऊ लागली. हे सारे घडतांना त्यांना सयाजीरावांची कधीच आडकाठी झाली नाही.

नोकरीच्या दरम्यान श्रीअरविंदांची राहाणी अतिशय साधी असायची. काटकसरीपणा, सतत वाचन व लेखन बाकी मितभाषी, निरिच्छ व मिताहारी, एक ट्रंक, केरोसिनचा दिवा व चहूबाजूला पुस्तकेच पुस्तके, त्यातच योगाभ्यासही हळूहळू आकारास येत गेला.

हे सारे सयाजीराव गायकवाड साक्षीभावाच्या आनंदाने बघायचे, कदाचित् त्यांची मानसिकताही अशीच असावी, पण श्रीअरविंदही आपल्या कर्तव्यात कुठेही कसूर होऊ देत नसत. या साऱ्या दरम्यान त्यांचा इतर राजकीय नेत्यांशी संपर्क येऊ लागला. त्यांना श्रीअरविंदांच्या मार्गदर्शनाची सातत्याने आवश्यकता पडू लागली. लोकमान्य टिळकांच्या सहवासात श्रीअरविंद आले, त्यांचे स्नेही सहकारी बनले. क्रांतिकार्याने झपाटून गेलेल्या श्रीअरविंदांनी १ वर्ष सलग रजा घेऊन १९०६ साली कलकत्ता गाठले. नोकरी सुटल्यात जमा झाली. दरम्यान इंदुप्रकाश, कर्मयोगिन, धर्म, युगांतर, वंदे मातरम् इ. नियतकालिकांमधून त्यांच्या लेखमाला सुरू झालेल्या होत्या. मवाळ गटाबरोबरचा विसंवाद हाही प्रगतीमधील अडसर ठरू लागला. सुरत अधिवेशनाचा फज्जा उडाला. लोकमान्य टिळकही जहाल गटाचे. त्यांच्या समवेत श्रीअरविंद विविध सभांमधून भाषणे देऊ लागले, लोकांमध्ये अंगार फुलत गेला, देशकार्याच्या पेटलेल्या मशालीचे आता धगधगते यज्ञकुंड झाले. लोकमान्य टिळकांच्या बरोबर श्रीअरविंदांनी पण 'स्वराज्य' हाच मंत्र लोकांच्या मनात रुजवला, त्याद्वारे असहकार, प्रतिकार, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण इ. चळवळींचा प्रसार सुरू झाला. एक क्रांतीकारक जहाल केंद्रवर्ती संस्था स्थापून त्याद्वारे सार्वत्रिक असंतोष निर्माण करणे, जरूर पडल्यास उघड उघड स्वातंत्र्य-युद्ध पुकारणे असा जहाल गटाचा अजेंडा ठरला. एका हातात खड्ग व एका हातात गीता असा प्रवास सुरू झाला.

आता वेळ आली होती. श्रीअरविंदांनी नोकरीचा राजीनामा देऊन कलकत्ता गाठले. वंदे मातरम्च्या गर्जना सर्व बाजूंनी ऐकू येऊ लागल्या. लोकांमध्ये साहस व वीरता निर्माण होऊन शक्तीच्या लाटा उठू लागल्या. श्रीअरविंद, लोकमान्य टिळक इ. ना नेमके हेच पाहिजे होते, ब्रिटीश आमदानीची आहुती पाहिजे होती. बऱ्याच वेळेला प्रत्यक्ष व अनेकवार अज्ञात राहून श्रीअरविंदांनी नेतृत्व केले. खरं तर सगळ्याच महत्तम घटनांची इतिहासात नोंद होतेच असे नाही. श्रीअरविंदांच्या बाबतीत बऱ्याच अंशी असे झालेले आहे आणि म्हणूनच त्यांच्या जीवनप्रवासाचा व त्यातील अनेक घटनांचा परिचय लोकांना झाला नाही, अगदी आजपर्यंत.

सारा देशच अरविंदांचा होता, मग महाराष्ट्र तरी कसा मागे राहील? त्यांचे महाराष्ट्राशीही एक नाते होते. राष्ट्रकार्याच्या झंझावातात ते मुद्दाम महाराष्ट्रात आले होते, तिथे त्यांची मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर येथे विविध सभांमधून भाषणे झाली होती.

बडोदा मुक्कामी असतांना श्रीअरविंदांच्या जीवनात आणखी एक घटना घडली. १९०१ साली कृषि विभागातील एक उच्चपदस्थ अधिकारी भूपालचंद्र बोस यांची कन्या मृणालिनी बरोबर त्यांचा विवाह झाला. त्यावेळेसच श्रीअरविंद २९ वर्षांचे तर मृणालिनी फक्त १४ वर्षांची होती. श्रीअरविंदांचे वैवाहिक जीवन जेमतेम १८ वर्षांचे होते आणि त्यातही सहजीवन म्हणाल तर फक्त काहीं महिनेच असावे. श्रीअरविंद सतत आपल्या विचारात, व्यासंगात, अध्यापनात व्यग्र असत, त्यातच सततचे दौरे, सभा, भाषणे, नियत कालिकातील सातत्याचे लिखाण, त्यामुळे सहजीवन फारसे व्यतीत झालेच नाही. मृणालिनी सुरूवातीला बडोद्याला आलेली होती, त्यानंतर मात्र वियोगाचा प्रवास सुरू झाला तो अगदी अखेरपर्यंत. मृणालिनी देवींचे निधन १९१८ साली झाले, त्याही वेळेस श्रीअरविंद पाँडीचेरी येथे होते. एकूणात हा विवाह खूप अल्पजीवी ठरला. दांपत्य जीवनातही श्रीअरविंद सदैव गंभीर, शांत व मौनात असायचे. त्याच वेळेस मृणालिनीला कळले की तिचा पती वेगळा आहे, सर्वसामान्य नाही, त्याच्यात अलौकिक असे देवत्व आहे. त्यानंतर मात्र दोघांचा जीवन प्रवास दोन वेगवेगळ्या



दिशांना होत गेला तो शेवटपर्यंत. ही पण एक नियतीची योजना होती.

बडोद्यातील नोकरीच्या कालखंडात श्रीअरविंदांचे जीवन अतिशय व्यस्त बनत गेले. अनेक स्थित्यंतरे होत गेली. नोकरी, योगाभ्यास, विवाह, अभ्यास, वाचन, लेखन, सभा, दौरे, अध्यापन, भारतभर भ्रमण इ. तसेच आत्मचिंतनाच्या खड्गाने त्यांनी सारे कौटुंबिक पाश कापले होते. त्या दरम्यान श्रीअरविंदांना आध्यात्मिक साधनेच्या प्रगतीची आस निर्माण झाली. या साऱ्या व्यग्रतेमध्ये साधनाभ्यास काहीसा मंद झाल्याचे त्यांना जाणवले. त्याच वेळेस त्यांची विष्णू भास्कर लेले या महाराष्ट्रीय योगिराजाशी भेट झाली. ते क्रांतीकारीही होते व योगाचार्यही. त्यांनी श्रीअरविंदांना योग, प्राणायाम व ध्यान धारणा याबाबत सखोल मार्गदर्शन केले. सलग तीन दिवस श्री लेले व श्रीअरविंद बडोद्याला एका खोलीत एकांतात बसून प्रयोग करीत होते. त्यामध्ये श्रीअरविंदांना शतप्रतिशत यश मिळाले व भगवंत प्राप्तीचा एक रस्ता त्यांच्यासमोर उलगडला गेला.

परत जाताना योगिराज लेले यांनी श्रीअरविंदांना सांगितले की या पुढे तुला तुझा अंतरात्माच मार्गदर्शन करेल, तुला आता बाह्य गुरूची आवश्यकता नाही. एका थोर महर्षीला मार्गदर्शन करण्याचे पुण्यकर्म परमेश्वराने श्री. विष्णू भास्कर लेले यांच्या हस्ते करवून घेतले. तीच त्यांची अंतर्वाणीही होती. विष्णू भास्कर लेले यांच्या मार्गदर्शनामुळे श्रीअरविंदांच्या मनात एक अतीव सुंदर नीरवता व आनंद भरला, नीरव ब्रह्मचेतना, विचारशून्यता व निर्वाणावस्था याची अनुभूति त्यांना आली. त्यांच्या मानसजगत् समाप्तीची व ब्रह्मजगत् निर्माण होण्याची ती सुरुवात होती. त्यांना तीन गोष्टी प्राप्त झाल्या.

- मनाला सच्चिदानंदरूपात नेऊन नीरव करण्याची शक्ती,
- स्थूल रूपातील मस्तकाचा (मन, बुद्धी) वापर न करताच बोलणे व लिहिणे याची शक्ती व,
- तिसरी उर्ध्वसत्तेच्या हातात स्वत:ला समर्पित करण्याची शक्ती व अभ्यास (हाच अभ्यास श्रीअरविंदांच्या साधनेचा पुढे मार्ग बनला.)

यामुळे श्रीअरविंदांना साऱ्या अनुभूति आतून यायला लागल्या. कुणीतरी कार्य करवून घ्यायला लागले. सगुण गुरूचे अनुसंधान थांबून निर्गुण चैतन्यशक्तीने आता सारी सूत्रे हाती घेतली, त्यामुळे त्यांच्या लिखाणामध्ये एकतानता, अतिशीघ्रता व खोली निर्माण होत गेली. भगवंत त्यांच्याही नकळत साऱ्या गोष्टी करवून घ्यायला लागला. अशा रीतीने गुरू-शिष्य या नात्याचे हे अनुग्रह-पर्व तिथेच थांबून असीम स्वात्मशोधाच्या पातळीवर येऊन वैयक्तिक प्रवासासाठी मार्गस्थ झाले.

हे सारे चालू असताना एक वेगळीच घटना श्रीअरविंदांची वाट बघत होती.

अलिपूर येथील कारावास : बडोद्याच्या नोकरीतून मुक्त होऊन बंगालला परतल्यानंतर 'वंदे मातरम्' मधील लेखाबद्दल श्रीअरविंदांवर खटला भरला गेला, पण त्यातून ते निर्दोष सुटले. त्यामुळे ब्रिटीश सरकार अधिकच खवळले. श्रीअरविंदांचे नाव व नेतृत्व सर्वदूर पसरले होते, त्यांना सरकार "Most dangerous man' असे समजत. खरे तर परिस्थिति, वेगवेगळ्या घटना, विष्णू भास्कर लेले इ. च्या माध्यमातून भगवंताकडून त्यांना ह्या व्यग्रतेतून बाजूला होऊन स्वात्मशोधाच्या साधनेसाठी मुक्त होण्यासाठी सुचवले जात होते. श्रीअरविंदांच्याही अंतर्यामी काही बदल स्पर्शून जायला लागले होते. हळूहळू मन, विचार, सवयी, व्याख्या, संकल्पना, priorities बदलत चालल्या होत्या. नीरव ब्रह्मचैतन्याचा अनुभव येऊ लागला होता. अद्वैताच्या प्रवासाची अभीप्सा वाढायला लागली होती, सदैव ध्यानावस्था येऊ लागली होती. मनातला झंझावात हेलकावे खात होता, निमत होता, उसळत होता, कारण श्रीअरविंद राष्ट्रवादाच्या सिद्धांताने, क्रांतिकार्याने झपाटून गेले होते. त्याकाळात घरदार, संसार, गृहस्थी ह्या साऱ्यांचा विसर त्यांना पडला होता. काहीशी संभ्रमावस्थाही होतीच. युद्धतेजाऐवजी ज्ञानतेजाने संघर्ष व्हावा असेही वाटत होते, देशवेड की देववेड या संभ्रमातून बाहेर पडून पडद्यामागे जाण्याची वेळ होती, पण तसे घडत नव्हते, लोकांनाही नेता हवा होता, शक्ती हवी होती, श्रीअरविंदही मागे फिरत नव्हते.

शेवटी नियतीनेच आणखी एका योजनेची आखणी करून त्यांना आंतरिक परिपूर्ण उन्नती व परिवर्तनासाठी मार्गस्थ करण्याचे ठरवले. माध्यम होते दस्तुरखुद्द ब्रिटीश सरकार. त्यांनी श्रीअरविंदांना बॉंबस्फोटाच्या एका खोट्या खटल्यात आरोपी करून मे १९०८ मध्ये अटक केली व अलिपूरच्या कारागृहात पाठवून दिले. या कारागृहात ते बरोबर १ वर्ष होते. सुरूवातीच्या काळात त्यांना उद्विग्नता आली की हे का लादले गेले? कोणताही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष गुन्हा केलेला नसताना हा अन्याय का? सतत ३ दिवस ते प्रार्थनेच्या माध्यमातून भगवंताशी बोलत होते.

१ वर्षाची अंधार-कोठडी व एकांतवास, खोटा आरोप, खोटी केस ब्रिटीश शासनकर्ते आता आनंदून गेले, त्यांना खात्री होती की आता जन्मठेप वा फाशीची शिक्षा दिली जाणार. माणूस व नियती यांचा वरकरणी झगडा आता सुरू झाला.


कारागृहातच त्यांना अंतर्वाणी ऐकू आली. जी बंधने तोडण्याचे बळ तुझ्यात नव्हते ती आता दूर झाली आहेत, तुझ्या हातून वेगळे कार्य करवून घ्यायचे आहे, श्रीअरविंद हलके हलके शांत होत गेले, नीरवता आली, त्यांनाही आठवले, अनेकवार त्यांना शक्तीकडून दूर व्हायचे आदेश मिळाले होते, पण त्यांच्याकडून ते पाळले जात नव्हते. पण आता मात्र शांत वाटले, कष्टप्रदता समर्पित प्रार्थनेची महत्ता कळली. (यातून आपल्यालाही जाणवतं की मनावर किती गोष्टी अवलंबून असतात. तुरुंग तोच, कोठडी तीच, बाहेरून सारे तसेच पण आतून मन, चित्तवृती शांत असतील तर तोच त्रास जाणवत नाही.) आता श्री अरविंदांची योग साधना तुरूंगातच सुरू झाली. वाचन, चिंतन, मनन, ध्यान-धारणा, प्राणायाम सुरू होऊन एक अतीव स्थितप्रज्ञता आली.

याच कारावासात भगवान श्रीकृष्णाचा साक्षात्कार श्रीअरविंदांना झाला. भगवंतांने त्यांना सांगितले की या ग्लानी आलेल्या भरतवर्षाला पारतंत्र्याच्या श्रृंखलांतून मी सोडवणार आहेच. पण त्या पलीकडे जाऊन तुला मानवकल्याणाचे कार्य करायचे आहे. याच कारागृहात श्रीअरविंदाशी स्वामी विवेकानंदांनी सतत १५ दिवस संवाद करून मार्गदर्शन केले.

१ वर्ष संपता संपता श्रीअरविंदांना न्यायदेवतेने संपूर्ण निर्दोष ठरवून मुक्त केले.

भगवंताने कारागृहात श्रीअरविंदांना काही अद्‌भूत अनुभूति दिल्या, आश्चर्ये दाखवली की त्याचे स्पष्टीकरण कोणतेही भौतिकशास्त्र देऊ शकले नसते. एकूणात त्यांचे कारागृहात येणे, संबंधित खटला, एकांतवास ह्या साऱ्या त्या भगवंत-कार्यामधील एकेक टप्पे व योजना होत्या. आता श्रीअरविंद कृष्णमय झाले होते.

उत्तरपाडा, चंद्रनगर, पाँडीचेरी : श्रीअरविंद निर्दोष सुटल्यानंतर उत्तरपाडा येथे एका धर्मरक्षिणी सभेत त्यांनी हजारोंच्या उपस्थितीत भाषण केले. आपले कारागृहातील काही अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवले. देशकार्यातील भारतवासीयांच्या सातत्याच्या सहभागाची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यानंतरचा काही काळ त्यांनी कलकत्यामध्ये व्यतीत केला. पण तरीही ब्रिटीश शासनकर्ते त्यांची पाठ सोडायला तयार नव्हते, ते संधी शोधत होते. देशकार्याची श्रीअरविंदांची तळमळ व तडफड त्यांना शांत बसू देत नव्हती तरी पण आता त्यांचे सारे जीवन भगवंताच्या हाती होते. त्यांना अनेकवेळेला भगवंत आदेश मिळत, अंतर्वाणी ऐकू येई. त्यातच ब्रिटीश शासनाने पुन्हा एकदा त्यांना जेरबंद करण्यासाठी म्हणून झाडा-झडती घ्यायचे ठरवले व श्रीअरविंदांना आदेश आला. चंद्रनगरला जा. चंद्रनगर ही ब्रिटिशांचे शासन नसलेली फ्रेंच वसाहत (colony) होती व कलकत्यापासून थोडी जवळ होती. तिथे श्रीअरविंद १ महिना होते, संपूर्ण एकांतवासात ध्यान व योगसाधना एवढाच त्यांचा दिनक्रम होता. श्रीअरविंद आता अंतर्यामी खूप बदलले होते. जीवन-दृष्टिकोनही बदलला होता, त्यांची योगसाधनेची उर्मी तीव्र झाली होती. अध्यात्मिक साक्षात्काराकडे त्यांचे सारे लक्ष आता लागले होते. अशात त्यांना मार्च १९१० मध्ये पुन्हा आदेश आला - पाँडीचेरीला जा. श्रीअरविंदांच्या जीवनप्रवासाचा पूर्वार्ध संपून त्यांच्या



राजकीय संन्यासाची सुरूवात झाली.

४ एप्रिल १९१० रोजी श्रीअरविंद वेदपुरी पाँडिचेरीला पोहोचले. १९१० ते १९५० हा त्यांचा तिथला कालखंड होता. हा त्यांच्या आयुष्यातला एक अत्यंत अलौकिक व दिव्य-स्पर्शीय असा उत्तरार्ध होता. त्या काळात अध्यात्मिक क्रांतीच्या मार्गाने साधना करून भगवंतमय होण्याची शिकवण व आदर्श श्रीअरविंदांनी भारतवासीय व इतर जगापुढे ठेवले.

१९१० ते १९१४ पर्यंतचा काळ साधारणपणे श्रीअरविंद पाँडीचेरीला स्थिरस्थावर होण्यात गेला. त्या दरम्यानही त्यांना अनेकविध अडचणींचा सामना करावा लागला. अर्थात् तरीही कोणत्याच अडचणीमुळे त्यांची साधना व कार्य थांबले नाही. काही काळानंतर ब्रिटीश शासनकर्त्यांनाही त्यांच्या राजकीय अलिप्ततेबद्दल खात्री पटली. श्रीअरविंदांचा आता भगवंतीय आदेशाप्रमाणे विश्वकल्याणकारी कार्याचा संसार सुरू झाला होता. भारताच्या भविष्यातल्या मुक्ततेची त्यांची खात्री पटली होती. त्यामुळे ते स्वत:च्या अति उत्कट साधनेमध्ये मग्न झाले.

एकीकडे, नोबेल पुरस्कारच्या योग्यतेचे व प्रस्तावित झालेल्या 'सावित्री' या प्रचंड महाकाव्याचे लिखाण चालू होते. आर्य या १९१४ साली सुरू झालेल्या मासिकातून १९२० सालापर्यंत सातत्याने श्रीअरविंदांचे लिखाण व साहित्य-निर्मिती बव्हंशाने प्रकाशित होत होती. श्रीअरविंदांची शिकवण, प्रगल्भता, व्यक्तिमत्वाची ओळख त्यांच्या या आर्यमध्ये प्रकाशित झालेल्या लिखाणातून होऊन नंतर विविध ग्रंथरूपात समोर आलेल्या अक्षरवाङ्मयातून झाली व आजही होत आहे.

दरम्यान सगुण गुरूच्या माध्यमातून भगवंतांचा शोध घेत श्रीअरविंदांच्या शिष्या व अध्यात्म सहयोगिनी श्री माताजी फ्रान्सहून पाँडीचेरी येथे प्रथम १९१४ साली व नंतर कायमच्या १९२० साली



आल्या. साक्षात् अदिती माता आल्याचे श्रीअरविंदांनी जाणले व हलके हलके सारे आश्रमकार्य त्यांच्या हाती सोपवत गेले. मौनातून व *एकांतातून करण्याची योगसाधना हा श्रीअरविंदांचा मूळ गाभा व स्रोत* होता.

पाँडिचेरीची आता योगभूमी बनू लागली होती. सुरुवातीला श्रीअरविंद अनुयायांबरोबर वार्तालाप वा सत्संग करीत असत. पण हलके हलके ते कमी कमी होत गेले व त्यांची साधना अतिशय उत्कट व वेगाने होत गेली. सारा वेळ भगवंतांच्या अनुसंधानात ते असत. १९२६ साली मात्र श्रीमाँच्या हाती सर्व कार्यभार सोपवून श्रीअरविंद तिथेच अलग झाले व एकांतात गेले. अर्थात् वार्तालापातील सातत्य, लिखित टिपणे वा पत्राचार या माध्यमातून चालू राहिला तसेच कल्याणकारी साहित्य व ग्रंथ निर्मिती ह्यातही खंड पडला नाही. सावित्री हे महाकाव्य तर श्रीअरविंद सातत्याने सलग ४५ वर्षे लिहीत होते. काव्यरचना, नाटक, निबंध, योगदर्शन, तत्वज्ञान, भारतीय संस्कृती, भावी समाज, वेद, उपनिषदे इत्यादि असे चतुरस्र लिखाण भगवंत श्रीअरविंदांच्या माध्यमातून करवून घेत होता, कारण हे सारे शब्द सातासमुद्रापलिकडे पोहोचणार होते.

१९११ ते १९१४ मधील मौन-साधना, १९१४ ते १९२६ या एका तपामधील कार्य, १९२६ ते १९३८ व १९३८ ते १९५० या उर्वरित २ तपांमधील श्रीअरविंदांची योगसाधना. यामुळे जगभरातील लाखो लोकांना साधनेचा एक वेगळा मार्ग अवगत झाला. मूर्तिपूजेचे वेड श्रीअरविंदांना कधीही नव्हते, ना कोणत्याही कर्मकांडाचा अवलंब त्यांनी कधी केला. त्यांची अभीप्सा, शिकवण व तत्वज्ञान हे स्वात्मशोधाशी व चैतन्य-शक्तीच्या अनुसंधानाशी निगडित होते. त्यांनी या जगाला व जीवन-प्रणालीला कधी नाकारले नाही व कधी मोक्षाची शिकवणही पुढ्यात मांडली नाही. त्यांनी साधनेची संकल्पना मांडली ती चढत्या विकासक्रमाच्या आवश्यकतेची, म्हणजेच जडातून वनस्पती, वनस्पतीतून प्राणिमात्र, व प्राणीमात्रातून मानवाकडे जाणारी स्थिती. पण श्रीअरविंद तिथेच न थांबता मानवातून दिव्य मानवाच्या रूपांतरणाची प्रक्रिया पुढे मांडतात.


विविध अंगी जीवनप्रवास : प्रकांड अशी साहित्य निर्मिती, कार्य-प्रवणता, विवेककल्याणाच्या संकल्पाने साधनेचा परमोच्च बिंदू गाठून, चैतन्य शक्तीचा दिव्य प्रकाश स्वत:च्या सगुण रूपात साठवून तो पृथ्वीवर सगळीकडे वितरित करण्याच्या हेतूने साधना करीत करीत या इच्छामरणी स्वामीने ५ डिसेंबर १९५० रोजी देहविलय केला. त्यांचा देहत्याग ही सुद्धा त्यांच्या योगसाधनेमधील एक प्रक्रिया होती. ७८ वर्षे देहात राहून श्रीअरविंदांनी परमेश्वराची दिव्य व सर्वोच्च चेतना या भूमीवर आणली व जगभरातील सर्व साधक-अभ्यासकांसाठी भविष्यकाळ बनून राहिले.

- श्रीकृष्ण मा. दीक्षित

एफ - ७०१, भास्करा, डि. एस. के. विश्व,

सिंहगड रोड, धायरी, पुणे ४१

■ ■ ■



श्रीअरविंदांचे वेगळेपण

सौ. वनश्री वाघमारे

एम.ए., पीएच.डी.
निवृत्त व्याख्याता, सध्या गृहिणी
श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरी, नाशिक केन्द्र सचिव म्हणून कार्यरत.
श्रीअरविंद-मदरची अनुयायी

जसजसे श्रीअरविंदांच्या अध्यात्म विस्तारात शिरावे तसतसे त्यांचे वेगळेपण ठळकपणे जाणवू लागते. त्यांच्या अध्यात्म महासागरात सर्व प्रचलित अध्यात्म नद्या येऊन मिळतात असे वाटू लागते. इथे त्यांचे वेगळेपण थोडक्यात जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

उत्क्रांतीचा पुढील टप्पा : प्रकृतीच्या (निसर्ग) विकासक्रमातील आजचा शेवटचा सजीवातील विकसित टप्पा आहे तो मानवाचा. श्रीअरविंदांनी सांगितले की, हा शेवटचा टप्पा नाही. ह्यापुढचा असेल तो अतिमानवाचा राहील. सध्या मानवाची मानस शक्ती काम करते ती मनाच्या पातळीवर. अतिमानवाच्या ठिकाणी जी शक्ती काम करेल तिला श्रीअरविंद अतिमानस शक्ती म्हणतात. अतिमानवाची चेतना सत्यचेतना असेल जी सच्चिदानंदाशी प्रत्यक्ष संबंध ठेऊन असेल त्यामुळे अतिमानवाच्या राज्यात पूर्णता प्रस्थापित झालेली असेल. अपूर्णता, असत्य ह्यांना काहीच स्थान नसेल. दिव्यतेचे ते राज्य असेल.

सर्वसमावेशक योग : श्रीअरविंद जीवनाची एकच बाजू लक्षात न घेता सर्व बाजूंचा विचार करतात. त्यामुळे सर्वांगीण जीवनाच्या सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीने प्रचलित योगपद्धती त्यांना पुरेशा वाटत नाहीत. कारण विशिष्ट योगपद्धती जीवनाच्या एका अंगाचा विचार करते म्हणूनच त्यांनी त्यांचा असा योग तयार केला ज्यात सर्व योगपद्धतींचा योग्य तो समावेश आहे. जसे हठयोग, राजयोग, तंत्रयोग, तसेच ज्ञान, भक्ती, प्रेम ह्या त्रिमार्गांचाही पूरक समावेश केला. दुसऱ्या शब्दात त्यांनी ह्या सर्व योगपद्धतींचा योग्य तो समन्वय केला. म्हणून त्यांच्या योगास समन्वयात्मक योग असेहि म्हणतात. त्यांनी 'योग-समन्वय' असा ग्रंथ पण लिहिलेला आहे.

योगाचे उद्दिष्ट : जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळवून देणारा मोक्ष हेच जवळजवळ इतर सर्व योगांचे उद्दिष्ट दिसून येते. श्रीअरविंदयोगाचे उद्दिष्ट मोक्ष नाही. मानवाने अनंततेप्रत पोहचावे, ती प्राप्त करावी व पृथ्वीवर, जडामध्ये ती आणून तिचे प्रकटीकरण प्रत्यक्षात करावे किंवा असे म्हणता येईल चेतनेने वर वर चढत जाऊन दिव्यता प्राप्त करावी व पुन्हा जडापर्यंत तिचे अवतरण व्हावे व जडातून चैतन्याचा आविष्कार प्रत्यक्ष व्हावा हे श्रीअरविंदयोगाचे उद्दिष्ट आहे. ते अधिक व्यापक आहे.

चेतना विस्तार : व्यक्ति ते पृथ्वी असा त्यांचा व्यापक असा जाणीवेचा विस्तार आहे. एकेका व्यक्तीची चेतना दिव्यतेप्रत पोहचावी आणि आत्मलीन किंवा ब्रह्मानंदी त्या व्यक्तीने लीन होऊन जावे हे अरविंदांना मान्य नव्हते, कारण पृथ्वी होती तशीच राहते. तिची अवस्था काहीच बदलत नाही. म्हणून अखिल पृथ्वीवरील जीवन दिव्यतेत रूपांतरित व्हावे असा त्यांचा मानस होता. सामान्य जीवन दिव्यजीवन बनावे तेहि ह्याच पृथ्वीवर. पण ते शक्य होण्यासाठी एक गोष्ट असणे आवश्यक आहे हे त्यांच्या लक्षात आले ते म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचे प्रत्यक्ष प्रकटीकरण होण्यासाठी भगवत्‌चेतनेचे अवतरण.

आरोहण व अवतरण : इतर योगामध्ये चेतनेचे आरोहण होऊन साधकाचे ईप्सित (आत्मप्राप्ती) साध्य होते पण अरविंदांच्या योगाचे दिव्यजीवनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी दिव्यचेतनेचे अवतरण आवश्यक आहे. हे अवतरण श्रीअरविंद म्हणतात, अतिमानस शक्तीच करू शकते आणि ते बरोबरच आहे. दिव्यता हवी तर ती प्राप्त करून प्रतिष्ठित होण्यासाठी शक्तीही दिव्यच हवी. ती चेतनाशक्ती सत्यचेतना असते असे श्रीअरविंद सांगतात. तेव्हा अरविंदांच्या योगात वरील दोन गती आहेत. त्याशिवाय त्यांचा योग पूर्ण होऊ शकत नाही हे विशेष आहे.

योगसाधना भगवंतासाठी : श्रीअरविंद म्हणतात, की त्यांचा योग स्वत:साठी नाही केवळ भगवंतासाठीच तो आहे. योग करणाऱ्या मानवाचा उद्धार आपोआप घडून येणारच, त्याची मनोभूमिका किंवा भावना ही अशीच असणे अपरिहार्य आहे. त्याचे कारणही ते देतात की पृथ्वीवर भगवंताचे प्रत्यक्षरीत्या प्रकटीकरण होणे हा मानवी संकल्प नसून भगवंताचाच संकल्प आहे. तथापि योगसाधना भगवंताकरिता करून त्याचे प्रकटीकरण व्हावे असा संकल्प मानवाने सुद्धा करावा अशीही अरविंदांची अपेक्षा आहे. प्रकृती दिव्य नाही पण तसे होण्याची तिची इच्छा आहे. ती आपल्या परीने त्या दिशेने, प्रगतीची वाटचाल करीत असते पण तिची चाल मंद आहे, असे श्रीअरविंद म्हणतात. आजचा मानव निर्माण होण्यात लाखो वर्षं लागली तशी पुढचा होण्यासाठीही लागतील. म्हणून अरविंद म्हणतात, मानवाच्या माध्यमातून गती वाढू शकते. कारण प्राप्तव्य मिळवण्यासाठी मानव तसा सक्षम आहे. मनाच्या मर्यादा ओलांडून अतिमनापर्यंत तो जाऊ शकतो. पण त्यासाठी-

पूर्णता : मानवाने शारीर-पातळी, प्राणिक-पातळी व मानसिक-पातळी अशा तीनही पातळ्यांवर पूर्णता प्राप्त करावयास हवी. शरीराची

जडता जाऊन ते चपळ, सुंदर, सुदृढ, निरोगी व्हावे आणि मानवी प्रगतीकरिता भक्कम पाया त्याने द्यावा. प्राणाने भावना, कामना, वासना, इच्छा, आवेग, विकार शुद्ध करावे व आपले बळ वाढवावे आणि मानवी उन्नतीस हातभार लावावा. मनाने विचार शुद्ध करावे, भ्रामक कल्पनांचा त्याग करावा व ज्ञान प्राप्त करावे. चेतनेस वर जाण्यासाठी मार्ग प्रशस्त करावा. दुसऱ्या शब्दात सर्वांनी पूर्णता प्राप्त करावी म्हणजे आत्मिक उन्नतीस सुरूवात करता येईल व पुढे पुढे चेतनेचा विस्तार होत जाईल व अंतिम लक्ष्यप्राप्ती होईल.

पूर्ण साक्षात्कार : श्रीअरविंद आत्मासाक्षात्कारावर थांबत नाहीत किंबहुना ही त्यांच्या योगाची पूर्वावश्यकता आहे. त्यांचा योग पुढे सुरू होतो. विश्वात्मक तसेच विश्वातीताचा साक्षात्कार असे सर्व पूर्णसाक्षात्कार त्यांना अभिप्रेत आहेत. संपूर्ण ईश्वर त्यांना हवा आहे. म्हणून ते आत्मसाक्षात्कारानंतर साधना थांबविण्याचा धोका असतो असे म्हणतात. कारण ही अवस्था गाठणेच फार अवघड (काही अपवाद सोडून) जाते व तिथे सर्व मिळाल्याचा हर्षोन्मादही असतो. तेव्हा हा धोका न पत्करता संपूर्ण ईश्वरी साक्षात्कार प्राप्त करण्याच्या उद्देशाने साधना सुरू ठेवावी असे ते म्हणतात.

बंधने नाहीत : श्रीअरविंदयोग करण्यासाठी साधकांवर कोणतेहि बंधन नाही. स्थळ-काळाचे बंधन नाही. कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी योगसाधना करता येते. साधक स्वयंशिस्त म्हणून, आध्यात्मिक स्थिरता येईपर्यंत स्वत:वर बंधने लादून घेऊ शकतो पण श्रीअरविंदांच्या योगाकडून बंधने अशी नाहीतच. कारण अरविंदांच्या मताप्रमाणे प्रत्येक व्यक्ति वेगळ्या स्वभावाची, वेगळ्या अभिरुचींची असते त्यामुळे तिला जमेल तसे, रुचेल तसे तिने ध्यान, योगसाधना करावी. त्यांनी अशा रीतीने प्रत्येकाचे स्वातंत्र्य जपलेले दिसून येते. वेशभूषासुद्धा पाहिजे ती ठेवता येते. भगवेच, पांढरेच वस्त्र घातले पाहिजे किंवा अमुक रंगाचेच असेही काही बंधन नाही.

सक्रिय ध्यान : एकांतात बसून, एका आसनी स्थिर होऊन शरीर शांत, स्थिर करूनच ध्यान करण्याची आवश्यकता नाही. विशिष्ट पातळीपर्यंत स्थिरता (आंतरिक) येईपर्यंत थोडे थोडे, झेपेल तेवढे ध्यान करण्यास हरकत नाही. पण श्रीअरविंदांच्या योगात सभान ध्यान, सक्रिय ध्यान जास्त महत्त्वाचे दिसून येते. कारण कोणत्याहि कामात, क्रियेत व्यक्ति असू द्या हे ध्यान करता येते. ह्यात व्यक्ति शरीर, मन, प्राण इत्यादी त्याच्या सर्व अंगाबद्दल सचेतन असतो. एरवी समाधी म्हटले की शरीराचे भान नसते, प्राणिक भावनाचे भान नसते, मन निर्विचार झालेले असते व समाधी लागते. परंतु त्यातून बाहेर आल्यावर पुन्हा प्रकृतीनुसारच व्यक्तीचे आचरण राहते. स्वभाव बदलत नाही. मदर म्हणतात, असे तासन्‌तास ध्यान करून साधकाची प्रगती पूर्ण होत नाही.

सौ. वनश्री वाघमारे
'अभिकल्प' अयोध्या कॉलनी, गंगापूर रोड,
आकाशवाणी रोड, सावरनगर पोस्ट ऑफिसजवळ,
नाशिक ४२२ ०१३.

■ ■ ■



योगी श्रीअरविंदांचा अलौकिक जीवनप्रवास

सौ. मृणाल सुहास थोरात

एम. एस. सी. (स्टॅटिस्टीक्स)
राष्ट्रीयीकृत बँकेतून निवृत्त
लेखनाची व संत साहित्याची आवड

मनुष्य हा बोलणारा, विचार करणारा प्राणी आहे. निसर्ग असा मानव निर्माण करण्याच्या प्रयत्नात होता की ज्याचे बाह्य स्वरूप मानवासारखे पण आंतरीय जाणीव पूर्ण विकसित झालेली, ज्ञानमयी, अज्ञानाचा बंध नसणारी व परिपूर्ण असेल. हे जाज्वल्य सत्य जगाला सांगण्यासाठी १५ ऑगस्ट १८७२ला डॉ. कृष्णधन घोष व सौ. स्वर्णलता घोष या दांपत्त्याघरी श्रीअरविंदांनी पृथ्वीतलावर जन्म घेतला. ज्ञानाचे, सौंदर्याचे, समृद्धतेचे प्रतीक असलेल्या कमलाप्रमाणेच श्रीअरविंदांचे व्यक्तिमत्त्व मृदु, सौम्य, प्रसन्न असे होते. कोवळ्या वयातच परदेशांत राहून त्यांना शिक्षण घ्यावे लागले. इंग्लिश, लॅटिन, फ्रेंच अशा अनेक भाषांत ते पारंगत झाले. १८९३ मध्ये नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या आमंत्रणावरून ते बडोदा संस्थानात नोकरीवर रुजू झाले.

एकीकडे हिंदुस्थानातील राष्ट्रीयसभा, तिची ध्येये, धोरणे, राजकीय प्रगती तिचे नेतृत्व ह्यावर त्यांनी अनेक लेखमाला प्रसिद्ध केल्या. आपल्या लेखातून त्यांनी राष्ट्रीय सभेच्या गुळमुळीत धोरणांवर व नेमस्त नेतृत्वावर प्रखर टीकाही केली. वयाच्या एकविसाव्या वर्षीच श्रीअरविंदांचे सूक्ष्म विचार-सामर्थ्य, परिस्थितीचे सर्वांगीण सर्वग्राही आकलन, भाषा प्रभुता, त्या शब्दांमागची कळकळ, धैर्य व देशाविषयी असलेली समर्पणबुद्धी या सर्वांचे त्यांच्या लेखांमधून दर्शन होत होते. स्वातंत्र्यानंतर मानवाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनात संपूर्ण नवकालाचा आरंभ होईल असा त्यांचा गाढ विश्वास होता. त्यांनी मनाशी त्यासंबंधी काही स्वप्ने पाहिली होती.

पहिले : क्रांतीकारकांच्या चळवळीत स्वतंत्र व एकात्म हिंदुस्थानाची स्थापना.

दुसरे : आशिया खंडातील जनता जागृत होऊन मानवी संस्कृतीच्या विकासात अग्रेसर होण्याची घटना.

तिसरे : मानवाचे जीवन अधिक सुखी, प्रकाशमय, उन्नत होण्यासाठी एका जागरूक जागतिक संघटनेची निर्मिती.

चौथे : हिंदुस्थानची संपूर्ण जगताला अध्यात्माची उज्वल व देदीप्यमान भेट.

पाचवे : उत्क्रांतीचा एक नवा टप्पा गाठून जाणिवेची उच्च व श्रेष्ठतर पातळी गाठणे.

बडोद्यातील वास्तव्यात ते क्रांतिकारकांशी वार्तालाप करून त्यांना तळमळीने कार्य करण्यासाठी प्रेरणा देत. त्यावेळी त्यांनी संस्कृत, मराठी गुजराथी भाषा अवगत करून 'सॉन्ग टु मार्टिला', 'प्रेम आणि मृत्यु' असे अनेक काव्यसंग्रह प्रसिद्ध केले. त्यांचे ह्रदय प्रेमाने ओतप्रोत भरलेले, मन निष्कलंक, नि:स्वार्थी मानवाच्या व्यथा जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठीची अंतरीच्या तळमळीने भरलेले व सर्वस्व समर्पण करायची तयारी असलेले पण स्वत:साठी कठोर व निग्रही होते. दर्शनी परम शांत भासणाऱ्या श्रीअरविंदांच्या चित्तात सहस्र क्रांतीचा धगधगता अग्नि सतत प्रज्वलित असतो अशी कोणासही पुसटशीही कल्पना नसे. आपल्याला ईश्वरी साक्षात्कार होऊन मूर्च्छित राष्ट्रभूमीला पुन्हा तेजस्वी करण्याचे सामर्थ्य मिळावे ही त्यांची उत्कट इच्छा होती. प्राणायाम, ध्यानधारणा, देशकार्य हे त्यांचे जीवन होऊन गेले. बडोद्याला श्री. विष्णु भास्कर लेले या योगी पुरुषाकडून त्यांना योगसाधनेचे पाठ मिळाले. लेले यांनी सांगितल्याप्रमाणे सलग तीन दिवस मनात येणारे विचार बाहेर टाकून देण्याची साधना करून अनंत, नीरव शांततेने त्यांचे मन भरून गेले. त्यानंतर त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्यचळवळ हे त्यांच्यासाठी एक ईश्वरकार्यच होऊन गेले होते.

अलिपूर येथील कारागृहातील बंदिवासाच्या काळात त्यांच्या जीवनाला कलाटणीच मिळून अंतर्मुख, देशभक्त अरविंद हे 'योगी श्रीअरविंद' झाले. कारागृहातील वास्तव्यात त्यांनी परमेश्वराची अति उत्कट प्रार्थना केली. त्यानंतर त्यांना कारागृहातच श्री नारायणाचे, वासुदेवाचे दर्शन झाले व त्यांचे मन शांततेने, शीतलतेने भरून परमसुखी झाले. भगवंताने आपल्या अंतरात्म्याला एक गूढमय शांती प्रदान केल्याचे श्रीअरविंदांना प्रकर्षाने जाणवले व एका अनामिक शक्तीने त्यांचा अंतरात्मा भरून पावला. कारागृहात केलेल्या ध्यानाच्या वेळी योगी श्रीविवेकानंदांच्या आत्मचैतन्याने श्रीअरविंदांना अतिमानस चेतनेच्या अस्तित्वाची प्रथम खूण दाखविली. 'आपुलिया बळे नाही बोलवत सखा विश्वंभर वाचा त्याची' याचा त्यांना साक्षात् अनुभव आला. कर्मप्रवण जीवनातील सर्व कर्मे आपण करीत नसून भगवत प्रेरणा ती कर्मे करून घेत आहे याचा प्रत्यय आला.

ईश्वरीय शक्तीला आपली चेतना सन्मुख करून अंतर्गत जाणीव अधिकाधिक विकसित करणे हे योगसाधनेचे उद्दिष्ट असल्याचे श्रीअरविंद सांगत. अंतरात्म्याच्या प्रकाशात आपले जीवन शुद्ध करून ईश्वरीय

शक्तीच्या अवतरणामुळे योग्य ती परिवर्तने घडून त्याच्याशी एकरूपता साधणे गरजेचे असल्याचे ते सांगत. आंतरिक जाणीव योगिक जाणिवेत विकसित करून आपल्यातील आत्मतत्त्व सर्व स्तरांवर विश्वव्यापी करून अधिमानसाच्या विकसित जाणीवेच्या सर्व स्तरापर्यंत विश्वपुरुष, विश्वशक्ति यांचे ज्ञान करून घेत दिव्य पुरुषाशी तादात्म्य पावण्याची कला अवगत करून घेणे गरजेचे असल्याचे ते म्हणत. अधिमानसाच्या पलीकडच्या ईश्वरतत्त्वाशी म्हणजेच अतिमानसाच्या म्हणजेच श्रेष्ठतम जाणीवेच्या सहाय्याने संवाद साधून चैतन्यशाली ईश्वरीय सत्याचे या पृथ्वीतलावर अवतरण करण्याचे आपण साधन होणे हे श्रीअरविंदांचे ध्येय होते. १९२० - १९२६ च्या काळातील त्यांची तपस्या अत्यंत कठोर, अंतर्मुख, एकाग्र, तीव्र होऊन त्यांनी स्थापिलेल्या आश्रमात त्यांच्या समवेत ध्यान करणाऱ्या साधकांना प्रत्यक्ष अनुभव आला की एक श्रेष्ठ शक्ति आसमंतात अवतरली आहे. या शक्तिला श्रीअरविंदांनी अधिमानस असे नाव दिले. याहूनही श्रेष्ठतर शक्तीला त्यांनी अतिमानस असे म्हटले. ते म्हणत अतिमानस म्हणजे भगवंताची संपूर्ण सत्यचेतना. अतिमानस व मानवी मन यांच्यामध्ये असणाऱ्या अनेक अवस्था व पातळ्यांमधील उच्चतम पातळी म्हणजे अधिमानस. अधिमानस हे प्रकाशमय, शक्तिमय असून ती शक्ति खाली आणल्याशिवाय अतिमानसाचे अवतरण कदापि शक्य नाही.

एकांतात जास्तीत जास्त राहून श्रीअरविंदांनी योगविद्येतील एक नवीन प्रयोग केला. संपूर्ण विश्वात व्यापलेल्या वासुदेवाला शरण जाऊन जीवाचे जीवपण सोडून, शिव होऊन जीवाची शरणता व अभीप्सा इतकी उत्कट करावी की परमात्मचेतना पार्थिव प्रकृतीत, जीवाच्या जीवपणात, जीवनात अवतरित व्हावी अशी श्रीअरविंदांची इच्छा होती. निर्हेतुक बुद्धीने भगवंतांवर प्रेम करून त्याच्या स्वभावाशी आपला स्वभाव तद्रूप करून आपली इच्छाशक्ति, आपली कर्मे आपले जीवनच भगवंतांच्या हातातले साधन होऊन साधना करणे हा श्रीअरविंदांचा योग होता. याला त्यांनी पूर्णयोग असे नाव दिले. शरीर मन बुद्धीसह समग्र अस्तित्वामध्ये व्यक्ति, समष्टि आणि परमेष्टीमध्ये परिपूर्ण ईश्वरीय परिवर्तन घडवून आणणारा योग तो पूर्णयोग.

श्रीअरविंदांनी संपूर्ण जीवनभर ती ईश्वरीय चेतना स्वत:मधून प्रकट व्हावी म्हणून उत्कट साधना करून इतरांनाही त्या साधनेसाठी प्रेरित केले की त्यातून ईश्वरीय ज्ञान, ईश्वरीय प्रेम, ईश्वरीय इच्छा यांच्याशी एकरूप होणे सहज साध्य होईल. दिव्य चेतनेचे तिच्या अतिमानस शक्तीने अज्ञानपूर्ण अशा तन मन व जड जीवनात अवतरण घडवून ते जडजीवन पालटवून ईश्वरी तत्त्वाचे पृथ्वीवर अवतरण घडविणे हे एकच उद्दिष्ट श्रीअरविंदांचे होते. व्यक्ति एकदा शाश्वत ब्रह्मसत्याशी एकरूप झाली की तिच्यापुरते विश्वाचे अस्तित्त्वच उरत नाही. असे श्रीअरविंद म्हणत. पूर्णयोगाची मांडणी वेगळी असून गतिशील, दिव्य, चैतन्ययुक्त सत्या-बरोबरच अज्ञानमय जगतात चैतन्याचे अवतरण होऊ शकते. सत्याची नवी जाणीव, अतिमानस जाणीव प्रकाशणार असून जड जीवनाला दिव्यत्व प्राप्त होणार असे श्रीअरविंदांचा पूर्णयोग सांगतो. दिव्यचेतनेशी सायुज्यता होऊन ती तिथे आविर्भूत होऊन अव्यक्त अशा शक्तीचे म्हणजे अतिमानस जाणिवेचे अवतरण हेच श्रीअरविंदांचे ध्येय होते.

जुन्या योग-पद्धतीत ईश्वराकडे उत्थान करणे हेच महत्त्वाचे पण पूर्णयोगात आरोहण ही अवतरणापूर्वीची पायरी असल्याचे श्रीअरविंद सांगत. तंत्रमार्ग किंवा वैष्णवपंथ यात जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मोक्ष मिळविणे हे साध्य मानतात. पण पूर्णयोगात परमेश्वरी संकेताची, परमेश्वरी इच्छेची परिपूर्ती करणे हे साध्य मानले आहे. पूर्णयोगाचे उद्दिष्ट ईश्वरतत्त्वाचा व्यक्तिगत साक्षात्कार नसून पृथ्वीवरील जाणिवेला उन्नत विकसित करणे हे आहे.

ज्याप्रमाणे मन:शक्ति जीवनात अवतरून मानव निर्माण झाला, त्याचप्रमाणे उत्क्रांती अवस्थेत अतिमानस जाणीवेचे अवतरण होऊन देवमानव निर्माण होईल असे श्रीअरविंदांचे मत होते. आज पृथ्वीवर ज्याप्रमाणे सामान्यमानस जाणीवेची मनुष्यकोटी आहे तशीच अतिमानस जाणीवेची देवमानव कोटी उदयास येईल. आजच्या मानवाची सुद्धा उन्नती होऊन सामान्यमानस व अतिमानस या जाणिवांच्या मधल्या स्थितींना तो उदित होऊन आपले जीवन सार्थक करेल असे श्रीअरविंद म्हणत. स्वयंसिद्ध, स्वयंचेत असे ईश्वरत्व जाणणे हे दिव्य चेतनेला अतिमानस तत्त्वाला शक्य असून अतिमानस हे विराट सत्य म्हणजेच परब्रह्म चेतना आहे हे पूर्वसूरींनी उद्‌घोषित केले आहे. पण श्रीअरविंद म्हणत जड पृथ्वीवर त्याचे अवतरण करून ते सुनिश्चित स्थिर करणे याचा प्रयत्न आजवर जो झाला नाही तसे करणे पूर्णयोगाचे साध्य आहे.

अतिमानस जाणीव म्हणजे दिव्यचेतना व अधिमानस जाणीव म्हणजे विकसित चेतना. अतिमानस जाणिवेकडे जाण्यासाठी अधिमानस जाणीव ओलांडावी लागते. अतिमानस जाणिवेच्या पलीकडे सत् चित् आनंद यांची विश्वे उलगडलेली आहेत. सत् चित् आनंद चेतना ही विश्वाची आधारशक्ति आहे. अतिमानस जाणीवच शरीर मन बुद्धीत परिवर्तन घडवून आणू शकते. सत् चित् आनंद यांचा अनुभव घेतल्यावरच अतिमानस जाणीवेकडे उत्थान आणि अतिमानस जाणीवेचे अवतरण शक्य होते. अतिमानस जाणीव पृथ्वीवर आणून स्थिर करून ही जाणीव ज्याची अधिष्ठात्री आहे- असे व्यक्तिजीवन समाजजीवन घडविणे हे पूर्णयोगाचे उद्दिष्ट आहे.


योगसाधनेने असत्याकडून सत्याकडे, व्यथेकडून आनंदाकडे बंधनांकडून मुक्तीकडे, मृत्यूकडून अमरत्वाकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे, अपूर्णतेकडून पूर्णतेकडे, जटिलतेकडून सरलतेकडे, विभक्तपणातून अद्वैताकडे, मायेकडून ईश्वराकडे अवरोहण करता येते. संपूर्ण ईश्वरत्व हेच पूर्णयोगाचे ईप्सित आहे. परमेश्वर आपल्याला त्याच्या पूर्णत्वात सामावून घेतो तसेच आपण सर्वव्यापक झाले पाहिजे असे श्रीअरविंद म्हणत. ईश्वरचरणी सर्वस्व अर्पण करणे तसेच जीवनात प्रकाश, सामर्थ्य, शांती, आनंद, व्यापकता, शुचिता, सत्यशीलता अवतारीत करणे हे योगाचे प्राणतत्त्व आहे. अशा समर्पित व्यक्तीसमोर परमशांती, प्रकाश, सामर्थ्य, मुक्ति, श्रेष्ठज्ञान आनंद आदिंचे अथांग सागर हेलावू लागतात. अतिमानस जाणीवेच्या प्रकाशाने मानवाचे अंतर्जीवन, बाह्यजीवन, व्यक्तिजीवन, समाजजीवन प्रकाशित होते. त्यासाठी योगसाधना करणे जरूरीचे आहे असे श्रीअरविंद म्हणत. निर्भय जीवन जगायचे असेल तर दोन गोष्टींची आवश्यकता आहे. एक म्हणजे भगवतीमातेची कृपा व दुसरी अंत:करणातील श्रद्धा, तळमळ, शरणता

अतिशय शुद्ध पाहिजे. त्यासाठी दंभ, अहंकार, वृथाभिमान, क्षुद्र सुखाची लालसा दूर करणे जरूरीचे असल्याचे श्रीअरविंद सांगत. योग म्हणजे भगवत्शक्तीशी सायुज्य की जे सायुज्य ईश्वरशक्तीला सर्वस्व समर्पणातून घडून येते. जागृत, अखंड अशी अभीप्सा, सर्व सुप्त आकांक्षांचा त्याग, 'मी' चे परिपूर्ण विसर्जन म्हणजेच शरणता ही तपस्येची विविध साधना आहे. श्रीअरविंदाचे अनेक लेख, काव्य, मासिके, पुस्तके, ग्रंथ प्रसिद्ध आहेत. विशेष करून 'आदर्श आणि वाटचाल', 'महामानव', 'विकासक्रम', 'चिंतने आणि दर्शने', 'युद्ध आणि आत्मनिश्चय', 'गीतेवरील चिंतन', 'दिव्य जीवन', 'हेरॅक्लिटस्', हिंदू राजनीतीचे हृदय आणि रूप, 'मानवी जीवनाचे चक्र', 'पुनर्जन्माचे गूढ', 'केनोपनिषद', 'हिंदू संस्कृतीचा मूलाधार' अशी अनेक पुस्तके त्यांच्या एकटाकी लेखनातून तयार झाली. 'सिन्थेसिस ऑफ योग' हे पुस्तक १९५५ ला श्रीअरविंद विद्याकेंद्राने प्रकाशित केले.

५ डिसेंबर १९५० या दिवशी त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. मृत्युनंतरही चार दिवस त्यांचा देह तेजोमय, चैतन्यमय दिसत होता. पाँडेचेरीच्या आश्रमात त्यांच्या समाधीनिकट गेलेल्यांना अजूनही ह्या महापुरूषाकडून संजीवनी लाभते. अशा दैदिप्यमान जीवन व्यतीत करणाऱ्या योगी श्रीअरविंदांना माझे शतशः प्रणाम.

– सौ. मृणाल सुहास थोरात
४८१ पर्वती दर्शन. फुले मॅन्शन
ब्लॉक नं. २ शाहू कॉलेज रोड. पुणे ४११००९

■■■



महाकवि महर्षी महायोगी श्रीअरविंद घोष

श्री. अशोकदादा लीन जावडेकर
पुणे

प्रतिवर्षी एक संत आणि तिची महानता यांचा सर्वंकष अभ्यास मांडण्याची ''कल्याणी'' प्रथा अतिशय अभिनंदनीय आहे. १५ ऑगस्ट १८७२ या दिवशी श्रीअरविंद कृष्णधन घोष या सत्‌चैतन्याचे कलकत्ता येथे देहमानवीय अवतरण झाले. ५ डिसेंबर १९५० या दिवशी तेच 'कॉन्शसनेस' पाँडिचेरीमध्ये परत त्याच चिरंतन अनंतात विलीन होऊन गेले. १९१० पासून ते पाँडिचेरीतच ४० वर्षे स्थिर वास्तव्य करून होते. श्रीअरविंद प्रथम विशेष प्रचलित करीत होते की मानवीय जीवन देह, मानस, बुद्धिधृति आणि जीवात्मा या चार मूलभूत पातळीवर ज्ञान, शक्ति, दिव्य प्रीति आणि आत्मिक सुंदरता हीच चार जीवनमूल्ये जन्मजात हिंदोळत असतात आणि या सर्वांचाच समरस सुमेळ साधून ते विश्वसत्‌चैतन्य अनादि अनंत क्रीडेत गूढरम्य क्रीडा चिरंतन खेळत आहे. वयाच्या ७व्या वर्षापासून २८व्या वर्षापर्यंत आईवडिलांच्या सहवासाविना, इंग्लंडसारख्या परदेशात मातृभाषेविना, भारतीयांच्या कशाही प्रकारच्या सहवासाव्यतिरिक्त आंग्लकुटुंबी धर्मोपदेशक पालकांबरोबर घरीच शिकणाऱ्या या श्रीअरविंदांचे १८९३ मध्ये भारतात परतल्यावर ते भारतीय सशस्त्र क्रांतिकारक युवक देशभक्ताबरोबरच सामाजिक राजकीय चळवळीतच तीव्र सक्रिय राहिले आणि ब्रिटिश पोलीस, खटले, कोर्ट, तुरुंगवास, देशकल्याण, फ्रेंचवसाहत चंद्रनगर, पाँडिचेरी येथे वास्तव्य अशा प्रसंगमार्गातून १९१० पासून पाँडिचेरी येथे लहान मर्यादित आश्रमात १९१० ते १९५० ही चाळीस वर्षे महाकवि-महाऋषी-महायोगी अशा स्वरूपात घालविली. मदर इंडिया, श्रीऑरोबिन्दो ॲक्शन यासारखी बरीच मासिके श्रीअरविंद - मिरामाता यांची विविध विधाने देऊन त्यांची लिखित, भाषित विवरणे देत आहेत. संजीवन (मराठी-पुडुचेरी) यासारख्या मासिकातून मिरा-अरविंद यांच्या आठवणी देत आहेत. त्यामुळे श्रीअरविंदांचे महाकवित्व, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक, मानसशास्त्रीय, नीति, संस्कृति, विविध कलाक्षेत्र कृति, अशा विषयातील प्रागतिक ऋषित्व, साधना, योग, आध्यात्मिक सिध्दांत अशा विभिन्न विषयातील समन्वयकारी संपूर्ण योगाचे मार्गदर्शन अशी सर्वांगीण जीवनकथा लेखकांनी एकत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. आश्रमाच्या प्रारंभकाळात पूर्वीच्या साधकांनी आपापल्या प्रादेशिक वाचकांसाठी लिहिलेली परिचय पुस्तकेच आपली ही तहान काही अंशी भागवू शकतात. श्री. बनसोड (बार्शी-मराठी) 'मदर' सुराज फ्रॉम मिरा टू मदर (चैन्नई-इंग्रजी), स्मृतिसुगंध (मराठी-चरित्र आठवणी) हे अनुवादिक चरित्र, डॉ. प्रा. ग. ना. जोशी (पुणे विद्यापीठ) जन्मशताब्दि प्रीत्यर्थ ग्रंथ, डॉ. चिंचोळकर. (अमरावती-मराठी) ''श्रीअरविंद दर्शन'' आणि सत्प्रेम यांच्या श्री ऑरबिन्दो दि ॲडव्हेंचर ऑफ कॉन्शसनेस या पुस्तकाच्या मराठी अनुवाद ''श्री अरविंद : चैतन्याचे अपूर्व साहस'' (मराठी : किशोर कुलकर्णी मुंबई) या पुस्तकातून श्रीअरविंदतत्त्वांचा चांगला परिचय मिळतो. श्रीअरविंद चरित्र आणि तत्वज्ञान यांचा एकत्रित वाचनाचा लाभ दुरापास्तच आहे. म्हणूनच या ॐकार ट्रस्टच्या कल्याणी वार्षिक नियतकालिकाची ही प्रकाश प्रथा अतिशय स्तुत्य आणि आवश्यक आहे. या निमित्ताने ट्रस्ट व ट्रस्टी यांचे मराठी भाषक कृतज्ञतापूर्वक आभारीच राहतील हे निश्चित आहे.

१५ ऑगस्ट १८७२ या दिवशी श्रीअरविंद कलकत्त्यात जन्मले तेव्हा वडील कृष्णधन व्यावसायिक व अंशत: शासकीय डॉक्टर होते. युरोपमधील औद्योगिक क्रांतीमुळे व नवीन सुधारणामुळे लोक अधिक सुखी व शिक्षणप्रेमी बनत चाललेले त्यांनी पाहिले आणि आपल्याही देशाची भरभराट होण्यासाठी ही नवीन जीवनपद्धती उत्साहाने व आत्मविश्वासाने स्वीकारली पाहिजे असे त्यांचे मत बनले. जुन्यापुराण्या अंधश्रद्धा व कर्मठपणा सोडण्यासाठी जुनी भाषा, कथा, तत्वे, उपदेश आपल्या मुलांनी प्रथमच सोडावेत यासाठी बंगाली भाषा संस्कार व जीवनपद्धती पूर्ण रद्द करून आधुनिक बनण्यासाठी त्यांनी आपल्या मुलांना त्यांच्या शिशु वयातच (अरविंदांच्या वयाच्या सातव्या वर्षीच) दार्जिलिंगला लॉरेन्टो कॉन्व्हेन्ट शाळेत दाखल केले व इंग्लिश कुटुंबातच त्यांना राहण्याजेवण्याची व्यवस्था करून बंगाल, बंगाली भाषा व बंगाली लोक यांच्यापासून कटाक्षाने दूर राखले. आपल्याकडेही त्याच काळात सुशिक्षित समाजसुधारक 'इंग्रजी भाषा ही वाघिणीचे दूध आहे' असे आग्रहाने सांगतच होते. विनयमोहन, मनमोहन, श्रीअरविंद हे तिघेही भाऊ वडिलांच्या आज्ञेनुसार १८७९ मध्ये इंग्लंडला गेले व मँचेस्टरमध्ये डुएट कुटुंबात सहनिवासी कुटुंबीय म्हणून राहिले.

१८८४ मध्ये ते लंडनला सेंट पॉलस्कूलमध्ये दाखल झाले आणि १८८९ मध्ये ते तेथून मॅट्रिक परीक्षा उत्कृष्टपणे उत्तीर्ण झाले. जुलै १८९० मध्ये आयसीएस मध्ये प्रवेश करून त्यांनी ११ ऑक्टोबरलाच केंब्रिजच्या किंग्ज कॉलेजमध्ये प्रवेश केला. शिक्षणकाळात ते शिष्यवृत्तीवरच राहिले आणि या काळात त्यांना काही वेळा वडिलांकडून

खर्चासाठी काहीच पैसे मिळतही नव्हते. डॉक्टर कृष्णधन घोष सामाजिक प्रेमस्वभावामुळे रुग्णांकडून औषधांचा, उपचारांचा, श्रमाचा मोबदला घेण्यात फारसे जागरूकही कधीच नव्हते. काव्यवृत्ती, ज्ञानतृष्णा, देशप्रेम या प्रबळ भावनांमुळे श्रीअरविंदही काही काळ अर्धपोटी राहिल्याचे उल्लेख आहेत. अत्यंत संवेदनशील आणि तैलबुद्धीच्या श्रीअरविंदांना इंग्रजी भाषासाहित्य, इंग्रजी माणसांचा स्वभाव, त्यांच्या सामाजिक जीवनाची मूल्ये यांचा निकटपूर्ण परिचय होऊन गेला व त्याचा त्यांना पुढील कार्यसमृद्ध जीवनात पूर्ण उपयोग झाला. केंब्रिजमध्येच ते ''इंडियन मजलिस'' या विद्यार्थी संघटनेत दाखल झाले आणि तेथेच भारतीय स्वातंत्र्यावर प्रगट भाषणेही देऊ लागले. १८९१-९२ मध्ये त्यांनी ''व्हिजिल ऑफ थायलंड'' हा दिर्घ पोवाडा (बॅलड) लिहिला. पण तो पुढे अपूर्णच राहिला. १८९२ मध्ये ते ''क्लासिकल ट्रायपॉस'' प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आणि लगेच ऑगस्ट १८९२ मध्येच आयसीएस अंतिम परीक्षाही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. वडिलांना तर अरविंदांनी कलेक्टर होऊन भरतवासीयांत शिक्षण सुधारणा करावी अशी तीव्र इच्छा होती तर श्रीअरविंदांची इंग्रजी राज्यकर्त्यांची कोणतीही नोकरी न करण्याचीच प्रतिज्ञा होती. म्हणून या मामलेदारी/कलेक्टरीच्या अंतिम 'अश्वारोहण' परीक्षेत त्यांनी चाचणीच दिली नाही म्हणून त्यांची तशी नेमणूक सरकारास करता येईना. ऑक्टोबर १८९२ मध्येच ते केंब्रिज सोडून लंडनला आले आणि लंडनमधील 'लोटस ॲण्ड डॅगर' या भारतीयांच्या गुप्त राजकीय संघटनेच्या संस्थापनेत सहभागी झाले. याचवर्षी नोव्हेंबर मध्ये त्यांना ''आत्म्याच्या मानसिक अनुभूतीचा'' योगपूर्व अनुभव आला. सयाजीराव गायकवाड बडोदा संस्थानचे राजे लायक व उमद्या सुशिक्षित/सुसंस्कृत युवकांना सर्वतोपरी साहाय्य, संरक्षण देण्याकडे त्यांचा जन्मजात कल होता. श्रीअरविंदांना त्यांनी ते इंग्लंडमध्ये असतानाच हेरलेले होते. १८९२ डिसेंबरमध्येच त्यांनी श्रीअरविंदांना बडोदा दरबारचे ''हुजूर कामदार'' (दिवाण/उपदिवाण/मुख्य सचिव) या नेमणूकीचे पत्र दिले. १२ जानेवारीला (१८९३) श्रीअरविंदांचे एसएस कारथेज बोटीने जिब्राल्टर पोर्टसैद एडन मार्गे इंग्लंडहून हिंदुस्थानकडे निघण्याचे तिकिटही निश्चित करण्यात आले. यावेळीच एक अनपेक्षित घटना घडली. त्यांचे वडील कृष्णधन घोषांना वृत्तसंदेह मिळाला की बोट प्रवासात संपूर्ण बुडाली आणि सर्वप्रवासी, बोटीचे अधिकारी, तळाशी बुडून मरण पावले, त्याच बोटीत श्रीअरविंद सर्वगुणी मुलगा ही बुडून वारला या वृत्ताने हाय खाऊन लवकरच कृष्णधन डॉक्टरही मृत्यु पावले आणि श्रीअरविंदांची आई सैरभैर झाली. प्रत्यक्षात दुसऱ्याच बोटीने इतर प्रवाशांबरोबर ६ फेब्रुवारीस (१८९३) श्रीअरिंवद मुंबईस अपोलो बंदरात उतरले. बंदरात उतरताच, मातृभूमीवर पाऊल ठेवताच श्रीअरविंदांना ''एका विशाल शांतीचा'' दिव्य अनुभव आला आणि तो नंतर काही महिने कायम राहिला, बडोद्यास कामावर रुजु झाल्यावर १८ फेब्रुवारी १८९३ लाच बग्गीतून जात असताना अपघात समयी त्यांना अलगद सुरक्षित उचलून घेतल्याचा संरक्षक दिव्य ईश्वराचा अनुभव आला, दर्शन घडले. मार्च एप्रिलमध्येच त्यांनी महाभारताच्या अनुवादास प्रारंभ केला. २६ जूनला मुंबईच्या ''इंदुप्रकाश'' मध्ये हिंदुस्थान व ब्रिटिश पार्लमेंट या संबंधावर विस्तृत लेख लिहिला. १८९४ मध्ये बंकिमचंद्र चतर्जीवर लेखन केले. १८९५ साली त्यांचा साँग्ज ऑफ माटिल्ला हा काव्यसंग्रही प्रसिद्ध झाला.

१८९६ मध्येच श्रीअरविंदांनी कथा काव्यरूपात 'उर्वशी' लिहिली. १८९७-९८ मध्ये श्रीअरविंद फ्रेंच आणि इंग्रजी भाषांचे प्राध्यापक म्हणून बडोदा कॉलेजमध्ये कार्यरत होते. याच काळात १८९९ मध्ये श्रीअरविंदांचे लव्ह ॲण्ड डेथ हे दीर्घ काव्य प्रसिद्ध झाले. चरित्रकार सांगतात की याच काळापासून महाकवि श्रीअरविंद यांचे काव्यबीज अंकुरले गेले आणि त्यातूनच पुढे ''सावित्री'' हे 'प्रतीक आणि रूपक' असे बारापर्वांचे जागतिक वैश्विक सौंदर्याचे महाकाव्य निर्माण झाले. अत्यंत संवेदनशील तसेच तीक्ष्ण बुद्धिमत्तेचा जन्मजात लाभ झालेल्या श्रीअरविंद यांचा व्यक्तिगत जीवभाव विकसित होत असतानाच त्यांचे मोठे बंधू विनयमोहन हे कुचबिहारच्या संस्थान दरबारी मोठे अधिकारी म्हणून स्थिरावले होते व दुसरे ज्येष्ठ भाऊ मनमोहन घोष प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये इंग्रजी भाषेचे निष्णात प्राध्यापक म्हणून विख्यात झालेले होते. समाजप्रेमी शैक्षणिक कार्यात रमलेले मनमोहन घोष आणि सामाजिक, राजकीय सुधारणा प्रयत्नात रमलेले विनयमोहन घोष यांचा पुढे घरात मात्र सक्रिय सहभाग कमीकमी होत गेला. ही सरोजिनी या प्रेमळ बहिणीची भावंडे यांच्या भेटी वर्तमानाबद्दल विस्तृत वर्णन श्री धर्मानंद कोसंबी (बौद्ध) यांच्या माहितीपूर्ण आत्मचरित्रातही वाचायला मिळते. १९०० साली श्रीअरविंदांच्या प्रथम राजकीय सक्रिय कार्याचा आरंभ झाला. जतींद्रनाथ बॅनर्जी या हस्तकाला त्यांनी क्रांतिकारक संघटना कार्य व प्रचार यासाठी बंगालला पाठवले. १९०१ मध्ये कलकत्त्यात सुधारक नेते भूपाल चंद्र बसू यांच्या मृणालिनी या कन्येशी श्रीअरविंदांचा विवाह झाला. तो अगदी साध्या पद्धतीने झाला. थोड्याच दिवसांनी श्रीअरविंद, बहीण सरोजिनी व पत्नी मृणालिनी हे तिघे नैनितालला गेले. भारताचे स्वातंत्र्य आणि ईश्वराच्या अनुभूतीसाठी तीव्र साधना हीच आपल्या आयुष्याची प्रमुख आदर्श ध्येये श्रीअरविंदांनी मानली होती. वैयक्तिक, सांसारिक, कौटुंबिक सुखाच्या आकांक्षा कधीच नव्हत्या. त्यामुळे त्यांचे राजकीय देशकार्य अधिकच जोमाने होत गेले. हुजूर कामदार, भूमिमापन संपादन अधिकारी, कॉलेज व्याख्याते, प्राचार्य, सयाजीरावांचे व्यक्तिगत व कार्यालयीन सचिव, सांस्कृतिक कार्यक्रमांचे अध्यक्ष अशा विविध कामातून लहान मोठ्या रजा, पगारी बिनपगारी अशा घेत. त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे कार्य अधिक वाढवीतच नेले व ते काँग्रेस पक्षातीलही जहाल सशस्त्र क्रांतिकारक अशा तरुण कार्यकर्त्यांचे नेते झाले. परमेश्वर साधनेकडेही ते अधिकाधिक तनमनाने निरलसने तीव्र मार्गप्रवण राहिले. त्यातूनच डिसेंबर १९०२ मध्ये राष्ट्रीश पक्षसंमेलनात त्यांची अहमदाबादला लोकमान्य टिळकांची महत्त्वपूर्ण भेट झाली आणि लगेच ते पश्चिम भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या गुप्त संघटनेत सामील होऊन कार्यरत झाले. राजकारणाच्या क्षेत्रात त्याकाळी तरुण मंडळी उत्साहाने सामील होत असत. देवावर पूर्ण श्रद्धा आणि निष्ठा असल्यानेच ते मे १९०३ मध्ये सयाजीरावाबरोबर काश्मीर दौऱ्यात प्रवासात श्रीशंकराचार्य योगस्थानावर आदिशक्ती मंदिराजवळ (तख्त-ऐ-सुलेमान) या उंचशिखरावर थांबले असताना त्यांना ''शून्य अनन्ताचा'' साक्षात् अनुभव आला. १९०४ मध्ये संस्थानाचे हुजूर

कामदारपद सोडून त्यांनी पूर्णवेळ कॉलेज कामास आणि तीव्र योगसाधनेस दिला. त्यातच १९०५ ऑक्टोबरमध्ये बंगालमध्ये फाळणी विरुद्ध ब्रिटिश सरकारशी विरोधी लढा जाहीर केला आणि ''संपूर्ण असहकार'' राजकीय पत्रके लिहून चळवळ पेटवली. यासाठी ''भवानी मंदिर'' हे लेखलेखन केले. १९०६ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस बनारस अधिवेशनात सहभाग घेतला. कलकत्त्याला राष्ट्रीय शिक्षण कौन्सिल निर्मिती केली, बंगाली ''युगांतर'' साप्ताहिक प्रकाशन सुरू केले, बारिसाल कॉन्फरन्स पूर्ण राजकीय करून बिपिनचंद्र पालांच्याबरोबर बंगालदौरा केला, ऑगस्टमध्ये ''वंदे मातरम्'' प्रकाशन सुरू केले अशाच अनेक कामामुळे आलेल्या आजारामुळे प्रकृति सुधारण्यासाठी ते ३/४ दिवस मात्र देवघर येथे गेले व परत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनात आले.

१९०७ मध्ये एकीकडे व्यक्तिश: प्रिन्स ऑफ एडूर हे नाट्यलेखन केले तर दुसरीकडे राजकीय कार्यात ब्रिटिश सरकारला कठोर तात्विक असहकारी विरोध या तत्वाचा पुरस्कार ''वंदे मातरम्''च्या अंकातून मांडला. हा अंक जूनपासून नव्या स्वरूपात प्रकाशित होऊ लागला आणि त्याबद्दल ब्रिटिश सरकारची ताकीद देणारी नोटीसही जारी झाली. जूनमध्ये खुलन्याला राष्ट्रीय विद्यालय स्थापन केले. 'पर्सियस द डिलिव्हर' हे नाट्यलेखन साप्ताहिक वंदे मातरम् मध्ये प्रसिद्ध केले. त्याबद्दल वंदे मातरम्च्या ऑफिसची झडती सरकारने घेतली व सरकारी तक्रार नोंदली. डिसेंबर १९०७ मध्ये सुरतला राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन सुरू झाले. दुसऱ्या दिवशी श्रीअरविंदांनी व्यासपीठावरूनच काँग्रेस जहाल क्रांतिकारी आणि नेमस्त मवाळ अशा दोन गटांमध्ये दुभंगल्याचे जाहीर केले. जानेवारी १९०८ मध्ये महाराष्ट्रीय महायोगी विष्णू भास्कर लेले यांची भेट घेतली. मन सर्वस्वी संपूर्ण शांत करण्याची त्यांची पद्धती शिकून त्या परमब्रह्मशांतीची स्पष्ट पूर्ण अनुभूति घेतली. नंतर १२ जानेवारी १९०८ ते फेब्रुवारी एक १९०८ महाराष्ट्रात रजाकीय दौरा करून पुणे, मुंबई गिरगाव आणि मुंबई राष्ट्रीय युनियन सभा, नाशिक, धुळे, अमरावती, नागपूर येथे जाहीर भाषणे दिली. मार्चपासून हावरा येथे बिपिनचंद्र पाल यांची ब्रिटिश कैदेतून मुक्ती झाल्याच्या सत्काराप्रीत्यर्थ जाहीर सभा, चेताला येथे प्रचंड राजकीय सभेत भाषण, कलकत्याला पनती मठात संयुक्त काँग्रेसवर भाषण नंतर बारुईपूर, किशोरगंज येथे पल्ली समिती अशी तुफानी भाषणे करून महाराष्ट्र व बंगाल राज्यांना राजकीय उद्बोधन दिले. २८ एप्रिल १९०८ ला कलकत्त्यातील पहिली जागा बदलून नवशक्ति ऑफिसमध्ये जाताच सशस्त्र क्रांतिकारक देशभक्तांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाच्या आरोपाखाली श्रीअरविंदांनी सरकारविरोधी उठाव केल्याच्या गुन्ह्याबद्दल त्यांना व त्यांचा युवकनेता भाऊ बारिंद्र यांना अटक करून लालबझार पोलीस कोठडीत कलकत्त्याला डांबून ठेवले. १९०८ मे मध्ये अलीपूर तुरुंगात अरविंदांना ठेवले असताना त्यांनी भगवद्गीता व उपनिषदे यांचा अभ्यास साधनेने केला आणि त्यांना वैश्विक चित्चैतन्य जाणीवेचा साक्षात्कार झाला व श्रीकृष्णच चराचर विश्वरूप आहे आणि सर्व चराचर विश्व हे पूर्ण श्रीकृष्ण स्वरूपच आहे असा प्रखर साक्षात्कार झाला. त्यांच्यावरील खटला कोर्टात चालून ६ मे १९०९ दिवशी त्यांची निर्दोष सुटका होऊन ते कलकत्त्याला आले. मे १९१० मध्ये उत्तरपादा अलीपूर येथे जाहीर सभा घेऊन प्रत्यक्ष राजकारणाचा संन्यास घेतला, राजकीय सहकाऱ्यांची अखेरची रजा घेतली. ''कर्मयोगी''च्या प्रकाशन-लेखात संपादकीय निवेदनातून त्यांनी राजकीय निवृत्ती जाहीर केली, ''धर्म''या बंगाली साप्ताहिकातून प्रकटीकरण छापले. बंगालमधील सर्व राष्ट्रीय काँग्रेस राजकीय समित्यांचे राज्याध्यक्ष या नात्याने आपली भूमिका मांडली आणि फेब्रुवारी १९१० मध्ये ते ब्रिटिश अमलाखालील भारतदेश सोडून चंद्रनगर या फ्रेंच वसाहतीत दाखल झाले. या सर्व कालखंडातील स्थित्यंतरात त्यांना श्री स्वामी विवेकानंदांची आंग्ल शिष्या भगिनी निवेदिता यांची अमोल मदत झाली. या वर्षातच त्यांनी कर्मयोगी प्रकाशनातून भारतीय शिक्षण पद्धती, बाजीप्रभू देशपांडे, चित्रांगदा हे लेखन प्रसिद्ध केले. नंतर ४ एप्रिल १९१० ला श्रीअरविंद पाँडिचेरी (आता पुदुचेरी) येथे येऊन राहिले. मद्रास (चेन्नई)च्या ''हिंदु''या वृत्तपत्रातून त्यांनी राजकीय लढ्यातून निवृत्ति व अध्यात्म साधनेचा प्रकर्षित अभ्यासयोगारंभ हे विचार ही प्रसिद्ध केले. १९१२ जुलैत त्यांनी बंगालचे राष्ट्रीय काँग्रेस नेते मोतीलाल रॉय यांना विस्तृत पत्र लिहिले आणि बंगालमधील क्रांतिकारक नेत्याबरोबर कृतज्ञतापूर्वक अप्रत्यक्ष संबंध निश्चित ठेवला.

१९१३ मध्ये पुडुचेरीत त्यांनी आपल्या एकांत साधनेसाठी पूर्ण अनुकूल निवासरचना राहील अशा दृष्टीने दोन वेळा जागा बदलून स्थळ रचना निश्चित केली व सर्व काही संपवल्यानंतरही आपल्यातच तरीही जो एक राहातो त्यालाही शून्य करणारा असा खराखुरा पूर्ण 'एकांत' अनुभवण्याची आपली योगसाधना तीव्र व प्रगतिमान केली. २९ मार्च १९१४ या दिवशी मिरा अल्फासा रिचर्ड या 'मदर-मानाजी-मातृका देवी-मिराम्बिका माता' या संगीततज्ञ, चित्रकार कलावतीची श्री गुरू अरविंदस्वरूपी श्रीकृष्ण यांची प्रथमच मानवदेही भेट पाँडिचरी आश्रमात झाली व एका नवीन युगालाच आरंभ झाला. १५ ऑगस्टला ''आर्य'' प्रकाशनाचा पहिला आरंभांक प्रसिद्ध झाला, द लाईफ डिव्हाईन (दिव्य जीवन)चा प्रथम खंड, सिंथेसिस ऑफ योग (योगसमन्वय-संपूर्ण योग) सिक्रेट ऑफ वेदा (वेदरहस्य) ईशोपनिषद् या ग्रंथांचेही प्रथम भाग याच श्रीअरविंद वर्धापन दिनी प्रकाशित झाले. ऑक्टोबरमध्ये ''वासवदत्ता'' हे रम्यनाट्यलेखन ही प्रसिद्ध झाले. याच काळात प्रथम जागतिक महायुद्ध सुरू झाल्याने राजकीय परराष्ट्र फ्रेंच प्रशासनाच्या नियमानुसार रिचर्ड दांपत्याला २२ फेब्रुवारी १९१५ ला फ्रान्सला परत जावे लागले. १५ सप्टेंबरला दि आयडिल ऑफ ह्यूमन युनिटी (ह्यूमन सायकल) सोशल ग्रंथाचा प्रथम भाग आर्यामध्ये प्रसिद्ध झाला. यानंतर क्रमाने द फ्यूचर पोएट्री, कालिदासाचे अनुवादभाष्य कुमारसंभवम्, माँटेग्यू सुधारणा अभ्यास, इंडिया सिव्हिलाइज्ड असे तात्विक, सामाजिक, मानसशास्त्रीय, काव्यरूपविवरण असे श्रीअरविंदांचे इंग्रजी लेखन प्रकाशित झाले.


१७ डिसेंबर १९१८ या दिवशी कलकत्त्यात श्रीअरविंदांची पत्नी मृणालिनी यांचे निधन झाले. त्यापूर्वी बरीच वर्षे त्या श्रीरामकृष्ण मठात शारदा माता यांच्या सहवासात आश्रमीय जीवन व्यतीत करीत होत्या. २४ एप्रिल १९२० ला श्री माताजी फ्रान्सहून पाँडिचेरी आश्रमात आल्या

आणि नंतर आश्रमात संपूर्ण काया पालट होत गेला.पाँडिचेरी आश्रमात २०/२५ साधक समूहाबरोबर राहातानाच त्यांनी आश्रमाला एक सुंदर साधना व्यवस्था लावून दिली व विरक्त महर्षी श्रीअरविंदांना महाकवि महायोगी जीवनाचा आमूलाग्र अंगीकार करण्यास सर्वतोपरी साहाय्य व कृष्णभक्तिपूर्ण सहकार्य सहजी नित्य उपलब्ध झाले. १९२० ऑगस्ट १५ दिवशी श्रीअरविंद प्रेरित 'स्टँडर्ड बेअरर' या चंद्रनगरच्या मासिकात आम्ही स्वत: 'Ourselves' हा लेख प्रसिद्ध झाला आणि श्रीअरविंद लेखन समाजमुखी, राष्ट्रमुखी, विश्वमुखी झाले. श्री अरविंदांची ग्रंथरचना व्हिक्टोरियन हायफ्लोन इंग्लिश पद्धतीची आहे. त्यामागे त्यांचा इंग्रजी, ग्रीक, लॅटिन, संस्कृत, हिंदी, बंगाली, मराठी, युरोपीय आफ्रिकन, अमेरिकन भाषांतील विविध विषयक संशोधन कलासंस्कृती इतिहास मिथ्य कथा यांचा प्रत्यक्ष अभ्यासच उभा आहे. सावित्री हे महाकाव्य, लाईफ डिव्हाईन, सिंथेसिस ऑफयोग, एस्सेज ऑफ गीता, सिक्रेट ऑफ वेदाज, उपनिषदे हे त्यांचे अत्यंत महत्वपूर्ण लेखन आहे. श्रीअरविंदांचे सर्व मूलभूत तत्त्वज्ञान हे त्यांच्या वाचनाचेच नव्हे तर अनुभूतीतून चिंतनाचेच आहे. श्रीअरविंद हे मूलतया वेदांती आहेत. त्यामुळे त्यांनी उत्पत्तीसाठी नासदीय सूक्त प्रमाण धरल्याचे दिसते. नसत्यातून असते निर्माण झाले असले पाहिजे असे ते मानतात. नसत्, असत्, सत् ही त्रिपुटी आद्य आहे असे त्यांनी म्हटले आहे. या सर्व निर्मितीचे मूळ नासदीय सूक्त या केवळ सात श्लोकातील ''कामस्तदग्रे'' हे महत्वाचे सूत्र त्यांनी लाईफ डिव्हाईन ग्रंथात प्रमाण धरलेले दिसते. जिज्ञासा-ज्ञान-इच्छा या क्रमानेच निर्मितीचा उलगडा होतो. मूळ त्रिपुटीचे रूपांतरण द्वैतात होते, वक्ता, वचन आणि श्रोता या त्रिपुटीने गाढ अनुभूतीने वक्ता व वचन एकरूप होऊन श्रोता व वचनबोध हे द्वैतच पुढे शिल्लक राहाते असे ते म्हणतात. ''सावित्रीत त्यांनी म्हटले आहे, इन डायर ड्यू ॲलिटी वुइ हॅव टू लिव्ह इन धिस वर्ल्ड.'' द्वैताचे साधनेने एकत्वात रूपांतर झाले की ब्रह्मज्ञान प्राप्त होते असे वेद म्हणतो - ब्रह्म हेच आदि मध्ये अंत आहे आणि त्याची प्राप्ति अंतिम धरली तरी ब्रह्म आज अज्ञातच राहाणार आहे. हा सिद्धांत अरविंदांना मान्य नाही. ब्रह्म हा सिद्धांतच त्यांना शब्दप्रमाण, रूक्ष व अपूर्ण जीवन वाटतो. लाइफ डिव्हाईनमध्ये ते सांगतात की ब्रह्म हे अज्ञात असेल, पण ते अज्ञेय नाही. ब्रह्म अमित असेल पण ते अमेय नाही. ते जड पार्थिवातूनसुद्धा मित होईल, मेय असल्याने जड पार्थिवातसुद्धा ते मोजता येईल. अरविंदांच्या मते जडपार्थिव व सत् चैतन्य हे एकच आणि समानच आहेत. जडाच्या स्वभावगुणामुळेच आपल्याला द्वैत अनुभवात जाणवत असते. मूलभूत द्वैते श्रीअरविंदांच्या मते दोनच आहेत. जड शारीरिक दृष्टीने पुरुष आणि स्त्री (नर-मादी) हे एक मूळ द्वैत आणि मनोदृष्टीने ज्ञान आणि अज्ञान अवस्था हे दुसरे मूळ द्वैत. बाकी सर्व द्वैते ही जीवनिर्मितच आहेत असे ते सांगतात.

निसर्गाचा स्वभाव - जन्मणे, जगणे, जगवणे, आणखी दुसरे अशा स्वरूपाचे जन्माला घालणे की जे पुढे आणखी काही जननक्षम असे जन्माला घालू शकेल, असे मूलभूत शारीरिक द्वैत आहे ते केवळ विश्वजीवन अखंड चालू राहावे व रहस्यमय आनंदात सतत राहू शकावे यासाठीच केवळ नर-मादी हे मूळ द्वैत आहे व राहील असे त्यांनी 'मोअर लाईटस् ऑन प्रॉब्लेम्स ऑफ लाईफ' या किशोर गांधी संपादित पुस्तकात म्हटले आहे. ज्ञान अज्ञान हे द्वैत मात्र साधना, प्रार्थना, योग, गुरूकृपा, देवाचा आशिर्वाद अशा सारख्या प्रयत्नांनी नष्ट होऊन मानसिक, हार्दिक, बौद्धिक, आत्मिक एकात्मता त्यांनी शक्य गृहीतच मांडली आहे. अरविंद निसर्गाला. जीवनाला (लाईफला) देवसमान मानतात असे लाईफ डिव्हाईनमध्ये दिसते. ब्रह्माचे गुणधर्म आज भौतिकी वैज्ञानिक ऊर्जेत (एनर्जीत) मानतात. त्यांचे सिद्धांत जिग्स् बोसॉम सारख्या डिव्हाईन पार्टिकलच्या (देवकणाच्या) कंपन-लहर-लाट-किरण अशा ऊर्जा शक्तीवर अवलंबून आहेत. अरविंद या ऊर्जांना स्थळ, काळ, रीति, पदार्थ गुण यांच्या मर्यादेत बद्ध मानतात. श्रीअरविंद, जाणतीजाणीव, आत्मभाव, आत्माभाव, चित्चैतन्य यासारख्या सिद्धांतांना मूलभूत सत्य मानतात कारण चैतन्य केवळ जडपदार्थ नाही, रुक्ष सिद्धांत शब्द नाहीत तर हृदयपूर्ण, भावपूर्ण प्रीति सौंदर्ययुक्त आनंदपूर्ण जीवन आहे, तेच देवदेवतांनाही जन्म देते असे सांगतात. जे बुद्धीस सुचू शकते ते प्रत्यक्षात होणारच आणि जे होणे शक्य नाही ते कधीही सुचूही शकणारच नाही असा विश्वासानुभव अरविंद तत्त्वामध्ये आहे. पण यासाठी १९१४ ते १९५० या तीन तपांच्या साधनेचा 'रेकॉर्डस् ऑफ योग' या ग्रंथाचा अभ्यास विचार समजणे आवश्यक ठरते.

श्री. अशोकदादा लीन जावडेकर, पुणे
मोबाईल - ९९२३५९६७१६

■ ■ ■



माताजी – सत् प्रेमाची ज्योती

सौ. मीरा श्रीकृष्ण दीक्षित

एम. ए., योगशिक्षक
नैनिताल येथील श्रीअरविंदो आश्रमातील
दरवर्षी होणाऱ्या स्वाध्याय शिबिरात सह-आयोजक म्हणून कार्यरत.



आमच्या गरजांसाठी एक आई, आमच्या अडचणी दूर करण्यासाठी एक मित्र, सहनशील व शांत अशी समुपदेशक व गुरू; आपल्या प्रफुल्लित हास्याने दु:ख चिंता, निराशेचे ढग पळवून लावणारी, सदैव पाठीशी असणाऱ्या तिच्या मदतीची आठवण देणारी आणि चिरंतन असा प्रकाश दाखविणारी दूस मेअर – Sweet Mother – माताजी – श्री माँ....!

काही व्यक्ती अलौकिकत्त्व घेऊनच जन्माला येतात. जगाला सत्याचा प्रकाश दाखविण्यासाठी त्यांचा जन्म असतो. माताजी, अशा व्यक्तींपैकी एक आहेत. कोण होत्या या माताजी? कोठून आल्या या पाँडिचेरीमध्ये? त्यांच्याविषयी असे अनेक प्रश्न आणि कुतूहल आपल्या मनात असेल, म्हणूनच हा लेखप्रपंच!

माताजी मूळ फ्रान्स देशीच्या. २१ फेब्रुवारी १८७८ रोजी त्यांचा जन्म पॅरीस येथे झाला. त्यांचे मूळ नाव – मीरा अल्फासा. वडील – मॉरीस अल्फासा, उच्चमध्यमवर्गीय बँकर होते व आई – मातिल्डा, एक सुसंस्कृत, शिस्तप्रिय स्त्री होती. त्यांना मातिओ नावाचा एक मोठा भाऊही होता, जो मोठेपणी काहीकाळ आफ्रिकेत गव्हर्नर तर पुढे फ्रान्समध्ये उच्च पदांवर कार्यरत होता.

चार वर्षांची असताना ही मीरा, इतर लहान मुलांप्रमाणे खेळणे, हट्ट करणे असे काही न करता आपल्या छोट्या खुर्चीवर शांतपणे बसून असे. तिचा तो शांत, गंभीर चेहरा पाहून, एकदा तिच्या आईने तिला विचारले, 'तुझ्या खांद्यावर जगाचे ओझे असल्यासारखा असा गंभीर चेहरा करून कां बसली आहेस?' त्यावर छोट्या मीरेने शांतपणे उत्तर दिले, 'होय, खरेच माझ्या खांद्यावर जगाचे ओझे आहे!' तिच्या आईने हे बोलणे गंमतीचे म्हणून सोडून दिले. पण मीरा सत्य बोलत होती!

काहीशी उशीरा शाळेत जाऊ लागलेली मीरा अभ्यासात अत्यंत हुशार होती. तिला अनेक कलांमध्येही रस होता व गतीही होती. वयाच्या नवव्या वर्षी ती उत्तम प्रकारे टेनिस खेळायला शिकली. तर पंधराव्या वर्षी गिटार, पियानो इत्यादी वाद्य-वादनातही पारंगत झाली. अप्रतिम अशी चित्रकला तिला अवगत होती. कला महाविद्यालयात तिने चित्रकलेचे शिक्षण घेतले. अगदी तरूण वयातच तिच्या चित्रांची प्रदर्शने पॅरीसमध्ये भरवली जाऊ लागली. ह्या काळात तिने आपल्या समवयस्क व समविचारी मित्र-मैत्रिणींचे एक मंडळ स्थापन केले व त्याला नाव दिले 'कॉसमॉस', दर बुधवारी त्यांची बैठक होई व त्यात प्रत्येकाने आपले विचार आपल्या निबंधात मांडावे असे ठरले. निबंधाचे विषयही – दु:खात पिचलेल्या सर्वसामान्य लोकांसाठी काय करता येईल? असे असत. या निबंधातील कल्पना प्रत्यक्षात कशा आणता येतील यावर सारे चर्चा करीत असत. अर्थात् या कार्यामध्ये नेतृत्व हे मीरेकडे असे.

लोकांची दु:खं दूर करण्याविषयीचे विचार मीरेच्या मनात लहानपणापासूनच येत असत. वयाच्या ११/१२ व्या वर्षी तिला एक स्वप्न नेहमी दिसत असे, ते असे- तिच्या शरीरातून तिचाच एक सूक्ष्म देह बाहेर पडतो आहे व आकाशात वर-वर जातो आहे. ती जसजशी वर जाते तसा तिच्या झग्याचा घेर मोठा मोठा होत जातो व मग दु:खी कष्टी लोक त्या झग्याच्या आश्रयाला येऊ पहातात. आश्रयाला आलेले लोक आपली दु:खं विसरून सुखासमाधानाने परत जातात. गूढ विद्या शिकण्यातही मीरेला रस होता. १९०५ ते १९०६ ह्या काळात अल्जेरियात जाऊन श्री ते ऑ व त्यांच्या फ्रेंच पत्नी यांचेकडून तिने गूढ विद्येचे शिक्षण घेतले. या साधनेने सूक्ष्म देहाने संचार करण्याची किमया तिने साधली. अध्यात्मिक उद्दिष्टांच्या सिध्दीसाठी तिला या ज्ञानाचा उपयोग करावयाचा होता. ह्या अलौकिक शक्तीचा उपयोग तिने फक्त आणि फक्त लोक कल्याणासाठीच केला; स्वत:चे मोठेपण मिरविण्यासाठी कदापिही नाही.

तरूणपणी मीरेची आध्यात्मिक साधना व त्या अनुषंगाने ग्रंथ वाचनही चालू होते. १८/१९ व्या वर्षी स्वामी विवेकानंदांचे 'राजयोग'

हे पुस्तक मीरेच्या वाचनात आले. ती अत्यंत आश्चर्यचकित झाली. कारण तिच्या साधनेमध्ये तिला येणाऱ्या अनुभवांना पुष्टी देणारी आणि तिला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यात होती. पुढे काही काळानंतर तिच्या हाती भगवद्गीतेचा फ्रेंच अनुवाद आला. अनुवाद काहीसा अपुरा होता व मीरेला भारतीय तत्त्वज्ञानाची त्यावेळी ओळखही नव्हती. त्यामुळे गीतावाचनात तिला बरेच प्रश्न, शंका येऊ लागल्या. पण शंका-समाधान करण्याचीही योजना आखली गेलेली होती. मीरेला स्वप्नात एक भारतीय व्यक्ती तिच्या प्रश्नांचे, शंकांचे निराकरण करून, तिचे मार्गदर्शन करू लागली. भगवान् श्रीकृष्णाने भगवद्गीता सांगितली आहे हे तिला माहित होते. त्यामुळे स्वप्नात येऊन मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीचे नाव तिने ठेवले – 'श्रीकृष्ण!'

पुढे मीरेचा विवाह पॉल रिचर्ड यांचेशी झाला. पॉल रिचर्ड हे उदार मतवादी, विचारवंत पत्रकार होते. वेगवेगळ्या देशातील दार्शनिकांची ओळख करून घेऊन त्यांचे विचार जाणून घेण्यास उत्सुक असलेले असे सद्गृहस्थ होते. पाँडिचेरी येथे फ्रेंच लोकांची सत्ता होती. मंत्रिमंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभ्या असलेल्या आपल्या मित्राला मदत करण्यासाठी पॉल रिचर्ड १९१० साली भारतात, पाँडिचेरी येथे आले. भारतभेटीला जाणाऱ्या आपल्या पतीजवळ मीरा रिचर्डने भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात तिला आलेले दोन प्रश्न दिले व भारतात एखादा योगीपुरुष भेटला, तर त्याच्याकडून या प्रश्नांची उत्तरे मिळवा म्हणून सांगितले. पाँडिचेरीमध्ये नुकत्याच आलेल्या श्रीअरविंदांशी पॉल रिचर्ड यांची गाठ पडली. श्रीअरविंदांच्या अलौकिक प्रतिभेने ते प्रभावित झाले. आपल्या पत्नीने दिलेले प्रश्न त्यांनी श्रीअरविंदांपुढे ठेवले. प्रश्न होते –

योगचक्र म्हणजे काय? व त्यात असणारे कमळ हे कशाचे निदर्शक असते? श्रीअरविंदांचे उत्तर होते – योगचक्र हे योग-बलाने जागृत होणाऱ्या चैतन्यशक्तीचे प्रतीक असते व त्यातील कमळ हे ईश्वराच्या कृपाप्रसादाने उमलणाऱ्या विकसनशील जाणिवेचे प्रतीक असते.

वरील उत्तराने मीरा रिचर्ड यांचे पूर्ण समाधान झाले व श्रीअरविंदांना भेटण्याची उत्सुकता, तीव्र इच्छा निर्माण झाली. पण ही इच्छा पूर्ण होण्यासाठी पुढे चार वर्षे जावी लागली. दरम्यान नोव्हेंबर १९११ पासून मीरा रिचर्ड आपल्या अध्यात्मिक साधनेमध्ये येणाऱ्या अनुभवांना, ईश्वराशी त्यांच्या होणाऱ्या 'मनोमय संवादाला' शब्दबद्ध करू लागल्या. हे लेखन पुढे त्या १९३५ सालापर्यंत करीत होत्या. ह्या लेखनाला त्यांची 'अध्यात्मिक रोजनिशी' ही म्हटले जाते. याच लेखनाचे संकलन करून त्यांचे 'Prayers & Meditation' अर्थात 'प्रार्थना आणि ध्यान' हे पुस्तक तयार झाले. मूळ फ्रेंच भाषेतील या लेखनाचे भारतीय व विदेशी अशा अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. श्रीअरविंदांच्या अनुयायांमध्ये 'Prayers & Meditation' ला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

सन १९१४ साली निवडणुकांच्या निमित्ताने पॉल रिचर्ड परत पाँडिचेरीला आले. ह्यावेळी त्यांच्याबरोबर मीरा रिचर्डही होत्या. पाँडिचेरीत दाखल होतानाच त्यांना एका विलक्षण शांतीची अनुभूती आली. तो दिवस होता २९ मार्च १९१४. त्यादिवशीच दुपारी मीरा रिचर्ड आपल्या पतीसह श्रीअरविंदांना भेटायला गेल्या. श्रीअरविंदांना मीरा रिचर्डनी जेव्हा प्रथम पाहिले, अन् त्या स्तब्ध झाल्या. भगवद्गीता अभ्यासताना त्यांच्या स्वप्नात येऊन त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या, ज्या व्यक्तीला त्यांनी 'श्रीकृष्ण' संबोधिले होते, ती व्यक्ती म्हणजे दुसरी, तिसरी कुणी नसून श्रीअरविंदच होते; हे त्यांना पहाताक्षणी त्यांच्या लक्षात आले. मीरा रिचर्ड श्रीअरविंदांसमोर नतमस्तक झाल्या, डोळे मिटून खाली जमिनीवर बसल्या. आता साऱ्या शंका फिटल्या होत्या, सारे प्रश्न निमाले होते. अंधाराची तमा उरली नव्हती, चिरंतन प्रकाश दाखविणाऱ्या व्यक्तीचे दर्शन घडले होते आणि आता घडत होते ते फक्त समर्पण! आपल्या शाश्वत गुरूसमोर भौतिकाच्या अखेरच्या पेशीपर्यंतचे संपूर्ण समर्पण!

दुसऱ्या दिवशीच्या आपल्या अध्यात्मिक रोजनिशीत मीरा रिचर्ड लिहितात – 'काल मी जी व्यक्ती पाहिली, तिचे अस्तित्त्वच मुळी कितीही अंधार असला तरी, एक दिवस प्रकाशाचा येणारच आहे याची ग्वाही देणारे आहे, ह्यात शंका नाही, श्रीअरविंदांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा केलेला अभ्यास, वेद, उपनिषदे, गीता इ. वर केलेले मौलिक चिंतन, त्यांचे विचार, या साऱ्याची जगाला ओळख व्हावी म्हणून रिचर्ड पती-पत्नीने श्रीअरविंदांना लेखन करण्याविषयी उद्युक्त केले. त्यातूनच 'आर्य' मासिकाचा आरंभ १५ ऑगस्ट १९१४ ला झाला. श्रीअरविंदाच्या या लेखनाचा मीरा रिचर्ड यांनी फ्रेंच व इटालियन भाषेत अनुवाद करून युरोप-खंडाला श्रीअरविंदांच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली. वर्षभराने पहिले महायुद्ध सुरू झाले आणि रिचर्ड दांपत्याला फ्रान्सला परतावे लागले.'

१९१६ साली पॉल रिचर्डना काही कामानिमित्त जपानला जावे लागले. १९१६ ते १९२० त्यांचे वास्तव्य जपान देशात होते. त्यावेळी मीरा रिचर्ड यांनी जपानी संस्कृती, त्यांची वैशिष्ट्ये, बौद्ध धर्म, झेन ध्यान साधना इत्यादींचा अभ्यास केला. तिथेही अध्यात्मप्रवण, समविचारी मित्रमंडळी त्यांच्याभोवती जमा झाली. उत्कृष्ट मार्गदर्शिका, उपदेशिका म्हणून त्यांची ख्याती झाली. त्या समविचारी मित्रमंडळींपैकी एक होते श्री. ओखावा. ते मीरा रिचर्ड यांच्याविषयी म्हणतात, 'पर्वतांनाही हलवू शकेल अशी इच्छाशक्ती तिच्या ठिकाणी होती. तलवारीच्या पात्यासारखी तिची बुद्धी तीक्ष्ण होती. तिचे विचार स्फटिकासारखे पारदर्शक आणि तिचा निश्चय वटवृक्षाच्या मुळापेक्षाही दृढ, खंबीर होता.' तर त्यांची दुसरी मैत्रिण श्रीमती कोबायाशी म्हणतात, 'अत्यंत तल्लख, उत्तम कलावंत. तिच्या बोटांवर कला जणु नाचत होती. तिने माझे एक रंगीत चित्र काढले होते अजूनही ते मी माझ्याजवळ जपून ठेवले आहे. बुद्धाची जन्मभूमी असलेल्या प्राचीन देशातील एका गुरूंना ती पूजनीय मानीत होती. तिचा दृढ विश्वास होता की, उद्याच्या जगाला तेच सत्य-मंत्र देणार आहेत!

१९१९ साली जपानमध्ये मीरा रिचर्ड यांची गुरूदेव रविंद्रनाथ टागोरांशी भेट झाली. रविंद्रनाथांनी त्यांचे अनेक कलांमधील नैपुण्य व अलौकिक व्यक्तिमत्त्व पाहून आपल्या शांतीनिकेतनची जबाबदारी घेण्याची त्यांना विनंती केली. पण मीरा रिचर्ड यांनी ती नम्रपणे नाकारली.

कारण आता त्यांना आपल्या कार्याचे स्थान व दिशा स्पष्ट झाली होती.

२४ एप्रिल १९२० रोजी मीरा रिचर्ड आपल्या एका मैत्रिणी समवेत पाँडिचेरीस परत आल्या. श्रीअरविंदांनीच एक दिवस त्यांना 'मदर' हे संबोधन दिले आणि मीरा रिचर्ड सर्व आश्रमवासियांच्या आई, मदर, माताजी झाल्या. माताजींनी आश्रमाला एक शिस्त लावली, त्यात सुसंवाद स्थापन केला. आश्रमाची आर्थिक स्थिती ठीक नव्हती. आश्रमाकरिता प्रसंगी माताजींनी स्वत:च्या मौल्यवान चीजवस्तूच नव्हे तर आपली उंची वस्त्रेही विकली व आश्रमाचा कारभार सुरळीत केला. १९२० साली एखाद्या विदेशी गोऱ्या स्त्रीला भारतीय समाजात प्रवेश मिळविणे ही फार कठीण गोष्ट होती. पण माताजींनी आपल्या दिव्य प्रेमाने सर्वांना आपलेसे केले. आश्रमातील एक ज्येष्ठ साधक श्री नलिनीकांत गुप्तजी सांगतात, 'श्रीअरविंदांचा थोरपणा आम्हाला कळत होता. पण त्यांच्याशी प्रथमपासून एक मित्रत्वाचे नाते असल्यामुळे आम्ही सर्व त्यांच्याशी तसेच वागत होतो. जेव्हा माताजी आश्रमात आल्या, तेव्हा त्यांच्या वागणुकीतून आम्हाला प्रथम कळले की, आपल्या गुरूंशी कसे वागावे, कसे बोलावे, त्यांचे बोलणे कसे ऐकावे, त्यांचा आदर कसा करावा – या साऱ्याचे ज्ञान आणि शिकवण न बोलता आपल्या कृतीतून माताजींनी आम्हाला दिली.'

माताजींनी आश्रमाची जबाबदारी समर्थपणे पेलली. प्रत्येकातील गुण व क्षमता ओळखून एकेकाला विशिष्ट कार्यभार त्यांनी दिला. आश्रमाला आवश्यक भाजीपाला, दुग्ध व्यवसाय, बेकरी इ. छोटे छोटे उद्योग सुरू केले आणि आश्रम स्वयंपूर्ण बनविला. गुणवत्तेच्या बाबतीत कुठेही तडजोड न करता कार्यरत असलेले हे उद्योग आजही उच्च दर्जाच्या उत्पादनांकरिता प्रसिद्ध आहेत. माताजींनी आश्रमाची जबाबदारी घेतली तेव्हा १५/१६ आश्रमवासी होते तर त्यांच्या अंतिम समयी ही संख्या १६०० झाली होती. आश्रमवासियांच्या सर्व गरजा त्या स्वत: लक्ष घालून पुरवित असत. लहानपणापासूनच माताजींचे एक स्वप्न होते की ईश्वराची साधना करणाऱ्यांसाठी एक अशी जागा हवी ज्यात साधकांना आर्थिक, सांसारिक अडी-अडचणींचे ओझे नको. त्यांनी मुक्तपणे आपली साधना करावी. अरविंदाश्रमाची जबाबदारी घेऊन त्यांनी ते स्वप्न पूर्ण केले.

श्रीअरविंदांच्या शिष्यांची, अनुयायांची संख्या सतत वाढत होती. प्रत्यक्ष भेटणाऱ्या शिष्यांना दिवसा मार्गदर्शन करणे व देशोदेशीहून येणाऱ्या पत्रांना रात्रभर बसून उत्तरे लिहिणे हा श्रीअरविंदांचा दिनक्रम झाला होता. आता त्यांना एकांतिक साधना करावयाची होती, म्हणून त्यांनी १९२६ साली आश्रम व आश्रमवासी या साऱ्यांची जबाबदारी माताजींवर सोपविली व आपल्या साधनेसाठी एकांतवास स्वीकारला. लोकांना त्यांचे दर्शन वर्षातून फक्त चारवेळा दर्शन-दिनानांच होत असे. आश्रमाची व्यवस्था, शिष्यांना मार्गदर्शन ही सारी जबाबदारी माताजींनी पार पाडली. श्रीअरविंदांचे तत्त्वज्ञान, त्यांची शिकवण माताजींनी सर्वांना सांगितली. श्रीअरविंद म्हणाले आहेत की, 'मदर इथे आल्या नसत्या तर माझी 'दिव्य जीवनाची' कल्पना केवळ तत्त्वज्ञानातच राहिली असती.'

श्रीअरविंदांचे विचार सामान्यजनांपर्यंत पोचविण्याचे कार्य माताजींनी केले. म्हणूनच सार्थ अभिमानाने व कृतार्थतेने माताजी म्हणतात – 'माझ्याशिवाय ते अव्यक्त आहेत आणि त्यांच्याशिवाय तर मला अस्तित्त्वच नाही!'

जेव्हा श्रीअरविंद व माताजी या दोघांची भेटही झाली नव्हती, त्यांच्यात कोणताही संपर्क नव्हता, तेव्हापासूनच त्या दोघांची अध्यात्मिक साधना एका समान मार्गावरून, एका समान ध्येयाच्या दिशेने चालू होती. श्रीअरविंद एका साधकाला पत्रात लिहितात –

ङश्रीमाताजींची चेतना व माझी चेतना ही एकच आहे. एकच दिव्य चेतना दोघांमध्ये विभागली गेली आहे. त्यांच्या चेतनेची खरोखरी अनुभूती आली तर त्या चेतनेमागे मीही उपस्थित आहे असे समजावे आणि माझ्या चेतनेचा अनुभव आला तर त्याच्या पाठीमागे त्याही आहेत असे समजावे....!'

म्हणूनच माताजींना श्रीअरविंदांची शिष्या न म्हणता, अध्यात्मिक सहयोगिनी म्हटले जाते.

माताजी आश्रमकार्यात कायम मग्न असत. लोकं त्यांच्या भेटीला सतत येत रहात. कुणी आपली साधनेतील समस्या घेऊन येई, तर कुणी सांसारिक अडचणी घेऊन येई, कुणाजवळ आजाराची तक्रार असे तर एखाद्या शिक्षकांची त्यांच्या विद्यार्थ्यांबद्दल तक्रार असे. प्रश्न कोणतेही असले तरी माताजी सर्वांना वेळ देत असत, प्रत्येकाच्या समस्येवर उपाय सांगत असत. एक मुलगा नेहमी येऊन आपल्या शाळेबद्दल काहींना काही माताजींना बराच वेळ सांगत बसे. इतरांना असे वाटत असे की, या मुलाच्या फालतू गप्पांमध्ये आपले महत्त्वाचे प्रश्न राहून जात आहेत. माताजींजवळ कुणी हा विषय काढल्यावर त्या शांतपणे म्हणाल्या, 'माझ्यासाठी सगळ्यांचे प्रश्न सारखेच महत्त्वाचे आहेत आणि तितकेच निरर्थकही आहेत!'

ह्या एका उत्तरात माताजींचे थोरपण सामावले आहे. ज्या उंचीवर त्या आहेत तिथून सर्वसामान्यांच्या प्रश्नांमधील, समस्यांमधील फोलपणा त्यांना कळत होता. तरीही त्यांच्याकडे आशेने येणाऱ्या रंजल्या-गांजलेल्यांना त्या आईच्या मायेने कुशीत घेत होत्या व सत्याचा मार्ग, सन्मार्ग दाखवित होत्या.

श्रीअरविंदांच्या पश्चात १९५२ साली माताजींनी 'श्रीअरविंद इंटरनॅशनल सेंटर ऑफ एज्युकेशन' या संस्थेची स्थापना केली. या संस्थे अंतर्गत शाळा, महाविद्यालये सुरू केली. गरीब, गरजू मुलांसाठी शाळा चालविली. शिक्षणाबाबत त्यांचे चिंतन, त्यांचे विचार मौलिक आहेत. शिक्षणाकडे केवळ उपयोगितेच्या दृष्टिकोनातून बघणे (पैसा कमविण्याच्या दृष्टीने) त्यांना मंजूर नव्हते. 'उपयोगितावादाला' त्या भयंकर रोग समजायच्या. शिक्षणातून स्वत:ची उन्नती झाली पाहिजे, आपली जाणीव विकसित झाली पाहिजे, त्यासाठी शिक्षणही तशाच पद्धतीचे हवे, शिकविणारे शिक्षकही आदर्श असले पाहिजेत असे त्यांचे मत होते.

आश्रमातील मुलांसाठी माताजी आठवड्यातून एकदा वर्ग घेत असत. त्यात त्या मुलांना श्रीअरविंदांचे ग्रंथ, स्वत:चे 'प्रार्थना आणि ध्यान' इ. सोप्या भाषेत शिकवित असत. शिकवणीसाठी मुले त्यांच्या

भोवती गोलाकार बसत असत. आश्रमातील मोठी माणसेही त्या वर्गात मुलांच्या मागे येऊन बसू लागली. श्रोत्यांची संख्या एवढी वाढत गेली की, माताजी हा वर्ग क्रीडांगणावर घेऊ लागल्या व ध्वनिक्षेपकाचीही सोय करावी लागली. पण या वर्गात मुलांनी आपल्याला प्रश्न विचारावेत, आपल्याशी संवाद साधावा अशी त्यांची इच्छा असे. मुकाटपणे बसलेल्या मुलांसमोर नुसते एकतर्फी शिकवणे, हे वाऱ्यावर उडून जाणारे निरर्थक आहे असे त्यांना वाटे.

धर्म, देश, भाषा इत्यादींच्या पलिकडे असलेल्या आनंदी आणि सुसंवादी जगाची, 'ऑरोविल'ची निर्मिती माताजींनी १९६८ साली केली. ऑरोविल येथे जगातील कोणत्याही देशाचा, धर्माचा, भाषेचा नागरिक येऊन साधना करू शकतो. श्रीअरविंदांच्या 'एकता हे सत्य आहे, विभाजन असत्य आहे.' या विचाराला माताजींनी इथे मूर्तरूप दिले आहे.

माताजींना ९५ वर्षाचे दीर्घायुष्य लाभले, ज्याच्यातील प्रत्येक क्षण त्यांनी जनकल्याणासाठी वेचला.

१९२० साली पाँडिचेरीला आलेल्या माताजी अखेरच्या श्वासापर्यंत, १७ नोव्हेंबर १९७३ पर्यंत पाँडिचेरीतच राहिल्या. आपल्या जीवनकार्याचे सार त्या खालील केवळ चार ओळींत मांडतात –

'श्रीअरविंदांना भेटण्यासाठी मी भारतात आले. त्यांच्याबरोबर राहाता यावे म्हणून मी इथे राहिले, आणि त्यांच्या देहत्यागानंतरही मी इथे राहिले, ती त्यांचे कार्य करण्यासाठी, सत्याची सेवा करण्यासाठी आणि लोकांना सत्याची प्रकाशवाट दाखविण्यासाठी!'

१९५० साली जेव्हा श्रीअरविंदांचे महानिर्वाण झाले, त्यावेळी शोकाकुल शिष्यांना त्यांनी समजविले, 'श्रीअरविंदांच्या निर्वाणाचा शोक करणे, व्याकुळ होणे म्हणजेच त्यांच्यावर अविश्वास दाखविणे आहे. कारण त्यांनी आपल्याला शब्द दिला आहे की, ते आपल्यासोबत सदैव रहातील. त्यांचा कृपाप्रसाद मिळविण्यासाठी आपल्यात गृहणशीलता असली पाहिजे. देहरूपाने ते नसले म्हणून काहीच फरक पडत नाही.' श्रीअरविंदांबद्दल माताजींनी काढलेले उद्‌गार त्यांच्या स्वत:साठीही तितकेच सार्थ ठरतात. मनापासून, उत्कटतेने केलेल्या प्रार्थनेला त्यांच्याकडून उत्तर मिळतेच, फक्त आपण आपली ग्रहणशीलता विकसित केली पाहिजे.

एकदा एका साधकाने माताजींना विचारले, 'आमचा (तुमच्याकडून) स्वीकार झाला आहे हे आम्हाला कसे कळणार?'


माताजी म्हणाल्या, 'जेव्हां तुम्ही माझा स्वीकार करता तेव्हां आपोआपच तुम्ही माझ्याकडून स्वीकारले जात असता.'

म्हणूनच जेव्हा अत्यंत तळमळीने माताजींना हाक घातली जाते, त्या हाकेला उत्तर मिळतेच! माताजींनी स्वत:विषयी एका ठिकाणी म्हणून ठेवले आहे. – 'I am not eger to be the Guru of anyone. It is more spontaneously natural for me to be the universal mother and to act in silence through love.'

– सौ. मीरा श्रीकृष्ण दीक्षित
एफ. ७०, भास्कर डि. एस. के.
विश्व सिंहगड रोड, पुणे – ४११०४१

■ ■ ■

योगी अरविंदांचे मार्गदर्शक
श्रीलेले महाराज (विष्णु भास्कर लेले)



डॉ. श्री. कमल बाळकृष्ण वैद्य

मराठीत 'एकनाथी भागवता'वर पीएच.डी.
ब्रह्मलीन प.पू. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज यांचा अनुग्रह. त्यांच्या 'मानसगूढार्थ चंद्रिका-प्रस्तावना खंड'चे (१९५१) मध्ये हिंदी भाषांतर व दासबोध-गद्य रूपांतर व इतर ८/१० ग्रंथ गीताप्रेस तर्फे प्रकाशित. अनेक मासिक, त्रैमासिकांतून लेख, प्रज्ञानंद व गोस्वामी, संपूर्ण वाल्मीकी रामायणाचा मराठी अनुवाद इंटरनेटवर उपलब्ध. तुलसीदास चरित्र व प्रबंध प्रकाशित.

सो कुल धन्य उमा सुनु जगत पूज्य सुपुनीत ।
श्रीरघुबीर परायन जेहि नर उपज विनीत ।। (उत्तरकांड दोहा १२७)

श्रीरामचरितमानसात गोस्वामी तुलसीदास म्हणतात की ज्या कुळात रघुवीर परायण अर्थात रामभक्त, भगवतभक्त नर जन्माला येतात ते कुल धन्य होय, असे शंकर पार्वतीस सांगत आहेत. त्याप्रमाणे ज्याच्यामुळे त्याच्या समस्त कुळाचा उद्धार झाला अशा एका महापुरुषाचे चरित्र आपण येथे जाणून घेणार आहोत ते आहेत योगी अरविंदांचे गुरु श्री. लेले महाराज! हे प्रसिद्धिपराङ्मुख होते त्यामुळे महाराष्ट्रातील लोकांनाही त्यांच्याबद्दल फारशी माहिती नाही. ज्यांनी योगी अरविंदांना मार्गदर्शन केले त्यांच्या चरित्राचा थोडक्यात परिचय करून देण्याचा प्रयत्न येथे श्रीसद्गुरुकृपेने केला जात आहे.



श्री. लेले महाराजांचे घराणे मूळ कोकणातील. मुक्काम गोळप, तालुका, जिल्हा रत्नागिरी येथे राहणारे. ज्ञातापासून ७ वी पिढी. यात श्री. महेश्वर यांना विठ्ठल, दिनकर, भास्कर, अनंत आणि जनार्दन असे पाच मुलगे होते. त्यातील तिसरे चिरंजीव भास्करराव हेच आपल्या चरित्रनायकाचे वडील होत. श्री. भास्करराव हे वऱ्हाडात मामलेदार होते. त्यांना साधुसंतांविषयी फार आदर असल्याने घरी साधुसंतांची वर्दळ असे. त्यामुळे बाल विष्णूच्या मनातही त्यांच्याविषयी श्रद्धा, प्रेम उत्पन्न झाले होते. होळकरांच्या राज्यातील सातपुड्याच्या पहाडात राहणारे श्री. नामू पाटील उर्फ पहाडीबुवा नावाचे एक सिद्ध पुरुष [illegible] असत. त्यांचे श्री. भास्कररावांवर आणि विष्णूवर [illegible] होते. ते विष्णूला देवादिकांच्या गोष्टी सांगत. श्री. भास्कररावांना [illegible] देवदर्शन घडवा म्हणून आग्रह करीत असत. एकदा ते त्यांना [illegible] डोंगरावर घेऊन गेले आणि म्हणाले की समोरच्या पहाडावरील देवाचे दर्शन तुला येथूनच घ्यावे लागणार आहे. जवळून देवदर्शनाचा योग या जन्मी नाही. तुझ्या मुलाला मात्र त्याच्या तिसाव्या वर्षी जवळून देवदर्शन घडणार आहे व त्याप्रमाणेच पुढे घडले.

श्री. लेले महाराजांची जन्मतिथी व तारीख माहीत नाही. पण त्यांनी १९३८ साली महासमाधी घेतली तेव्हा ते सत्तर वर्षांचे असावे असे म्हणतात. म्हणून त्यांचा जन्म इ.स. १८६७ मध्ये झाला असावा. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' म्हणतात त्याप्रमाणे विष्णूच्या ठिकाणी बालवयातही तीव्रतर ईश्वरनिष्ठा होती. एकदा बालविष्णूच्या आईची नथ हरवली. त्यामुळे त्या चिंताग्रस्त होऊन शोधाशोध करीत होत्या. विष्णूला जेव्हा हे कळले तेव्हा तो म्हणाला, 'एवढेच ना, मी माझ्या देवाला विचारतो. तो मला सांगेल.' असे म्हणून तो देवघरात जाऊन थोडा वेळ डोळे मिटून देवापुढे बसला आणि नंतर एकदम उडी मारून आईजवळ येऊन म्हणाला, की 'तुझी नथ त्या कणगीच्या मागे बिळात आहे असे मला दिसले' आणि खरोखरच नथ तिथे सापडली.

विष्णु १७/१८ वर्षांचा होईपर्यंत अभ्यास, देवभक्ती, देशभक्ती यात गढून गेला होता. तो मॅट्रिकच्या परीक्षेसाठी गेला असता स्टेशनमास्तर खरे- जे त्याच्या वडिलांचे मित्र होते. त्यांनी त्यास सांगितले की तिसरे दिवशी त्याच्यावर गंडांतर येणार आहे, म्हणून ते परत घरी आले. तेव्हा घरात सर्वांना आश्चर्य वाटले. पण तिसऱ्या दिवशी ते एकाएकी मूर्च्छा येऊन पडले. सर्व घाबरून गेले पण तेवढ्यात पहाडीबुवा आले आणि म्हणाले की विष्णूचे गंडांतर टळावे म्हणून ते बरेच दिवस तप करीत होते आणि ते त्याच्याकडे निरखून पाहून त्याच्या मस्तकावरून हात फिरवू

लागले. काही वेळाने विष्णु शुद्धीवर आला आणि सर्वांना आनंद झाला.

श्रीलेले महाराजांचे आपल्या वडिलांवर फार प्रेम होते. त्यांच्या शेवटच्या आजारात त्यांनी वडिलांची अतिशय सेवा केली. ते पहाडीबुवांना म्हणाले होते की ''माझ्या आयुष्याची दहा वर्षे माझ्या वडिलांना द्या व त्यांना बरे करा.'' त्यावर ते म्हणाले, 'विष्णु, त्यात दोघांचेही कल्याण नाही.'' मग विष्णूने हट्ट धरला नाही. भास्कररावांची इच्छा होती की विष्णूला आपले स्नेही श्री. पांडुरंग गोविंद वकील यांच्या स्वाधीन करावा तर पहाडीबुवांनी त्यांचे आयुष्य एक दिवस वाढवून त्यांची ती इच्छा पूर्ण केली. श्रीलेले महाराजांचे बालपण काही फारसे सुखात गेले नव्हते. पण परिस्थितीमुळे वडील गेल्यावर त्यांना दुसऱ्याच्या घरी राहावे लागले एवढे मात्र खरे.

श्रीमहाराजांची देहकांती नुसती गौर नसून तिच्यात सत्त्वगुण, मार्दवता व प्रभा दिसून येई. डोळे निळे व तेजस्वी होते. चेहरा किंचित् उभट असून दोन दात पुढे होते. उतारवयात हे दात पडल्यामुळे दिसत नव्हते. उंची सुमारे पाच फूट होती आणि उजव्या हातात कंप होता. त्याला writers cramp म्हणतात. कचेरीतील काम ते अत्यंत मनापासून करीत. त्यांचे काम वरिष्ठांना पसंत पडत असे. पुष्कळ वेळा रात्री त्यांना कचेरीच्या कामाचे ड्राफ्टिंग सुचत असे व ते झोपेतून उठून ते लिहून ठेवत. ज्यावेळी कचेरीच्या कामात त्यांचे मन रमेनासे झाले तेव्हा हातातील कंपाचे कारण सांगूनच त्यांनी नोकरी सोडली.

आळंदीचे श्रीनृसिंह सरस्वती स्वामी हे हटयोगी होते. त्यांचेकडे ते वरचेवर जात. प्रथम हटयोगाचा अभ्यास होता पण नंतर ते भक्तिमार्गाकडे वळले. पहाडीबुवांच्या सांगण्यावरून ते १८९७ च्या आसपास गिरनारला गेले होते. तेथे त्यांना प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेयांचे दर्शन झाले होते. ते दिवसातून दोन-दोनदा गिरनार पर्वत चढून जात. तेथे राहण्याची काही सोय नाही. तेथे फक्त श्रीदत्त पादुकाच आहेत. ते म्हणत, 'श्रीदत्तगुरु माझे आराध्य दैवत! मला त्यांचा साक्षात्कार व्हावा हा माझा छंद! त्याकरिता मला गिरनारला जावे लागले, किंमत मोजावी लागली. मी ती दिली. फळ हाती आले.' त्यांना श्रीदत्तात्रेयांचे दर्शन तेथेच झाले.

विष्णूपंतांचे वडील गेल्यामुळे त्यांचे पुढील शिक्षण झाले नव्हते व ते अमरावतीला डिस्ट्रिक्ट कोर्टात चिटणीस म्हणून नोकरीला लागले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे विष्णूपंतांचे लग्न लवकरच झाले होते. भास्कररावांनी त्यांच्या मूळ 'गोळप' गावाजवळच्या गणेशगुळे - आजचे आगरगुळे येथील श्री. रघुनाथराव पटवर्धन यांची मुलगी बयो म्हणजेच सुभद्रा हिला सून म्हणून पसंत केले होते. तिचा व विष्णुपंतांचा विवाह थाटात संपन्न होऊन ती सौ. गोपिकाबाई विष्णुपंत लेले म्हणून लेल्यांच्या घरी प्रवेश करती झाली. विष्णूच्या आईला पोटदुखीची व्यथा होती. ती बळावून त्यातच त्यांचा अंत झाला.

तो काळ असा होता की संपूर्ण भारतात देशभक्त देश स्वतंत्र व्हावा म्हणून प्राणपणाने झटत होते. विशेषत: बंगाल व महाराष्ट्र जास्तच पेटून उठले होते. वंगभंगाची चळवळ चालू होती. महाराजही नोकरी सोडून सशस्त्र क्रांतिकारकात सामील झाले होते. नर्मदेच्या काठावर एक क्रांतिकारकाचे विद्यालय काढायचे ठरले आणि त्याचे प्रमुख अध्यापकत्व श्री. टेंबेस्वामी उर्फ वासुदेवानंद सरस्वती यांचेकडे देण्यात आले. त्यांच्या बैठका निरनिराळ्या ठिकाणी होत. पुण्याच्या बैठकीला श्री. बारेंद्र घोष (योगी अरविंद यांचे बंधु) आले होते. याआधी श्रीअरविंदांनी योगसाधनेसंबंधी आपले असमाधान वाटून प्रगती खुंटल्याने या मार्गात कोणी मार्गदर्शक गाठून देण्यास त्यांना सांगितले होते. सन १९०७ मध्ये श्रीअरविंद बडोद्यास आले होते. तेव्हा त्यांच्या बंधूंनी त्यांना कळविले की सुरत येथील काँग्रेसनंतर परत ते बडोद्यास येतील तेव्हा त्यांची एका योग्याशी गाठ घालून देण्यात येईल.

त्यावेळी श्रीलेले महाराज ग्वाल्हेरला होते. त्यांच्या एका शिष्याने तार करून त्यांना बडोद्यास बोलावून घेतले. श्रीलेले महाराज म्हणाले की ''ज्यावेळी मला ग्वाल्हेर येथे तार मिळाली तेव्हा माझ्या अंत:करणातून असा उत्स्फूर्त आवाज आला की तू बडोद्याला जा. कोणा महापुरुषाला तुझी दीक्षा प्राप्त व्हावयाची आहे.'' त्याप्रमाणे ते बडोद्यास आले. या दोन महापुरुषांची पहिली भेट बडोद्यास दांड्या बाजारातील श्री. खाशेराव जाधव यांच्या निवासस्थानी डिसेंबर २८ ते ३० च्या दरम्यान झाली असावी. ती अर्धा तास चालली व श्रीलेले महाराजांनी अरविंदांना योगसाधनेला मदत करण्याची तयारी दाखवली. पण ते म्हणाले की तुम्हाला योगमार्गातील साधनानुभूतीकरता (काही काळ) राजकारणातील काम बंद ठेवावे लागेल.'' अरविंदांनी तयारी दर्शविताच ते म्हणाले, ''थोडे दिवस सर्वांपासून अलग राहून आपल्याबरोबर रहावे लागेल.'' नंतर साधनेकरिता सरदार मुजुमदार यांच्या वाड्यातील वरच्या मजल्यावरील एका खोलीत श्रीलेले महाराज व श्रीअरविंद तीन दिवस गुप्त राहिले होते. श्रीलेले महाराजांनी श्रीअरविंद यांना आपले मन पूर्णपणे शांत-विचारशून्य कसे करावे हे शिकविले. परम श्रद्धेय स्वामी रामसुखदासजी याप्रकारच्या साधनेला 'चुप साधन' म्हणतात. केवळ त्यांच्या अनुज्ञेने श्रीअरविंदांना निर्विचार अवस्था प्राप्त झाली. श्रीलेले महाराजांनी श्रीअरविंदांना महत्त्वाची गोष्ट अशी सांगितली की सर्व विचार माणसे समजतात त्याप्रमाणे मनाच्या आत उत्पन्न होत नसून ते बाहेरून येतात व ज्याप्रमाणे डोक्यावरचे ओझे आपण फेकून देऊ शकतो, त्याप्रमाणे ते बाहेरून आत येत असतानाच विचारांना आपण फेकून देऊ शकतो आणि अशा प्रकारे त्यांना मनात प्रवेश न करू देणे हेही सहज साधू शकते. योगी अरविंद पुढे त्यांच्या शिष्यांना हाच बहुमोल उपदेश वारंवार करीत असत. या संदर्भात योगी अरविंद म्हणत, ''श्रीलेले यांनी मला हे शिकविले याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.''

''ध्यानस्थ बसा.'' श्रीलेले महाराज म्हणाले, ''पण विचार करू नका. फक्त आपल्या मनाकडे पहा. तुम्हाला असे दिसेल की विचार बाहेरून तुमच्या मनात येत आहेत. ते तुमच्या मनात शिरण्याच्या अगोदर तुमचे मन प्रशांत होईपर्यंत त्यांना बाहेर फेकून द्या.'' श्रीअरविंद म्हणत की ''विचार मनात प्रत्यक्ष बाहेरून येतात हे मी पूर्वी कधी ऐकले नव्हते पण या गोष्टीची सत्यता किंवा शक्यता याबद्दल शंका घेण्याचे माझ्या मनात आले नाही. मी फक्त बसून सांगितल्याप्रमाणे केले. एका क्षणात माझे मन उंच पर्वतावर शिखरावरील वातरहित हवेप्रमाणे प्रशान्त झाले. नंतर मला असे दिसले की विचार असे एकामागून एक प्रत्यक्ष बाहेरून

येत आहेत. ते आत शिरून माझ्या मेंदूचा ताबा घेण्याच्या अगोदरच मी त्यांना फेकून दिले आणि तीन दिवसात स्वतंत्र झालो. त्या क्षणापासून माझ्यातील मनोजीव स्वतंत्र, प्रज्ञारूप व विश्वरूप झाला.''

''अशा प्रशान्त अवस्थेत मनात कोणत्याही प्रकारचा विचार नसताना मी मुंबईला गेलो. राष्ट्रीय सभेत मला व्याख्यान द्यावयाचे होते. म्हणून मी श्रीलेले यांना विचारले, ''अशा स्थितीत मी काय करू?'' ते म्हणाले, ''सभेच्या वेळी तुम्ही फक्त प्रार्थना करा.'' पण मी प्रशान्त ब्राह्मीभावात इतका गढून गेलो होतो की मला प्रार्थनाही करता येईना. म्हणून मी त्यांना म्हणालो, ''मी प्रार्थना करण्याच्याही मन:स्थितीत नाही.'' ''हरकत नाही.'' ते म्हणाले, ''ते व दुसरे प्रार्थना करतील. मी फक्त सभेला जावयाचे. श्रोतृवृंदाला नारायण समजून नमस्कार करावयाचा. नंतर कोणतातरी आवाज बोलू लागेल.''

''त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी केले. सभेला जाण्याच्या वाटेत कोणीतरी मला वर्तमानपत्र वाचावयास दिले. बोलण्याकरिता जेव्हा मी उभा राहिलो तेव्हा मथळ्याच्या ओळीची अक्षरे माझ्या मनात चमकली व नंतर एकाएकी काहीतरी (माझ्यातून) बोलू लागले. हा मला श्रीलेले यांच्याकडून दुसरा अनुभव मिळाला.''

ज्यावेळी मी मुंबईला गेलो होतो, त्यावेळी माझ्या मित्राच्या घराच्या बाल्कनीमधून मुंबईतील सर्व गजबजलेली रहदारी एखाद्या चित्रपटातील चित्राप्रमाणे मिथ्या व छायारूप दिसू लागली. ती मनाची अवस्था अजूनपर्यंत त्यानंतर मी ठेवू शकलो आहे. संकटाच्या ऐन गर्दीतसुद्धा मी तिला मुकलो नाही. कलकत्त्याच्या वाटेवर मी जी सर्व व्याख्याने दिली ती सर्व अशाच प्रकारची होती. फक्त त्यातील काही भागात माझ्या मानसिक भागाचे मिश्रण होते. ही जगन्मिथ्यत्वाची अनुभूती नाहीशी होऊन हे विराट अनंत विश्व मूळ सत्याचे छायारूप नसून, ते साक्षात् तद्रूप तद्‌धन होय ही अनुभूती त्यांना नंतर प्राप्त झाली.

''श्रीलेले यांचा निरोप घेण्यापूर्वी मी त्यांना साधनेतील मार्गदर्शनासंबंधी विचारले. ते मला सविस्तरपणे मार्गदर्शन करीत होते. इतक्यात त्यावेळी अंत:करणात स्फुरलेला मंत्र मी त्यांना सांगितला. मार्गदर्शन करता करता ते एकदम थांबले व त्यांनी मला विचारले की, ''ज्याने तुम्हाला हा मंत्र दिला त्याच्यावर तुम्ही संपूर्ण विश्वास ठेवू शकाल का?'' मी म्हणालो, ''मी नेहमी विश्वास ठेवू शकेन.'' त्यानंतर श्रीलेले म्हणाले, ''तर मग आणखी मार्गदर्शनाची गरज नाही.''

श्री. अंबालाल फराणी यांच्या 'अरविंद जीवन' या गुजराथी चरित्रात श्रीपूर्णयोगी अरविंद यांनी श्रीलेले महाराजांसंबंधी बोलता बोलता पुढील अत्यंत महत्त्वपूर्ण उद्‌गार काढले असे नमूद केले आहे. १९२५ साली सहज बोलणे निघाले असताना श्रीअरविंद म्हणाले, ''त्यावेळी श्रीलेले सर्वसाधारण माणसापेक्षा फारच उच्च स्थितीला जाऊन पोहोचले होते व त्यांच्या अंगी माणसाच्या सामान्य चेतनाशक्तीला ऊर्ध्वचेतना शक्तिप्रत खुली करून देण्याची महान् शक्ती त्यांचेजवळ होती. त्यांच्यापासून मला स्वत:ला तीन गोष्टी प्राप्त झाल्या.

१) मन प्रशांत करून निर्गुणब्रह्माचा साक्षात्कार. हे विराट अनंत विश्व मूळ सत्याचे छायारूप नसून ते साक्षात तद्रूप व तद्घन आहे. त्यानंतर या अनुभूतीला मी नित्याकरता, माझ्या जाणीवेत राखू शकलो आहे.
२) स्थूल मेंदूचा उपयोग न करता बोलण्याची व लिहिण्याची कला.
३) मला स्वत:ला कोणत्यातरी दैवी शक्तीच्या मार्गदर्शनाखाली ठेवण्याचा अभ्यास ही गोष्ट त्यावेळी मला शक्य नव्हती.''

श्रीअरविंद ज्या आंतरिक आवाजाचे मार्गदर्शन घेत होते तो आवाज आसुरिक तर नाही ना? कारण त्यावेळी क्रांतिकारी चळवळीशी त्यांचा संबंध होता. मात्र पुढे श्रीअरविंदांनी ती चळवळ सोडून दिली. पण त्यावेळी जर त्या आवाजाच्या मार्गदर्शनाप्रमाणे श्रीअरविंद वागणार असतील तर त्यांच्या साधनेची जबाबदारी घेणे आपणास कठीण जाईल असे श्रीलेले महाराजांनी त्यांना सांगितले. श्रीअरविंदांनी ताबडतोब श्रीमहाराजांना त्या जबाबदारीतून सोडविले. या वृत्तांतातून श्रीअरविंद आतल्या आवाजाचे मार्गदर्शन क्रांतिकारी चळवळीसंबंधात घेत होते असे दिसते. श्रीलेले महाराजांनी श्री. बारिंद्र घोषना निदान सांगितले होते की अध्यात्म व क्रांतिकारी चळवळ ही एकमेकाशी जुळणारी नाहीत. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य शांततेने मिळणार आहे. त्यावेळी श्रीघोष आदि हे ऐकून हसले. पण श्रीमहाराजांचे म्हणणेच पुढे खरे ठरले. श्रीअरविंदांनीही आपल्या 'योगाचा समन्वय' या पुस्तकात 'साधकाच्या आतून येणारे सर्व आवाज दैवी असतात असे नाही' असे म्हटलेच आहे.

'जीवनातील घडणाऱ्या लहानथोर सर्व क्रियांच्यामागे कल्याणकारी ईशसंकल्प सदैव जागृत असतो' हे महाराजांच्या जीवनाचे प्रमुख सूत्र होते कारण सर्व कर्मांचे कर्तेपण परमेश्वराचेच आहे अशी त्यांची साक्षात्कारी धारणा होती. म्हणूनच ज्ञानपूर्व व ज्ञानोत्तर - नोकरीच्या काळापासून ते पूर्णत्वानंतरही जीवनातील सर्व माणसांशी आदराने व प्रेमाने वागत गेले.

वाई क्षेत्रात त्यांच्या जीवनातील शेवटची आठ वर्षे गेली. तेव्हा ते पहाटे ५-५ ।। ला उठून रात्री ठेवलेल्या दुधाचा चहा स्वत: करून घेत. दहाच्या सुमारास ते कृष्णानदीवर स्नानाला जात व अकराच्या सुमारास भोजन करीत. भोजन साधे, भात-पोळी, भाजी, आमटी, केळी असे असे. केळ्याबरोबर तूप खात. भोजनाच्या वेळी कोणी आल्यास त्यांनाही जेवावयास लावीत. अडचणीच्या वेळी तांदळात सर्व पदार्थ - डाळ, कडधान्य, भाजी वगैरे मिसळून खिचडी बनवून त्याचे अमृतान्न तयार करून खात. रात्री सूर्यास्ताच्या आत भोजन करीत. त्यांचा पोशाख म्हणजे धोतर, मोठा सदरा, टोपी असा असे. घरात पुष्कळ वेळा अर्धी विजार घालून बसत. नीटनेटकेपणाची आवड होती पण चोखंदळपणा नव्हता. चित्तात निर्वाणशांती, हृदयात चिदानंद व आचरणात निर्व्याज प्रेम हेच त्यांचे यथार्थ स्वरूपदर्शन होय. त्याकाळी सर्व देशच इंग्रजांच्या विरुद्ध पेटला होता. महाराजही त्याला अपवाद नव्हते. प्रथम ते सक्रिय क्रांतिकारकातच गणले जात होते. ते धरपकडीत पकडलेही गेले होते. त्यांना कोर्टासमोर उभे करण्यात आले तेव्हा आपल्याला खोटे बोलावे लागेल की काय असे त्यांना वाटले होते. ते तर सत्यवचनी होते. पण खोटे बोलावे लागले नाही आणि भगवत्कृपेने त्यांची सुटका झाली होती.

श्री. रा. ब. आठवले म्हणतात की श्रीलेले महाराज आणि त्यांचे

शिष्य श्रीअरविंद घोष व श्रीरामकृष्ण परमहंस आणि त्यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांच्यात विलक्षण आश्चर्यकारक साम्य आहे. श्रीरामकृष्णांप्रमाणे श्रीलेले महाराजही अल्पशिक्षित असूनही उपासनामार्गानेच ईश्वरी साक्षात्कारापर्यंत पोहोचले होते. श्रीरामकृष्ण देवीचे उपासक होते तर श्रीलेले महाराज दत्तात्रेयाचे उपासक होते. दोघांनी आपल्या दैवी शक्तीने शिष्यांना समाधीपर्यंत पोहोचविले होते. दोघांचेही शिष्य अत्यंत बुद्धिमान, पाश्चात्य व प्राचीन भारतीय विद्येत पारंगत व भारताच्या स्वातंत्र्याकरिता तळमळणारे असे होते. दोघेही गुरु आपापल्या शिष्यांना अल्पकाळच मार्गदर्शन करून स्वत: आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रात इतर अनेक शिष्यांना मार्गदर्शन करीत राहिले. दोघांच्याही शिष्यांनी आपल्याला मिळालेल्या आत्मज्ञानाचा प्रसार साऱ्या जगभर केला. दोघांच्याही शिष्यांनी आपापल्या गुरूंचे ऋण भावपूर्ण शब्दात व्यक्त केले आहे. श्रीलेले महाराज म्हणत, ''मला कोणताही चमत्कार करता येत नाही. पण माझ्यापासून डझनवारी साक्षात्कारी पुरुष झाले आहेत.''


श्रीमहाराजांच्या आयुष्याची शेवटची आठ वर्षे श्रीक्षेत्र वाई येथे गेली. साताराचे गडनीस महाराज बरीच वर्षे त्यांच्या सेवेसाठी त्यांच्याजवळ राहिले होते. त्यांनी श्रीमहाराज असतानाच सातारला माची येथे श्रीशंकराचार्य यांचे मंदिराजवळ वरच्या बाजूस अवधूताश्रम बांधला होता. श्रीमहाराजांनी त्यांना आपल्या शेवटच्या आजारपणात त्यांना सातारला अनुष्ठान करण्याकरिता धाडून दिले होते. शिष्य सोमणही जवळ नव्हते. शेवटच्या आजाराचे स्वरूपही विशेष असे नव्हते. त्यांना ताप येत होता आणि आजारास उतार पडत नव्हता. जीवनाच्या अंतिम क्षणीही सप्रेम समभाववृत्ति होती. या महायोगेश्वराने श्रावणी अमावास्येस म्हणजे पिठोरी अमावास्येला शके १८६० म्हणजेच २५ ऑगस्ट १९३८ या दिवशी सायंकाळी पाचच्या सुमारास आपल्या पार्थिव देहाचा त्याग केला. त्यावेळी त्यांच्या पत्नीस त्या खोलीच्या बाहेर महान दिव्य प्रकाश जाताना दिसला. तो श्रीमहाराजांच्या एका उघड्या डोळ्यातून बाहेर जात होता. दिवसा असा प्रकाश पाहून त्यांना आश्चर्य वाटले. इकडे पाहतात तो श्रीमहाराज यांचे प्राणोत्क्रमण झालेले होते. असे म्हणतात की 'साधु ओळखावा मरणी।' त्याप्रमाणे आपल्या दिव्यत्वाची प्रचीति देऊनच ते पंचत्वात विलीन झाले! त्यांच्या चरणी विनम्र अभिवादन!

हरि: ॐ तत्सत्

श्री. लेले महाराज जीवनदर्शन – बा. म. दीक्षित
शांतीब्रह्माची जीवनगाथा– अरुंधती साठे या ग्रंथांवर आधारित

– डॉ. श्री. कमल बाळकृष्ण वैद्य
'हॉली माऊंट', ३५ विजयनगर,
श्री. शिल्प चिंतामणी को.ऑ. हौ. सोसायटी,
पोस्ट– वानले सवांडी, सांगली ४१६४१४
दूरध्वनी : ०२३३–२६०१२१९, मो. ९२७२२०१७८९

■ ■ ■



योगी अरविंदांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

प्रा. मिलिंद गोविंदराव जोशी

एम.टेक. (सिव्हिल), प्राध्यापक,
प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, तसेच अन्य चार मान्यवर संस्थांचे पदाधिकारी, नामवंत व्याख्याते, १२ पेक्षा जास्त पुस्तकांचे प्रकाशन. वेगवेगळ्या दैनिकांतून लेखन. अनेक पुरस्कार व पारितोषिके यांनी सन्मानित. वेगवेगळ्या साहित्य संमेलनांचे अध्यक्षस्थान भूषविलेले आहे.

''योगी अरविंदांच्या चरित्रात आणि तत्त्वज्ञानात लौकिकापेक्षा अलौकिकाचा भाग जास्त आहे. त्यामुळे त्यांच्याभोवती कुतूहलाचे आणि गूढतेचे दाट वलय आहे. त्यामुळे अनेकांच्या लेखी त्याला निर्जन प्रदेशातील दुर्गम पहाडाचे रूप प्राप्त झालेले आहे.'' अशा शब्दात महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत आणि मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु आणि ख्यातनाम वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी योगी अरविंदांच्या जीवनचरित्राचे वर्णन केले आहे.



योगी श्रीअरविंद लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचेबरोबर

योगी अरविंदांचे वडिल कृष्णधन घोष यांना पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण होते ते त्यांचे वास्तव्य परदेशात घडल्यामुळे. भारताला प्रगतिपथावर जायचे असेल तर भारताने पाश्चात्य संस्कार आणि जीवनपद्धतीचा अंगिकार केला पाहिजे असे त्यांना वाटत होते. आपल्या मुलांची जडणघडण होत असताना भारतीय संस्कृतीतला 'स'देखील त्यांच्या कानावर पडणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली. मुले पोरवयात असताना इंग्रजी अधिकाऱ्यांची मुले ज्या शाळांमध्ये शिकतात तिथे आपल्या मुलांना त्यांनी शिक्षणासाठी पाठविले. तिथले अवकाश मुलांसाठी पुरेसे नाही असे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या मुलांना रेव्हरंड ड्रिनेट नावाच्या ख्रिश्चन धर्मगुरूच्या कुटुंबात राहण्यासाठी आणि शिकण्यासाठी इंग्लंडला पाठविले. इंग्रजी राजवटीत आपल्या मुलाने अधिकाराचे एखादे पद भूषवावे असे वडिलांना वाटत होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. अरविंद आयसीएसची परीक्षा उत्तीर्ण झाले. या परीक्षेनंतर अश्वारोहणाची परीक्षा होती. ती त्यांनी दिली नाही म्हणून त्यांचे नाव यादीतून काढून टाकण्यात आले. दरम्यान इंग्रजांचे राज्य उलथून टाकण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या इंडियन मजलिस नावाच्या क्रांतिकारी संघटनेशी त्यांचा संबंध आला. अरविंद त्या संघटनेचे कार्यवाह झाले. 'लोटस ॲण्ड डॅगर' या गुप्तचर संघटनेशीही त्यांचा संबंध येत होता. हे सारे सुरू असताना मॅक्समुल्लर या विद्वानाने उपनिषदांचा जो इंग्रजी अनुवाद केला होता त्यातील 'सेल्फ' हा शब्द अरविंदांना खूप भावला. वेदांताचा एक कवडसा त्यांच्यापर्यंत येऊन पोहोचला. वडिलांनी मुलाला कलेक्टर होण्यासाठी परदेशात पाठविणे, त्याने भारतीय संस्कृती विसरावी यासाठी एका ख्रिश्चन धर्मगुरूच्या कुटुंबात वास्तव्यास ठेवणे आणि मुलाने आयसीएसची परीक्षा पास होऊनही अश्वारोहणाची परीक्षा नाकारणे, भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठीच्या चळवळीत सामील होणे हे सारेच अनाकलनीय होते; पण घडत होते. घडले होते. भारताच्या ओढीने १८९३ मध्ये योगी अरविंद भारतात आले. अपोलो बंदरात पाय ठेवताच आसमंत व्यापून टाकणाऱ्या प्रसन्नतेचा अनुभव त्यांनी घेतला. अनामिक, अखंड आणि अनपेक्षित आनंदाचा प्रत्यय त्यांना आला.

अरविंद भारतात आले आणि बडोद्याच्या दरबारात दाखल झाले. सयाजी महाराजांना त्यांनी शब्द दिला होता. सुरुवातीला संस्थानच्या कामाचा परिचय व्हावा म्हणून त्यांनी वेगवेगळ्या विभागात आलटून पालटून नोकरी केली. या काळात देशात वेगवेगळ्या घटना घडत होत्या. बंगालमध्ये भूमिगतांच्या संघटना स्थापन झाल्या होत्या. भगिनी निवेदितांसारखी स्वामी विवेकानंदांची धर्मकन्या राजकारणाची भाषा बोलू लागली होती. अनेक संन्यस्त, धर्मकारणाचा त्याग करून राजकारणात उतरले होते. बंकिमचंद्रांच्या आनंदमठ या कादंबरीत निःस्पृह, निर्भय आणि निर्वैर अशा राजकारणाच्या सर्व छटा चित्रित झालेल्या होत्या. इंग्रजांशी लढायचे तर ते सशस्त्रपणे अशी अरविंदांची धारणा होती. त्यासाठी स्वतःच्या भावाला बारिंद्रला त्यांनी तयार केले. बंगाली युवकांना सैन्यात प्रवेश दिला जात नव्हता कारण त्यांचे वंगप्रेम इंग्रजांना माहित होते. त्यामुळे भावनावशता आणि मनोदौर्बल्य या दोषांचा ठपका ठेवून बंगाली युवकांना सैन्याचे प्रवेशद्वार बंद करून टाकण्यात आले होते. जतिंद्रनाथ बॅनर्जी या युवकाने त्यावर एक उपाय

शोधला. त्याने स्थलांतर केले व तो उत्तर प्रदेशात जाऊन राहिला. त्याने उपाध्याय हे आडनाव लावले. तरीही त्याचा प्रयत्न असफल ठरला. मग तो बडोद्याला अरविंदांना येऊन भेटला. अरविंदांनी खासेराव जाधवांना सांगून त्याला प्रवेश मिळवून दिला. तो लष्करी विद्येत तरबेज झाला. एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात भगवद्‌गीता देऊन अरविंदांनी त्याला बंगालमध्ये पाठविले. माणसे जमा करणे, शस्त्रास्त्रे मिळविणे आणि शस्त्रागारे तयार करणे ही जबाबदारी त्याच्याकडे देण्यात आली. अरविंदांनी स्वत:चे बंधु बारिंद्र यांनादेखील बंगालमध्ये पाठविले. जतीन आणि बारिंद्र हे अरविंदांचे सेनापती बनले. अरविंदांचा बंगाली क्रांतिकारकांशी संबंध वाढत होता. मुंबईत क्रांतिकारकांची एक संघटना होती. ठाकोरसिंग तिचे प्रमुख होते. अरविंद त्या संघटनेचे सदस्य होते. १८९७ मध्ये चाफेकर बंधूंनी रँडचा खून केला. त्यांची 'हिंदूधर्म संघ' नावाची जी संघटना होती तिचे काम योगी अरविंद पाहू लागले. गुजरातमधील क्रांतिकारी संघटनेचे ते अध्यक्ष होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्याची प्रज्वलित झालेली ज्वाला अधिक तेजस्वी करण्याचे काम योगी अरविंदांनी केले.

अरविंदांनी भारतातील युवकांना भवानीमंदिर बांधण्याचे आवाहन केले. आपल्या राजकीय दर्शनाची रूपरेषा त्यांनी 'भवानी मंदिर' या पुस्तकात स्पष्ट केली. अरविंदांना अपेक्षित असणारी भवानी कोणती होती? तुळजाभवानी की महिषासुरमर्दिनी दुर्गा, महाकाली की रणचंडी? त्याचे उत्तर देताना अरविंद म्हणाले होते, "Bhavani is infinite energy" भवानीमातेची उपासना म्हणजे राष्ट्रदेवतेची उपासना. बंगालच्या फाळणीनंतर योगी अरविंद क्रांतिकारकांचे नेते बनले. दोन महिन्यांची रजा घेऊन त्याला जोडून एक महिन्याची बिनपगारी रजा घेऊन लोकजागरण, लोकसंस्करण आणि लोकप्रबोधन कार्यासाठी ते बंगालमध्ये गेले. कोलकोता अधिवेशनात अरविंद आणि लोकमान्यांनी पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर करून घेतला. सुरत काँग्रेसमध्ये जे काही घडले त्यामुळे जहाल अधिक जहाल झाले.

माणिकतोळा उद्यान प्रकरणात अरविंदांचा हात आहे असं समजून त्यांना अटक करण्यात आली. माणिकतोळा हे जागृत स्थान होते. अरविंदांना अपेक्षित असणारे भवानीमातेचे मंदिर उभे करण्याचे काम शस्त्रास्त्रे जमा करून युवक या ठिकाणी करीत होते. त्याच्यावर इंग्रजांनी धाड टाकली. त्याची पाळंमुळं अरविंदांपर्यंत जाऊन पोहोचली आहेत असे पोलिसांना वाटले. अरविंदांना अटक करण्यात आली. २०० साक्षीदार, ४००० कागदपत्रे आणि ५००० स्फोटक वस्तू पुरावा म्हणून सादर करण्यात आल्या. बॅ. देशबंधूंनी केस चालवली. १९०८ ते १९०९ या वर्षात अरविंद अलिपूरच्या कारागृहात होते. तेथे त्यांनी चार छोट्या पुस्तिका लिहिल्या. त्याची शीर्षके होती,

a) Message of bomb
b) Morality of bomb
c) Psycology of bomb
d) Philosophy of bomb

या एक वर्षाच्या कालखंडात भारतीय क्रांतिकारकांचे वैचारिक प्रबोधन करण्याचे काम अरविंदांनी केले. कारागृहात असताना स्वामी विवेकानंदांची अनाहूत वाणी त्यांच्या कानावर पडली. दोन आठवडे या मार्गदर्शक आणि अलौकिक अशा विचारश्रवणाने ते प्रोत्साहित झाले. तोच विश्वंभराने आपले वासुदेवरूप त्यांच्यासमोर प्रकट केले. त्या नंतर अरविंद बदलून गेले. क्रांतिकारक ते महायोगी या प्रवासातली पावले पडत राहिली आणि ते महायोगी या पदाला पोचून महायोगी अरविंद झाले.


समर्थ रामदास म्हणत, **''मुख्य ते हरिकथा निरूपण। दुसरे ते राजकारण। तिसरे ते सावधपण। सर्वाविषयी।।''**

अरविंदांनी हा क्रम बदलला. त्यांनी राजकारणाला प्राधान्य दिले. हरिकथा निरूपणाला दुसरे स्थान दिले. महायोगी होण्यापूर्वी त्यांनी क्रांतिकार्यात भाग घेतला. ते क्रांतिकारकांचे तारणहार बनले. तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून आपण ज्यांचा उल्लेख करतो असे भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांच्याशी अरविंदांचा घनिष्ठ स्नेह होता. महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढा गतिमान करण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. याचे स्मरण निदान महाराष्ट्रातील माणसांनी तरी ठेवायला हवे होते.

प्रा. मिलिंद गोविंदराव जोशी
बी१/१२, रविराज टेरेस,
सुखसागरनगर, कात्रज, पुणे ४६.
फोन : २६९६३५०९, ९८५०२७०८२३

■ ■ ■

श्रीअरविंद वंदना



सौ. शैला सुहास पटवर्धन

एम. बी. एड.
सेवानिवृत्त शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय

। वंद्य वंदे मातरम् ।


वंद्य वंदे मातरम्! मातृभू, तुजवंदना!
राष्ट्रभू, तुज वंदना! वंद्य वंदे मातरम्।।

भौतिकाच्या अस्तित्वात दिव्य जीवन निर्मावे
'सनातन धर्म श्रेष्ठ' जगापुढे दृश्य व्हावे
'श्रद्धा-स्वार्थत्याग-धैर्य' त्रिगुणांचे संवर्धन
'धर्म सनातन श्रेष्ठ' करी राष्ट्राचे उत्थान!

सैतानी शक्तींचे तांडव करू आले आक्रमण
'संभवामि युगे युगे' राष्ट्रशक्तीत दर्शन
क्षात्रशक्ति ब्रह्मशक्ति राष्ट्रधर्म सारे परजू
'धर्म' 'आर्य' 'कर्मयोगिनी' 'वंदे मातरम्' क्रांति गर्जू
मनगटे हवी पोलादी, मने वज्राहूनहि कठीण
बुद्धितेज मात्र असावे 'ईश-राष्ट्र-सज्जन' शरण!
'एकता-स्वराज्य-ज्ञान-शक्ति' चार चाके
राष्ट्रमुक्तिः 'जगन्नाथ रथ' 'अरूदाँ' गुरू सांगे
योगीश्री अरविंदगुरू विश्वशांति ध्यास
ज्ञानरूप आत्मतेज दे जगा प्रकाश!

तस्मै श्री गुरवे नमः।।
।। ॐ तत् सत् ।। ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

■■■



अलौकिक दांपत्य जीवनातील अंतरीचा जिव्हाळा

डॉ. सौ. आरती अरुण दातार

एम्.ए.पी.एचडी. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातून मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त. कोलंबो विद्यापीठाचे ओपन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी फॉर कॉम्प्लीमेंटरी मेडीसिनमध्ये 'संत आपुले जीवन' प्रबंध. आदर्श शिक्षिका गौरव. समाजकार्यासाठी रणरागिणी पुरस्कार. संत व त्यांच्या वाङमयाच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी ठिकठिकाणी वर्ग. २०१२ साली प्रकाशित झालेल्या शून्यातून सूर्याकडे या पुस्तकाचे प्रकाशन – ग. दि. मा. प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार.

महायोगी अरविंद म्हणजे भारतीय वैभवशाली परंपरेतील ऋषिमुनी! श्रीअरविंद हे आधुनिक काळातील एक जगप्रसिद्ध भारतीय तत्वज्ञ होते, स्वातंत्र्यपूर्वकाळातील एक महान राजकीय नेते होते. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम व भारताचा आध्यात्मिक विकास यात सारखेच योगदान करणारी महान विभूती म्हणून योगी अरविंद यांचं इतिहासातील स्थान अपूर्व आहे. भारतीय दर्शन परंपरेनुसार ते आधुनिक भारतातील एक ऋषि होते. योगी अरविंद हे युगपुरूष होते. त्यांनी भारतीय राजकारणाला व्यापक अधिष्ठान दिले. त्यांनी राजकारणाला देशकारणाचे, देशकारणाला धर्मकारणांचे व धर्मकारणाला विश्वकल्याणाचे रूप दिले. विश्वकल्याणाचा अतीव ध्यास असलेले अरविंद म्हणजे जणू श्रीज्ञानदेवांचा अवतार! योगी अरविंद हे केवळ एक व्यक्तिमत्व नसून मानवकुलाचं भवितव्य घडविणारं दर्शन आहे.



महापुरुषांच्या मांदियाळीत अरविंद या महायोग्याचं स्थान अवर्णनीय आहे. अरविंद हे महान क्रांतिकारक, देशभक्त, तरुणांचे चेतनस्तंभ होते. ते महान कर्मयोगी व आध्यात्मिक साक्षात्काराचे महर्षी होते. अरविंद म्हणजे सामान्यांचे जीवन सुखमय करण्याचे विहित कर्म करण्यासाठी भगवंताने पृथ्वीतलावर पाठविलेला प्रेषित ! भारतीय मूल्यांचा अत्यंतिक आदर करणारे, भारतीय संस्कृतीची थोरवी मान्य करणारे, भारतीय राष्ट्रीयत्वाचे पितामह होते. अरविंदांना भारताचा आत्मा गवसला होता. अरविंदांचं दिव्यजीवन हा अनेक भाविकांच्या उपासनेचा भक्तिविषय आहे. अरविंदांसारख्या युगपुरुषांचं व्यक्तिगत जीवन आपण समजून घेतलं तर आपलं व्यक्तिगत जीवन सुंदर वाटतं. स्वत:ची स्वत:ला नव्यानं ओळख होते. अखिल मानवजातीच्या विकासाचे व विश्वशांतीच्या निर्मितीचे आध्यात्मिक नेतृत्व करण्याचं कार्य नियतीने भारतावर सोपविलं असल्याची जाण, दृढ धारणा अरविंदांची होती. नियतीने सोपविलेलं योगसिद्धीचं कार्य पूर्ण करण्यासाठी वैयक्तिक जीवनाकडे, सुखदु:खाकडे पाठ फिरवून, स्वत:ला सहजपणे नियतीच्या स्वाधीन करण्याची जाणीव अरविंदाना होती. ही जाणीव समजून घेण्याची कुवत सर्व-सामान्यांजवळ असणं अवघड नाही तर अशक्य आहे. अरविंद जाणिवेला खूप महत्त्व देतात. अंतरंगीची सूक्ष्म जाणीव म्हणजे भगवंताचं दर्शन ! आपण पृथ्वीवर जन्म घेतो तो या जाणिवेसह.

योगी अरविंद यांचं जीवन ही एक नवलकथा आहे, ती स्थित्यंतरांची कहाणी आहे. देवाच्या सख्यत्वासाठी! पडाव्या जिवलगांच्या तुटी याचा वस्तुपाठ म्हणजे अरविंदाचं कौटुंबिक जीवन! योगी अरविंद हे कुटुंबवत्सल होते, मातृभक्त होते. स्वर्णलतादेवी ही त्यांची माता. सुशिक्षित, सुविद्य, काव्यशास्त्र-विनोदात रमणाऱ्या, साहित्यप्रेमी, धर्मपरायण अशा स्वर्णलतादेवींचे गुण अरविंदांमध्ये उतरले होते. अरविंद शिक्षणासाठी सातव्या वर्षी परदेशी गेल्यामुळे आपल्या आईचा त्यांना फारसा सहवास लाभला नाही. १८९४ मध्ये अरविंद मायदेशी परतल्यावर त्यांची आई 'पगली मा' झाली होती. प्रथमदर्शनी आई आपल्या लेकराला ओळखू शकली नाही. भारतात परतण्यापूर्वी पित्याच्या निधनाची वार्ता त्यांना समजली. कुटुंबाची जबाबदारी पेलण्यासाठी अरविंदांनी आपलं सारं बुद्धिवैभव विसरून बडोदा सरकार दरबारी नोकरी पत्करली. बहीण सरोजिनी व धाकटा भाऊ बारींद्र यांची जबाबदारी प्रेमानं स्वीकारली.

बडोदा संस्थानची नोकरी करीत असताना अरविंदांनी स्वत: कलकत्याच्या एका वर्तमान पत्रात 'वधू पाहिजे' अशी जाहिरात दिली होती. १९०१ मध्ये श्री. भूपालचंद्र बसू यांच्या लेकीशी मृणालिनी

यांच्याशी अरविंदाचा विवाह झाला. विवाहप्रसंगी अरविंदाचं वय होतं २९ तर मृणालिनी यांचं वय होतं १३. अरविंदांचा विवाह म्हणजे एक अनाकलनीय घटना होती. त्यांचं मातृभूमीविषयीचं अत्यंतिक प्रेम, तिच्या स्वातंत्र्याचा अंतर्यामी असलेला ध्यास, त्या ध्यासापायी आपलं आयुष्य ओवाळून टाकण्याचा निश्चय, अरविंदांच्या या विचारांमुळे, जीवनपद्धतीमुळे ते विवाहबंधनात अडकतील असं वाटत नव्हतं. अरविंद मातृभूमीच्या स्वातंत्र्याची स्वप्न रंगविणारे क्रांतिकारक तर मृणालिनी संसाराची स्वप्न रंगविणारी आदर्श गृहिणी. अरविंद या क्रांतिकारकाचं जीवन म्हणजे धगधगती आग. तर मृणालिनी म्हणजे देवघरातील शांत समई! अशा या विरोधी रेषा विवाह वेदीवर शतपावली करण्यासाठी एकत्र आल्या. पण दोघांच्या स्वभावधर्मानुसार नियतीने दोघांच्या वाटा भिन्न केल्या.

अरविंदरूपी वादळाला अति हळूवार, कोमल, संवेदनशील मनाची, नाजूक भावनांची, पातिव्रत्य जपणारी, पतीदेव हेच जीवनसर्वस्व मानणारी संस्कारसंपन्न गृहिणी मिळाली. पतीचं घर हे मंदिर, मंदिरातील देव म्हणजे अर्थातच पती. या सद्‌विचारांची मूर्ती म्हणजे मृणालिनीदेवी. या देवीच्या मंदिरातील देव्हाऱ्यात तिचा देव नव्हता हे तिचं दु:ख होतं. एका लोकविलक्षण पतीचं ध्येय, त्याचे विचार आपलेसे करून त्याला अखंड साथ देण्याचं भाग्य या पतिव्रतेला लाभलं नाही. असं का.. या प्रश्नाचं उत्तर 'नियती'! श्रीअरविंद व मृणालिनी देवी या पती-पत्नींच्या पवित्र नात्यात दोघांच्या स्वभावात विरोधी सूर दिसला तरी त्या नात्यातील अंतरीचा जिव्हाळा, गोडवा मात्र आयुष्यभरासाठी होता.

श्रीअरविंद विवाहानंतर काही महिने मृणालिनी व आपल्या भगिनीसह नैनितालला होते. मृणालिनीदेवींना पतीदेवाचा सहवास अगदी अल्पकाळ मिळाला. श्रीअरविंदांसारख्या महापुरुषांना वैयक्तिक जीवन नसतं. अवघ्या देशाची चिंता करणाऱ्या अरविंदांना स्वत:च्या महान भाग्यध्येयाची आंतरिक जाणीव झाल्यानंतर त्यांचे कार्याचे व्याप वाढू लागले. आपल्या या कार्यात आपल्याला आपल्या सहधर्मचारिणीची, मृणालिनीदेवींची साथ मिळावी अशी त्यांची मनोमन इच्छा होती. पत्नीने पतीची सावली होऊन राहावे, त्याच्या कार्याच्या वाटेनं मार्गक्रमण करावे हा अरविंदांचा विचार मृणालिनीदेवींना पटला तरी त्यानुसार कृती करणं त्यांच्या नाजूक, सोज्वळ, भक्तिपरायण स्वभावाला शक्य नव्हते, नियतीला ते मान्य नव्हतं. श्रीअरविंद व मृणालिनीदेवी यांच्या वैवाहिक जीवनाची करुण कहाणी ऐकताना आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांच्या मनात विचार येतो की वैयक्तिक सुखाकडे पाठ फिरविणारे युगपुरूष विवाहाचा विचार का करतात ? आपल्या पत्नीचं आयुष्य दु:खी का करतात ? योगी अरविंद म्हणतात.. ' काळावर कर्तृत्वाने नाव उमटविणारे लोकोत्तर पुरुष कधी तरी सामान्य असतात. तेव्हा त्यांच्या मनात एका क्षणी विवाहाचा विचार चमकून जातो. तो विचार कृतीत येतो. पत्नीवर अन्याय करण्याची त्यांची भावना नसते. नियतीमुळे सारं काही घडतं. नियतीपुढे कोणाची इच्छा चालत नाही हेच खरं!'

स्थितप्रज्ञ योगी अरविंद मुळात अत्यंत ऋजु स्वभावाचे होते. मृणालिनीदेवींच्या बाबतीत ते अती हळवे होते. आपल्या जिवितकार्यात तिच्या समर्थ सोबतीची तीव्र इच्छा त्यांच्या मनात होती. त्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्याचं हळवं, पारदर्शी मन त्यांनी वेळोवेळी मृणालिनीदेवींना जी पत्रं लिहिली त्यातून सहजपणे बोलकं झालं आहे. ही पत्रं म्हणजे जणू योगी अरविंदांच्या मनाचा आरसा! अरविंदांचं वैवाहिक विश्व उलगडायला ही पत्रं उपयोगी आहेत. योगी अरविंद म्हणजे आदर्शवाद तर मृणालिनीदेवी म्हणजे आशावाद. ज्ञान ही शक्ती असलेल्या अरविंदांना स्त्री ही पुरुषाची शक्ती आहे असे वाटे. या शक्तीचा लाभ मृणालिनीदेवींकडून व्हावा ही त्यांची इच्छा होती. त्यासाठी मृणालिनीदेवींशी त्यांनी साधलेला पत्ररूपसंवाद अत्यंत बोलका आहे. ते लिहितात –

'आपली सहानुभूती व आपला उत्साह यांच्या योगाने तू माझी शक्ती द्विगुणित करणार ना? तू म्हणशील की, 'मी एक सामान्य मुलगी आहे' माझ्यात मनोबल नाही, बुद्धी नाही. अशा गंभीर गोष्टीचा विचार करण्याचेही तुला भय वाटते. पण मी तुला एक सोपा उपाय सुचवू का ? तू भगवंताचा आश्रय घे. ईश्वरप्राप्तीच्या मार्गात पाऊल टाक, तुझ्या साऱ्या उणिवा तो दयाघन दूर केल्याशिवाय राहाणार नाही. एकदा का भगवंताचा आश्रय घेतला की भय मागल्या पावलाने पोबारा करील. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव. माझे ऐकशील तर मी माझी शक्ती तुला देऊ शकेन. त्यामुळे माझे बळ तर कमी होणारच नाही, उलट आणखी वाढेल. खाणे, पिणे, हसणे, कपडालत्ता ही काही उन्नतीची लक्षणे नव्हेत. अशा चुकीच्या विचारांच्या आहारी जाऊ नकोस. माझ्या बरोबर ये. भगवंताचे कार्य करण्यासाठी मी या जगात आलो आहे. हे कार्य आपण करू या. तुझ्या स्वभावातला एक दोष हा आहे की, तू फार सरळ आहेस. कुणाच्याही सांगण्यावर तुझा चटकन् विश्वास बसतो. पण त्यामुळे तुझे मन सदा अस्थिर राहाते, बुद्धीचा विकास खुंटतो, कोणत्याही कामात मनाची स्थिरता राहात नाही. हे सारं तुला सुधारले पाहिजे. लोकांच्या निंदास्तुतीची पर्वा सोडली पाहिजे. परोपकाराकडे, स्वार्थत्यागाकडे तुझी मूळ प्रवृत्ती आहे. फक्त मनोबळ कमी पडत आहे. ईश्वराची उपासना कर, म्हणजे तुला ते निश्चित प्राप्त होईल. या उपासनेचे अवडंबर नको. रोज फक्त अर्धा तास ईश्वराचे ध्यान केलेस तरी पुरे. प्रार्थनेच्या काळात आपली उत्कट इच्छा त्याच्यापुढे मांडीत जा. त्यामुळे तुझ्या मनाची शांती हळूहळू वाढत जाईल. पतीच्या उद्दिष्टात, त्याच्या ईश्वरप्राप्तीच्या साधनेत, त्याच्या साऱ्या जीवनात, माझे सदा सहाय्य व्हावे, अशी ईश्वराची प्रार्थना करत जा.' अरविंदांचं हे पत्र वाचून मनात येतं की हे पत्र, पत्रातील त्यांचं मनोगत, मौलिक संदेश केवळ मृणालिनीदेवींसाठी नाही तर अवघ्या विश्वमनासाठी आहे. या अर्थपूर्ण पत्रात वैयक्तिक नात्याचा भाग नाही तर या हृदयीचं त्या हृदयी ओतण्याचा हा सुंदर संवादरूप मार्ग आहे.

योगी अरविंदांनी स्वत:ला सुरवातीच्या काळात राजकारणात झोकून दिलं. नंतर त्यांनी संपूर्ण जीवन परमेश्वराला अर्पण केलं. पाँडिचेरीच्या गुहेत त्यांनी स्वत:ला बंदिस्त करून घेतलं. ते स्वत:ला विसरून गेले. अरविंदाचं नाव सर्वदूर झालं. अवघं जग कवेत घेण्याची शक्ती त्यांच्यात होती. अरविंदांच्या वाढत्या लौकिकामुळे

मृणालिनीदेवींच्या जीवनातील राम दूर चालला होता. त्यांचा संसार उघड्यावर पडला. सासर-माहेरच्या सोबतीने त्यांना राहाण्याची वेळ आली. पतिदेवांच्या पत्रांची सोबत त्यांना पुरेशी वाटत नव्हती. ३० ऑगस्ट १९०५ रोजी लिहिलेल्या पत्रात अरविंद म्हणतात-

'आता तुझ्या लक्षात आले असेल की, तुझा जीवनसांगाती हा एक वेडा फकीर आहे. असा माणूस आपल्या सहचारिणीला सुख कुठून देणार? पण हिंदूधर्माच्या प्रणेत्यांना व उपसकांना अशा अपवादभूत जीवांचे विलक्षण आकर्षण होते. एखाद्या उत्तुंग साध्यामागे धावणाऱ्या व त्यापायी होरपळून निघणाऱ्या ध्येयनिष्ठांविषयी त्यांच्या मनात अपार आदर होता. अशा जीवांच्या पत्नीला दिलासा देण्यासाठी त्यांनी कोणता उपाय सुचविला हे तुला माहित झाले आहे का? ते म्हणतात-'अशा स्थितीत पतीलाच गुरू मानावे व त्याच्या आज्ञेत राहावे. पतीचे सहाय्यक व्हावे. त्याच्या पाठीशी राहावे. त्याच्या मनोरथांची कार्यवाही करावी. माझ्या मनात तीन वेडे विचार अहोरात्र घोंघावत असतात. त्या व्यतिरिक्त मला काही ऐकू येत नाही, दिसत नाही. पहिला विचार माझ्या संग्रही असणारे ज्ञान, धन, बुद्धी, उत्साह ही सारी प्रभूची संपदा आहे, देवाचे दान आहे. त्यापैकी निर्वाहापुरते घ्यावे व उरलेले त्याचे त्याला परत द्यावे. दुसरा विचार या जगात देव असेल तर केवळ त्याच्या नावाचा जप न करता त्याचे साक्षात् दर्शन घ्यावे. याची देही याची डोळा त्याचा साक्षात्कार व्हावा. हिंदू सांगतो की, देवाच्या दाराकडे नेणारा मार्ग आपल्याच अंतर्यामी असतो. गेला महिनाभर मी त्या मार्गाने चालायचा प्रयत्न केला, मला प्रत्यय आला. मी अनुभवले, जाणले. मला वाटते तू सुद्धा माझ्या मागे यावेस. माझे अखेरचे वेड- देश म्हणजे केवळ भूप्रदेश नव्हे. राष्ट्र ही आपली माता, देवता आहे. एखादा राक्षस आपल्या आईच्या रक्ताचे घोट घेऊ लागला तर तिच्या पुत्राने ते निमूटपणे पहावे का? तूच सांग. माझा गाढ विश्वास आहे की, या पतित राष्ट्राच्या उत्थानासाठी व परित्राणांसाठी आवश्यक ते सामर्थ्य माझ्या अंगी आहे.'

रक्ताच्या शाईने लिहिलेला या पत्रातील प्रत्येक शब्द आपल्या अंतरंगीची तार छेडतो, माणुसकीला जाग आणतो, त्यांच्या भावपूर्ण शब्द-संपत्तीला आपण नम्रपणे वंदन करतो. अरविंदांच्या अंतरंगीचं स्फुरण आपल्या आत्मारामाला हलवून सोडतं. नाजूक मनाच्या मृणालिनीदेवींना वाट दाखविताना अरविंद लिहितात.. 'तुझे भाग्य एका विचित्र माणसाच्या भाग्याशी जोडले गेले आहे. जगाच्या सामान्य दृष्टीला हा माणूस वेडाच दिसत असेल. अशा वेड्याच्या हातात पडणं हा स्त्रीच्या दृष्टीने अशुभ योग आहे. कारण स्त्रीच्या आशाआकांक्षा सांसारिक सुखदुःखाशी निगडित असतात. पण स्त्री ही पुरुषाची सहधर्मिणी ना? मग त्याच्या सुखदुःखाशी तिने सहभागी व्हायला नको का? ज्या कार्याला तो स्वधर्म मानीत असेल, त्याच्यात तिने सहाय्य केले पाहिजे. सल्ला दिला पाहिजे. त्याला उत्तेजित केले पाहिजे. कार्याची निवड पुरुषाची, पण त्याला सहाय्य करण्याची, त्याचा उत्साह वाढविण्याची कामगिरी स्त्रीची. तू ही जबाबदारी पत्करशील ना? एखाद्या कोपऱ्यात रडत तर बसणार नाहीस ना? नवरा आंधळा म्हणून आपलेही डोळे बांधून घेणारी गांधारी आपल्याच देशातील ना ? हिंदू स्त्रियांचे असले महान आदर्श तुलाही मान्य असतील. तर मग माझ्यापाठोपाठ माझ्या मार्गाने तू येशील ना?'

अरविंदांच्या या पत्रातील प्रामाणिक भावना, त्यातील आर्तता मनाला स्पर्शून जाते, आपल्याला आदर्शाकडे घेऊन जाते. आपल्या पत्नीशी हितगूज करणारी ही पत्रं प्रत्येकाला शाश्वत सुखाचा मार्ग दाखवितात, पति-पत्नीच्या नात्यातील गाभ्याला हात घालतात, महायोग्याला त्याच्या खडतर प्रवासात स्त्रीशक्तीची नितांत गरज असते हे सांगून जातात, प्रत्येक पुरुषात स्त्रीहृदय असते व प्रत्येक स्त्रीत पुरुषहृदय असते याची जाण करून देतात. आपली वैभवशाली संस्कृती अर्धनारी नटेश्वराची संस्कृती आहे याची ओळख करून देतात. त्यांच्या पत्ररूपी विचारांना काळ सुद्धा धक्का लावू शकणार नाही. संस्कृतीचं संवर्धन करणारी ही पत्रं म्हणजे मर्मबंधातील ठेव आहे हे नक्की !

इ.स. १९०७ मध्ये १७ फेब्रुवारी व ६ डिसेंबर या दिवशींची पत्रं म्हणजे त्यांच्या प्रभुशरणवृत्तीचं दर्शन होय. मृणालिनीदेवींना ते लिहितात- 'आता मी माझ्या इच्छेच्या अधीन राहाणार नाही. भगवंताच्या हातातील कठपुतळी म्हणून राहाणार आहे. तो जिकडे नेईल तिकडे मी राहीन. जे काही तो माझ्याकडून करवून घेईल ते मी करीन. याचा अर्थ तुला आता कळणार नाही. पण तुला सांगितलेच पाहिजे. नाहीतर माझ्या या काहीशा लोकविलक्षण आचरणाने तू दुःखी होशील. मी तुझी उपेक्षा करतो आहे असे तुला वाटेल. पण असा गैरसमज करून घेऊ नकोस. आजपर्यंत मी तुझे खूप अपराध केले आहेत. पण आता मी माझा राहिलो नाही. ईश्वराच्या आधीन झालो आहे. त्याच्या आदेशानुसार वागत आहे. तू आलीस म्हणजे याचे मर्म तुला समजू शकेल, भगवंताने आपल्या करुणेने जो प्रकाश दाखविला आहे तोच प्रकाश तो तुलाही दाखवेल अशी मी आशा करतो. तू माझी सहधर्मिणी ना? तर मग हा करुणापथ भगवंताने तुलाही दाखववा अशी प्राणपणाने त्याची प्रार्थना कर'. या पत्रातून मृणालिनीदेवींची मनापासून वाट बघणारे अरविंद आपल्याला अंतर्मुख करतात. जीवनाच्या प्रत्येक वळणावर त्यांना पत्नीची समर्थ साथ हवी असल्याची त्यांच्या मनाची तीव्रता लक्षात येते. अरविंद या झंझावाताला नाजूक वेलीची ओढ आहे. गरज आहे. वादळाशी झुंजताना स्त्रीशक्तीचा हात हातात हवा आहे. यातून अरविंदांचं हळुवार मन दिसतं. आपल्या जगावेगळ्या वाटेमुळे आपण पत्नीवर अन्याय करत असल्याची जाण व दुःख त्यांच्या मनात असल्याची साक्ष पटते. भावनेने ओलीचिंब झालेली ही पत्रं आपल्यातलं देवत्व जागं करतात. पति-पत्नीच्या नात्यातील श्रीमंती सांगताना नात्यांची खोली व उंची दाखवतात.

६ डिसेंबरच्या पत्रात डोळ्यात प्राण साठवून मृणालिनीदेवीची वाट बघणारे अरविंद भेटतात. ते लिहितात.. 'माझी एक गोष्ट ऐकशील का ? अत्यंत चिंताजनक काळातून मी हल्ली जात आहे. चहूबाजूंनी त्या चिंतेचे जाळे माझ्या भोवती पसरलेले आहे. इतके की, वेडा होण्याची वेळ माझ्यावर येऊ पाहात आहे. तुझ्या उत्साहजनक व सांत्वनपर पत्राची मला यावेळी अत्यंत जरूरी आहे. तसे तुझे पत्र आले, तर माझी शक्ती खूप वाढेल. प्रसन्न मनाने साऱ्या संकटांशी सामना करून मी विजयी


होईन. देवघर येथील एकाकी जीवनात तू फार कष्टी होत असशील याची मला कल्पना आहे. पण मन घट्ट करण्याची हीच वेळ आहे. श्रद्धा व विश्वास यांची कास धरल्यास दु:खाची काहीही मात्रा चालू शकत नाही. साधारण माणसांप्रमाणे स्वत:चा परिवार व स्वजन यांचे सुख पाहाणे एवढाच जीवनाचा उद्देश मी समजत नाही. अशा माणसाशी तुझे भाग्य लग्नगाठीने जोडले गेले आहे. तेव्हा माझा धर्म हा तुझा धर्म झाला पाहिजे. आणखी एक गोष्ट, हल्ली ज्यांच्यात तू राहात आहेस ती माझी वडिलधारी माणसं आहेत, गुरुजन आहेत. तुला जरी कधी ती कटु वाक्ये बोलली तरी तू त्यांच्यावर रागावू नकोस. ते जे काही बोलतात ते मनापासून थोडेच असते ? तुला दु:ख देण्याचा त्यांचा हेतू नसतो. रागाच्या भरात न कळत ते काही तरी बोलून जातात. पण आपण तेच उगाळत बसू नये. तरीपण तिथे राहाणे तुला अगदीच अशक्य झाले तर तू आपली आपल्या वडिलांच्याकडे जा.'

आपल्या ईश्वरप्रेरित साधनेत आपल्या प्रिय पत्नीला सामावून घेण्यासाठी अंतरीच्या उमाळ्याने अरविंदांनी लिहिलेली ही पत्रं म्हणजे पति-पत्नीच्या पवित्र, सोज्वळ नात्यातील जिव्हाळा, हळूवार प्रेम म्हणावं लागेल. दोन ध्रुवांवर हे दोघे वास्तव्य करीत असतानाही अंतरंगीचा जिव्हाळा नित्य होता याचं आपल्याला आश्चर्य वाटतं.

योगी अरविंद व मृणालिनीदेवी याचं सहजीवन समजून घेताना श्रीरामकृष्ण परमहंस व श्रीशारदामणीदेवी यांचं प्रकर्षाने स्मरण होतं. मृणालिनीदेवी श्रीशारदादेवींच्या भक्त व उपासक होत्या. श्रीरामकृष्णांचे आशीर्वाद व श्रीशारदादेवींचं प्रेम व उपदेश ही मृणालिनीदेवीची जगण्याची शक्ती होती. अखेरपर्यंत त्यांच्या मनात पतिसहवासाची ओढ होती. अरविंदांना अभिप्रेत असलेली स्थिरता, शांती मृणालिनीदेवींना शिलाँगला, त्यांच्या माहेरी मिळाली. अरविंदांची साधना पूर्ण झाल्यावर त्यांनी मृणालिनीदेवींना पाँडिचेरीला बोलाविले. सिद्धी प्राप्त झाल्यानंतरही अरविंदांना पत्नीच्या सहकार्याची आशा होती. पति-आज्ञेनुसार मृणालिनीदेवी पाँडिचेरीला जायला निघाल्या. रांचीमार्गे त्या कलकत्याला आल्या. एन्फ्ल्युएंझाच्या साथीत त्या सापडल्या. १७ डिसेंबर १९१८ रोजी त्यांची प्राणज्योत मालविली. त्यांच्या अखेरच्या श्वासातही पतीच्या भेटीची ओढ होतीच. श्रीशारदामातांच्या मते 'मृणालिनी ही शापभ्रष्ट देवता होती. कर्मफलाची सांगता झाल्यावर तिच्या आत्म्याला मुक्ती मिळाली.' मृणालिनीदेवींच्या निर्वाणानंतर महायोगी अरविंदांनी मृणालिनीदेवीचं नाव लिहिलेल्या पुस्तकांची मागणी आपल्या श्वशुरांजवळ केली. या मागणीतून पत्नीबद्दलचं प्रेम बोलकं होतं, त्यांच्या मनाचा तळ दिसतो.

योगी अरविंदांना त्यांच्या कार्यात साथ देण्यासाठी भगवंताने स्त्री शक्तीची योजना-माताजींच्या रूपाने केली होती. नियतीने मृणालिनी देवींना उचललं आणि माताजींना योगी अरविंदांच्या पारमार्थिक वाटेवर ठेवलं. भगवंताच्या लीला समजणं आपल्यासाठी अवघड असतं हेच खरं!

डॉ. सौ. आरती अरुण दातार
वुडलँड अपार्टमेंटस्, सी. ५१/५२, कोथरूड- पुणे-४११०३८
फोन : ९३७२४४१३६९ ■■■



महायोगी श्रीअरविंदांचे अलीपूर कारागृहातील दिवस

सौ. देवयानी दिलीप देशपांडे

एम् ए. मॅथॅमॅटीक्स
निवृत्त बँक कर्मचारी
योगी अरविंदांच्या अभ्यासक



१ मे १९०८ या दिवशी श्रीअरविंद 'वंदेमातरम्' च्या कार्यालयात असताना, मुझफ्फरपूरमध्ये बॉम्बस्फोट झाल्याची तार त्यांना मिळाली. त्या दिवशीच्या 'एम्पायर' ह्या इंग्रजी वृत्तपत्रात पोलीस कमिशनरने म्हटले होते की, या हत्याकांडामागे कोण आहेत, ते आम्हाला माहीत आहे, त्यांना लवकरच अटक केली जाईल.

लवकरच मुझफ्फरपूर व माणिकतोला बॉम्ब स्फोटाचा मुख्य सूत्रधार गुप्त नेता आणि राष्ट्र विप्लव युवकदलाचा नेता असल्याच्या संशयावरून श्रीअरविंदांना अटक झाली, आणि अलीपूरला निर्जन कारावासासाठी त्यांना नेण्यात आले. ५ मे १९०८ ला जेलचा पोशाख चढवून, त्यांना कोठडीत बंद करण्यात आले होते. ही कोठडी (पिंजरा) ९ फूट बाय ५/६ फूट होती, भक्कम गजांचे लोखंडी दार, समोर लहानसे ओबड-धोबड अंगण, विटांच्या उंच भिंती व समोरच्या भिंतीत लाकडी दरवाजा ! 'निर्जन कारावास' ही 'विशेष' शिक्षा होती. त्या कैद्याला शक्य तितका मनुष्य संसर्ग व मुक्त आकाशदर्शन वर्ज्य होते. सुरवातीला काही दिवस वाचनासाठी पुस्तके मागवण्याचीही परवानगी नव्हती. नंतर अधिकाऱ्यांनी तशी परवानगी दिली. तेव्हा श्रीअरविंदांनी घरून काही कपडे आणि गीता व उपनिषद् अशी दोन पुस्तके मागविली. चार-पाच दिवसांनी ती त्यांच्यापर्यंत पोहोचली. श्रीअरविंद म्हणतात, ''मधल्या दिवसात समजले की निर्जन कारावास हा दृढ व सुप्रतिष्ठित बुद्धीही नष्ट करू शकतो, अणि मन उन्मादावस्थेत जाते.''

सुरवातीला जेलमध्ये, त्यांना मिळालेल्या वस्तू म्हणजे एक थाळी व एक 'चमकणारा' कटोरा ! थाळीचा विशेष म्हणजे, जरा बोट दाबले की ती फिरू लागे. त्यामुळे एका हाताने थाळी पकडायची व एका हाताने जेवायचे ! नाहीतर जेलचे ते अतुलनीय, मूठभर अन्न घेऊन ती पळून जाण्याची भीती. कटोरा तर जास्त 'भारी' व 'उपकारी' वस्तू ! तोंड धुणे, स्नान, पाणी पिणे, पदार्थ खाणे आणि शौचासाठीही 'तोच' तो कटोरा ! श्रीअरविंद म्हणतात, ''त्या 'मौल्यवान' व 'सर्वकार्यक्षम' कटोऱ्याने माझ्यावर सांसारिक उपकार केलेच, शिवाय माझ्या योगसाधनेतही तो 'सहायक' झाला. घृणा-परित्यागाचा तो उपदेशक बनला. बाकी जेलमधली शौच्यासाठीची 'व्यवस्था' हीसुद्धा मन:संयमन साधण्यासाठी केली गेली होती. 'जेलच्या तपस्येत' स्नान हे सुद्धा 'सुख' व 'विलास' होता. खूप जणांच्या भाग्यात केवळ काक-स्नानच असे !

उन्हाळयात श्रीअरविंदाच्या कोठडीत हवेचा प्रवेश जवळ-जवळ निषिद्ध होता. कडक-प्रखर ऊन कोठडीच्या टोकापर्यंत येऊन कोठडी भट्टीसारखी तापत असे. अशावेळी लागलेल्या तहानेला उपाय, टीनच्या बादलीतले गरम पाणी ! वारंवार तेच गरम पाणी पिऊन तहान भागत नव्हतीच, पण भरपूर घाम येऊन परत तहान लागे. अनेक दिवस तृष्णेशी दिलेल्या या घोर संग्रमातून 'पिपासा-मुक्ती' चे वरदान त्यांनी मिळवले.

झोपण्यासाठी, माता वसुंधरेचा शीतल स्पर्श घ्यावासा वाटला तर, जेलच्या जमिनीच्या स्पर्शाने झोप लागणे शक्य नसे. त्या गर्मीतही कांबळ्यावरच झोपावे लागे. पाऊस पडला तर जरा बरे वाटे. पण जराच! वारा व पावसाचे तांडव झाले तर कोठडी धूळ, पाचोळा व पाण्याच्या पुराने भरून जाई. अशावेळी आणि नंतर जमीन सुकेपर्यंत, झोपणे अशक्य असे. भिजलेले कांबळे घेऊन रात्र रात्र कोठडीच्या कोपऱ्यात बसून काढावी लागे.

श्रीअरविंद लिहितात, ''अलीपूरच्या 'गव्हर्नमेंट हॉटेल'चे जे मी वर्णन केले आहे, ते माझ्या कष्ट-भोगांना प्रसिद्धी मिळावी म्हणून नाही, तर अनेक निरपराध लोकांना दीर्घकाळ ही 'यंत्रणा' भोगावी लागे, हे सांगावे म्हणून ! ''सुसभ्य ब्रिटिश राज्याच्या'' फक्त 'विचाराधीन' (खरी शिक्षा होण्यापूर्वी संशयावरून अटक केलेल्या) कैद्यांसाठी ही 'अद्भुत' व्यवस्था होती. पण परमेश्वराच्या दयेने हे कष्ट मी थोडे दिवसच अनुभवले. या ठिकाणी, माझ्यात व अशिक्षित माणसात काहीही फरक नव्हता. त्यामुळे ही व्यवस्था सर्व द्वंद्वांवर विजय मिळविण्यासाठी अनुकूल होती. याला कारावास म्हणण्यापेक्षा मी ''आश्रमवास' म्हणेन ! खूप दिवसांपासून हृदयस्थ नारायणाचे साक्षात् दर्शन घेण्याची इच्छा होती, प्रयत्न होते. पण दैनंदिन जीवनातील नाना कर्मे, असंख्य वासनांमुळे होणारी आकर्षणे आसक्ती इत्यादींमुळे ते जमले नव्हते.''

या अलीपूर प्रकरणापूर्वीच, श्रीअरविंदांना ''राजकारणातून निवृत्त होऊन अध्यात्मचिंतनाचा'' आदेश दैवी शक्तीने दिलेला होता. पण त्यावेळी ते राजकारण व वृत्तपत्राच्या व्यापात इतके गुरफटलेले होते की या आदेशाकडे त्यांना लक्ष देता आले नाही. या दुर्लक्षाची मोठी किंमत त्यांना द्यावी लागली. श्रीअरविंद म्हणतात, ''त्या परमदयाळू दैवी शक्तीने माझ्या सर्व शत्रूंना एकाच घावात समाप्त केले. आणि माझ्या आध्यात्मिक साधनेसाठी सुविधा करून दिली. मला ''योगाश्रम'' दिला आणि स्वतः भगवान् श्रीकृष्ण गुरुरूपात, सखारूपात, या क्षुद्र कुटिरात माझ्यासाठी येऊ लागले. हा 'योगाश्रम' म्हणजे माझी अलीपूर कारागृहातील कोठडी ! माझे अहित चिंतणाऱ्या ब्रिटिशांनी मला त्रास देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे मला मिळालेले 'उत्तमफळ' म्हणजे मला भगवंत भेटले !

मी भगवंतावर पूर्ण विसंबून होतो. त्यामुळे निर्जनपणाचा मला त्रास झाला नाही. तसेच जेलमधील ''खाण्याच्या' अद्भुत दर्शनानेही मी विचलित झालो नाही. सावित्रीच्या या त्यांच्या महाकाव्यात श्रीअरविंद लिहितात,

Though Hell claimed rule,
the spirit still had power. (Savitri II-7-P-211).

या 'योगाश्रमात' श्रीअरविंदांनी स्वप्रयत्नाने योगाभ्यासास सुरूवात केली. सुरवातीस चंचल मन दीड-दोन तासांपेक्षा जास्त वेळ स्थिर होईना. देहही थकत होता. त्यामुळे ते श्रान्त होते होते व तीव्र विफलता अनुभवत होते. अशा स्थितीतही मनाला दुसरे काही बघावेसे वाटले तर, भोवती कोठडीच्या भिंती व विषण्ण वातावरण ! एक दिवस त्यांना ध्यान साधेना, उन्मादावस्थेच्या भयाने ते त्रस्त झाले. आणि बुद्धिभ्रंशापासून वाचण्यासाठी, प्राणपणाने त्यांनी भगवंताला हाक मारली. आणि त्याच क्षणी, त्यांना शरीर-मनात एक प्रसन्न, स्निग्ध, सुखमय, शीतलता सर्वत्र झिरपत असल्याचा अनुभव आला. या दिवसानंतर त्यांना तुरुंगातील जीवन कष्टप्रद वाटेनासे झाले. प्रार्थनेची असाधारण शक्ती आणि सफलता यांचाही प्रत्यय आला. कोठडीतही वेळ सहज व आनंदात जाऊ लागला. उपनिषदांतील गंभीर, भावोद्दीपक आणि अक्षय शक्तीदायक मंत्र म्हणत असताना श्रीअरविंदांना तुरुंगातील कैदी, अधिकारी, कर्मचारी या 'सर्वाभूती नारायण' प्रतीत होऊ लागला. तसेच सभोवतीचे वृक्ष, गृहे, भिंती, माणसे, पशु, पक्षी, धातू आणि माती या सर्व भूतांत त्यांना ''सर्वं खल्विदं ब्रह्म'' याचा प्रत्यय येऊ लागला.

ज्या चार महत्त्वपूर्ण अनुभूतींवर श्रीअरविंदांचा संपूर्ण योग व तत्त्वज्ञान आधारित आहे, त्यापैकी दोन अनुभूती- १. निश्चल, नीरव, कालातीत व अवकाशातीत अशा ब्रह्माची अनुभूती व २. वैश्विक चैतन्य व दिव्यत्वाची सर्वत्र अनुभूती या त्यांना अलीपूर जेलमध्ये जाण्यापूर्वीच आलेल्या होत्या. तर स्थितिशील आणि गतिशील असे परमसत्याचे दोन विशेष व अतिमानसाकडे नेणाऱ्या चेतनेच्या अधिक उच्चतर स्तरांची अनुभूती यांची सुरुवात अलीपूर जेलमध्ये झाली.

गुरू व सखारूपात श्रीकृष्णदर्शनाने, गीतेतील ''वासुदेवः सर्वमिदम्'' ही अनुभूती त्यांच्या चित्तात स्थिर होऊ लागली. त्यामुळे मॅजिस्ट्रेट समोर चाललेल्या खटल्यातील साक्षी, पुरावे, वकील यांचा कोलाहलही त्यांना विरक्तीपर वाटू लागला.

ब्रिटीश सरकारला या केसचे मुख्य सूत्रधार श्रीअरविंद यांना ठरवायचे होते. त्यांच्यावर सरकारने मोठ-मोठे गंभीर आरोपही लावले होते. सरकारी वकिलाने केस खूप जटिल केली होती. श्रीअरविंदांच्या बचावासाठी चांगल्या वकिलाची गरज होती. पहिल्या वकिलाने खटला सोडला होता. श्रीअरविंदांची भगिनी, सरोजिनी हिने लोकांना अपील केले. तेव्हा श्रीअरविंदांचे जुने मित्र, हुशार व देशभक्त अशा चित्तरंजन दास यांनी त्यांचे वकीलपत्र स्वीकारले. श्री चित्तरंजन दासांचे बचावाचे शेवटचे भाषण हे जगाच्या इतिहासातील एक अद्वितीय भाषण ठरले. यावेळी जणू भगवत्-शक्तीच त्यांच्या मुखातून बोलत होती. सर्व पुराव्यांची नव्याने शहानिशा करून ६ मे १९०९ ला जज्जांनी श्रीअरविंदांना निर्दोष मुक्त केले. पूर्ण एक वर्ष निर्णयाची वाट पाहात, या कैद्यांना 'नरकच' अशा अलीपूर जेलमध्ये काढावे लागले.

जेलमध्ये साधना चालू असताना, श्रीअरविंदांना, स्वामी विवेकानंदांचा आवाज १५ दिवस ऐकू येत होता. त्यांनी श्रीअरविंदांना एका महत्वाच्या आध्यात्मिक विषयाचे कथन केले. नंतर तो आवाज थांबला.

जेलमधल्या काळात श्रीअरविंदांना जाणवले की भारतीय लोकात स्वभावतः आत्मसंयमन, दया, दाक्षिण्य, कृतज्ञता आणि पारमार्थिक भगवत्भक्ती असल्याने, त्यांच्यात एक प्रकारचा 'देवभाव' आहे. त्यामुळे ते प्रतिकूल स्थितीही स्वीकारू शकतात, मनाचे स्थैर्य व धैर्य कायम ठेवून! हा प्राचीन काळापासून या भूमीला लाभलेला आर्यसंस्कृतीचा वारसा आहे.

श्रीअरविंद, या निर्जन कारावासात, स्वप्रयत्नांनी, संपूर्ण समर्पणाने, व पूर्ण श्रद्धेने योगाभ्यास करीत होते. या योगाभ्यासाने, भगवान स्वतः प्रसन्न होऊन शक्ती, सिद्धी व आनंद देतील, तो सर्व भगवत् कार्यात लावणे, हा तेव्हा त्यांचा उद्देश होता.

अलीपूरच्या 'या' योगाश्रमातून श्रीअरविंद ६ मे १९०९ ला मुक्त झाले. आता श्रीअरविंद पूर्ण बदललेले होते. एक पूर्ण नवी दृष्टी, नवी

बुद्धी, नवे प्राण, नवे मन व नवे चरित्र त्यांना मिळाले होते. संपूर्ण नवे बनून ते कार्यक्षेत्रात आले होते.

आता श्रीअरविंद एका नव्या क्रांतीसाठी सिद्ध झाले होते. आध्यात्मिक क्रान्तीसाठी-ज्यासाठी लक्ष्य होते केवळ भारतच नव्हे तर सर्व पृथ्वी, सारी मानवता ! संपूर्ण मानवतेचे भविष्य उज्ज्वल करणाऱ्या क्रान्तीसाठी श्रीअरविंदांनी साधना सुरू केली. पाँडिचेरीत !


वेदकाळापासून सुरू झालेला व पुढच्या काळात प्रचलित असलेला अनेक विभिन्न योगमार्ग व संप्रदाय यांचा अभ्यास करून श्रीअरविंदांनी आपल्या पूर्णयोगाची संकल्पना जगासमोर मांडली. "All Life is yoga" हे ब्रीदवाक्य असणारा हा योग जीवनाच्या प्रत्येक गोष्टींवर प्रत्यक्ष नियंत्रण व योग्य परिवर्तन प्राप्त करण्याच्या संदर्भातील आहे. आणि म्हणूनच, निर्दोष असतानाही श्रीअरविंदांना अलीपूर जेलमधल्या कष्टप्रद यातना का भोगाव्या लागल्या, ह्याचे स्पष्टीकरण त्यांच्याच शब्दात मिळते, ते असे -

Only by hard sacrifice
is high heaven earned :
He must face the fight, the pang
who would conquer Hell.
(Savitri XI -2 P-447).

सौ. देवयानी दिलीप देशपांडे
जी /१०२, भरतनगर, एरंडवणे, पुणे - ४११०३८.
मो. : ०९८५०४२६८३५, ०२०-२५४४२७४०.

■ ■ ■

वासुदेवमय कारागृह



सौ. स्मिता राजेंद्र सरोदिया

सीबीआय मधून निवृत्त
वास्तव्य नाशिक
नैनिताल येथील स्वाध्याय शिबिरामध्ये सातत्याने सहभाग

विश्वावर अधिराज्य गाजविणाऱ्या अंत:पुरुषाशी सायुज्यता किंवा समर्पण साधून निर्माण होणाऱ्या विचारातील व कृतीतील शक्ती व ऊर्जा म्हणजे आध्यात्मिकता. ईश्वराच्या इच्छेनुसार ही शक्ती व ऊर्जा कोणत्याही कार्यासाठी वापरली जाऊ शकते. ज्ञान प्रेम किंवा सेवा या कामी ती उपयुक्त ठरते. ही शक्ती व ऊर्जा अंतरंगातून काम करते. ईश्वरी शक्तीच्या माध्यमातून तिचे कार्य चालते. अतिमानवी शक्तीच्या बरोबरीने ती कार्यरत होते. एखादया व्यक्तीच्या आत्म्याच्या मुक्तीसाठी किंवा एखादया राष्ट्राच्या उभारणीसाठीही ती वापरता येईल, असे श्रीअरविंदाचे मत होते.

श्री योगी अरविंद इंग्लंडहून १८९३ मध्ये भारतात परतले. बडोदयाचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे ते स्वीय सचिव म्हणून काम पाहू लागले. त्यानंतर महाराजांच्या इच्छेनुसार बडोदयाच्या कॉलेजमध्ये ते फ्रेंच व इंग्रजी हे विषय शिकवू लागले. येथूनच त्यांच्या राष्ट्रीय कार्याला सुरुवात झाली. १९०७ साली त्यांनी बडोदा सोडले व ते कलकत्त्याच्या महाविद्यालयाचे प्राचार्य बनले. अदम्य, अक्षय, आध्यत्मिक सामर्थ्यातून भौतिक, मानसिक व नैतिक सामर्थ्य भारतीयांमध्ये उन्नत करणे हे अरविंदांचे राष्ट्रीय ध्येय होते. "No Compromise" हे पत्रक तयार करून सबंध बंगालमध्ये त्यांनी त्याचा प्रसार केला. 'भवानी मंदीर' योजनेची आचार-विचार संहिता त्यांनी तयार केली. 'युगांतर' नावाच्या इंग्रजी साप्ताहिकात त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले. वंदेमातरम् या पत्रातून त्यांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध लढा व पूर्ण बहिष्काराचा प्रचार केला. राष्ट्रधर्म ही श्रीअरविंदांची सर्वश्रेष्ठ जीवन प्रेरणा होती. तडजोड न करता ब्रिटिशांविरूद्ध लढा देऊन संपूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काँग्रेसला तयार करण्याचा सतत प्रयत्न त्यांनी केला. काँग्रेसमधील जहाल गटाच्या माध्यमातून त्यांनी कर्झन प्रणीत बंगालच्या फाळणीला जोरदार विरोध केला. ब्रिटिशांच्या वस्तू, संस्था यावर बहिष्कार, असहकार, अप्रत्यक्ष प्रतिकार ही श्रीअरविंदाची स्वातंत्र्यसूत्रे होती. १९०२ मधील अहमदाबाद अधिवेशन, १९०४ मधील मुंबई अधिवेशन व १९०५ मधील वाराणसी येथील अधिवेशनात ते उपस्थित होते. यात अनेक राष्ट्रीय नेते त्यांच्या संपर्कात आले. लाल-बाल-पाल यांच्या बरोबरीने राष्ट्रीय सभेला जहाल, ज्ञाननिष्ठ, स्वार्थत्यागी स्वरूप प्राप्त करून देण्यात श्रीअरविंदांची स्वातंत्र्यसाधना महत्त्वाची ठरली. लोकमान्य टिळकांच्या सूचनेनुसार त्यांनी महाराष्ट्रात दौरा केला. वंदेमातरम् केवळ राष्ट्रगीत नसून राष्ट्रमंत्र आहे. पूर्ण त्यागाशिवाय राष्ट्रनिर्मिती होऊ शकत नाही ही तत्त्वे त्यांनी पुणे, नाशिक, मुंबई, धुळे, अमरावती, नागपूर येथील भाषणांमध्ये प्रगट केली. त्यांची मते जहाल होती.

वंदेमातरम् या पत्रात ते जहाल लिखाण करीत असत. त्यात प्रसिद्ध झालेल्या एका लेखामुळे त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरण्यात आला, पण त्यातून ते निर्दोष सुटले.

१९०८ मध्ये मुझफ्फरपूर येथे उठाव झाला. तसेच माणिकतोळा येथे बॉम्बस्फोट झाला. या दोन्ही घटनांमध्ये श्रीअरविंदांचा सहभाग असल्याच्या संशयावरून त्यांना अटक करण्यात आली. अलीपूरच्या कारागृहात त्यांना ठेवण्यात आले. आपण तुरूंगात अडकलो तर भारताच्या स्वातंत्र्यचळवळींचे कार्य कसे होईल, याचा ते विचार करू लागले. त्यांचे हृदय आक्रंदून उठले. ''हे प्रभो, माझ्या देशबांधवांसाठी मला खूप काही करावयाचे आहे आणि ते पार पडेपर्यंत तुझे संरक्षक कवच माझ्याभोवती असेल असा मला विश्वास वाटत होता. मग मी तुरूंगात कसा? माझ्या स्वातंत्र्यचळवळीचे काय होईल?'' ही अरविंदांच्या मनातील आशंका भगवंतानी दूर केली. ''ज्या स्वातंत्र्यासाठी तू एवढा तळमळतो आहेस त्याची प्राप्ती करण्यासाठी मी दुसऱ्या माणसांची निवड केली आहे. क्रांतिकार्यापेक्षा तुझा मार्ग वेगळा आहे. तुझे पृथ्वीवरील नियत कार्य वेगळे आहे'' अशी स्पष्ट व नि:संदिग्ध जाणीव ईश्वराने त्यांना अलीपूरच्या कारागृहातच करून दिली. राजकीय स्वातंत्र्य नव्हे तर आध्यात्मिक मार्गावरील योगसिद्धी हे आपणावर नियतीने सोपविलेले कार्य आहे आणि भारतभूमीवर स्वातंत्र्य अवतरणारच याची त्यांना खात्री पटली.

कारागृहात त्यांची अस्वस्थता वाढू लागली. अशातच त्यांना आतला एक आवाज ऐकू आला. ''थांब व पहा'' (wait & see) श्रीअरविंद म्हणतात, हृदयस्थ परमेश्वराने मला जणू सांगितले की, ''जी बंधने तोडण्याचे तुला बळ नव्हते ती मी तुझ्यासाठी तोडली आहेत. मला तुझ्याकडून दुसरीच गोष्ट करून घ्यावयाची आहे.'' मी देवाचा धावा सुरू केला. माझा बुद्धिभ्रंश दूर कर अशी प्रार्थना केली. त्या क्षणी माझे संपूर्ण अस्तित्व एकाएकी शांततेने, शीतलतेने भरून गेले. तप्त मन इतके मोकळे, शांत झाले की पूर्वी कधीही अशी मनाची अवस्था मी अनुभवली नव्हती.

अलीपूरच्या कारागृहात प्रत्यक्ष श्रीकृष्णानेच अरविंदांच्या हाती गीता दिली. गीतेच्या योगाचे आचारण सुरू झाले आणि केवळ सहा महिन्यातच अरविंदांना ''वासुदेव-सर्वमिति'' हा श्रेष्ठ साक्षात्कार झाला. त्या शक्तीने त्यांच्या अंतरंगात प्रवेश केला आणि गीताप्रणीत साधना करण्यास ते समर्थ झाले.

श्रीअरविंद म्हणतात, ''कारागृहात मला जिकडे तिकडे वासुदेव दिसू लागला. मी तुरूंगाकडे पाहू लागलो तो तुरूंगाच्या उंचच उंच भिंतीत मी बद्ध आहे, असे मला दिसेना. माझ्या भोवती सर्व बाजूंनी वासुदेव उभा होता. माझ्या खोलीच्या बाहेर वासुदेवच उभा असून तोच पहारेकऱ्याचे काम करीत असल्याचे मला दिसून आले. माझ्या खोलीच्या गजांकडे मी पाहिले तर तेथे पण मला वासुदेवच दिसू लागला. माझ्या खोलीच्या समोर असलेल्या वृक्षाखाली मी फिरू लागलो, पण मला तो वृक्षच दिसेना. मला तेथे वासुदेव दिसू लागला. त्याठिकाणी श्रीकृष्ण उभा असून तो माझ्यावर आपली सावली पसरवीत आहे, असे मला दिसले. मला ज्या खरबरीत कांबळ्यावर निजावे लागत होते. त्या कांबळ्यात मला मजभोवती श्रीकृष्णाचे बाहूच अनुभवाला येऊ लागले. परमेश्वराने दिलेल्या दिव्य दृष्टीचाच हा परिणाम. तुरूंगात सभोवती असलेल्या कैद्यांकडे मी पाहू लागलो, तर त्या चोर, खुनी, दरोडेखोर लोकांमध्ये मला वासुदेवच दिसून आला.''

''खालच्या कोर्टात चौकशीसाठी खटला उभा राहिला. आम्हाला मॅजिस्ट्रेट समोर उभे करण्यात आले. तेव्हाही माझी दिव्य दृष्टी कायम होती - देव मला म्हणाला, ''जेव्हा तुला तुरुंगात आणले गेले तेव्हा तुझे अंत:करण विचलित झाले होते ना? आणि मला येथे देवाचे संरक्षण कुठे आहे असे आक्रंदन तू करत होतास ना? मग आता बघ मॅजिस्ट्रेटकडे, सरकारी वकिलाकडे'' आणि मी पाहतो तो काय? मी ज्याच्याकडे पाहिले तो मॅजिस्ट्रेट नव्हताच तो तर वासुदेव होता. मॅजिस्ट्रेटच्या खुर्चीवर माझा वासुदेवच बसला होता आणि सरकारी वकिलाच्या खुर्चीवर बसला होता श्रीकृष्ण, माझा प्रिय सखा. माझ्याकडे हास्यपूर्ण कटाक्ष टाकीत तो म्हणाला, ''आता तरी तुझी भीती मावळली ना? मीच मनुष्यमात्रात विराजमान आहे. त्यांच्या उक्तीवर व कृतीवर माझेच नियंत्रण आहे. माझे पूर्ण संरक्षण तुला आहे. तुला भीती बाळगण्याची गरज नाही. या खटल्याचे सर्व काम माझ्या हाती सोपवून तू निर्धास्त रहा. या खटल्यासाठी मी तुला येथे आणलेले नाही. माझा हेतू वेगळाच आहे.''

खटल्यामध्ये श्रीअरविंदांना त्यांचे वकील श्रीयुत चित्तरंजनदास यांना काही सूचना देणे आवश्यक वाटले. तेवढ्यात त्यांना आतल्या आवाजाचा संदेश आला, ''तुझ्या पायाभोवतीच्या बेड्यांच्या जोखडातून मी तुझी सुटका करणार आहे. तुझ्या हातातले कागद बाजूला ठेव. त्याला सूचना देण्याची तुला गरज नाही. कारण मीच त्याला सूचना देणार आहे.'' अशा तऱ्हेने श्रीअरविंदांना सगळीकडे वासुदेवच दिसत होता. कोर्टात न्यायाधीश, वकील, प्रेक्षक सारे सारे. वासुदेव हा भास नव्हे तर वास्तव आहे, याची प्रचीती श्रीअरविंदांना सतत येत होती.

या अनुभूतीनंतर आता योगसाधना संपायला हवी होती. पण श्रीअरविंद बैचेन होते. काय करावे? योगसाधनेतील सर्वोच्च शिखर म्हणजे इष्ट देवतेचे दर्शन. ते तर झाले होते. मग अशी तगमग का? १९०८ ते १९०९ या वर्षात अलीपूर कारागृहात श्रीअरविंदांना सतत १५ दिवस दिव्य वाणी ऐकू येत होती. ती दिव्य वाणी त्यांना पुढचा मार्ग सांगू लागली. मार्ग कळला, उद्दिष्ट कळले तेव्हा सोळाव्या दिवशी श्रीअरविंदांनी त्या दिव्यवाणीला विचारले, ''आपण कोण?'' तर ''मी विवेकानंद आहे'' असे उत्तर आले. स्वामी विवेकानंदांनी त्यांना पुढील अध्यात्माचा मार्ग दाखविला. त्यानंतरची साधना सुरू झाली. आतापर्यंत प्राप्त झालेल्या दिव्य स्तरावरील स्तर गाठावयाचा होता. आत्मसात करायचा होता. त्या स्तरावरील निखळ तेज आत्मसात करायचे होते. या स्तराला श्रीअरविंदांनी 'अतिमानस स्तर' (Super Mind) असे म्हटले आहे. अतिमानस हा शब्दप्रयोग अरविंदांचा स्वत:चा असला तरी त्या आत्मिक स्तरावर आरोहण करण्याचा मार्ग आपल्याला स्वामी विवेकानंदांनीच दाखविला असे, श्रीअरविंद सांगतात.

अलीपूरच्या कारावासातील एक असामान्य अनुभव म्हणजे शरीरोत्थापन. गंभीर ध्यानात गर्क असताना श्रीअरविंदांच्या मनात प्रश्न आला, अशी सिद्धी खरोखरीच शक्य आहे काय? आणि तात्काळ आपले शरीर वर उचलले गेले असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. शरीर अधांतरी वर उचलले गेले होते. हा कैदी आढ्याजवळच्या खिडकीतून पळून जाण्याचा प्रयत्न तर करीत नाही? अशी भीती तेथील पहारेकऱ्याला वाटली होती. शरीराच्या अन्नमय प्राणमय कोषांची शुद्धता अलीपूरला दहा दिवसांच्या व पाँडेचेरीला तेवीस दिवसांच्या कडकडीत उपवासांनी केली होती.

१९०५ च्या सुमारास श्रीअरविंदांनी 'भवानी मंदीर' नावाची पुस्तिका लिहिली. हिंसात्मक कार्यासाठी नव्हे तर तरुणांना क्रांतिकार्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी त्यांची ती योजना होती. भवानी म्हणजे चित्‌शक्ती. दुर्गा म्हणजे तीच. कालीही तीच, तीच लक्ष्मी, प्रियतमा राधाही तीच. तीच आमची माता आणि तीच आमची जन्मदात्री. प्रत्येक युगात ही माता शक्तिमाता म्हणून अविष्कृत झाली आहे. रामकृष्ण परमहंस हे कालीचे उपासक होते. ते जिच्याशी तद्रूप झाले तीच भवानी, आदिमाता. त्या रामकृष्ण परमहंसांनी विवेकानंदांना कालीचे दर्शन घडविले आणि याच स्वामी विवेकानंदांनी श्रीअरविंदांना अलीपूर जेलमध्ये उपदेश केला.

मे १९०९ मध्ये श्रीअरविंदांची जेलमधून निर्दोष मुक्तता झाली. जेलमधून बाहेर पडलेल्या अरविंदांचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे बदललेले होते. त्यांच्यात आमूलाग्र बदल झाला होता. क्रांतिकारक श्रीअरविंदांचे श्री योगी अरविंदामध्ये रूपांतर झाले होते.

१९१० ते १९१४ ही चार वर्षे श्रीअरविंदांनी प्रखर आध्यात्मिक साधनेत घालविली. त्यांना स्वामी विवेकानंदांनी अलीपूर जेलमध्ये अतिमानस तत्त्वाची ओळख करून दिली होती. पुढची चढण आता त्यांनाच चढायची होती. त्याकरिता त्यांना वेळ हवा होता म्हणून पाँडेचेरी आश्रमाची जबाबदारी भविष्यकाळात त्यांनी श्री माताजींवर सोपवली व फक्त साधनेसाठी प्रस्थान ठेवले.

२४ नोव्हेंबर १९२६ या दिवशी ईशसाधनेची जी परिसीमा म्हणून आतापर्यंत समजली गेली होती, ती त्यांनी गाठली. त्या अधिमानसाच्या

(over mind) अवतरणाने श्रीअरविंदांच्या साधनेचा एका दृष्टीने परिपाकच झाला होता. त्या दिवशी अधिमानसाचे, देवलोकीचे धरतीवर अवतरण झाले. या अधिमानसाच्या अवतरणाबद्दल श्री योगी अरविंद म्हणतात, *My Soul & his indissolubly linked in the one task for which our lives were born. To raise the world to God in deathless light.*

To bring god dwon to the world on earth, we came to change the earthly life to life devine.

श्री योगी अरविंद आपल्या त्या अनुभवाबद्दल असे म्हणतात,

तेजाच्या पुरात लोटता सर्व कोषिका
रोमांचित मम देहाच्या
आत्मा आणि शरीर डोले सामर्थ्याने हर्षाच्या
प्रकाश आणि प्रकाश पुनरपि
वरती तैसा भवती माझ्या
सागर लाटा जणू उसळल्या

पाषाणसम ताठर डोंगर
अथवा पुतळा खिळलेला
तैशी माझी विशाल काया
जगताच्या भारास अनुभवे, आधारही होते
अमोघ आणि अफाट अवतरण
देवांशाचे घडून येता
नाशिवंत या गात्रामध्ये प्रविष्ट ते होते.

अग्नी चेतला प्रखर जाहला जणु देवमूर्ती
भूतकाळाची सर्व बंधने त्यात भस्म होती
पवित्र अशा वेदीवरती थाट नवा आला
प्रतिष्ठापना नवी लाभली मुक्त जीवनाला
चिरंतनाचा स्पर्श जाहला अद्भुत मग घडले
भौतिक ऐंद्रिय अनुभूतीचे साचेही फुटले
पार्थिव शक्ती अवयव त्याचे धरते रोधोनी
या शक्तीहूनि प्रबळ शक्ती ये खाली उतरोनी

२६ नोव्हेंबर १९२६ हा दिवस कृष्णाचे भौतिकामध्ये अवतरण होण्याचा होता. कृष्ण अतिमानसिक प्रकाश नाही. कृष्णाच्या अवतरणाचा अर्थ असा होईल की, अधिमानस देवाचे हे अवतरण जरी स्वत:मधून नसले तरी अतिमन आणि आनंदाच्या अवतरणाची तयारी करणारे आहे. कृष्ण हा आनंदमय देव आहे. तो अधिमानसाच्या माध्यमातून उत्क्रांतीला आधार देत आहे व आनंदाकडे नेत आहे.

श्रीअरविंद पृथ्वीच्या भूमीत स्वर्गाच्या शाखेच्या रोपणाबाबत लिहितात,

स्वर्गीचा अग्नी आता पृथ्वीवर प्रज्वलित
अस्त न होणारा सूर्य येथे आहे तळपत
आश्चर्य जे जन्माच्या मर्यादाना आलय भेदून
देहधारी आत्मे त्याच्याद्वारे इच्छा करता आज्ञसून

सत्य आणि परमानंदाच्या राज्याप्रतच्या ज्वालासमान
सोनसळी – रक्तवर्णी उतरतात सोपान
बाळे स्वर्गीची तेज:पुंज तुतारी फुंकतात
अंधकाराच्या अंतास घोषित करतात

थोडी प्रतीक्षा अधिक, दारे नवजीवनाची
कोरून निघतील प्रकाशांमध्ये रुपेरी
स्वर्णमय छत त्याचे नक्षीदार फरसबंदी
खुले उज्वल भवन एका महान जगति

विहरतील स्वप्ने माझी त्यांच्या सोनेरी हवेत
कारण सोनसळी नीलवर्णी वस्त्र प्रावरणात
होऊनी भूतिमान पृथ्वीवर या नांदेल
तुझे सत्य, अनुपम आणि जाज्वल्य

जड भौतिकात व ऐहिकात दिव्य चेतनेचे प्रकट होणे ही त्याची ईश्वरदत्त नियती आहे, असे साक्षात्कारी सत्य प्रस्थापित करून श्री योगी अरविंदांनी जड व चैतन्य यांच्यातील दर्शनी व अवास्तव विरोध कायमचा मिटवून टाकला. उच्चतर जाणिवेचा उपयोग, निम्नतर जाणिवेचे शुद्धीकरण व अखेर रूपांतर करण्यासाठी केला पाहिजे, असे ते म्हणतात. अशा या श्री योगी अरविंदांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम.

सौ. स्मिता राजेंद्र सरोदिया
नाशिक. फोन नं. २३४७३७३



कोर्टातील युक्तिवाद आणि सुटका

संग्रहीत मजकुरावरून...

इंग्लंडमधील वास्तव्यानंतर भारतात परतलेल्या श्रीअरविंदांनी लोकमान्य टिळक व इतर थोर राजकीय नेत्यांसमवेत जुलमी ब्रिटिश अमदानीविरुद्ध भरतभूमीवर झंझावात उभा केला. मरगळलेल्या भारतीयांच्या मनात राष्ट्रतेजाची ज्वाला चेतवली. आसेतु-हिमाचलपर्यंत श्रीअरविंदांचा शब्द विजेच्या लोळाप्रमाणे समाजमनात भिनत गेला आणि असंतोषाचा भडका उडायला सुरुवात झाली. यामुळे ब्रिटिश सरकार हादरले नसते तरच नवल होते. त्यांनी मग ठरवले, कसेही करून त्यांना अडकवायचे. काहीही करून त्यांना जेरबंद करायचे आणि लौकरच त्या बेमुर्वत सरकारला ती संधी (खोटी) मिळाली. एका बॉंब खटल्यात श्रीअरविंदांचा कोणताही संबंध नसताना त्यांना अडकवण्यात येऊन अटक करण्यात आली व त्यांची रवानगी अलिपूरच्या कारागृहात करण्यात आली.

एक वर्षभर त्यांना कारागृहात डांबण्यात आले होते. त्या काळात ब्रिटिश सरकारने आटोकाट प्रयत्न केले. शेकडो साक्षीदार तयार केले. हजारो कागदपत्रे व दस्तऐवज पुरावे म्हणून निर्माण केले.

इकडे एक प्रख्यात बॅरिस्टर श्री. चित्तरंजन दास हे श्रीअरविंदांचे वकील म्हणून नियुक्त झाले. त्यांनी आपली वकीलीची इतर प्रॅक्टिस थांबवली. केसचा अभ्यास केला. त्याअगोदर त्यांनाही अंतर्वाणी ऐकू आली की तुला ही केस घ्यायची आहे व लढायची आहे. देवाची योजना होती. असत्याविरुद्ध सत्याची लढाई होती ती. सतत आठ दिवस साक्षीपुराव्यांच्या धबडग्यात बॅ. चित्तरंजन दास आपला युक्तिवाद करीत होते आणि आता निकालाच्या दिवशीचा त्यांचा शेवटचा युक्तिवाद! श्रीअरविंद इकडे कोर्टात लोखंडी पिंजऱ्यात बंदिस्त. पण तरीही शांत, स्थितप्रज्ञ व ध्यानमग्न असे!

५ मे १९०८! My Lord.....

बॅरिस्टर चित्तरंजन दास म्हणाले - जणू भगवंताने त्यांच्या मुखात युक्तिवादप्रद शब्द घातले होते....

या खटल्यातील चर्चा आता समाप्त होत आहे! श्रीअरविंदांवर जे आरोप लादले गेले ते खरे की खोटे याचा निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. आरोप सिद्ध होण्याच्या अगोदरच एखाद्या व्यक्तीला गुन्हेगार म्हणून समजणे अशी भलतीच पद्धत सरकारी पक्षाने अवलंबिलेली दिसतेय!

श्रीअरविंदांनी फक्त राष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला आहे. या देशाने जो आत्मविश्वास गमावला आहे त्यामुळे श्रीअरविंद उद्विग्न आहेत. ते आपल्या देशबांधवांना फक्त एवढेच म्हणताहेत की तुम्ही भेकड नाही. तुम्ही समर्थ आहात. श्रद्धा ठेवा व पुढे चला. श्रीअरविंदांनी राष्ट्राला स्वातंत्र्याचे ध्येय शिकवले व जर ते कार्य कायद्याच्या विरुद्ध आहे असे म्हणायचे असेल तर किंवा स्वातंत्र्याचे धडे देणे हा अपराध असेल असे म्हणायचे असेल तर ते अपराधी आहेत असे अभिमानाने म्हणायला हरकत नाही. केवळ स्वातंत्र्याचे पाठ देणे हे कायद्याच्या विरुद्ध कोणत्याच कलमात बसत नाही.

मला आपल्याला एवढेच सांगायचे आहे की नसते अपराध लावून श्रीअरविंदांसारखा पुरुष केवळ याच न्यायालयाच्या समोर उभा नसून मानव इतिहासरूपी उच्चतम न्यायसभेसमोर उभा आहे. माझे आपल्याला निवेदन आहे की ज्यावेळेस हा वादविवाद थांबेल, हा संघर्ष व हे आंदोलन समाप्त होईल, एवढेच काय श्रीअरविंद हा आरोपी इहलोक सोडून गेल्यावरही त्याचे शब्द भारतातच नव्हे तर सातासमुद्रापलिकडेही सतत दुमदुमत राहतील.

एक द्रष्टा, एक देशप्रेमी, एक मानव कल्याणाचा उद्गाता याच दृष्टीने सारे जग त्यांच्याकडे बघेल.


महाराज, इंग्लिश न्यायपद्धतीच्या साऱ्या परंपरांचा निर्वाळा देऊन व आतापर्यंत ज्या ज्या सन्माननीय न्यायाधीशांनी विधिवत निर्णय दिलेले आहेत त्या सर्वांच्या वतीने मी आपणास कळकळीची विनंती करीत आहे की, एक इंग्लिश न्यायाधीश न्यायाचा पाठपुरावा करण्याचे विसरून गेले असे म्हणण्यास वाव ठेवू नका! इतक्या बुद्धिप्रचुर व स्पष्ट युक्तिवादावर न्यायाधीश महाशयांनी समग्र विचार केला, त्यांनाही वास्तव परिस्थितीची जाणीव झाली व सरकारचा श्रीअरविंदांच्या अटकेमागील कुटिल हेतू उमजला. निकालाच्या दिवशी कोर्टात प्रचंड गर्दी उसळलेली होती. सरकार पक्षातर्फे हजर असलेले तमाम अधिकारी, वकील इ. अगदी निर्धास्त होते. त्यांना कसेही करून प्रतिशोध घ्यायचा होता. मूलतःच क्रौर्य अंगी असलेल्या शासनकर्त्यांकडून मानवतेची कशी अपेक्षा ठेवणार? पण भगवंत जागा होता. सत्यसंकल्पाचा दाता परमेश्वर, त्याच्या न्यायालयात अन्याय कसा होईल?

न्यायाधीश महाराजांनी निकाल दिला -

I find Sri Aurobindo not guilty! Not Guilty!

या खटल्यामध्ये एकूण (एकूण ४२ आरोपी/४००० कागदपत्रे/ ४०० इतर पुरावे / २२२ साक्षीदार) यांचा समावेश होता. (सरकारी वकील = नॉर्टन होते / तर न्यायाधिश = बीचक्रॉफ्ट) होते.

■ ■ ■



श्री अरविंद वंदना
अलिपूर न्यायालयांत

सौ. शैला सुहास पटवर्धन


एम. बी. एड.
सेवानिवृत्त शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय

ज्ञानसागर! राजभूषण! युवक-तारांगण-रणी,
देशमुक्ति आद्य ठरता जाहला व्रतस्थितझणी
पद-धन-तसे आप्त-ममता दूर मोहा सारूनी
वाणी आणि लेखणी राष्ट्रधर्म प्रसारणी
वृत्तपत्रे लेखने त्या आंग्लसत्ता थरकली
ते 'युगांतर' 'वंदे मातरम्' चंडिकाशक्ति भली
किती प्रयत्ने माग घेती 'अग्नि' ना पण ये करी
'विनाशाय च दुष्कृताम्' जन्म हा भूमीवरी
मुजफ्फरपूर प्रकरणी संशयाची अंगुलि
सदनी झडती, दस्तऐवज जप्ती निष्कारण छळी
राजद्रोह 'कलम एकशे एकवीस ते चोवीस' गुन्हा
साग्रसंगीत कूटनीती साक्षी पुरावे पुनःपुन्हा
अरविंद कारावास शिक्षा चालली वर्षस्थिता
भावभक्ती - प्रार्थना - अर्थसहाय्या अगणिता
मदतनिधी स्वयं येत होता पूर्ण देशच पाठीशी
अंध भिक्षेकरीही देतो - लोकां विनवुन रौप्य श्री
गरीब विद्यार्थी भुकेला एक वेळच जेवतो
पै नि पैशाहून जगती देशप्रेमा श्रेष्ठ तो
नवल अद्‌भुत देशबंधूस दृष्टांत 'उपाध्याय'दे
मातृ-आज्ञा, भगिनी विनवी ''न्याय अरविंदास दे''
'दास-घोष' दोन जीव परंतु एक देशव्रते
'बीचक्राफ्ट' न्यायमूर्ति अरविंद सहाध्यायी ते
ऐहिकांचे ऐलतीर ध्येयवादी पैलतीर

या जगा कैसे दिसावे? देव तिष्ठत ते मंदिर!
लटकते तलवार शिरी पण गाढ निद्रा लक्तरी
भय न मृत्यूचे न क्रोधही शांत मुद्रा साजिरी
भवती क्रांतिकारी युवक प्राशिले गीतारव्य की
'देह नश्वर शाश्वतात्मा' जन्म झाला सार्थकी!
उगवला दिन चित्तरंजन दास वाक्पटु-पंडित
कायद्यातील मुकुटमणी जणू भाष्य वेधक, परिमित!
''नियतीच्या न्यायालयी आज दारवल आरोपपत्र
अंधारातून मार्ग दारववी हाच जगा 'अरू' मित्र
विझेल वणवा। शमेल वादळ। विरेल कोलाहल
उरेल केवळ ह्याची प्रतिमा प्रेषित जणु चिरकाल
देवाघरचा दूत, महाकवी, मातृगानगंधर्व,
पुण्यपुरुष हा मानवकुळी-प्रतिसदनी पुण्यस्मरण!
जळीस्थळी काष्ठी पाषाणी प्रतिध्वनि घुमतील
सातसागरापार शब्द हे पंचतत्त्व नेतील!
मानवकुळीचा मुक्तिदाता राष्ट्रधर्मी प्रत्यक्ष
न्यायालय जो निर्णय देईल इतिहासी ठरे साक्ष।।''
इतिहासातहि साक्ष समांतर आंग्लभूमिला स्तुत्य
कसा गुन्हा हे राष्ट्रप्रेम? जे न्यायदेवतामान्य
शब्द चित्तरंजनांचे झाले स्तिमित न्यायालय ते
न्यायमूर्ति ज्यूरी आवाक् प्रसन्न परंतु श्रोते
एकमुरवाने वदले ज्यूरी 'अरबिंदो निर्दोष'
चिरंजीव वच चिंतन प्रकटन अमर 'दास' अन् 'घोष'
'वासुदेव दर्शन' परी ठरले लक्ष्य योगसाधना
नवप्रवास हा पूर्णयोगपथ मानवकुल-उत्थाना!
।। ॐ तत् सत् ।। ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

संदर्भ : मुक्तिगाथा महामानवाची
लेरवक : प्राचार्य शिवाजीराव भोसले

■ ■ ■



'त्या' दोन घटना : अन्वय आणि अर्थ

श्री. प्रभाकर गोपाळ नुलकर

एम. ए. (पुणे विद्यापीठ)
पत्रकार
६० वर्षे पत्रकारिता, जीवनगौरव आदि पुरस्कारांनी सन्मानित.
थॉमसन फाऊंडेशन शिष्यवृत्ती मिळवून प्रगत वृत्तपत्रीय अभ्यासक्रमासाठी इंग्लंडमध्ये वास्तव्य.

।। श्री माँ ।।

योगी श्रीअरविंद यांच्या आयुष्यातील दोन महत्त्वपूर्ण घटनांबाबत सर्वसामान्य भारतीयांच्या मनात फार मोठे कुतूहल व तेवढेच मोठे प्रश्नचिन्ह उभे असते. पहिली घटना म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीचे कार्य 'अर्धवट' सोडून त्यांनी फ्रेंच वसाहतीत परागंदा होणे आणि दुसरी घटना म्हणजे जर्मन-जपान विरोधी युध्दात त्यांनी भारताच्या शत्रुस्थानी असलेल्या ब्रिटनला सक्रिय पाठिंबा देणे.

सुरतला काँग्रेसपक्ष फुटल्यानंतर त्यातील जहाल गटाचे नेतृत्व लोकमान्यांचे बिनीचे सहकारी असलेले बाबू अरविंद घोष स्वीकरतील अशी अपेक्षा बाळगणे स्वाभाविक असता त्यांनी स्वातंत्र्य चळवळी-पासून दूर जाणे हा सर्वसामान्य भारतीयांना धक्काच होता.

पुढे दुसऱ्या जागतिक महायुध्दात ब्रिटन अडचणीत असताना त्याच्या अगतिकतेचा लाभ उठविण्याऐवजी श्रीअरविंदांनी त्याची उघडपणे पाठराखण केली. हाही सर्वसामान्य भारतीयांना एक जबर धक्काच होता. विशेषत: ब्रिटीश सत्ता अडचणीत असताना नेताजी सुभाषचंद्र बोस व महात्मा गांधी या नेत्यांनी जी पावले उचलली होती त्या पार्श्वभूमीवर श्रीअरविंदांनी स्वीकारलेली भूमिका लोकांच्या पचनी पडणे कठीण होते.

ब्रिटन अडचणीत असता सुभाषचंद्रांनी नजरकैदेतून ब्रिटीश सरकारच्या हातावर तुरी दिली आणि जर्मनी व जपानशी संधान बांधले. शिवाय आझाद हिंद सेनेची उभारणी केली. इकडे ब्रिटीश सत्तेला कोंडीत पकडण्यासाठी महात्मा गांधींनी सन १९४२ साली 'चले जाव' चा निर्वाणीचा इशारा देऊन स्वातंत्र्य चळवळीला नवा वेग दिला.

श्रीअरविंदांच्या राजकारणातील निवृत्तीच्या घटनेला आता १०० वर्षाहून अधिक काळ लोटला आहे तर दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या काळात त्यांनी ब्रिटन, फ्रान्स-अमेरिकेची पाठराखण करण्याच्या घटनेलाही अर्धशतक लोटले आहे. आता या प्रदीर्घ कालावधीनंतर तात्कालिक भावनिक प्रतिक्रिया बाजूला सारून या घटनांचे अधिक वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे आणि त्यांचा नेमका अन्वय आणि अर्थ लावणे शक्य होणार आहे. असे झाले तरच या घटनांविषयी सर्वसामान्यांच्या मनात असलेला गैरसमज व अज्ञान दूर करता येईल.

चार-चौघा समकालीन राजकीय पुढाऱ्यांपेक्षा अगदी वेगळेपण वाट्याला घेऊन आलेले बाबू अरविंद घोष हे सातत्याने ईश्वरी तत्त्वाच्या हातातील एक शक्ति म्हणूनच जगाच्या रंगभूमीवर आपली भूमिका वठवीत होते हे समजून घेतल्याखेरीज विराट ईश्वरी लीलेतील त्यांच्या हालचालीचे रहस्य उलगडून सांगता येणे अशक्य आहे.

बाबू अरविंद घोष हे एक वेगळेच रसायन होते ही गोष्ट त्यांच्या बालपणापासूनच्या वाटचालीवरून दिसून येते. त्यांचे वडील डॉ. कृष्णधवल घोष हे कट्टर 'इंग्रजाळलेले' गृहस्थ होते आणि आपल्या चिरंजीवाला भारतीय संस्कृतीचा अजिबात संपर्क घडू नये म्हणून त्यांनी वयाच्या ७ व्या वर्षापासूनच अरविंदांची इंग्लंडला शिक्षणासाठी रवानगी केली. २१ वर्षापर्यंत ते इंग्लिश वातावरणातच वाढले, भारतात परतल्यावर मात्र त्यांना विविध अतींद्रिय अनुभव येऊ लागले. अगदी प्रथम मुंबईला अपोलो बंदरावर पाऊल टेकल्यावर आपणाला एक प्रकारच्या प्रगाढ शांतीने लपेटून घेतले आहे असा दिव्य अनुभव त्यांना आला, तो दिवस होता ६ फेब्रुवारी १८९३. पुढे १९०३ साली काश्मीरच्या प्रवासात तख्त-ई-सुलेमान या सुळ्यांच्या कडेवरून चालत असताना त्यांना शून्य ब्रह्माचा-अनंताचा-साक्षात्कार झाला. १९०८ साली महाराष्ट्रीय योगी विष्णु भास्कर लेले यांच्या समवेत बडोद्यातील मुजुमदार वाड्यात मनाच्या शांत अवस्थेत त्यांना नीरव ब्रह्मचैतन्याचा रोकडा अनुभव आला. पुढे अलीपूर कारागृहात असताना त्यांना सर्वत्र श्रीकृष्णाचे दर्शन होऊन सगुण साक्षात्कार झाला.

राजद्रोहाच्या आरोपाखाली अलीपूर कारागृहात वर्षभर डांबलेले बाबू अरविंद घोष जेव्हा निर्दोष सुटून बाहेर आले तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल झाला होता आणि ते आधीचे 'राष्ट्रीय पुढारी' म्हणून राहिले नव्हते. त्यांनी आता स्वत:ला पूर्णपणे ईश्वराच्या स्वाधीन केले होते व म्हणूनच 'गो टु पाँडिचेरी' हा ईश्वरी आदेश आल्यावर क्षणभराचाही विचार न करता त्यांनी त्या फ्रेंच वसाहतीच्या दिशेने प्रस्थान केले.

ही कृती कोणताही 'पलायनवाद' नसून व्यापक ईश्वरी कार्य करण्यासाठी उचललेले ते एक सकारात्मक पाऊल होते हे एकदा समजून घेतले की त्या अचानक व एकाएकी प्रस्थानाबद्दल कोणताही गैरसमज राहणार नाही. स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय इतरांना यथावकाश साध्य होणारच आहे, पण योगमार्गातील पुढील टप्पा गाठण्यासाठी मात्र तुझीच नितांत


गरज आहे हा ईश्वरी आदेश श्रीअरविंदांसाठी होता व म्हणून त्यांना पाँडिचेरीत जाणे क्रमप्राप्त होते.

ईश्वरी आदेशानुसार चालण्याच्या याच वाटचालीतील पुढील टप्पा म्हणजे दुसऱ्या जागतिक महायुद्धातील श्रीअरविंदांची भूमिका. पारंपारिक योगसाधनेच्या पलीकडे जाऊन समग्रतेचा व पूर्णत्वाचा ध्यास धरणाऱ्या श्रीअरविंदांच्या दृष्टीने दुसरे महायुद्ध हा दोन युद्धमान राष्ट्रगटातील सत्तासंघर्ष नव्हता तर सुर व असुर प्रवृत्तीतील घनघोर संग्राम होता. 'इंग्लंडवरील संकट म्हणजे भारताला सुसंधी' किंवा 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या सर्वसामान्य मानसिक पातळीवरील संकुचित व सदोष विचारांना इत:पर श्रीअरविंदांच्या दृष्टिकोनात स्थान नव्हते. त्यांना हे पक्के ठाऊक होते की, हिटलर व नाझीवादाच्या बाजूने आसुरी शक्ती उभ्या होत्या आणि त्यांची सरशी ही मानवी उत्क्रांतीची व विशेषत: आध्यात्मिक प्रगतीची पीछेहाटच ठरली असती. त्यामुळे केवळ युरोपलाच नव्हे तर साऱ्या आशियाई खंडाला व भारतालाही अभूतपूर्व गुलामगिरी भोगावी लागली असती.

अशा रीतीने केवळ लोकशाही व मानवजातीच्या दृष्टीनेच नव्हे तर श्रीअरविंद व माताजी पृथ्वीवर ज्या अतिमानव वंशाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करीत होते त्या नव्या मानवाच्या आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीनेही आता जीवन-मरणाचा तीव्र प्रश्न उत्पन्न झाला होता. या अदिव्य शक्तीची घोडदौड रोखण्यासाठी श्रीअरविंदांनी आध्यात्मिक स्तरावर जे अथक प्रयत्न केले त्याचे अद्‌भुत वर्णन डॉ. निरोदबरन यांनी 'श्रीअरविंदांच्या समवेत १२ वर्षे' या ग्रंथात तपशीलवार केले आहे. श्रीअरविंदांच्या लौकिक जीवनातील या अलौकिक गोष्टी जर योग्य रीतीने प्रकाशात आल्या तर त्यांच्या वाटचालीतील दोन प्रमुख घटनांचा उचित अन्वय आणि अर्थ जनमानसाच्या नीट ध्यानात येऊ शकेल आणि त्यांचे गैरसमज व अज्ञान दूर होतील.

वस्तुत: वेद, उपनिषदे, गीता यांच्या तोडीचे लाईफ डिव्हाईन व सावित्री यासारखी ग्रंथनिर्मिती करून श्रीअरविंदांनी वैदिक परंपरेतील नवे 'दर्शन' मानवजातीला उपलब्ध करून दिले आहे. मुळात इंग्रजी भाषेत असलेल्या या साहित्याला देशी भाषांचे लेणे चढवून ती जनमानसात वितरित करण्याची नितांत आवश्यकता आहे. 'कल्याणी'चा श्रीअरविंद विशेषांक काढून या दिशेने ठोस पाऊल टाकल्याबद्दल ओंकार ट्रस्ट अभिनंदनास पात्र आहे.

प्रभाकर गोपाळ नुलकर
कर्मयोगी, पत्रकारनगर, सोलापूर-४१३००३
फोन-०२१७-२३१०९२८



श्रीअरविंद यांचा
१५ ऑगस्ट १९४७ चा संदेश

श्रीअरविंदांच्या संग्रहीत लेखनामधून...

१५ ऑगस्ट १९४७ हा स्वतंत्र भारताचा जन्मदिन आहे. हा दिवस, भारताच्या जुन्या युगाची समाप्ती व नवीन युगाचा प्रारंभ सूचित करतो. पण आम्ही एका स्वतंत्र राष्ट्राच्या रूपात आपल्या जीवनकार्याद्वारे ह्या दिवसाला, एक असा महत्वाचा दिवस बनवू शकतो, जो संपूर्ण जगासाठी, साऱ्या मानवजातीच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच आध्यात्मिक भविष्याकरिता एका नव्या युगाला घेऊन येणारा ठरेल!

१५ ऑगस्ट हा माझा स्वत:चा वाढदिवस आहे, त्यामुळे अर्थातच माझ्यासाठी ही फार आनंदाची बाब आहे की, ह्या दिवसाला इतका महान अर्थ आणि महत्व प्राप्त झाले आहे. पण हा दिवस, स्वातंत्र्यदिन बनणे ह्याला मी केवळ योगायोग मानीत नाही, तर मला असे वाटते की, ज्या कार्याने मी माझ्या जीवनाची सुरुवात केली, माझे मार्गदर्शन करणाऱ्या ईश्वरी शक्तीने त्या माझ्या प्रयत्नांना मान्य केल्याची ही मोहोर उठवली आहे आणि माझे ते कार्य पूर्णपणे सफल होण्याचा हा आरंभ आहे. निश्चितपणे आजच्या ह्या मंगलदिनी, त्या सर्व जागतिक आंदोलनांना, ज्यांना मी माझ्या आयुष्यातच यशस्वी होण्याची आशा केली होती, जरी त्या काळात मला ते एखाद्या स्वप्नाप्रमाणे असंभव वाटत होते. तरी आज त्यांना मी सफल होताना किंवा सफलतेकडे मार्गक्रमण करताना पाहू शकत आहे. या सर्व आंदोलनांमध्ये भारत एक उत्तम भूमिका घेऊ शकतो आणि एक प्रमुख स्थानही ग्रहण करू शकतो.

ह्या स्वप्नांमध्ये **पहिले स्वप्न** होते, एक क्रांतीकारक आंदोलन जे स्वतंत्र आणि अखंड भारताला जन्म देईल. भारत आज स्वतंत्र झाला आहे पण तो अखंड राहिला नाही. एकावेळी असेही दिसत होते की, स्वतंत्र होण्याच्या ह्या प्रक्रियेत कदाचित हा देश पूर्वी होता त्याप्रमाणे वेगवेगळ्या राज्यांच्या विस्कळीत अवस्थेत, गर्तेत जाणार पण सुदैवाने हे संकट टळेल अशी शक्यता निर्माण झाली आहे व अखंड जरी नसला तरी एक विशाल व बलशाली एकता स्थापन होईल. विधान परिषदेच्या दूरदर्शी नीतीमुळे कोणतीही फूट न पडता, दलितांच्या समस्या सोडविल्या जातील. परंतु हिंदू - मुसलमानांचा जुना धर्मभेद हा राजकीय विभाजनाच्या रूपाने बळकट झालेला दिसतो आहे. अशी आशा केली पाहिजे की ही झालेली फाळणी म्हणजे काही काळ्या दगडावरील रेष नव्हे तर हा एक तात्पुरता कामचलाऊ उपाय आहे, त्यापलीकडे काही नाही. कारण जर ही व्यवस्था कायमस्वरूपी राहिली तर भारत मोठ्या प्रमाणावर दुबळा आणि अपंग होऊ शकतो; अंतर्गत कलहाची शक्यता कायम राहील. नवीन आक्रमण आणि विदेशी राजवटीची आशंकाही राहू शकते. भारताची अंतर्गत प्रगती आणि समृद्धी यामध्ये अडथळा येऊ शकतो. अंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची स्थिती दुबळी बनू शकते. त्याचा भविष्यकाळ कुंठितच नव्हे तर व्यर्थही ठरू शकतो, असे होता कामा नये, देशाची फाळणी रद्द झाली पाहिजे. आपण आशा करूया की हे कार्य स्वाभाविकपणेच होऊन जावे. केवळ शांती व एकीनेच नव्हे तर सहकार्याने काम करण्याची गरज उत्तरोत्तर समजून घेऊन तसेच मिळून-मिसळून कामे करण्याचा प्रयत्न आणि त्यासाठी लागणारी साधने निर्माण करून हे कार्य संपन्न होत जाईल. अशाप्रकारे एकता शेवटी कोणत्याही रूपात येऊ शकते. तिच्या योग्य रूपाचे व्यावहारिक महत्व असेलही पण ते काही अंतिम महत्त्वाचे नाही. पण कोणत्याही का होईना, कशाही प्रकारे कां होईना, ही फाळणी दूर झाली पाहिजे आणि एकता अवश्य स्थापित झाली पाहिजे आणि स्थापित होईलही; कारण भारताच्या भविष्याकाळातील महानतेसाठी हे आवश्यक आहे.

दुसरे स्वप्न होते - आशियातील लोकांचे पुनरुत्थान, स्वातंत्र्य आणि मानव सभ्यतेची उन्नती, की ज्यायोगे आशियाखंड परत मूळच्या महान स्थानी विराजमान होईल. आशिया आता जागृत झाला आहे, त्याचे मोठमोठे प्रदेश स्वतंत्र झाले आहेत किंवा बंधनातून मुक्त होत आहेत. त्याचे अन्य प्रदेशही काही अंशी पारतंत्र्यात आहेत, पण तेही घोर संघर्षातून पार पडत स्वातंत्र्याकडे अग्रेसर होत आहेत. आता थोडेच कार्य बाकी आहे, पण ते आज नाहीतर उद्या पूर्ण होणारच आहे. त्यात भारतालाही आपली भूमिका बजावावयाची आहे. त्याने ती अशा सामर्थ्याने व ताकदीने करायला प्रारंभ केला आहे की अन्य राष्ट्रांच्या सभेत त्याच्या (भारताच्या) योग्यतेचे कोणते स्थान तो प्राप्त करू शकतो हे तो आत्तापासून सूचित करीत आहे.

तिसरे स्वप्न होते - एक विश्वसंघ जो अखिल मानवजातीसाठी एक सुंदरतर, उज्ज्वलतर आणि महत्तर असा जीवनाचा बाह्य आधार निर्माण करेल. मानवजातीची ही एकता प्रगतीच्या मार्गावर आहे. एक अपुरा प्रारंभ संगठित केला गेला आहे, पण तो मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करीत आहे. पण तरीही त्यात एक जोश आहे, जो

निश्चितपणे वाढतच जाईल आणि विजयी होईल. ह्या कार्यातही भारतदेशाने प्रमुख भूमिका घेणे सुरू केले आहे आणि जर तो विशाल धोरणाचे राजकारण विकसित करू शकला, जे राजकारण केवळ रोजच्या घटना आणि तात्कालिक शक्यतांपुरतेच संकुचित नसून द्रष्टेपणाने भविष्यालाही जवळ आणणारे असे राहिले तर भारत आपल्या उदाहरणाद्वारे धीमा-भीरूतापूर्ण विकास आणि जलद - साहसी विकास यातील मोठा फरक दाखवू शकेल. जे कार्य सुरू आहे, त्यात मोठी संकटे येऊन ती अडथळे निर्माण करू शकतात. किंवा ते कार्य नष्टही करू शकतात. पण तरीही अंतिम परिणाम निश्चित आहे. कारण एकता ही प्रकृतीची, निसर्गाची आवश्यकता आहे, अनिवार्य अशी गती आहे. एकतेची आवश्यकता अन्य राष्ट्रांसाठीही तितकीच आहे, कारण हिच्याशिवाय छोट्या - छोट्या देशांच्या स्वातंत्र्यावर केव्हाही गदा येऊ शकते आणि मोठ्या व शक्तिशाली राष्ट्रांचेही जीवन असुरक्षित बनू शकते. म्हणून या एकतेमध्येच सर्वांचे हित सामावलेले आहे. या एकतेला केवळ माणसांचा दुबळेपणा व मूर्ख अशी स्वार्थीवृत्तीच फक्त विरोध करू शकते. पण हा विरोधही प्रकृतीच्या आवश्यकतेविरूद्ध आणि ईश्वराच्या इच्छेविरूद्ध सदैव उभा राहू शकत नाही. परंतु एक बाह्य आधार पुरेसा नाही, अंतरराष्ट्रीय विचार आणि दृष्टीकोनही विकसित झाले पाहिजेत. अंतरराष्ट्रीय फॉर्म्स आणि संस्थाही निर्माण झाल्या पाहिजेत. कदाचित अशा प्रकारची प्रगतीही झाली पाहिजे. उदाहरणार्थ दोन किंवा अनेक देशांचे एकाचवेळी नागरिक बनणे, विविध देशांची एकमेकांमध्ये स्वेच्छेने सांस्कृतिक देवाण-घेवाण करणे, स्वेच्छेने एकमेकात मिसळणे. त्यावेळी राष्ट्रीयतेला आपले खरे स्वरूप कळेल आणि ती आपली युद्धप्रियता सोडून देईल आणि तेव्हा ती आत्मसंरक्षण व अखंडतेच्या दृष्टीला विसंगत समजणार नाही. एकतेची एक नवी भावना लोकांवर राज्य करेल.

चौथे स्वप्न - जगाला भारताची अध्यात्मिक देणगी, जी देण्याचे कार्य आधीच सुरू झाले आहे. भारताची अध्यात्मिकता युरोप आणि अमेरिकेत सतत वाढत्या प्रमाणात प्रवेश करीत आहे. हे आंदोलन वाटेल; वर्तमानातील संकटांमध्ये अधिकाधिक लोक भारताकडे आशेने पहात आहेत. केवळ त्यांच्या शिकवणुकीसाठी नाही तर अध्यात्मिक साधनेचाही उत्तरोत्तर आश्रय घेतला जात आहे.


शेवटचे स्वप्न होते - उत्क्रांतीमधील पुढचे पाऊल मानवाला एका उच्चतर आणि विशालतर चेतनेमध्ये घेऊन जाईल आणि त्या सर्व समस्यांची उत्तरे शोधायला सुरवात करेल. जेव्हांपासून त्याने वैयक्तिक पूर्णता व समाजाची पूर्णता याविषयी विचार करण्यास प्रारंभ केला तेव्हा त्याला ज्या समस्यांनी त्रस्त केले, त्या समस्यांची तो उत्तरे शोधायला सुरवात करेल. हे अजून सारे वैयक्तिक आशा, विचार आणि आदर्श मात्रच आहे, ज्याने भारत आणि पश्चिम ह्या दोन्ही ठिकाणच्या द्रष्ट्या विचारवंतांना समजून घेणे सुरू केले आहे. ह्या मार्गातील अडथळे हे प्रयत्नांच्या अन्य कोणत्याही क्षेत्रांपेक्षा अधिक कठीण आहेत. पण संकटे ही पार करण्यासाठीच असतात आणि जर दिव्य परम इच्छाशक्ती सोबत असेल तर ती संकटे दूर होणारच. इथेही या विकासाला घडायचे असेल, तर ते आत्मा आणि अंर्तचेतनेच्या अभिवृद्धीद्वारेच होईल. याचा प्रारंभ भारतवर्षच करू शकतो. जरी या विकासाचे क्षेत्र सार्वभौम असले तरी केंद्रीय आंदोलन भारतच करील.

हे आहेत ते विचार आणि भावना ज्यांना मी भारतीय स्वातंत्र्याच्या तिथीबरोबर संलग्न करतो. या आशा योग्य ठरतील का, किंवा त्या कुठवर योग्य सिद्ध होतील, ही गोष्ट नवीन आणि स्वतंत्र भारतावर अवलंबून आहे.

■ ■ ■

श्रीअरविंदांच्या शब्दांत-

''अजूनही दिव्य सत्य वाढेल व सुसंवाद विकास पावेल.
एक दिवस असा येईल की, माणसांना जवळीक आणि
एकात्मता वाटू लागेल.
तोपर्यंत पुढे टाकलेले प्रत्येक पाऊल म्हणजे
कोणता ना कोणता लाभच होय.
कारण पृथ्वीच्या धूसर आत्म्याला
दिव्य प्रकाशात जाग येईतो,
तीला अंशाअंशाने दिव्य लोकांसमोर खुले झालेच पाहिजे''



उत्तरपारा भाषण

श्रीअरविंदांच्या संग्रहीत लेखनामधून...

श्रीअरविंदांनी ३० मे १९०९ रोजी उत्तरपारा येथे 'धर्मरक्षिणीसभे'-समोर केलेल्या भाषणाचा हा गोषवारा. अलीपूरच्या तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी केलेले हे पहिले भाषण, ज्यात त्यांनी कारावासात त्यांना आलेले आध्यात्मिक अनुभव वर्णन केले आहेत, तसेच खऱ्या राष्ट्रप्रेमाचा संदेशही दिला आहे. हिंदुधर्म, सनातनधर्म याची व्याख्या केली आहे, ज्याची आज सर्वांनाच गरज आहे. त्यांच्या जीवनाला जी कलाटणी मिळाली तिची ओळखही या भाषणातून होते.

''तुमच्या संस्थेच्या वार्षिक समारंभाच्या वेळी भाषण करण्याविषयी जेव्हा मला आमंत्रित करण्यात आले, तेव्हा हिंदूधर्माविषयी दोन शब्द सांगावे, असा माझा विचार होता. पण तो विचार तडीस जाईल की नाही हे मी सांगू शकत नाही. कारण इथे आल्यावर माझ्या मनाला एक संदेश मिळाला. तो तुम्हाला आणि साऱ्या भारत देशाला मला सांगायचा आहे. हा संदेश मला प्रथम तुरुंगात ऐकू आला आणि आता तोच माझ्या देशबांधवांना सांगण्यासाठी मी तुरुंगाच्या बाहेर आलो आहे.

ज्यावेळी मला अटक करून घाईघाईने लालबाजार पोलीस ठाण्यात नेण्यात आले, माझी श्रद्धा क्षणभरासाठी डळमळली. कारण त्यावेळी मला ईश्वरी इच्छेचे मर्म कळले नव्हते. मी देवाचा धावा करू लागलो, त्याला मनातल्या मनात विचारू लागलो, ''हे काय झाले? माझा विश्वास होता की देशवासियांकरिता मला काही विशेष कार्य करायचे आहे व ते कार्य पार पडेपर्यंत तू माझे रक्षण करशील. मग मला इथे का आणले गेले? माझ्यावर असे आरोप का लावले गेले?'' एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तीन दिवस गेले आणि माझ्या आतून मला एक आवाज ऐकू आला, ''शांत रहा आणि पहा काय होत आहे ते !'' मी शांत झालो व प्रतीक्षा करू लागलो. मला लालबाजार ठाण्यातून अलीपूरच्या तुरूंगात नेण्यात आले.

अलीपूरच्या तुरूंगात मला एक महिन्यासाठी लोकांपासून दूर निर्जन कालकोठडीमध्ये ठेवण्यात आले. मी ईश्वराचा आवाज ऐकण्यासाठी चातकासारखी वाट पाहिली आणि त्यावेळी मला आठवण झाली. अटक होण्याअगोदरच सुमारे महिनाभर आधी मला आतून एक आदेश मिळाला होता की, सारी कामे बाजूला सारून मी एकांतवासात जावे. आत्मशोध घेऊन ईश्वराच्या अधिक संपर्कात जाण्याचा प्रयत्न करावा. पण मी दुबळा होतो. या आदेशाचे पालन करू शकलो नाही. माझे कार्य मला प्रिय होते. मनात एक गर्व होता की मी नसलो तर देशकार्याचे नुकसान होईल, ते बंद पडेल म्हणून माझ्याने ते सोडवेना. आता मला अशी जाणीव झाली की ईश्वर मला म्हणतो आहे, ''जी बंधने तोडण्याची शक्ती तुझ्यात नव्हती, त्यांना मी तोडून टाकले आहे. कारण तुझे हे कार्य चालू रहावे, अशी माझी इच्छा नाही. तुझ्यासाठी मी वेगळे कार्य नियोजित केले आहे आणि त्यासाठीच तुला मी इथे आणले आहे. त्या कार्यासाठी तुला मी इथे तयार करणार आहे.'' त्यानंतर ईश्वराने माझ्या हातात भगवद्गीता दिली. गीतेचा अभ्यास करण्यासाठी मला शक्ती देऊन समर्थ बनविले. मला आता केवळ बुद्धीने नाही तर अनुभूतीने जाणून घ्यायचे होते की श्रीकृष्णाची अर्जुनाला कोणती शिकवण होती, ईश्वरी कार्य करण्याची ज्यांची इच्छा असते, त्यांच्याकडूनही श्रीकृष्णाला काय हवे असते? अर्थात् द्वेष, वासना, कामना इत्यादीतून मुक्त होणे व ईश्वरासाठी निष्काम कर्म करणे. स्वतःच्या इच्छेचा, स्वार्थाचा त्याग करून, ईश्वराच्या हातचे एक साधन बनून ईश्वरी कार्य करीत रहाणे. उच्च आणि नीच, मित्र व शत्रू, यश व अपयश – या सगळ्याकडे समदृष्टीने पहाणे आणि असे सर्व करताना, कुठेही आपल्या कार्यात अडथळाही होता कामा नये. त्यावेळी मला हिंदुधर्म म्हणजे काय याचे ज्ञान झाले. इतर धर्म व्रत, दीक्षा, विश्वास, मान्यता यांना महत्त्व देतात, पण सनातन धर्म स्वयं जीवन आहे. अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी प्राचीन काळापासून एकांतवासात जपला गेला आहे. याच धर्मासाठी भारताचे उत्थान होत आहे. भारतवर्ष दुसऱ्या देशाप्रमाणे केवळ स्वतःकरिता शक्तिशाली होणारा किंवा दुसऱ्यांना नष्ट करण्यासाठी उभा रहाणारा नाही. भारताचे उत्थान हे साऱ्या विश्वाला सनातन प्रकाश देण्यासाठी आहे.

देवाने मला दुसरी गोष्ट दाखविली – हिंदुधर्माचे मूलतत्त्व – सत्य – सत्याचा साक्षात्कार घडविला. माझ्या काळकोठरी समोरील झाड, त्याच्या फांद्या म्हणजे श्रीकृष्णच हात पसरून माझ्यावर सावली धरतो आहे, अशी प्रचीती येऊ लागली. पहारेकऱ्यात वासुदेव दिसू लागला. माझे अंथरूण म्हणून असलेली जाडीभरडी कांबळ म्हणजे माझा सखा, माझा प्रिय कृष्ण मला आपल्या बाहुपाशात घेत आहे, असे वाटू लागले. तुरुंगातले चोर-दरोडेखोर कैदीही वासुदेवच भासू लागले.

कोर्टात खटला सुरू झाला. त्यावेळी माझ्या आतून पुन्हा आवाज

आला, ''ज्यावेळी तुला अटक झाली, त्यावेळी हताश होऊन मला विचारीत होतास ना की, 'हे काय झाले? कुठे गेले तुझे संरक्षण?' घे, आता त्या जज्जसाहेबाकडे पहा, त्या सरकारी वकीलाकडे पहा' मी जज्जसाहेबाकडे पाहिले तर त्यांच्या खुर्चीत स्वयं वासुदेव, नारायण बसले होते. सरकारी वकिलाकडे पाहिले तर तिथे वकील नव्हताच, साक्षात् श्रीकृष्ण माझ्याकडे पाहून स्मितहास्य करीत होता. आतून आवाज आला, ''आता भीती वाटते का? अरे, सर्व माणसात मीच आहे. त्यांच्या सर्व कार्यावर व शब्दांवर माझेच नियंत्रण आहे. तुझ्यावरचा हा खटला माझ्यावर सोपव. तुला मी इथे खटल्यासाठी नाही, दुसऱ्याच कामासाठी आणले आहे.''

मग मी तो खटला, त्याची चिंता सारे काही श्रीकृष्णाच्या हाती सोपविले आणि न घडणाऱ्या घटना घडल्या. माझे वकीलपत्र श्री. चित्तरंजनदास यांच्याकडे गेले. त्यांनी रात्र-रात्र जागून मला वाचविण्यासाठी काम केले, खटला झाला, त्याचा निकालही तुम्हाला माहीतच आहे. मी निर्दोष ठरलो. पण मला आतून सतत एक आवाज आदेश देत होता, ''घाबरू नकोस. मी तुला रस्ता दाखवितो आहे. जे काही करतो ते मी करतो आहे, तू किंवा अन्य कुणी नाही. लक्षात ठेव, कितीही संकटे येऊ देत, दु:ख-कष्ट वाट्याला येऊ देत. असंभव कठीण असे काहीच नाहीये. हा देश आणि त्याचे उत्थान यात मीच आहे. मी वासुदेव आहे, मी नारायण आहे. जे काही होईल ते माझ्याच इच्छेने होईल.''

प्रथम माझ्या मनात खूप शंका होत्या. माझे पालन-पोषण सारे इंग्लंडमध्ये परदेशात झाले होते. त्यामुळे हिंदुधर्मातील बऱ्याच गोष्टी मला कपोलकल्पित वाटत असत. पण आता हिंदुधर्माचे सत्य माझ्या मनात, प्राणात, शरीरात अनुभवाला आले. प्रथम देवाजवळ मी पूर्ण भक्तिभावानेही गेलो नव्हतो की ज्ञानमार्गी म्हणून गेलो नव्हतो. एक नास्तिकता, साशंकता मनात होती. त्यामुळे त्यावेळी ईश्वराची कोणतीही अनुभूती मला मिळाली नाही. पण तरीही काही असे होते की ज्यामुळे मी वेद-गीता-हिंदुधर्म आणि त्यांची सत्यता याकडे आकर्षिला गेलो. त्यावेळी मला असे वाटले की या योगामध्ये काही महाशक्तिशाली असे सत्य निश्चितपणे आहे. वेदांतावर आधारित या धर्मामध्ये परम सत्य खात्रीने वसलेले आहे. योगाभ्यास करतानाही मी देवाजवळ हीच प्रार्थना करीत होतो, ''हे देवा, तुला माहीत आहे, मला मुक्ती नको आहे, स्वत:साठी काहीच नको आहे. पण माझ्या प्रिय देशबांधवांसाठी कार्य करण्याची मला शक्ती दे.''

पुढे कारागृहातील या एक वर्षाच्या एकांतवासात मला संदेश मिळाला, ''ज्या हिंदू धर्माविषयी तुला संदेह होता, त्या धर्माची सत्यता बघ. हा धर्म मी ऋषी, मुनी व अनेक अवतारांकडून विकसित केला व परिपूर्ण बनविला. ज्यावेळी भारताची उन्नत्ती होईल त्यावेळी या धर्माचीही उन्नत्ती होईल. मी तुला दाखवून दिले की मी सगळीकडे व्याप्त आहे. मी या आंदोलनात आहे. तसाच आंदोलनाला विरोध करणाऱ्या लोकांतही मीच आहे. लोकांना काहीही वाटो, पण त्यांच्याद्वारा कार्य करणाराही मीच असतो. या उत्थानाची तयारी मी दीर्घ काळापासून करीत आहे. पण आता वेळ आली आहे की हे कार्य मी पूर्णत्वाला नेईन.''

हाच ईश्वरी संदेश मला तुम्हाला सांगायचा होता. तुमच्या संस्थेचे नाव आहे 'धर्मरक्षिणी सभा'. धर्माचे रक्षण, हिंदुधर्माचे साऱ्या विश्वामध्ये संरक्षण करण्याचे कार्य आमच्यासमोर आहे. पण हा हिंदुधर्म म्हणजे काय आहे? ज्याला आम्ही सनातन धर्म म्हणतो तो काय आहे? समुद्र आणि हिमालय यांनी वेढलेल्या या द्वीपांमध्ये एकांतवासात हा धर्म फुलला आहे. या पवित्र, प्राचीन भूमीवर दीर्घ काळ आर्यांनी या धर्माचे रक्षण केले. तरीही हा धर्म एका देशामध्ये बंदिस्त नाहीये. कारण ज्याला आम्ही हिंदुधर्म म्हणतो तो वास्तवात सनातन धर्म आहे. कारण तोच विश्वव्यापी धर्म आहे. केवळ हाच धर्म अन्य धर्मांनाही आलिंगन देतो. याच धर्मात विज्ञान, त्याचे आविष्कार आणि तत्त्वज्ञानाचे चिंतन मिळून जडवादावर विजय प्राप्त केला जाऊ शकतो. प्रत्येक माणसामध्ये, प्रत्येक जीवामध्ये, प्रत्येक कणामध्ये ईश्वराचे अस्तित्व मान्य केलेले आहे – अशा अन्य धर्मांनाही हा आपलेसे करतो. हाच एक धर्म आहे जो हे सत्य केवळ समजणे आणि त्यावर विश्वास ठेवणे यात मदत करीत नाही तर या सत्याची अनुभूती आपल्या कणाकणात देण्यातही मदत करतो. केवळ हाच धर्म साऱ्या जगाला दाखवितो की हा संसार म्हणजे वासुदेवाची लीला आहे ! या लीलेमध्ये आपण आपली भूमिका कशी जास्तीत जास्त चांगली करू शकतो, त्याचे सूक्ष्मातिसूक्ष्म नियम कोणते आणि महत्तम तत्त्वज्ञानही कोणते हेही फक्त हाच धर्म सांगू शकतो. जीवनातील प्रत्येक छोटीशी गोष्टही या धर्मापासून भिन्न नाही. अमरत्व म्हणजे काय आणि मृत्यूचे भय म्हणजे केवळ भ्रम आहे हे सांगणारा कोणता धर्म असेल तर तो हिंदुधर्मच होय.

आज मला जे सांगायचे होते ते बाजूला ठेवून माझ्या तोंडून जो ईश्वराचा संदेश सांगितला जायचा होता, तो माझ्याकडून तुम्हाला सांगितला गेला. अशाच योगयुक्त स्थितीत मी पूर्वी एकदा सांगितले होते की, सध्याचे हे आंदोलन खरे राजकीय आंदोलन नव्हे, तर तो एक श्रेष्ठ प्रतीचा धर्म आहे, ती एक निष्ठा आहे, जन्मभर चालण्याचा तो एक शाश्वत मार्ग आहे. त्याच म्हणण्याची आज मी जरा वेगळी मांडणी करतो. ज्याला आपण सनातन धर्म म्हणतो, तोच आपला राष्ट्रधर्म आहे; असे मी म्हणतो. सनातन धर्म तर हिंदूंना जन्मजात मिळालेला आहे. जेव्हा या धर्माचे उत्थान होते तेव्हा जनतेचाही विकास होतो आणि जेव्हा या धर्माचा ऱ्हास होतो तेव्हा हिंदूंचाही ऱ्हास होतो आणि जर सनातन धर्माचा विनाश शक्य असता तर हिंदूंचाही विनाश झाला असता. सनातन धर्मच राष्ट्रधर्म आहे. हाच तो संदेश आहे, जो मला तुम्हाला सांगायचा होता.

■ ■ ■

जगाच्या इतिहासात श्रीअरविंद ज्याचे प्रतिनिधित्व करतात
ती शिकवण नाही, तो साक्षात्कारही नाही,
तर ती थेट सर्वोच्च भगवत् चेतनेद्वारे होणारी
निर्णायक कृती आहे / होय.

। श्री माँ ।



श्री अरविंद वंदना
प्रार्थना (करुणाघना, जगज्जीवना)

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम. बी. एड.
सेवानिवृत्त शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय

ॐ तत्सद् श्रीनारायणा,
करुणाघना, जगज्जीवना!
जलस्थल अशी स्थिरव्यापक,
सत्संरक्षक दुष्टविनाशक,
मानवधर्मा, तू प्रतिचालक
अद्भुत जनकहि तू जगचालक!
दीपस्तंभ तू! तू भवतारक!
करुणाघना, जगज्जीवना!
तुझ्या करातिल मानव साधन,
परिसस्पर्श तू! धृति-उत्थापन!
अव्यक्ताची अभिव्यक्ति दे।
भौतिकाच्या अस्तित्वातही!
दिव्य मानवी जीवन होवो
सत्यचेतना शक्ति येवो ।।
करुणाघना, जगज्जीवना!
अधिमानस अन् अतिमानसही
येईल निश्चित पृथ्वीवरती
पूर्णयोगी गुरूकृपा निरंतर
श्री अरविंदा विनम्र वंदन!
विनम्र वंदन! विनम्र वंदन!!
।। तस्मै श्री गुरवे नमः ।।
।। हरिॐ तत् सत् ।। ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

■■■

पूर्णयोगाची साधना



श्रीमती प्रज्ञा सुखटणकर

योगी अरविंद शिकवणीच्या साधक

आत्मतत्त्वाला परतत्त्वाशी जोडणे (युज्) हे योगाचे सर्वसाधारण उद्दिष्ट असते. तत्त्वज्ञानातील प्रत्येक गोष्ट स्वत: पडताळून पाहणे, त्यातील प्रत्येक शब्दाचा, प्रत्येक सिद्धांताचा, प्रत्येक टप्प्याचा स्वत: अनुभव घेणे हे योगाच्या अंतर्गत येते. त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जी पद्धती मांडण्यात आलेली असते त्यानुसार अंतर्बाह्य आचरण करण्याची प्रक्रिया म्हणजे योगसाधना आणि त्या दिशेने जी व्यक्ती प्रयत्नशील असते ती त्या योगमार्गाची साधक होय.

पूर्णयोगाचे उद्दिष्ट : साधकाला **परमेश्वराविषयीचे संपूर्ण ज्ञान** प्राप्त होणे, त्याने परमेश्वराची प्रत्यक्ष भेट घेणे, त्याच्याशी अभेद अनुभवणे हे पूर्णयोगाचे उद्दिष्ट आहेच. त्याचबरोबर ते याहूनही अत्यंत व्यापक आहे. साधकाच्या **आंतरिक जाणिवेचे परिवर्तन** होणे यासाठीची प्रक्रिया पूर्णयोग सांगतो. साधकाच्या चेतनेमध्ये उत्तरोत्तर बदल घडत जाऊन ती रूपांतरित होत जावी व त्यायोगे अखेरीस त्याच्या अस्तित्वाला व चेतनेला संपूर्ण साफल्य प्राप्त व्हावे हा उद्देश आहे आणि त्यायोगे त्याच्या वैयक्तिक प्रवृत्तींमध्ये बदल घडत जाऊन अखेरीस त्याचे ह्या **पृथ्वीवरचे जीवन संपूर्णपणे निर्दोष व परिपूर्ण व्हावे** हाही उद्देश आहे. म्हणजेच, निर्वाण अथवा मोक्ष हे पूर्णयोगाचे अंतिम ध्येय नाही. साधनेचे फलित म्हणून काहींना ते प्राप्त होऊही शकते, परंतु पूर्णयोगाचा साधक तेथे थांबू शकत नाही. कारण हा योग **संपूर्णपणे जीवनाभिमुख** आहे. जसजशी साधना होईल तसतसे पृथ्वीवरचे जीवन बदलत गेले पाहिजे, परमेश्वरप्राप्तीचा परिणाम म्हणून ते अधिकाधिक प्रमाणात सत्यं-शिवं-सुंदरम् होत गेले पाहिजे, समृद्ध होत गेले पाहिजे आणि अखेरीस ह्या **पृथ्वीवर दिव्य जीवन स्थापन** झाले पाहिजे त्यासाठी पूर्णयोगाचे सगळे प्रयास आहेत.

साधनापद्धतीची कक्षा : पूर्णयोगाचे उद्दिष्ट हे **मानवाशी समग्रपणे निगडित** आहे, त्यामुळे त्याच्या साधनापद्धतीच्या कक्षेमध्ये देखील त्या सर्व गोष्टींचा समग्रपणे अंतर्भाव झाला पाहिजे. त्याकरिता साधकाने प्रथम आपले **मन पूर्णपणे अंतर्मुख** केले पाहिजे. त्याची बंद दारे उघडून स्वत:ला **खुले** केले पाहिजे, रिक्त केले पाहिजे, की ज्यायोगे आपण ती जागा परमेश्वराच्या **स्वीकृतीसाठी देऊ** शकू आणि असे करीत असताना त्याने आपले मन, इच्छाशक्ती, हृदय, प्राणशक्ती, शरीर हे सर्वकाही, आपल्या सर्वात आतल्या आंतरिक अस्तित्वापासून ते सर्वात बाह्य अस्तित्वापर्यंतचे सर्वकाही, आपल्या जाणीवयुक्त मनाच्या सर्वात खालच्या अचेतन थरांपासून ते सर्वात उच्च जाणिवेच्या थरांपर्यंतचे सर्व स्तर इ. आपल्या अस्तित्वाचे सर्व घटक त्याने खुले व रिक्त करून परमेश्वराला स्वत:चे आत्मदान केले पाहिजे. त्याने हे सर्वकाही **साधन** म्हणून वापरले पाहिजे, ते त्याच्या **अनुभूतीचे व रूपांतराचे समग्र क्षेत्र** असले पाहिजे, त्या **प्रत्येक घटकाचा ह्या प्रक्रियेमध्ये सहभाग** असला पाहिजे. म्हणजे मग त्याठिकाणी, परमेश्वराच्या कृपाप्रसादामुळे दैवी चेतना वृद्धिंगत होत जाईल व त्या तेजाने उजळून निघून त्याची संपूर्ण चेतना व सर्व प्रवृत्ती ह्यांचे **दिव्य चेतना व प्रवृत्तींमध्ये रूपांतर** होईल.

पूर्णयोगाचे क्षेत्र : पूर्णयोगाची साधना **व्यक्तीबरोबरच संपूर्ण विश्वाच्या पातळीवरून** चालते. सर्व अचेतन व सचेतन जगत्, सर्व वनस्पती, कीटक, पक्षी, प्राणी, सर्व मानव, सर्वच सृष्टी परस्परांशी विशिष्ट जाणिवेने जोडलेली असून एकसंध असते. परस्परांवर परिणाम करत असते. कशाचीही परस्परांपासून फारकत करता येत नाही. प्रत्येक मानव हा संपूर्ण मानवजातीशी दृश्य व अदृश्यपणे जोडलेला असतो. पूर्णयोग हा **मानवाच्या व पर्यायाने विश्वाच्या उत्क्रांतीशी संबंधित** आहे. त्यामुळे साधकाला समाजाबरोबर मार्गक्रमण करावे लागते. कारण हा योग **संपूर्ण मानवजातीच्या चेतनेच्या उत्क्रांतीचा** आहे. पृथ्वीच्या चेतनेच्या उत्क्रांतीचा वरच्या दिशेने प्रगत होत जाणारा चढ संपलेला नाही आहे आणि **मानवी मन हे काही त्याचे अखेरचे शिखर नव्हे.** पृथ्वीच्या सध्याच्या मानसिक जाणिवांच्या उत्क्रांतीमधून त्यांचे अतिमानसिक चेतनेमध्ये रूपांतर करण्यासाठी अतिमानसाचा प्रकाश पृथ्वीवर आणणे, स्थापन करणे व कार्यरत करणे ह्यासाठी श्रीअरविंदांनी साधना केली. भगीरथाने आपल्या प्रयासांनी पृथ्वीवर गंगेचे अवतरण केले आणि शिवशंकरांनी ती आपल्या मस्तकी धारण करून पृथ्वीवर क्रमश: पाठवली. अतिमानसाच्या तेजाची गंगा पृथ्वीवर अवतीर्ण करण्याच्या बाबतीत श्रीअरविंदांनी भगीरथाचे व शिवशंकराचेही कार्य केले.

पूर्णयोगाची दुहेरी प्रकिया : पूर्णयोगाच्या साधकाची प्रक्रिया ही देखील **आरोहण व अवरोहण** ह्या दोन्ही दिशांनी कार्य केल्यावरच पूर्ण होते. साधकाने आपल्या आरोहणाद्वारे अगदी निर्वाणापर्यंत पोहोचण्याचा

किंवा परमेश्वराशी तादात्म्य पावण्याचा सर्वोच्च अनुभव घेतला, तरीही **त्या ब्रह्मतत्वामध्ये विलीन होणे किंवा त्या ब्रह्मानंदात रममाण होणे येथे तो थांबू शकत नाही.** त्याने तो ब्रह्मानंद घेऊन अवतरण केले पाहिजे व तो आनंद ह्या पृथ्वीवरील जीवनात आणला पाहिजे; **तेव्हाच हा योग सिद्ध होईल.**

श्रीअरविंदांनी अत्यंत बारकाव्याने हे सारे विश्लेषण केलेले असून साधक आपल्या मनाच्या एकाग्रतेमध्ये ह्याच्या प्रत्येक टप्प्याचा अनुभव आपल्या आंतरिक चेतनेमध्ये घेऊ शकतो. आपल्या अहंकाराचे निर्मूलन करत व आत्मशुद्धी करत परमेश्वराशी ऐक्य साधण्याच्या प्रयत्नात तो उन्नत होत जातो, आरोहण करत जातो आणि त्याद्वारे प्राप्त होणारे ज्ञान, प्रकाश, आनंद घेऊन तो खाली येतो, अवरोहण करतो; आपल्या मन, प्राण, शरीर इ. घटकांच्या चेतनेमध्ये बदल घडणे आणि आपले व आपल्या सभोवतालचे जीवन अधिक ज्ञानमय, अधिक आनंदमय, अधिक प्रेममय होणे यामध्ये त्याचे उपयोजन होते. अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने साधकाची चेतना एकेक पायरी वर चढते, विकास पावते.

यासाठी अर्थातच, आपल्याला प्राप्त झालेले जीवन स्वीकारून त्यातील प्रत्येक गोष्ट व घटना, आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण व आपल्या स्वत:च्या अस्तित्वाचा प्रत्येक घटक यांना सामग्री म्हणून तो वापरतो.

दिव्य मातेचे सामर्थ्य[१] : ज्या व्यक्तीला पूर्णयोगाची साधना करावयाची आहे तिने प्रथम ईश्वर-शक्ती किंवा पुरूष-प्रकृतीचे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे. तसेच तिला हेही माहीत असायला हवे की अज्ञान, ढोंगीपणा, मृत्यू नि दु:ख असणाऱ्या ह्या जगात सत्य, प्रकाश, दिव्यजीवन व अमरत्वाचा आनंद आणण्याचे हे जे कार्य करावयाचे आहे, ते कोणतेही मानवी प्रयास अथवा तपस्या एकट्याने करू शकत नाहीत. **दिव्य मातेचे सामर्थ्यच केवळ हे कार्य करू शकते** आणि म्हणूनच, जी व्यक्ती पूर्णयोगाकडे आकृष्ट झालेली आहे, तिच्यासाठी दोन पायऱ्या अत्यंत महत्वाच्या व आवश्यक अशा आहेत. त्या म्हणजे, तिला **दिव्य जीवनाची आकांक्षा असली पाहिजे,** ओढ लागली पाहिजे; आणि त्यासाठी तिने **दिव्य मातेला शरण गेले पाहिजे,** तिचे कृपार्थी झाले पाहिजे. तेव्हा मग, खालून वरच्या दिशेला उत्कट हाक मारणारी अभीप्सा आणि तिला वरून प्रत्युत्तर देणारी सर्वश्रेष्ठ कृपाशक्ती ह्यांची ही साद-प्रतिसादात्मक प्रक्रिया सुरू होऊ शकते. ह्याचे कारण असे आहे की, ह्या विश्वामध्ये जे जे काही घडत असते, त्या प्रत्येकाच्या मागे दिव्यत्व असते, आणि ते आपल्या शक्तीद्वारे, म्हणजेच सृजनात्मक अशा श्रेष्ठ चेतनेद्वारे त्या कृती घडवून आणत असते आणि साधक हा त्या दिव्य शक्तीचा आधार असतो. तो आधार ज्यावेळेस त्या दिव्य शक्तीचा स्वीकार करण्यासाठी स्वत:ला खुले करतो, तेव्हा मग तेथे प्रकाश, सामर्थ्य, ज्ञान, चेतना व आनंद ह्या **दिव्य प्रवाहांचा वर्षाव करणे आणि त्या साधकामार्फत आपली साधना करणे** हे त्या दिव्य मातेला शक्य होते.

साधकाचे प्रयत्न[२] : आणि म्हणूनच, पूर्णयोगाची जाणीवपूर्वक साधना करणाऱ्या व्यक्तीने आपण हा वर्षाव स्वीकारण्यास अनुकूल व पात्र ठरावे यासाठी, आपण स्वत: हेच **मंदिर स्वच्छ व पवित्र ठेवणे** हे त्याचे कर्तव्य ठरते. त्याचप्रमाणे, साधकाने आपण स्वत: हे साधन आहोत हे जाणून त्याद्वारे सातत्याने काही विशिष्ट कष्ट घेणे आवश्यक ठरते. त्यामध्ये सर्वप्रथम ज्या तिहेरी कष्टांचा अंतर्भाव होतो, ते म्हणजे **अभीप्सा, अस्वीकार व समर्पण.** अभीप्सा म्हणजे परमेश्वराची व दिव्य जीवनाची प्राप्ती याविषयी असणारी तीव्र इच्छा, दृढ संकल्प, आर्त तळमळ व नित्य ध्यास. अस्वीकार म्हणजे सत्याशी वैर राखणाऱ्या, अदैवी बाबींचा तसेच प्रकृतीच्या कनिष्ठ दर्जाच्या हालचाली व चलनवलनांचा अस्वीकार करणे, त्यांचा संपूर्ण परित्याग करणे, त्यांना ठाम नकार देऊन दूर हाकलून देणे, त्यासाठी झुंजारपणे लढणे. समर्पण म्हणजे आपल्या अस्तित्वाचे सर्व घटक, आपल्या जाणिवांचे सर्व स्तर, आपल्या आयुष्याचे सर्व क्षण व आपल्या जीवनाच्या सर्व हालचाली या सर्व दिव्यत्वाच्या कारणी लावणे व त्याद्वारे फक्त दिव्यत्वालाच शरण जाणे; हीच यज्ञीय आहुती आहे ह्याचे भान ठेवणे.

हे तिहेरी प्रयत्न करत असताना आणि हा संघर्ष करत असताना साधकाला दिव्य मातेचे प्रेम, कृपा व सरंक्षण प्राप्त होण्याची नेहमीच गरज असते. त्यासाठी त्याने **स्वत:वर जागता पहारा** ठेवून ह्या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे की आपली परमेश्वरावरची **श्रद्धा** ही ठाम, अविचल, निर्दोष व परिपूर्ण आहे ना, त्यात आपल्या क्षुद्र अहंकार व स्वार्थाची भेसळ झालेली नाही ना. आपल्यामध्ये मिसळणारा अशुद्धपणा हुडकून काढून त्याचे निर्मूलन करण्यासाठी आपण **जागरूक** व **लवचिक** राहून **प्रामाणिक** प्रयत्न करतो आहोत ना. फलाची अभिलाषा न धरता व हातचे काहीही राखून न ठेवता आपण सर्वकाही दिव्यत्वालाच **नि:शेषपणे समर्पित** करतो आहोत ना.

यासाठी साधकाने आपल्या मनाचे नव्हे तर **अंतरात्म्याच्या सत्याचे अनुसरण** करणे आवश्यक असते. तर त्याला प्रतिसाद हा मिळतोच. मात्र त्याने स्थिर व अचंचल राहून समतेच्या वृत्तीने ग्रहणशील राहिले पाहिजे व त्याचा यथोचित विनियोगही केला पाहिजे. रूपांतरप्रक्रियेसाठी अंतरात्मा खुला करता येणे हे सर्वात महत्वाचे आहे.

शास्त्र, उत्साह, गुरू व काल ह्यांचे सहाय्य : पूर्णयोगाची सिद्धी प्राप्त होण्यासाठी साधकाला चार गोष्टींच्या सहाय्याची गरज असते. शास्त्र, उत्साह, गुरू व काल[३]. पूर्णयोगाचे **शास्त्र** हे वेदातील चिरंतन सत्यांच्या ज्ञान, सामर्थ्य, सूत्रे, पद्धती व अनुभूतींपासून सुरू होते. त्यासंबंधीचे संपूर्ण विवेचन श्रीअरविंदांनी आपल्या विस्तीर्ण ग्रंथसंपदेमधून व पत्रोत्तरांमधून सविस्तर व सर्व बारकाव्यानिशी केलेले आहे. आणि त्यातील असंख्य बाबींचे स्पष्टीकरण श्रीमाताजींनी आपल्या प्रश्नोत्तरांमधून केलेले आहे. ह्या शास्त्रावर विसंबून अतिशय धैर्याने, चिकाटीने व पुन:पुन्हा प्रयत्नशील राहण्याचा **उत्साह** राखणे हे साधकाचे काम असते. साधकाला **गुरूची** नितांत आवश्यकता ही असतेच. ह्या जगताचा जो स्वामी तोच आपल्या प्रत्येकाच्या अंतरंगात त्या चिदाग्नीचा स्फुल्लिंग अशा स्वरूपात असतो.[४] गुप्त रूपात वसति करणाऱ्या त्या आपल्या स्वत:च्या अंतस्थ मार्गदर्शकावर भिस्त ठेवून साधकाने

शास्त्राधाराच्या सहाय्याने वाटचाल करावयाची असते. त्याचबरोबर, त्या त्या गोष्टींकरिता त्या त्या विशिष्ट कालावधीची गरज असते, तो **काल** साधकाने देणे आवश्यक असते.

स्वधर्म व स्वातंत्र्य : पूर्णयोग हा प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतिधर्माशी सुसंगत असणारा योग आहे. साधकाने आपल्या पिंडाच्या गुणधर्मानुसार **आपला स्वधर्म ओळखून अत्यंत नैसर्गिकपणे** आपली प्रगती करावयाची असते आणि म्हणूनच ही योगपद्धती व्यक्तीला आपल्या मार्गक्रमणाची **दिशा स्वत: ठरविण्याचे स्वातंत्र्य** देते. मूलभूत अटींचे पालन करून व आपल्या आंतरिक मनोवृत्तींचा अभ्यास करून साधकाने आपल्या मर्यादा व कृती स्वत:च ठरवून घ्यायच्या आहेत. आपण आत्ताच्या ह्या क्षणी जेथे व जसे आहोत, तेथून व त्या क्षणापासून आपण ह्या योगाची सुरूवात करू शकतो. जितक्या भिन्न व्यक्ती, तितके ह्या योगाचे भिन्न मार्ग.

सर्वंकष समन्वय : पूर्णयोगाविषयी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. कुंडलिनी जागृती हे ध्येय ठेवणे व खालून वरच्या दिशेने चक्रांचे उद्दीपन करणे ह्याला श्रीअरविंदांनी पूर्णयोगाच्या साधकांसाठी स्पष्ट नकार दिलेला आहे. त्याच्या उलट, साधकांनी दिव्य मातेला शरण जाऊन तिच्या सामर्थ्यप्रवाहाला वरून खाली बोलवावे असे श्रीअरविंद सांगतात, की ज्यामुळे ही साधना पूर्णपणे **बिन धोक्याची** ठरते. साधकाला त्याच्या प्रगतीनुसार ह्या चक्रांच्या उद्दीपनाचे फायदे त्याच्या साधनेअंतर्गत मिळूही शकतात, मात्र त्यासाठी हा क्रम नव्हे वा ते उद्दिष्ट नव्हे.

ही एक बाब वगळता पूर्णयोगामध्ये **अन्य सर्व योगमार्गांच्या वैशिष्ट्यांचा यथोचित सर्वंकष समन्वय** साधला जातो. परमेश्वराप्रत जाण्यासाठी ज्ञान, भक्ती व निष्कामकर्म ह्या तिन्हीतील अनेक गोष्टी उपयुक्त ठरतात. तर हठयोगातील आसने, प्राणायाम इ. चा स्वेच्छेनुसार वापर करून घेऊ शकतो. एकाच वेळी अनेक मार्गांचेही सहाय्य घेऊ शकतो. पूर्णयोगाच्या मूलभूत संकल्पनेचे ज्ञान, दिव्य मातेशी अनुसंधान व उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्न, हे महत्वाचे.

सर्वजण, सर्वकाळी, सर्वजागी : या कारणांमुळे पूर्णयोगाची साधना करणे सर्व व्यक्तींना शक्य होते. यात कोणताही धोका नसल्यामुळे, अंतस्थ मार्गदर्शक जगद्गुरू व्यतिरिक्त अन्य कोणी वैयक्तिक शिक्षक नसला तरी चालू शकते. जीवन सर्वार्थाने जगत असताना करण्याची ही साधना असल्यामुळे, साधकाला संसार सोडून दूर एकांतवासात निघून जावे लागत नाही. जी काही विरक्ती अथवा नियंत्रण मिळवायचे ते सर्व आंतरिक असल्यामुळे, बाह्य जीवनातील गोष्टींचा त्याग अथवा शरीरक्लेश घ्यावे लागत नाहीत. कोणत्याही पारंपारिक पूर्वज्ञानाची आवश्यकता नसल्यामुळे व्यक्ती कोणत्याही देशाची, धर्माची, वंशाची असण्याने किंवा ती कोणत्याही चालीरीती वा सभ्यता पाळत असण्याने काही फरक पडत नाही. पूजा-अर्चा, हवन, प्रार्थना, जप, ध्यान-धारणा यासारख्या गोष्टींपैकी कशाचे, केव्हा, किती सहाय्य घ्यायचे अथवा घ्यायचे नाही, हेही ती व्यक्ती आपल्या उद्दिष्टानुसार ठरवू शकते. परमेश्वराचे अस्तित्व सगुण, निर्गुण अथवा दोन्ही स्वरूपात स्वीकारू शकते. या कारणांमुळे पूर्णयोगाची साधना **सर्वजण, सर्वकाळी** व **सर्वजागी** करू शकतात.

साधकावर कोणत्याही बाह्य परिस्थितीचे बंधन नसते, अथवा विशिष्टच परिस्थिति पोषक आहे, असेही नसते. कारण व्यक्तीने आपल्या आंतरिक चेतनेची अभिव्यक्ती बाह्य जीवनात करत जीवनसंघर्षातून आपल्या चेतनेच्या विकासाचे पुढचे टप्पे गाठायचे असतात. म्हणून ही **चेतनेच्या रूपांतरयोगाची साधना** आहे.

समता, स्थिरता व शांती : यासाठी सर्वप्रथम, मनामध्ये **आंतरिक स्थिर शांतीची स्थापना** केली पहिजे. अन्यथा आपल्याला काही जरी अनुभूती आल्या, तरी त्या कायमस्वरूपी राहू शकणार नाहीत, व दिव्य सामर्थ्यप्रवाहाला आपले रूपांतराचे कार्य करता येणार नाही. काहीही घडले, तरी आपण अत्यंत स्थिर राहणे, अस्वस्थपणा वा खळबळ येऊ न देणे; कोणत्याही परिस्थितीला कणखरपणे, अविचल राहून, धीर धरून व **समतेच्यावृत्तीने** सामोरे जाणे; आपल्या अहंकाराचे दमन करून व कोणत्याही प्रकारची त्रस्त प्रतिक्रिया न देता त्याकडे **साक्षीभावाने** पाहणे, मनाला संतुलित असे स्वास्थ्य व निवांतपणा प्राप्त होणे. यामुळे योगसाधनेसाठी भक्कम पाया तयार होतो, अनुभूती येतात, आंतरिक विकास होऊ लागतो व **सत्य-चेतनेचा प्रवास** सुरू होतो.[५]

यासाठी श्रीमाताजींनी दैनंदिन जीवनात लक्षात ठेवून कराव्यात अशा अनेक युक्त्या-प्रयुक्त्या सांगितलेल्या आहेत. त्यापैकी नित्य नेमाने करावी अशी ही एक छोटीशी क्रिया. काहीही करण्यासाठी पुढे जाण्याच्या अगोदर एक क्षणभर थबका. एक पाऊल मागे घेऊन स्वत:च्या आतमध्ये जा. त्या क्षणार्धात स्वत:च्या जास्तीत जास्त आत जायला शिका. **एक पाऊल मागे आणि तुम्ही सुरक्षित.** एक पाऊल मागे घेतल्याखेरीज कुठेही घाईने जाऊ नका, कोणताही निर्णय घेऊ नका, कोणताही शब्द उच्चारू नका की कोणतीही प्रतिक्रिया देऊ नका. एक पाऊल मागे घ्या आणि आपली आंतरिक शांती ढळू देणे टाळा. हे कायम लक्षात ठेवा की तुम्ही शांत असल्याखेरीज तुम्हाला कधीही दिव्य शक्तीकडून उत्तर मिळू शकणार नाही. अथवा सत्याच्या चलनवलनाचा बोध होऊ शकणार नाही.[६]

आणि जेव्हा आपण कामाच्या धावपळीत नसतो, तेव्हा करण्यासाठी श्रीमाताजींनी सांगितलेली दुसरी एक क्रिया. प्रथम हालचाल न करता बसा आणि इतर अनेक गोष्टींवर विचार करण्यापेक्षा ''शांति, शांति, शांति....'' असे स्वत:शी म्हणत राहा. आणि त्याचवेळी शांतीची कल्पना करा. इच्छा करा. तिने यावे असे मागणे मागा. इतर कोणताही विचार आला तर त्याच्याकडे लक्ष देऊ नका; त्याला झटकून टाका आणि पुन्हा ''शांति, शांति....'' असे म्हणत राहा. काही काळ असे करून आपल्या कामाला लागा. पुन्हा पुढच्या वेळी असेच करा. पुन्हा पुन्हा करायला लागा. सकाळी, दुपारी, रात्री निजताना..... आणि तुमच्या लक्षात येईल की सगळ्या गोष्टींमध्ये शांती प्रवेश करत आहे. ही एक छोटीशी सुरूवात आहे. तुम्ही शांतीशी मैत्री जोडा आणि तिला हाक मारून बोलवा. ''शांति, शांति, ये, ये[७]!''

प्रेम, एकत्व व आनंद : स्वत:मध्ये शांतीची स्थापना करणे

अत्यंत आवश्यक असले, तरीसुद्धा ते अंतिम उद्दिष्ट नव्हे. सर्व योगाचे जे अंतिम उद्दिष्ट आहे, जिवाशिवाचे मीलन होणे, आत्मतत्त्व परमतत्त्वाशी जोडले जाणे व ते दोन्ही परस्परांशी **संपूर्ण एकत्व** पावणे, त्याच्याकरिता, शांतीची स्थापना ही पायाभूत ठरत असते.

आपल्या प्रत्येकाच्या अंतरंगात चिदाग्नीचा स्फुल्लिंग असतो खरा, परंतु आपल्याला त्याचे भान नसते, बोध नसतो, अज्ञान असते. कारण त्याच्यावर असंख्य पुटे चढलेली असतात. ती विविध आवरणे काढून टाकून अथवा भेदून जाऊन आत शिरले तरच आपल्याला ह्या स्फुल्लिंगाचा अथवा **अंतरात्म्याचा शोध** लागू शकतो. ह्या अंतस्थ चिदाग्नीची जेव्हा आपल्याला जाणीव होईल, तेव्हाच आपण सुद्धा परमेश्वराचेच स्वरूप आहोत त्याचे आकलन होईल. आणि तेव्हा आपल्याप्रमाणेच अन्य व्यक्ती, अन्य सजीव, इतकेच नव्हे तर सर्व चराचर हेही परमेश्वराचेच स्वरूप आहे, सर्वांमधील चैतन्य एकच आहे, या सत्याची जाणीव व ज्ञान होऊ शकेल. त्यावेळी आपल्याला आजवर अज्ञात असलेला आपण व सारी सृष्टी यामधला अदृश्य संबंध ज्ञात होईल, आणि दोहोंमधला परकेपणा व भेद गळून पडेल. आपल्या ठिकाणी असणारे दिव्यत्व हे अन्य ठिकाणी असणाऱ्या दिव्यत्वाशी जोडले जाईल. आपल्या बाह्य बंधनातून आपण मुक्त होऊ, स्वतंत्र होऊ, आंतरिक स्वातंत्र्याचा अनुभव घेऊ आणि मग, **परमेश्वराशी व त्याने निर्माण केलेल्या सृष्टीशी एकत्व पावण्याची दिव्य अनुभूती, आपल्याला** येईल.

हे जोडले जाणे, हे एकत्व पावणे हीच सर्व योगाची अपेक्षा असते. आपल्या सर्व प्रकारच्या अज्ञानापासून मुक्त होऊन परम सत्य व चिरंतनत्वाशी एक होणे हा **मोक्ष अथवा सायुज्य मुक्ती** ही ज्ञानमार्गाची सिद्धी होय. तर परमेश्वराच्या जवळ जाणे, त्याच्याबरोबर राहणे हे सामीप्य आणि त्याच्यामध्ये प्रवेश करून त्यात निमग्न होणे हे **सालोक्य** ही भक्तिमार्गाची सिद्धी होय. आणि आपल्यामध्ये सर्वोच्च परिपूर्णता आणून आपण परमेश्वरासमान होणे हे **सादृश्य** ही कर्ममार्गाची सिद्धी होय. परमेश्वराशी बहुविध प्रकारे एकत्व प्राप्त करणे पूर्णयोगाला अपेक्षित असल्यामुळे पूर्णयोगाचे फलित प्राप्त होण्यामध्ये ह्या तीनही मार्गांच्या फलिताचा त्यात अंतर्भाव असतो.[८]

आणि **हा एकत्वाचा आनंद हेच प्रेमाचे खरे स्वरूप** आहे. प्रेम हा एक वैश्विक व चिरंतन असा सामर्थ्यप्रवाह आहे आणि प्रत्येकाच्या अंतरंगामध्ये ह्या विशुद्ध प्रेमाचा निवास असतो. प्रेम हा प्रत्येक गोष्टीचा स्थायीभाव आहे, आधार आहे. प्रेम पृथ्वीतलावर मूर्त स्वरूपात येताना त्यामध्ये जरी काही विकृती शिरलेल्या असल्या, तरीही गोष्टींच्या बाह्य स्वरूपाच्या पलीकडे जाऊन **त्यांच्या अंतरंगात दडलेले सत्य व प्रेम** जाणणे ही तपस्या आहे आणि त्याच्याशी एकत्व पावणे व आपण स्वत: ह्या पृथ्वीवर त्या प्रेमाचे मूर्त स्वरूप होणे हा त्या तपस्येचा खरा **विशुद्ध आनंद** आहे. त्या दैवी प्रेमाच्या, त्या दिव्य एकत्वाच्या व त्या उत्कट आनंदाच्या प्राप्तीची ओढ असणे हे **अंतरात्म्याचे वैशिष्ट्य** आहे आणि तोच त्याचा **खरा अर्थ** आहे. दिव्य प्रेम हाच आत्मतत्त्वाला परमतत्त्वाशी जोडणारा मधला दुवा आहे.

श्रीअरविंदांनी आपल्या स्वत:च्या व श्रीमाताजींच्या योगसाधनेचे सत्यवान-सावित्री कथेच्या प्रतीकांद्वारे काव्यात्म वर्णन करणाऱ्या आपल्या 'सावित्री' ह्या महाकाव्याची सांगता, सगळ्याचा सारांशच अशा चार ओळींनी केलेली आहे. सावित्री सांगते –

''जागृत झाले आहे मी माझ्या हृदयांतरीच्या अर्थाने
की जाणणे प्रेमाला अन् एकत्व हेच जगणे,
आणि ही आहे किमया सोनेरी बदलाची आमच्या,
एवढेच जाणते मी सत्य, अथवा करते आकांक्षा, हे मुनिवरा.''

मनाच्या एकाग्रतेसाठी दोन स्थाने : ही सर्व मनोभूमिका स्वत:मध्ये बाणवून घेऊन सजगपणे साधना करत असताना, मनाच्या एकाग्रतेसाठी श्रीअरविंदांनी दोन स्थाने सांगितलेली आहेत. आपल्या हृदयाच्या मागच्या बाजूस मध्यभागी, सूक्ष्मशरीरामध्ये चैत्य पुरुषाचे किंवा अंतरात्म्याचे स्थान असते, हे एक आणि आपल्या मस्तकाच्या काहीशा वरच्या बाजूस असणारे दुसरे. ह्या दोन्ही केंद्रांपैकी साधकाला जे सुखावह वाटेल त्या स्थानी मन एकाग्र करून त्याने तेथून आपल्या जाणिवेने आत शिरण्याचा प्रयत्न करावा. कधी एक स्थान तर कधी दुसरे असेही साधक वापरू शकतो. परंतु अभ्यास करण्यासाठी दोन्हीही स्थाने अत्यंत आवश्यक आहेत.

ही बंद केंद्रे उघडली गेल्यानंतर दिव्य सामर्थ्यप्रवाहाचा तेथील प्रभाव अनुभवावा. त्याची आतल्या व वरच्या दिशेने जाणारी हालचाल व कार्य यांचा अनुभव घ्यावा. त्या दिव्य प्रवाहाचे अवतरण अनुभवावे. मात्र हे सर्व काही घडून येणे हे केवळ त्या दिव्य शक्तीवर असणारी आपली श्रद्धा, तिने आपल्या चेतनेमध्ये परिवर्तन घडवून आणून आपल्याला अधिक निर्दोष व परिपूर्ण करावे यासाठी असणारी आपली तीव्र आकांक्षा आणि दिव्य मातेला व परमोच्च तेजाला समर्पित असणारी आपली वृत्ती याच्यावरच अवलंबून आहे, दुसऱ्या कशावरही नाही.[९]

गायत्रीमंत्र : त्यासाठी, श्रीअरविंदांनी लिहिलेल्या गायत्री मंत्राने आपण प्रार्थना करूया – **'सवित्याच्या सर्वश्रेष्ठ स्वरूपाचे म्हणजेच परमोच्च ज्योतीचे आपण ध्यान करूया, जे आम्हाला सत्याने उजळवेल.'**

'तत्सवितुर्वरं रूपं ज्योति: परस्य धीमहि ।
यन्न: सत्येन दीपयेत् ।।''[१०]


श्रीमती प्रज्ञा सुखटणकर
४, क्षितीज अपार्टमेंटस्, प्रभात रोड, गल्ली क्र. ७, पुणे ४११००४.
फोन नं. – ०२०-२५६५१३१९, ८८०५३६२४६८

संदर्भ – सूचि :

SABCL : Sri Aurobindo Birth Centerary Library
CWM : Collected Works of the Mother
1, 2) The Mother, SABCL vol. 25, P. 1-10, 15-18, 37-40
3,4) The Synthesis of Yoga, SABCL vol. 20. P. 47, P .55
5,8) Letters on Yoga
6,7) CWM vol. 3, P. 160 ; CWM, vol. 6, P. 313 - 314
9) Letters on Yoga, SABCL vol. 23, P. 505
10) Sri Aurobindo on Himself, SABCL vol. 26, P. 513

■ ■ ■

कर्म हीच साधना



डॉ. सौ. शैला काळकर

एम.ए.पीएच.डी., निवृत्त अध्यापिका (मराठी विभाग प्रमुख, राजगुरू महाविद्यालय) संत साहित्याच्या अध्यापनाचा २० वर्षाचा अनुभव. श्री समर्थ रामदासांच्या कार्यांचा प्रसार व प्रचार. उत्कृष्ट प्रवचनकार / व्याख्यात्या, वर्तमानपत्रे व मासिकातून स्फुट लेखन. भरतकाम शिवणकाम हस्तकौशल्य यात प्राविण्य. योगी अरविंदाश्रम दिल्ली यांच्या नैनिताल येथील शिबिरात प्रमुख वक्त्या म्हणून कार्यरत. २०१२ मध्ये मूक चिंतन या पुस्तकाचे प्रकाशन.

अध्यात्ममार्गामध्ये कर्ममार्ग, उपासना किंवा भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग हे तीन प्रमुख मार्ग आहेत. परमार्थमार्गाची वाटचाल करणारांपैकी खूप मोठा वर्ग कर्ममार्गाने वाटचाल करणारा आहे. त्यापेक्षा थोड्या कमी संख्येने भक्तीची वाटचाल करणारा व फारच थोडा वर्ग ज्ञानमार्गाची वाटचाल करणारा आहे. सर्व मार्ग शेवटी ज्ञान सागरालाच येऊन मिळतात कारण मोक्ष, मुक्ती किंवा परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार हेच सर्व योगांचे, साधनांचे, उपासनांचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी कोणी आधी शरीर निकोप, सुदृढ करो, चित्तवृत्ती स्थिरावो, मन शांत ईश्वराभिमुख करो, आपल्या भावनांचा आवेग ईश्वराकडे वळवो किंवा अहंकार आणि कर्तृत्वाभिमान सोडून ईश्वरस्मरणपूर्वक, समर्पण बुद्धीने कार्यरत होवो. शेवटी ईश्वराचे ज्ञान व त्याचा साक्षात्कार हेच सर्वांचे अंतिम ध्येय होय यात शंका नाही. ज्ञानयोगाची महत्तता नक्कीच आहे. पण त्या ज्ञानयोगाने अनेक थोरामोठ्यांना जगापासून दूर केले. जगाच्या सांसारिक, व्यावहारिक, जीवनापासून त्यांना अलग, अलिप्त ठेवले व अलिप्ततेमुळे ज्ञानाच्या सर्वांगीण महानतेचा, त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ जगाच्या दैनंदिन जीवनाला व्हावा तसा व व्हावा तितका उपयोग होऊ शकला नाही. ही त्रुटी योगी अरविंदांनी भरून काढली. त्यांनी ज्ञानयोगाला माजघरात आणले. कर्म मार्गे साधना, कर्म हीच साधना अशी विचारधारा त्यांनी मांडली.

इथे मला ज्ञानदेवांची व समर्थांची आठवण प्रकर्षाने होते कारण सर्व संत हे, **'साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।**
अवघे मिळोन एकची झाले । देहातीत वस्तु ।।

दासबोध ७ : २ :३१

या ओवी प्रमाणे स्वत:ला ज्ञानप्राप्ती झाली तरी ते ज्ञान फक्त आपल्यापुरते मर्यादित न ठेवता सर्वसामान्यांपर्यंत पोचवावे यासाठी ते ज्ञान संतांनी सुलभ करून सर्वसामान्यांच्या आवाक्यात येईल असे आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ज्ञानदेवांनी भगवद्गीतेचे ब्रह्मरसाचे ताट फक्त देववाणी जाणणाऱ्यांपुरते मर्यादित ठेवून चालणार नाही. ते सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी त्या काळाच्या समाजाचा विरोध पत्करून प्राकृतात व मराठीत आणले. ते

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।' या हेतूने किंवा
'बुडती हे जन देखवेना डोळा । म्हणून येतो कळवळा ।'

म्हणून समर्थ रामदास स्वामींनीही स्वत:ला ज्ञानप्राप्ती झालेली असताना व भोवतालची परिस्थिती, अस्मानी सुलतानी पाहून अस्वस्थता व विरक्ती आलेली असताना श्रीरामाज्ञेवरून कर्म करण्याची प्रेरणा मिळाल्याचे, शिवरायांच्या स्वराज्य-स्थापनेच्या कार्यापाठीमागे उभे राहण्याची प्रेरणा मिळाल्याचे व त्यामुळे लोकसंग्रह, मठस्थापना, बलोपासनेसाठी अकरा मारूतीची स्थापना हे सर्व केल्याची इतिहास साक्ष देतो. केवळ आत्मोद्धाराकडे लक्ष दिले तर जगाच्या, मानवतेच्या कल्याणाकडे लक्ष दिले जाणार नाही, ते द्यायला हवे म्हणून ते करणारे समर्थ रामदास हे वेगळे योगी होत. तसेच नुसते वैयक्तिक दिव्यत्व अरविंदांना अभिप्रेत नव्हते. अखिल मानव समाजाला ते प्राप्त करून द्यावयाचे हे त्यांचे उद्दिष्ट होते. नुसती वैयक्तिक मुक्ती नव्हे तर साऱ्या मानववंशाची मुक्ती त्यांना हवी होती. पण ही मुक्ती म्हणजे जीवनातून निवृत्त होऊन मिळणारी मुक्ती नव्हे तर जीवनांत जिचा आविष्कार होईल अशी मुक्ती **'याची देही याची डोळा। भोगु मुक्तीचा सोहळा।'** मिळाली पाहिजे. सर्वांगीण आत्मसाक्षात्काराच्या पायावर मानवसमाजाची पुनर्रचना आपल्याला हवी आहे. ईश्वरीशक्तीचे बोट धरूनच ही दिव्यतेची चढण आपल्याला चढावयाची आहे. ही त्यांची पक्की धारणा होती.

आपले मन विकसित झाले पण अस्तित्वाचे प्राणिक व विशेषत: कायिक विभाग होते तिथेच राहिले. एवढ्याचसाठी सर्व विभागांची प्रगती आपल्याला करून घेतली पाहिजे तरच जीवन सुखकर होईल, दिव्य होईल. हा दिव्यत्वाचा मार्ग अरविंदांनी दाखवला.

पशुतेचा वारसा घेऊन मानव जन्माला आला. पशुतेचे रक्त त्याच्या धमन्यांतून वहात आहे. अनेकवेळा अचानक ते उसळते. मानवता झुगारून दिली जाते आणि कधीतरी तर पशूलाही लाजवणारी कृत्ये माणसाच्या हातून घडतात. पण मानवाचा खरा वारसा हा नव्हे. गीतेने वर्णिल्याप्रमाणे त्याच्या जीवनवृक्षाची खरी मुळे खाली जमिनीच्या चिखलात नसून थेट वर परमेश्वरात आहेत. 'अधश्च मूलान्यनुसंततानि' हे त्याचे फक्त गौण वर्णन आहे. वडाच्या पारंब्या जशा खाली जमिनीत शिरतात, मूळ धरतात तसे 'उर्ध्वमूल' हे त्याचे खरे वर्णन. माणसाचा खरा वारसा, मूळ वारसा दिव्यतेचा आहे. आणि आपल्या वेड्या कृतीने / कर्माने त्याने घालवलेला हाच वारसा त्याला परत मिळवावयाचा आहे. इथे वेदान्तशास्त्रातले तत्त्व आठवल्याशिवाय राहात नाही. पशु

आणि मानव यात आहार, निद्रा, भय, मैथुनं च ह्या प्रेरणा अगदी सारख्याच असल्या तरी क्रियमाण स्वातंत्र्य फक्त मानवाजवळ असल्यामुळे ज्याने मला निर्माण केले त्याला जाणण्याचे सामर्थ्य असल्याने प्रयत्नाने त्याचे उन्नयन शक्य आहे. आणि हा प्रयत्न साधनेच्या मार्गाने आपला आपणच करावयाचा आहे. म्हणूनच कर्म हीच साधना हा दृष्टिकोन सर्व सामान्यांच्या दृष्टीने अरविंदांना जास्त महत्त्वाचा वाटला व त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. वैयक्तिक दिव्यत्व बऱ्याच अगोदर पासून त्यांनी स्वत: प्राप्त केलेले किंवा ईश्वरी योजनेने / कृपेने त्यांना प्राप्त झाल्याचे अनेक प्रसंगातून प्रत्ययाला येते. ईश्वरीशक्तीचे बोट धरूनच ही दिव्यतेची चढण आपल्याला चढावयाची आहे. व त्याच हेतूने व त्या हेतूच्या परिपूर्तीसाठी योगी अरविंदांनी आपले जीवन निश्चित ध्येयाने प्रेरित होऊन व्यतीत केले.

इथे मला गौतमबुद्धांची आठवण होते. वडिलांनी जीवनातील सर्व दु:खापासून, खरे तर दु:खापासून म्हणण्यापेक्षा वास्तवापासून प्रयत्नपूर्वक सिद्धार्थाला दूर ठेवले पण ज्या क्षणी हे वास्तव त्यांच्या निदर्शनास आले व ते माणसाचे खरे स्वरूप व वास्तव आहे हे कळले त्याच क्षणी संसाराचे सर्व पाश झुगारून देऊन ते ज्ञानप्राप्तीची वाट चालू लागले. अगदी तसेच अरविंदांच्या बाबतीत वडिलांनी भारतीय संस्कृती, संस्कारापासून आपल्या मुलांना हेतूपुरस्सर दूर ठेवले. त्याच्यावर भारतीय संस्कार होऊ नयेत याची पुरेपूर काळजी घेतली पण मूळ रक्तातच तो अंश असल्यामुळे वेळ येताच व संधी मिळताच तो स्रोत मूळ प्रवाहाकडे धावला व अरविंदांचे योगी अरविंद झाले हे आपण बघतोच.

इथे ज्ञानदेवांच्या,

'तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागी ।'

या ओवीची आठवण आल्याशिवाय रहात नाही, जे जे काम आपल्या वाट्याला येईल ते ते कर्म फूल समजून ईश्वरार्पण करायचे. ते फुलासारखेच सुगंधित, टवटवीत ठेवले व त्याच्या इच्छेनेच ते माझ्या वाट्याला आलेले आहे असे म्हणून वाहिले तर योग्य होईल. त्यासाठी **'अगा जया जे विहित । ते ईश्वराचे मनोगत ।'** हा दृढ विश्वास मात्र हवा. तसेच माझे प्रत्येक कर्म साधना म्हणून करायचे असेल तर ते,

'विधीते पाळीत । निषेधाते गाळीत ।
मन देऊन जाळीत । कर्मफळे ।।'

असेच असायला हवे. ओवीचा 'हळूच बोलाची वालीफ फेडीजे' अशा धारणेने विचार केला तर प्रस्तुत ओवीत ३ विधी आणि निषेधांचा अर्थ लपलेला दिसतो १) खरे बोला, २) वडीलधाऱ्यांची सेवा करा आणि ३) बसल्याजागी रामकृष्ण हरी म्हणा. हे तीन विधी पाळा. १) परस्त्री २) पर धन ३) पर निंदा हे तीन निषेध टाळा असे केलेले कर्म वेदविहित कर्म ठरते. व असे ईश्वरार्पणबुद्धीने केलेले कर्म साधनेची वाटचाल करण्यासाठी उपयुक्त ठरते. कर्म खूप व्यापक आहे. उदा. व्यष्टीसाठी केलेले कर्म-समष्टीसाठी केलेले कर्म, चित्तशुद्धीसाठी केलेले कर्म, वेदांतशास्त्रासाठी केलेले कर्म. हे लिहिण्याचा हेतू इतकाच, वर वेदविहित कर्माचा उल्लेख केला. त्याने मोक्ष मिळणार नाही हे नक्की पण मोक्षाच्या दिशेने मार्गस्थ होण्यासाठी जी वाटचाल चालायची ती चित्तशुद्धीद्वारा नक्की होईल. वेदविहित कर्माचे ते निश्चित मिळणारे फळ आहे.

कर्म अनिवार्य आहे हे नक्की. जन्म हे एक कर्म आणि मृत्यू हे एक कर्म. या दोन कर्मांच्या मधील कर्मांमधून माझी सुटका होईल ही शक्यता अजिबात नाही. 'न ही कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत' एक क्षणभरही माणूस कर्म केल्यावाचून राहू शकत नाही. कर्म सुटणे शक्य नाही कारण ते प्रारब्धाधीन आहे. पण कर्मबंधन सुटणे शक्य आहे आणि जिथे बंधन रहात नाही तिथे मोक्ष आहे. **'नियतं कुरु कर्म त्वम्'** किंवा

'तैसे आपुले नि विहीता । उपाय असे न विसंबिता ।।
ऐसा किजे की जगन्नाथा । आभास पडे ।'

असे जर मी माझे कर्म केले तर त्या कर्माचे ओझे विठ्ठलाच्या / रामाच्या डोक्यावर चढून इतके सुंदर कर्म करणारा कोण आहे असा शोध घेत ते आले पाहिजेत. हेच जगन्नाथा आभास पडे, पुंडलीकासाठी असाच शोध घेत विठोबा आला ना ! त्यालाच रुबाबदार परमार्थ करणे म्हणतात.

कर्म जर अनिवार आहे तर ते नेमके कसे करावे याचे मार्गदर्शन आपल्याला संतांकडून, आध्यात्मशास्त्राकडून नेमकेपणाने मिळते.

१) कर्म वेदविहित निष्काम झाले पाहिजे.

२) कर्तृत्व/भोक्तृत्वरहित झाले पाहिजे.

३) रामाला आवडेल तसे, त्याने सांगितले तसे, रामातारी व त्याला अर्पण करून झाले पाहिजे.

कर्म अनिवार आहे व निष्काम बुद्धीने करावे असे पुन: पुन्हा सांगितले जाते. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की चरितार्थासाठी केलेले कर्म निष्काम बुद्धीने केलेले असणार नाही. १ तारखेला मला केलेल्या कर्माचा पगाराच्या रूपाने मोबदला मिळत असेल तर मी निष्काम बुद्धीने कर्म करते हे म्हणणे टिकत नाही. तसेच धर्म-कर्म, नित्य नैमित्तिक कर्म, स्नान-संध्या वैश्वदेव आणि कर्तव्यकर्म, पुत्रधर्म, पतिधर्म, शेजारधर्म, मानवधर्म ही सर्व जर निष्काम भावानी केली तर चित्तशुद्ध होऊन जाईल. इथला जर फार महत्त्वाचा आहे. मातृ-पितृ धर्माचे पालन जर मी मुलांची ट्रस्टी म्हणून केले तर ते निष्काम होऊन जाईल. पण आम्ही मुलांचे पालक होण्याऐवजी मालक होऊन केले तर आणि बहुतेक वेळा तसेच करतो. निष्काम कर्माने चित्त शुद्ध होईल आणि चित्त शुद्ध झाले तर ज्ञानाची व्यवस्था होऊन जाईल. पण आपले चित्त विविध कारणांनी शुद्ध होते आणि चित्त जितक्या प्रमाणात शुद्ध होईल तितक्या प्रमाणात स्थितप्रज्ञता येण्याची शक्यता कमी. स्थितप्रज्ञता अंगी बाणण्यासाठी दोन गोष्टींची नितांत आवश्यकता आहे.

१) कर्म निष्काम केले पाहिजे.

२) ज्याच्या सत्तेवर कर्मे होतात (५ ज्ञानेंद्रिये + ५ कर्मेंद्रिये + अंत:करण पंचक यांची कर्मे) त्याच्या अनुसंधानात अखंड राहिले पाहिजे. हे दोन्ही साधत राहिले तर साधन व्यवस्थित होऊन जाईल. आत्मस्वरूपाच्या अनुसंधानात जर कर्मे करावयाची असतील तर निष्काम बुद्धीने करण्याखेरीज गत्यंतर नाही. अशा या दोन गोष्टी परस्परावलंबी व परस्पराश्रयी आहेत. जोवर कोणत्याही कर्माविषयी, कर्माच्या फळांविषयी किंचित आशा, हुरहुर अपेक्षा असेल तर ती जर

पूर्ण झाली नाही तर आतमध्ये विषाद निर्माण होतो. विषादग्रस्त मन आत्मस्वरूपाच्या अनुसंधानात राहणे शक्य नाही. त्यामुळे मननासाठी जर एखादे सूत्र कळले तर अस्वस्थता, आशा, निराशेचा खेळ थांबून जाईल. अस्वस्थतेने, आशा निराशेच्या हिंदोळ्याने मन उद्विग्न होते. उद्विग्न मन व्यग्र राहते. ते मोकळे मिळत नाही आणि जे मन मोकळे नसते ते पाहिजे तिथे वापरण्यासाठी उपलब्ध नसते.

मोकळं म्हणजे रिकामं नाही हं! सुखाने किंवा दु:खाने कशानेही व्यग्र नसलेले मन अनुसंधानासाठी वापरता येते. सुखाचा किंवा दु:खाचा कसलाही आंदोल किंवा झोका शांत राहण्याच्या आडच येतो.

कर्म हीच साधना असा विचार जेव्हा समोर येतो तेव्हा 'साधना' म्हणजे नेमके काय? असा प्रश्न स्वाभाविकपणे आपल्या मनात येतो. परमार्थात नेमकेपणा आणि नेटकेपणा असल्याची नितांत गरज आहे. त्यामुळे अपेक्षित फळ पदरात पडते. डॉ. श्रीकृष्ण देशमुख ह्यांनी प्रवचनांच्या, लेखनाच्या ओघात अनेकदा साधना म्हणजे नेमके काय याचे मार्गदर्शन केले, ते साधनेसाठी अत्यंत उपयुक्त आहे. उदा. एका व्याख्येत ते म्हणतात – 'परमार्थ जीवनापासून दूर न ठेवता तो प्रत्यक्ष जीवनात उतरविण्याची अखंड धडपड याचे नाव साधना आहे.' कारण 'रोजचे जीवन ही अध्यात्माची प्रयोगशाळा आहे. जे ज्ञान मिळविले ते जीवनात उतरविणे हीच साधना.' तसेच,

'मी कर्ता नसून केवळ माध्यम आहे हा विचार सतत जागृत ठेवणे याला साधना म्हणतात.' या व्याख्या वाचल्यानंतर असे लक्षात येते की योगी अरविंदांनी व सर्व संतांनी ह्या व्याख्या जगून दाखविल्या व तीच त्यांची जीवनशैली होती.

कर्मयोग हा अरविंदांच्या शिकवणुकीचा महत्त्वाचा भाग आहे. पाँडिचेरीच्या अरविंद आश्रमाची उभारणी याच पायावर झाली. काही तरी करीत राहिल्याशिवाय, काही हालचाल केल्याशिवाय कोणाचाही एक क्षण सुद्धा जाऊ शकत नाही, असे जर आहे तर या कर्माला योग्य वळण का लावू नये हाच कर्मयोग. हा संदेश गीतेच्या द्वारा देणाऱ्या भगवान् श्रीकृष्णांचा जन्म जसा बंदिवासात झाला तसाच गीतेच्या कर्मयोगाचे रहस्य सांगणाऱ्या लोकमान्य टिळकांचा महान ग्रंथही कारागृहात लिहिला गेला. आणि त्याच श्रीकृष्णाचा 'वासुदेव: सर्वमिति' हा साक्षात्कार श्रीअरविंदांना अलीपुरच्या तुरूंगात झाला. कर्मयोगाच्या बाबतीतले हे तीन योग विलक्षणच म्हणावे लागतील.

आपण करीत असलेले काम आपल्या आवडीचे पाहिजे व त्याचे इष्ट फळही आपल्याला मिळाले पाहिजे, ही आसक्ती व अपेक्षा माणसाला विवंचनेत टाकणारी आहे, अशी विवंचनाच जर आपले सारे लक्ष वेधून घेईल तर हाती घेतलेल्या कर्माच्या सिद्धीकडे आपले पूर्ण लक्ष कसे राहील? समर्थ रामदास स्वामींचे फार सुंदर विचार या बाबतीत मार्गदर्शन करणारे आहेत. **'ध्येय असावे सुदूर। की जे कधी न हाती यावे। मात्र तयाच्या प्रकाशात चालावे। चालता चालता चालणेच विसरावे।'**

कुठलेही चांगले काम करताना ते करतानाचा प्रवासच खूप आनंद देऊन जातो. पण आपले लक्ष कामापेक्षा फळाकडे असेल तर कामात रममाण होण्याचा आनंद कसा मिळणार? गीतेने **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।'** हे तर प्राधान्याने सांगितले आहे. अनासक्ति आणि निरपेक्षता यांच्यावरच कर्मयोगाचा मुख्य भर आहे. पण जोवर त्याला ईशतत्वाचा स्पर्श झाला नाही तोवर नुसता अनासक्त व निरपेक्ष कर्मयोग निरस व नि:सत्वच राहणार. कर्माची ती एक व्यावहारिक रीत होईल एवढेच. अध्यात्मात तिला जागा नाही. स्वत:साठी, कुटुंबीयांसाठी, आप्तस्वकीयांसाठी बहुतेकांचे आचरण कमी अधिक प्रमाणात होतच असते. कर्तव्यबुद्धीचा भाग त्यात आहे. पण अध्यात्माचा संबंध मात्र त्यात नाही आणि म्हणूनच कर्मयोगाचा आविष्कार नाही. कर्मयोग शब्दात योग शब्द आहे. त्यात 'युज' नावाचा धातू आहे. युज म्हणजे जोडणे. ज्या कर्माने मी ईश्वराशी जोडली जाते व ज्या कार्यपद्धतीने जोडली जाते तो कर्मयोग.

याच कर्मयोगाची मांडणी गीतेने केली आहे. 'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानव:' हे या कर्मयोगाचे सूत्र आहे. ईश्वर-पूजनाची भावना आपल्या प्रत्येक कर्मात गुंफली गेली पाहिजे. भक्तियोगाचा म्हणून प्रसिद्ध असलेला गीतेचा जो बारावा अध्याय त्यातल्या आठ ते अकरा या चार श्लोकांनी कर्मयोगाच्या मर्मालाच हात घातला आहे. आपले प्रत्येक कर्म ईश्वरार्पणबुद्धीने झाले पाहिजे. मग तू अवघाची सुखरूप होसी हेच या कर्मयोगाचे फळ. तसेच या कर्मयोगाचे ध्येयही

'मयि एव मन आधत्स्व। मयि बुद्धिं निवेशय। निवसिष्यसि मय्येव। अत उर्ध्वं न संशय:।' हेच कर्मयोगाचे ध्येय सांगितले आहे व सुखरूपता ती हीच.

आपल्या मनाचे एक बरे आहे ते एकदा आवरता आले की ते ईश्वराकडे वळवणे फारसे कठीण नाही. या मनाचे एक निरे। देखलिया गोडीच्या ठाया सोके. आपल्या मनाला जसे वळण/गोडी लावावी तशी लागते. अशी गोडी लागली ईश्वराकरिता, त्याची आज्ञा म्हणून व चित्तात त्याला स्थिर करून कर्म करणे या कर्मयोगाच्या साऱ्या पायऱ्या मग सहज चढता येतील. साधना कोणत्याही क्षेत्रातली असो, क्रमविकासाच्या पायऱ्या चढाव्याच लागतात. योग साधनेतील यम, नियम या आठ पायऱ्या सर्वांना परिचित आहेत. तसेच ज्ञानसाधनेत श्रवण, मनन, निदिध्यासन, कर्म साधनेत वेदविहितता, निष्कामता, कर्तृत्व, भोक्तृत्व रहितता. ईश्वराला आवडेल तसे, त्याने सांगितले तसे व त्याला अर्पण करून हा कर्म साधनेचा सोपानच ना?

कर्मयोगाने ईश्वरामधले व आपल्यामधले नुसते मानसिक अंतर तोडावयाचे नाही तर आपले सारे शरीरच त्याच्या अधिवासाला सुयोग्य करावयाचे आहे. देवळाची बांधणी सुधारावयाची आहे, मजबूत करावयाची आहे. नीटनेटकी सुंदर करावयाची आहे. म्हणूनच अतिमानसरूपी ईशकृपेची जी शक्ती तिला आवाहन करावयाचे व हे सारे अवघड काम तिच्या हाती सुपूर्द करावयाचे. इथे वसंत बापटांच्या **'देह मंदिर, चित्त मंदिर, एक तेथे प्रार्थना। सत्य सुंदर मंगळाची नित्य हो आराधना।'** या कवितेच्या ओळी आठवल्याशिवाय रहात नाहीत.

ज्ञान, भक्ति आणि कर्म या तिन्ही योगांना अरविंदांनी आपल्या

पूर्णयोगात स्थान दिले आहे आणि साधकांच्या पात्रतेप्रमाणे आणि रुचिभेदाप्रमाणे प्रत्येकाला त्यात जागा ठेवली आहे. म्हणूनच पूर्णयोगाच्या साधनेचा हा महत्वपूर्ण त्रिमार्ग समजण्यास हरकत नाही. माणसाचा स्वभाव एक पदरी, एक विणी, साधासुधा नाही. सत्व, रज, तमांची त्यात फार गुंतागुंत आहे. जो तो ज्याच्या त्याच्या गुणांच्या प्रभावानी बांधलेला आहे. संत एकनाथ म्हणतात तसे –

'देही ज्या गुणाचे प्राधान्य । तैसेची कर्म उपजे जाण ।
इंद्रिये गुणाधीन । तद्नुसार वर्तती ।।'

बुद्धीचा, भावनांचा, विचारांचा, विकारांचा, उत्कटतेचा, उत्साहाचा असा अनेक गुणदोषांचा संमिश्र परिपाक माणसाच्या स्वभावात झालेला आहे. कुणी अत्यंत तर्कशुद्ध विचारसरणी अवलंबवेल, कुणी केवळ भावनेच्या आहारी जाईल, कुणाचा ओसंडणारा उत्साह कोणत्या ना कोणत्या कामात सदैव गुंतवून ठेवील. माणसाच्या अशा बहुरंगी, बहुढंगी स्वभावाला जी साधना योग्य वाव देईल तीच साधना त्याच्या बाबतीत प्रभावी ठरेल. माणसाचा हा संमिश्र, गुंतागुंतीचा स्वभाव श्रीअरविंदांनी आपल्या पूर्ण योगात पूर्णपणे विचारात घेतला आहे. विशेष म्हणजे तीनही गुण प्रत्येकात असतात. फक्त त्याचे प्रमाण कमी जास्त असते आणि ती मूळ प्रवृत्ती असते तिला वळण, दिशा देण्याचे काम व त्या मूळ प्रवृत्तीचाच योग्य प्रकारे वापर करण्याचे काम योगी अरविंदांनी केले.

ज्ञानदेवांनी, समर्थ रामदासांनी लौकिक अर्थाने प्रपंच, आपल्यासारखी उपद्व्यापी कर्मे केली नाहीत. पण त्या दोघांनी अनेक कर्मे केली ती निर्लेप, स्थितप्रज्ञाच्या वृत्तीतून व समाजहिताची. योगी अरविंदांच्या बाबतीत ते लौकिक प्रपंचात गुरफटले नाहीत. मृणालिनींना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात – 'तुझे भाग्य एका विचित्र माणसाच्या भाग्याशी जोडले गेले. जगाच्या दृष्टीने तो माणूस वेडाच दिसत असेल. अशा वेड्याच्या हातात पडणे हा त्या स्त्रीच्या दृष्टीने अशुभ योगच म्हटला पाहिजे, ज्या कार्याला तो स्वधर्म मानीत असेल, त्यालाच तिने सहाय्य केले पाहिजे, सल्ला दिला पाहिजे, त्याला उत्तेजित केले पाहिजे, कार्याची निवड पुरुषाची; पण त्याला सहाय्य करण्याची, त्याचा उत्साह वाढविण्याची कामगिरी स्त्रीची. तू ही जबाबदारी पत्करशील ना? एखाद्या कोपऱ्यात रडत तर बसणार नाहीस? हिंदू स्त्रियांचे महान आदर्श तुलाही मान्य असतीलच. तर मग माझ्या पाठोपाठ माझ्या मार्गाने तू येशील ना?' अशा आशयाच्या पत्रात ईश्वराने दिलेले गुण, प्रतिभा, शिक्षण, पैसा हे सर्व त्याच्याच मालकीचे. माफक गरजेपुरताच त्याचा वापर मी करेन, दुसरे वेड भगवंताचे साक्षात् दर्शन घेण्याचे आणि तिसरे वेड स्वदेशाबद्दलचे, मायदेश ही माऊली तिचा उद्धार. भगवंताचे कार्य करण्यासाठीच मी या जगात आलो आहे. हे कार्य आपण करू या.'' अशा आशयाचे विस्तृत पत्र अरविंदांनी मृणालिनींना लिहिले आहे.

या ठिकाणी हे पत्र वाचत असताना आपल्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. त्यांना जेव्हा काळ्या पाण्याची शिक्षा झाली तेव्हा आपल्या पत्नीशी कारागृहात ते काय बोलले ते सर्वश्रुत आहे. 'काडी काडी जमा करून संसार किंवा प्रपंच चिमणा चिमणीसुद्धा करतात, मी देशाचा संसार करायचा ठरविला आहे. तू साथ देशील ना? तुझी साथ असेल तरच मी हे कार्य करू शकेन.' दोघांच्याही पत्नीशी झालेल्या संवादात विलक्षण साम्य आहे आणि प्रेरणा स्वदेशाची जशी आहे तशीच.

'नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी ।
त्यासाठी झिजवावी । कोणी तरी काया ।।'

या समर्थ रामदासांच्या ओवीतील ईश्वर दोघांनाही अभिप्रेत होता व त्यासाठीच त्यांनी आपले अनमोल आयुष्य वेचले. योगी अरविंदांचे जीवन हे त्यांच्या नावाप्रमाणेच अनेक अंगांनी फुलले उमलले, ते कमळासारखेच सर्वांपासून अलिप्तही राहिले.

'मग मा व्यवहारी असेन वर्तन। जेवि जळा आन पद्मपत्र ।।' ही तुकाराम महाराजांची उक्ति अरविंदांना तंतोतंत लागू पडते.

कर्ममार्ग, उपासनामार्ग, ज्ञानमार्ग, योगमार्ग, हटयोग, पूर्णयोग, सहयोग अशा अनेक मूलगामी व मूलभूत गोष्टींचा समन्वय योग्य तऱ्हेने अनेक पिढ्यांना आदर्शवत् असा घातला व नुसता घातला नाही तर स्वत: आचरून आदर्श समोर ठेवला. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

डॉ. सौ. शैला काळकर
११, माऊली कृपा कॉम्प्लेक्स,
आझाद नगर, कोथरूड, पुणे-४११०३८
फोन नं.: ०२०-२५३८५२११३०. मोबाईल :९८२२८६६४७५

■ ■ ■

योगी श्रीअरविंद : साधना पद्धती



डॉ. सौ. अंशुमती अरविंद दुनाखे

पी. एच. डी., एम. ए. (हिंदी), एम. ए. (इंग्रजी), टिळक विद्यापीठाच्या संस्कृतच्या तीन परीक्षा, बंगालीची एक परीक्षा, निवृत्त सरकारी अधिकारी.

उपनिषदे, संतसाहित्य आदींचे अध्ययन, अध्यापन. उपनिषदांवर पुस्तके, उपनिषदांतील गोष्टी, श्रीरामनामावली, माऊलींचा हरिपाठ, दोन कविता संग्रह, सूरदासांच्या दृष्टिकोनांतून बाळकृष्ण वर्णन आदी पुस्तकांचे लेखन, स्फुट लेखन, विविध पुस्तके व मासिकांमधून.

योगी श्रीअरविंद म्हटल्याबरोबर डोळ्यांपुढे पद्मासन घालून समाधी लावलेले ऋषी येत नाहीत. कारण श्रीअरविंदांनी सांगितलेला पूर्ण योग हा हठयोग वा राजयोगाहून अगदी वेगळा आहे.

उपनिषदात म्हटल्याप्रमाणे श्रीअरविंदही मानव हा दिव्यतेचा वारसा घेऊन जन्माला आला आहे, असेच सांगतात. त्या दिव्य शक्तीशी एकरूप होण्याची क्षमता मानवांत आहे हे उपनिषदांप्रमाणेच तेही मानतात. ते स्वत: त्या दिव्य शक्तीशी एकरूप झाले होते व त्या दिव्य शक्तीशी एकरूप होण्याचा मार्गही त्यांनी दाखवला. पण तो मार्ग उपनिषदातील ज्ञानमार्गाहून भिन्न आहे.

भक्तीच्या आचार्यांनी 'प्रेमस्वरूपा भक्ती'च्या श्रद्धेच्या जिवावर परमात्मरूप होता येते, असे प्रतिपादन केलेले आहे. भक्तीमध्ये भाव महत्वाचा आहे. शरीराला वा कर्मकांडाला महत्व नाही. नाम घेण्यासाठी, कीर्तन करण्यासाठी शरीर हवे पण ते अतिशय गौण आहे. श्रीअरविंदांनी प्रेम व श्रद्धा मानली आहे. पण भोळी-भाबडी भक्ती मानलेली नाही. सारे प्रयत्न हे जाणीवपूर्वक करावयाचे आहेत, तसेच शरीरालाही महत्व आहे.

पारमार्थिक मार्गातील साधक देहाला नावे ठेवतात. पण श्रीअरविंदांनी देहाला नावे ठेवलेली नाहीत. शरीराचे महत्व व सहकार्य तर त्यांनी प्रतिपादिले आहेच पण देहालाही दिव्य करता येते, हे कुणीही न प्रतिपादिलेले त्यांनी आवर्जून सांगितले आहे व सिद्धही करून दाखवले आहे. श्रीअरविंद धन, कला, सौंदर्य वगैरेंनाही नावे ठेवीत नाहीत तर तोही परमेश्वराचा आविष्कार आहे असे मानून त्याचे महत्व प्रतिपादन करतात. आपले जीवन जडद्रव्य व आत्मतत्त्व दोघांचे मिळून बनले आहे. ही आपल्याला दोन विरूद्ध टोके वाटतात. पण श्रीअरविंद म्हणतात की, या जड द्रव्यात, पार्थिवतेत दिव्यत्वाला विरोधी असे काही नाही. दिव्यत्वातूनच जे निर्माण झाले त्यात अदिव्य काय असू शकणार? जीवन हे मूलत: सत्यावर, दिव्यतेवर अधिष्ठित आहे. जीवन हा आभास नाही ते खरे आहे. दिव्यतेचा पूर्ण लाभ करून घेण्याची त्याच्यात क्षमता आहे. 'ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या' याहून त्यांचे म्हणणे वेगळे आहे.

श्रीअरविंदांचे म्हणणे असे की, संसार असार आहे, जग खोटे आहे या कल्पनेने माणसांचे, भारतीयांचे ऐहिक गोष्टींकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे आपले जीवन एकांगी झाले. आपले मन विकसित झाले पण आपल्या अस्तित्वाचे प्राणिक व विशेषत: कायिक विभाग होते तिथेच राहिले. सर्व विभागांची सर्वांगीण उन्नती झाली की जीवन सुखी होईल, आपल्या जीवनाचे उद्दिष्ट म्हणजे आपल्याला सर्वांगीण दिव्यता प्राप्त करून घ्यावयाची आहे. नुसते वैयक्तिक दिव्यत्वही श्रीअरविंदांना अभिप्रेत नाही तर अखिल मानवजातीला ते दिव्यत्व प्राप्त करून देणे हे श्रीअरविंदांचे उद्दिष्ट आहे. मूळ दिव्य शक्ती आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी या क्रमाने अवतरित झाली. हे तिचे अवरोहण होय. आता उत्क्रांतीचा विकास पृथ्वीतत्वापासून दिव्य शक्तीपर्यंत व्हायला हवा. त्याला ते आरोहण असे म्हणतात.

शरीर-प्राण-मनासह सर्वांगीण परिवर्तन हे आपले उद्दिष्ट आहे. प्रथम आंतरात्मिक परिवर्तन, मग आध्यात्मिक परिवर्तन व शेवटी अतिमानसिक परिवर्तन. मन, चेतना व शरीर या सर्वात आंतरात्म्याचे प्रकटन म्हणजे आंतरात्मिक परिवर्तन (Psychicisation) आंतरात्म्याच्या या संपर्काकरिता आपल्या जाणिवेला आत खोल नेले पाहिजे. याच्या उलट, ईश्वरी, आत्मतत्त्वाच्या संपर्काकरिता आपल्या जाणिवेने उंच वर, अगदी श्रेष्ठ जाणिवेपर्यंत गेले पाहिजे. हेच दुसरे म्हणजेच आध्यात्मिक परिवर्तन (Spiritualisation) याला प्रतिसाद देण्यासाठी ईश्वरी कृपा खाली उतरली म्हणजे आपले जीवन कृतार्थ होईल, परिपूर्ण होईल. त्या योगाने अतिमानसिक परिवर्तन घडून येईल (Super Mentalisation) असे अतिमानसिक परिवर्तन वैयक्तिक होईलच. पण ते सर्व राष्ट्राचे, विश्वाचे झाले पाहिजे. म्हणजे सर्वांगीण परिवर्तन झाले असे म्हणता येईल. त्यांच्या 'सावित्री'या महाकाव्यात त्यांनी हा सर्व प्रवास काव्यात्मक भाषेत सांगितलेला आहे.

आतापर्यंत जे विचार झाले ते वैयक्तिक उन्नतीचे, वैयक्तिक मोक्षाचे झाले. आपल्याबरोबर सर्व विश्वाची उन्नती करण्याचे ध्येय श्रीअरविंदांनी लोकांसमोर ठेवले. त्या उन्नतीची सुरुवात शरीरापासून करावयाची. शरीराचेही बळ वाढविणे अत्यावश्यक आहे. त्याला मागे ठेवायचे नाही. तुच्छ लेखायचे नाही.

'शरीरम् आद्यं खलु धर्मसाधनम्' असे कवि कालिदासाने कुमारसंभवात म्हटले आहे पण प्राचीन विचारानुसार शरीर हे केवळ साधन म्हणून वापरायचे. परमेश्वराशी ऐक्य साधतांना शरीराचा विचार होत नव्हता. श्रीअरविंदांनी शरीरही दिव्य करायला सांगितले आहे. शरीर

दिव्य करावयाचे म्हणजे आज आपले शरीर स्वयंचलित, स्वयंप्रेरित आणि अनिच्छावर्ती आहे. आपल्या जाणिवेचे त्यावर नियंत्रण नाही. ते जाणिवेचे नियंत्रण शरीरावर स्थापित करावयाचे. त्यामुळे शरीर अधिक लवचिक, चपळ होईल, हलके होईल, अधिक कार्यक्षम होईल.

श्रीअरविंदांचे शरीर असे दिव्य झाले होते. देह ठेवल्यावरही कित्येक दिवस त्यांच्या शरीराचे तेज वा टवटवीतपणा कायम राहिला होता.

श्रीअरविंदांचा पूर्ण योग

मानवाला पूर्णतेकडे नेणारा श्रीअरविंदांचा 'पूर्णयोग' (Integral yoga) आहे. भारत ही योगभूमी असल्यामुळे तिथे योगमार्गाचे अनेक प्रयोग झाले. त्या सर्वांचा अभ्यास करून श्रीअरविंदांनी पूर्ण योगाची कल्पना समोर मांडली. पूर्णयोगाने माणसाच्या सर्वांगीण उन्नतीचे ध्येय त्यांनी लोकांसमोर ठेवले. काया, वाचा, मन आदि सर्वांकडे या योगात लक्ष पुरविले गेलेले आहे.

पूर्ण योग हा जसा माणसाला पूर्ण करणारा योग आहे, तसाच तो माणसाला पूर्णाचा साक्षात्कार घडविणारा योग आहे. वास्तविक त्रिविध रूपाने आपण परमेश्वराची ओळख करून घेतली पाहिजे. परमेश्वर जसा आपल्यात आहे तसाच तो विश्वातही आहे व विश्वाच्या पलिकडेही तोच आहे. विश्वरूप होऊनही दशांगुळे तो उरला आहे, असे जे म्हटले जाते ते या अर्थाने. पूर्णयोगाचे ध्येय त्यामुळेच वैयक्तिक, विश्वव्यापक व विश्वातीत परमेश्वराची ओळख करून घेणे आहे.

उपनिषदांतील शरीर-व्यष्टी, समष्टी-ब्रह्मांड व त्या पलिकडची शक्ती, ती हीच होय. समूहाला वगळून एकट्या दुकट्याची खरी उन्नती, पूर्ण उन्नती होऊ शकणार नाही, असेच पूर्ण योग मानतो. एकट्या मानवजातीचा सुद्धा नव्हे तर थेट पार्थिवापर्यंत साऱ्या पृथ्वीचा उद्धार पूर्ण योगाला अभिप्रेत आहे हा विचार आतापर्यंत कुणीही मांडलेला नव्हता.

सामान्यपणे जिला आम्ही माणसाची पूर्ण वाढ मानतो – ती म्हणजे मानसिक प्रगती, नैतिक शुचिता, खंबीर स्वभाव, प्राणिक शक्ती, शारीरिक आरोग्य वगैरे. ही काही ईश्वरी पूर्णता नव्हे. ही फक्त निसर्गाने व्यक्त केलेल्या काही अंगांची प्रगती होय. सर्वांगिण पूर्णता ही आत्मिक पूर्णतेनेच (Intergrality of the soul) मिळू शकते. यासाठी आपल्याला मनाच्या पलिकडे गेले पाहिजे. अतिमानस शक्तीची जोड मिळवली पाहिजे. ही अतिमानस शक्ती हाही परमेश्वरी आत्मतत्त्वाचाच एक आविष्कार होय. या शक्तीनेच विश्वाची निर्मिती व विश्वाचे नियंत्रण होत असते.

ही अतिमानस शक्तीच माणसाला पूर्णत्वाकडे नेईल. परमेश्वरी तत्त्व मानवात आहेच. पण त्याचे कार्य पडद्याआड चालते. तो पडदा दूर व्हायला हवा. श्रीअरविंदांना देहासकट आत्मा, जगासकट जगदीश हवा आहे. देवाच्या सृष्टीत काहीही कायमचे त्याज्य नाही. सौंदर्य जीवनाला विघातक नसून त्याचा आनंद वाढविणारे आहे. पूर्ण योगाने कलादृष्टीला तर वाव दिलाच पण उद्योगधंदे, व्यापार, शेती अशा सर्व जीवनोपयोगी व्यवसायांनाही उत्तेजन दिले.

ज्या प्रक्रियेने आपण हल्लीची जीवनपद्धती टाकून उच्च व विशाल जाणिवेची पद्धती स्वीकारू, त्या प्रक्रियेलाच पूर्णयोगामध्ये योग म्हणतात. श्रीअरविंदांची ही योगपद्धती सामान्यांच्याच नव्हे तर बुद्धिवंतांच्याही पद्धतीहून वेगळी आहे. आपली जी अहंकारयुक्त किंवा अहंकारमय जाणीव आहे, ती बदलून वैश्विक जाणीव मिळविणे हा उद्देश या योगासमोर आहे. माणसाचा उगम ईश्वरी, म्हणजेच वैश्विक जाणिवेत आहे. तेथूनच तो अवतीर्ण झाला आहे आणि तिथे परत पोहोचणे हेच त्याचे ध्येय असले पाहिजे.

जीवनापासून निवृत्त करणारी आध्यात्मिकता हे पूर्णयोगाचे उद्दिष्ट नाही, तर आध्यात्मिक शक्तीने जीवन जिंकणे, परिवर्तित करणे, हे त्याचे ध्येय आहे. आपली अहंकारयुक्त वा अहंकारमय जाणीव आहे ती बदलून आपण वैश्विक जाणीव मिळवणे हा योगाचा उद्देश आहे. यासाठी पूर्ण समर्पण हवे. आपल्या मनाची द्वारे ईश्वरशक्तीसाठी सदैव खुली ठेवली पाहिजेत. ध्येयासाठी प्रयत्न करणे म्हणजेच जीवाचे आरोहण होय व त्या प्रयत्नांना ईश्वर उत्तर देतो. ईश्वरकृपेचा आपल्यावर वर्षाव करतो ही ईशकृपा खाली येतांना धक्के देत येत नाही. शांतपणे, हळूहळू अगदी शरीराच्या तळापर्यंत पोचते. त्यामुळेच मन, प्राण, शरीर-सर्व घटकांची सर्वांगाची प्रगती होते. उन्नती होते. ईशकृपेचे अवतरण हीच पूर्णयोगाची खरी सुरवात असते आणि ईशकृपेने साधकाचे दिव्यतेत परिवर्तन घडवून आणणे हे पूर्ण योगाचे उद्दिष्ट असते.

या योगात कुंडलिनी शक्ती जागृत करण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात कुंडलिनी जागृत झाल्यावर काय काय गोंधळ घालते, त्याचा किती त्रास होतो, तो इथे होत नाही. पूर्ण योगाचे ध्येय समाधी अवस्था प्राप्त करणे नाही. समग्र मानवी स्वभावाचे अतिमानवी, दैवी स्वभावात परिवर्तन व्हावे, हे पूर्ण योगाचे ध्येय आहे. दैवी शक्तीला संपूर्ण शरणागती हे त्या ध्येयाचे साधन आहे.

हे ध्येय प्राप्त करण्यासाठी बाहेरून व आतून दोन्हीकडून जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

बहिरंग साधना

पूर्ण योगात शरीराला हीन, क्षुद्र मानलेले नाही. शरीर सुदृढ ठेवणे व दीर्घायु प्राप्त करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी व्यायाम करायला हवा व कार्यप्रवणताही हवी.

हठयोगासाठीही शरीर सुदृढ व निकोप असण्याची आवशक्यता असते. त्यात वेगवेगळे बंध व आसने असतात. षट्चक्रांचे भेदन असते. ज्ञानेश्वर महाराज सांगतात की हा मार्ग फार अवघड आहे. 'आव्हाटा' आहे. पूर्ण योगात हा अवघडपणा काढून टाकला गेला आहे. श्रीअरविंदांनी शरीरसाधनेला पुष्कळसे आधुनिक व सामूहिक वळण दिले आहे. व्यक्तीला साधनागृहातून त्यांनी बाहेर खुल्या मैदानात आणले. सामूहिक शिस्तीच्या कवायतींवर व खेळांवर श्रीअरविंदांनी व श्री माताजींनी जास्त भर दिला. सामुदायिक व्यायामात सहकाऱ्यांमुळे व्यायामाला हुरूप येतो व आपण जास्तीत जास्त चांगल्या रीतीने करून दाखववावे असे वाटत राहते. व्यायाम प्रकारांमध्ये पोहण्याचाही अंतर्भाव केलेला आहे. आसनांना त्याज्य मानले नाही पण त्यांचा आग्रहही केलेला नाही.

बहिरंग साधनेची पुढची पायरी म्हणजे कृतिशीलता. स्वकर्म कुसुमांनी परमेश्वराची पूजा करावयाची. वास्तविक पूजेमध्ये हीच कृतिशीलता आहे. पण पूर्ण योगात कृतिशीलतेचा अर्थ व्यापक आहे. बाह्य अस्तित्वाची पुनर्रचना हे या बहिरंग साधनेचे उद्दिष्ट आहे. 'योग: कर्मसु कौशलम्' हा गीतेचा सिद्धान्त महत्वाचा मानला आहे. आपण जीवनातील सर्व कामे कर्तव्य म्हणून करीत रहावे. त्यात आसक्तीचा लवलेशही नसावा. म्हणजे काम तर करावयाचेच पण नि:स्वार्थपणाने करावयाचे. नि:स्वार्थी काम कितीही लहान असले तरी विश्वाच्या विशाल अस्तित्वात प्रवेश करण्याकरिता ते तुमच्या संकुचित अस्तित्वाची कवाडे उघडू शकते.

तैतरीय उपनिषदामध्ये सर्व कार्ये कशी अनेक घटकांनी एकत्रित येऊन केलेली असतात हे दाखवले आहे. ते सर्वांचे परस्परावलंबित्व ध्यानात घेऊन ईश्वराकरिता काम करावयाचे. सर्वांचा सहभाग व ईश्वरी अधिष्ठानामुळे व्यक्तीचा अहंकार फणा काढू शकणार नाही. जे करावयाचे ते नेटकेपणे, पूर्ण शक्तीनिशी, हृदयापासून करावयाचे. मग ते झाडण्याचे काम असो, लेखनिकाचे काम असो, शाळेतील अध्यापनाचे काम असो, स्वयंपाकाचे असो कुठले ही असो काम लहान मोठे, श्रेष्ठ कनिष्ठ कसेही असो ते ज्या श्रद्धेने, ज्या उत्तम रीतीने केले असेल ते महत्वाचे. शिकवण्याची पाटी टाकण्यापेक्षा मनापासून लक्ख झाडण्याचे फळ अधिक मिळेल. त्यामुळे आपल्या वाट्याला जे काम आले असेल ते ईश्वर समर्पण बुद्धीने करणे, हे महत्त्वाचे आहे. अहंकाराला आपल्या कामातून निग्रहपूर्वक वगळले पाहिजे. म्हणजे रोजची कामे, रोजचा व्यवहारच आपल्या शुद्धीकरणाचे, परिवर्तनाचे साधन बनून जाईल. म्हणून साधकाने कधीही कर्मत्याग करावयाचा नाही. गीतेतही भगवंत नेमके हेच सांगतात, भाषा थोडीशी वेगळी आहे.

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मण:।
शरीरयात्रापि च ते न प्रसिध्द्येदकर्मण:। (३.८)
कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिण:।
जन्मबन्धविनिर्मुक्ता: पदं गच्छन्त्यनामयम्।। (२.५१)

थोडक्यात 'योगस्थ: कुरु कर्माणि' अनासक्त बुद्धीने, ईश्वरार्पण भावनेने कर्म करीत रहावे. कार्यमग्नता हा पूर्णयोगाचा पाया आहे. ईश्वराने दिलेली शक्ती त्याची त्याला अर्पण करण्याची संधी कामामुळेच मिळते म्हणून प्रत्येक काम, मग ते लहान असो वा मोठे असो, उत्तम रीतीने, व्यवस्थितपणे, सुसंवादी व सौंदर्यदृष्टीने करणे हीच देवपूजा आहे. हे कायम लक्षात ठेवायचे. काम तल्लीन होऊन करणे म्हणजेच ध्यान करणे होय. प्रत्येक कामामागे सदिच्छा, सहानुभूती व मनाचे औदार्यही असायला हवे.

तेव्हा हे ध्यानात ठेवायचे की नुसत्या ज्ञानाने खरी प्रगती होत नाही त्याला कर्मयोगाची जोड पाहिजेच.

अंतरंग साधना

व्यायाम, कसरत व सदिच्छापूर्वक कार्यमग्नता ही बहिरंग साधना झाली. त्याबरोबरच अंतरंग साधना हवीच. अंतरंगसाधनेचा नऊ अंगांनी विचार करावा लागेल. अहंकार, अंतरात्मा, अभीत्सा, प्रभुशरणता, त्याग, शांती, ध्यान, आरोहण-अवतरण व ईशकृपा.

१) अहंकार – 'मी' हेच जगातल्या अज्ञानाचे, कलहांचे, हेव्यादाव्यांचे, रागद्वेषांचे, युद्धाचे मूळ आहे. वास्तविक पाहता देवाने अहंकाराची निर्मिती जीवन जगण्याचे एक उपयुक्त साधन म्हणून केली. ही मीपणाची जाणीवच माणसाला आपले भरणपोषण, वाढ संरक्षण वगैरे आपल्या प्राथमिक गरजांकडे लक्ष देण्यास मदत करते. पण पुढे तो अहंकार उपयोगाचा नाही. त्याचा त्यागच करायला हवा. तसे करता न आल्यास त्या 'मी' ला विश्वव्यापक बनवायला हवे.

अहंकार जेव्हा डोईजड बनतो तेव्हाच तो 'अज्ञान' बनतो. वास्तविक पाहता, आपली अस्मिता हीसुद्धा नित्य, अविनाशी आत्म्याचाच एक आविष्कार होय. जे परमात्वतत्त्व विश्व व्यापून राहिलेले आहे तेच आत्मरूपाने, निरूपाधिक शुद्ध मी च्या रूपाने प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात स्थित आहे. याची आपण जाणीव ठेवली पाहिजे.

ज्या अहंकाराने आपल्याला संकुचित, मर्यादित, वेगळेपणा दिला, तो नको आहे. कारण तसला अहंकार हा साऱ्या अशांतीचे बीज आहे. आपल्याला एकटेपणा नको एकात्मता हवी आहे. असला अहंकार म्हणजे आपल्या अंतरात असलेल्या ईशतत्त्वाची केवळ बाह्य छाया होय. आपल्याला आपल्यातील ईशतत्त्वाची जाणीव होऊ लागते तेव्हा या छाया अहंकाराची गरज संपते.

वासनात्मक आत्मा (desire soul) विकारी, जड व अज्ञानमय आहे. मन, प्राण, शरीर यांच्या सर्व हालचालींवर याचेच नियंत्रण असते. हा वरवरचा, मिरवणारा अहंकार, खरा अहंकार वा अंतरात्मा आत खोल ठिणगीसारखा असतो. हा खरा अहंकार आपण आधी शोधायचा व मग झेप घ्यायची विश्वात्म्याकडे Universal soul कडे.

पण इथेच थांबून रहायचे नाही. या विश्वात्मकतेच्याही पलिकडे या विश्वात्मकतेचे नियंत्रण, मार्गदर्शन करणारी अतिवैश्विक Transcendental अनंतता आहे. ते आपले खरे गंतव्य स्थान आहे. 'सा पराकाष्ठा.'

२) अंतरात्मा – अशा रीतीने परमेश्वराचे रूप त्रिविध आहे. विश्वातील, विश्वात्मक व वैयक्तिक. त्यातील वैयक्तिक रूप ही दुहेरी – शिव व जीव. मुंडक उपनिषदांतील तृतीय मुंडकाच्या प्रथम खण्डातील प्रथम मंत्रांत म्हटल्याप्रमाणे,

'द्वा सुपर्णा सयुज सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते।'

एक सुखदु:खांची फळे खाणारा व दुसरा साक्षीभावाने पाहणारा. जीव (soul) हा संसारात गुरफटलेला व शिव (self) साक्षी भावाने पाहणारा पण दोन्हीही ईश्वराचेच अंश असतात.

या जीवाला (soul) श्रीअरविंद psyche म्हणतात. psychic being म्हणजे 'चित्पुरूष' वा अंतरात्मा. साधकाने या अंतरात्म्याचा शोध घेऊन त्याला पुढे आणले पाहिजे. नऊ द्वारांच्या या पुराचा (देहाचा) राजा म्हणजे अंतरात्मा, अहंकार त्याचा प्रधान आहे. त्याला डोईजड होऊ द्यावयाचे नाही. या अंतरात्म्याची अखंड जाणीव ठेवली पाहिजे. म्हणजे मग आंतरात्मिक परिवर्तन psychic Transformation पूर्ण होईल.

अंतरात्मा प्रकट झाला की आपल्या मानसिक, प्राणिक, शारीरिक स्मृती अधिक स्पष्ट होऊ लागतात. पूर्वजन्म दिसू लागतात. पुनर्जन्म आवडीप्रमाणे घेता येतो. हे साध्य झाल्यावर विश्वात्मकाची ओळख करून घ्यावयाची.

हे आत्मतत्त्व जड चेतन सर्वात भरून राहिलेले असते. अंतरात्माही ईशतत्त्वाची, ईश्वर जाणिवेची एक ठिणगी आहे. ईशतत्त्वाच्या या ठिणगीने हळूहळू जडद्रव्याचे परिवर्तन, त्याची प्रगती सुरू होते.

अंतरात्म्याचा साक्षात्कार करून घेणे हा या पूर्णयोगातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. अन्य योगसाधनेत तो अखेरचा टप्पा-गंतव्य स्थान मानले जाते. यासाठी पतंजली मुनींनी शुचितेवर, यमनियमांवर भर दिला आहे. श्रीअरविंद शुचितेचे महत्त्व मान्य करतात पण यमनियमांना महत्व देत नाहीत. प्रत्येकाने आपल्या स्वभावाप्रमाणे, कलाप्रमाणे विकास करून घ्यावा, असे त्यांना वाटते. आपले सत्त्व व अस्तित्व प्रेममय करण्यावर श्रीअरविंदांचा भर आहे.

३) अभीप्सा – अहंकाराचे ओझे उतरवले, अंतरात्म्याचे दर्शन झाले की खरी साधना सुरू होते. साधनेची मुख्य त्रिसूत्री म्हणजे अभीप्सा, प्रभुशरणता व त्याग.

अभीप्सा म्हणजे Aspiration जिथे जायचे तिथे पोचण्याची उत्कट इच्छा हवी, प्रामाणिक निष्ठा आणि सोज्वळ, तळमळ हवी. काम करण्याची जिद्द, तडफ, हुशारी यांना अभीप्सेत विशेष महत्व आहे. नुसती इच्छा पांगळी असते. ईशशक्तीला केलेले आवाहन म्हणजेच अभीप्सा. अशी अभीप्सा आपल्यात आपला अंतरात्माच उत्पन्न करतो.

अभीप्सा ही स्थिर, अखंड, दक्ष आणि सतत राहणारी हवी, तिला मन, बुद्धी व भावना यांची सोबत असली पाहिजे. अभीप्सा व प्रार्थना यांची जवळीक आहे. अभीप्सेला श्रद्धा सहाय्य करते. अभीप्सेचा उगम हृदयात असतो. ती आत्मसमर्पणाला सदैव तयार असते. तिच्यात स्वार्थ नसतो. अभीप्सेची देणगी जन्मजात नसते ती मिळवावी लागते.

४) प्रभुशरणता – प्रभुशरणता ही अभीप्सेची धाकटी बहीण. भक्ती ही प्रभुशरणतेची गंगोत्री. श्रीअरविंदांच्या पूर्ण योगाला ज्ञानाचे मस्तक, भक्तीचे हृदय व कर्माचे हातपाय लाभले आहेत.

सर्व संत व सर्व आचार्य प्रभुशरणतेला आत्यंतिक महत्व देतात. शरणागतीचा गाभा म्हणजे ईश्वरावर पूर्ण श्रद्धा. माकडीचे पिल्लू ही आईवर निर्भर असते. तिला घट्ट धरून असते पण मांजरीचे पिल्लू आईवर स्वत:ला पूर्ण सोपवून निवांत असते. तशी प्रभुशरणता हवी.

शरणागती म्हणजे असहायता, दीनता नव्हे. ईशशक्तीशी पूर्ण जागृतीत, स्वखुशीने केलेले ते सहकार्य आहे. या सहकार्याची परिणती तादात्म्यात होते. शरणागती व प्रयत्न यात विरोध नाही. पहिला टप्पा प्रयत्नाचा व नंतरचा शरणागतीचा. प्रयत्नांना दिव्य शक्तीची, ईशशक्तीची जोड आवश्यक असते. म्हणून प्रयत्न व शरणागती सहकार्याने राहतात. पूर्णयोगातील शरणागती म्हणजे कळकळीने आणि सातत्याने केलेला प्रयत्न.

आत्मसमर्पण ही शरणागतीची पहिली पायरी. पूर्ण शरणागती म्हणजे आपल्या प्रत्येक भागातील अहंकाराची गाठ सोडून तो तो भाग शुद्ध स्वरूपात ईश्वराला अर्पण करणे. प्रभुशरणता आली की अन्य कोणत्याही योगाची, साधनेची आवश्यकता राहात नाही. ईश्वराची शक्ती अमर्याद आहे. तोच सर्व करवून घेतो.

५) त्याग – नको असलेल्या गोष्टींचा त्याग हा प्रगतीला सहाय्य करणारा असतो. मनाला प्रलोभनांच्या तावडीतून सोडवावयाचे हे त्यागाचे काम आहे. मनाला मनानेच आवरायचे. चित्तनिरोध करावयाचा. त्यासाठी अभ्यास हवा, वैराग्य हवे. कुठल्याही गोष्टीला चिकटायचे नाही कायमचे. लेप लावून घ्यायचा नाही. निर्लेप रहावयाचे.

अनासक्ती, निरहंकार व निरिच्छा हा प्रेमाचा अभाव नव्हे तर तो प्रेमाचा विस्तार होय. ईशावास्य उपनिषदात संभूति व असंभूति जाणायला हवी हे सांगितले आहे. ही असंभूति म्हणजेच त्याग.

६) शांती – त्यागाची परिणती शांतीत होते. निर्विचार होण्यात खरी शांती आहे. छांदोग्य उपनिषदात उपकोसलाची गोष्ट आहे. उपकोसलाला अग्नी सांगतो 'कं म्हणजे खं, खं म्हणजे कं, कं, कं खं म्हणजे ब्रह्म.' कं म्हणजे सुख व खं म्हणजे पोकळी, काही नसणे. काही नसणे म्हणजेच सुख व तेच ब्रह्म आहे. म्हणजेच निर्विचार होणे हाच खरा आनंद, खरी शांती.

आपण मनावर सर्व गोष्टींसाठी विसंबून असतो. ती सवय सोडायला हवी. ईश्वरकृपा व आंतरिक आत्मा सर्व कामे बिनबोभाट करू शकतात. मन वास्तविक नोकर आहे. मालक नाही. तो सांगकाम्या नोकर आहे. कामचुकारही आहे. त्याला काबूत आणले की शांतीची स्पंदने म्हणजेच आपल्या अंतरात्म्याची शक्ती अधिक व्यवस्थितपणे, अधिक शहाणपणाने कार्यरत होते. अंतरात ह्या शांतीची स्थिरता लाभली की विश्वमनाशी आपला संबंध जोडला जातो. वैयक्तिक जाणिवेचा विश्वातल्या श्रेष्ठ जाणिवेशी जोडलेला हा संबंध फार प्रभावी व सर्वव्यापी असतो. त्याने शरीर, प्राण, मनासकट आपल्या सर्व अंगोपांगात एकाच दिव्यशक्तीचा संचार सुरू होतो. जीवनाला समन्वय, सुसंबद्धता, तालमयता प्राप्त होते.

हे प्राप्त करण्यात पहिला अडथळा मनाचा असतो. आपण आपल्या चित्तवृत्तींचा निरोध केला पाहिजे. पण ध्यान हा शांतीचा खरा उपाय नाही. मन:शांती असेल तर ध्यान लागते. ध्यान सुटले की परत अशांतीचा अंमल सुरू होतो. पण तरीही दोन्ही परस्पर पूरक होऊ शकतात.

मन:शांतीच्या साधनेत प्राणिक विभागाला – याला श्रीअरविंद Vital म्हणतात – फार महत्व आहे. या प्राणिक विभागात प्राणिक मनाचे दर्शन होते. या भागात तीव्र अडचणींचा तसाच महान सत्तेचा उगम होतो. आपल्या प्रेरणांना, भावनांना, वासनांना आकार द्यावयाचा, त्यांचे समर्थन करावयाचे हे याचे काम. या प्राणिक मनाला शिस्त लावायला हवी. चांगले जपून वाईट दूर करावयाचे. ही क्षमता मन:शांतीच्या साधनेनेच येऊ शकेल. या मन:शांतीमुळे विचार-विकारांची स्पंदने थोपवता येतील. आपण प्रतिसाद दिला नाही तर ती आपोआप शांत होतील.

याच्या वरचा स्तर खऱ्या प्राणिक शक्तीचा True vital चा.

उत्स्फूर्त एकाग्रता हे या शक्तीचे स्वरूप. मूलगामी निश्चलता ती हीच. हीच नव्या क्षमतेच्या झऱ्यांचे, उत्साहाचे उगमस्थान होय. दुःखवेदनांची नाव-निशाणीही नसलेल्या असीम आनंदाची प्राप्ती हिच्यामुळे होते. आपली जाणीव विस्तारते. विश्वव्यापी बनते. श्रीअरविंद म्हणतात, 'अशा जाणिवेच्या स्थितीत योगी पूर्ण शांती, सत्ता, स्वतंत्रता, सामर्थ्य, प्रकाश, ज्ञान, आनंद यांची मूर्ती बनतो.'

समता हाही शांतीचा एक वेगळा प्रकार आहे. शरीराची समता म्हणजे निकोप प्रकृती. सुदृढ शरीर आणि नियंत्रित मज्जातंतू (nerve) आत्म्याची समता मानसिक आहे. वस्तूचा किंवा घटनांचा संपर्क किंवा संघर्ष सहन करण्याची शक्ती म्हणजे ही समता होय.

७) ध्यान – एकाग्रता ही ध्यानाचा प्राण आहे. श्रीअरविंद ध्यानाच्या शारीरिक क्रियेला महत्व देत नाहीत. या एकाग्रतेला महत्व देतात. या एकाग्रतेला नीरवता फार सहाय्यकारी आहे. त्यामुळे भोवतालच्या कोलाहलाचा आपल्यावर परिणाम होणार नाही. पूर्णयोगातील ध्यानाला विशिष्ट जागा व विशिष्ट आसनाची आवश्यकता नसते. महत्व स्थिरतेला व सुखी अवस्थेला आहे. ध्यान म्हणजे शांततेने, एकाग्रतेने परमेश्वराचे केलेले आवाहन. बाकीचे तपशील स्वभाव व परिस्थिती प्रमाणे बदलू शकतात. ध्यान कृतिशील, सक्रिय (Dynamic Meditation) वा निष्क्रिय Passive Meditation असू शकते. काम करता करता वा काहीही न करता स्थिर बसून ध्यान करणे. मनन चिंतन याही ध्यानाच्याच पायऱ्या श्रीअरविंद मानतात. Meditation व Contemplation त्यातील चिंतन ही पायरी वरची. एखाद्या विषयासंबंधीच्या विचारांच्या साखळीवरील किंवा मालिकेवरील एकाग्रतेला श्रीअरविंद मनन म्हणतात. तर एकएकट्या विचारावरील, कल्पनेवरील, प्रतिमेवरील एकाग्रतेला ते चिंतन म्हणतात.

मनहृदयाचे भांडे रिकामे करावयाचे. विचार विकारांचे जाणे येणे साक्षीभावाने पहावयाचे, शरीर, प्राण, मन शिथिल करावयाचे. व आपण विचार-विकारांवर स्वार व्हायचे. ते धुमाकूळ घालून शांत होतील. अशा प्रकारे ध्यानाने मन व हृदय संयमित झाले, शुद्ध झाले की त्यांच्यातून उत्स्फूर्तपणे प्रार्थना बाहेर पडू लागते. ईश्वराशी आपण बोलू शकतो.

सर्व श्रेष्ठ जाणिवेपर्यंत पोचायचे पण तिथे थांबायचे नाही. भौतिक जगालाही जाणिवेचा लाभ करून द्यावयाचा. व्यक्ती व समष्टी दोघांचाही उद्धार करणे, हे पूर्ण योगाचे साध्य आहे.

८) आरोहण व अवतरण – विश्वनिर्मिती म्हणजे त्या पूर्णाने खाली उतरत उतरत नेणिवेपर्यंत पोचणे व मग अज्ञानाची संगत नको वाटून पुन्हा वर जाऊ लागणे. विश्वातीत प्रभु विश्वात्मक झाला. याला श्रीअरविंद अवक्रांती (Involution) म्हणतात. ज्या ज्या माध्यमातून परमेश्वराचे प्रकटीकरण होत गेले त्या माध्यमाचाही विकास होऊ लागतो.

आरोहण अवतरणाचा म्हणजेच चढण उतरणीचा आणखी एक प्रकार म्हणजे जी जाणीव नेणिवेपर्यंत उतरली Inconscient रूपापर्यंत उतरली. ती जाणीव चढत चढत मानवापर्यंत आली. माणसाला या जाणिवेने खूप देणग्या दिल्या- भरपूर बुद्धि दिली, निवडीची संधी दिली, विवेकाचे सामर्थ्य दिले. या आधाराने त्याने उच्चमन Higher mind, प्रकाशित, प्रकाशमय मन Illumined mind, प्रतिभमन Intuitive mind, अधिमानस Over mind व अतिमानस Super mind अशा पायऱ्या चढत जावयाचे आहे व स्वतःला शरीरासकट, पूर्णता व दिव्यता आणावयाची आहे. हे त्याचे आरोहण आहे.

पण इथे यश केवळ प्रयत्नांनी मिळत नाही. ईशकृपेने मिळते. कुंडलिनी ऐवजी श्रीअरविंदाचा या ईशकृपेवर जास्त भर आहे. ती ईशकृपा आपल्यात उतरली पाहिजे. ईशशक्तीचे प्रत्यक्ष संक्रमण त्यांना अभिप्रेत आहे. हे अवरोहण वा उतरणे. ईश्वराच्या कृपेचा हात धरून ही शिडी उतरायची आहे. अगदी पायाच्या तळव्यापर्यंत उतरून शरीराला दिव्यता प्राप्त करून देणे, हे तिचे कार्य आहे. तसेच पृथ्वीच्याही निम्नतम स्तरापर्यंत ही दिव्यता पोचवायची आहे.

९) ईशकृपा – श्रीअरविंदांच्या पूर्णयोगात ईशकृपेला साधनेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. ईशकृपा हे साध्यही आहे व साधनही आहे. पूर्णयोगाच्या साधनेकडे नुसते वळणेसुद्धा ईशकृपेवर अवलंबून आहे. प्रगतीला तर ईशकृपा हवीच हवी. साधनेची परिणती ही ईशकृपेतच आहे.

प्रयत्न आपण करावयाचा व यश परमेश्वरावर सोपवायचे हेच जीवनाचे रहस्य आहे. प्रयत्न साधनेचे क्षेत्र नांगरून तयार ठेवायचे, ते सुफलित ईशकृपेने होते. ती ईशकृपा झाली की आपले काम अगदी सोपे होते. ती आपल्याकडून सर्व करवून घेते.

अशा रीतीने मानवाने आपली पूर्ण प्रगती करून घ्यावयाची. पुन्हा खाली येऊन शरीरालाही दिव्य करावयाचे व नंतर समष्टीला पृथ्वीलाही दिव्य करावयाचे. हा श्रीअरविंदांचा पूर्ण योग आहे. शरीराला दिव्य करणे, समष्टीला व पृथ्वीलाही दिव्य करणे, हे आतापर्यंत कुणीही सांगितले नव्हते. श्रीअरविंदांनी हा नवा विचार पूर्ण योगाच्या रूपाने जगापुढे ठेवला. हा मार्ग थोडा वेगळा आहे. श्रीअरविंदांचे बोट धरून तो सर्वांना आक्रमिण्याजोगा आहे.

ह्या लेखासाठी श्री. प. गं. पाळंदे यांच्या श्रीअरविंद साधनापद्धती व मार्गदर्शन या पुस्तकाचा आधार घेतला आहे.

– डॉ. सौ. अंशुमती अ. दुनाखे
विन्दांधु प्लॉट नं १३, तेजस सहकारी गृहरचना
तेजसनगर, कोथरूड, पुणे ४११०३८
फोन – २५३८५०२३

***

पृथ्वीवरील विकासक्रमाचे कार्य अजून समाप्त झालेले नाही. बुद्धी ही या विकासक्रमातील अंतिम स्थिती नाही, आणि तर्काला अनुसरून विचार करणारा प्राणी (मानव) हेच प्रकृतिने घडविलेले परमोच्च रूप नव्हे. पशुकोटीतून विकास पाऊन मानव अस्तित्वात आला, तसाच मानवकोटीतून अतिमानस पुरुष (मानव)- दिव्य मानव- अस्तित्वात येईल.

– श्रीअरविंद



श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाची त्रिसूत्री

सौ. सुनंदा शाळिग्राम
एम.ए. (मराठी)
स्वामी सत्यदेवानंद यांच्या शिष्या, श्रीगीता, श्रीज्ञानेश्वरी व भागवत निरूपणसेवा, प्रवचनकार

माणसाला पूर्णत्वाकडे नेणारा योग म्हणजे पूर्णयोग! माणसाला अपूर्णतेची बोच असते; पण पूर्णतेची ओढ असते. माणूस अपूर्ण असतो कारण त्याची चेतना मर्यादित स्वरूपात कार्य करीत असते. मानवी चेतना वृद्धिंगत झाली, तिला आत्मस्वरूपाची जाण आली की, ती अधिक विशाल होऊन विश्वचैतन्याशी एकरूप झाली, इतकच काय, पण तिचे परिवर्तन दिव्य चेतनेत झालं, तर मानवाचं महामानवात रूपांतर होईल. चेतनेचं असं सर्वांगीण, सर्वोच्च व विशाल परिवर्तन करणारा योग, म्हणजे पूर्णयोग!

आपल्याला 'योग' नवीन नाही. नराचा नारायण करतो, तो योग! जीव-शिवाचे ऐक्य घडवितो, तो योग! आत्मदेवाची भेट घडवितो, तो योग! विश्वात्मक देवाची ओळख करून देतो, तो योग! कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, राजयोग, हठयोग या सर्व योगांची परिपूर्ती 'आत्मसाक्षात्कारा'त होते! पण श्रीअरविंदांचा 'पूर्णयोग' आत्मसाक्षात्कारापर्यंत थांबत नाही. आत्मसाक्षात्कारासाठी वरील सर्व योगांमधील ग्राह्यांश श्रीअरविंद स्वीकारतात. पण त्यांच्या पूर्णयोगातील तो महत्त्वाचा पहिला टप्पा आहे. या टप्प्यात आपल्या चेतनेला म्हणजे जाणिवेला अंतरात्म्याकडे वळवून अंतरात्म्याचा बोध करून घेतात. दुसऱ्या टप्प्यात या 'जाणिवेला' वृद्धिंगत करून व्यक्तिमर्यादांच्या पलीकडे नेऊन वैश्विक जाणिवेशी जोडून त्याशी एकरूप करतात. इथे **विश्वात्मक** देवाचा साक्षात्कार होतो. पुढील तिसऱ्या टप्प्यात अतिमानसाच्या अलौकिक सामर्थ्याचे संचरण व्यक्तिमत्त्वाच्या अणूरेणूत घडविणे, ही आहे पूर्णयोगाची परिपूर्ती! **विश्वातीत** प्रभूचा साक्षात्कार तो हाच! म्हणजे परमात्म्याचा त्रिविध रूपात साक्षात्कार या पूर्णयोगाने घडणार आहे. वैयक्तिक म्हणजे अंतरात्म्याचा, विश्वात्मक आणि विश्वातीत! मनाचे उन्नयन व रूपांतर अतिमानसात घडवून अतिमानसाचे अवतरण भूतलावर घडवून आणण्याचे कार्य श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाने केले. जगाचा त्याग न करता किंवा जगाकडे पाठ न फिरविता अतिमानसाच्या योगे जगात व जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे अरविंदांनी ठरविले. श्रीअरविंदांच्या मते परमेश्वरी कृपेशिवाय साधना सफल होणार नाही. मात्र परमेश्वरी कृपा होण्यासाठी अलौकिक आत्मतयारी व्हावयास हवी. ही आत्मतयारी होण्यासाठी श्रीअरविंद साधनात्रयी सांगतात- १) अभीप्सा, २) प्रभुशरणता, ३) त्याग, योग (ध्यान) व ईशकृपा. श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाची ही त्रिसूत्री आहे.

१. अभीप्सा (Aspiration) –

श्रीअरविंद 'The Mother' या आपल्या पुस्तकात म्हणतात, ''अभीप्सा ही एक महान् शक्ती आहे. ईशकृपेला खालून हाक देणारी ही शक्ती आहे. आपल्या अस्तित्वाचा, आपल्या व्यक्तित्वाचा आर्त आवाज ईश्वरापर्यंत पोचविणारी शक्तीही हीच. आपल्या अस्तित्वाची सर्व दारे ईशकृपेच्या प्रवेशाकरिता वात्सल्याने उघडून ठेवणारी शक्तीही हीच. ही शक्ती म्हणजे अतिमानसाचाच एक आविष्कार होय.''

अभीप्सा म्हणजे ईशशक्तीला केलेले आवाहन. त्या सर्वोच्च शक्तीने, त्या उच्चतम जाणिवेने आपल्यापर्यंत खाली उतरावे म्हणून हे आवाहन! दिव्यतेला मारलेली हाक म्हणजे अभीप्सा! अभीप्सा उत्कट असेल तर ती फलद्रूप होण्यात कोणत्याही परिस्थितीचा व्यत्यय येत नाही. पण अभीप्सेत तळमळ ओतप्रोत असेल तरच ईशकृपा कार्यान्वित होते. अभीप्सेत जशी कळकळ हवी, तसेच सातत्य हवे. ती स्थिर अखंड, दक्ष व सतत राहणारी हवी. श्रीअरविंद म्हणतात, 'पूर्णवेळ करावयाचा योग, तो पूर्णयोग! किंवा आयुष्यभर करावयाचा योग म्हणजे पूर्णयोग!' ईशकृपेचा अंतिम साक्षात्कार होईपर्यंत आपण अभीप्सेची सोबत सोडता कामा नये. एकवेळ आपण स्वत:ला विसरलो तरी चालेल; पण देवाला विसरता कामा नये. देवाची सदैव स्मृती राखण्याचे कार्य अभीप्साच करते. सत्य, ईशतत्त्व हे आपले ध्येय, त्याच्याकडे सतत लक्ष ठेवणे, ध्येयाची सदैव आठवण ठेवून त्यासाठी सतत दक्ष राहणे म्हणजे अभीप्सा! ध्येयावर ती जागता पहारा ठेवते. जीवाला शिवाची सदैव लागलेली ओढ म्हणजे अभीप्सा! तिच्या आर्ततेत ईशशक्तीला आपल्याकडे खेचून आणण्याचे सामर्थ्य आहे. ती कधी प्रार्थनेच्या रूपात शब्दातून व्यक्त होईल, तर कधी अश्रूंतून! पण ती दुबळी नाही. ध्येय गाठण्याची जिद्द तिच्यात आहे. त्यासाठी अथक प्रयत्न करण्याची शक्ती तिच्यात आहे. मार्गातल्या अडथळ्यांना दूर करण्याचं धैर्य तिच्यात आहे. कितीही काल लागला, तरी वाटचालीमध्ये उत्साह ती टिकवून ठेवते; नैराश्य येऊ देत नाही. कारण प्रभूवर तिचा उदंड विश्वास आहे. श्रद्धेला ती तडा जाऊ देत नाही. अंगीकृत कार्यावर तिची निष्ठा आहे. परमात्म्याबद्दल कृतज्ञता आहे; याचना नाही! काय द्यायचं आणि केव्हा द्यायचं, हे तिने परमात्म्यावर सोपविलं आहे. ती नुसती 'सदिच्छा' नाही. आपला अंतरात्मा हेच तिचे उगमस्थान आहे. खरी प्रेरणा त्या अंतरात्म्याची! तिला कोणत्याही बाह्य उपकरणाची

जरूरी नाही. निरांजन नको, उदबत्ती नको. अभीप्सा स्वत:च अंतर्ज्योत आहे. आपल्या सर्वोच्च ध्येयावर ती अखंड प्रकाश टाकीत असते. इच्छेप्रमाणे स्वार्थाच्या काजळीने ती मलिन होत नाही. तिची ही शुद्धता आनंददायी असते. तिचा उगम हृदयात असतो व तो उत्स्फूर्त असतो. ती आनंदमयी असते. आपले मन, बुद्धी, सारी आंगोपांगे यांची साथ तिला असली पाहिजे. तरच ती ईशकृपेचा प्रवेश थेट आपल्या पार्थिव भागापर्यंत होण्याकरिता देहाला लायक बनवील. आत्मसमर्पणाला ती सदैव तयार असते. म्हणूनच परमार्थाला अत्यंत आवश्यक नव्हे, अपरिहार्य असणारी शरणागती अभीप्सेमुळेच शक्य होते.

२. प्रभुशरणता (सर्वसमर्पण)

भगवंताला आपल्याजवळ आणणारा प्रभूशरणतेइतका सरळ व सोपा मार्ग नाही. आपल्या जीवनाची सर्व जबाबदारी ईश्वरावर सोपविण्याचा निर्णय म्हणजेच शरणागती. शरणागतीच्या भावनेचा गाभा म्हणजे ईश्वरावर पूर्ण श्रद्धा. ही जर असेल तर मग इतर कोणतीही तपश्चर्या करावयास नको, असे श्रीअरविंद म्हणतात. जेव्हा अंतरात्मा, हृदय व विचारशील मन या सर्वांसकट आपण प्रभूला शरण जाऊ, तेव्हाच शरणागतीला पूर्णता येईल मात्र ईश्वरकृपेवाचून शरणागतीला पूर्णता नाही. त्या कृपेसाठी आपल्या अस्तित्वाची सर्व दारे उघडून ठेवली पाहिजेत. आपली शरणागती मांजरीच्या पिलासारखी म्हणजे सर्वस्वाने प्रभूवर विसंबणारी व विसावणारी असावी, असे सर्वसंतांप्रमाणे श्रीअरविंदांना वाटते. सर्वच संतांनी शरणागती सांगितली असली तरी श्रीअरविंदांनी तिला आपल्या पूर्णयोगाचे एक प्रधान अंग बनविले. पूर्णयोगाच्या साधनेचे तिला एक अपरिहार्य घटक मानले. त्यांच्या मते सारे काही त्या एकमेवाद्वितीय ईशशक्तीत विलीन व्हावयाचे हाच शरणागतीचा सर्वोत्तम विलास होय! शरणागती म्हणजे असहाय्यता नव्हे. ईशशक्तीशी पूर्ण जागृतीत, स्वखुशीने केलेले ते सहकार्य आहे. याच सहकार्याची तादात्म्यात परिणती होते व ईश्वर पुढे येऊन आपल्या सर्व कार्याची धुरा स्वत: वाहू लागतो.

प्रयत्नांचे मोल पूर्णयोग जाणतो. पण माणूस कितीही प्रबल असला तरी त्याचे एकट्याचे प्रयत्न दुबळे ठरतात. त्याला ईशकृपेची जोड आवश्यक आहे, असे पूर्णयोगाचे म्हणणे आहे. आपल्या संपूर्ण जीवनाचे दिव्यीकरण करण्यासाठी ईशकृपेचे साहाय्य घेतलेच पाहिजे व हे साहाय्य मिळविण्याची गुरुकिल्ली म्हणजे शरणागती होय. ही शरणागती नुसती मानसिक असून उपयोगी नाही. प्रत्यक्ष आचरणात ती उतरली पाहिजे. पूर्णयोगातील शरणागती म्हणजे मनाने घेतलेला निर्णय नव्हे की, हृदयाने केलेला निश्चयही नव्हे. कळकळीने व सातत्याने केलेला प्रयत्न, केलेले परिश्रम म्हणजे शरणागती. आपल्या अनेकांगी अस्तित्वाला प्रत्येक भागाला शरणागतीचे वळण लावले पाहिजे.

आत्मसमर्पणाशिवाय प्रभुशरणतेची पूर्णता होऊ शकणार नाही. आत्मसमर्पण हे पूर्णयोगाच्या साधनेचे रहस्य आहे, असे श्रीअरविंद म्हणतात. समर्पण नसेल तर व्यक्तीचे संपूर्ण परिवर्तन होणे शक्य नाही. जेव्हा खरे आत्मदान होते, तेव्हा खऱ्या समर्पणाला सुरूवात होते. अहंकार व वासनाच समर्पणाच्या आड येतात. म्हणून शरणागती व ईशकृपा यांच्या आड येणारा अहंकाराचा सूक्ष्म पडदा बाजूला केला पाहिजे. तसेच भगवंताला शरण 'कशासाठी' जायचे? आपले सारे अस्तित्व त्याच्या सत्तेवर अधिष्ठित आहे, अवलंबून आहे. त्याची कृपाच आपल्याला अज्ञानातून, अपूर्णतेतून मुक्त करणारी आहे, असा विश्वास आहे म्हणून! काही मागण्यासाठी, कामनेने, अभिनिवेशाने शरणागत व्हायचे नाही! आपले संपूर्ण अस्तित्व ईशसत्तेच्या स्वाधीन करण्यासाठी शरण जायचे!

'त्वदीयं वस्तु गोविंद, तुभ्यमेव समर्पयेत्।' मी तुझाच आहे, तुझ्यातच लीन होऊ इच्छितो. तू माझा आपलेपणाने स्वीकार कर, या भावनेने प्रभुशरण व्हायचे! प्रामाणिकपणे प्रभुशरण झालेल्याच्या जीवनात कोणत्या खुणा उमटतात? मुख्य खूण म्हणजे तो कारण न विचारता, विरोध न करता, हक्काने मागणी न करता किंवा अट न घालता भगवंताची आज्ञा पूर्णत: पाळतो आणि सर्व दिव्य प्रभावांना प्रतिसाद देतो व जे काही भगवंताकडून आलेले **नसेल**, ते तो नाकारतो. भगवद्इच्छेचा स्वीकार व त्याच्याकडून आलेले नसलेल्याचा नकार म्हणजेच सक्रिय समर्पण होय आणि सर्व काही पूर्णत: भगवंतावर सोपविणे म्हणजे निष्क्रिय समर्पण! पण असे फारच थोडेजण करू शकतात.

३. (अ) त्याग

अभीप्सा व शरणागती यांना विरोध करील, त्यांच्यात व्यत्यय आणील, असा कोणताही परका विचार मनात येऊ द्यायचा नाही. जबरदस्तीने येऊ लागला तर, त्याला हाकलून लावायचे, त्याचा अव्हेर करायचा, ही त्यागाची कामगिरी! त्यागाने मनाचा कोपरा-न्-कोपरा स्वच्छ होतो. शरणागतीला योग्य अवसर मिळतो. मनाचे कल्पनातरंग, आवडीनिवडी, मतमतांतरे, सवयी या सर्वांचा आपण त्याग केला पाहिजे. असा त्याग करून मन शांत झाले म्हणजे ज्ञानाला तिथे जागा मिळते. आपल्या स्वभावातील मूर्खपणा, संशय, हट्टीपणा, क्षुद्रपणा, आळस यांचा आपण त्याग केला पाहिजे. आपल्या वासना, इच्छा, विकार, संवेदना नियंत्रित केल्या पाहिजेत. सत्याला विरोध करणाऱ्या गोष्टी आपण मनातून निपटून काढल्या पाहिजेत. हे शुद्धीकरण अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय आपले संपूर्ण परिवर्तन होणे, आपल्याला अधिकाधिक दिव्यता प्राप्त होणे शक्य नाही. गळू जसा आपल्या शरीराचा एक भाग बनतो; त्याशी तादात्म्य पावतो. म्हणूनच ते कापताना आपल्याला दु:ख होते. आपला क्रोध, मत्सर, कुविचार, अतिरेकी भावना इ. शी आपलेही असेच तादात्म्य झालेले असते. म्हणून त्यांना दूर करताना आपल्याला दु:ख होते. पण अशा विरोधी वृत्तींचा जेव्हा आपण निग्रहाने त्याग करू, तेव्हाच खऱ्या आनंदाचे आपण धनी होऊ.

आपल्याला खरंतर आपल्या सगळ्या जीवनाचा त्याग, करायचा नसून त्यातील चुकांचा, चुकीच्या कल्पनांचा, चुकीच्या आचरणांचा त्याग करायचा आहे. त्याग हे आपले प्रभावी साधन आहे. सर्वांगीण परिवर्तनाचे, पूर्ण साक्षात्काराचे ध्येय आपल्याला गाठायचे आहे. त्यासाठी आसक्ती, अहंकार आणि इच्छा (स्पृहा) यांच्या त्यागाची तयारी आपण ठेवली पाहिजे. हा त्याग बाह्य स्वरूपाचा असून चालणार नाही तर तो आंतरिक हवा. जीवन त्याज्य नाही, तर त्याची आसक्ती त्याज्य आहे. माणूस तिरस्करणीय नाही, त्याचा अहंकार त्याज्य आहे.

त्यागाची परिणती शांतीत होते. मनाची शांती ही साक्षात्काराची श्रेष्ठ साधना आहे, पूर्णयोगाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. जी जाणीवशक्ती आपल्या अंतरात आहे, तिचा आणि बाह्य मनाचा संपर्क साधून दिला म्हणजे मन शांत होते.

३. (आ) ध्यान (योग)

मन:शांतीचाच एक भाग म्हणजे ध्यान. ध्यान हे मन:शांतीचे एक साधन आहे. ध्यान म्हणजे शांततेने, एकाग्रतेने परमेश्वराला केलेले आवाहन! ध्यानाच्या कोणत्याही रूपात एकाग्रता हा मुख्य घटक आहे. आपल्या जाणिवेचे दार उघडण्यासाठी ध्यान ही किल्ली आहे. मनाची इतर दारे बंद केली म्हणजेच हे दार उघडते. श्री माताजी म्हणतात, 'प्रथम अस्तित्वाची एकता व नंतर हृदयाची शुद्धता या दुहेरी प्रयत्नांमुळेच एकाग्रता साधते व तिच्यामुळे ईशस्पर्श व ईशसान्निध्य लाभते.'

ध्यानाचे मुख्य दोन प्रकार – सक्रियध्यान व निष्क्रिय ध्यान. आपण बोलताना, चालताना, काम करताना जे ध्यान करू, ते सक्रिय ध्यान आणि कोणतेही काम न करता केवळ ध्यानासाठी म्हणून आसन घालून एखाद्या ठिकाणी डोळे मिटून जे ध्यान करू ते निष्क्रिय ध्यान. आणखी एका पद्धतीने ध्यानाची विभागणी केली जाते, मनन आणि चिंतन! मनाची प्रगती ही मनाच्या गतीवर अवलंबून नसून स्थिरतेवर अवलंबून आहे. मनाला स्थिर करणे हेच साधनेचे उद्दिष्ट आहे. एखाद्या विषयासंबंधीच्या विचारांच्या साखळीवरील एकाग्रतेला श्रीअरविंद 'मनन' (meditation) म्हणतात आणि एकएकट्या विचारावरील, कल्पनेवरील एकाग्रतेला ते 'चिंतन' म्हणतात. (Contemplation) मन एका विचारावर स्थिर करायचे, ही कामगिरी केव्हाही जास्त कठीण.

ध्यानसाधनेत आपल्या जाणिवेला आपण बाहेरून आत वळवीत असतो. ध्यान हेच अंतरंग साधनेचे मर्म होय. अंत:करणाचे भांडे रिकामे करून, योग्य तऱ्हेने भरणे हीच ध्यानाची मुख्य प्रक्रिया होय. ज्या अनिष्ट विचार-विकारांनी हे भांडे भरलेले असते, सारखे भरत असते, त्यांची आवक थांबवणे, साचलेली धूळ नष्ट करणे व शेवटी ईश्वरी अस्तित्त्वाच्या जाणिवेने ते रिकामे भांडे भरणे म्हणजे ध्यान! अंत:करणातील विचार-विकारांची ये-जा, त्यांच्यात न गुरफटता, साक्षित्त्वाने, तटस्थतेने पाहून, त्या विचार-विकारांना लाजविणे, त्यांचे आगमन बंद करणे, हा ध्यानाचा एक भाग! या क्रियेला तीव्र अभीप्सेची मदत होते. ईश्वराचे सर्वव्यापी, पण आपण विसरलेले अस्तित्त्व पुन्हा जाणण्यास, आपले अंत:करण त्याच अस्तित्त्वाने भरलेले आहे, हे ओळखण्यास आपली अभीप्साच आपल्याला मदत करते. ध्यानाची ही दुसरी क्रिया!

ध्यान हे परिवर्तनक्षम असावे. आपल्या स्वभावाच्या सर्वांगीण परिवर्तनाची, अस्तित्त्वाच्या सर्वांगीण उन्नतीची क्षमता त्या ध्यानात असली पाहिजे. आता श्रीअरविंद प्रणीत ध्यानाची पद्धत पाहू –

''ज्या क्षणी उजळती प्रकाशदीप अंतरी
संपती वासना जरी वांछित जन्मभरी
त्याक्षणी मिळे एकांत सुखी आत्म्याला
हितगुज करी लोपुनि मानसिक दरी।''

– श्रीअरविंद (सावित्री)

ध्यानासाठी योग्य आसन आवश्यक आहे. श्रीअरविंद म्हणत, त्यांचे आवडते आसन म्हणजे चालणे होते. ते म्हणतात, 'तुम्ही उभे राहा किंवा बसा. तुमचे शरीर एका रेषेत असले पाहिजे. तुमचे शरीर, मान व डोके सरळ रेषेत हवे. पाठीचा कणा ताठ असला पाहिजे. त्यामुळे शक्तीचा प्रवाह सहज होऊ शकतो.'

आसनानंतरची पुढची पायरी म्हणजे आपल्या श्वसनावर लक्ष केंद्रित करणे. आपल्या शरीरातील प्राणशक्ती व आपली विचारशक्ती यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. जेव्हा आपले मन क्षुब्ध होते, तेव्हा आपला श्वासोच्छ्वास अनियमित होतो. आपल्या श्वसनावर नियंत्रण करून शांतीचा अनुभव घेणे व मनावर ताबा मिळविणे शक्य आहे. दीर्घश्वसन हे महत्त्वाचे तत्त्व आहे. आपण श्वास शक्य तितक्या शांतपणे खोल आत घेतला पाहिजे व संथपणे तो बाहेर सोडला पाहिजे आणि या क्रियेचे निरीक्षण केले पाहिजे असे चार-पाच वेळा दीर्घश्वसन केले की आपले मन शांत होते व आपल्या विचारांचा प्रवाह थंडावतो. ध्यानाची ही पूर्वतयारी झाली.

यापुढील पायरी म्हणजे प्रत्याहार. आपल्या अस्तित्त्वाला सुसंघटित करून एकत्रित करण्याची सुरूवात करायची. आपले मन हजार वाटांनी धावत असते. त्याला एका निश्चित विषयावर केंद्रित करून जराही इकडे-तिकडे हलू द्यायचे नाही याला 'एकाग्रता' म्हणतात. मन थोडा वेळ एकाग्र करून आपण ज्यावर ध्यान लावले असेल त्या विषयाची कल्पना, विचार करणे, त्याचा सतत विस्तार करणे, त्यात बुडून जाणे याला 'ध्यान' म्हणतात.

आपण ध्यानाला बसलो की विचारांचा लोंढा सुरू होतो. यावर मात करण्याचे तीन उपाय आहेत. एक म्हणजे त्यांचे पृथक्करण किंवा विश्लेषण करणे. विचारांचे निरीक्षण करायचे पण त्यात भाग घ्यायचा नाही. अशाप्रकारे विचारप्रवाह वाहू दिला की त्याचा वेग मंदावतो. दुसरा उपाय म्हणजे प्रत्येक विचार बाहेरून येऊन मनात शिरण्यापूर्वी बाहेरच अडवायचा. याने मन विचारशून्य होते. पण विचारत्यागाचा हा मार्ग कठीण आहे. तिसरा उपाय म्हणजे विचारप्रवाह चालू द्यायचा, पण तिकडे लक्ष द्यायचे नाही. आपले सर्व लक्ष मूळ उद्दिष्टावर केंद्रित करायचे. ध्येयावरील आपली दृढता जशी वाढत जाते, तसतसे आपले मन ध्येयांशी एकरूप होऊ लागते. आपण ध्यान करीत आहोत, याचीही शुद्ध आपल्याला राहात नाही. समाधीची ही सुरुवात असते. पण समाधी हे श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाचे ध्येय नाही. आपल्या मनाच्या पृष्ठभागावरील जाणिवेला वर चढवीत, सर्वोच्च जाणिवेपर्यंत पोचवायचे आणि तेथे अतिमानसाला सर्वोच्च जाणिवेला, ईशकृपेला आवाहन करून तिला खालच्या पार्थिव पातळीपर्यंत उतरवायचे, असे हे दुहेरी कार्य आहे.

प्रथम जाणिवेची चढण कशी आहे, ते पाहू – ''दीर्घ श्वसनाला सुरूवात करा आणि त्याच श्वासाचा शक्य तितक्या खोलवर आत मागोवा घ्या. तुम्हाला असे वाटेल की, तुम्ही एखाद्या गुहेत उतरत आहात किंवा एखाद्या खोल विहिरीत उडी घेत आहात किंवा दरवाज्यामागून दरवाजे ओलांडून तुम्ही एका अत्यंत खोल दडलेल्या गुप्त दालनात प्रवेश करीत आहात. आपला श्वास म्हणजे एक आधाराची दोरी

आहे असे समजून तिच्या आधाराने तुम्ही खाली खोल अस्तित्त्वात उतरा. तुमच्या लक्षात येईल की तुमचा श्वास अतिशय मंद झाला आहे.''

ध्यानासाठी दिवसातून एकदाच जास्त वेळ बसण्यापेक्षा थोडा थोडा वेळ, पण **जास्त वेळा** बसा. शक्य तितक्या जास्त वेळ आपण ध्यानावस्था आचरणात उतरविली पाहिजे. आपल्या ध्यानाची वेळ व ध्यान न करण्याची वेळ यातील कालावधी हळूहळू कमी कमी करत आणला पाहिजे. आपण रोजचे कार्य करीत असतानाही आपल्या ध्यानातील भूमिका आपण न सोडता चालविली पाहिजे. ध्यानातील आपली वृत्ती पवित्र, समर्पणाची व ग्रहणाची असते. तीच अखंडित तशीच चालू ठेवली पाहिजे. खंडित ध्यानापेक्षा अखंडित ध्यानाची स्थिती सातत्याने चालविली पाहिजे. हे साधले की आपले कार्यच ध्यानरूप होते व आपल्या हातून घडणारी प्रत्येक गोष्ट परमेश्वराला समर्पित होते. ध्यानाच्या सतत अभ्यासाने आपल्याला परम चेतनेचा व उच्च शांतीचा कायम लाभ होतो. उत्कट अभीप्सा, संपूर्ण शरणागती व त्यागाने संपूर्ण शुद्धीकरण झाल्यानंतर केलेले सततचे ध्यान-यानेच आपल्यावर 'ईशकृपा' होते.


३. (इ) ईशकृपा

पूर्णयोगाचा मुकुटमणि म्हणजे 'ईशकृपा'. ईशकृपेच्या मार्गात अहंकाराची भिंत असता कामा नये. तीव्र अभीप्सा आपल्या अंत:करणात असली पाहिजे. खरी शरणागती केली पाहिजे. तिच्या पडद्याआड कोणतीही कामना लपून राहता उपयोगी नाही. तरच ईशकृपा तुमच्या आवाहनाला प्रतिसाद देईल. तुमच्या अस्तित्त्वाची, व्यक्तित्त्वाची सर्व दारे ईशकृपेच्या प्रवेशाकरिता तुम्ही उघडून ठेवली पाहिजेत. ईशशक्तीचे प्रत्यक्ष संक्रमण आपल्यात होईलच होईल. नुसत्या मानवी प्रयत्नांनी साधनेला पूर्णत्व येत नाही. पूर्णता येते ती, पूर्णाच्या मदतीने म्हणजे ईशकृपेने! ही ईशकृपा आपल्यात उतरली पाहिजे असे श्रीअरविंद म्हणतात. यालाच ते आध्यात्मिक साधनेचे अवरोहण, उतरणे म्हणतात. ईशकृपा आपल्यात उतरताना शरीराच्या कणाकणातून, पेशीपेशीतून दिव्यीकरणाचे कार्य करते. ईशकृपेने साधकाचे दिव्यतेत परिवर्तन घडवून आणणे हेच पूर्णयोगाचे उद्दिष्ट. म्हणून श्रीअरविंदांनी ईशकृपेला पूर्णयोगाचा पाया मानले आहे. किंबहुना पूर्णयोगाचा आदि, मध्य व समाप्ती हे सारे ईशकृपेनेच व्याप्त आहेत. श्रीअरविंदांनी ईशकृपा हाच आध्यात्मिक साधनेचा मुख्य आधार मानला आहे. इतर योगात ही ईशशक्ती कुंडलिनीच्या रूपाने वर चढते, तर पूर्णयोगात ही ईशकृपेच्या रूपाने खाली उतरते आणि साधकाला 'दिव्य जीवन' प्रदान करते. त्याचे सर्व जीवन योगच होते! समाजाच्या उद्धारासाठी तो आपली शक्ती वेचतो. जग त्याच्याकडे 'तारणहार' म्हणून पाहते. श्रीअरविंद म्हणतात, ''भगवत्स्पर्शाने अंतरात्म्यात परिवर्तन पावून आम्हाला त्या दिव्य, विद्युत शक्तीचे जणू काय 'डायनॅमो' होऊन जगात कार्य करायचे आहे व अखिल मानवजातीत तिला अंत:करण हालवून सोडीत व विकिरण करीत प्रवाहित करायचे आहे. अशासाठी की, आम्हांपैकी कोणी एखादा कुठेही उभा राहिल्यास त्याच्या भोवतालचे शेकडो लोक भगवत् प्रकाशाने व शक्तीने पुलकित होतील, भगवंतमय व आनंदमय होतील.''

- सौ. सुनंदा शाळिग्राम

पुणे. मोबाईल - ९१७५५२२९९०.

■ ■ ■



श्रीअरविंद प्रणीत ध्यानसाधना

श्री. सचिन बोरकर
आर्किटेक्ट, लेखनाची आवड

श्रीअरविंद प्रणीत ध्यानसाधना हा विषय मांडतांना प्रथम एक गोष्ट नमूद करू इच्छितो की, ध्यानाची पद्धती शिकविणे हा या लेखाचा उद्देश नाही. तो माझा अधिकारही नाही. तर ध्यानाचा परिचय करून देणारी एक छोटीशी खिडकी उघडणे असा आहे. म्हणून ध्यान, योग ह्या विषयी बाळगल्या जाणाऱ्या काही पूर्वग्रहांचा निरास करणे, साधनेचे उद्दिष्ट व सर्व साधनमार्गातील अंतस्थ सूत्राचा विचार करणे, ध्यानाची उपयुक्तता प्रतिपादन करणे व श्रीअरविंदांचे ध्यानविषयक चिंतन या मुद्यांच्या आधारे या विषयाची मांडणी करणार आहे.

साधनेचे उद्दिष्ट व अंतस्थ सूत्र :

आत्मज्ञानाची प्राप्ती, आत्मसाक्षात्कार हे जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे. आपल्या सर्व साधना या एकाच ध्येयानुगामी आहेत. बाह्य आचरणानुसार कर्म, भक्ती आणि योग अशा तीन शीर्षकांखाली साधनेची प्राथमिक विभागणी केली जाते. या शीर्षकाचा अखेरीस 'मार्ग' असेही जोडले जात असल्याने या तीन पूर्णत: भिन्न वाटा आहेत असाही समज प्रचलित आहे. आपल्या साधनेचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करताना इतर साधनांवर टीका करणे घडते. प्रसंगी संतांच्या वचनांचाही सोयीस्कर अर्थ काढून त्यांचे दाखले दिले जातात. विशेषत: गूढता, विलक्षण परिभाषा, चमत्कारिक घटना, सिद्धी आदी वलयांमुळे योगमार्गाकडे अत्यंत पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून पाहिले जाते व त्यापासून चार हात लांब रहाणेच पसंत केले जाते. साधनेच्या प्रकारात असे तट पडणे उचित नाही. वस्तुत: एकाच भगवंताच्या प्राप्तीसाठीचा तो खटाटोप आहे. त्यामुळे त्यात अंतर्विरोध नसून परस्पर पूरकताच आहे. साधनेच्या अंतरंगात डोकावून पाहाता याचा उलगडा होतो. साधनेचे अंतस्थ सूत्र शोधण्यासाठी आपल्याला मनाचे स्वरूप व कार्य तसेच साधनेचे परिणाम यांचा विचार करावा लागेल. त्यासाठी प्रारंभी मूलभूत प्रश्नाचा विचार करूया.

- आत्मप्राप्तीचे ध्येय केव्हा साध्य होईल?
- देह अहंता पूर्ण लय पावले तेव्हा.
- देह अहंता लय केव्हा पावेल?
- चित्त विशुद्ध होईल तेव्हा.

चित्तस्य शुद्धये कर्म न तु वस्तूपलब्धये ।
वस्तुसिद्धी: विचारेण न किंचित् कर्मकोटिभि: ।।

जगद्गुरू आद्य शंकराचार्यांनी या सूत्रातून साधनेविषयी मौलिक मार्गदर्शन केले आहे. आपल्या अनेकानेक जन्मात इच्छा, वासना, प्रतिक्रिया, रागादि उर्मी, अविद्या अस्मिता आदि क्लेश अशा मनोव्यापारांचे ठसे संस्कार-रूपात चित्रातील कर्माशयात संग्रहित असतात. ते यथावकाश सुप्त वा प्रकट होत आपल्या प्रारब्धीय कर्म सूत्राची गुंफण करीत असतात. चित्रातील हा कर्म संस्कारांचा संग्रहच देह अहंतेचे पोषण करीत असतो. हेच संस्कार बंधनाचे कारण ठरतात. म्हणून आपल्या सर्व साधना चित्ताच्या विशुद्धी करता सांगितल्या आहेत. विशुद्ध चित्तच आत्मज्ञानाचा विचार ग्रहण करु शकते. ही विशुद्धता साधण्यासाठी एकाग्रतापूर्वक कर्म सांगितले आहे. योगाभ्यास असो, संध्यादि कर्मानुष्ठान असो वा नामसंकीर्तन, भजन, ईशसेवा, गुरुसेवा आदि भक्तीची अंगे असोत. साधक जर स्वत:स विसरून अत्यंत एकाग्रतेने आपल्या साधनेत तल्लीन झाला तर आणि तरच तो ज्ञान प्राप्तीच्या लक्ष्यापर्यंत पोहचू शकतो. कारण एकाग्र व्यवस्थेत देहाचा अहंबोध सहजतेने विलीन झालेला असतो. तद्विपरीत जर साधक आपल्या साधनेचा अभिमान बाळगेल, तिच्यात लिप्त होईल तर त्यास इप्सीत प्राप्त होत नाही. श्री दासगणु महाराज श्री गजानन विजय ग्रंथात सांगतात,

''योगी योग क्रियेचा । जरी अभिमान वाहि साचा ।
तरी तयासी तत्त्वाचा । खरा बोध ना होईल ।।
योगक्रिया वरून । अलिप्त रहावे तयापासून ।
कमलपत्रा समान । तरीच तत्व कळून यें ।। ६-६४-६५ ।।''

हाच नियम सर्व साधनास पूर्णत: लागू पडतो. कर्मानुष्ठानी जर सोवळे, ओवळे, कर्मे यांचा भक्त जर आपले इष्ट दैवत, गुरू, जप संख्या, साधना यांचा अहंभाव फुलविणारा व द्वैतभाव बळावणारा दुरभिमान बाळगेल तर तो साध्याप्रत पोचू शकणार नाही आणि 'उपायची होय अपाय' या समर्थोक्ति प्रमाणे मोकळे होण्यासाठी केलेली साधनाच बंधनाचे कारण होईल.

या ठिकाणी एक गोष्ट सुस्पष्टपणे समोर येते की, चित्तशुद्धी व देह अहंतेचा निरास हेच एकमेव सर्व साधनांचे सूत्र आहे. बाह्यांगे भिन्न दिसत असली तरी अंतर्मार्ग एकच आहे.

अंतर्मुखता, एकाग्रता वर्धिष्णु करत, चित्तातील कर्म संस्कारांची

पुटे झपाट्याने नष्ट करीत, हृदयस्थ चैतन्याची दिव्यानुभुती प्रदान करणारे 'ध्यान' हे या अंतर्मार्गावर गतिमानतेने प्रगती साधून देणाऱ्या सर्वोत्तम साधनांपैकी एक साधन आहे.

तेव्हा भिन्न बाह्य स्वरूपामुळे पूर्वग्रहदूषित दृष्टीने न पाहता, साधनांच्या तुलनेत न अडकता आपल्या शारीरिक व मानसिक प्रकृतीस अनुरूप अशा साधनांची समन्वयात्मक निवड व त्यांचे आचरण करून आत्मप्राप्ती करून घेणे अधिक इष्ट आहे.

या साधन समन्वयाविषयी श्रीअरविंदांचे विचार अत्यंत उद्बोधक आहेत. ते मी येथे उद्धृत करतो. ''..... इस वृत्ति के मूल मे अज्ञानपूर्ण धारणा काम कर रही है। वह यह की व्यक्तिको अनिवार्य रूपसे केवल कर्म या केवल ध्यान करना चाहिये। या तो कर्म ही साधन है, या ध्यान ही साधन है, दोनो भला कैसे साधन हो सकते है! जहातक मुझे मालूम है, मैने कभी नहीं कहा की ध्यान नही करना चाहिये। कर्म और ध्यान मे खुला या लुका-छिपा संघर्ष खडा कर देना भेय-जनक मनकी एक चालकी है जो पुराने योग से संबंध रखती है। कृपया याद रखो की मै सदा ही उस पूर्णयोग का प्रतिपादन करता रहा हू जिसमे ज्ञान, भक्ति, कर्म-चेतना का प्रकाश, आनंद एवं प्रेम, कर्मो के निमित्त संकल्प एवं सामर्थ्य भगवान का ध्यान, पूजा, सेवा सब का अपना अपना स्थान है।'' (ध्यान और एकाग्रता - पृ. ३१)

श्रीअरविंदांचा ध्यानविचार :

श्रीअरविंदांनी आपल्या दीर्घ योगतपस्येने प्रत्येक व्यक्तीस आचरता येईल असा समन्वयकारी पूर्ण योग जगाला दिला आहे.

पृथ्वीवरील शेकडो वर्षांच्या उत्क्रांतीनुसार सध्या मानव मनाच्या पातळीवर जगत आहे. पण उत्क्रांती होता होता 'उच्च मन', 'प्रदीप्त मन', 'अंतर्ज्ञानात्मक मन', 'अधिमानस' या अवस्थांमधून विकसित होत होत शेवटी 'अतिमानसात' त्याची परिणती होईल असे श्रीअरविंदांनी प्रतिपादित केले आहे.

अर्थ व स्वरूप :

ध्यानाचा अर्थ व स्वरूप विशद करतांना श्री अरविंद सांगतात -

'ध्यान या भारतीय शब्दाच्या अभिव्यक्तीसाठी इंग्रजीत Meditation व Contemplation असे दोन शब्द प्रयोग वापरले जातात. एखादा विषय, विचार, भावना यावर मन एकाग्र करणे हे Meditation व या एकाग्रतेतून तो विषय, विचार, भावना यांचे ज्ञान चित्तात उदित होणे हे Contemplation अशा रीतीने विचार वा ज्ञानावर केलेली एकाग्रता हेच ध्यानाचे मूळ स्वरूप आहे. याच्या जोडीला स्वामी विवेकानंदांनी मार्गदर्शित केलेली 'आत्मनिरीक्षणात्मक' एकाग्रता असेही ध्यानाचे एक रूप आहे. या ध्यानाच्या क्रियेने मन विशुद्ध, सजग व निष्कंप अशा अवस्थेत पोहोचते, जिथे दिव्य ज्ञान प्रकट होऊन आपले संस्कार मनावर ठसविते. ध्यानात चिंतनाच्या मानसिक प्रक्रियेतून मन मुक्त होत असल्याने श्रीअरविंद ध्यानास मुक्तिदायक ध्यान' असेही संबोधितात.

हृदयस्थ चैतन्याच्या दृढ अनुभूतीने युक्त होऊन सर्व कर्माचरण सहज, स्वाभाविकतेने (जीवन्मुक्ततेने) करणे हे मुख्य ध्येय साध्य करून देणारे, ध्यान हे एक प्रमुख साधन आहे. त्यात कसलाही अट्टाहास अपेक्षित नसून 'सहजता' व 'स्वाभाविकता' यांनी युक्त ध्यानच सर्वोत्तम असल्याचे श्रीअरविंद सांगतात.

आवश्यक अवस्था :

ध्यान हे विशिष्ट वेळ, स्थान, आसन अशा बाह्य अवस्थांनी बांधिल असणे श्रीअरविंदांस मान्य नाही. या गोष्टी साधनेच्या केवळ प्रारंभीच्या अवस्थेत अत्यंत आवश्यक व महत्त्वाच्या आहेत. वस्तुतः ध्यानाच्या अभ्यासाने अशी अवस्था प्राप्त करून घेतली पाहिजे की सर्व परिस्थितीत झोपून, बसून, हिंडता, फिरता, एकांतात, नीरव शांततेत, कोलाहलात ध्यान सहजतेने साधणे शक्य झाले पाहिजे.

मनाची धावाधाव, विस्मरण, निद्रा, शारीरिक अधीरता, चंचलता या अंतस्थ ध्यान-विघ्नांच्या विरूद्ध दृढ संकल्पित एकाग्रता आणि अविकारित मनाची शांत, शुचि अवस्था या दोन गोष्टी ध्यानासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

ध्यान व कर्म :

अंतर्मुख होताना कर्माच्या बाह्यचेतनेची उपेक्षा श्रीअरविंदांना मान्य नाही. अशा असंतुलित एकमुखते विषयी सावध करताना साधकाने आंतरिक अनुभूती व बाह्य कर्माचरण सम चेतनेने सांभाळावे.

मन सुदृढ होईपर्यंत अधिक काळ ध्यान करण्याची परवानगी श्रीअरविंद देत नाहीत. असे करण्याने बाह्य तथ्यांशी असलेला संस्पर्श तुटून सामंजस्य हीन गती उत्पन्न होऊन जीवनाची समतोलता भंग होण्याचा धोका ते दाखवून देतात.

एकाग्रता :

सैरभैर चेतनेला एकत्र आणून अपेक्षित स्थानी केंद्रित करणे म्हणजे एकाग्रता. ही स्थिती कुठल्याही ओढाताणीशिवाय साध्य करणे आवश्यक आहे. अविचलता व शांतता ही एकाग्रतेची वैशिष्ट्ये असल्याने चंचलता व अतिउत्सुकता असलेल्या व्यक्तीच्या ठायी ती अभावाने आढळते, त्यामुळे या दोहोंचा निरास एकाग्रताप्राप्तीसाठी आवश्यक आहे.

बौद्धिक चिंतनाचे केंद्र जरी मस्तिष्क असले, तरी चेतना ही सर्वत्र विद्यमान आहे व तिचे कोणतेही केंद्र नाही. योगात मस्तक व हृदय ही दोन प्रमुख स्थाने सांगितलेली आहेत. त्यांना मानसकेंद्र व चैत्यकेंद्र अशीही संज्ञा आहे. परंतु त्याचा अर्थ असा नाही की त्या विशिष्ट स्थानाशी एकाग्र व्हायचे, अपितु स्थानाच्या सहाय्याने भगवंताशी एकरूप होणे हे लक्ष्य आहे. ते स्थान केवळ साधनरूप आहे.

एकाग्रतेच्या भयाचा निरास करून शांती व आनंदाचा अनुभव घेत नीरव व मुक्त मनाकडे वाटचाल करणे हे साधनेचे ईप्सित आहे.

मनात उठणारे भावकल्लोळ, साधने दरम्यान येणारी निद्रा आदी ध्यानातील अडथळ्यांचा परिचय व त्यांच्या निवारणाचे उपाय, ध्यानास पूरक प्रणवजप, नामजप आदी विषयी श्रीअरविंदांनी सखोल मार्गदर्शन. अनेक बारकाव्यांसह केले आहे. ध्यानाच्या पद्धतीसह त्यांचा अभ्यास

मुळातून करणे इष्ट असल्याने त्याचा ऊहापोह या लेखात करीत नाही.

अशा पद्धतीने ध्यानाचा सम्यक् अभ्यासाची वाटचाल समाधीच्या दिशेने होत जाते.

आत्मप्राप्तीच्या वाटचालीत ध्यानाची महत्ता व उपयुक्तता आपण पाहिली. ध्यान जर सद्गुरूंकडून दीक्षेने प्राप्त झाले असेल तर उत्तमच. पण जर तसे साधत नसेल तर संतांच्या श्रीअरविंदांसारख्या महायोग्यांच्या वाङ्मय रूपास शरण जाऊन, त्यांच्या मार्गदर्शनाचे अध्ययन करून अभ्यास करणे श्रेयस्कर ठरते. आत्मरूपाशी तदाकार होऊन जगज्जीवनी निरंतर होऊन राहिलेले हे शरणागतवत्सल महात्मे साधकांना सदैव मार्गदर्शन करीत असतात.

साधन कोणतेही असो, आत्मप्राप्तीचे साध्य प्राप्त होणे महत्त्वाचे, ज्या योगे आपल्या पूर्वसूरींचे वंशज म्हणवून घेण्यास खऱ्या अर्थाने पात्र होऊ. सर्वांना त्या शाश्वत सत्याच्या प्राप्तीची प्रेरणा देणाऱ्या छांदोग्य उपनिषदातील शांती मंत्राने लेखनास पूर्णविराम देतो.

आप्यायन्तु ममांगानि। वाक् प्राणश्चक्षुः
श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि सर्वं
ब्रह्मोपनिषदम्। माहं ब्रह्म निराकुर्याम् मा मा
ब्रह्म निराकोदनिराकरणमस्त्वनिराकरणं मे अस्तु।
तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि
सन्तु ते मयि सन्तु।।

(माझे शरीरबल, मनोबल, करचरणादि समस्त अवयव, वाणी, नेत्र, श्रवणादि सारी इंद्रिये, पंचप्राण त्या ब्रह्मतत्त्वांतच बुडून राहावेत. माझे सारेच जीवन परिशुद्ध तत्त्वमय व्हावे. ब्रह्मप्राप्तीचे साधन हातून घडण्याकरिता व त्या ब्रह्मत्त्वाचा साक्षात्कार होण्याकरिता, आवश्यक असे सर्व सामर्थ्य माझ्या मन इंद्रियांना प्राप्त होवो. सर्व उपनिषदांत ज्याचे प्रतिपादन केले आहे. ते ब्रह्मच हे सर्व आहे असा माझा सदैव निश्चय असो. मी त्या ब्रह्मस्वरूपाचे निराकरण करू नये व त्या स्वरूपानेही माझे निराकरण करू नये अशा या अनिराकरणाचे भाग्य व लाभ मला होवो. त्या ब्रह्मात्मैक्याच्या अभ्यासात मी नित्य असतां उपनिषदात वर्णिलेली सारी ब्रह्मलक्षणे माझे ठायी प्रकट होवोत...)


।। ॐ तद् सत् ।।

सचिन बोरकर
६, अरविंद कॉम्प्लेक्स (जुनी), नित्यानंद हॉलजवळ,
२५/६ हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता,
पुणे - ४११०५१
मोबाईल : ९९७५५६८४४३

■ ■ ■

ज्या दिवशी माणसाच्या जीवनाच्या सर्व कक्षांना त्याचा आत्मा स्पर्श करू शकेल त्या दिवशी माणसाचा देव झालेला असेल!

- श्रीअरविंद



श्रीअरविंद श्री माताजी – पूर्णयोग अतिमानस

प्रा. सौ. नीलिमा पाठक डाके

एम्.ए. (इंग्रजी), एम्.कॉम., एम्.बी.ए., एल्.एल्.बी.
प्राध्यापिका स्पोकन इंग्लिश क्लासच्या संचालिका. श्रीअरविंद श्री माताजींवर अनेक व्याख्याने दिली. श्री. दीक्षित आयोजित नैनीताल येथील 'study-camp' मध्ये श्रीअरविंद– श्री माताजी, त्यांचा पूर्णयोग, त्यांचे महाकाव्य 'सावित्री' अशा विविध विषयांवर व्याख्याने दिली. श्रीअरविंद श्रीमाताजी पुणे सेंटरची Chair-person आहे. अनेक अभ्यास सत्रे गेली कित्येक वर्षे चालू आहेत.

श्रीअरविंद श्रीमाताजी यांचा हा पूर्णयोग (Integral yoga), अतिमानस योग (Transcendental Yoga, Supramental Yoga), पूर्णत्वाचा योग (Yoga of Perfection), रूपांतरणाचा योग (Yoga of Transformation), पृथ्वीचा योग (Yoga of the earth).

श्रीअरविंद आणि श्री माताजी यांच्या पूर्णयोगाचे वैशिष्ट्य हेच आहे की, "All Life is Yoga." 'संपूर्ण जीवन हे योगच आहे.' आम्हाला परमेश्वराची (Divine) सेवा करायची आहे. या योगाचा कुठल्याही धर्माशी, जातीशी, पंथाशी, राष्ट्राशी संबंध नाही. हा योग संपूर्ण मनुष्यजातीसाठी आहे. आपले हे परमभाग्य आहे की श्रीअरविंद हे भारतीय आहेत. श्री माताजी सुद्धा जरी फ्रेंच असल्या तरी त्यांना भारताविषयी लहानपणापासून प्रेम, आदर आहे म्हणूनच पुढे त्यांनी दुहेरी नागरिकत्व स्वीकारलेले आहे. (फ्रेंच आणि भारतीय). पदुचेरी येथील आश्रमामध्ये त्यांनी अथक साधना करून हा प्रकाशमार्ग (Sunlit-path) मनुष्यजातीला उपलब्ध करून दिलेला आहे. भारत ही आपली मातृभूमी किती श्रेष्ठ आहे, व ज्या भारतामध्ये आमचा जन्म झाला ते आम्ही भारतीय नागरिक किती पुण्यवान आहोत हे या अतिमानस योगाने सिद्धच केलेले आहे. भारत ही संतांची भूमी आहे. इथला प्रत्येक धूलिकण पवित्र आहे. आज सर्व जगाला मार्गदर्शनाची गरज आहे. राजकारण, अर्थकारण, शासन, सत्ता, शिक्षण, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही 'क्षेत्रात' आज आम्हाला मार्गदर्शन करू शकतील ते केवळ श्रीअरविंद आणि श्रीमाताजी, श्रीअरविंदांची ही भविष्यवाणी आहे की काळाच्या ओघात भारत देश हाच सर्व जगाला मार्गदर्शन करू शकेल. जगाच्या इतिहासात एक अशी पहाट उगवेल की ज्या क्षणी जगातील सर्व राष्ट्रे, देश, खंड, सांपत्तिक दृष्ट्या कितीही थोर असले तरी ते 'भारता'पुढे नतमस्तक होत असलेली दिसतील. श्रीअरविंद श्रीमाताजींच्या या पूर्ण योगाची वैशिष्ट्ये आधी लक्षात घेऊ.

श्रीअरविंद म्हणतात,

"Where all the other Yogas end my Yoga begins."
ङ्'जिथे इतर सर्व योग थांबतात तेथेच माझ्या योगाची सुरुवात होते.''

याचा अर्थच असा की 'मुक्ती' हे या योगाचे ध्येयच नव्हे, तर आम्हाला या संपूर्ण पृथ्वीलाच अज्ञानातून मुक्त करायचे आहे. आम्हाला इथून उठून स्वर्गात जायचे नाही तर तर तो संपूर्ण स्वर्गच आम्हाला पृथ्वीवर आणायचा आहे. जीवनाचे दिव्यत्वीकरण पृथ्वीचे स्वर्गीकरण आम्हाला करायचे आहे. परा आणि अपरा यांच्यामधील अंतर संपून अपरा प्रकृतीचे परा प्रकृतीमध्ये आम्हाला रूपांतर करावयाचे आहे.

श्रीअरविंद म्हणतात की, मला परमेश्वराचे संपूर्ण रूप पहावयाचे आहे. त्याचे सर्वांग परिपूर्ण रूप, व्यक्तिमत्त्व मला पृथ्वीवर आणावयाचे आहे. म्हणून त्यांनी या पूर्णयोगाचे आशीर्वाद वरदान मनुष्यजातीला दिलेले आहे. श्रीअरविंदांच्या पूर्णयोगात सर्व मार्गांचे एकत्रीकरण करण्यात आलेले आहे. (The synthesis of Yoga) (योगसमन्वय).

भक्तियोग
राजयोग
कर्मयोग
हठयोग
ज्ञानयोग

सर्व मार्गांचे एकत्रीकरण करा. सर्व मार्ग चोखाळा सर्व मार्गांनी पुढे जा. म्हणजे तुम्हाला परमेश्वराचे खरेखुरे एकांगी नव्हे तर सर्वांगपरिपूर्ण असे दर्शन होईल. नुसते दर्शन घेऊन आम्ही थांबणार नाही तर या परमेश्वराच्या लहरी पृथ्वीवर (जडतत्वात) आणण्याचे महत्त्वाचे काम आम्हास करावयाचे आहे.

तीन तत्त्वप्रणाली जाणून घेऊ या

१) Aspiration (तीव्र अभीप्सा) :

प्रत्येकाच्या हृदयामध्ये परमेश्वराला भेटण्याची तीव्र तळमळ, अभीप्सा ही असलीच पाहिजे. उत्कट इच्छा असल्याखेरीज मार्ग दिसत नाही. परमेश्वर भेटावा जीवाशिवाची गाठभेट व्हावी असे आंतरिकदृष्ट्या वाटलेच पाहिजे. हृदय, अंत:करण, चित्त, चैत्य–पुरूष (Psychic-being) अंतरात्मा हा फक्त परमेश्वर ईश्वर पुरुषोत्तमाच्याच प्रतीक्षेत असला पाहिजे.

२) Rejection (नकार) :

पृथ्वीच्या सुरुवातीपासूनच चांगले वाईट हे युद्ध सुरू आहे. राम आहे तिथे रावण आहे. कृष्ण आहे तिथे कंस आहे. पांडव आहेत तिथे कौरव आहेत, Positive आणि Negative forces चा हा लढा हे युद्ध पृथ्वीच्या सुरूवातीपासून आहेच. आपण हा योग स्वीकारताना, अंगीकारताना सत्याच्या चांगल्या गोष्टींच्याच बाजूने ठामपणे उभे राहिले

पाहिजे. राक्षस, सैतान, भूत, पिशाच्च ही आहेतच त्यांना श्रीअरविंद श्रीमाताजींच्या नामस्मरणाने पळवून लावले पाहिजे.

३) **Surrender शरणागती :**

श्रीअरविंदांच्या या योगाची प्रमुख तत्वप्रणाली म्हणजे परमेश्वराला संपूर्ण शरणागती.

हा योग तुम्ही आम्ही करत नसून ती भगवती माता, आदिती, जगज्जननी, मीराम्बिका तुमच्याकडून करवून घेत आहे.

आज जो 'Ego' अहं या जगावर राज्य करत आहे त्याचे परिणाम आपण सगळे पहात आहोतच. निसर्ग हे परमेश्वराचे रूप आहे. त्याचा आदर आपण केला पाहिजे. त्याच्यापुढे नतमस्तक व्हायला पाहिजे, हे न केल्यामुळे अहंचे अधिराज्य जगावर आल्या कारणाने आम्ही अनेक नैसर्गिक आपत्तींना, संकटांना तोंड देत आहोत. निसर्गचक्र बदलायला लागले आहे. ''नेमेचि येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा'' असे म्हणण्याचे दिवस मनुष्याच्या दुष्कृतींमुळे संपले आहेत. प्रचंड प्रमाणात झाडेतोड, सिमेंट क्रॉंकिटची जंगले, नैसर्गिकतेकडून कृत्रिमतेकडे माणसाचा प्रवास वाढत आहे. म्हणूनच वेळी-अवेळी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्कळा, पूर, भूकंप, वादळे, ज्वालामुखी, चक्रीवादळ (सँडी, कॅटरिना, नीलम) यांना मनुष्यजातीला तोंड द्यावे लागत आहे.

श्रीअरविंद म्हणतात, ''मानव हा संक्रमणावस्थेतील प्राणी आहे. "Man is a transitional-being." मनुष्यप्राणी हा काही उत्क्रांतीवादातील शेवटचा टप्पा नव्हे. उत्क्रांतीवादामध्ये ज्याप्रमाणे आधी पंचमहाभूते नंतर वनस्पती जीवन, पशु-जीवन, प्राणीजीवन. आधी सरपटणारी जनावरे, मग माकड डायनोसर, मग माणूस अशी आपण प्रगती करत आलेलो आहोत. म्हणून मनुष्यप्राणी हा काही शेवटचा टप्पा नाही. ह्याच्यापुढे आपल्याला श्रीअरविंद श्रीमाताजीच्या आशीर्वादाने प्रचंड प्रगती करायची आहे. परंतु मनुष्यातील जनावर जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत त्यातील मनुष्यत्व जागे होणार नाही आणि मनुष्यात्व जागे झाल्याखेरीज तो ईश्वत्वाकडे जाऊ शकणार नाही. म्हणून श्रीमाताजींनी सांगितल्याप्रमाणे, प्राणिक प्रकृतीच्या वासना मागण्या, लालसा, संवेदना, आवेग, स्वार्थीपणा, गर्व, उद्धटपणा, कामुकता, लोभ, मत्सर, हेवादावा 'सत्याशी' वैर यांचा आपण त्याग केला पाहिजे.

श्रीअरविंद श्रीमाताजींच्या पूर्ण योगातील काही महत्त्वाचे शब्द.

१) **Psychic-being (चैत्य-पुरुष) :**

अंगुष्ठमान पुरुष :

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।१ ।। गीता - श्रीकृष्ण

ध्यानाद्वारे प्रत्येकाने आपला चैत्य-पुरुष (soul) शोधून काढावा. यासाठी श्रीअरविंद श्रीमाताजींनी ध्यानाच्या दोन पद्धती सांगितल्या आहेत.

१) **Through Heart हृदयाच्या बाजूने :** हृदयाच्या मागे आतआत खोलवर जाऊन जी गुहा आहे त्यामध्ये हा चैत्य-पुरुष बसलेला आहे. हा परमेश्वर आहे. तो प्रत्येकाच्या हृदयामध्ये आहे. तो आपल्याला शोधून काढायचा आहे. त्या आत्म्याच्या संदेशाप्रमाणे आपल्याला वागायचे आहे. परमेश्वराने आपल्याला पृथ्वीवर पाठवताना हा वाटाड्या आपल्याबरोबर दिला आहे. त्याच्या संदेशाप्रमाणे, आदेशाप्रमाणे आपल्याला पृथ्वीवर काम करायचे आहे. कारण आत्म्याचा संदेश आदेश हा परमेश्वराचाच आवाज आहे. आम्हाला आंतरिक हाक आंतरात्म्याचा आदेश पाळावयाचा आहे. आज व्यक्ति 'अहं'च्या आदेशाने काम करत आहे. अहं ची जागा चैत्य पुरुषाने घेतली पाहिजे. हा 'हृदयस्थ गुह्यम' हृदयात दडलेला चैत्य-पुरुष पुढे आला पाहिजे आणि त्याचे सर्व कामावर अधिपत्य असले पाहिजे.

२) **Through Head डोक्याच्या वरील बाजूने :** आपल्या डोक्याच्या वर ३ ते ४ फुटांवर जे सहस्त्रार चक्र आहे त्याच्या वर सर्व परमेश्वरी स्तर आहेत. आपल्या सहस्रावरील हे सर्व स्तर लक्ष एकाग्रचित्त करून आपल्याला हळूहळू शरीरातील इतर सर्व भागात, सर्व चक्रात खाली आणावयाचे आहे,

सहस्रार
↓
आज्ञाडोके (मेंदू) आज्ञा
↓
विशुद्ध- कंठ
↓
अनाहत हृदय
↓
मणिपूर
↓
स्वाधिष्ठान
↓
मूलाधार

आपल्या मूलाधार चक्रात ही कुंडली सुप्तावस्थेमध्ये आहे. ती कुंडलिनी जागृती साधायची आहे. आपले शरीर हे पंचमहाभूतांनी (आप, वायू, तेज आकाश, पृथ्वी) बनलेले आहे. ते पंचमहाभूतात विलीन होणार आहे. शरीर रहाणार नाही. पण शरीरातील चक्रे (सूक्ष्म-चक्रे) याचे शुद्धीकरण व्हावयास पाहिजे. आत्मा अमर आहे, तो परत जेथून आला त्या मूळ स्थानाकडे उगमाकडे परत जाणार आहे. तो परमेश्वरामध्ये विलीन होणार आहे. ध्यानाच्या आधारे ही शुद्धीकरणाची रूपांतराची क्रिया आपल्याला साधायची आहे.

२) **Consciousness जाणीव :**

जाणीवेच्या वेगवेगळया पातळया आहेत. आपल्याला परमेश्वराच्या जाणीवपातळीपर्यंत पोचायचे आहे. आपल्याला परमेश्वरी जाणीवेमध्ये जगायचे आहे.

३) हा योग करताना जाणीवेच्या सगळ्या स्तरांवर, पातळ्यांवर करावयाचा आहे.

Physical Level	=	शारीरिक
Mental Level	=	मानसिक
Vital Level	=	प्राणिक
Psychic Level	=	आत्मिक

मानसिक जाणीवांमध्ये वेगवेगळे जाणीवेच स्तर आहेत

Higher Mind (अधिकतर मानस)
↓
Illumined Mind (दीप्तिमान मानस)
↓
Intuitive Mind (स्फूर्तिमय मानस)
↓
Over Mind (अधिमानस)
↓
Super Mind (अतिमानस)
↓
Transcendental अतिमानसाच्या पलीकडील स्तर

आम्हाला या अतिमानसिक जाणीवेमध्ये प्रवेश करायचा आहे. परंतु तो केवळ मनाने जमणार नाही. इथे पुन्हा त्रिसूत्री.

१) Psychicization (चैत्यीकरण आत्मा शोध)
२) Spiritualization (अध्यात्मवादी)
३) Supramentalization (अतिमानसिकीकरण)

अचेतन अतिचेतन
Inconscient to Superconscient

उत्क्रांतीवादामध्ये जे दडलेले आहे, लपलेले आहे तेच बाहेर पडणार आहे. परमेश्वर शिडीच्या पायऱ्या उतरत उतरत हळूहळू लपत लपत खाली जडतत्वात आलेला आहे. त्यामुळे वास्तविक पहाता माणसाचा हा प्रवास अचेतनातून नसून अतिचेतनेतून अतिचेतनेकडे जाणे असाच आहे. फक्त अचेतनात दडलेले हे अतिचेतन तत्व आपल्याला शोधून काढावयाचे आहे. श्रीअरविंद म्हणतात,

"Matter shall reveal the spirit."

जडामध्ये लपलेली नवचेतना, परमेश्वराचा अंश आम्हाला शोधून काढायचा आहे. अणू-रेणूमध्ये, परमाणूमध्ये वाळवंटातील वाळूच्या कणामध्ये सुद्धा परमेश्वर दडून राहिलेला आहे. ते ईश्वरी परमेश्वरी तत्व आम्हाला शोधून काढायचे आहे. व्यक्त करायचे आहे. परमेश्वराचे अभिव्यक्तीकरण व्हायला पाहिजे म्हणूनच श्रीअरविंदांविषयी त्यांच्या अजर, अमर, अक्षर महाकाव्यात पंक्ती आहेत.

"It is because of him that the
Inconscient does its work.
It is because of him that the
world forgets to die".

श्रीअरविंद आहेत म्हणूनच अचेतनेतही काम चालू आहे. अचेतनेत जी सचेतना आहे, नवचेतना आहे, नवसंजीवनी आहे. ती बाहेर काढण्याचा, ती अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केवळ श्रीअरविंदांच्या कृपेने शक्य आहे. श्रीअरविंदांमुळेच केवळ या जगाचा जो मृत्यु झाला असता तो मृत्यु हे जग विसरले आहे. ही नवचेतना कोणी दिली ? ही नवसंजीवनी कोणी दिली ? हे नवजीवन कोणी दिले ?

श्रीअरविंदांनी - त्यांच्या पूर्ण योगाने आज आपण बाहेर जगाची परिस्थिती पहात आहोत. दहशतवादाचा कळस झाला आहे. निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. स्वार्थीपणा बळावला आहे. भ्रष्टाचार वाढलेला आहे. प्रत्येक ठिकाणी आर्थिक घोटाळे वाढत आहेत./ प्रत्येक माणूस पैसा आणि सत्ता यांच्या मागे पळत आहे. सत्तेची हाव एवढी वाढली आहे की कुणीही खुर्ची सोडायला तयार नाही. 'राजकारण' हा तर आज परवलीचा शब्द बनला आहे. 'Power corrupts absolute power corrupts absolutely.' ही आज जगाची स्थिती आहे. माणसाने आज स्वत:ची शांती समाधान, आनंद गमावलेला आहे. अशा काळात गरज आहे आत्मसंशोधनाची ! म्हणून श्रीअरविंद आपल्याला सांगतात, "Go within and find your soul." आत जा, हृदयाच्या अंतर्गत गुहेमध्ये जा आणि स्वत:चा आत्मा शोधा.

श्रीअरविंद श्रीमाताजी यांच्या शिकवणीची गरज आज सगळ्या जगाला आहे. वाईट गोष्टींनी आज परमोच्च बिंदू गाठला आहे. कारण या पृथ्वीच्या प्रसववेदना आहेत.

एवढे दु:ख, वेदना, त्रास का? श्रीअरविंद सांगतात या प्रसववेदनांच्यानंतर नवे सुंदर, सुदृढ, गोंडस बालक बाहेर पडत आहे. ही नवी पृथ्वी आहे. प्रसववेदनांच्या खेरीज नवनिर्मिती शक्य नाही. आता पृथ्वीवर हे मंथन चालू आहे. Law of duality आहे.

अंधार प्रकाश
मरण अमरता
दु:ख सुख
वेदना, यातना आनंद

**''असतो मा सद् गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय''**

असा आमचा प्रवास चालू आहे. या मंथनामध्ये ज्या वाईट गोष्टी आहेत त्या बाहेर फेकून टाकल्या जात आहेत. जी रत्ने आहेत, ज्या चांगल्या गोष्टी आहेत जे अमृत आहे ते बाहेर पडत आहे. श्रीअरविंद श्रीमाताजींच्या पथावर आपल्या सर्व साधकांसाठी हा अमृतवर्षावाचा आनंद आपण घेत आहोत.

आता इतर योग आणि पूर्णयोग यामधील फरक आपण पाहू.


१) **अन्य योग :** अन्य योगात मुक्ती ही अंतिम सिद्धी ठरते. त्यानंतर या योगात प्राप्त करण्यासारखे काही रहात नाही.
पूर्ण योग : अन्ययोगाची अंतिम सिद्धी. पूर्ण योगाची प्रथम पायरी बनते आणि त्यात अनंत सिद्धींची रांग लागलेली असते.

२) अन्य योगात चेतनेचे आरोहण असते.
पूर्णयोगात निम्न चेतनेचे आरोहण आणि उर्ध्व स्तरातून भागवन चेतनेचे अवतरण या दोघांचे सुलभ मीलन संयोजन असते.

श्रीअरविंदांचे प्रतीक

खाली शिरोबिंदू असलेला त्रिकोण सत्-चित्-आनंद दर्शवितो. त्याच्या स्वीकारार्थ उन्मुख असलेली प्राण, प्रकाश व प्रेम या स्वरुपातील पार्थिवतत्त्वाची आकांक्षा वर शिरोबिंदू असलेल्या त्रिकोणाने दर्शविली जाते. दोन्ही त्रिकोण जेथे मिळतात, तो मध्यावरील चौरस म्हणजे संपूर्ण

आविष्करणाचा दर्शक असून, त्याच्या मध्यावरील कमळ म्हणजे सर्वोत्तमाचा अवतार होय.



चौरसामधील पाणी हे विविधता म्हणजेच सृष्टीचें, निर्मितीचे दर्शक आहे.

३) **अन्य योगात मानव :** स्वत:च्या संकल्प शक्तीने साधना करतो.
पूर्णयोगात मानव साधना सुरू करतो. स्वत:च्या संकल्पशक्तीने परंतु क्रमाक्रमाने त्याची संकल्पशक्ती परमशक्तीच्या संकल्प शक्तीत विलीन होते आणि नंतरची साधना आई भगवती माँ स्वत:च करते.

४) अन्य योगात आंतरिक चेतना आरोहण मिळवून काही सिद्धी मिळविते परंतु मानसिक, शारीरिक आणि प्राणिक चेतना ज्याप्रमाणे असते त्याप्रमाणे अपरिपक्व, असंस्कृत आणि अपरिपक्व अवस्थेत रहाते.
पूर्णयोगात आरोहण आणि अवतरणाच्या प्रत्येक संयोजनात एक नवीनच चेतना उत्पन्न होत असते. रूपांतराच्या प्रक्रियेत क्रमाक्रमाने मानसिक, प्राणिक आणि शारीरिक चेतना पण येतात आणि त्यांचे रूपांतर शक्य होते.

५) अन्य योगात स्वत:शिवाय इतरांना स्पर्शणाऱ्या कोणत्याही साधनेवर जोर देण्यात येत नाही किंवा प्रयत्न करण्यात येत नाही.
पूर्ण योगात मनोमय लोक, प्राणमय लोक अचेतनस्तर अवचेतनस्तर सर्व समाविष्ट होतात.

६) अन्य योगात साधनेचे ध्येय व्यक्तिश: मोक्ष किंवा सिद्धी किंवा आनंद प्राप्ती असते.
पूर्ण योगाचा साधक स्वत:ची साधना जसजशी करत जातो तसतशी स्वत:बरोबर समाजाची देखील साधना करीत जातो. अशाप्रकारे व्यक्तिगत लक्ष न बनता ते समष्टिगत पूर्णता हे त्यांचे लक्ष बनते आणि म्हणून त्याचा दृष्टिकोन विशाल आणि व्यापक बनतो, त्याचे कार्यक्षेत्र विस्तृत होऊन त्याची साधना सर्वसमावेशक बनते.

७) अन्य योगात आपल्या आंतरिक स्वरूपाची रचना आणि घटनेचे वर्णन आणि चिंतन प्रमाणात अपूर्ण आणि कमी प्रमाणात आहेत.
पूर्ण योगात आपल्या आंतरिक स्वरूपाची ओळख आणि दर्शन खूपच विस्तृत हृदयाला भिडणाऱ्या आहेत. श्रीअरविंदांच्या ''द लाईफ डिव्हाईन'' ''सावित्री'' 'द सिन्थेसिस ऑफ योग' या पुस्तकामध्ये अति विस्तृत माहितीसह देण्यात आली आहे.

८) अन्य योगात आत्म्याची एक तर नीट ओळख होत नाही. अथवा त्याचे स्थान गौण आणि अस्पष्ट असते.
पूर्ण योगात चैत्य पुरुषाचे (psychic-being) खूपच महत्व आहे. psychic-being हा शब्द श्रीअरविंदांचाच आहे. पूर्णयोगाची सुरूवातच मुळी psychic-being पासून आहे. हेच अतिउत्कृष्ट संशोधन (supreme discovery) आपल्याला करायचे आहे. म्हणून चैत्य पुरुषाचे स्थान, कार्य इत्यादी श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनी अगदी विस्तृतपणे समजाविले आहे.

९) अन्य योगात चैत्य पुरुषाची फारशी ओळख नसल्याने मानवांच्या महत्तम खोलीला त्याची फारशी जाणीव होत नाही.
पूर्ण योगात चैत्य पुरुषाचा विकास प्रथम लक्ष आहे. म्हणून त्याचा परिणाम मानवाच्या अति खोल मनातून येणारे सत्य आणि अवतारित सत्य आणि आरोहित होणाऱ्या सत्याचे पूर्ण संयोजन आणि त्यामुळे सिद्ध होणारे नैसर्गिक हे रूपांतर या योगसाधनेत शक्य होते.

१०) अतिमानस चैतन्याचा उल्लेख वेदांच्या ऋचांमध्ये अस्पष्ट सूचनेच्या रूपाने मिळतो. दुसऱ्या योग शाखेत त्याचे स्पष्ट दर्शन होत नाही.
पूर्ण योगाचे दुसरे नावच अतिमानस योग आहे. अतिमानस चेतनेचे अवतरण आणि त्यामुळे होणारे रूपांतर आणि अतिमानस स्थिर करण्याचे हे कार्य श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनीच या पृथ्वीतलावर प्रथम केले आहे. हेच पूर्ण योगाचे वैशिष्ट्य आहे.

११) आत्तापर्यंतच्या इतिहासात कोणत्याही एका मानवाने सामान्य आणि कोणत्याही एका योगाच्या साक्षात्काराने मुक्ती, समाधी (सविकल्प, निर्विकल्प) मोक्ष निर्वाणपद्धती मिळविली आहे.
पूर्ण योगाच्या साधकाला लवकर की उशीरा हे सर्वच साक्षात्कार होतात आणि त्यांचा समन्वय करता करता अतिमानस साक्षात्काराकडे तो धाव घेतो म्हणूनच हा पूर्ण योग आहे. सर्वांग योग आहे. या पूर्ण योगात संपूर्ण ज्ञानाचा समावेश आहे.

१२) अन्य योगात सूक्ष्म चक्रे खालून वर उलगडतात.
पूर्ण योगात वरून सहस्रारापासून सुरूवात होऊन क्रमश: अतिमानस चेतना हळूहळू खाली उतरत एकेका चक्राचे शुद्धीकरण करत मूलाधारापर्यंत जाते हा अधिक सुरक्षित मार्ग आहे.

१३) अन्य योगात कुंडलिनीशक्ती जागृत होऊन वरील चक्रात येताना जर शक्ती मध्ये अडकली तर योगी उन्मनी अवस्थेत जातो व भरकटतो. इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत.
पूर्णयोगात असे घडत नाही कारण शक्तींचा प्रवाह वरून खाली एकेका चक्रातून जाताना सर्व चक्रांचे शुद्धीकरण करत शेवटी अचेतनेत जाऊन तेथेही चेतनेचा प्रवाह वहायला लागतो.

१४) अन्य योग दर्शनात जीव, जगत् आणि ईश्वर या तिघांचा परस्पर संबंध वैज्ञानिक संयोजन आणि परस्परावलंबन आणि अंतिम लक्ष याविषयी बौद्धिक स्पष्टता मिळत नाही.

पूर्ण योगाच्या दर्शनात जीव, जगत आणि परमात्मा यांचे परस्पर संबंध, तिघांची रीती गती आणि विधी व अंतिम हेतू याविषयी बुद्धिगम्य वैज्ञानिक स्पष्टता मिळते.

१५) अन्य योगाच्या साधनेने संसारापासून, गृहस्थाश्रमापासून दूर जावयाचे असते. संन्यास घ्यावयाचा असतो.

पूर्ण योगात संसाराचा स्वीकार करावयाचा असतो.

श्रीअरविंद म्हणतात,

"Not renunciation but glad acceptance of Life."

''जीवनाचा त्याग नव्हे संन्यास नव्हे,
तर जीवनाची सहर्ष स्वीकृती करा.''

म्हणूनच श्रीअरविंद श्रीमाँचा हा पूर्णयोग अत्यंत सोपा जिथे असाल तिथे करता येण्याजोगा आहे. त्याला 'कुठल्याही साधनांची गरजच नाही. मनाच्या पुढे अतिमानसिक जाणीवेमध्ये जाण्याचा प्रयत्न करा. अनंत जाणीवेतून सांताकडे पहायला शिकू या.

मानवातील पशुत्व संपलेच पाहिजे. श्रीअरविंदांनी घोषित केल्याप्रमाणे ''उत्क्रांतीच्या टप्प्याचा शेवट हा बहुधा नेहेमीच ज्या गोष्टी उत्क्रांतीच्या बाहेर जायच्या आहेत, त्या गोष्टींच्या शक्तिशाली उद्रेकांनी भरलेला असतो. (द आयडियल ऑफ कर्मयोगिज्) आपण मानव असण्याच्या शेवटाला आलो आहोत हेच त्याचे खरे कारण आहे. आपण जुन्या यंत्रणेच्या अंतापर्यंत आलो आहोत. कारण आपण निराळ्याच कशाकडेतरी जाणाऱ्या स्थित्यंतराच्या स्थितीत आहोत. सध्या जग नैतिक बिकट प्रसंगातून जात नसून ''औत्क्रांतिक बिकट प्रसंगातून'' जात आहे. आपण अधिक बड्या जगाकडे चाललेलो नाही की अधिक निकृष्ट जगाकडेही चाललेलो नाही. आपण आमूलाग्रपणे निराळ्या जगात प्रविष्ट होण्याकरता चालू असलेल्या वीजबदलाच्या मध्यभागी आहोत आणि ज्याप्रमाणे मानवाचे जग एप-जगतापेक्षा कमालीचे निराळे होते त्याचप्रमाणे आगामी नवीन जग मानवी जगापेक्षा आमूलाग्रपणे निराळे असणार आहे. आपण नवीन युगात अतिमानस युगात प्रवेश करीत आहोत. श्रीअरविंद श्रीमाताजी आपल्याला जाणीव करून देत आहेत,

"A new world is already born"
नवीन जगाचा उदय झालेला आहे.

श्रीअरविंद श्रीमाताजी यांचा शारीरीक रूपांतरणावर जास्त जोर आहे. Physical transformation cellular transformation खरा संघर्ष, खरी लढाई तिथेच आहे. हे नवीन चैतन्य जर मानवी शिखरांवर आढळणार नसेल तर आपल्याला ते कुठे सापडणार आहे? कदाचित् आपण मानसिक चक्रात शिरल्यानंतर ज्या गोष्टींकडे कमालीचे दुर्लक्ष केले त्या शरीरातच ते सापडण्याची शक्यता आहे. शरीर हाच आपला पाया आहे. औत्क्रांतिक पाया आहे. ते शरीर तीच जुनी स्थिती आहे. ज्यात आपण परतले पाहिजे. आणि हेच शरीर यातना, वृद्धत्व आणि मृत्यू यातून जायला लावून स्वत:कडे लक्ष वेधून घेते.

''या अपूर्णतेतच अधिक आणि सर्वांगीण पूर्णत्वाची अभीप्सा आहे.''असा दिलासा श्रीअरविंद आपल्याला देतात. आपण भौतिक द्रव्याचेच रूपांतर केले पाहिजे. अन्यथा ते त्याच्यावर लादलेली सर्व मानवी आणि अतिमानवी साधने एकामागून एक खाली खेचेल. या शरीरात या भौतिक पेशीद्रव्यात ''सर्वशक्तिमान शक्ती,'' बंदिस्त झालेल्या आहेत. हे मुके चैतन्य स्वत:मध्ये सर्व प्रकाश, सर्व अनंतता आणि सर्व मानसिक आणि आध्यात्मिक विपुलता बाळगून आहे. कारण प्रत्यक्षात सर्व काही ईश्वर आहे.

नवे साहस हे असे आहे. हा या साध्याकरिता (Adventure of Consciousness) श्रीअरविंद श्री माताजी आपल्याला बोलावत आहेत. पृथ्वी नव्या चाकोरीत प्रवेश करत आहे. श्रीमाताजी म्हणतात,

''मृत्यूचे काहीही स्वीकारू नका. जीवन हीच तुमची मुक्ती आहे. जीवनातच आपण स्वत:चे रूपांतर केले पाहिजे. पृथ्वीवरच आपला विकास होतो. पृथ्वीवरच आपल्याला परिपूर्ण होता येईल. विजय शरीरातच मिळविला जातो.''

(**Comments on the Dhammapada श्रीमाताजी- Mother.**)

श्रीअरविंद म्हणतात, ''जगाच्या ज्ञानाला तुमच्या कानाच्या खूप जवळ कुजबूजू देऊ नका. कारण ही घटिका अनपेक्षिताची आहे.''

(**The Hour of God श्रीअरविंद**)

योगसाधनेने आपण चढून जातो- असत्यातून सत्यामध्ये. दुर्बलतेतून सामर्थ्यामध्ये, दु:खशोकातून आनंदामध्ये, बंधनातून स्वातंत्र्यामध्ये. मृत्यूतून अमरत्वामध्ये, अंधकारातून प्रकाशामध्ये, संकीर्णतेतून स्पष्टतेमध्ये, अपूर्णतेतून पूर्णत्वामध्ये, आत्मविभजनातून एकन्तामध्ये, मायेतून देवत्वामध्ये. **– श्रीअरविंद.**

''मनुष्य हा संक्रमणावस्थेतील आहे. आता तो मानसिक चेतनेमध्ये रहात आहे. परंतु हा शेवट नाही. त्याला नवीन अतिमानसिक चेतना मिळणार आहे. सत्यचेतना मिळणार आहे. सत्यचेतना सुसंवाद त्यांनी आपले सर्व जीवन हे ही अतिमानसिक चेतना पृथ्वीवर स्थापित करण्यासाठीच दिले होते. **– श्री माताजी.**

श्रीअरविंद श्रीमाताजी यांच्याविषयी श्रीमाताजी म्हणतात, "Without Thee I exist not and without me He is unmanifest."

''तुमच्याशिवाय (श्रीअरविंद) माझे (श्रीमाताजी) अस्तित्व नाही आणि माझ्याशिवाय (श्रीमाताजी) तुम्ही (श्रीअरविंद) व्यक्त होऊ शकत नाही.

अशा ह्या श्रीअरविंद श्री माताजींना आमचे कोटी कोटी प्रणाम ।

– प्रा. सौ. नीलिमा पाठक डाके
(Chairperson-Sri Aurobindo Society, Pune)
२०७७ विजयानगर कॉलनी, एस्.पी.कॉलेजमागे,
पुणे-४११०३०. फोन नं - ०२०-२४३३३०२०.
मोबाईल - ९८२२४५२८१२.

■ ■ ■



सर्व जीवन योग आहे
All Life Is Yoga

सौ. वनश्री वाघमारे

एम.ए., पीएच.डी.
निवृत्त व्याख्याता, सध्या गृहिणी
श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरी, नाशिक केन्द्र सचिव म्हणून कार्यरत.
श्रीअरविंद-मदरची अनुयायी

All Life Is Yoga

''सर्व जीवन योग आहे'' हे श्रीअरविंदांचे विधान खोलवर विचार करून पाहिले तर दिव्यजीवनाचा मंत्रच वाटतो. त्यातून जीवनाची अत्युच्च क्षमता, संभावना कळू लागते. निम्न चेतना उच्चपदास प्राप्त करण्याचे सामर्थ्य, क्षमता सर्व जीवनात आहे याचा अंदाज येतो. जीवनाचा हा जणू दिव्य सिद्धांतच व्हावा! श्रीअरविंदांचे सर्व दार्शनिक वाङ्मय अनुभवसिद्ध आहे. त्यामुळे त्यांचे विधान सिद्ध झालेलेच आहे म्हणून ते पूर्ण श्रद्धेस पात्र ठरते. विविध महान व्यक्तींची, योगी, साधु-संतांची निवडक वाक्ये, सुभाषिते वाचायला, ऐकायला मिळतात आणि प्रेरणादायी ठरतात. तसे हे वाक्य वाचनीयच नव्हे, विचारनीयच नव्हे, चिंतनीयच नव्हे, मननीयच नव्हे तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते आचरणात आणण्यासाठी अत्यंत योग्य व गरजेचे आहे. म्हणून की काय १९९८ साली दोन रुपयाच्या नाण्यावर "All Life is Yoga", ''संपूर्ण जीवन योग है'' असे इंग्रजी व हिंदी भाषेत त्यांच्या प्रतिमा व नावासकट मुद्रित केले होते.

मुळात शुद्ध रूपात सर्व जीवन योग आहे. वर वर पाहता ते भोग असते. निम्नस्तरावर जीवनाचा केवळ भोग सुरू असतो, तिथे चेतनेचा स्तर जागृत नसतो. थोडी जरी जाणीव विकसित होत गेली तर तेवढ्या प्रमाणात जीवन योग असते. जसजशी अधिकाधिक चेतना वर जाते तसतसे जीवन अधिकाधिक योगमय होत जाते. जीवनाचे विविध स्तर आहेत. त्या सर्व स्तरांवरून अरविंदांनी पाहिले की, जीवनाचे रूपांतर घडून येऊ शकते. जीवनाची श्रेष्ठ/अंतिम संभावना त्यांनी पाहिली जिच्याबद्दलची निश्चिती त्यांनी सांगितली आहे, ती आहे दिव्यजीवन. या पृथ्वीवरच ते शक्य आहे. योगानेच हे होऊ शकणार. जीवन योग आहे म्हणूनच ही शक्यता चरितार्थ होऊ शकणार आहे. प्रत्यक्ष भगवंताचे पृथ्वीवरील जीवनात प्रकटीकरण ते होय. परमेश्वरी संकल्पच तसा आहे. जेव्हा परमेश्वराच्या संपर्कात चेतना येते तो योग म्हणून जीवनाची प्रत्येक क्रिया ईश्वराच्या संपर्कात मानवास नेते. योग म्हणजे अशी क्रिया जी ईश्वराशी संबंध प्रस्थापित करते. दिलेल्या विधानात दोन प्रमुख शब्द आहेत - 'सर्व जीवन' आणि 'योग'. या संबंधात श्रीअरविंदांच्यांच शब्दात जाणून घेऊ. सर्वसाधारण योग प्रक्रियांबद्दल श्रीअरविंद म्हणतात, ''...या योगाच्या प्रक्रिया मानवी-जीवनाला अंतर्मुख करून, आंत आंत अत्यंत गुह्य अंत:करणाच्या गाभाऱ्यात नेतात. तसेच या जीवनाला वरवर अत्यंत उंच अशा अस्तित्वाच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या उच्चस्थानी घेऊन जातात.'' यावरून एरव्ही बहिर्मुख असलेले जीवन योगप्रक्रियेमुळे अंतर्मुख होते, तसेच जीवनाच्या आतील, आत्मिक भागाचा स्पर्श किंवा जाणीव करून दिली जाते. तसेच व्यक्तीचे अस्तित्व, त्याचे व्यक्तिमत्त्व एका अधिक विशालतेने, व्यापकतेने, उदात्ततेने समृद्ध केले जाते, उच्चस्थानावर प्रतिष्ठित केले जाते. जीवनाची खोली आणि उंची दोन्हीही गोष्टी मानवास साध्य होतात, असे आपल्याला समजते. श्रीअरविंद पुढे म्हणतात, ''जीवनाचा व योगाचा योग्य विचार केला असता, हे दिसून येते की, सर्व प्रकारचे जीवन योगच आहे. मग ते पूर्ण जाणीवपुर:सर असो किंवा अर्धजाणीवेचे असो. कारण आत्मपूर्णत्वाच्या सिद्धीसाठी चाललेला पद्धतशीर प्रयत्न हा योग शब्दाचा आमचा अर्थ आहे. या प्रयत्नात मानवात, मानवी अस्तित्वात सुप्त असलेल्या शक्ती प्रकट केल्या जात असतात; तसेच मानवी व्यक्ती आणि विश्वात्मक व विश्वातीत सत्ता यांचे ऐक्य, अभिन्नत्व जे मानवात व विश्वात अंशत: प्रकट झालेले आम्हाला दिसते, ते पूर्णतया प्रस्थापित करण्यात येत असते. सर्व जीवनाच्या दृश्य रूपांच्या पाठीमागे आम्ही नजर टाकली तर, असे दिसून येईल की, हे जीवन म्हणजे एक महान योग आहे - निसर्ग किंवा प्रकृती हा जीवनरूपी योग अभ्यासित आहे.''

दिलेल्या विधानात 'सर्व जीवन' असे श्रीअरविंद म्हणतात, केवळ व्यक्तिगत जीवन किंवा विशिष्ट जीवन असे त्यांना म्हणायचे नाही किंवा मानवी जाणीव जागृत होऊन विशेष साधना करते तेव्हा तेच जीवन योग असते, असे त्यांना म्हणायचे नाही हे स्पष्ट होते. वर सांगितलेल्या त्यांच्या शब्दांमधून 'सर्व जीवना'चा अर्थ कळतो - ''पूर्ण जाणीव पुर:सर असो किंवा अर्धजाणीवेचे असो'' सर्व जीवन योगच आहे. तसेच याच्या पुढील शब्दांमधून योगाचा उद्देश स्पष्ट होतो. तो म्हणजे व्यक्ती, विश्व व विश्वातीत यांच्यातील सत्तेचे ऐक्य, प्रकृतीद्वारे प्रकृतीमध्ये हे सातत्याने घडून येत असते. आता प्रकृतीबद्दल श्रीअरविंद काय सांगतात ते त्यांच्याच शब्दात पाहू. ''या योगप्रकृतीच्या मनातील उद्देश, आपले स्वत:चे पूर्णत्व गाठणे हा आहे; आपल्यातील विविध शक्ती सारख्या वाढत्या प्रमाणात प्रकट करीत, प्रकृती आपले पूर्णत्व गाठू इच्छिते. या योगाच्या आश्रयाने प्रकृती आपल्या दिव्य सत्य स्वरूपाशी गाठ घेऊ

इच्छिते. मानव हा प्रकृतीचा विचारशील घटक आहे;'' हे साध्य साधण्यासाठी प्रकृती मानवाच्या ठिकाणी आत्मजाणीवयुक्त कर्मसाधने व इच्छानियुक्त कर्मयोजनाचा उपयोग करते. विश्वशक्तीचे, प्रकृतीचे दोन व्यापार श्रीअरविंद सांगतात – ''एक व्यापार 'विषयीची' (subjective) किंवा जीवाची आत्मपरिपूर्ती व दुसरा व्यापार 'विषयीची' (objective) किंवा जगताची परिपूर्ती पूर्णता होय. हे व्यापार करीत असताना प्रकृती ज्या प्रक्रिया उपयोगात आणते, ज्या शक्ती कमी-अधिक स्वरूपात संघटित करत आहे, त्या शक्तीचाच तीव्रतायुक्त अपवादात्मक उपयोग म्हणजे योग.'' श्रीअरविंद पुढे स्पष्ट करतात – ''योग या सामान्य नावाखाली एकत्र येणाऱ्या सर्व प्रक्रिया आहेत. त्यातून असामान्य शक्ती, असामान्य परिणाम निर्माण केले जातात. ज्यांची अवस्था सामान्य व्यापारांत अंतर्भूत असते, पण अप्रकट असते. सुलभतेने व्यक्त होत नाही.'' कधी-कधी योगामुळे संसारत्याग किंवा जीवनाकडे पाठ फिरवण्याचा धोका संभवतो. तसे होऊ नये म्हणून व मानवी जीवन पूर्ण करून या पूर्ण जीवनात ईश्वर व प्रकृती (निसर्ग) यांचे ऐक्य साधावे या उद्देशाने श्रीअरविंदांना प्रचलित विविध योगपद्धतींचा समन्वय करावयाचा होता. त्यातील प्रक्रिया अंतर्बाह्य कर्मांचा मेळ घडून आणण्यास आग्रही असतात. श्रीअरविंदांच्या योग समन्वयामुळे द्विविध शक्यता स्पष्ट होतात. भौतिक जगतात उतरलेल्या सद्वस्तूचे निवासस्थान मानव आहे, ते तिचे प्रतीक आहे. मानवात निम्नवस्तूचे रूपांतर उच्चतर वस्तूत होऊ शकते ही एक व उच्चतर वस्तू निम्नरूपातून स्वतःस प्रकट करू शकते ही दुसरी शक्यता होय. मानवास हे जीवन त्या शक्यता व्यवहारात उतरवण्यासाठी दिले आहे. हे जीवन टाळणे योगास मान्य नाही, कारण श्रीअरविंद म्हणतात, ''योग हा मानवाचा सर्वश्रेष्ठ उद्योग आहे, योग हा त्याचे आत्मपूर्णत्वाचे, आत्मपरिपूर्तीचे समर्थतम साधन आहे. योगाचा खरा उद्देश, पुरा उद्देश त्याचा खरा व पूर्ण उपयोग तेव्हाच झाला, सिद्ध झाला असे म्हणता येईल की, जेव्हा मानवाचा जाणीवयुक्त योग, निसर्गाच्या (प्रकृतीच्या) अर्धजागृत योगाप्रमाणे बाह्यतः जीवनाशी समव्याप्त होईल; आणि अर्धजागृत व जाणीवयुक्त योगांचा मार्ग व सिद्धी यांजकडे पाहून आम्हाला सुस्पष्टपणे, खऱ्या व पुऱ्या अर्थाने असे म्हणता येईल की, ''सर्व जीवन हे योगच आहे.''

प्रकृतीच्या तीन पायऱ्या याविषयी श्रीअरविंदांनी जो उहापोह केला आहे, त्यात प्रकृतीबद्दल त्यांचे स्पष्टीकरण थोडक्यात का होईना पाहणे आवश्यक ठरते. ते म्हणतात...''प्रकृती किंवा निसर्ग ही विरूपताजनक मायेची केवळ दिखाऊ भ्रमात्मक करणी आहे ही कल्पना आम्ही टाकून दिली पाहिजे; उलटपक्षी, प्रकृती (निसर्ग) ही ईश्वराची स्वतःची विश्वव्यापी शक्ती आहे, विश्वव्यापी करणी आहे ही गोष्ट आम्ही ओळखली पाहिजे.'' विकासक्रमात प्रकृती कार्यरत असते. ''प्रकृतीने विकासक्रमाने आमच्याकरिता देहजीवन पक्क्या पायावर अस्तित्वात आणले आहे. प्रकृतीने आपल्या नित्य भौतिक व्यापारात एक प्रकारची स्थिरता यशस्वीपणे आणलेली आहे.'' ''आमच्या प्रकृतीचा खरा धर्म आचारात आणण्यासाठी योजलेले आद्य साधन शरीर हे आहे; ही म्हण जर खरी असेल तर शारीर-जीवनापासून कायमचे मागे वळणे हे ईश्वरी ज्ञानाच्या पूर्ण स्वरूपाला पराङ्मुख होणे आहे.'' ''प्रकृतीने आमच्यासाठी शारीरजीवन पक्के विकसित केले आहे; आमचे शारीरजीवन हे प्रकृतीच्या सर्व व्यापारांचे अधिष्ठान, पाया आणि प्रथमचे साधन आहे; शारीरजीवनानंतर ती आता मानसिक जीवन विकसित करीत आहे; मानसिक जीवन हे शारीर जीवनाहून श्रेष्ठ असे तिचे क्रियासाधन आहे.'' या पलिकडेही प्रकृतीचा विकासक्रम आहेच. श्रीअरविंद म्हणतात, ''मानसिक जीवनाची पूर्णता, बुद्धीचा लवचिकपणा आणि व्यापकपणा, भावनेची व संवेदनेची व्यवस्थित श्रीमंती या गोष्टी मानवाचे अंतिम प्राप्तव्य नसून, त्याचे अंतिम प्राप्तव्य निराळे आहे व वरील गोष्टी या अंतिम प्राप्तव्याच्या मार्गातील आवश्यक साध्ये आहेत, हे उघड आहे; हे अंतिम प्राप्तव्य म्हणजे बौद्धिक, भावनिक जीवनाहून उच्चतर जीवन व समर्थतर शक्ती यांचा विकास होय; या शक्ती व हे जीवन व्यक्त होऊन खालचा (बौद्धिक-भावनिक) साधनाचा ताबा घेणार आहे; मनाने (बौद्धिक-भावनिक मनाने) शरीरानंतर विकसित होऊन शरीराचा ताबा घेतला आहे. तसेच या मनाचा ताबा श्रेष्ठतर वस्तु (दिव्य अतिमन) घेणार आहे, शरीर अस्तित्व हे मनाने त्याचा ताबा घेतल्यामुळे, स्वतःच्या तृप्तीसाठीच केवळ जीवन व्यापार करीत नाही, तर स्वतःपेक्षा श्रेष्ठ (अतिमनाच्या) व्यापारासाठी पाया व कच्चा माल पुरवते; तसेच मानसिक जीवन हे, त्याहून श्रेष्ठ. जीवनासाठी (दिव्य अतिमनाच्या जीवनासाठी पाया व कच्चा माल पुरविणार आहे.)'' शेवटी श्रीअरविंद प्रकृतीच्या व्यापारांतील तीन पायऱ्यांबद्दल सारांशात अगदी स्पष्ट रूपाने असे सांगतात – ''शरीर जीवन ही पहिली पायरी; येथील भौतिक जगातील आमच्या जीवनाचा पाया शरीर जीवन आहे. मानसिक जीवन ही दुसरी पायरी. शरीर जीवनातून आम्ही वर मानसिक जीवनात येतो; या जीवनाने आम्ही शरीर जीवनाचा उच्चतर उपयोग करून घेतो, त्याला व्यापक करून अधिक पूर्ण करतो. तिसरी पायरी दिव्य जीवन ही आहे. हे जीवन दुसऱ्या दोन जीवनांचे साधन आहे; त्याबरोबरच ते त्या दोन जीवनांकडे परतून, त्यांना शक्य अवस्थेतून मुक्त करते. आम्ही या जीवनांपैकी कोणतेही जीवन, आमच्या प्रकृतीच्या आवाक्याबाहेरचे आहे किंवा तिच्याहून खालच्या दर्जाचे आहे, असे मानीत नाही; आणि आमच्या अंतिम साध्याच्या दृष्टीने यापैकी कोणत्याही जीवनाचे निर्मूलन, आम्ही आवश्यक मानीत नाही, तर आम्ही उपरिनिर्दिष्ट पहिल्या दोन जीवनांची परिपूर्ति व मुक्तता आमच्या योगाच्या साध्याचा निदान एक भाग आणि तोही एक मोठा व महत्त्वाचा भाग मानतो.''


प्रकृतीच्या वर दिलेल्या तीन पायऱ्या पाहिल्यावर आता त्रिमुखी जीवन या संबोधनाखाली श्रीअरविंद जे पुढे मांडतात तेहि आपल्या विषयानुरूप असल्याने थोडक्यात समजून घेणे आवश्यक वाटते. शरीर जीवन, मानसिक जीवन आणि पडद्याआड असलेले आध्यात्मिक अस्तित्व हे ते त्रिमुखी जीवन होय. श्रीअरविंदांच्याच शब्दात ते काय सांगतात तेच विचारात घेणे ईष्ट होईल – ''प्रकृतीचे साध्य, शारीर जीवन सांभाळून व पूर्ण करून मानसिक जीवनाची परिपूर्ती करून, पूर्ण शरीरात व मनात सर्वातीत आत्म्याचे व्यापार प्रकट करावे, असे आहे; आणि

तेच आमचेहि असावे. मानसिक व्यापार शारीर व्यापार रद्द करीत नाही, तर त्या व्यापारांना उन्नत करून, त्यांचा अधिक चांगला उपयोग करण्यामागे ते असते; तसेच आध्यात्मिक जीवनाने आमचे बौद्धिक, भावनिक, कलात्मक प्राणिक व्यापार रद्द न करता, त्यांना उन्नत रूप द्यावे हे उचित आहे.''

श्रीअरविंद म्हणतात, ''पार्थिव प्रकृतीचा शीर्षभूत मानव या साच्यातच (मानव हा साचा) प्रकृतीचा पूर्ण विकास शक्य आहे. हा मानव त्रिमुखी जीवन धारण करतो. त्यात शरीर हे पात्र आहे, जीवन हे त्या शरीराच्या द्वारा देवाचा आविष्कार करण्याचे क्रियाशील साधन आहे. प्रगतिशील मन हे त्याच्या व्यापाराचे केंद्र आहे.'' मनाचे साध्य काय आहे तर मनाची, त्याचे घर म्हणजे देहाची आणि जीवनाची पूर्णता होय. यावरून मन, शरीर व जीवन याचा अंत:संबंध आपल्याला कळतो. विश्वातीत, विश्वव्यापी आत्म्याचे एक रूप हे मानवाचे खरे स्वरूप होय. मानव त्याच्या विकासक्रमाअंती हे नित्य-स्वरूप गाठतो, ज्ञानमय, आनंदमय आत्मा हेच त्याचे नित्य-स्वरूप आहे. देह, मन आणि आत्मा या तिघांचा मेळ घालून मानव स्वत:च्या ठिकाणी पूर्ण दिव्यता, 'पूर्ण मानव' निर्माण करू शकतो, असे श्रीअरविंद म्हणतात.

वरील तीन प्रकारच्या जीवनाच्या शक्ती कशा असतात, याबद्दल श्रीअरविंद सांगतात की, शरीर जीवनाची शक्ती प्रगतीची नसते. व्यक्तीची महत्ता, विशालता निर्माण करणे ही त्याची खास शक्ती असते. शुद्ध मनाची खास शक्ती परिवर्तन, बदल ही आहे. त्यानुसार मन अधिकाधिक व्यापक होत जाते. आत्म्याचा खास नियम स्वयंभू पूर्णत्व आणि अपरिवर्तनीय अनंतता हा आहे. सर्व वस्तूत, विश्वात आणि विश्वाच्या बाहेरही असलेले परमतत्त्व याचा साक्षात्कार हे आध्यात्मिक जीवनाचे वैभव आहे. श्रीअरविंद म्हणतात, ''विश्वाच्या अस्तित्वाचा कळस आत्मा आहे, या अस्तित्वाचा पाया भौतिक जडद्रव्य आहे. पाया आणि कळस यांना जोडणारा दुवा म्हणजे मन होय.'' अशा या मनापर्यंत उत्क्रांती झालेल्या मानवाकडून श्रीअरविंदांना काय अपेक्षा आहे, याची कल्पना पुढील वर्णनावरून येते. मानवाने प्रकृतीच्या मनांतील जाणून घेऊन तिचा गैरवाजवी उपयोग न करून घेता तिच्या जवळच्या समर्थतम साधनांचा उपयोग करण्याची आकांक्षा धरावी.'' याचा सोपा अर्थ असा घेता येईल की, जीवन केवळ भोग नाही. त्यातून योग्य अनुभव घेण्यासाठी आहे. अनुभव घेऊन थांबण्यासाठी नाही तर त्यातून शिकण्यासाठी (ज्ञान घेण्यासाठी) आहे. ते आचरणात आणण्यासाठी आहे. घेतलेले ज्ञान आचरणात आणले नाही तर बुद्धीपातळीवरचेच ते राहते. जोपर्यंत आचरणात आणले जात नाही किंवा तसे जगले जात नाही तर अनुभूती होऊ शकत नाही. निम्नतेकडून उच्च, अधिक उच्चतेकडे जाता येत नाही. असे फक्त- योगाद्वारेच करता येते. असे केले गेले तरच श्रीअरविंदांच्या 'सर्व जीवन योग आहे' या सिद्धांतास चरितार्थता प्राप्त होईल 'तसे' करणे आणि होणे मानवाच्या हाती आहे.

सौ. वनश्री वाघमारे
'अभिकल्प' अयोध्या कॉलनी, गंगापूर रोड, आकाशवाणी रोड,
सावरनगर पोस्ट ऑफिसजवळ, नाशिक ४२२ ०१३.



फुलांची आध्यात्मिक महत्ता

(Spiritual Significance of Flowers)

सौ. मीरा श्रीकृष्ण दीक्षित

एम. ए., योगशिक्षक
नैनिताल येथील श्रीअरविंदो आश्रमातील
दरवर्षी होणाऱ्या स्वाध्याय शिबिरात सह-आयोजक म्हणून कार्यरत.

मीरा अल्फासा रिचर्ड, ज्या पुढे पाँडिचेरीतील श्रीअरविंदाश्रमात 'मदर', 'माताजी' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. माताजी हे एक दिव्य, अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. या व्यक्तिमत्त्वाला एक सुंदर चित्रकार, निष्णात वाद्यवादक असे पैलू होते. तसाच एक अजून पैलू होता - तरल संवेदनशीलतेचा. निसर्गाशी एक उत्कट असा त्यांचा भावबंध होता. झाडे, फुले, पाने या साऱ्यांशीच त्यांचे गहिरे नाते होते. माताजी म्हणत असत, ''फुले आपल्याला मौनातील आनंद शिकवितात, तसेच समर्पण हे बदल्यात कसलीही अपेक्षा न ठेवता केले जाते हेही ती सांगतात.''

''फुले म्हणजे सृष्टीच्या आराधनेची सहज सुंदर अभिव्यक्ती आहे !''

''फुले म्हणजे निसर्गाची नि:शब्द प्रार्थना आहे !''



वयाच्या बाराव्या वर्षीच त्या आपल्या गावाजवळच्या एका जंगलात जात असत. त्या जंगलात २००० वर्षांचे विशाल वृक्ष होते. त्या वृक्षांच्या बुध्याशी ही बारा वर्षांची मुलगी डोळे मिटून ध्यान लावून बसत असे. त्यावेळी तिचे मन एका वेगळ्याच आनंदाने भरून जात असे. त्या वृक्षांशी तिचे खूप जुने गाढ नाते आहे, असे तिला वाटत असे. त्या वृक्षांच्या भावनाही तिला त्यावेळी जाणवत असत.

पुढे सखोल एकाग्रता व ध्यान साधना जसजशी वाढत गेली, तसतसा वनस्पती जगताशी माताजींचा संबंध गहिरा बनत गेला. १९१७ साली त्या जपान देशात रहात होत्या. तेथील चेरीची झाडे पाहिली की माताजींना वाटत असे की त्या परमचैतन्याने चेरीच्या फुलांमध्ये जादूमय शक्ती घातली आहे व त्यामुळे ती फुले त्या एकमेवद्वितीय अस्तित्वाला व्यक्त करीत आहेत. जपानमधील वास्तव्यात चेरीच्या झाडाशी, त्याच्या चेतनेशी एकरूप होण्याचा अनुभव माताजींना मिळाला. आपल्या 'Prayers & Meditations' या अध्यात्मिक रोजनिशीत त्याबद्दल त्या लिहितात -

''जेव्हा मी चेरीच्या झाडाबरोबर त्याच्या बहराबरोबर एकरूप होत होते, तेव्हा झाडाच्या चेतनेमध्ये वरून खाली खोलवर उतरले आणि अचानकपणे मी ते चेरीचे झाडच झाले. फुलांनी लगडलेल्या असंख्य फांद्या म्हणजे आकाशाच्या दिशेने उंचावलेले माझे बाहूच झाले. मला जाणवले, हे झाड म्हणजेही ते दिव्यत्त्वच आहे, जे ही फुलंरूपी प्रार्थना स्वर्गाला अर्पण करत असते. त्या अनुभूतीतून बाहेर आल्यावरही मला वाटत होते की, चेरीच्या झाडाचे रक्त माझ्या धमन्यामधून वहाते आहे आणि त्याचबरोबर वहाते आहे एक अतुलनीय शांती अन् सामर्थ्य... ... मला जाणवलं, मानवी शरीर आणि झाडाचं शरीर सचेत करणारी चेतना समान आहे - एकच आहे !''

जपानमध्ये असताना त्यांनी घराजवळ फळभाज्याही लावल्या होत्या. माताजी सांगतात की, ज्यावेळी त्या या फळभाज्या तोडायला जात असत, त्यावेळी ज्या भाज्या तोडण्यास योग्य झालेल्या असत, त्यांची रोपे त्यांना म्हणत असत, ''मला घे, मला घे'' तर जी फळं तयार

झालेली नसत त्यांच्याकडे हात नेला की ती ''नको, नको'' असे म्हणत असत. अर्थात् माताजींच्या जाणीवा इतक्या ग्रहणशील होत्या की, त्या रोपांच्या, पानाफुलांच्या संवेदनाही ओळखत असत.

फुलांच्या प्रकृतीशी, त्यांच्या आंतरिक सत्याशी जेव्हा त्यांचा संपर्क होई, तेव्हा ते फूल कशाचे प्रतिनिधित्त्व करते आहे, ते आपल्याला काय सांगते आहे, हे त्यांना कळत असे. या प्रक्रियेतूनच त्यांनी शेकडो फुलांचे संदेश, अध्यात्मिक संदर्भ सांगितले आहेत.

पाँडिचेरीच्या आश्रमातील मुलांसाठी त्यांनी 'फुले आणि त्यांचे अध्यात्मिक संदर्भ' यावर एक खेळ बनविला होता. त्यासाठी पत्त्याचे (कार्डस्) दोन संच बनविले गेले. एका संचातील कार्डस्वर फुलाचे चित्र व त्या खाली माताजींनी दिलेले अध्यात्मिक नाव व त्या फुलाचे प्रचलित नाव लिहिलेले असे तर दुसऱ्या संचातील कार्डस्वर केवळ अध्यात्मिक नाव असे. दोन्ही संचातील पत्त्यांच्या फुले व अध्यात्मिक नावाच्या जोड्या लावायचा खेळ ही मुले खेळत असत. तारादीदींच्या (श्रीअरविंदाश्रम दिल्लीच्या प्रमुख विश्वस्त) 'Growing up with the Mother' या पुस्तकात या खेळाची माहिती मिळते. त्यात तारादीदी म्हणतात की, आम्ही मुले फुलांना त्यांच्या प्रचलित नावाबरोबर अध्यात्मिक नावानेही ओळखायला लागलो होतो. उदा. जाईच्या फुलांना 'Purity' (शुद्धता), प्राजक्ताला 'Aspiration' (अभीप्सा), गुलाबाला 'Surrender' (समर्पण) इ.

खेळाच्या माध्यमातून फुलांचे अध्यात्मिक संदर्भ तोंडपाठ झालेल्या तारादीदींना हे फुलांचे अध्यात्मिक संदर्भ पुस्तकरूपाने लोकांसाठी उपलब्ध व्हावे असे वाटले आणि त्यांनी माताजींजवळ या कामाची परवानगी मागितली. माताजींनीही त्यासाठी अनुमती दिली व दयाळूपणे या कार्यात सहकार्य करण्याचीही तयारी दाखविली. माताजींची तारादीदींना अट एकच होती - फूल प्रत्यक्षात समोर हवे, मग त्याकडे पाहून त्या, त्या फुलांचा अध्यात्मिक संदर्भ स्पष्ट करतील. माताजींची परवानगी मिळाल्याबरोबर सगळे उत्साहाने कामाला लागले. तारादीदींची पूर्ण सकाळ बागांमधून, रानांमधून जिथून मिळतील तिथून रोज वेगवेगळी फुले जमा करीत हिंडणे यात जात असे. माताजींसमोर फुले ठेवल्यावर त्यावर त्या जे सांगतील ते आपल्या वहीत त्या उतरवून घेत असत. आश्रमाचे माळीही वेगवेगळ्या दुर्मिळ फुलांची लागवड, जोपासना करू लागले. परदेशातूनही माताजींच्या शिष्यांनी विविध फुलझाडांच्या बिया, कंद, रोपे इ. पाठविली. काही कंद व रोपे तर फ्रिजमध्येही वाढविली गेली. कारण त्यांना तसे तापमान वाढीसाठी आवश्यक होते.

प्रत्यक्ष फूल पाहून त्यावर लक्ष एकाग्र करून माताजी अध्यात्मिक संदर्भ, संदेश सांगत असत. ''फुलांचा हा संदेश त्या कशा ओळखतात?'' या प्रश्नावर त्या उत्तर देत असत -

''आपल्याला जेव्हा त्यांना ऐकायचे कसे हे कळते तेव्हा फुले आपल्याशी बोलतात. ही एक तरल, सुगंधी भाषा आहे.'' पुढे त्या म्हणतात -

''फुलं म्हणजे लहान मुलाप्रमाणे - ज्याला विशेष अशा संवेदना - जाणीवा नसतात किंवा या दोन्हींचे एक मिश्रण विशिष्ट स्पंदनांमध्ये असते. जर फुलांमधील या स्पंदनांच्या संपर्कात कुणी आले, ही स्पंदने कुणाला जाणवली - तर तो त्यांचे विचारांमध्ये परिवर्तन करू शकतो. अशाच पद्धतीने मी हे संदर्भ दिले आहेत. फुलांची स्पंदने ओळखून एक प्रकारच्या अनुमानाने, कारण कधीतरी ही जाणीव उत्स्फूर्तपणे होते तर कधी प्रसंगवशात होते.''

फुलांच्या आध्यात्मिक नावाच्या या पुस्तकाला माताजींनी शीर्षक दिले - 'Flowers and their Messages' या विषयावरील नंतर अनेक पुस्तके आली. रंगीत छायाचित्रांचे, फुलांच्या आध्यात्मिक नावांबरोबर प्रचलित नावे, वनस्पतींची शास्त्रीय नावे यांच्या सूचीसह 'The Spiritual Significance of Flowers' हे दोन खंडही प्रकाशित झाले.

जवळ-जवळ ९०० फुलांना माताजींनी अध्यात्मिक संदर्भ/नावे दिली आहेत. फुलांची ही आध्यात्मिक नावे, फुलांच्या पारंपारिक नावाशी, त्यांच्या पारंपारिक उपयोगाशी (विशेषत: पूजेसाठी, उपासनेसाठी वापरली जाणारी) सुसंगत अशी आहेत.

तुळस Devotion : समर्पण

भगवान विष्णूला वाहिली जाणारी तुळस ही पावित्र्य आणि समर्पण याचा प्रतिशब्द आहे. माताजींनी तिचा आध्यात्मिक संदर्भही - Devotion म्हणजे समर्पण हाच दिला आहे.

प्राजक्त Aspiration **: अभीप्सा**

अत्यंत शुद्धतेचे प्रतीक असलेली ही फुले, जी केवळ पूजेकरिताच उपयोगात आणली जातात - त्यांना माताजींनी Aspiration म्हणजे 'अभीप्सा' - 'उत्कट इच्छा' म्हटले. जिच्यात काही हीन, अशुद्ध, मालिन्य असूच शकत नाही अशी ईश्वरप्राप्तीची उत्कट इच्छा - असा संदर्भ दिला आहे.

धोतऱ्याचे फूल : तपस्या – जे फूल तपस्वी, विरागी

शंकराला वाहिले जाते. माताजींना कदाचित् त्याचा हा पारंपारिक उपयोग माहितही नसेल, पण तरीही त्यांनी धोतऱ्याच्या फुलाचे आध्यात्मिक नाव ठेवले - 'तपस्या'.

लाल जास्वंदीचे फूल Power : शक्ती

विघ्नविनाशक गणेशाला आणि महिषासुरमर्दिनी दुर्गेला वाहिले जाणारे लाल जास्वंदीचे फूल - माताजी त्याला नाव देतात 'Power' - म्हणजेच 'शक्ती'.

रुईचे फूल 'Courage' : धैर्य

रुईच्या फुलांची माळ ही मारुतीला घातली जाते, ज्याने आपल्या आराध्य दैवतासाठी सागर ओलांडले, पर्वत उचलून आणले - यासाठी लागणारे धैर्य - जीवनातील प्रत्येक संकटाला तोंड देताना लागणारे धैर्य आणि अडथळ्यांची पर्वा न करता ईश्वरप्राप्ती मार्गात सदैव अग्रेसर होण्यासाठी लागणारे धैर्य - हेच धैर्य माताजींना रुईच्या फुलांतून प्रकट होताना दिसते.

'कमळ' हे देवतांशी संबंधित मानले जाते. त्याला माताजी 'Divine Consciousness' - 'दिव्य जाणीव' असे नाव देतात तर

त्यातील लाल रंगाच्या कमळाला – 'अवतार' असे म्हणतात. ९०० फुलांचे आध्यात्मिक संदर्भ शोधून माताजींनी आपल्याला फुलांच्या भाषेची जणू गुरूकिल्लीच दिली आहे.

माताजी आपल्यासमोर फुलांचा आदर्श ठेवतात. त्या म्हणतात –

"फुलासारखे व्हा... ... ... मुक्त, सरळ, समदर्शी दयाळू कृपाळू... ... ...!

मुक्त – फूल त्याच्या सभोवतालच्या सर्व गोष्टींसाठी खुले असते – सृष्टी, सूर्यप्रकाश, वारा – साऱ्यांसाठी – फूल सौंदर्य व आनंद पसरविते.

समत्व – फूल सर्वांसाठी सारखे असते. आपले सौंदर्य, सुगंध सर्वांना सारखे देते. फरक – भेदाभेद – निवड काहीच नाही.

दानी – कोणतीही अट किंवा निर्बंध न ठेवता आपले अद्‌भुत सौंदर्य व स्वत:चा खास असा सुगंध ते किती उदारपणे सर्वांना देते.


प्रेमळ – फूल सदैव आनंदी असते, सुखदायी असते. त्याचे अस्तित्वच आपल्यात आनंद भरून टाकते.

सुखी माणूस तोच आहे ज्याच्या अंगी फुलाचे सच्चे गुण असतात.
फुलाचे शुद्ध गुण अंगी बानविण्याचा प्रयत्न करा... ... ...
फुलासारखे व्हा... ... ...

– माताजी

जाई	– Purity – शुद्धता
अनंत	– Perfect radiating Purity – पूर्ण प्रकाशदायी शुद्धता
गवतीतूरा	– Humility – विनम्रता
कृष्णकमळ	– Silence – शांतता (प्रगती करण्याकरिता आदर्श स्थिती)
मधुमालती	– Faithfulness – विश्वासार्हता
झेंडू	– Plasticity – लवचिकता
अबोली	– Mental Opening – मनोविकास
सूर्यफूल	– Consciousness turned towerds the Light – प्रकाशाभिमुख चेतना
सदाफुली	– Progress – प्रगती
मोगरा	– Intergral Purity – संपूर्ण शुद्धता
कडुनिंब	– Spiritual Atmosphere – अध्यात्मिक वातावरण
बोगनवेल	– Protection – संरक्षण
कारल्याचे फूल	– Sweetness – मधुरता, माधुर्य
मिरचीचे फूल	– Whipping – तडाखा
नारळ	– Multitude – वैविध्य
शेवगा	– Hyginic Organisation – आरोग्यदायी संयोजन
लाल कर्दख	– Friendship with the Divine – दिव्यत्त्वाशी सख्य
ब्रह्मकमख	– Supramental riches – अतिमानसिक ऐश्वर्य

■ ■ ■



योगी श्रीअरविंदांचे अक्षरवाङमयाचा संक्षिप्त वेध

डॉ. श्री. अजित कुलकर्णी

बी.ए.एम.ए.पी.एच.डी. (श्रीमत्‌भगवद्‌गीता एक जीवनप्रणाली) निवृत्त रजिस्टार
बी.एम.सी.सी.पुणे.
पुस्तके व लेखमाला प्रकाशित. गेली ३० वर्षे दासबोध, भागवत, ज्ञानेश्वरी, भगवान रामकृष्ण व स्वामी विवेकानंद यावर व्याख्याने व प्रवचने. आदर्श शिक्षक पुरस्कार पुणे महानगरपालिका, धर्मभूषण पदवी प्राप्त.

भारत देशाचे फार मोठे भाग्य आहे. येथे अनेक योगी तपस्वी होऊन गेलेत. या संत व योगी जनांच्या प्रभावळीतील एक अनमोल दिव्यरत्न म्हणजे योगी अरविंद हे होत. ज्याप्रमाणे कार्यावरून कारणाचा अंदाज करता येतो, तसे योगी अरविंदांच्या अक्षर वाङमयावरून त्यांच्या व्यक्तीमत्वाचा, त्यांच्या उत्तुंग बुद्धिमत्तेचा वेध घेता येतो. त्यांचे सारे वाङमय हे स्फर्तीप्रद व अभ्यासनीय आहे. यातून त्यांच्या आध्यात्मिक उंचीचा परिचय होऊ शकतो.

योगी अरविंदांच्या वाङमयाचे अवलोकन विविध अंगानी नटलेले आहे. त्यांच्या या वाङमयात राजकारण, धर्मकारण, गीता, उपनिषदे, नाटक, काव्य इ. अनेकविध विषयांना स्पर्श झाला आहे. त्यांना भारतातील अनेक भाषा अवगत होत्या. प्राधान्याने सर्व लिखाण हे इंग्रजी, बंगाली भाषेत आहे. श्रीअरविंदांना इंग्रजी, मराठी, बंगाली, तमीळ, गुजराथी, संस्कृत इ. भाषा अवगत होत्या. ते स्वत: नाटककार, कवी, महाकवी, कथाकार, वक्ता, योगी होते. त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात या वाङमयाचे ३० खंडामध्ये प्रकाशन केलेले आहे.

योगी अरविंदांची ग्रंथ संपदा :

१) वंदेमातरम्, २) कर्मयोगिन, ३) The Harmony of vitue गुणसमन्वय, ४) बंगाली भाषेतील लिखाण, ५) कविता, ६) नाटक और कहाँनिया, ७) संग्रहीत नाटके व कविता, ८) भाषांतरे, ९) भावी कविता, १०) वेदरहस्य, ११) अग्निमंत्रमाळा, १२) उपनिषदांवरील भाष्य, १३) गीतेवरील निबंध २ खंड, १४) भारतीय संस्कृतीचा पाया, १५) मानव चक्र, १६) अति मानसाचे अवरण, १७) भागवत घटिका, The Hour of God आणि इतर लेख, १८) दिव्य जीवन खंड-१, १९) दिव्य जीवन खंड-२, २०) योग समन्वय खंड १ व २, २१) योग-समन्वय खंड ३ व ४, २२) योगांवरील पत्रे खंड १, २३) योगावरील पत्रे खंड २ व ३, २४) योगावरील पत्रे खंड ४, २५) श्री माँ, २६) स्वत:विषयी, २७) पुरवणी, २८) सावित्री खंड - १, २९) सावित्री खंड - २.

१) **वंदेमातरम् :** योगी अरविंदांचा जन्म पारतंत्र्याच्या काळातील! हा ग्रंथ एकूण ९०० पानांचा आहे. 'वंदेमारम्' या वृत्तपत्रात जे राष्ट्रवादावरचे विचार, देशासाठी बलिदान देण्यास प्रवृत्त करणारे क्रांतीकारी लेख होते, ते या ग्रंथात आहेत. तसेच थोर व्यक्तिंचे लेख, छोट्या नाटिका, त्यांची काही भाषणे याचा समावेश यात आहे. याचे मूळ लेखन इंग्रजी भाषेत असून याचे भाषांतर हिंदी व इतर भाषेतून झाले आहे.

२) **कर्मयोगिन :** योगी अरविंदांनी कर्मयोगिन व धर्म ही वर्तमानपत्रे सुरू केली होती. यातील भाषा ही मवाळ होती. अलिपूरच्या खटल्यातून त्यांची निर्दोष म्हणून सुटका झाल्यावर ही वर्तमानपत्रे सुरू केली. या खटल्याचा त्यांच्या जीवनावर परिणाम झाला होता. अलिपूरच्या तुरूंगात त्यांच्यावर खटला चालू असताना गीतेतील योग साधना त्यांच्याकडून घडली. त्यांनी राष्ट्रीयत्त्व व अध्यात्म यांची सांगड घातली असल्याचे दिसून येते. यातील लेख १९०९ ते १९१० या कालावधीतील होते. यातील विषय म्हणजे धर्म, संस्कृती इ. वरील आहेत. या ग्रंथात मांडूक्य केन कठ उपनिषदावरील भाष्य आले आहे.

३) **The Harmony of Virtur** : या ग्रंथात विविध प्रकारचे लेख आहेत. सांस्कृतिक लिखाण, बंकीमचंद्र चॅटर्जी यांचे संदर्भातील लेख, काव्याचा स्त्रोत, वाल्मिकी व व्यास यांच्यावरील चिंतन, भारताचा मेंदू (Brain of India) असे अनेक विषयावरील चिंतनशील लेख या ग्रंथात आहे.

४) **बंगाली भाषेतील साहित्य :** या ग्रंथात बंगाली भाषेतून प्रसिद्ध झालेले लेख आहेत. यात दुर्गास्त्रोत, काव्य कथा वेदावरील चिंतन, उपनिषद-पुराणावरील भाष्य, गीता, धर्म, राष्ट्रवाद, 'धर्म' यावरील संपादकीय अशा प्रकारच्या विचारांचा संग्रह यात आहे.

५) **Collected Poems :** निवडक कवितांचा संग्रह यात आहे. लघुकाव्ये, सॉनेटस्, नव्या छंदातील कवितांचा यात समावेश आहे. त्यांचा काव्य हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा होता. यातून त्यांच्या दिव्य प्रज्ञेचे दर्शन घडते.

६) **लघुनाटके व लघुकथा आणि** ७) **संग्रहीत नाटके व कविता :** योगी अरविंद एक तत्त्ववेत्ता होते. त्यांनी बोधप्रद लघुनाटके व लघुकथा लिहिल्या आहेत. त्याचा या ग्रंथात समावेश आहे. यातील काही नाटके म्हणजे बसऱ्याचा वझीर, एडरचा राजपुत्र, विक्रमोर्वशीय इ. नाटकांचा समावेश यात आहे आणि सोन्याचा पक्षी, ज्युलेलिना इत्यादी लघुकथा यांचे संग्रह यात आहेत.

८) **भाषांतरे :** या ग्रंथात अरविंदांनी मूळ ग्रंथांची जी भाषांतरे केली त्याचा समावेश आहे. यात रामायणातील काही 'कांडे',

महाभारतातील काही भाग, भगवद्गीता, कालिदास, बंकीमचंद्रांच्या 'आनंदमठ' कांदबरीतील १३ प्रकरणे, काही तमीळ काव्याचे बंगाली, हिंदी, इंग्रजी इ. भाषेत भाषांतर केले आहे. प्राधान्याने मूळ संस्कृत ग्रंथाचे भाषांतर यात आहे.

९) **भावी कविता :** हा ग्रंथ म्हणजे योगी अरविंदांच्या आत्म्याच्या अविष्कारातून प्रकट झालेले काव्य आहे. यातून कवीच्या अंतरात्म्याची मोहक किरणे प्रकट झाली आहेत. या भावी कवितेतून कविची व्यापक दृष्टी दिसून येते. यातील आध्यात्मिक स्तर असा की, कवीला सदैव भगवंत दिसून येतो हे समजत आहे.

१०) **वेदरहस्य :** योगी अरविंद हे वेदाला मानीत होते. त्यांचे वेदावरील जे चिंतन आहे ते त्यांनी 'आर्य'मध्ये प्रसिद्ध केले होते. त्यांचे असे मत होते की, ''पुरातन प्रश्नांप्रती एका नव्या दृष्टीकोनातून पाहणे, त्यांना नवा अर्थ प्रदान करणे व ज्या प्रश्नांची आतापर्यंत चिकित्सा केली गेली नाही त्याबद्दल विस्तृत विवेचन करणे हा आहे.'' त्यांचे असे मत आहे की, 'ऋषी हे सूक्तांचे निर्माते नसून ते एक द्रष्टा होते.' वेदांची भाषा 'स्वयं श्रुती आहे' हा एक छंद आहे. त्यांची निर्मिती ही बुद्धीप्रामाण्याने होत नसून ती एक 'दिव्य वाणी' आहे. त्यातूनच दिव्य कंपने निर्माण होतात व जीवाला 'तत्' चा साक्षात्कार होतो. अशा विचारांचा यात समावेश आहे.''

११) **अग्निमंत्रमाला :** ऋग्वेदात जो अग्नि विषय आला आहे. त्यावरचे चिंतन या ग्रंथात आहे. हे सर्व विवरण यांनी विस्तृततपणे केले असून हे अत्यंत बोधप्रद व साधकाला मार्गदर्शक आहे.

१२) **उपनिषदांवरील भाष्य :** या ग्रंथात योगी अरविंदांचे उपनिषदांवरील भाष्याचे चिंतन आहे. अरविंदांचे उपनिषदावर म्हणणे असे होते की, 'समाजात लोकांना समजेल अशा चिकित्सक भाषेत वेदांतील सूक्ष्म चिंतन मांडले आहे. तर्काच्या साह्याचे लिखाण नसून अंत:प्रज्ञेतून प्रकट झालेले चिंतन आहे. ईश उपनिषदावर नवीन दृष्टीकोनातून चिंतन केले आहे. बडोदा येथे असताना आठ उपनिषदांवर चिंतन व्यक्त केले आहे.'

१३) **गीतेवरील निबंध २ खंड :** योगी अरविंदांनी गीतेच्या सहा अध्यायावर बडोदा येथे असताना इंग्रजीत जे भाष्य केले होते. त्याचा समावेश आहे याचे दोन खंड आहे.

अरविंदांच्या मते गीता हा केवळ नीतिशास्त्रावरील ग्रंथ नसून आध्यात्मिक जीवनावरही आहे. गीतेत केवळ निष्काम कर्माची शिकवणूक नाही तर कर्मे सकाम केली तरी ती केवळ ईश्वरप्राप्तीची कामना करणारी असावीत. ईश्वर साक्षात्कार हेच जीवनाचे उच्चतम ध्येय असावे. सर्व सामाजिक धर्म व कर्तव्ये निरुपयोगी आणि अनावश्यक आहेत. म्हणून सर्वधर्म परित्याग करून ईश्वराला शरण जावे व सर्व कर्मे ही ईश्वरासाठी केलेला यज्ञ आहे हे समजावे. परमेश्वराला सर्वस्वाने शरण जावे ही जीवनाची अंतिम कृतार्थता आहे. एक विशेष चिंतन म्हणजे अरविंद म्हणतात, धर्मरक्षणासाठी ईश्वराचा अवतार होतो (गीता ४-७-८). यावर ते म्हणतात, धर्मरक्षण राजे, धर्म संस्थापक, किंवा ऋषीही करू शकतात. त्यासाठी ईश्वरी अवताराची गरज नाही. त्यांच्या मते अवतार म्हणजे आत्मतत्त्वाचे जडतत्त्वात अवरोहण इतकेच नसून जडाचे आत्मतत्त्वात आरोहण आहे. हेच ब्रह्मभवन आहे. (म्हणजे जडातून आत्मतत्व प्रकट होते.)

या भागाचे हिंदी, कानडी, तामीळ, गुजराथी, फ्रेंच व चिनी भाषेत भाषांतरे झाली आहेत. हा अरविंदांच्या वाङमयातील सर्वात लोकप्रिय ग्रंथ आहे. गीतेबद्दल त्याचे मत असे की, ''भारतीय तत्त्वज्ञान व धर्म यांच्या उत्क्रांतीच्या इतिहासातील 'गीता' एक क्रांतीकारक वळण घेते.''

१४) **भारतीय संस्कृतीचा पाया :** श्री विल्यम अर्चर या पाश्चात्त्य लेखकानी 'भारतीय संस्कृतीचा पाया' ही एक व्यंजनात्क(?) टीका केली होती. त्याला उत्तर म्हणून या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. प्राचीन काळापासून भारतीय जीवनपद्धती कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे, याचे विश्लेषण यात केले आहे. राजघराणी, राज्यव्यवस्था, लोकशाही इ. शासन पद्धतीचा एक विश्लेषणात्मक विचार यात आहेत. या सर्वात धर्माचा भक्कम आधार असून 'राजधर्म' कसा श्रेष्ठ याचे चिंतन आहे.

१५) **मानवचक्र :** या ग्रंथाचा विषय असा आहे की, योगीजनांची व्यक्तीगत पूर्णता आणि सफलता आदर्श जीवनासाठी समाजात कशाप्रकारे रूजविता येईल, प्रत्यक्ष आचरणात कशी आणता येईल हा या ग्रंथाचा गाभा आहे. 'मानव एकतेचा आदर्श' यात त्यांनी स्पष्टपणे सांगितला आहे.

१६) **अति मानसाचे अवतरण :** या ग्रंथात तात्त्विक चिंतनाचे लेख आहेत. मराठीत याला 'अतिमानसाचे अवतरण' हे भाषांतर उपलब्ध आहे. यात योगसाधनेचे काही महत्त्वाचे निष्कर्ष आहेत.

१७) **The Hours of God** : भागवत घटिका व इतर लेख : या ग्रंथात अनेक प्रकारचे लेख आहेत. The Hours of God, Evolution, Psychology, The Super Mind, On yoga, Education and Art, Reviewes etc. या लेखांचे मराठीत भाषांतर असून यात 'भागवत घटिका' या नावानी ती प्रसिद्ध आहे.

१८ व १९) **दिव्य जीवन Life Divine खंड १ व २ :** हे ग्रंथ लोकप्रिय आहेत. यात अरविंदांनी एक संदेश भव्यरुपात व्यक्त केला आहे. तो म्हणजे 'विश्वाचे मूळ सत्य आहे, तो आत्मा! त्यांच्या अभिव्यक्तीचे क्षेत्र आहे जीवन. परंतु जीवन आत्म्याची अभिव्यक्ती करण्याऐवजी त्याच्याशी वैर साधते आहे. हे जीवन आत्म्याला विन्मुख आहे, त्याला आत्म्याची प्रतिमा बनविण्यात सार्थकता आहे.' अरविंदांच्या मते प्रकृती या उद्दिष्टाप्रत संथ गतीने चालत आहे. हाच अरविंदांच्या दर्शन शास्त्राचा मूलसिद्धांत आहे. तसेच यात सत्याची मीमांसा केली आहे. यातील चिंतन केवळ मानवी वाणीतून नसून अंतर्यामीची वाणी आहे. यातील प्रत्येक शब्दात एक शक्ती आहे. दिव्य जीवनाच्या नव्या भाव-भावना, नवे शब्द, नवी शैली, नव्या विचारांचा तेजो प्रवाह इ. यातून व्यक्त झालेले आहे. यात आध्यात्मिक उत्क्रांतीचे तत्वज्ञान आहे.

२० व २१) **योगसमन्वय :** योगी अरविंदाना वाटते की, 'देवाचे राज्य' या धरतीवर आणावे. हे प्रत्यक्षात कसे उतरावयाचे याचा ऊहापोह 'योग समन्वय' ग्रंथातील भागात केला आहे. तर दुसऱ्या भागात त्याचे आचरण कसे करावे, हे सांगितले आहे.

यामध्ये योगाच्या कर्म, ज्ञान, भक्ती या त्रिमार्गाचा अभ्यास

केलेला दिसतो. यात हटयोग व राजयोगाची तत्त्वे जोडली आहेत. मनोमय जगताचे स्तर यात आहे. अरविंदांचे तत्त्वज्ञान विशेष लक्षण म्हणजे ते सृष्टीच्या क्रमविकासावर आधारित आहे. अरविंदांच्या 'पूर्ण योगाचे' विश्लेषण यात आले आहे. अरविंदाचा 'पूर्ण योग' हा प्रचलित योगापेक्षा वेगळा चिंतनशील विषय आहे.

पूर्णयोगा म्हणजे पृथ्वीच्या पलिकडे असणारा एखादा स्वर्ग, वा वैकुंठ व कैलास प्राप्तीचा नसून मानवी आत्म्याला जगत व ईश्वर यांच्याशी असणाऱ्या त्याच्या अंगभूत एकात्मतेच्या आनंदाचे प्रत्यंतर या दिव्य सामुहिक जीवनात आणून देणे हा आहे.

२२) **योगावरील पत्रे खंड १ :** हा अरविंदांच्या योगावरील पत्र संग्रह आहे. या पत्रातून The Supramental Evolution, Integral yoga & other Path, Religion, Morality, Idealism & yoga, Reason, Science & yoga, Karma & Heridih etc. असे विषय यात आहेत.

२३) **योगावरील पत्रे खंड २ व ३ :** या ग्रंथातही पत्रातून व्यक्त होणारे चिंतन म्हणजे, The object of Integral yoga, synthetic Methods & Integral yoga, Basic Requisites of the Path, Through Meditation, Sadhana Through Love and Devotion, Sadhana in the Ashram & outside.

२४) **योगावरील पत्रे खंड ४ था :** वरील भाग १ ते ४ हे प्रत्येकी जवळ जवळ ८००-९०० पृष्ठांचे आहेत. यात तार्किक विवेचन आहे. या ग्रंथात The Tripple Transformation of the mind, Transformation of the Vital, Transformation of the Physical, Opposition of the Hostile force. etc. हे विषय आहेत.

२५) **The Mother** : या ग्रंथात अरविंदांच्या सागरासारख्या विशाल तत्त्वज्ञानाचे सार आहे. यातून पूर्ण योगाची त्रिसूत्री अभिप्सा अव्हेर व समर्पण (Aspriration, Rejection, Surrendr) या ग्रंथात असून जगज्जननीच्या चार महानरुपाचे वर्णन यात आहे. भावी काळात आदिमाता कोणत्या रुपात प्रकट होणार हे असून दिव्यजीवन कसे साकार होईल हे अरविंदांनी योगबलाने प्राप्त केलेले ज्ञान या ग्रंथात सांगितले आहे.

२६) **On Himself : स्वत:विषयी :** या ग्रंथात योगी अरविंदानी लिहिलेल्या नोट्स व पत्रे याचे संपादन केलेले आहे. तसेच अरविंदांनी स्वत:विषयीची माहिती यात समाविष्ट केली आहे. अरविंदांच्या जीवनविषयी खरी व वास्तव माहिती यात आहे. विविध प्रसंग व घटनांची माहिती यात आहे.

२७) **पुरवणी खंड :** या ग्रंथात योगी अरविंदांचे काव्य ग्रंथ, काव्य, भावी काव्य इ. नावाने प्रसिद्ध झालेले आहे. Future Poetry यात डॉ. जेम्स कॉन्सिस यांच्या New way in English litertur या पुस्तकावर मनोगत करण्याच्या उद्देशाने ३२ निबंध त्यांनी लिहिले आहेत. यातून त्यांनी डॉ. जेम्सच्या साहित्यावर चर्चा केली आहे. इंग्लिश काव्याची प्रकृती आणि त्यातील प्रवाह यावर चर्चा केली आहे. तसेच चॉसर, शेक्सपीअर, स्पेन्सर इ. कवींवर चिकित्सक लिखाण केले. तसेच त्यांनी काही गूढ मंत्रकाव्येही लिहिली आहेत याचा समावेश यात आहे.

२८ व २९) **सावित्री खंड १ व २ :** सावित्री हे योगी अरविंदांचे इंग्रजी महाकाव्य आहे. या काव्याची १२ पुस्तके व ४९ cantoes आहे. सुमारे २४००० ओळींचे हे महाकाव्य आहे. हे लिहिण्यासाठी अरविंदांना ४५ वर्षे लागली आहेत. सतत १२ व्या वर्षापासून काव्यरचना करणाऱ्या महाकवीला एवढी वर्षे लागावीत हा एक चमत्कार म्हणावा लागेल.

या महाकाव्यात अरविंदांनी जे साधना करून साध्य करून घेतले त्याचा समावेश यात आहे. सत्यवान सावित्रीची जी कथा आहे. त्यातील पात्र तशीच ठेवून जे रुपक दिले आहे. त्याचे चिंतन यात आहे. उदाहरण सावित्री हे प्रतीक, अरविंदांच्या भावी कार्याचे आहे. भावी कार्य म्हणजे नरदेहातच अमरत्वाची प्राप्ती, विश्वाच्या निश्चितेची अनंत खोली खणून तिथे सत्याचे निशाण फडकविणे जड चेतनेत सत्यचेतना उतरविणे, सावित्रीच्या माध्यमातून अरविंद एक नवी दृष्टी देतात. ती दृष्टी आकलन होण्यासाठी त्यांचे मृत्यूसंबंधीचे विचार यातून प्रकट झाले आहेत. या महाकाव्यातून प्रत्येक शब्द मंत्रवत आहे. त्याच्या उच्चरणाने स्फूरण, चैतन्य, आनंद निर्माण होते.

समारोप : योगी अरविंदांचे वाङमय अत्यंत महत्त्वपूर्ण आणि वाङमयाच्या सारस्वताची फार मोठी देणगी आहे. एका व्यक्तीकडून सुमारे ७८ (१८७२-१९५०) वर्षाच्या जीवनात साधना करता करता इतक्या विपुलतेने वाङमय निर्माण होणे ही भगवंताची लिला आहे. त्याच्या नावातच एक अर्थ आहे. 'अर' म्हणजे शत्रू वा अज्ञान, 'विंद' म्हणजे शत्रूचा नाश करणारा, म्हणजे अज्ञान नष्ट करणारा, अंध:कार नष्ट करणारा असा आहे. त्यामुळे सूर्याला 'अरविंद' म्हणतात. असा हा 'ज्ञान सूर्य' या भूतलावर गेल्या शतकात अवतीर्ण झाला होता.


अरविंदांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यांनी प्रत्येक देशाच्या संस्कृतीचा, इतिहासाचा अभ्यास केला होता. लेखनाची भाषा प्राधान्याने इंग्लिश व बंगाली असून अत्यंत गूढ अशी आहे. भाषेत रसाळपणा, शांत, संथ, मधुर शब्दांचा वापर असला तरी सामन्याला समजून घेणे जड जाते. लेखाची भाषा, प्रखर, सडेतोड, मुद्देसुद, परिपूर्ण विश्लेषण करणारी, देशप्रेमाने ओतप्रोत भरलेली आहे. भाषेला खरोखर परतत्त्वाचा स्पर्श आहे. हे वाङमय मानवी मनाच्या कक्षेत येत नाही. त्यांनी नवी शब्द, व शब्दांनाही नवीन अर्थ प्रदान केल्यामुळे त्याचे सौंदर्य अधिक खुलून गेले आहे.

उदाहरण : अतिमानस, मनाचा सर्वोच्च स्तर, याला त्यांनी Super Mind ही संज्ञा वापरली. चिदात्मा याला Psychic Being हा स्वनिर्मित शब्द योजना करून भाषेचे सौंदर्य वाढविले आहे. तसेच त्यांच्या व्यक्तीगत जीवनातील पैलू वाङमयात आढळून येतात. त्यांच्या साहित्य भाषांचा प्रभाव त्यावेळच्या साहित्यीकांवर पडला होता. अशाप्रकारे सन १९७२ मध्ये जी योगा अरविंदांची जन्मशताब्दी झाली. त्योळी २९ खंडात त्याच्या वाङमयाचा परामर्श घेतला होता. त्यानुसार हे चिंतन यात लिहित आहे. ही वाङमयीन अक्षरसेवा योगी अरविंदांच्या चरणी समर्पण करतो.

- डॉ. अजित कुलकर्णी

संदर्भ ग्रंथ : १) मराठी तत्त्वज्ञान कोश भाग १ ते ३.
२) श्रीअरविंद : लेखिका डॉ. सौ. सरल सु. नागराज.

■ ■ ■



श्रीअरविंद– साहित्याचे अनुवादक सेनापती बापटांचे योगदान

डॉ. केतकी मोडक
शिक्षण : एम्.ए. ; एम्.एड्. ; पीएच.डी.
व्यवसाय : उपप्राचार्य, गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स
विशेष उल्लेखनीय बाब : संत मुक्ताबाईवरील संशोधनपर पुस्तक १) 'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायी' प्रकाशित. ह्या पुस्तकास महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद इ. पाच संस्थांतर्फे पुरस्कार प्राप्त. २) 'उपयोजित मराठी' ह्या पुस्तकाचे संपादन.

सेनापती बापट ह्यांचे नाव इतिहासाला ज्ञात आहे ते प्रामुख्याने मुळशी सत्याग्रहाच्या संदर्भात. त्या काळात झालेला हा सत्याग्रह जगातील पहिलाच धरणविरोधी सत्याग्रह होता. ह्या अर्थाने त्याचे मोल महत्त्वाचे होते. ह्याच सत्याग्रहाचे नेतृत्व केल्यामुळे पांडुरंग महादेव बापट हे सेनापती बापट ह्या नावाने ओळखले जाऊ लागले.

महाराष्ट्रातील पारनेर येथे जन्माला आलेले बापट अभियांत्रिकीच्या पुढील उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तेथे गेल्यानंतर भारताच्या स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित झाल्याने त्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात आली आणि त्यांना भारतात परतावे लागले. माणिकतोळा बॉंब केसमध्ये पकडले जाण्याची शक्यता असल्याने ते चार वर्षे भूमिगत झाले. १९१३ ते १९२० या काळात त्यांनी सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिले. टिळकांच्या मराठा या नियतकालिकाचे उपसंपादक म्हणूनही त्यांनी काम सांभाळले होते. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या सहभागामुळे जवळपास दोन दशके त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संयुक्त महाराष्ट्र आणि गोवा मुक्तिसंग्राम यामधील त्यांचा सहभाग लक्षणीय होता. बापटांच्या या साऱ्या कार्याची इतिहासात आवर्जून नोंद घेतलेली आढळते.

पण मराठी सारस्वतामधील त्यांच्या कार्याची दखल अभावानेच घेतली जाते. अनुवादक म्हणून सेनापती बापटांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे, परंतु दुर्दैवाने ह्याची पुरेशी दखल मराठीमध्ये घेतली जात नाही. अर्थात् त्याची कारणे सहज लक्षात येण्याजोगी आहेत. कारण ज्या ग्रंथांचा अनुवाद त्यांनी केला आहे ते पाँडिचेरी येथील योगी श्रीअरविंद यांचे साहित्य, मुळात तत्त्वज्ञानात्मक आणि समजण्यास दुर्बोध. तेव्हा त्याकडे वळणाऱ्या लोकांची संख्या ही मुळातच मूठभर. तेव्हा योगी श्रीअरविंदांचे साहित्य मराठीत उपलब्ध आहे का? ह्याचा शोध घेणाऱ्या लोकांची संख्याही मर्यादितच. त्यामुळे सेनापती बापटांनी केलेले अनुवादकार्य माहीत असण्याची शक्यता तशी कमीच. परंतु असे असले तरी, ह्या कार्याचे मोल इतके प्रचंड आहे की, त्याकडे असे दुर्लक्ष करून चालणार नाही.

भारतीय योगाचा आणि तत्त्वज्ञानाचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाची मांडणी होण्याच्या आधी ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, हठयोग, राजयोग, तंत्रयोग असे विभिन्न योगमार्ग आणि त्यानुसार मार्गक्रमण अशी व्यवस्था होती. योगी श्रीअरविंदांनी प्रथमच या सर्व योगांचा समन्वय करून पूर्ण योगाची स्वतंत्रपणे मांडणी केली. म्हणून योग आणि तत्त्वज्ञानाचा एक पुढचा टप्पाच एकप्रकारे आक्रमिला गेला. मानव हा उत्क्रांतीमधील शेवटचा टप्पा नाही तर मानव हा संक्रमणशील आहे, याहीपुढे अतिमानव हा पुढचा टप्पा तयार करण्याच्या प्रयत्नात निसर्ग आहे आणि मानव त्यात जाणीवपूर्वक सहभागी होऊ शकतो अशी मांडणी योगी श्रीअरविंदांनी केली आहे. पूर्णयोग आणि अतिमानस या संकल्पनांची मांडणी हे त्यांचे योग आणि तत्त्वज्ञानाला दिलेले योगदान. ही सर्व विद्वत्तापूर्ण मांडणी प्रथमच केलेली असल्याने ती समजण्यास गहन आहे. मुळातील हे सर्व लिखाण इंग्रजीमध्ये आहे.

योगी श्रीअरविंद यांचे इंग्रजीदेखील उच्च पातळीवरील आहे. आशय अपूर्व आणि आविष्कारदेखील तितकाच सघन. त्यांचे एकेक वाक्य एकेका परिच्छेदाएवढे असते. अशावेळी मराठी माणसाला त्यांचे इंग्रजीतील मूळ साहित्य वाचणे अशक्यप्राय वाटावे इतके कठीण आहे. अशा वेळी ते सारे साहित्य मराठीमध्ये तंतोतंत उपलब्ध होणे ही मराठीजनांना पर्वणीच वाटावी अशी गोष्ट आहे आणि हे शिवधनुष्य पेलण्याची जबाबदारी उचलली ती सेनापती बापटांनी. त्यांनी हा अनुवाद करून मराठीजनांना केवढा ज्ञानसाठा खुला करून दिला आहे हे लक्षात घेतले की मन त्यांच्याविषयीच्या आदराने आणि कृतज्ञतेने भरून येते. अत्यंत सघन असा आशय आणि व्यामिश्र आविष्कार यांना पार करून त्यापलीकडील तत्त्वज्ञानाकडे वळणे आणि ते कळणे हे एरवी दुरापास्तच ठरले असते. परंतु सेनापती बापटांच्या अनुवादामुळे हे मराठी जनांच्या शक्यतेच्या कोटीत येऊन पोहोचले आहे.

योगी श्रीअरविंद यांच्यू Life Divine, The Foundations of Indian Culture, Essays on Geeta, Synthesis of Yoga या ग्रंथांचे अनुवाद अनुक्रमे दिव्य जीवन (खंड १, खंड २ – भाग १, खंड २ – भाग २), भारतीय संस्कृती, गीतेवरील निबंध, योगसमन्वय या नावांनी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यांची प्रकाशन वर्षे अनुक्रमे १९६०, १९६२, १९६५, १९७१, १९७२, १९९७ अशी आहेत. अर्थात् त्यातील शेवटचे तीन ग्रंथ हे सेनापती बापट यांच्या मृत्यूनंतर (२८ नोव्हेंबर, १९६७) प्रकाशित झालेले आहेत हे लक्षात येते. अर्थात

हे सारे ह्याच क्रमाने अनुवादित झाले असतील किंवा कसे, यासंबंधी निश्चितपणे काही सांगता येत नाही. सूक्ष्म आकलनशक्ती, भाषेवरील प्रभुत्व, घेतलेल्या कामावरील अढळ निष्ठा, सातत्यपूर्ण चिकाटी या गोष्टी असल्याशिवाय हे शिवधनुष्य पेलणे केवळ अशक्य आहे हे लक्षात येते.

त्यांनी केलेल्या अनुवादाची कल्पना यावी म्हणून गीतेवरील निबंधामधील इंग्रजीतील मूळ उतारा आणि त्याचा मराठी अनुवाद लक्षात घेणे उचित ठरावे.

"This then is the supreme movement, this complete surrender of your whole self and nature, this abandonment of all Dharmas to the Divine who is your highest Self, this absolute aspiration of all your members to the supreme spiritual nature. If you can once achieve it, whether at the outset or much later on the way, then whatever you are or were in your outward nature, your way is sure and your perfection inevitable. A supreme Presence within you will take up your Yoga and carry it swiftly along the lines of your swabhava to its consummate completion. And afterwards whatever your way of life and mode of action, you will be consciously lliving, acting and moving in him and the Divine Power will act through you in your every inner and outer motion. This is the supreme way because it is the highest secret and mystery and yet an inner movement progressively realisable by all. This is the deepest and most intimate truth of your real, your spiritual existence."

''तेव्हा, तुमचा आत्मा आणि तुमची प्रकृति तुम्हीं सर्वांशांनी ईश्वराला पूर्ण समर्पण करणे, तुमचा उच्चतम आत्मा जो ईश्वर, त्याच्या चरणी तुमचे सर्व धर्म तुम्ही समर्पण करणे, तुमच्या सर्व अंगांनी, अवयवांनी सर्वोत्तम आध्यात्मिक प्रकृतीचा आश्रय घेण्याची पराकोटीची आकांक्षा धरणे ही क्रिया सर्वात श्रेष्ठ क्रिया होय. ही क्रिया, योगाचा आरंभ करतानाच किंवा योगमार्ग बराच चालून झाल्यावर तुम्हाला साधली की, एक गोष्ट तुम्ही निश्चित समजा कीं, तुमची बाह्य प्रकृति या सिद्धीच्या वेळी किंवा तत्पूर्वी कशीहि असो, तुमचा मार्ग खात्रीचा आहे आणि तुमची पूर्णता या मार्गाने तुम्हांला खात्रीने लाभणार आहे, ती लाभणे अटळ आहे. कारण, या सिद्धीनंतर तुमच्या ठिकाणी असणारा सर्वोत्तम परमात्मा तुमचा योग आपल्या हाती घेऊन, त्याला तुमच्या स्वभावाच्या विशेषानुसार जोराची गति देईल आणि याप्रमाणे त्याच्या विशिष्ट अंतिम पूर्णतेला त्याला शीघ्रतेने नेऊन सोडील आणि तुमचा जीवनमार्ग, तुमचा कर्ममार्ग कोणताहि असला, तरी हे घडून आल्यावर, तुम्हीं जाणीवपूर्वक परमात्म्याच्या ठिकाणींच राहून जीवन चालवाल व कर्मे कराल आणि परमात्म्याची शक्ति तुमच्या द्वारा, तुमच्या प्रत्येक बाह्य व आंतर कर्माच्या द्वारा तिचे नियोजित कार्य करीत राहील. हा पूर्ण समर्पणाचा, पूर्ण शरणागतीचा मार्ग, सर्वोत्तम मार्ग आहे. कारण हा गुह्यतम मार्ग असला, तरी सर्वांना क्रमशः साधण्यासारखा आंतरिक साधनेचा मार्ग आहे. तुमच्या खऱ्या आध्यात्मिक अस्तित्वाचे, अगदी जिव्हाळ्याचे, अगदी खोलात खोल सत्यसाधन म्हणजे पूर्ण शरणागतीचे आंतरिक साधन होय.'' (गीतेवरील निबंध)

आपल्या येथे एक गोष्ट ध्यानात येते की, हा शब्दशः अनुवाद नाही. शब्दशः अनुवाद केला तर काही वेळा तो कृत्रिम होतो आणि त्यामुळे त्याचे वाचन कंटाळवाणे होते पण येथे असे होत नाही. शब्दांशी प्रामाण्य राखीत तरीही अर्थाशी एकनिष्ठ राहून केलेला हा आशयप्रवाही अनुवाद आहे त्यामुळेच आपण हे भाषांतर वाचत आहोत अशी जाणीवदेखील होऊ नये इतका यथार्थ उतरलेला हा अनुवाद आहे. किंबहुना त्यांच्या सर्वच ग्रंथाच्या वाचनाच्यावेळी ही गोष्ट लक्षात येते. त्यांचे सर्वच मराठी अनुवाद हे स्वतंत्रपणे आस्वाद्य आणि तितकेच बुद्धीला खाद्य पुरविणारे ठरतात.

बापटांनी केलेल्या प्रचंड आणि महत्त्वपूर्ण कामाची पुरेशी कल्पना यावी यासाठी योगी श्रीअरविंदांनी मूळ इंग्रजीत लिहिलेले एखादे वाक्य स्वतः अनुवादित करण्याचा प्रयत्न करून पाहा. इंग्रजीवर आत्यंतिक प्रभुत्व असलेले योगी श्रीअरविंद शब्दांचा चपखल उपयोग करतात आणि तो आशय संदर्भानुसार नेमका लक्षात घेऊन, परत मराठीत त्याचे अनुवादन करणे ही सोपी गोष्ट नाही. येथे बापटांना उपयोगी पडते ते त्यांचे संस्कृतभाषेवरील प्रभुत्व. येथे बापट यांनी, अनेक जुन्या शब्दांचे पुनरुज्जीवन केले आहे. तर काही शब्द नव्याने घडविले आहेत.

मुळातच योगी श्रीअरविंदांचे लिखाण हे उच्च पातळीवरील असल्यामुळे, त्याचा अनुवादही तितक्याच उच्च पातळीवरील आहे. त्यामुळे त्या पातळीवरील लिखाण समजण्यासाठी आधी त्या पातळीवर चढून जाणे आवश्यक आहे. त्या पातळीशी आपले सूर एकदा जुळले की मग मात्र हे लिखाण वाचणे, समजून घेणे तितकेसे जड जात नाही. एकदा त्या पातळीशी आपण समकक्ष होऊ शकलो तर मग मात्र आपण प्रवाहीपणे ते सहजतेने वाचू शकतो.

बहुतेक सर्व ठिकाणी त्यांनी यथातथ्य भाषांतर केले आहे. मात्र अगदी क्वचित् ठिकाणी त्या त्या प्रकरणाचे महत्त्व लक्षात घेऊन त्याचा मोकळा व विस्तृत अनुवादही त्यांनी केला आहे. उदा. दिव्य जीवन, प्रकरण पहिले.

मुळातले योगी अरविंदांनी लिहिलेल्या ग्रंथातील पृष्ठसंख्या आणि अनुवादित मराठी ग्रंथातील पृष्ठसंख्या लक्षात घेतली तरीही सेनापती बापटांनी केवढे थोर कार्य मराठीजनांसाठी करून ठेवले आहे याची कल्पना येईल. दिव्य जीवन (इंग्रजी १०७० – मराठी १३३८), भारतीय संस्कृतीचा पाया (इंग्रजी ४३३ – मराठी ३९९), गीतेवरील निबंध (इंग्रजी ५७५ – मराठी ६८३) योगसमन्वय (इंग्रजी ८७२ – मराठी ११२०).

सेनापती बापटांनी एवढे भगीरथ कार्य करून ठेवले आहे पण त्याचा फारसा गाजावाजा कोठेही केलेला आढळत नाही. एवढेच काय, पण या साऱ्या अनुवादकार्यामागील त्यांची प्रेरणा, त्यांची भूमिका, त्यांचा अनुभव ह्याचे वर्णन करावे, अनुवादकाचे मनोगत ग्रंथाच्या सुरुवातीला प्रकाशित करावे अशी पुसटशी इच्छादेखील त्यांना झाली असल्याचे

दिसत नाही. त्यांच्या ह्या निर्मोहित्वाने तर मन अधिकच मुग्ध होते. मात्र असे मनोगत त्यांनी लिहिले असते तर बरे झाले असते हेही मनोमन वाटून जाते.

ह्या संपूर्ण विषयाची व्यापकता पाहता, हा एका स्वतंत्र प्रबंधाचा, संशोधनाचा विषय ठरू शकतो हे सहज लक्षात यावे. या लेखाचे स्वरूप परिचयवजा असल्यामुळे येथे अधिक तपशीलात न जाता, विषय मांडला आहे. काहीशा अलक्षित असलेल्या या उत्तम अनुवादाचा मराठीजनांनी लाभ घ्यावा ह्या सदिच्छेपोटीच केलेला हा लेखप्रपंच !

डॉ. केतकी मोडक


श्रीराम अपार्टमेंटस्, २४३/८, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२


फो नं. (०२०) २४४६०५२०

■■■

भगवंताला काही लोक आपला आत्मा देतात, काहीजण आपले सारे जीवन देतात, काही त्याला आपले कर्म अर्पण करतात, तर काही आपली संपत्ती वाहतात. पण या सर्वांचे एकत्रित समर्पण फारच थोडे लोक करतात, तीच परमेश्वराची खरी लेकरे होत

। श्री माँ ।





योगी श्रीअरविंदकृत महाकाव्य 'सावित्री'

कुलश्री अशोक मेघरे

एम्.ए. (इंग्रजी वाङ्मय), बी.एड.
सेवानिवृत्त, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षिका.
श्रीअरविंद सोसायटी केंद्र वलगाव इथे सचिव म्हणून सेवारत, तसेच अमरावती शाखेशी संलग्न 'अभीप्सा' मासिकाच्या संपादन, भाषांतर ह्या कार्यात सहभाग. दोन अनुवाद पुस्तकांचे व १ काव्यसंग्रहाचे प्रकाशन झालेले आहे.

योगेश्वर श्रीअरविंदांच्या जीवनातील उत्तरार्धाचा ४० वर्षांचा कालखंड उत्क्रांतीचा उद्घोष करीत, समग्रयोगाचा मार्ग प्रशस्त करीत, पृथ्वी व पृथ्वीवरील जीवनाच्या परिवर्तनाचा, मानवी दिव्य-जीवनाचा ध्यास घेऊन अखंड साधना करीत पाँडिचेरी येथे व्यतीत झाला. सक्रिय राजकारणातून निवृत्त होऊन ह्या महान् क्रांतिकारक देशभक्ताने योगसाधनेचा मार्ग धरला आणि वैश्विकपातळीवर जी प्रवृत्ती केली ती म्हणजे अज्ञाताचा वेध होती, चैतन्याचे अपूर्व साहस होते. "Adventure of consciousness and joy." अशी पंक्ती 'सावित्री' ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या पानावर येते. त्यातून जणू काही सावित्रीचा विषय स्पष्ट होतो. श्रीअरविंदांच्या अफाट लेखनातून व समृद्ध ग्रंथसंपदेतून विश्वाला लाभलेली अमूल्य देणगी म्हणजे 'सावित्री' हे महाकाव्य. हे अप्रतिम काव्यशिल्प म्हणजे इंग्रजी-भाषेला व अखिल विश्वाला मिळालेले परमेश्वरी चैतन्याचे वरदान आहे.

'सावित्री' ह्या ग्रंथाची ओळख अजून जगाला पटलेली नसली, तरी मानवी जाणीव शक्तीच्या विकसनासोबतच ती नजिकच्या भविष्यकाळात सर्वत्र आपला ज्ञानप्रकाश प्रसारित करणार आहे हे निश्चित.

भारतीय पौराणिक कथांमधून सावित्रीच्या कथेची निवड त्यांनी आपल्या महाकाव्याच्या विषयासाठी केली, ती त्यातील मृत्यूच्या पराभवासाठी. मानवी चैतन्याची साहसमूर्ती सावित्री ही राजकन्या दैव आणि मृत्यू सारख्या बलाढ्य शक्तींच्या पुढे आव्हान स्वीकारीत उभी राहिलेली आहे. मृत्यू म्हणजे जीवनाचा अंत. ह्या घटनेमुळे सर्व दु:खांचा अंत होतो असे मानले, तरी मानवी जीवनातील सर्वात मोठे दु:ख म्हणजे मृत्यू. जीवनाचे परमदु:ख आणि परमसत्य कोणते, तर मृत्यू ! ह्या परमसत्याचे सर्व अंगांनी वास्तवदर्शन तसेच त्याच्या पलीकडील विराट सौंदर्याचे वास्तवदर्शन ह्या काव्यातून महाकवींनी घडविले आहे. ह्याशिवाय जीवनाचा भेसूरपणा आणि जीवनाचे सौंदर्य, प्रेमाची व आनंदाची अधोगती आणि उर्ध्वगती, जीवनातील विसंगती व द्वंद्वे आणि त्यांची सुसंवादासाठी चाललेली धडपड, जाणीवेचा विकासक्रम, सुसंवादी दिव्यजीवनाकडे जाण्याचा मार्ग, आत्मशक्ती, भौतिक शक्ती, जीवन-शक्ती, मन:शक्ती ह्यांची स्वरूपे, मोक्ष-निर्वाणादि स्थितींचे स्वरूप, साक्षात्कारांच्या पायऱ्या इत्यादि अनेक गोष्टी सावित्रीचे विषय आहेत. निश्चेतना ते पराचेतना किंवा महाचैतन्य हा सावित्रीतील प्रवास आहे. त्यामुळे यातील जगतांची दर्शने सामान्य मानवी बुद्धीला अनाकलनीय वाटू शकतात. परंतु, त्यातून मानवी चेतनेच्या विकासाची तसेच अवस्थांची रहस्ये हळु-हळू उलगडत जातात हे ही नि:संशय खरे आहे. आपण मानसरोवराचे दर्शन घेतलेले नाही म्हणून त्याच्या अस्तित्वाविषयी शंका घेणे इष्ट होईल का ?

'सावित्री' हे काव्य एक अतुलनीय, अद्वितीय प्रकाशवैभव आहे. ती परमानंदाचा एक नव्हे, दोन नव्हे, तर अनेक साक्षात्कार घडवणारी दैवी योजना आहे. ह्यातील काव्यसौंदर्य, विचार-सौंदर्य, ज्ञान-सौंदर्य वर्णनातीत आहे. विश्वस्तरीय शब्दभांडार आणि अद्भुत पदरचना, लखलखणारी, विद्युत प्रकाशाच्या झोताप्रमाणे अकस्मात् प्रकट होणारी सत्ये त्यातील ओळींमधून सतत प्रवाहित होतात. आणि मग, हे संपूर्ण काव्यच जणू मांत्रिक शक्तीने भारलेले आहे असा प्रत्यय येतो.

श्रीअरविंदांनी अनेक भाषांचा अभ्यास केलेला होता. पाश्चिमात्य अभिजात वाङ्मयाचे अध्ययन केलेले होते. ग्रीक आणि लॅटीन भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. युरोपीय साहित्याचा अभ्यास आयुष्याच्या पूर्वार्धात आधी झाला नंतर भारतीय भाषांचे अध्ययन झाले. संस्कृतचे अध्ययन, अभिजात साहित्याचा अभ्यास, वेदांचा अभ्यास, उपनिषदांचा अभ्यास होता होता, संस्कृत रचनाही साकारल्या 'भवानी-भारती' हे खंडकाव्य त्यांच्या प्रतिभेची उंची आणि व्याप्ती सहज दर्शविते. ह्या सर्व अध्ययनाच्या मागे केवळ विद्वत्ता प्राप्त करणे आणि पांडित्य प्रदर्शित होणे असा हेतु नसून एका सत्यशोधक हृदयाचा ध्यास होता, आध्यात्मिक क्रांतीचा न्यास तयार होण्याची ती प्रक्रिया होती.

वैश्विक साहित्याची साधना आणि योगसाधना, जाज्वल्य देशभक्ती, अंतर्बाह्य अनासक्त भाव ह्या गोष्टींनी युक्त असलेल्या त्यांच्या जीवनातून लेखनाचे अनंत भांडार प्रकट झाले. महर्षींच्या लेखनसंभारातील 'सावित्री' हा मुकुटमणी ग्रंथ आहे. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य महाकाव्यांचे संकेत पाळीत त्यांनी हे सृजन केले. रचनेच्या दृष्टीने महाकाव्याची तीन भागात विभागणी केलेली आहे. बारापर्वांची निर्मिती असून प्रत्येक पर्वातील अध्यायसंख्या वेगवेगळी आहे.

'सावित्री'च्या पहिल्या भागात तीन पर्वे असून चोवीस सर्ग (अध्याय) येतात. पृष्ठसंख्येच्या दृष्टीने पाहता महाकाव्याचा मध्य ह्या

भागाच्या अंती येतो. पहिल्या पर्वात सृष्टीचा आरंभ, राजा अश्वपतीची योग साधना (सावित्रीचा पिता) पूर्ण होते. दुसरे पर्व पंधरा सर्गांचे असून पहिल्या पर्वात चैतन्याची सुटका झाली असली, तरी वैश्विक ज्ञानाचा प्रवास ह्या पर्वात सुरू होतो. सूक्ष्म जडाचे जगत्, जीवनाची स्वरूपे, उच्चतर जीवनाची राज्ये, देववृंद, महारात्री, असत्याचे राज्य, प्राणदेवतांचा स्वर्ग, मनाची जगते, मनोविकासाचे टप्पे, मनोमय चैतन्य, विश्वात्म्याचे स्वरूप, श्रेष्ठ ज्ञानाचे क्षेत्र इत्यादि स्पष्ट केलेले आहे.

तिसरे पर्व दिव्य-मातेचे आहे. Book of the Divine Mother, नितांत सुंदर आणि भगवतीचा साक्षात्कार घडवणारे आहे. जगन्मातेचे दर्शन, वरप्रदान ह्यांचे वर्णन आहे. विशाल समर्पणाशिवाय साध्य न होणारी ही गोष्ट आहे.

दुसऱ्या भागात पर्व ४ ते ८ पर्यंत कथा येते. ह्यात सावित्रीचा जन्म, विकसन, वराचा शोध, सत्यवान-सावित्री भेट, प्रेमपर्व व नियति पर्वात 'दैव आणि दैवाचा मार्ग' व 'दु:खाचे कोडे' असे दोन महत्वाचे सर्ग आहेत. सातवे पर्व सात सर्गांचे असून सावित्रीच्या योगाची साधना विशद करतात. ह्यात निर्वाण-स्थितीचे आश्चर्यकारक वर्णन आहे, विचार प्रक्रियेचे अद्भुत स्पष्टीकरण आहे. नंतर एकच सर्ग असलेले मृत्यु-पर्व येते.

सावित्रीचा तिसरा भाग ९,१०,११ आणि उपसंहाराचे १२ वे पर्व मिळून ४ पर्वांचा आहे. सावित्रीने मृत्यूचा केलेला पाठलाग, खरे तर, हा सत्यवानाच्या मागे सूक्ष्मदेहाने जात काळरात्रीच्या व मृत्यूच्या राज्यातून सावित्रीने केलेला प्रवास ९ आणि १०व्या सर्गात येतो. तिला परतून लावण्याचे यमराजाचे सर्व प्रयत्न फसतात. सत्यवानाला पृथ्वीवर परत पाठवावे ह्याशिवाय दुसरे कुठलेही सावित्रीचे मागणे नसते. अनेक विषयांवर दोघांमध्ये वाद होतो. श्रीअरविंदांचा यमराज मानवाप्रमाणे बौद्धिक तर्क प्रस्तुत करतो, आणि मानवी सावित्रीचे पात्र त्या कार्यकारी शक्तींच्या देवाला ज्ञानामृताची संजीवनी देते. जेव्हा यमाकडून मुक्तीचे (मोक्षाचे) प्रलोभन दिले जाते तेव्हा-एका किंवा दोन मानवांच्या मुक्तीने काय साध्य होणार ? असे विचारीत सावित्री म्हणते- "My spirits Liberty, I ask for all" ''माझ्या चैतन्याची मुक्ती मला सर्वांसाठी हवी आहे. पृथ्वीवर राहून सत्यवानासह मला देवकार्य करावयाचे आहे, तेव्हा सत्यवानाशिवाय मला दुसरे काही नको'' अशी तिची ठाम भूमिका आहे.

दहावे आणि अकरावे पर्व साक्षात्कारांचे पर्व आहे. दहाव्या पर्वात सावित्रीच्या पूर्वचैतन्य स्वरूपाचा यमाला साक्षात्कार होतो आणि तो परास्त होतो. त्याचे अस्तित्वच तिच्यापुढून नाहीसे होते.

अकराव्या पर्वात शाश्वत, अनंत, परात्पर भगवंताचा साक्षात्कार आहे. सत्यवानाला जीवन देणारा हा प्रभू दिव्य स्वरूप प्रकट करतो. चतुर्विध स्वरूपाचा हा साक्षात्कार अद्वितीय रूपाचा आहे. विराट (अस्तित्वाचे स्वरूप), हिरण्यगर्भ (आत्मतत्व), अतिमन चैतन्य (प्रकाशामध्ये अवगुंठित पराचेतना), अनंत ज्याच्या चिंतनात मग्न असतो ते प्रेम व हर्षाचे स्वरूप हे सर्व एकवटून प्रकट होतात. सावित्री गांगरून न जाता आत्मचेतनेत स्थिर होऊन जागृत जाणिवेच्या अवस्थेत आजवर कधी न मागितली गेलेली वरदाने मागते. जगत् आणि जीवनाचे दिव्य जीवनात रूपांतर होण्यासाठी, मानवाचे दिव्य-मानवात रूपांतर होण्यासाठी सावित्री एका पाठोपाठ एक अशी ४ वरदाने मागते.

''हृदयात जपण्यासाठी तुमची परमशांती द्या.'' Thy peace, O Lord, a boom within to keep----- For the magnificent soul of man on earth." हे पहिले वरदान मिळाल्यानंतर ''सर्व जीवांशी एकत्व प्राप्त करण्यासाठी अनंताचे एकत्व'' तिला विश्वास्तव हवे असते. तिसरा वर, ती - ''सर्व जीवांना, स्त्री-पुरुषांना त्यांच्या दु:खात मातेप्रमाणे कवेत घेता यावे म्हणून ऊर्जाशक्ती द्यावी'' असा मागते. चौथ्या वेळी तिने मानवाचे दु:खबंध तोडण्यासाठी हर्ष-प्रभु-प्रीतीचा अखंड प्रवाह मिळावा असे मागणे मागितले. "--- Thy sweetness give to me for earth and men." अशी शेवटची ओळ आहे.

ही सर्व वरदाने दिल्यानंतर प्रभूने सावित्रीचा गौरव केला.

''ओंकाराची प्रगट देवता सुंदर तनु अससी.
तुझे विचारचि माझे असती तू दुसरी नससी.
मीच बोललो तव वाणीतुनि, प्रगट तुझी दिसली.
संकल्पहि तो एकच अपुला आस एक झाली.
निवड तुझी जी तीच असे मम, निश्चिंतहि राही
मागितले तू जे, ते मनुजा विश्वा मी देई''

इथे हा सर्ग संपत नाही, काव्यही संपत नाही. ती दिव्य-वाणी आगामी दिव्य-जीवनाचे दर्शन घडवते. त्यासाठी सावित्रीला काय करावे लागेल ते सांगते, कारण तिने स्वर्गमोक्षादि प्रलोभने नाकारून पृथ्वीवरील संघर्ष आणि तिचे दैव ह्यांची निवड केली. पार्थिव बंधनात अडकलेल्या मनुष्यांच्या उद्धारासाठी वाटणारी करुणा हृदयात बाळगली. Now will I do in thee my marvelous works. ह्यानंतर काही ओळी आहेत व पुढे ह्या अकराव्या पर्वाच्या एकमेव सर्गात १००० वी ओळ सावित्री ग्रंथाचे महात्म्यच सांगत आहे.

"O Sun-Word, thou shalt raise the earth-soul to Light
And bring down God into the lives of men;
Earth shall be my work-chamber and my house,
My garden of life to plant a seed divine."

सूर्यवाणी सावित्रीचा महिमा मूळ शब्दांमध्येच वाचावा. ती भविष्यवाणी आहे. रूपांतराचे हे वर्णन आहे.

"Men shall be lit with the eternals' ray
----- ४ ओळी -----
Living for me, by me, in me they shall Live"

दिव्य-जीवनात माणसे शाश्वत प्रकाशाने युक्त होतील आणि केवळ भगवंतासाठी, भगवंतामध्ये जगतील. भविष्यवाणीचे अनेक परिच्छेद सावित्रीत प्रत्येक भागात येतात. इथे त्या सर्वांची प्रस्तुती करणे शक्य नाही. ज्ञान, सौंदर्य, शक्ती, प्रेम-आनंद ही सर्व दिव्य मूल्ये अंगभर लेवून नटलेली ही सावित्री दर्शनीय आहे, वाचनीय आहे, साक्षात् शक्तिरूप आहे. श्रीअरविंद देवमुखातून सावित्री विषयी जे बोलतात ते ह्या ग्रंथाबद्दलही तेवढेच सत्य आहे.

''हे सावित्री, शक्ती अससी माझ्या आत्म्याची,
प्रगट मूर्ति तू अजरामर त्या माझ्या शब्दाची

कालाच्या ह्या मार्गावरती मुख तू सत्याचे
आत्म्यांना तू पथ दाखविसी त्या भगवंताचे''

(सावित्री पृ.५६० ; Savitri ७०३)

दहाव्या पर्वातही एक भाग सावित्री काव्याचे वर्णन करतो.

"The Ineffable puts on a robe of speech
Where all its words are woven like majic-threads
Moving with beauty, inspiring with their- gleam,
And every thought takes up its destined place
Recorded in the memory of the world."

साक्षात् अनिर्वचनीय तत्वाने वाणीरूप महावस्त्र धारण केलेले आहे. ह्यात त्याचे सर्व शब्द आपल्या किरण-प्रभेने स्फूर्तिदायक सौंदर्यलहरींनी युक्त अशा जादूच्या धाग्यांनी विणलेले आहेत. आणि विश्वाच्या स्मृति-कोशात नोंदवलेला प्रत्येक विचार आपले ठरलेले दैवसिद्ध स्थान ग्रहण करीत आहे.

सावित्रीतील शब्दांची, त्यांच्या रचनेची, विचारांची थोरवी ह्याहून अधिक कोणत्या भाषेत आपण सांगू शकणार ?

एक सुंदर, महत्त्वपूर्ण भविष्यदर्शन ७०४ पानावर येते. १२०५ ओळीपासून सुरूवात होते ती अशी -

"A few shall glimpse the miraculous Origin
And some shall feel in you the secret force"

---- १२१२ क्रमांकाच्या ओळीत श्रीअरविंद म्हणतात-

"You shall reveal to them the hidden
-----------------------------eternities,
-------------------------- Mystery"

मराठी सावित्रीच्या ५६१ पृष्ठावर हे वर्णन दिलेले आहे.

''मध्य मार्ग सोडुनि देतील आत्मे कुणि थोर
त्या थोड्यांना उगमाचा त्या हो साक्षात्कार
तुझ्या ठायिंच्या शक्तीचाही प्रत्यय ये कोणा
मागे फिरुनी शोधतील ते तुझ्याच पदचिन्हा

या विश्वाची भव्ययोजना समोर प्रकटेल
लपलेल्या चिरंतनाचे रूप तूच दावी
असीमातूनी श्वास तयांना आणुनिया देई
ज्या ऊर्मीने विश्व निर्मिले तिची रूची देई
सर्वशक्तियुत भगवंताची शक्तीही दावी
किरण जरासा त्यास दिसू दे त्या गूढत्वाचा
सर्वज्ञानी परमात्म्याच्या अपूर्व ज्ञानाचा''

श्रीअरविंदांची 'सावित्री' हा योगग्रंथ आहे. मनोमय बंधनाला तोडून मानवीचेतनेने सीमोल्लंघन करीत अतिमानसिक चेतनेचा पल्ला गाठावयाचा आहे. व तोच पार्थिव जीवनाच्या रूपांतरणाचा मार्ग आहे. अनेक साक्षात्कारांच्या द्वारांमधून हा पुढे जातो. ह्यासाठी कराव्या लागणाऱ्या आत्मयज्ञात काय समिधा टाकावयाच्या, आत्मचेतनेचे शुद्धीकरण, उन्नयनाचे टप्पे, महत्तम ध्येय, मनाच्या विविध स्तरांवरील जीवन, अंतत: दिव्य जीवन ह्या गोष्टींचे सविस्तर विवेचन ह्यात येते.

पारंपारिक सावित्रीने मिळवलेली वरदाने वैयक्तिक होती. ह्यातील वरदाने वैश्विक आहेत, ती शाश्वत आशीर्वादाच्या स्वरूपात सिद्ध केलेली आहेत. त्यासाठी चुकवावयाचे मूल्य देखील तसेच भव्य-विराट आहे. विराटाची साधना आणि विराटाचे हे मनोगत आहे. बौद्धिक प्रयासापेक्षा अंत:करणातील देव जागा झाल्यावर सावित्री बोलू लागते. 'सावित्री' हा भावी मानववंशाचा गौरवग्रंथ, धर्मातीत वैश्विक ग्रंथ होणार म्हणून ही रचना विश्वभाषेत झाली आहे.


मानवी जीवनाच्या किनाऱ्यांना स्पर्श करीत सावित्रीचा ओघ वहात असला तरी त्याची ओढ अतिमानसाची आहे. ही एक शब्द-रत्न-खचित आकाशगंगा असून अनमोल सुभाषितांचा तेजस्वी प्रकाश प्रकट करणारी अद्भुत रचना आहे.

जीवनाला साद्यंत समजायचं तर सावित्री वाचावी, मृत्यूला समजायचं, सुखदु:खाला समजायचं तर सावित्री वाचावी. आनंदाची रूपं न्याहाळायची तर सावित्री वाचावी. चेतनेच्या शांतीचा आणि मौनाचा अर्थ सावित्रीतूनच प्रतीत होईल. श्रीअरविंदांनी दिव्यवाणीचा प्रवाह शिवाच्या जटेप्रमाणे स्वत:मध्ये धारण केला आणि अक्षररूपाने आपल्यासाठी सावित्रीमध्ये बांधला. सावित्रीच्या रूपाने विश्वाला मिळालेली ही अमृतत्वाची देणगी सर्वांना अखिल विश्वाला तारक आणि मार्गदर्शक बनून चिरकाल इथे संचार करील.

डॉ. सौ. कुलश्री मेघरे
५ मधुबन कॉलनी, कॅम्प रोड. अमरावती
मोबाईल : ९८९०६९६२०७ (०७२१-२६६३८४१)

■ ■ ■

योगी श्रीअरविंदांच्या 'सावित्री'मध्ये प्रतिबिंबित झालेला अतिमानसयोग



हरिहरानंदशरण उपाख्य **प्रा. नवनाथ निवृत्ती लोंढे**

एम्.ए., बी.एड., सेट उत्तीर्ण, पी.जी.डी.टी. (हैद्राबाद)(CIEFL) Hydrabad,

पी.एचडी. प्रबंध सोलापूर विद्यापीठास सादर., सहायक प्राध्यापक, इंग्रजी विभाग दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर. श्री विद्या महायोग परंपरेतील विद्यमान आचार्य अखंड महायोगी श्रीनिवास सिद्धाचार्य यांचेकडून श्री विद्या अखंड महायोगात दीक्षा- अनुग्रह. 'श्री विद्या अखंड महायोग एक सैद्धांतिक व ऐतिहासिक दृष्टीकोन' पुस्तकाचे लेखन श्रीनिवास सिद्धाचार्यांनी लिहिलेल्या दोन इंग्रजी कविता संग्रहाचे संपादन. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर इंग्रजीमधून अनेक संशोधन लेख प्रसिद्ध झाले.

सनातन वैदिक हिंदू अध्यात्म परंपरेतील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ज्यांचा विशेष उल्लेख केला जावा असे व्यक्तिमत्त्व म्हणजे पाँडिचरीचे योगी श्रीअरविंद होत. कवित्व, बहुभाषिकत्व, देशभक्ती, ईश्वरभक्ती, प्राचीन वैदिक परंपरेबद्दल जिज्ञासायुक्त विशेष आदर आणि ओढ, प्रकांड विद्वत्ता, शैक्षणिक व्यक्तिमत्व, वाचनलेखन (साहित्य आणि साहित्येतर), मनन, आध्यात्मिक अनुभूती, गुह्ययोग-साधनासंपन्नयोगी आणि लोकसंग्रह अशा असंख्य दुर्मिळ दिव्य पैलूंना आपल्या व्यक्तिमत्त्वात सहज समाहित करून असंख्य भक्त आणि श्रद्धासंपन्न जिज्ञासूंना मार्गदर्शन करणारे योगी अरविंद आधुनिक काळातील ऋषीच होत. योगी अरविंदांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे परमेश्वराने केलेला एक दिव्य संकल्पच, ही बाब त्यांच्या दिव्य चरित्रातून प्रतिबिंबित होते. अगदी बालवयापासून त्यांनी केलेले काव्य असो अथवा भारतमातेला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी वैदिक संस्कृतीमधून प्रेरित झालेला जहालवाद असो अथवा आयुष्याच्या सायंकाळी पूर्णतेला गेलेले आधुनिक महाकाव्य 'सावित्री' असो, या सगळ्या वैविध्यपूर्ण घटनाक्रमातून सहज स्पष्ट होणारा परमेश्वरी संकल्प अथवा परमेश्वरप्राप्तीसाठी केलेली साधना त्यांच्या सगळ्या आयुष्याला व्यापून टाकणारी होती असे जाणवते. योगी अरविंद म्हणत असत, 'All Life is Yoga'. सर्व सामान्य माणसाला देखील आपले आयुष्य, दैनंदिन जीवनाला आवश्यक असलेली कर्तव्यकर्मे योगामध्ये (भगवान् श्रीकृष्णांनी गीतेमध्ये म्हटल्याप्रमाणे 'योगःकर्मसु कौशलम्') परावर्तित करता येतात. पण त्यासाठी व्यक्तित्वात विशेष कौशल्याची आवश्यकता असते.

योगी अरविंदांचे वडील भारतीय संस्कृतीचे कट्टर द्वेष्टे होते. भारतीय संस्कृती व जीवनपद्धतीचा आपल्या मुलावर कोणताही प्रभाव पडू नये म्हणून, त्यांनी आपल्या मुलांना शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले. परंतु चौदा वर्षाच्या इंग्लंड मधल्या वास्तव्यानंतरसुद्धा योगी अरविंदांवर पाश्चात्य संस्कृती व विचाराचा कोणताही प्रभाव पडला नाही. उलट ते आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये भारतीय जीवनपद्धतीशी किती घट्टपणे जोडले गेले होते, हे त्यांच्या लेखन साहित्यवरून कळल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या सर्व साहित्य व साहित्येतर लेखनामध्ये 'सावित्री' हे महाकाव्य भारतीय तत्वज्ञान, काव्य, योग, इतिहास, मानसशास्त्र अशा असंख्य विषयाशी संलग्न आहे.

अरविंदांची सावित्री :

योगी अरविंदांचे 'सावित्री' हे महाकाव्य जवळजवळ २४ हजार ओळींचे ओव्यांचे असून जगामध्ये इंग्रजीतून लिहिल्या गेलेल्या पद्यांमध्ये सर्वात मोठे पद्य आहे. ४९ छोटे-मोठे विभाग बारा पुस्तकांमध्ये विखुरलेले आहेत. सत्यवान-सावित्रीची कथा प्राचीन वेदकाळात घडून गेलेल्या सत्य घटनेवर आधारलेली आहे. मूलतः या सत्य घटनेचा संदर्भ प्रथम प्राचीन वेदांमध्ये दिसून येतो. अलीकडच्या काळात महाभारताच्या वनपर्वात मार्कंडेय ऋषी युधिष्ठिराला सत्यवान-सावित्रीची कथा कथन करताना दिसतात. महाभारतकर्ते महर्षि व्यासांनी हीच कथा जवळपास ७०० ओळींत मांडली. योगी अरविंदांवर ज्या काही थोड्या सनातन वैदिक परंपरेतील ग्रंथांचा प्रभाव होता यामध्ये महाभारत हा एक ग्रंथ. सत्यवान-सावित्रीचे कथानक योगी अरविंदांना खूप भावले. म्हणून महर्षि व्यासांनी सांगितलेल्या कथेचा विस्तार योगी अरविंदांनी २४ हजार ओळीत केला. या कथेमध्ये योगी अरविंदांना वेदवाङ्मयातून उद्बोधित झालेली मानवाच्या अमरत्वाची, स्थूल पार्थिवाला जरा, रोग आणि मृत्यूपासून मुक्त करण्याची संकल्पना दिसली. प्रकृतिस्वरूप शरीर, प्राण आणि मन मरणशील, विनाशशील आहेत तर या तिन्हींच्या पलीकडे असलेला आत्मा अमर आहे. जे मोक्षेच्छुक आहेत त्यांना शरीर, प्राण आणि मनाला ओलांडून आत्मतत्वात प्रवेश करावा लागतो. मगच आत्म्याच्या अमरत्वाचा अनुभव येतो. हा एक मुक्तीचा अथवा अमरत्व अनुभविण्याचा आजच्या प्रचलित असलेल्या पारमार्थिक जगतातील रूढ मार्ग आहे. परंतु मरणशील शरीराला जरा, रोग आणि मृत्यूपासून मुक्त करून शरीरालाच अमर बनविणे हा सुद्धा एक मुक्तीचा अथवा आत्म्याच्या अमरत्वाला स्थूल पार्थिव स्तरावर उतरवून अमरत्व अनुभविण्याचा दृष्टीकोन प्राचीन वैदिककाळात रूढ होता. म्हणजेच मानवाला अमरत्व दोन प्रकारे अनुभवता येते. पहिल्या प्रकारात आत्म्याचे अमरत्व अनुभविण्यासाठी आपल्या जाणिवेला शरीर व मनाच्या पलिकडे न्यावे लागते. दुसऱ्या प्रकारात अमरत्व अनुभविण्यासाठी मरणशील शरीराला ओलांडावे लागत नाही. उलट आत्म्याचे अमरत्व शरीराच्या स्तरावर उतरवावयाचे आणि मरणशील शरीराचे रूपांतर जरा, रोग आणि मृत्यूहीन स्थितीमध्ये करायचे. योगी अरविंदांना अमरत्वाचे दोन्ही प्रकार ज्ञात होते. परंतु त्यांना जो अमरत्वाचा अर्थ किंवा अनुभव भावला तो म्हणजे स्थूल

पार्थिव शरीराचे स्वभावांतर घडवून शरीराला जरा, रोग आणि मृत्यूपासून मुक्त करून दिव्य अशा स्थितीमध्ये घेऊन जायचे. हा वैदिक जीवनादर्श अभिव्यक्त करण्यासाठी सत्यवान-सावित्रीची कथा त्यांना अतिशय सूचक वाटली. योगी अरविंदांच्या मते, जरा, रोग आणि मृत्यूवर विजय मिळविता येतो. मृत्यूवर विजय मिळवून देणाऱ्या साधना वैदिक परंपरेत आजही आहेत याची जाण योगी अरविंदांना स्वानुभवाने होती. हा अतिशय उच्चतर साधनप्रणालीचा निर्देश आणि व्यक्तिगत स्तरावर एक श्रेष्ठतम साधक-सिद्ध म्हणून अनुभवलेले एक विलक्षण आध्यात्मिक सत्य सत्यवान-सावित्रीच्या कथेमध्ये योगी अरविंदांच्या दिव्य दृष्टीस दिसले. सत्यवान-सावित्री कथानक भारतीयांना सर्वश्रुत, सर्वज्ञात आहे. यमदेव सत्यवानाचा प्राण घेऊन जातो. सावित्री इतर सर्व सामान्य स्त्रियांसारखी रडत न बसता यमाच्या मागे जाते. यमाशी भांडते आणि यमावर विजय मिळवते. सत्यवानाचा प्राण घेऊन परत पृथ्वीवर येते. सत्यवान जिवंत होतो. सावित्रीने यमावर कसा विजय मिळविला? सावित्रीने कोणती योगसाधना केली, सावित्रीचे पातिव्रत्य, सावित्रीचे सत्यवानावर असलेले प्रेम कोणते या सर्व प्रश्नांची उत्तरे योगी अरविंदांनी केलेल्या अतिमानसयोगाच्या साधनप्रणालीत दिसून येतात. बाह्यत: ही एक पौराणिक कथा वाटत असली तरी या कथेच्या अंतरंग गाभ्यात अतिमानवयोगाचा एक दिव्य परिणाम दडलेला आहे. हे अरविंदांना ज्ञात होते. सावित्री सत्यावानाचा प्राण पृथ्वीवरती परत घेऊन येते, हे प्रतीकात्मक आहे. मानवाने मृत्यूवर मिळविलेल्या विजयाचे प्रतीक आहे. सत्यवान जिवंत होतो आणि ते ही या मर्त्य पृथ्वीवर हे कशाचे सामर्थ्य आहे ? योगी अरविंदांच्या मते, हा अतिमानसयोगामुळे शक्य होणारा परिणाम आहे. अतिमानसयोगाची साधना करणारा योगी जरा, रोग आणि मृत्यूवर विजय मिळवितो आणि अमर होतो आणि इतरांनासुद्धा ह्याच परिणामांपर्यंत घेऊन जातो हे सावित्रीच्या उदाहरणावरून दिसून येते.

अतिमानसयोग :

अतिमानसयोग ही एक अत्यंत दुर्मिळ गुह्यसाधनप्रणाली आहे. ही योगसाधना अतिमानस स्तरावर म्हणजे असा एक जाणिवेचा स्तर की जिथे मनाचा अभाव असतो. योगीजनांच्या मते, मनाच्या पलिकडेसुद्धा एक जाणिवेचा स्तर आहे. आणि तिथे एका वेगळ्या प्रकारची जाणीव असते, हा पण एक अनुभव आहे. अतिमानसयोग हा मनाच्या पलिकडे असलेल्या जाणिवेच्या स्तरावर केला जातो. म्हणूनच या योगप्रकाराला अतिमानसयोग (Supramental Yoga) असे म्हणतात. जिज्ञासूंना अतिमानसस्तरावर जाऊन योग-साधना करण्यासाठी योगी अरविंदांनी प्रकाशित केलेल्या 'सर्वांगयोग' (Integral Yoga) किंवा पूर्णयोगाच्या प्रक्रियेतून जावे लागते. पूर्णयोगाच्या साधन प्रक्रियेत शरीर, इंद्रिये, प्राण, मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार या व्यक्तित्वातील सर्व घटकांचे शुद्धीकरण आणि स्वभावांतर घडवून आणले जाते. पूर्णयोगाच्या साधनप्रक्रियेद्वारे जिज्ञासू अज्ञानाच्या प्रभावातून पूर्णपणे मुक्त होतो. परंतु अज्ञानाचे संस्कार व्यक्तितत्वाच्या या घटकावर आणखी शिल्लक असतात. ते संस्कार नष्ट करून समस्त व्यक्तितत्वाचे दिव्य प्रकृतीमध्ये रूपांतर घडवून आणण्यासाठी अतिमानसयोग केला जातो. या साधनेच्या अंतिम टप्प्यावर शरीराला जरा, रोग आणि मृत्यू, तर प्राणाला रज आणि तम आणि मनाला वासनेच्या संस्कारापासून मुक्त केले जाते. असे वासना विनिर्मुक्त मन (ज्याला वेदांताच्या परिभाषेत शुद्ध सत्वाने भारीत झालेले मन) अतिमानसयोग करण्यास सक्षम होते. अतिमानसयोगाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, अतिमानसयोगसंपन्न सिद्धमहात्मा फक्त स्वत:लाच रोग, जरा आणि मृत्यूच्या प्रभावातून मुक्त करतो असे नाही तर ज्यांना या प्रभावातून मुक्त व्हायचे आहे अशांना सुद्धा तो मार्गदर्शन करतो. म्हणूनच अतिमानसयोगाचे प्रयोजन व्यष्टी अज्ञानाबरोबर समष्टी अज्ञानाचे निराकरण असे असते. सावित्री, सत्यवानाच्या मृत्यू अगोदर तीन रात्री जी साधना करते ती अतिमानसयोगाची साधना आहे. ही साधना सावित्रीबरोबरच सत्यावानालाही मृत्यूच्या प्रभावातून मुक्त करते. यामुळे अतिमानसयोगाचे प्रयोजन हे व्यापक आणि समष्टी स्तरावर कार्यरत असताना दिसून येते.

सावित्री आणि अतिमानसयोग :

योगी अरविंदांनी अतिमानसयोगाबद्दल आपल्या लिखाणात फारसे स्पष्टीकरण दिलेले नाही. अतिमानसयोगाचा संदर्भ त्यांच्या लिखाणात कोठेतरी तुरळक दिसतो. अतिमानसयोगाचे विश्लेषण त्यांनी जाणिवपूर्वक टाळले. मात्र 'सावित्री' महाकाव्यात त्यांनी स्वत: अनुभवलेली अतिमानसयोगाची साधनप्रणाली अतिशय कौशल्यपूर्वक आणि गूढतेने मांडलेली आहे. अतिमानसयोगाची प्रक्रिया विशेषत: कुंडलिनीयोगाच्या ध्यानप्रक्रियेद्वारे त्यांनी स्पष्ट केली आहे. आध्यात्मिक साधन क्षेत्रात असंख्य योगप्रकार वर्णिले आहेत. त्यामध्ये कुंडलिनीयोग हा एक मुख्य साधनप्रकार मानला गेलेला आहे. श्रीगुरूंच्या कृपेमुळे जागृत झालेली कुंडलिनीशक्ती साधकजीवाच्या सूक्ष्म शरीरात अवस्थित असलेल्या मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धी आणि आज्ञाचक्राचे भेदन करून मस्तकाच्यावर मध्यभागी असलेल्या सहस्रारचक्रात स्थिर होते. परिणामत: साधकजीवाला परमार्थतत्वाचा बोध होतो. याला कुंडलिनीशक्तीचे आरोहण असे म्हणतात. कुंडलिनी एकामागून एक अशा वर नमूद केलेल्या सहा चक्रांचे भेदन करून अतिमानसस्तरावर असलेल्या बिंदू, अर्धचंद्र, रोधिणी, नाद, नादांत, शक्ती, व्यापिका, समना या चक्रांचे भेदन करून सहस्रारात असलेल्या उन्मनेमध्ये स्थिर होते. साधकाला अमृतपान केल्याचा आनंद होतो. साधनेच्या या टप्प्यावर साधक अज्ञानाच्या प्रभावातून मुक्त झालेला असतो. परंतु शरीर, इंद्रिये, प्राण इत्यादी अजूनही अज्ञानाच्या संस्काराने अभिभूत असतात. त्यासाठी कुंडलिनीशक्तीचे अवरोहण उतरत्या क्रमाने असलेल्या सूक्ष्म शरीरातील चक्रात होणे आवश्यक असते. कुंडलिनीशक्ती सहस्रारातून आज्ञा, विशुद्धी, अनाहत, मणिपूर, स्वाधिष्ठान आणि शेवटी मूलाधार चक्रात उतरत्या क्रमाने सहस्रारातील अमृत घेऊन अवतरित होते. हेच ते अमृत स्थूल शरीराला जरा, रोग, मृत्यूपासून, प्राणाला रज तमापासून आणि मनाला अदिव्य वासनेच्या संस्कारातून मुक्त करते. साधकाची देहोपाधि एक दिव्य अमर काया होते. कुंडलिनीच्या अवरोहणाचे वर्णन योगी अरविंदांनी सावित्रीने केलेल्या

योगाभ्यासात स्पष्ट केले आहे. योगी अरविंदांची सावित्री ही एक केवळ पतिव्रता नाही तर ती एक योगिनी सुद्धा आहे. कुंडलिनीयोगाची जाणकार आहे. कुंडलिनीच्या आरोहण आणि अवरोहण या दोन्ही प्रक्रिया तिने अनुभवून स्वत:ला अज्ञान आणि त्याच्या संस्कारापासून मुक्त केलेले आहे. ती एक पूर्ण साक्षात्कारी, सामर्थ्यसंपन्न आणि मृत्यूवर विजय मिळवलेली आणि इतरांनासुद्धा मृत्यूच्या प्रभावातून मुक्त करू शकणारी स्त्री आहे. त्यामुळेच ती सत्यवानाचा प्राण यमाकडून परत मिळवते आणि सत्यवान जिवंत होतो.

योगी अरविंदांनी सावित्री महाकाव्यातील सातव्या खंडात सावित्रीचा योग विशद करताना कुंडलिनीयोगातील कुंडलिनीचे अवरोहण स्पष्ट करतानाच अदिव्य प्रकृतीचे दिव्य प्रकृतीमध्ये कसे रूपांतर होते याचे वर्णन केले आहे. जीवाच्या सूक्ष्म शरीरात अवस्थित असलेली ही चक्रे जीवाच्या इच्छा, ज्ञान आणि क्रियेचे नियंत्रक असतात. बहात्तर हजार नाड्यांच्या माध्यमांतून प्राणप्रवाह शरीर व मनाला एकमेकाशी जोडत असतात. शरीर, इंद्रिये, प्राण आणि मनाद्वारे होणाऱ्या इच्छा, ज्ञानक्रियेचा संस्कार या चक्रामध्ये साठवून ठेवलेला असतो. याच संस्काराचा प्रभाव शरीर व मनावर पुन्हा पुन्हा पडत असतो. अशा पद्धतीने अज्ञानजन्य इच्छा, ज्ञान आणि क्रियेचे संस्कार जतन करणे व यातूनच पुन्हा अज्ञानजन्य क्रियाकलाप घडणे असे जीवाच्या बाबतीत युगानुयुगे घडत असते. कुंडलिनीच्या साधनप्रक्रियेतून हे अज्ञानजन्य प्रभाव आणि त्याचे संस्कार नष्ट करून समस्त प्रकृतीचे स्वभावांतर घडवून तिला दिव्य शक्तीचे माहेरघर बनविता येते. हे सावित्री महाकाव्यात योगी अरविंदांनी विशद केले आहे. त्यातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे कुंडलिनीशक्तीचे अवरोहण उतरत्या क्रमाने असलेल्या चक्रात कसे होते हे खालीलप्रमाणे स्पष्ट केले.

कुंडलिनीशक्तीचे सहस्रारचक्रात आरोहण :

साधकाच्या साधनकालात कुंडलिनीशक्ती मूलाधारातून उर्ध्वगतीने मस्तिष्कस्थित हजार पाकळ्या असलेल्या कमलदलात म्हणजेच सहस्रारचक्रात प्रवेश करते. तेथे असलेल्या अमृत-कुंभाला ती डंक मारते आणि परिणामत: तो अमृतकुंभ फुटतो. ती अमृतपान करते. साधकजीवाला अमृतपान केल्याचा विलक्षण आनंद होतो. या टप्प्यावर त्या साधकाला आत्म्याचे अमरत्व अनुभवायला येते.

अतिमानसयोगाच्या साधन प्रक्रियेत ही कुंडलिनीशक्ती सहस्रातील हे अमरत्वरूपी अमृत घेऊन सूक्ष्मशरीरातील एकाखाली एक उतरत्या क्रमाने असलेल्या चक्रात जसा जसा अमृताचा वर्षाव करीत प्रविष्ट होते, तसे तसे अमरत्वरूपी अमृत साधकाच्या शरीर, प्राण आणि मनाला अमर अथवा दिव्य बनविते. हा अवरोहणाचा क्रम खालील प्रमाणे :

कुंडलिनीचे आज्ञाचक्रात अवरोहण : कुंडलिनी सहस्रारातून प्रथम भ्रूमध्याच्या ठिकाणी असलेल्या आज्ञाचक्रात अमृत घेऊन उतरते. हे अज्ञाचक्र मनसतत्त्वाचे निर्देशक आहे. या मनसतत्त्वात समस्त वैश्विक मनाचे संस्कार साठवले जातात. ते सर्व संस्कार दिव्यशक्तीच्या अवतरणाला विरोधी असतात. परंतु कुंडलिनीच्या अवतरणातून सर्व विरोधी संस्कार नष्ट होऊन मनसतत्त्व परिशुद्ध होते आणि परमार्थ साक्षात्कारास पूर्णपणे योग्य होते. सावित्रीमध्ये वरील प्रक्रियेचे वर्णन असे आहे-

In the castle of the lotus twixt the brows
Whence it shoots the arrows of its sight and will, (529)

कुंडलिनीचे विशुद्धीचक्रात अवरोहण :

आकाशतत्त्वाचे विशुद्धीचक्र परमार्थविरोधी संस्काराने अभिभूत झालेल्या वैश्विक आकाशतत्त्वाच्या प्रभावाखाली असते. कुंडलिनी-शक्तीच्या अवरोहणामुळे वैश्विक आकाशतत्त्व परिशुद्ध होऊन साधकाला दिव्य ध्वनी ऐकू येतात. तसेच पश्यंती वाणीचा अनुभव येतो. जिज्ञासूला शाश्वत तत्त्वाकडे घेऊन जाणारा विचार मनात स्थिर होतो. संकुचित विचाराची कुंपणे गळून पडतात. या प्रक्रियेचे वर्णन सावित्रीमध्ये पुढील प्रमाणे केले आहे.

In the passage of the lotus of the throat
Where speech must rise and expressing mind
The immortal's thoughts displaced our bounded view
The immortal's thoughts earth's drab idea and sense;
All things now bore a deeper heavenly sense...
Life now obeyed to a divine rule
And every act became an act of God.(529)

कुंडलिनीचे अनाहतचक्रात अवतरण :

वायूतत्त्वात्मक अनाहतचक्रात कुंडलिनीचे अवतरण झाल्यानंतर साधकाच्या मनात दिव्य प्रेमाचे, निष्काम प्रेमाचे अंकुर फुटू लागतात. सर्व अदिव्य भावनांचे उदात्तीकरण होते. साधकाचे मन सच्चिदानंदाला उन्मुख होते-

In the kingdom of the lotus of the heart
Love chanting its pure hymeneal hymn
Made life and body mirrors of sacred joy
And all the motions gave themselves to God. (529)

कुंडलिनीचे मणिपूरचक्रात अवरोहण :

नाभिस्थानी असलेल्या जलतत्त्वाच्या मणिपूर चक्रात कुंडलिनीचे अवरोहण झाल्यानंतर अदिव्य महत्त्वाकांक्षा आणि वासना त्याच्या संस्कारासह नष्ट होतात. सर्व महत्त्वाकांक्षांचं रूपांतर परमेश्वरी कार्यामध्ये होते-

In the navel lotus's broad imperial image
Its proud ambitions and its master lusts
Were tamed into instruments of a great calm sway
To do a work of God on earthly soil. (530)

कुंडलिनीचे स्वाधिष्ठानचक्रात अवरोहण :

अग्नितत्त्वात्मक स्वाधिष्ठानचक्रात अवतरण झाल्यानंतर साधकाच्या अंतरमनात खूप खोल दडून बसलेल्या कामवासना, स्थूलजगाला घट्ट धरून जगण्याच्या तीव्र इच्छांचं स्वाभावांतर घडून येते.

साधकाला शाश्वत सुखाचा, शांतीचा अखंड अनुभव येऊ लागतो-

In the narrow nether centre's petty parts
Its childish game of daily dwarf desires
Was changed into a sweet and boisterous play, (530)

कुंडलिनीचे मूलाधारात अवतरण :

पृथ्वीतत्त्वाचे मूलाधार हे अंतिमचक्र. या चक्रात कुंडलिनीचे अवतरण झाल्यानंतर मर्यादित देशकालाचा अनुभव संपून साधकाला व्यापकत्वाची जाणीव येऊ लागते. स्थूल जगाचे आकर्षण संपून जाते. परमार्थतत्त्वाची अखंड अनुभूती येऊ लागते -

In the deep place where once the Serpent slept
There came a grip on Matter's giant powers
For large utilities in life's little space;
A firm ground was made for Heaven's descending might. (530)


अशा पद्धतीने साधकाच्या अदिव्य प्रकृतीचे दिव्य प्रकृतीमध्ये रूपांतर होते. कुंडलिनीच्या आरोहणात साधकाच्या ठिकाणी असलेल्या व्यष्टीतत्त्वाचे शुद्धीकरण तर कुंडलिनीच्या अवरोहणात ब्रह्मांडातील समष्टी स्तरावर असलेल्या तत्त्वांचे परिशुद्धीकरण होते. याचे कारण साधकाची प्रकृती ही पिंड-ब्रह्मांडात्मक, व्यष्टी, समष्टी स्तरावर असते. परंतु स्वाभावांतराची ही प्रक्रिया कुंडलिनीच्या अवरोहणातूनच पूर्ण होते. सावित्री आपल्या योग-साधनेत कुंडलिनीयोगाच्या दोन्ही प्रक्रिया पूर्ण करते. आपले स्थूल कायेचे रूपांतर दिव्य कायेत करते म्हणूनच एक सामर्थ्यसंपन्न दिव्य प्रकृति घेऊनच यमावर विजय मिळवते. ती इतकी सामर्थ्यसंपन्न आहे की, जे जे या जरा, रोग, मृत्यूवर विजय मिळविण्यास उत्सुक आहेत, त्यांनाही तो इष्ट परिणाम प्राप्त करून देते. सत्यवान हे एक अत्यंत महत्त्वाचे प्रतीकात्मक उदाहरण आहे. योगी अरविंदांच्या मते, हे सामर्थ्य अतिमानसयोगाचे आहे. अतिमानसयोगामध्ये अनेक साधन पद्धतींचा समावेश आहे. त्यापैकी कुंडलिनीचे अवरोहण की ज्याद्वारे जैवी प्रकृतीचे रूपांतर दैवी प्रकृतीमध्ये करता येते. ही एक मुख्य साधन-प्रणाली योगी अरविंदांनी सावित्री या महाकाव्यात अतिशय गुह्यपणे मांडली. हेच योगी श्रीअरविंदांचे वेगळेपण होय.

ऋणनिर्देश :

योगी श्रीअरविंदांच्या 'सावित्री' महाकाव्यामध्ये प्रतिबिंबित झालेला अतिमानसयोग हा शोध-निबंध माझ्या पी.एचडी प्रबंधावर आधारलेला असून हा शोध-निबंध माझे श्रीगुरूदेव अखंडमहायोगी श्रीनिवासजी सिद्धाचार्य उपाख्य प्रा. श्री. श्रीनिवास शामराव काटकर यांच्या दिव्य प्रेरणेमुळे व मार्गदर्शनामुळे मी लिहलेला आहे. एतदर्थ मी त्यांचा अतीव कृतज्ञतेने ऋणनिर्देश करत आहे.

हरिहरानंदशरण उपाख्य प्रा. नवनाथ निवृत्ती लोंढे
'श्री योगेश्वरनिलय' एफ / ४ फुरडे कॉम्प्लेक्स,
जाममिल जवळ, दमाणीनगर, सोलापूर ४१३००१,
फोन नं. ०२१७-२३८००४७, मोबाईल : ९७६७९१७०९३

■ ■ ■



'सावित्री' महाकाव्यातील
सावित्रीची व्यक्तिरेखा

सौ. कल्याणी अशोक शिवले (उज्वला काळे)

एम.ए., निवृत्त बँक अधिकारी

जगाच्या इतिहासात भारतीय अध्यात्मशास्त्राला, संस्कृतीला महत्वाचे स्थान आहे. अतिप्राचीन ऋषिमुनींचा हटयोग वा योगाभ्यास, मध्ययुगीन संताचा कर्मयोग वा भक्तीमार्ग आणि आधुनिक संतांची नाम साधना या परंपरांनी हे स्थान आजच्या अणूयुगातही टिकविले आहे. सर्व प्राणिमात्रांचे भले चिंतण्याची सहिष्णुता आणि सर्वव्यापकता ही तिची वैशिष्ट्ये आहेत. येथे अंधश्रद्धेचे पंगुत्व नाही. अज्ञानाचे ज्ञान व ज्ञानाचे विज्ञान व्हावे हाच एक स्वच्छ हेतू आहे व त्यासाठीच संत अवतार आहेत.

योगी श्रीअरविंद म्हणजे गेल्या शतकातील योग साधनेचा असाच एक अवतारी पुरुष. या महापुरुषाने स्वानुभवातून 'सावित्री' हे महाकाव्य साऱ्या जगाला दिले. श्री माताजींच्या म्हणण्यानुसार 'सावित्री ' मंत्रसिद्ध आहे. यात विश्वाचा इतिहास आहे. या महाकाव्यांत सर्व काही सामावले आहे.

अमरावतीच्या प्रा. डॉ. सौ. सरला नागराज यांनी 'सावित्री' मधील काही ओळी घेऊन त्यातून श्रीअरविंदांनी रेखाटलेल्या सावित्रीची व्यक्तिरेखा 'सावित्री एक दीपशिखा' या पुस्तिकेत स्पष्ट केली आहे. या पुस्तिकेच्या आधारेच या लेखाचा प्रपंच.

ज्येष्ठ पौर्णिमेस पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करण्याची प्रथा आपल्याकडे आहे. त्या प्रथेमधील सत्यवान सावित्री ते हेच. फक्त त्यातील सखोलतेचा विचार कधी केला गेला नाही.

सावित्री हे महाकाव्य म्हणजे महाभारतातील वनपर्वात मार्कंडेय ऋषींनी सांगितलेली सत्यवान-सावित्रीची कथा. श्रीअरविंदांनी या महाकाव्याच्या माध्यमातून जगाला नवी दृष्टी दिली आहे.

अश्वपती हा प्रेमळ, प्रजेचे हित पाहणारा राजा पण अपत्यहीन. धर्मकार्यासाठी पुत्राची आवश्यकता आहे या हेतूने त्याने बारा वर्षे सावित्री देवतेची उपासना केली. वर मिळविला, तिच्या कृपेने कन्या प्राप्त झाली म्हणून तिचे नाव सावित्री ठेवले. श्रीअरविंदांच्या 'सावित्री'मधील राजाची अंतरंगीची साधना एवढी तीव्र आहे की भगवती मातेला सारे रूढ नियम बाजूला ठेवून राजाला वर द्यावा लागला. नव्हे त्याच्या असामान्य योगसाधनेमुळे स्वत: भगवतीमातेलाच जन्म घ्यावा लागला. अश्वपतीच्या घरी जन्माला आलेल्या देखण्या सावित्रीचे तेज देदिप्यमान होते. सर्वांना झेपणारे नव्हते. राजा अश्वपतीला तर वेळोवेळी तिच्या दिव्यत्वाची जाणीव होत असे. साक्षात् भगवतीचे तेज, रूप लावण्य घेऊन भूतलावर आलेली ही सावित्री काही विशिष्ट कार्यासाठीच येथे अवतरली आहे हे तो ओळखून होता. श्रीअरविंद म्हणतात –

This wonder of the divine Artist's make,
Carved like a nector cup for thirsty Gods.

दिसामाजी वाढणाऱ्या या आपल्या लेकीला उपवर झाल्यावर कोणाच्या हाती सोपवावे हा प्रश्न त्याला पडत असे. 'पण' लावून स्वयंवर करावे तर 'पण' जिंकणाऱ्याला वरमाला घालणे आवश्यक, भले तो योग्य नसला तरीही. यात कन्येवर अन्याय होण्याची भीती त्याला वाटली, म्हणून त्याने सावित्रीलाच आपला पती शोधण्यास पाठविण्याचे ठरविले. राजा सावित्रीस म्हणाला, ''हे चैतन्यरूपिणी बाळे, अनंत काळापासून तुझा प्रवास चालू आहे. तू वेगवेगळी रूपे धारण केलीस, वेगवेगळ्या लीला केल्यास या वेळी तू भूतलावर अवतरली आहेस ते ही फार मोठ्या कार्यासाठी. नियतीच्या हातातील बाहुले बनून राहिलेल्या मानवाला स्वप्रयत्नाने नियतीच्या पार जाता यावे, आपले भविष्य आपल्याला हवेतसे घडविता यावे, हे स्वत:च्या उदाहरणाने जगाला दाखवून देण्यासाठीच. तेव्हा रथावर आरूढ हो. तुझ्या वर शोधाच्या मोहीमेवर जा आणि योग्य तो निर्णय घे. तो घेण्याची क्षमता केवळ तुझ्यातच आहे.''

Thy unknown lover waits for thee the unkown.
Thy soul has strength and needs no other guide

राज्यामागून राज्ये, नगरामागून नगरे शोधीत सावित्री चालली होती. पण मन वेधून घेणारा कोणी आढळलाच नाही. शेवटी माणसांच्या गलबल्यापासून दूर अरण्यांत तो सापडेल म्हणून ती तिकडे वळली. हेवे दावे, मत्सर, ईर्षा राखणाऱ्या मानवांच्या जगात 'तो' (जीवनसाथी) भेटणे शक्य नव्हते. एका विशाल अरण्यांत आत आत जातांना तिच्या नजरेस तो पडला. जणू प्रकाशाचा पुतळाच. खूण पटली, हाच तो! याचाच शोध घेत होतीस तू! नजरेला नजर मिळाली त्यालाही ओळख पटली. वनांतील त्याची झोपडी हेच आपले भावी वसतिस्थान आहे, शाश्वत ठिकाण आहे हे तिने जाणले. पित्याला आपला निर्णय सांगून त्याची संमती घेऊन परत येण्याचे आश्वासन देऊन सावित्री राजवाड्याकडे परतली. तिने आपला निर्णय पित्यास सांगितला. शाल्व

देशाचा राजा द्युमत्सेनाचा मुलगा सत्यवान याची निवड आपण जीवनसाथी म्हणून केल्याचे तिने सांगितले. महर्षी नारद त्यावेळी तिथे उपस्थित होते. त्रिकालदर्शी नारद सावित्रीचे भविष्य जाणून होते. पण सावित्रीच्या पित्याने त्यांना काही सांगण्यापासून परावृत्त केले. सावित्रीच्या मातेने भविष्यवाणी जाणून घेण्यासाठी नारदांना बराच आग्रह केला, तेव्हा नारदांनी बरीच टाळाटाळीची उत्तरे दिली पण ती आपला हेका सोडेना. तेव्हा नारदांनी सांगितले की आजपासून एक वर्षांनी याच दिवशी सत्यवान मृत्यू पावेल. हे ऐकून राणी हबकली, गलितगात्र झाली. तिने हरप्रकारे आपल्या कन्येला समजाविले. पण सावित्री ऐकण्यास तयार नव्हती. ती आपल्या निर्णयावर दृढ होती. माता हतबल झाली. नारदांनीही सावित्रीचे सामर्थ्य मातेस सांगण्याचा प्रयत्न हरप्रकारे केला ते म्हणाले,

Her eyes are fixed upon her mighty aim. No cry or prayer can turn her from her path. she has! leaped an arrow from the bow of God.

शेवटी सावित्रीचे म्हणणे माता-पित्यांना मान्य करावेच लागले. विवाह संपन्न झाला. सावित्री राजस वस्त्रे टाकून अलंकार उतरवून साध्या वेषांत सत्यवानाबरोबर पर्णकुटीत राहू लागते. सासू सासऱ्यांची सेवा करू लागते.

सत्यवानाच्या प्रेमळ सहवासांत ती स्वर्गसुख अनुभवीत होती. सारी सुखे आपल्या मुठीत आहेत असे तिला वाटत होते. या सुख सागरात जणू ती भविष्यातील भीषणता विसरली होती. श्रीअरविंद म्हणतात.

All joy of earth, All heavens beatitudes she rejolced in his brightness and believed not in his fate and know not of the evil drawing near.

तृप्त असलेला सत्यवान आणि आज्ञाधारक सून बघून सासू-सासरे सुखावतात. पुढे काय वाढून ठेवले आहे फक्त तिलाच माहीत आहे.

She in dreadful knowledge was alone.

दिवस उलटत होते. एखाद्या सामान्य स्त्रीसारखी ती वागते आहे की काय? आपला भविष्यकाळ बदलण्याचा प्रयत्नही करीत नाही की काय? तिला आपल्या कर्तव्याचा विसर पडला की काय? आपण या भूतलावर कशासाठी आलो आहोत याची विस्मृती झाली की काय? प्रभूला कोडे पडले. सुखातही भविष्याची स्मृती येऊन सावित्री अश्रू ढाळीत बसली असता तिला एक आवाज ऐकू आला. तिने लक्ष देऊन ऐकले तेव्हा तिला जाणवले की तो आवाज आपल्या भृकुटी मध्यातून येत आहे. हा आवाज आपल्याला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देत आहे. सावित्री हतबल झाली होती जणु मृत्यूने तिची सारी शक्तीच हिरावून घेतली होती. तिच्या मनात विचार येत होते, माणूस आपणच आपल्या भोवती कुंपण घालून घेतो. कोश विणतो. या अज्ञानाच्या कोशात अडकून पुनरपि जननम् - पुनरपि मरणम् या चक्रांत अडकून राहण्यात त्याला कृतार्थता वाटते, आनंद वाटतो, सुख वाटते. अशा कोशात जगणाऱ्या माणसांसाठी आपण कशाला प्रयत्न करायचे? सावित्री बधिर झाली आहे. आनंदाने बंधने स्वीकारणाऱ्या मानवाला बंधनाची जाणीव द्यायची कां? तिला प्रश्न पडतो. सावित्री त्या आवाजाला म्हणते, "हे दिव्य आवाजा माझ्या अंतरंगी दडलेल्या दिव्यत्वाला तू आज्ञा कर. आदेश दे. मी कोणते कार्य करण्यासाठी इथे आली आहे? तुझेच कार्य करण्यासाठी नां" तो आवाज आज्ञा देतो.

Find out thy soul.

स्तब्ध बसलेली सावित्री आपल्या आत्म्याच्या शोधार्थ निघते. स्वत:च्या अंतरंगात जाण्याचा प्रयत्न करते. बंद दारावर धडका मारते. आत प्रचंड गोंधळ आहे, तरीही ती पुढे चालत राहते. कारण तिला तिचा आत्मा शोधायचा आहे. एकएक दालन पार करीत करीत सावित्री पुढे चालत राहाते. तिला देवदेवता भेटतात. त्या तिला त्यांच्या बरोबर राहण्याचा आग्रह करतात पण ती पुढे जाते. आत्म्याच्या शोधार्थ. शेवटी तिला तो दिसतो. दोघे एकरूप झाले. योग साधना पूर्ण झाली.

And Savitri's life was glad fulfilled like earth's.

she had found herself, she knew her being's aim. thus for a while she trod the Golden path. This was the sun before abysmal night.

आत्म्याच्या दर्शनाने आपण या धरतीवर का आलो, आपल्या जीवनाचे उद्दिष्ट काय हे पूर्णपणे तिला कळते. या ज्ञान प्रकाशात तिला पुढे येणाऱ्या काळरात्रीची कल्पना आली.

शेवटी तो दिवस उजाडला. क्षणभरासाठी ही सत्यवान नजरेआड होऊ नये असे तिला वाटते. त्यामुळे वडिलधाऱ्यांच्या परवानगीने ती सत्यवानाबरोबर वनात जाते. अखेर तो क्षण येतो. साऱ्या वनांत अंधार पसरतो. मृत्यूला सामोरे जाण्यासाठी सारी शक्ती एकवटून ती सिद्ध होते.

Sole now she rose to meet the dreadful God.

Then like a tree recovering from wind. she raised her noble head, fronting her gaze.

यमाच्या डोळ्याला डोळा भिडतो. तिच्या मांडीवरील सत्यवान तो ओढून घेऊन जाऊ शकत नाही. तो गर्जना करून सांगतो. ठेव त्याला खाली तो आता माझा आहे. वेळ काळ ओळखून सावित्री सत्यवानास खाली ठेवते. सत्यवानाच्या देहातून तेजस्वी सूक्ष्म देह यमापाठोपाठ जाऊ लागतो. तीही त्यांच्या मागे जाऊ लागते पण जाता जाता देहाचे ओझे वाटू लागल्यावर तीही सूक्ष्म देहाने त्यांच्या पाठोपाठ चालत राहाते. एका विशिष्ट ठिकाणी आल्यावर यम तिला मागे फिरण्याची आज्ञा करतो. कारण मानवाला घालून दिलेल्या लक्ष्मणरेषेच्या पुढे ती आली होती. सावित्री काहीच बोलत नाही. पण यमाच्या मागे जाणे सोडत नाही. यम तिला परत जाण्यासाठी वारंवार धमकावीत असतो. पण ती त्याच्या धमक्यांना भीक घालीत नाही. ती सांगते माझे मूळस्थान देवभूमी आहे. भगवतीचे कार्य करण्यासाठी त्याने मला धरतीवर पाठविले आहे. मी याचना करणार नाही वा अश्रूही ढाळणार नाही. माझ्या सत्यवानावरील दिव्य प्रेमाच्या बळावर त्याला परत मिळवेन. सावित्रीने परत जावे म्हणून यम तिला वर देतो. अश्वपतीला गुणी पुत्र प्राप्त होईल असे सांगतो. सासऱ्यांची दृष्टी व राज्य परत मिळेल असे सांगतो. पण सावित्री सांगते

मला कशाचीच अपेक्षा नाही. यम तिला भौतिक जगाचे अनेक नियम सांगतो. यम आपल्या सामर्थ्याच्या वल्गना सांगतच राहतो. त्यावर सावित्री म्हणते –

Who house the mighty mother's voilent force. My mind is a torch lit from the eternal sun My life a breath drawn by the Immortal Guest My mortal body is the Elernal's house.

तू कितीही सामर्थ्यशाली असलास तरी माझ्यातही महाकालीची शक्ती आहे. होत्याचे नव्हते करून टाकण्याची ताकद यात आहे. या जगात सुख आनंद नांदावे, मानव-देवमानव बनावा यासाठी धडपडणाऱ्या जगाची मी प्रतिनिधी आहे. दु:ख यातनांच्या भोवऱ्यातून मला जगाला मुक्त करावयाचे आहे. संपूर्ण सुखी दिव्यजगत मला निर्माण करावयाचे आहे.

दरडावून, अनेक प्रलोभने दाखवूनही काही उपयोग होत नाही. हे पाहिल्यावर व तिच्या तोंडून तिचे सामर्थ्य ऐकल्यावर यम तिला तिच्या ठायी असणाऱ्या शक्तीचे, भगवतीचे दर्शन घडविण्यास सांगतो. यम म्हणतो किती तरी युगे झाली तिने मला या ठिकाणी नेमून ठेवले आहे. कधीही परत बोलाविले नाही. किंवा भगवतीही मला भेटायला आली नाही. तू जर मला तिचे दर्शन घडविलेस तर मी तुझी मनोकामना पूर्ण करीन तुला तुझा सत्यवान परत देईन.

दिव्य प्रेमाच्या प्रभावाने सत्यवानास परत मिळविण्यासाठी जगन्मातेचे दर्शन यमाला घडविण्याचा विचार करणारी सावित्री बोलू लागते.

And as she spoke, mortality disappeared, Her Goddess self grow visible in her eyes, Light came a dream of heaven into her face.

तिचे भौतिकत्व हळूहळू नाहीसे होऊ लागते. ती तेजाची पुतळी बनते. यमाला म्हणते तू तरी माझ्यापेक्षा वेगळा कुठे आहेस मीच तुला या कार्यासाठी नेमले आहे. थकल्या भागल्या जीवांना विश्रांती देण्यासाठी मीच तुला इथे ठेवले आहे. पण आता तू जरा बाजूला हो माझ्या रूपाची ओळख करून घे. येथे सावित्री त्याला स्वत:ची भगवतीची ओळख करून देते. यमाला स्वस्थानी निघून जावे लागते. पुढे प्रत्यक्ष भगवती व सावित्री यांचा संवाद आहे. भगवती म्हणते मी तुला तुझा सत्यवान परत देत आहे. दोघे सुखाने संसार करा. तुमच्याद्वारे धरतीवर अध्यात्मदृष्ट्या सामर्थ्यशाली असे मानव निर्माण करा. ही घटना काळाच्या ओघात घडणारच होती पण अश्वपतीच्या योगसाधनेमुळे सावित्रीचे धरतीवरील कार्य कितीतरी आधी घडून आले. मानवातून दिव्य मानव निर्माण होतील. सत्यवानाला भगवतीने मुक्त केले.

इतका वेळ सूक्ष्म देहाने चाललेला प्रवास संपला. मानवी देह धारण करून दोघे वाट चालू लागले. सत्यवान भांबावला, मूर्च्छा आल्यावर आपण कुठे कुठे फिरलो त्याला कळेना. आता आहे हे स्वप्न की इतका वेळ पहात होतो ते स्वप्न असा प्रश्न पडला. सावित्री एवढेच म्हणाली, ''चला सारे वाट पहात असतील.'' सर्वसामान्य स्त्री असती तर आपल्या कर्तृत्वाचा मोठेपणा तिने वारंवार सांगितला असता. सावित्री मानवी देहात असली तरी प्रत्यक्ष भगवतीचे रूप होती. शालीनतेचे रूप होती. भगवतीचे तेज तिच्या सर्वांगावरून प्रगटत होते. न बोललेल्या सावित्रीचेच हे थोरपण आहे हे सत्यवान ओळखून होता. नव्या जगाचा उष:काल उराशी बाळगून दोघे चालू लागले.


श्रीअरविंदांचे महाकाव्य इथे संपते. श्रीअरविंदांना काय सांगायचे आहे या महाकाव्यातून? श्रीसमर्थ रामदास स्वामी दासबोधात म्हणतात, 'जे पिडीते ब्रह्मांडी.' विश्वात जरी आपण असलो तरी सारे विश्व आपणात आहे हाच साक्षात्कार श्रीअरविंदांनाही द्यावयाचा आहे असे वाटते. प्रत्येक मानवात दिव्यशक्ती वास करीत असते. फक्त तिला ओळखून योग्य दिशेला वळविणे महत्वाचे आहे. मानव देह धारण करणाऱ्या अवतारी पुरुषांनाही दु:ख संकटे सोसावीच लागली. त्या संकटांना अडचणींना धैर्याने तोंड देणे महत्वाचे.

देवापुढे आपण दिवा लावतो. केवळ एक कृती म्हणून ही गोष्ट न करता त्याचा अर्थ समजून घेऊन ते केले तर फायद्याचे. अचेतन निरांजनास सचेतन करणे ही कृती महत्वाची आहे. आपल्या अंतर्यामी अचेतन असणाऱ्या उर्जेस सचेतन करणे आपल्याच हाती आहे. अंतर्मनातील दीपशिखा एकदा का प्रज्वलित झाली म्हणजे दिव्याने दिवा लागतच राहील. श्रीअरविंदांची सावित्री म्हणून 'दीपशिखा' आहे. आपल्या अंतरीची ज्योत तिच्या सततच्या वाचण्याने नक्कीच प्रज्वलित झाल्याशिवाय राहणार नाही. हृदयस्थ दीपशिखेकडून अज्ञानाचा अंधकाराचा पडदा दूर होईल. सर्वांनी सतत अथक प्रयत्न केले तर महायोगी श्रीअरविंदांचे पुढील शब्द प्रत्यक्षांत येतील.

एक दिवस मी परत येईन,
तेव्हा कोणत्याही माणसाच्या हृदयांत
कुणाहीबद्दल घृणा असणार नाही।
एक दिवस मी परत येईन
तेव्हा या पृथ्वीवरील दु:ख आणि संताप
नाहीसा झालेला असेल।
एक दिवस मी परत येईन
तेव्हा भगवंताचा हात हाती घेऊन
त्यालाच तुमच्या समोर घेऊन येईन
तेव्हा सर्वत्र शांती व आनंद
पसरलेला असेल, व त्याच्या प्रकाशात
त्या भगवंताचा चेहरा तुम्ही सारे
स्पष्टपणे बघू शकाल।

सौ. कल्याणी शिवले
(उज्वला काळे)

■ ■ ■



सावित्री

कुलश्री अशोक मेघरे

एम्.ए. (इंग्रजी वाङ्मय), बी.एड.
सेवानिवृत्त, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षिका.
श्रीअरविंद सोसायटी केंद्र वलगाव इथे सचिव म्हणून सेवारत, तसेच अमरावती शाखेशी संलग्न 'अभीप्सा' मासिकाच्या संपादन, भाषांतर ह्या कार्यात सहभाग. दोन अनुवाद पुस्तकांचे व १ काव्यसंग्रहाचे प्रकाशन झालेले आहे.


उद्धरण्यासी धरणीवरती भाग्य मनुष्याचे
महाकाव्य श्रीअरविंदांचे बोल भविष्याचे ।। ध्रु ।।

अनंत शक्ति, अनंत ऊर्जा
विघ्नांच्या त्या तुकड्या फौजा
तोडीत मोडीत पुढे निघाले
अज्ञाताला वेधीत गेले
एकान्ताच्या गुहेत करिती ध्यान शास्वताचे ।।

'सावित्री' ही अद्‌भुत रचना
साकार तपस्या देई वचना
अनुभूतींच्या सजीव नोंदी
नववंशाची त्यातच नांदी
शब्दांमधुनी सांगती दर्शन अदृष्टपूर्वांचे ।।

उध्दरण्यासी धरणीवरती भाग्य मनुष्याचे
महाकाव्य श्रीअरविंदांचे बोल भविष्याचे ।।

■■■



वेददार्शनिक महायोगी श्रीअरविंद

श्री. प्रभाकर पुजारी

एम. ए. (मराठी- इंग्लीश)
अध्यापक, दयानंद महाविद्यालय, सोलापूर - ३५ वर्षे.
ग्रंथ - १) सामर्थ्ययोगी रामदास, २) वेदांतील राष्ट्रधर्म, ३) राष्ट्रयोगी श्रीअरविंद,
४) प्रसिद्ध लेख सुमारे २००

इ. स. १९१४ पासून १९२० पर्यंत जे लेख श्रीअरविंदांनी लिहिले ते १९५६ मध्ये "On the Veda' या ग्रंथात संग्रहित केलेले आहेत. त्यांचे 'वेददर्शन' हे स्वतंत्र आहे आणि सर्वांगपरिपूर्ण आहे.

"The Mantras of the Veda illuminated with a clear and exact light psychological experiences of my own for which I had found no sufficient explanation either in Eurpoen Psychology on in the teachings of yoga or of Vedanta.'

सगळ्या वेदमंत्रांचा आणि सगळ्या प्राचीन-आधुनिक वेदभाष्यांचा, निरनिराळ्या ज्ञानशाखांमधून मांडलेल्या पाश्चात्य आणि आधुनिक सिद्धांतांचा शोध घेऊन आत्मानुभवाच्या अधिष्ठानावरून त्यांनी 'वेददर्शन' घडवले आहे.

वेदकालासंबंधीच्या, मॅक्समुलरपासून लो. टिळकांपर्यंतच्या सर्व मतांचा वेध घेऊन श्रीअरविंदांनी लिहिले. त्वदकाल म्हणजे.... an almost antiquity. वेदांतील भौतिकवादाविरूद्ध उपनिषदांनी तत्वनिष्ठेचे बंड केले. हे अनेकांनी केलेले भाष्य श्रीअरविंदांनी अमान्य केले. शून्यातून उपनिषदांतील महान तत्वे निर्माण झालेली नाहीत, निर्माण होत नसतात.

"The human mind in its progress marches from knowledge to knowledge or it renews and enlarges previous knowledge....'

पुरातन ऋषी आणि नूतन ऋषी असे उल्लेख वेदांमध्ये आहेत. सुसंस्कृत द्रविडांवर रानटी आर्यांनी आक्रमण केले. हा सिद्धांत तर्कदुष्ट आहे. परिपूर्ण संस्कृती असणाऱ्या बहुसंख्य द्रविडांवर रानटी अल्पसंख्य लोक विजय मिळवतात हे असत्य पाश्चात्यांनी लोकमानसात रुजवले. आर्यत्व हा भारतीयांचा मानवी जीवनातील सर्व गुणांचा, कर्मांचा, सामर्थ्यांचा आदर्श होता.

बाह्य निसर्गतत्त्वांकडून आंतरिक शक्तींकडे वळणे ही प्रक्रिया मानवी संस्कृतीत जी आढळते तीच वेदांमध्येही आहे. वेदांमधूनच नंतर ब्राह्मणग्रंथ - उपनिषदे - स्मृतिग्रंथ - पुराणे - महाकाव्ये विस्तारलेली आहेत. सहस्रावधी कालानंतर दुर्बोध बनलेल्या वेदमंत्रांना समाजनिष्ठ बनवण्याचे कार्य निरनिराळ्या ग्रंथांनी सतत पार पाडले. 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्' या आदेशामुळे वेदांचे दार्शनिक महत्त्व अधिकाधिक संपन्न होत गेले, ते सर्व थरांत, सर्व कालात भारतभर विस्तारले.

"It will be that, in sober truth, the Vedanta, Puran, Tantra, the philosophical schools and the great Indian religions do go back in their source to Vedic origins!'

वेदांतील ऋचांपासून उपनिषदांतील वचनांपर्यंतचे अंतर्गत आत्मिक सूत्र जाणवल्यानंतर त्यांतील एकात्मता आणि तर्कशुद्धता स्पष्ट होते.

तार्किक तत्त्वज्ञानापूर्वीचे वेद हे वेगळ्याच सामर्थ्यांतून निर्माण झालेले आहेत. वेदांमध्ये अंत:स्फूर्त प्रकाशदर्शने आहेत. द्रष्ट्या ऋषींचे व्यक्तिनिरपेक्ष चिरंतन सत्य वेदांमध्ये प्रकट झाले आहे. वेदांना श्रुती म्हटले जाते कारण,

"a divine word that came vibrating out of the Infinite to the inner audience of the man who had previously made himself it for the impersonal knowledge.'

'दृष्टी' आणि 'श्रुती' फक्त वेदांतील शब्दसिद्धी आहे. अलीपूरच्या कारावासात श्रीअरविंदांना असे आदेश आले होते. दैवी दर्शनेही तेथेच घडलेली होती. 'काराकहिनी' या बंगाली भाषेतील आत्मकथनात त्यांचे वर्णन श्रीअरविंदांनी केले आहे, वेदांमध्ये साक्षात्कार हे तत्त्व चमत्कार किंवा अलौकिक - अद्भुत या अर्थांनी आलेले नाही. "a progressive self-culture' असे त्याचे वर्णन त्यांनी केले आहे. शोध आणि सिद्ध, प्रवास आणि पूर्णप्राप्ती, साधना आणि अंतिम विजय, अंतिम प्रकाश-प्राप्ती, असे वैदिक दर्शनशास्त्राचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले.

"It is the book of works, of the inner and the outer sacrifice; it is the spirits hymn of battle and victory as it discovers and climbs to planes of thought and experience inaccessible to the natural or animal man.'

दैवी प्रकाश, दैवी सामर्थ्य, दैवी कृपा यांचे कार्यकर्तृत्व वेदांमध्ये गौरवले आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या आत्मिक प्रगती - उन्नतीसाठी वेदांची निर्मिती ऋषींनी केली. मानवांमधील देवत्वाचे दर्शन घडवणे, अनिष्टांचा नाश करणे, पूर्णत्वाच्या प्राप्तीसाठी सतत संघर्ष करणे, दैवी शस्त्रांनी पशुत्वाचा, अनितीचा वध करणे ही वैदिक ऋचांची वैशिष्ट्ये होती.

श्रीअरविंदांनी एक संपूर्णपणे नवा सिद्धांत मांडला आहे. सध्या उपलब्ध असलेली वेदसंहिता वेदव्यासांची आहे. वेदांमधील आज

उपलब्ध असलेल्या ऋचा आरंभकालातील नसून शेवटच्या कालातील आहेत. 'पुरातन' ऋषी आणि 'नूतन' ऋषी या वेदांमधील उल्लेखांवरून श्रीअरविंदांचा सिद्धांत कालदृष्ट्या सिद्ध होतो. 'सरस्वती' नदी आणि मृगनक्षत्रातील संपातबिंदू यांच्या एकत्र विचारांतून आणि 'सरस्वती' च्या भौगोलिक स्थित्यंतरावरून नूतन वेदांचा काल ५५ ते ६० सहस्रवर्षांपूर्वीचा ठरतो.

लोहयुगापासूनचा हळहळू संध्याकाल - अंधारयुगाचा काल निर्माण झाल्यानंतर वेदव्यासांनी निवडलेल्या ऋचांमधील अर्थांमध्ये पूर्वकालीन दैवी प्रकाश, दैवी अंत:प्रेरणा या क्षीण होत गेल्या आणि त्यांना भौतिक जीवन, बौद्धिक विचार, तर्कनिष्ठा असे स्वरूप प्राप्त झाले. वेदांमधील आंतरिक आत्मिक ज्ञानावर नंतरच्या लौकिक-भौतिक पूजाप्रकारांचे जाड थर निर्माण होत गेले आणि आत्मिक तेज-सामर्थ्य नष्ट झाले. प्रतीकपूजांमधून दैवी प्रकाश, दैवी सामर्थ्य नष्ट झाले आणि निरर्थक ग्राम्यता शिल्लक राहिली. नंतरच्या कालखंडांत ब्राह्मणग्रंथांनी वैदिक ऋचांचे बाह्य स्वरूप चिरंतन ठेवले आणि उपनिषदांनी वेदांचे आत्मस्वरूप पुनरूज्जीवित केले. वैदिक ऋषींच्या आत्मस्फूर्त ऋचांच्या जागी उपनिषदांची बुद्धिगम्य सूत्रे आली आणि त्यांना भारतीय तत्त्वज्ञानाचे सर्वोच्च स्थान प्राप्त झाले. पुराणांनी वेद बाजूला सारून नव्या धार्मिक पद्धती समाजात दृढमूल बनवल्या. वेद म्हणजे केवळ कर्मकांड आणि उपनिषदे म्हणजे निखळ ज्ञानयोग अशी कृत्रिम विभागणी उपनिषद्काळानंतर केली गेली, वेदांचे सर्वांगपरिपूर्णत्व विस्मृत झाले आणि उपनिषदे म्हणजे भारतीय तत्त्वज्ञान आणि पुराणे म्हणजे धर्मग्रंथ अशी विभागणी भारतीय लोकजीवनात दृढमूल झाली.

सहा वेदांगांमधील 'निरुक्ता' या वेदांगाचे रचयिते यास्काचार्य होते. त्यांच्या 'निघंटू' मध्ये एकाच अर्थाचे निरनिराळे शब्द वेदांमध्ये किती-कोणते आहेत त्याचा ज्ञानकोश आहे आणि 'निरुक्ता'मध्ये एकाच धातूपासून निरनिराळ्या अर्थांचे निरनिराळे शब्द कसे निर्माण झाले त्यासंबंधीचा उत्पत्तिकोशही आहे. महर्षी दयानंदांनी तीन वर्षे निरुक्ताचे अध्ययन गुरूपाशी केले होते. श्रीअरविंदांनी यास्काचार्य यांना सर्वोच्च स्थान दिले आहे आणि सायणाचार्यांना दुसरे पण सगळ्या पाश्चात्य ग्रंथकारांपेक्षा सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. सायणाचार्यांनी देवतांना निसर्गातील दिव्य-भव्य रूपे मानल्यामुळे त्यांच्या ग्रंथाच्या अनुवादावर सर्व वेदभाष्ये आधारणाऱ्या पाश्चात्य ग्रंथकरांची सर्व मते, श्रीअरविंदांनी भ्रामक - चुकीची ठरवली. पाश्चात्य लोक मठ्ठ असल्यामुळे त्यांना सूक्ष्म भारतीय तत्त्वांचे आकलन होऊ शकत नाही असे श्रीविवेकानंदांनीही म्हटले आहे.

सायणाचार्यांच्या काळापर्यंत वैदिक ऋचांचे लौकिक-भौतिक स्वरूपच यज्ञाच्या ढोबळ स्वरूपात रूढ झाले होते, म्हणून वेदांतील व्यापक 'कर्म' तत्त्वाला संकुचित यज्ञविधी असे स्वरूप प्राप्त झाले.

"The dominance of the ritualistic interpretation had already deprived India of the ""living use" of its greatest scripture and of the true clue to the entire sense of the Upanishads.'

तरीही सायणाचार्यांचे भाष्य वेदरहस्य उघड करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून सर्व युरोपीय ज्ञानापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.

"Sayana's work is yet indispensable for opening the antechambers of Vedic learning. All the vast labour of European erudation has not been able to replace its utility.'

सायणांनी बाह्य विधींना अवास्तव महत्त्व दिल्यामुळे युरोपीय विद्वानांनी, यज्ञांतील आहुतींच्या आधारे वेदांना, काल्पनिक देवतांना कृपा करण्यासाठी किंवा शत्रूंचा विनाश करण्यासाठी केलेल्या प्रार्थना असे वेदांचे स्वरूप रानटी समाजाचे होते असे म्हटले. वैदिकांच्या आध्यात्मिक संस्कृतीमध्ये 'सत्य' आणि 'आत्मिक अमरत्व' (ऋतम् आणि अमृतम्) ही परिपूर्ण सर्वोच्च तत्त्वे प्रकट झाली आहेत. त्या संस्कृतीमध्ये वांशिक भेदांचे अस्तित्व कोठेही आढळत नाही. रिस्ले यांनी भाषिक आधारावर आर्य-द्रवीड असे वेगवेगळे वंश मानले पण प्रगत वंशशास्त्राने भाषाभेद हे अशास्त्रीय ठरवले. त्यामुळे भारत हा एकजिनसी समाज असलेला देश होता हे सिद्ध झाले आहे. सेष्ट, ट्युटॉन, ग्रीक यांच्याशी तुलना करून त्यांच्याप्रमाणे आर्य संस्कृतीला रानटी ठरवण्याची चूक भाषाशास्त्रज्ञांनी केली.

वेदांमधील तत्त्वांचा अखंडपणे नंतरच्या सर्व ग्रंथांमध्ये सर्व क्षेत्रांत, सर्व बाजूंनी विस्तार झाला आहे. वेदांमधील सूक्तांमध्ये शाब्दिक प्रतिमा मागील, मन:शक्तींना दिलेल्या देवतास्वरूपांना जाणणे फार महत्त्वाचे आहे. प्राचीन भारताच्या राष्ट्रीय इतिहासाचेही दर्शन त्यांतून घडते. उत्तरेकडची आर्यसंस्कृती दक्षिण भारतात उतरली आणि भारतात एकात्म संस्कृती विकसित झाली. मानवी कवट्यांच्या मोजमापावरून वंशभिन्नत्व ठरवणे हे मानववंशशास्त्राने अशास्त्रीय ठरवले आहे. श्रीअरविंदांच्या नंतरच्या काळात बॉइड शेफर या राष्ट्रवादाच्या भाष्यकाराने 'उत्खननातील किंवा प्रत्यक्षातील हाडांच्या तपासणीतून फक्त हाडासंबंधीचे ज्ञान होते, पण मानवांसंबंधी कोणतेही सत्य समजत नाही' असा निष्कर्ष मांडला आहे.

(Nationalism : Myth and Reality) I could not but perceive that whatever might have taken place, whatever regional diffences might have been evolved, there remains, behind all variations, a unity of physical as well as of cultural type throughout India." आर्य-द्रवीड भेद नष्ट झाला आहे.

वेद, हे दुर्बोध वाटणाऱ्या उपनिषदतत्त्वांवर प्रकाश टाकतात. वेदांमधील ऋचा, लौकिक आणि आध्यात्मिक आशय प्रत्येक शब्दांमधून प्रकट करतात. म्हणून लौकिक - भौतिकांपासून मानसशास्त्रीय - आध्यात्मिकांपर्यंत निरनिराळी भाष्ये वेदांवर लिहिली गेली. सायाणाचार्य, महर्षी दयानंद सरस्वती, पं. श्री. दा. सातवळेकर, म. म. बाळशास्त्री हरदास यांच्या वेदभाष्यांतून निरनिराळ्या स्तरांवरचे विविधार्थ स्पष्ट झाले आहेत. श्रीअरविंदांचे भाष्य प्रधानत: आध्यात्मिक असूनही वैदिक शब्दांचे वेगवेगळे अर्थ संदर्भाप्रमाणे त्यांनी स्पष्ट केले. धी = विचार, आकलन; मती = विचार, मन:स्थिती, भावना; मनीषा = विचार; मनीषा = बुद्धिमत्ता; ऋतम् = सत्य; कवी = द्रष्टा; मनीषी =

विचारवंत; विप्र-विप्रश्चित = मनाने उदात्त; दक्ष = शक्ती; श्रवस = अन्न, वैभव, कीर्ती. वैदिक शब्दांना लौकिक किंवा अंतर्गत - आध्यात्मिक अर्थ, भाष्यकाराच्या अभ्यास - अनुभूतीतून प्राप्त होतो. गीतेमध्ये 'यज्ञ' शब्द बाह्य आणि आंतरिक कर्म अशा दोन्ही अर्थांनी येतो. वेदांमधील 'यज्ञ' याचा अर्थ बाह्य आहुती आणि आंतरिक त्याग हे दोन्ही अर्थ प्रकट करतो. **'दीप्तानलात निज-मातृविमोचनार्थ । हा स्वार्थ जाळुनि आम्ही ठरलो कृतार्थ ।'** या स्वातंत्र्यवीरांच्या उद्‌गारांत अंतर्गत अर्थ आहे. **'यज्ञो वै श्रेष्ठतमं कर्म ।'** या यजुर्वेदातील वचनातून श्रीअरविंदांचा अर्थ स्पष्ट झालेला आहे. महर्षी दयानंदांच्या भाष्यातून 'श्रेष्ठगुणपूजन - संगतीकरण - दान' = मानसिक - राष्ट्रीय - व्यक्तिधर्म असे तिन्ही प्रकट झाले आहेत.

"I perceived throughout Veda the elements of our personality are themselves continually personified.'

अग्नी म्हणजे मानवांतील दैवी मन आणि दैवी सामर्थ्य. गो म्हणजे प्रकाश. उषा म्हणजे मानवी मनातील प्रकाश, वेदांतील 'गो' आणि 'अश्व' या प्रतिमा 'प्रकाश' आणि 'क्रियाशक्ती', 'ज्ञान' आणि 'गती', म्हणजे मानवी जीवनातील सर्व कर्मांचे 'द्विविध' स्वरूप आहे. अश्वमेध म्हणून अश्वांचा बळी असा चुकीचा हिंसात्मक अर्थ नंतरच्या काळात रूढ झाला. अथर्ववेदामध्येही यज्ञातील पशुहत्येचा रानटी म्हणून निषेध केलेला आहे. महर्षी दयानंदांनी यज्ञ = अध्वर = अहिंसा असा यज्ञाचा मूळ अर्थ स्पष्ट केला आहे. अश्वमेध = अश्व + मेधा = गती + ज्ञान. ज्ञान हे अश्वाप्रमाणे गतिमान बनवणे हा अश्वमेधाचा तात्त्विक आणि व्यावहारिकही अर्थ आहे.

मानवी अस्तित्वाचे सत्, चित्, आनंद, विज्ञान, प्राण, मन आणि अन्न असे सात प्रकार मानले आहेत. तेजाचे निरनिराळे प्रकार हे वेदोपनिषदांमध्ये 'देव' मानलेले आहेत. मानवी मनाला उन्नत करण्याच्या मार्गातील विरोधी वृत्ती-वृत्र, पणी, राक्षस, शंबर, वल, नमुची यांच्या रूपाने देहधारी शत्रू मानलेले आहेत. मानवी जीवनातील श्रेष्ठ तत्त्वे आणि अनिष्ट मनोवृत्ती यांच्यातील संग्राम वैदिक ऋचांमध्ये वर्णन केलेला आहे. द्रवीड समाज या आधुनिक अपकल्पनेतून अत्यंत प्राचीन (६० सहस्र वर्षांपूर्वीचे) भारतीय संस्कृतीला दूषित केले आहे.

यजुर्वेदामध्ये 'प्रथमा संस्कृतिः विश्ववारा' = विश्वव्यापक अशी जगातील पहिली संस्कृती असे वैदिक संस्कृतीचे वर्णन केलेले आहे. श्रीअरविंदांनी वैदिक संस्कृत्चे प्रथम स्थान आणि नंतरचा विकास यासंबंधी महत्त्वाचा सिद्धांत मांडला. एकेका धातूमधून अनेक शब्द आणि अनेक अर्थ निर्माण करणे ही वैदिक ऋषींची आवश्यकता होती. म्हणून वैदिक शब्दांचे अनेक अर्थ जाणल्याशिवाय वेदांचे संपूर्ण व्यापक स्वरूप समजणे अशक्य आहे. वैदिक संस्कृत भावसंपन्न आहे, प्रतिभासंपन्न आहे म्हणून वेदभाष्यकारांनी नंतरच्या काळात बद्ध झालेल्या शब्दार्थांमधून वेदांचे गुह्य न शोधता स्वतंत्र प्रज्ञेने, स्वतंत्र प्रतिभेने, आत्मानुभवाने शोधले पाहिजे. हे वेददार्शनिक श्रीअरविंदांनी आपल्या ग्रंथातून प्रतिपादिले.


प्रभाकर पुजारी

'गौरव' अपार्टमेंट, ६, डहाणूकर कॉलनी १,

कोथरूड पुणे २९. फोन : ६५२१३९२८

■ ■ ■

श्रीगुरूदेव रानडे प्रणीत समालोचन



श्रीअरविंदांचे 'ब्रह्मभवन' आत्मसाक्षात्काराकडे नेणारे!

प्रा. डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे

एम. ए. पीएचडी, मराठी विभाग प्रमुख दयानंद कॉलेज, सोलापूर
सोलापूर संचार व समाचारमध्ये सहसंपादक, अध्यात्मावर विपुल लेखन. १२ पुस्तके प्रकाशित. संतकृपा, सज्जनगड प्रसाद मासिकातून लेखन. व्याख्याने व प्रवचनकार. १९७८ पासून श्री स्वामी समर्थ उक्कलकोट महाराज पुण्यतिथीचे संयोजन. श्री गुरूदेव रानडे यांचे अनुग्रहीत. अनेक पुरस्कार प्राप्त.

विसाव्या शतकातील थोर तत्वज्ञ आणि साक्षात्कारी संत डॉ. रा. द. तथा श्रीगुरूदेव रानडे यांनी आपल्या 'गीता : आत्मसाक्षात्कार दर्शन' या ग्रंथात अनेक गीताभाष्यकारांचा परामर्श घेतला असून विशेषत: आधुनिक काळातील त्यांचे समकालीन असलेले लो. टिळक - म. गांधी - योगी अरविंद यांच्या गीताभाष्यावर उत्तमपणाने समालोचन केले आहे. तिघांचेही भाष्य क्रमोन्नतीने साधकाला साक्षात्काराकडे नेणारे असून त्यांना आत्मदर्शन घडविते. 'ब्रह्मभवन' विषयक अरविंदांचे तत्त्वज्ञान हे त्यांना विशेष भावले असून त्यांच्या सिद्धांताशी ते अधिक जवळचे आहे, असे त्यांनी नमूद केले आहे. त्या दृष्टीने या भाष्यकारांचा थोडक्यात मागोवा घेऊन अरविंद यांनी कोणती मोलाची भर टाकली आहे, ते पाहण्याचा विनम्र प्रयत्न करू.

टिळक-गांधी-अरविंद

श्रीगुरूदेव रानडे यांचा टिळक-गांधी-अरविंद या भाष्यकारांशी एक व्यक्तिगत ऋणानुबंध आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या 'गीता : साक्षात्कार दर्शन' ग्रंथात प्रकरण १०वे मध्ये टिळकांच्या कर्मयोगाचा विचार केला आहे. प्रकरण ११ व्यात गांधींच्या अनासक्तीचा विचार केला आहे. प्रकरण १४व्यात अरविंदांच्या ब्रह्मभवनाचा विचार केला आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा परामर्श घेताना मला वा त्यावर समालोचन करताना म्हणा, त्यांनी 'स्वमत भाष्य' देखील केले आहे. त्यांचा व्यक्तिगत ऋणानुबंध काय आहे ते प्रथम पाहू. : टिळक-गांधी-अरविंद यांच्यात एक विलक्षण साम्य असे आहे की, या तिघांनीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपापल्यापरीने कार्य केले आहे. तिघांनी ग्रंथलेखनही केले आहे. टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मी मिळविणारच' असे उद्घोषित करून परकीयांशी लढा दिला. गांधींनी 'चले जाव' चळवळीचे नेतृत्व करून स्वदेशीचा पुरस्कार केला. अरविंद तर क्रांतिकारकच होते. तरीही या तिघांच्या जीवनकार्याचे अधिष्ठान भगवद्गीता हे आहे. टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून कर्मयोगप्रधान अशाप्रकारचे विचार मांडले. तरीही ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी लिहिले आहे की, 'कर्मयोग महत्वाचा असला तरी भक्तीशिवाय समाधान नाही.' हे पाहता त्यांनाही 'भक्तियोग' अभिप्रेत होता हे लक्षात येते. राजकीय कार्यात त्यांना भक्तिसाधनेसाठी वेळ मिळाला नाही, इतकेच! गांधीजींनी आपल्या लेखातून गीताभाष्य केले आहे. त्यांनी सत्य आणि अहिंसा यांचा पुरस्कार करताना 'अनासक्ति योग' प्रतिपादिला आहे. गीतेच्या गुजराती भाषांतराला त्यांनी हेच नाव दिले. त्यांना चरख्यातील संगीत हे ईश्वराचा आवाज वाटत असे. त्यांच्या अनासक्ति योगात निष्काम कर्म, सर्व कर्मे ईश्वरार्पण करणे, शरणागती ही तत्वे आढळतात. देहाचे देऊळ होण्यासाठी एवढे व्हायलाच हवे, असे गांधींचे म्हणणे आहे. अवतारित्याविषयी त्यांचा विचार असा की, प्रत्येक देहधारी प्राणी हा अवतारच आहे. पण मानवतेची काहीतरी लोकोत्तरसेवा केल्यावाचून कोणालाही पूर्ण अवतार म्हणता येणार नाही. अरविंदांनी मात्र गीताभाष्य करून तत्त्वज्ञानात फार मोठी भर घातली, असे गुरूदेवांचे म्हणणे आहे. तत्पूर्वी एक गोष्ट पाहता येईल, ती म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांती करण्यात अग्रणी असलेल्या अरविंदांनी पुढे आध्यात्मिक क्रांतीचा पुरस्कार करून आत्म-स्वातंत्र्यासाठी ध्यानोपासनेस प्राधान्य दिले. 'सावित्री' 'महाकाव्य' तसेच 'आर्य' मासिकातील लेख याद्वारे त्यांनी ही आध्यात्मिक क्रांती जगाला पटवून दिली आहे. त्यांच्या 'ब्रह्मभवन' सिद्धांताचा विचार नंतर आपण करणार आहोतच! या तिघांशी श्रीगुरूदेवांचा वेगवेगळ्याप्रकारे संबंध येऊन ऋणानुबंध जुळून आला. त्यामुळेच त्यांनी मोठ्या आत्मीयतेने व साक्षित्वाने त्यांच्या गीताभाष्यावर समालोचन केल्याचे कळून येते.

त्रिमूर्तींची 'प्रभावस्थळे'

टिळक-गांधी-अरविंद यांच्या संदर्भातील प्रभावस्थळे दाखविणाऱ्या काही घटना पाहण्याजोग्या आहेत. टिळकांचा काळ गुरूदेवांच्या दृष्टीने पुष्कळ अगोदरचा आहे. त्या दोघांत दोन संवाद विशेषत्वाने झाले. १९१५ साली **टिळकांनी** गुरूदेवांना केसरी मराठा वृत्तपत्राचे संपादकपदासाठी आमंत्रण दिले होते. पण हे काम धकाधकीचे आहे, असे कारण देऊन गुरूदेवांनी त्यास विनम्रतेने नकार दिला. राजकीय जीवन वा राजकारण हा गुरूदेवांचा पिंड नव्हता. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३० वर्षे होते. पुढे पुन्हा टिळकांनी १९१७ साली गुरूदेवांना विनंती केली की, आपण 'गीतारहस्य' या ग्रंथावर केसरीमध्ये इंग्रजीतून तीन लेख लिहावेत. मी फार लहान मनुष्य आहे, तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून माझ्या जीवनाला आताच कोठे प्रारंभ केला आहे, अशा परिस्थितीत गीतारहस्यासारख्या महत्वाच्या ग्रंथावर मी आपले विचार प्रदर्शित करणे हे अविचाराचे होईल असे सांगून नकार दिला. कारण त्यांना पुढे साक्षात्कारशास्त्र मांडणारा स्वतंत्र ग्रंथ लिहावयाचा होता. टिळकांची इच्छा त्यांनी 'गीता साक्षात्कारदर्शन' या ग्रंथात स्वतंत्र प्रकरण

लिहून पूर्ण केली आहे. परामर्षासह **गांधीजींच्या** आध्यात्मिक जीवनावर श्रीगुरूदेवांनी अहमदाबाद येथे ७ व ८ ऑगस्ट १९४७ साली दोन व्याख्याने दिली. १) नव - भारतापुढील कार्य : सर्व मानवजात एक कशी होईल? २) गांधी आणि हिंदी संत यांचे आध्यात्मिक जीवन. 'गांधींचे आध्यात्मिक जीवन' ही छोटेखानी पुस्तिका प्रसिद्ध झाली आहे. गांधीजींचा 'आतला आवाज' हा ईश्वरी संकेत देणारा होता. ईश्वरी अस्तित्वावर गांधींचा दृढ विश्वास होता. गुरूदेवांनी त्याविषयी आदर व्यक्त केला आहे. **योगी अरविंद** यांच्याविषयी गुरूदेवांना आदर होता पण गुरूदेवांच्या लेखनाने अरविंदांवर प्रभाव पडलेला होता. 'ग्रीक अँड संस्कृत : ए कंपॅरेटिव्ह स्टडी' हा निबंध प्रसिद्ध झाल्यावर अरविंद प्रभावित झाले. त्यांनी गुरूदेवांना पत्र पाठविले. त्यांत ते म्हणतात, 'हे अत्यंत भरीव लिखाण आहे. त्यांनी अभ्यासाचे हे कार्य अत्यंत सूक्ष्म काटेकोरपणे आणि साद्यंत रीतीने केले आहे. या विषयावरील अधिक विस्तृत व परिपूर्ण लिखाणाची ही त्यांची सुरुवात म्हणूनच मी या निबंधाकडे पाहतो. त्यातील माहिती, नाविन्यपूर्ण व आकर्षक आहे.' (१९१३) पुढे गुरूदेवांनी हिरॅक्लीटस या ग्रीक तत्त्ववेत्त्याच्या विचारासंबंधीचा चिकित्सक निबंध लिहिला. त्यावर अरविंद लिहितात की, हा निबंध गुरूदेवांच्या बुद्धिमत्तेचा उच्चांक दाखविणारा आहे. त्यांनी मांडलेले विचार अंत:करणाची पकड घेतल्यावाचून राहात नाहीत. (१९१६) पुढे ते अभिप्राय देतात की, 'या अवघ्या १७ पानांच्या निबंधामुळे मी मंत्रमुग्ध होऊन ज्ञानसंपन्न व संतुष्ट झालो आहे.' (गुरूदेव रानडे यांचे जीवनदर्शन/दादासाहेब देशपांडे १९८६)

अरविंदांची 'नवी दृष्टी'

टिळकांची कर्माशीच ज्ञान आणि भक्ती जोडण्याची भूमिका, तसेच गांधींची अनासक्तीभोवती ज्ञान-भक्ती-कर्म जोडण्याची भूमिका, त्याला अहिंसेचे दिलेले परिमाण आणि पुढे ईश्वरार्पणता व शरणागती हे मुद्दे मांडून कर्मप्रधानता ही अनासक्तीशी निगडीत करण्याची दृष्टी, या गोष्टी पाहता अरविंदांची गीतार्थाकडे पाहण्याची दृष्टी नवी आहे. विशेषत: गीतेचा तात्पर्यार्थ निश्चित करणाऱ्या आधुनिक पंडितांपैकी अरविंद हे एक असून त्यांनी गीता - तत्वज्ञानात बहुमोलाची भर घातली आहे, असे गुरूदेवांचे मत आहे. अरविंदांच्या सहा मुद्यांचा उल्लेख गुरूदेवांनी केला आहे.

१) तत्वांची विकासात्मक रचना : त्यांत अरविंदांच्या मते सत् हे उच्चतम तत्त्व असून त्यांतूनच चित्-शक्ती हे तत्त्व निघते. त्यातून आनंदतत्त्व निर्माण होते. हाच नेमका सच्चिदानंद आहे.

२) जाणिवेच्या चढत्या पायऱ्या : याविषयीचा विचार अरविंदांनी मानसशास्त्रदृष्ट्या केला आहे. खनिजपदार्थ, वनस्पती, मनुष्येतर प्राणी व मनुष्य यामध्ये जाणवलेल्या चढत्या पायऱ्या दिसून येतात.

३) अध्यात्मज्ञान प्रधान - ध्येय : खरा अध्यात्मज्ञानवादी साधक अतिमनाने कार्य करीत असतो. ज्ञान व योगसिद्धी यांत मुळीच भेद नाही. एखादी व्यक्ती ज्ञानवादी, तात्त्विक किंवा आध्यात्मिक दृष्टीने ज्ञानी झाली म्हणजे कामपूर्ण झाले असे नाही. तर अध्यात्मज्ञानी किंवा पूर्णत्वाला पोहोचलेल्या माणसांचा एक वंश निर्माण होऊन अध्यात्मवादी मानववंशच निर्माण व्हावा हे साध्य झाले पाहिजे. अखिल मानवतेला आत्मज्ञानी केले पाहिजे. या सर्व घटनेचा परिणाम म्हणजे जगावर ईश्वराचे राज्य, रामराज्य नांदेल. गुरुदेवांनी या दृष्टिकोनाची प्रशंसा केली आहे. कारण त्यांत ज्ञानानंतरच्या अनुभूतीचा विचार ध्वनित होतो. गुरु-शिष्य परंपरा किंवा ईश्वरनिष्ठांची मांदियाळी या गोष्टी आत्मज्ञानी-मानववंश निर्मितीशी अगदी जवळच्या आहेत. गुरूदेवांनी अन्यत्र म्हटले आहे की, 'सर्वधर्मी होण्यापेक्षा ईश्वरधर्मी व्हा!' तसेच त्यांना 'एक जग, एक मानव, एक धर्म' हा सिद्धांत अभिप्रेत आहे.

४) अतिमानव : अरविंदांच्या तत्त्वज्ञानात या सिद्धांताला विशेष महत्व आहे, असे गुरूदेवांनी म्हटले आहे. गीतेच्या १६ व्या अध्यायात जी दैवी आणि आसुरी संपत्ती आहे त्यात ज्या अतिमानवाच्या ठिकाणी दैवी सामर्थ्य व दैवी प्रेमच नव्हे, तर त्याबरोबर दैवी ज्ञानही नांदते, तो अतिमानव. (इथे दैवीज्ञान म्हणजे आत्मज्ञान किंवा ईश्वरी - अनुभूती ही अपेक्षित आहे.)

५) अमरत्व आणि ब्रह्मभवन : अमरत्व आणि ब्रह्मभवन यांचा काय संबंध आहे, हेही अरविंदांनी यथोचितपणे सांगितले आहे. कसे म्हटले तर 'जडत्वात दिव्यजीवन निर्माण करणे म्हणजे अमरत्त्व होय.' मन, प्राण आणि देह यांना अंतरात्म्याचे दिव्यत्त्व आणि अमरत्त्व काही प्रमाणात तरी आत्मसात् करता आले, तरच अमर होण्याची आकांक्षा पूर्ण होऊ शकेल. अमरत्त्व आणि ब्रह्मभवन एकच आहे. ते पुढे सांगतात की, 'आत्म्याचे उत्क्रमण झाले म्हणजे मनुष्याला अनंत आणि शाश्वत तत्वाचा, ब्रह्माचा अखंड साक्षात्कार होतो, त्याची अखंड जाणीव राहते. अनंताची शांती व आनंद प्रत्यक्ष, शाश्वत अनुभवाच्या रूपाने अवतरतात. अखिल दृष्य ज्ञानात आणि आकारात शाश्वत, सत्य तत्त्वांचे दर्शन होते, सर्व नादात तेच ऐकू येते. सर्व स्पर्शात त्याचाच स्पर्श अनुभवाला येतो, त्याचा आकार, त्याची स्वरूपे, त्याचे आविष्कार यावाचून दुसरे कोठे काहीही नाही. अंत: करणातील आनंद व पूज्यभाव, आत्मत्त्वाने सर्व विश्वाचा अभेदाने अनुभव - विश्वात्मभाव आणि आत्म्याची एकता, ही शाश्वत अविनाशी तत्त्वे आहेत.' **गुरूदेवांना 'ब्रह्मभवन' विषयक त्यांचे तत्त्वविवरण अधिक जवळचे वाटते. कारण त्यात साक्षात्काराची बीजे आहेत.**

गीता - तात्पर्याविषयीचे अरविंदांचे काही नवीन विचार आहेत. गुरूदेवांनी ते नोंदविले आहेत. (विस्तारभयास्तव त्याची चर्चा इथे करणे शक्य नाही.) ते नवीन विचार असे :

१) गीता नीतिशास्त्रावरील ग्रंथ नसून, आध्यात्मिक जीवनावरील आहे.
२) गीतेत 'निष्काम कर्म' आचरणाचा उपदेश नाही.
३) सर्व धर्माचा व कर्तव्याचा त्याग. ईश्वराला शरण जाणाऱ्याला कोणताही धर्म उरत नाही.
४) समाजसेवेचा उपदेश गीता करीत नाही. जे कार्य करायचे ते ईश्वरोन्माद झालेल्या महापुरुषांनी तशाच ईश्वरोन्मत्त झालेल्या पुरुषांसाठी करावे. असेच कर्म आम्हाला पाहिजे आणि आम्ही हेच केले पाहिजे.
५) आत्मयज्ञ - त्याग आणि शरणागती. 'सर्व कर्मे ही मानव आणि अखिल सृष्टी याचा एकमेव आधार म्हणून जो उभा आहे, त्या

ईश्वरासाठी केलेला यज्ञ होय.'

६) शरणागती - जगदीश्वराला सर्वस्वाने शरण जाणे हेच ध्येय ठेवावे. त्यातच जीवनाची सार्थकता आहे.

७) ईश्वरी अवतार - धर्मरक्षणासाठी अवताराची आवश्यकता नाही. अवतार म्हणजे आत्मतत्त्वाचे जडतत्त्वात अवक्रमण नसून जडाचे आत्मतत्त्वात उत्क्रमणही आहे.

ब्रह्मभवनाचे हे द्विविधरूप आहे. ईश्वराच्या शक्तीचे प्रवाही वाहक झालेला आत्मा म्हणजे अवतार. अंत:करणात प्रकटलेल्या दिव्य चैतन्याने मनुष्य जेव्हा इतका झडपला जातो की, त्याच्यामधून ते दिव्य चैतन्यच प्रभावीपणे प्रसृत होऊ लागते. त्या दिव्य चैतन्याच्या प्रसाराचे तो प्रभावी साधन बनतो, तेव्हाच त्याला अवतारपद प्राप्त होते. (ही अरविंदांची भव्योदात्त व्याख्या असून ती उदात्ततेच्या शिखराला पोहोचली आहे, असे गुरूदेव सांगतात. स्वत: ईश्वराचा साक्षात्कार करून घेऊन जो विश्वात ईश्वराच्या आदेशाचा प्रसार करतो तोच अवतार होय. हे अरविंदांचे सांगणे गुरूदेवांना अत्यंत महत्त्वाचे वाटले आहे.)


क्रमोन्नतीने साक्षात्काराकडे -

टिळक-गांधी-अरविंद यांनी केलेल्या गीताभाष्याचे समालोचन श्रीगुरूदेवांनी आपल्या ग्रंथात स्वतंत्र प्रकरणे लिहून केले आहे, याचाच अर्थ त्यातील विचार महत्वपूर्ण आहेतच. ज्याला जसा अवधी मिळाला व जो ज्या क्षेत्रात वावरला त्याप्रमाणे त्याने गीतार्थ लावला आहे, ही गोष्ट उघड आहे. टिळक राजकारणात वावरले. पत्रकारिता हा त्यांचा धर्म होता. 'गीतारहस्य' ग्रंथातील कर्मयोग हा त्या काळाला धरूनच आहे, हे अमान्य करता येत नाही. गांधी देखील 'चले जाव' चळवळीचे नेते होते. त्यांनीही गीताभाष्य केले आहे. 'कर्मसातत्य' करताना अहिंसा-शांती-अनासक्ति विषयक विचार त्यांनी मांडले आहेत. चरखा हा कर्मयोगाचे प्रतीक तर प्रार्थना ही ईश्वरपूजा अशी त्यांची धारणा आहे. 'आतला आवाज' हा त्यांना ईश्वरानुभूती वा 'देवाचा कौल' या स्वरूपात जाणवतो. त्यामुळे त्यांची मनोधारणा आणि कार्यकुशलता ही त्यांच्या मार्गाने ईश्वरी साक्षात्काराकडे वाटचाल करण्याचाच संकेत दाखविते. अरविंदांनी 'ब्रह्मभवन' विषयक विचारात अवतारित्त्वापर्यंत आत्मोन्नतीचा प्रवास दाखवला असून अवतारपद म्हणजे ईश्वरीतत्त्वांचाच प्रसार स्वानुभवाने करू पाहणारा थोर महापुरुष होय, हेही विशद केले आहे. ते पाहता 'अवतारपद' हे 'सद्गुरू' या अधिकारपदाकडे निर्देश करणारे आहे, हे कळून येते. शरणागतीलाही त्यांनी विशेष प्राध्यान्य दिले आहे.

आता, वरील तिघांही थोर सत्पुरुषांचा गीतार्थ पाहता असे लक्षात येते की, त्यांच्या तत्त्वविचारातून मानवी जीवनाचा प्रवास हा **क्रमोन्नतीने आत्मोन्नती** करून घेणारा असून शेवटी **ईश्वरी-साक्षात्कारानेच कृतार्थता प्राप्त** होणार आहे अशा फलश्रुतीपर्यंत येऊन पोहोचणारा आहे. त्यातही विशेषकरून अरविंदांचा ब्रह्मभवन विषयक सिद्धांत आणि त्यांच्या अनुषंगाने मानवात ईश्वरदर्शनाचे ध्येय ठेवणारा अतिमानस वंश, तसेच अवतारपद प्राप्त करून घेणारा महापुरुष त्याचा ईश्वराच्या शक्तीचे वाहक ठरणारा आत्मा, त्यांच्यातील शरणागतीची श्रेष्ठभावना या सर्वगोष्टी गुरूदेवांना अधिक भावल्या आहेत. टिळक-गांधी-अरविंद यांची सर्वच मते सनातनी किंवा आधुनिक अशा विचारवंतांना पटतीलच असे नाही हेही गुरूदेवांनी नोंदविले आहे. तरीही **साक्षात्कार शास्त्रात शरणागतीला विशेष महत्व** असून अरविंदांनी अन्यत्र मांडलेल्या एका तत्त्वविचारालाही गुरूदेवांनी प्रशंसिले आहे. ते तत्त्व म्हणजे '**साधकाचे जसे प्रयत्न, तशी देवाची कृपा होते**' हे होय. अवताराविषयी गुरूदेवांनी आपले स्वतंत्र मत नोंदविले आहे. ते म्हणतात की, '**भक्ताच्या दृष्टीसमोर देवाच्या रूपाचे अवतरण म्हणजे अवतार होय.**' ते स्पष्टीकरण देतात की, 'अवतार शब्दाला आमच्या मते अर्थ कोणता? तर अव या उपसर्गाचा 'खाली' असा अर्थ आहे. तसाच आम्ही करतो. साक्षात्कारात साधकाच्या दृष्टीसमोर देवाचे रूप अवतरते. अशाप्रकारे साधकासमोर देवाचे रूप अवतरणे, उतरणे, म्हणजे अवतार.' हे पाहता असे लक्षात येते की, हे रूप **शाश्वत** असते. त्यात **अमरत्व** आहे. सद्गुरूही अमर होतात. अरविंदांचे 'ब्रह्मभवन' अशा साक्षात्काराकडे नेणार आहे. ।।इति।।

डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे
'प्रज्ञा' अ-७४, आसरा सोसायटी, होटगी रस्ता,
सोलापूर - ४१३००३
फोन : ०२१७-२६०००३ मोबाईल : ९४२२६५३६३६

■ ■ ■



सप्तभूमिक अज्ञान

डॉ. सौ. उषा संजय रोटीथोर

बी. ए. एम. एस / वैद्यकीय व्यवसाय
श्रीअरविंदो यांचे साधक-अभ्यासक / पुणे सेंटरच्या कार्यकर्त्या

१९१४ ते १९१९ या काळात श्रीअरविंदांनी त्यांची प्रमुख सात पुस्तके लिहिली. 'दिव्य जीवन' (Life divine), योग समन्वय (Synthesis of yoga), गीतेवरील निबंध (Essays on the Gita), व इतर ग्रंथ. प्रथम 'आर्य' या मासिकांत प्रसिद्ध झाली. त्यावेळी पहिल्या महायुद्धाला सुरूवात झाली होती. विश्व विनाशाच्या उंबरठ्यावर होते. सर्वत्र अंधकार पसरला होता. मनोमय जाणिवेचे जुने जग नष्ट करण्यात येत होते.

ज्याप्रमाणे कुरूक्षेत्रावरील युद्धाच्या वेळी भगवान् श्रीकृष्णांनी मानव जातीला गीतेचे तत्त्वज्ञान दिले, त्याप्रमाणेच श्रीअरविंदांनी पहिल्या महायुद्धाच्या काळात मानव जातीला 'नवीन गीता' म्हणजेच 'दिव्य जीवन' हा तत्त्वज्ञानपूर्ण ग्रंथ दिला. 'दिव्य जीवन' हा जीवनाविषयीचा एक नवा दृष्टीकोन असून तो 'अतिमानसिक जाणीव' या जाणिवेच्या उच्च पातळीवर आधारलेला आहे. जाणिवेच्या उच्च पातळीच्या अवतरणासाठी योग्य वातावरण निर्माण करण्यासाठी नवे अवतार पृथ्वीवर येत असतात.

दिव्य जीवन हा नवा दृष्टीकोन आहे. जीवनाचा नवा मार्ग आहे. नवे युग आहे. जीवनाच्या लढ्यातूनच आपल्या जाणिवेचा विकास होत असतो व त्या विकासासाठी आम्ही अभीप्सापूर्वक प्रयत्न करावयास हवा. जाणिवेच्या उच्चतर अवस्था प्राप्त करून घ्याव्यात असा त्यांचा संदेश आहे. जीवन काय आहे; जीवनाच्या समस्या काय आहेत; त्याचे ध्येय काय आहे; ते ध्येय कसे गाठावयाचे याविषयी सविस्तर मार्गदर्शन त्यांच्या 'दिव्य जीवन' या ग्रंथात आहे. कालातीत अस्तित्वातून सुरुवात करून 'काल आणि अवकाश' स्थल कालात होणारी अभिव्यक्ती, अनंत अस्तित्व, अनंत जाणीव, अनन्त शक्ति आणि अस्तित्वाचा अनंत आनंद, विश्वातीत, विश्वरूप आणि व्यक्तिरूप अस्तित्व यांचे परस्परसंबंध या आणि अशाच अनेक संकल्पना पानापानावर आढळतात. ज्या अंतर्यामिन् चैत्यपुरुषाचे ठिकाणी अभीप्सा जागृत झाली आहे, त्याला विश्वांत होणारा क्रमविकास व त्याच्या पाठीमागे आत व बाहेर असणाऱ्या या संकल्पना सहजपणे ज्ञात होतात. अशीच एक विश्वव्यापक संकल्पना 'साप्तभूमिक, अज्ञान व पूर्ण ज्ञान' विश्वाचे रहस्य उलगडून सांगणारी संकल्पना श्रीअरविंदांच्या शब्दात सांगण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न.

सप्तभूमिक अज्ञान व पूर्ण ज्ञान :-

ब्रह्म हे मूळ सत्य, एकंदर अस्तित्व हे दुसरे त्यातून निघालेले सत्य, या समग्र अस्तित्वाची अनेक अंगे ही त्या समग्र अस्तित्वाची अंगभूत सत्ये; या सर्व सत्यांचे परस्पर संबंध घडविणारी संबंध सत्ये, अशा सत्यांचा पसारा आहे. या सर्व सत्यांचे वेगळे वेगळे आणि संयुक्त व एकीकृत ज्ञान म्हणजे पूर्ण ज्ञान होय. आमची सध्याची अवस्था अज्ञानाची अवस्था आहे. आमचे अज्ञान अनेक बाजूंनी ज्ञानाच्या शोधात आहे. सर्व गोष्टींतील सत्य शोधून काढण्याच्या मागे आमचे अज्ञान म्हणजे आम्ही आहोत; सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण करणारे मूळ सत्य कोणते, सर्व गोष्टीच्या मुळाशी असलेली सत्य वस्तू कोणती यासंबंधाने आमचे मन नानाविध कल्पना करून राहिलेले आहे. सर्व गोष्टींचे पायाभूत सत्य, सर्व वस्तूतील पायाभूत सद्वस्तु कशी असावी ही कल्पना स्पष्ट आहे. ही सद्वस्तू मूलभूत वस्तू असली पाहिजे आणि विश्वव्यापक वस्तू असली पाहिजे. एकाच वेळी विश्वातीत मूलभूत आणि विश्वरस अशी सद्वस्तू असेल तिलाच खरी पायाभूत सत्य वस्तू म्हणता येईल. मूलभूत सत्य जे असेल ते सर्व अस्तित्वाचे सत्य असले पाहिजे, सर्व अस्तित्व त्यात अंतर्भूत होत असले पाहिजे, व्यक्तीचे सत्य, विश्वाचे सत्य, विश्वातीत जे असेल त्या सर्वाचे सत्य-अस्तित्वाचे हे त्रिविध सत्य जे असेल, ज्यात अंतर्भूत असेल तेच पायाभूत मूलभूत सत्य म्हणता येईल.

आमचा शोधाचा प्रवास अज्ञानापासून सुरू होत असल्याने, ज्ञानाकडे आम्ही अज्ञानाच्या क्षेत्रांतून जात असल्याने, अज्ञानाचे गूढ-स्वरूप आणि त्याचा पुरा विस्तार आम्हाला शोधून काढणे प्राप्त आहे. आम्ही सामान्यत: अज्ञानात राहतो आणि वावरतो. भौतिक विश्वात, स्थलकालमय विश्वांत आम्ही व्यक्तिगत वेगळेवेगळे जीवन जगत आहो; हे जीवन स्वभावत: अज्ञानमयच आहे. आमच्या अज्ञानमय जीवनाच्या अज्ञानाकडे आम्ही बारकाईने लक्ष दिले तर, ते आत्मविषयक अज्ञान आहे आणि त्याची अनेक अंगे आहेत असे दिसून येते. मूलविषयक अज्ञान, विश्वमूलक अज्ञान, अहंमूलक अज्ञान, कालमूलक अज्ञान, मनोमूलक अज्ञान, रचनाविषयक अज्ञान आणि व्यवहारविषयक अज्ञान असे सात प्रकार आत्मविषयक अज्ञानाचे अनुभवास येतात.

१) मूलविषयक अज्ञान : सर्व निर्गुण-सगुण निराकार-साकार

अस्तित्वाचे मूळ केवळ स्वयंपूर्ण आत्मा आहे ही वस्तुस्थिती असताना, अस्तित्वाच्या फुटकळ घटनांना, साकार अस्तित्वातील कालमूलक संबंधांना अस्तित्वाचे समग्र सत्य मानून आम्ही सर्वोच्च स्थानी बसवितो हे पहिले मूलविषयक अज्ञान होय.

२) विश्वमूलक अज्ञान : केवळ आत्म्यानंतर स्थलकालातीत, अक्षर असा आत्मा आम्हाला कळावयास हवा, पण स्थलकालाच्या क्षेत्रात विश्वाची जी अखंड घडामोड आणि हालचाल चालते, तीच अस्तित्वाचे समग्र सत्य आहे असे आम्ही मानतो हे दुसरे, विश्वमूलक अज्ञान होय.

३) अहंमूलक अज्ञान : आमचे पहिले अज्ञान आमच्या स्वयंपूर्ण केवल आत्म्याविषयीचे, दुसरे आमच्या कालातीत आत्म्याविषयीचे, तसे तिसरे आमच्या कालगत विश्वरूप आत्म्याविषयीचे. आमचा आत्मा विश्वव्यापी आहे, सर्व निराकार साकार अस्तित्वाशी आमची असीम एकता आहे हे आम्ही विसरलो आहो; आमचा खरा आत्मा म्हणजे आमचा अहंपूजक असा मर्यादित शक्तीचा शरीरसंघात होय, या संघाताबाहेरील सर्व काही अनात्मा असे आम्ही मानतो हे तिसरे अहंमूलक (आत्मविषयक) अज्ञान होय.

४) कालमूलक अज्ञान : लहानशा कालखंडात, लहानशा क्षेत्रात लहानसे अल्पकालीन जीवन म्हणजेच आमचा आरंभ, मध्य, शेवट असे आम्ही मानतो. कालाच्या अनंत पसाऱ्यात आम्ही नित्य साकार होत राहतो, ही गोष्ट आम्ही विसरलो आहोत. शाश्वत काल टिकणारा असा आमचा जो आत्मा त्याचे ज्ञान आम्हाला नाहीसे झाले आहे हे चौथे कालमूलक अज्ञान होय.

५) आत्माविषयक अज्ञान, मनोमूलक अज्ञान : आमचे पृष्ठवर्ती साकार अस्तित्व आणि त्याचे प्रकटपणे मनोयुक्त असलेले थोडेसे अनुभव हेच आमचे सर्व अस्तित्व आहे असे आम्ही मानतो; आमचे अल्पकालीन साकार अस्तित्व पृष्ठवर्ती अस्तित्वाहून फार व्यापक आहे हे ही आम्ही जाणत नाही; पृष्ठवर्ती अस्तित्वाच्या सर्व बाजूंना लांबवर आमचे अस्तित्व पसरले आहे, त्याच्या आतही आमचे अस्तित्व आहे, त्याच्या वरही आमचे अस्तित्व आहे, परिचेतन अस्तित्व, आंतरचेतन आणि अवचेतन अस्तित्व, उपरिचेतन किंवा अतिचेतन अस्तित्व असे चतुर्विध अस्तित्व पृष्ठवर्ती अस्तित्वाची पूर्णता करणारे आहे, पण ते आम्ही विसरलो आहो - हे आमचे पाचवे आत्मविषयक अज्ञान, याला मनोमूलक अज्ञान असे म्हणता येईल, कारण पृष्ठवर्ती मनावर सर्व लक्ष केंद्रित केल्याने हे अज्ञान निर्माण होते.

६) रचनाविषयक अज्ञान : आमचे शरीर, प्राण, मन यांची रचना गुप्त चैतन्याने स्वत:च्या 'घटक-द्रव्यातून' केली आहे, ते नित्य या त्रयीच्या आत उपस्थित आहे, या त्रयीच्या सर्व व्यापारांचे नियोजन, ते अप्रकट असता आपल्या सार्वभौम आधिकाराने करीत असते. ते क्रमश: प्रकट होऊन सार्वभौम रीतीने त्याचे सर्व व्यापार नियंत्रित करणार अशी योजना ठरलेली आहे, ही मन, प्राण, शरीर यांच्या वास्तव रचनेची गोष्ट आमच्या जाणिवेत नाही. या ज्ञानाच्या अभावी, आमचे सर्व अस्तित्व, किंवा आमच्या अस्तित्वाचे खरे तत्व मनच आहे, प्राणच आहे, जड शरीरच आहे, किंवा मन-प्राण, मन-शरीर किंवा मन-प्राण-शरीर हे आमचे सर्व अस्तित्व आहे अथवा अस्तित्वाचे खरे तत्त्व आहे असा आग्रह आम्ही धरीत असतो; हे आत्मविषयक अज्ञान रचनाविषयक अज्ञानाचे परिणामरूप आहे म्हणून याला रचनाविषयक अज्ञान असे म्हणता येईल.

७) व्यवहारविषयक अज्ञान : यानंतर शेवटले अज्ञान वर वर्णिलेली सहा अज्ञाने संयुक्तपणे ज्या परिणामाला जन्म देतात तो परिणाम हा उपनिर्दिष्ट षड्विध अज्ञानामुळे आणि जीवनाचे खरे ज्ञान आम्हाला उपलब्ध होत नसल्याने या जीवनावर खरी नियंत्रणा, खरी हुकमत आमची होऊ शकत नाही, आणि जीवनाचा खरा उपभोग आम्हाला घेता येत नाही, आमचे विचार, आमच्या इच्छा, आमच्या संवेदना, आमच्या क्रिया अज्ञानाने ग्रासलेल्या असतात, अर्थात् विश्वाच्या (विश्वातील वस्तूंच्या, जीवांच्या, घटनांच्या) संपर्काला प्रतिक्रिया म्हणून जे वर्तन किंवा कृती आम्हाकडून घडते, ती जवळजवळ प्रत्येक प्रसंगी चुकीची किंवा सदोष असते. प्रमाद आणि वासना, धडपड आणि अपयश, दु:ख आणि सुख, पाप आणि ठेंचा यांच्या गोंधळात दिङ्मूढ होऊन आम्ही भटकत असतो. सरळ मार्ग न सापडल्याने वाकड्या मार्गाचा आम्ही आश्रय करतो. आमचे अंतिम लक्ष्य नेहमी बदलत राहते, या बदलत्या अंतिमाकडे आंधळ्यासारखे चाचपडत चाचपडत आम्ही वाटचाल करीत असतो. षड्विध अज्ञानाच्या या परिमाणरूप अज्ञानाला व्यवहारविषयक अज्ञान असे म्हणता येईल.

आमचे प्रस्तुत जीवन याप्रमाणे अज्ञानरूप आहे, पण ज्ञानाच्या शोधात ते सदैव असते; पूर्ण ज्ञान याचा अर्थ सप्तविध, सप्तांगी आत्मविषयक अज्ञानाचा लय घडवून आणणारे आत्म्याचे सप्तविध सप्तांगी स्वयंप्रकटन, स्वयमाविष्करण हा आहे. सप्तविध अज्ञानामुळे आमची जाणीव आत्मविषयक सप्तविध ज्ञानाला पारखी झाली आहे. आंतरिक संशोधनाने या ज्ञानाचा शोध लावून, आमच्या जाणिवेत त्याचे आसन भक्कम करणे म्हणजे पूर्ण ज्ञान.

आता पूर्ण ज्ञानाचा तपशील पाहणे गरजेचे आहे. स्वयंभू, स्वयंपूर्ण आत्मा, केवलात्मा (ब्रह्म) सर्व वस्तुजाताचे मूळ आहे. आत्मा, चैतन्य हे मूळ अस्तित्व (मूळ पुरुष) आणि विश्व हे या मूळ अस्तित्वाचे साकार होणे आहे. निराकार पुरुषाने नामरूपे धारण करणे हे विश्वाचे स्वरूप आहे. आमच्या खऱ्या आत्म्याच्या जाणिवेत विश्व आणि आम्ही व्यक्ती एकरूप असतो. विश्वापासून आम्ही वेगळे आहो हा भ्रम आहे. विभक्तपणाची कल्पना, अहम्‌चा संसार हा या भ्रमाच्या मुळाशी आहे. हा आत्मा कालदृष्ट्या अमर, शाश्वत काल टिकणारा आहे. आमच्या पृष्ठगत अस्तित्वाला जोडून, त्याच्या पाठीमागे महान आंतर अस्तित्व असते. आमचे मन-प्राण-शरीर एवढेच आमचे अस्तित्व असते. मनाच्या पाठीमागे आमचा खरा आत्मा आहे, तो या त्रयीचा स्वामी आहे. आमच्या मन, प्राण, शरीर या त्रयीच्या वरती आमचे अतिचेतन आत्मिक, अतिमानसिक अस्तित्व आहे. पूर्ण ज्ञानाची ही सहा अंगे झाली. आता सातवे अंग जे या सहा अंगांचा परिणाम म्हणून प्रकट होते

ते. आमचे विचार, इच्छा, कृती यांचा खरा मेळ कसा साधावयाचा त्याचे ज्ञान होय. या ज्ञानाने आमचा स्वभाव, आमची प्रकृति (मन-शरीर-प्राण) समूळ बदलते; ती पूर्ण जाणिवेने चैतन्याचे, आत्म्याचे, ईश्वराचे, पूर्ण अध्यात्मिक सत्याचे, सद्वस्तूचे, ब्रह्माचे अविष्कारसाधन बनते, त्याचे ज्ञानयुक्त अभिव्यक्तीसाधन होऊन काम करू लागते.

पण हे सप्तविध ज्ञान (पूर्ण ज्ञान) काही बौद्धिक वस्तू नव्हे. आमची जाणीव आहे तशीच राहून या जाणिवेच्या प्रस्तुतच्या साच्यात आम्ही राहून काही पूर्ण ज्ञान आम्हाला शिकता येणार नाही. ती काही बुद्धीने शिकावयाची वस्तू नाही, आमच्या जाणिवेत बदल होणे, आमच्या अस्तित्वातच बदल होणे, आमच्या अस्तित्वाने, आमच्या जाणिवेने श्रेष्ठरूप धारण करणे हा पूर्ण ज्ञानाचा, त्याच्या विविध अंगांची प्राप्ती झाल्याचा अर्थ आहे.

पूर्ण ज्ञान हे अनुभवात्मक आहे. उच्चतर उच्चतम अनुभव हे पूर्ण ज्ञानाचे स्वरूप आहे. आमचे वर्धिष्णु साकार अस्तित्व आणि जीवन क्रमविकासाच्या नियमाने वाढते, बदलते, उच्चतर होत जाते; आमचे मानसिक अज्ञान हे या क्रमविकासाच्या टप्प्यांतील एक टप्पा आहे. आमच्या अस्तित्वाचा, आमच्या प्रकृतीचा क्रमशः विकास होऊनच आम्हाला पूर्ण ज्ञान प्राप्त होऊ शकते. आमच्या अस्तित्वाचे, जाणिवेचे क्रमविकासाच्या नियमानुसार आतापर्यंत, मनाच्या टप्प्याला येईपर्यंत जसे परिवर्तन, रूपांतर होत गेले तसेच परिवर्तन, रूपांतर पुढे पुढे होत आम्ही पूर्ण ज्ञानयुक्त होणार आहो. आतापर्यंत आमचा विकास आम्ही करीत नव्हतो, चेतना, जाणीव उदयास येण्याच्यापूर्वी निसर्ग (निसर्गातील गुप्त आत्मा) विकासाचा कार्यक्रम कालाच्या मंद गतीने चालवीत होता, आता विकासाचा कार्यक्रम आम्ही ठरवावयाचा आहे. आमच्या विकासाच्या पायऱ्या आम्हीच ठरवावयाच्या आहेत. जाणीव पुरःस्सर आमच्या जाणिवेत व जीवनांत बदल करीत करीत, आमचे ज्ञान (पूर्ण ज्ञान) आम्हाला क्रमशः वाढवीत जावयाचे आहे.

ज्ञान, अज्ञान यांचा विचार करताना श्रीअरविंदांना अभिप्रेत असलेला ज्ञान आणि अज्ञानाचा अर्थ साक्षेपाने विचारात घेणे योग्य होईल. श्रीअरविंदांच्या 'दिव्य जीवन' ग्रंथाचा अभ्यास करताना हा अर्थ स्पष्ट होतो.

अज्ञान म्हणजे ज्ञानाला मर्यादित करणे. ज्ञान मर्यादित होणे हे अज्ञानाचे मूळ आहे. पूर्ण सत्यात (ब्रह्मात) पूर्ण ज्ञान अंतर्भूत असते. केवळ मनाच्या खटपटीने पूर्ण ज्ञान सापडतच नाही. ते आत्म्याच्या आध्यात्मिक प्रयत्नाला, प्रयत्नशील आत्म्याला स्वतः होऊन दर्शन देते. आध्यात्मिक पूर्ण जाणीव ही अस्तित्वाच्या सर्व अंगाच्या ज्ञानाने भरलेली असते. अचेतनतेतून आमच्या क्रमविकासाला आरंभ होतो. अचेतनतेत गुप्त असलेली जाणीव ही ज्ञानवस्तु प्रकट करते. अहंता आणि विश्वता, अज्ञान आणि ज्ञान दोन्ही अवस्था ओलांडून पार गेल्याशिवाय केवळ अचेतनतेची जाणीव लाभत नाही. आध्यात्मिक दृष्टीने किंवा स्थल काल दृष्टीने जवळ, दूर जे जे आहे ते ब्रह्मच आहे, मूळ अस्तित्व तेच आहे, नामरूपात्मक अस्तित्व तेच आहे, शुद्ध शान्त, अलक्षण, अक्रिय तत्त्व ते आहे, तसेच विश्व आणि विश्वातील वस्तू यांची यथोचित निर्मिती व व्यवस्था करणारा द्रष्टा आणि विचारकर्ता तेच आहे. आंतर आत्मा आणि त्याचे निवासस्थान दोन्ही एकमेव ब्रह्मच झाले आहे. आमचे ज्ञान काय अज्ञान काय हे सर्व त्या अज्ञेय अव्यक्ताचेच विविध असे प्रकट स्वरूप आहे. पूर्ण ब्रह्मात, पूर्ण सत्यात पूर्ण ज्ञान अंतर्भूत असते. अज्ञान हे ज्ञानाचाच अर्धवट झाकलेला भाग आहे.


संदर्भ : दिव्य जीवन खंड दुसरा भाग दुसरा प्रकरण १५ ब्रह्म आणि पूर्ण ज्ञान.

- डॉ. उषा संजय रोटिथोर

४२, नित्यानंद सोसायटी, धनकवडी पुणे ४११०४३

फोन - ०२०/२४३७८१५४

■ ■ ■



व्यक्तीची नियती

सौ. माधुरी अ. आचार्य

बी. कॉम.

श्रीअरविंदो यांच्या साधक-अभ्यासक/ श्रीअरविंदो सेंटर, पुणे यांच्या कार्यकर्त्या

सर्व प्रकारच्या अस्तित्वाचे व जीवनाचे सारतत्त्व नि:संदेह सत्य, सर्वव्यापी सद्वस्तु ब्रह्म हे आहे. ही सद्वस्तु एक आहे. या सद्वस्तुने स्वत: घेतलेली रूपे अनंत प्रकारे भिन्न भिन्न आहेत.

ही जी शुद्ध एकतेची सद्वस्तु ब्रह्म, ती सर्व भेदांचे मूळ आहे. त्यांचा आधार आहे, त्यांचे पुन्हा परत एक होण्याचे स्थान आहे. या ब्रह्माविषयी एक विधान अस्ति अर्थी व दुसरे नास्ति अर्थी, अशी एकमेकांना काट देणारी विधाने करण्यात येतात. ब्रह्म ही एकच एक वस्तु अस्तिपक्षी आहे. ब्रह्माखेरीज ब्रह्माच्या जोडीला दुसरे अस्तित्व काहीही नाही. या एकतेचे स्वाभाविक स्वरूप व्याख्यातित आहे. या सद्वस्तूचे स्वरूप 'अलक्षणम्' लक्षण करता येत नाही, व्याख्या करता येत नाही असे आहे. ते ब्रह्म आम्ही स्वत: आहोत. मानसिक जाणिवेला ते अज्ञेय आहे. अस्तित्वाचे अनेक धर्म, अस्तित्वाच्या अनेक अवस्था, जाणिवेचे अनेक आकार, प्रकार कार्यशक्तीचे अनेक क्रिया कलाप यांच्याद्वारा ते आम्हाला अप्रत्यक्ष दर्शन देते.

ही सद्वस्तूच्या अज्ञेयत्वाची, मनाच्या ग्रहणशक्तीच्या पलिकडे असण्याची वस्तुस्थिती 'असत्, शुद्ध अस्तित्वापलिकडे असणारे असत्' या शब्दाने वर्णिलेले आहे. ही असत्ची कल्पना तत्वत: वेदांतातील आहे. सत् आणि असत् एकाच अज्ञेयाची एकाच क्षणीच्या दोन अवस्था दाखविणारी नावे आहेत.

सत् असत् यांच्या समन्वयाप्रमाणे एक आणि अनेक यांचाही समन्वय स्वयंसिद्ध आहे. ब्रह्म एक आहे आणि ब्रह्म सर्व (अनेक) आहे.

एकाचे एकतेचे ज्ञान म्हणजे विद्या, विद्येने ईश्वराची ओळख होते. विद्या नाही आणि नुसती 'अविद्या' म्हणजे मर्यादित अनेकदर्शी जाणीव आहे, असे असेल तर ही अविद्या अंधाराने भरलेली रात्र, अज्ञानाचा व्यवस्थाशून्य पसारा असल्याचे प्रत्ययास येईल. परंतु उलटपक्षी अविद्येचे अज्ञानाचे क्षेत्र आपण धिक्कारले, अविद्या ही वस्तू नाहीच, असली तर केवळ भ्रमरूप आहे असे म्हणून तिला बाजूला ढकलून दिले आणि विद्या मात्र जवळ केली तर ती विद्या एक प्रकारचा अंधारच होऊन बसेल. तिच्यामुळे मानव अपूर्ण होईल. विद्या हा प्रकाश खरा, पण प्रकाशातिशयाने माणसे आंधळी आंधळ्यासारखी होतात. त्याप्रमाणे नुसत्या विद्येने आपण आंधळे होऊ. ज्या क्षेत्रावर आम्हास राहावयाचे आहे, काम करावयाचे आहे, ते क्षेत्र विद्येने प्रकाशित केलेले असून विद्येच्या प्रकाशातिशयात आम्हांस दिसू शकणार नाही.

'एकत्व ही मूळ सद्वस्तु आहे, म्हणून अनेकत्व हा आभास आहे. केवलत्व हे सत् अस्तित्व आहे, म्हणून अ-केवलत्व सापेक्षत्व हे असत् अनास्तित्व आहे,' हे एकांगी तर्काने केलेले भेद आपण बाजूला ठेवणेच योग्य होईल.

ब्रह्म सत्य व जग मिथ्या ही अध्यात्मनिष्ठ मनाची आग्रही मांडणी व जडतत्व एकमेव सत्य आहे ही भौतिकनिष्ठ मनाची तितकीच आग्रही मांडणी या दोन्हीत सत्य मुळीच नाही, असे नाही. सत्य आहे पण ते विकृत रूपात मांडले आहे. ब्रह्माने आकार धारण केला, आपले अस्तित्व भौतिक द्रव्याच्या द्वारा व्यक्त केले ते कशाकरिता?

या प्रश्नाचे उत्तर एवढेच संभवते की, मर्यादित स्थूल जाणिवेच्या मूर्तीत आपले अस्तित्व, स्वत्व घालून या आत्मप्रकटनाचा जो काय आनंद असेल तो भोगावा. ब्रह्म या जगात आहे ते जीवनाच्या मूल्यांच्या द्वारा आपले स्वत्व व्यक्त करण्याकरता आहे. ब्रह्माच्या पोटात जीवन उदयास येते ते स्वत:च्या पोटी ब्रह्माचा शोध लावून अनुभव घेण्यासाठी उदयास येते.

या जगात मनुष्याचे विशेष महत्व आहे. ते अशाकरता की तो जगाला त्याच्या जाणिवेच्या विकासाच्याद्वारा पूर्ण आत्मसाक्षात्कार मिळवून देतो आणि या साक्षात्काराच्या प्रभावाने जगाला स्वत:चे स्वरूप आमूलाग्र बदलणे शक्य होते. मनुष्याचे मनुष्यत्व मानवाची मानवता खरी याच गोष्टीत आहे की त्याने जीवनात ईश्वराला कृतार्थ करावे. ईश्वरी जीवन दिव्य जीवन हे मानवाचे अंतिम ध्येय आहे. पशु जीवन पाशवी प्रवृत्ति-पसारा हा मानवी जीवनाचा केवळ आरंभ आहे.

To fulfil God in life is man's Manhood.

विचार क्षेत्राप्रमाणेच जीवनक्षेत्रातही आत्म्याचे आविष्करण करायचे तर त्याला एक नियम आहे. तो नियम म्हणजे जीवनाने वा विचाराने क्रमाक्रमाने नवे नवे क्षेत्र घ्यावयाचे पण जुने क्षेत्र सोडावयाचे नाही. आमच्या विचारशील मनाचे व क्रियाशील जीवनाचे उदात्तीकरण व अध्यात्मीकरण करताना जुने सांभाळून क्रमाने नवे मिळविणे हा नियम विसरता कामा नये. स्थूल भौतिक जीवन हा आमचा पाया आहे. या जीवनाला आम्ही केव्हाही टाकता कामा नये. क्षुद्र लेखता कामा नये.

कोणतेही खालच्या पायरीवरील जीवन, वरच्या पायरीवरील जीवनाने त्याच्या श्रेष्ठ प्रकाशाने बदलून घेणे, यात ईश्वरी प्रकृतीचे खरे

कार्य आहे. यात स्वाभाविक ईश्वरी जीवन, दिव्य जीवन साधण्याचा साधना मार्ग आहे.

(कोणतेही खालच्या पायरीवरील जीवन टाकून देण्यात, त्याच्यावर चढूनही पूर्वी ते होते तसेच राहू देण्यात काहीच दिव्यता नाही. दिव्य ईश्वरी स्वभावधर्माचा मुळीच अविष्कार नाही.) त्यात ब्रह्म हे पूर्ण आहे. एकाचवेळी अनेक ज्ञानभूमिका (जाणिवेच्या अवस्था) त्यात एकीभूत असतात, एकतेने अविरोधाने असतात. हा ब्रह्माचा स्वभाव आम्हाला आमच्या जीवनात प्रकट करावयाचा तर आम्हीही त्याच्याप्रमाणे पूर्ण समावेशक व्हावयास हवे.

जाणिवेचे सर्वसाधारण तीन प्रकार आहेत; व्यक्ति जाणीव, विश्व जाणीव, विश्वातीत जाणीव या तीन जाणिवांचे व्यक्तीच्या ठिकाणी जे अन्योन्यविषयक नाते असेल त्या नात्यावरून वैयक्तिक जीवनाची गाठ व गुंतागुंत आणि तिचे स्वरूप निश्चित होते.

व्यक्ति आपल्या स्वत:ला इतर सर्व व्यक्तिहून वेगळी चीज समजते. आपला समावेश इतर भिन्न व्यक्तीबरोबर विश्वात होतो आणि विश्व व स्वत: आपण असे दोघेही, दोघाहून पलिकडे असणारे जे तत्व त्यावर अवलंबून आहोत असे मानते. हे जे विश्वातीत तत्व त्याला सामान्यत: ईश्वर हे नाव देतात. या व्यक्तीच्या कल्पनेला हा ईश्वर विश्वाच्या वरचा पण विश्वाला जोडलेला वाटण्यापेक्षा, विश्वाहून अगदी वेगळा, विश्वाशी संबंध नसलेला वाटतो. याप्रमाणे व्यक्ति व विश्व दोघांनाही या व्यक्तीच्या कल्पनेत क्षुद्रस्थान मिळते आणि याप्रकारे विश्वातीत ईश्वर, विश्व व व्यक्ती यांचा नसता भेद मनात भरला म्हणजे ईश्वराची प्राप्ति म्हणजे व्यक्ति व विश्व यांचा संबंध तोडणे – व्यक्ति व विश्व स्वत: पुरते नाहीसे करणे अशी सर्व सामान्य व्यक्तीची तर्कशुद्ध दृष्टी बनते.

मानसिक आणि आध्यात्मिक जीवनाच्या सिद्धीसाठी ज्याप्रमाणे स्थूल भौतिक शरीर जीवन टाकावे लागत नाही त्याप्रमाणे विश्व जाणीव आपली करण्यासाठी किंवा केल्यावर तसेच विश्वातीत जाणीव मिळविण्यासाठी किंवा मिळविल्यावर वैयक्तिक क्रियाकर्मे आम्ही टाकली पाहिजेत असे समजण्याचे कारण नाही.

आमचे वैयक्तिक व्यवहार आणि वरील दोन ज्ञानभूमिका यामध्ये विरोध किंवा विसंवाद जेथे नाही अशी दृष्टी म्हणजे ब्रह्माच्या एकत्त्वाची पूर्ण दृष्टी आम्हाला लाभू शकते. विश्वातीत, विश्वाधिशायी ब्रह्म, विश्वाला सर्वांगाने सर्वांगी समालिंगन देऊन आहे. विश्वाशी एकरूप आहे, व्यक्तीला सर्वथा अविभाज्य निजांग म्हणून बाळगून आहे. व्यक्तीला ते अंगाबाहेर टाकीत नाही. व्यक्ति ही पूर्ण विश्वजाणिवेचे केंद्र आहे, आणि विश्व हे अशरीर अलक्षण अशा ब्रह्माने स्वत:साठी निर्मिलेले आणि स्वत: अंतर्बाह्य पूर्णतया व्यापलेले, असे त्याचे सलक्षण शरीर आहे.

ब्रह्माचे, विश्वाचे आणि व्यक्तीचे परस्पर नाते नेहमी हेच असते. आमच्या अज्ञानाने हे खरे नाते आमच्यापासून लपलेले राहते.

आम्हाला ज्ञान झाले, वस्तुविषयक योग्य जाणीव आम्हाला लाभली म्हणजे हे ब्रह्म विश्व व्यक्तीचे शाश्वत नाते तत्त्वत: अणुभरही बदलत नाही. एवढेच होते की, वैयक्तिक केंद्रातून जे पूर्वी घडत होते ते आतले आणि बाहेरचे दर्शन, तत्त्वात व तपशीलात पार बदलून जाते आणि त्याचा परिणाम म्हणून व्यक्तीच्या व्यवहाराचा आत्मा, आशय व त्याचा परिपाकदेखील पार बदलून जातो. विश्वात आपले कार्य करण्याचे साधन म्हणून विश्वातीत ब्रह्माला ज्ञान झालेल्या व्यक्तीची पूर्वी इतकीच आवश्यकता असते. व्यक्तीला ज्ञान झाले म्हणजे तिला ब्रह्माचे कार्य करता येणे अशक्य होते असेही नाही. उलटपक्षी व्यक्तीमध्ये नेहमीच असलेल्या विश्वातीत ब्रह्माचा तिला साक्षात्कार होणे, तिला तिच्या अंतर्यामी जाणीव पूर्वक ब्रह्माचा सहयोग लाभणे हेच एक विश्व पुरुष, समष्टीपुरुष आत्मसाक्षात्कारी होण्याचे साधन असल्याने, विश्वाच्या खेळात ही एक अनिवार्य आवश्यकता आहे की, 'आत्मज्ञान लाभलेल्या व्यक्तीने विश्वाच्या कार्यात पूर्वी प्रमाणे अखंडपणे भाग घेत रहावे.'

आत्मज्ञान झाले की, त्या आत्मज्ञानी व्यक्तीला संसारातून बाहेर गेले पाहिजे, विश्वकार्यात तिला स्थान नाही असा कठोर निरपवाद नियम असेल तर विश्व हे अज्ञान, मृत्यु, दु:ख यांनी गांजलेल्या व यातून सुटकेची आशा नसलेल्या अनंत जीवांचे शाश्वत प्रदर्शन म्हणून रहावे, असा त्याला शाप मिळाला आहे असे मानावे लागेल, आणि असे विश्व एकतर क्रूरपणे सत्त्वपरीक्षा करणारे दिव्य तरी असले पाहिजे किंवा गतिमान असणारे अचेतन भ्रमचित्र असले पाहिजे.

संन्यासपर तत्त्वज्ञान विश्वाविषयी भ्रम किंवा मिथ्या अस्तित्व अशीच कल्पना करण्याकडे झुकते. पण विश्व स्वत: भ्रम असेल, विश्वातील अस्तित्व मिथ्या असेल, तर व्यक्तीचा मोक्ष या भावनेला काहीच खरा अर्थ राहणार नाही. अद्वैतदर्शनात व्यक्तीचा आत्मा ब्रह्माशी एकरूप असतो. ब्रह्मापासून आपण वेगळे आहोत ही त्याची भावना अज्ञानजन्य असते. या भेदभावनेपासून मुक्त होणे आणि ब्रह्माशी स्वत:चा अभेद ओळखणे हाच व्यक्तीचा मोक्ष असतो. या भेदभावनेपासून मुक्त होण्याच्या या व्यवहारात लाभ कोणाला होतो ?

अर्थात ब्रह्माला काही लाभ होत नाही कारण ब्रह्म हे सदासर्वदा मुक्त, स्थिर, शांत, शुद्ध असते.

विश्वाला काही लाभ होत नाही कारण कोणतीही व्यक्ति विश्व भ्रमापासून मुक्त झाल्याने विश्वभ्रमरूप विश्व काही मुक्त होत नाही. ते बंधनात असते तसेच नेहमी बंधनात राहते.

व्यक्तीला मात्र लाभ होतो. व्यक्तीचा आत्मा भेदातून आणि भेदाच्या दु:खातून सुटून खाली ज्या भूमिका आहेत त्या सर्वांची एकता अनुभवतो. विश्वातीताशी तो एकरूप झाला की, विश्वाच्या अनेकतेशी तो एकरूप होतोच होतो. आणि ही मुक्त आत्म्याची विश्वातील अनेक आत्म्यांशी जी एकरूपता होते, ती फलत: या अनेकांच्या मुक्तीला कारणीभूत होते. प्राणमय आत्मा, पाशवी आत्मा देहनिष्ठ असतो व आपल्यासारखे दुसरे देह निर्माण करतो, त्याप्रमाणे ब्रह्ममय, ब्रह्मनिष्ठ आत्मा आपल्या सारखे दुसरे ब्रह्ममय मुक्त आत्मे निर्माण करतो.

वस्तुस्थिती अशी आहे की, विश्वातील विस्तृत क्षेत्रातून स्वत:ला पुसून न टाकताही 'असत्‌ची' सर्वश्रेष्ठ निर्वाणावस्था आत्मसात् करता येते. ब्रह्म हे अंतरात एकटे एक पूर्ण स्वतंत्र व बाहेर साकार अनेकरूप असे एकाचवेळी असते. व्यक्ततेपासून वेगळे राहणे आणि व्यक्ततेचा आश्रय करणे या दोन्ही गोष्टी ब्रह्म एकाचवेळी करते. अंतर्यामी निराकार एकता, बाहेर साकार अनेकता या दोन बाजू ब्रह्म नेहमीच सांभाळते.

आपणही ब्रह्म आहोत, म्हणून ब्रह्माची ही दिव्य आत्मसत्ता आम्हाला लाभू शकते.

मुक्तीसाठी खालच्या पायरीवरून वरच्या पायरीवर असे चढत जावे लागते. असे करताना केवळ मुक्तीच्या मागे लागून चढून आलेल्या खालच्या पायऱ्यांचा संबंध तोडून टाकीत गेले तर या नकारपथाने जीव शेवटी ईश्वराने आपले म्हटलेल्या विश्वाचा त्याग करतो. ईश्वराने ज्या गोष्टींचा समन्वय केला आहे, ज्या गोष्टी एकत्र एकमेकींच्या पूरक म्हणून काम करतात, आणि अनेकतानिष्ठ एकता तीन क्षेत्रात – अधोमानसिक जाणीव, मानसिक जाणीव, अतिमानसिक जाणीव या तीन क्षेत्रात किंवा अवस्थांत ब्रह्माने प्रतिष्ठित केलेली आहे.

वस्तुत: 'विश्व मी' हा एकच खरा 'मी' असता या 'विश्व मी' चे व्यक्तिगत अहंकाराने विभाग पाडल्याने आमची अपूर्ण व्यक्तीत निर्माण झाली आहे. पण अहं काही नेहमी व्यक्तीच्या व्यक्तित्त्वाच्या चौकटीत बंदिस्त राहत नाही.

'व्यक्ति – मी' या जाणिवेच्या पलिकडे तो जाऊ शकतो. अतिमानसिक जाणिवेची अवस्था त्याला लाभू शकते. ही अवस्था त्याला लाभली म्हणजे पूर्वी त्याच्याबाहेर म्हणून दिसणाऱ्या गोष्टी त्याला त्याच्या आत दिसू लागतात. त्याचा क्षुद्र अभिमान गळून जातो. सर्व विश्व एक आहे ही जाणीव त्याला होते. विश्वातील ब्रह्मात तो प्रविष्ट होतो आणि हे अनेकरूपी एकता भरलेले विश्व त्या विश्वातीताचे व्यक्त स्वरूप आहे हे त्याला कळते.

ईश्वराला वैयक्तिक आत्म्याच्या मुक्तीची सर्व प्रथम आवश्यकता असते. अनेक रूपात स्वत:ची पूर्णतया अभिव्यक्ती करण्याची ईश्वराची इच्छा आहे. या अभिव्यक्तीचा आरंभ व्यक्तीच्या मुक्तीपासून होतो. ही मुक्ति, हा एक प्रकाशबिंदू आहे. जेथून ईश्वराच्या मनातील स्वरूप प्रकाशनाला विश्वगत अनेकांच्याद्वारा करावयाच्या नियोजित पूर्णस्वरूप प्रकाशनाला आरंभ होतो. मुक्त आत्मा आपल्या पातळीत, आपल्या पातळीच्यावर आणि वस्तू आहे ते बंधनातीत आहे. स्वत:च्या एकतेचे बंधन त्याला नाही, स्वत:च्या अनेकतेचे बंधन त्याला नाही.

'कोणी बद्ध नाही, कोणी मुक्त होत नाही, कोणी मुमुक्षु नाही' कारण ते केवलपूर्ण, स्वतंत्र ब्रह्म सदासर्वदा पूर्ण स्वतंत्र असते, पूर्ण मुक्त असते. ते इतके स्वतंत्र आहे की, ते आपल्या स्वतंत्रतेनेही बांधलेले नाही. ते बंधनात असल्याचा खेळ खऱ्या बंधनात पडल्यावाचून खेळू शकते.

अहं किंवा मी हे एक बंधन या ब्रह्माने काही कालाकरिता अवस्थांतराचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एक युक्ति म्हणून निर्माण केले आहे. आपल्या खेळासाठी निर्माण केलेल्या वैयक्तिक ब्रह्माचे ठिकाणी विश्वब्रह्म आणि विश्वातीत ब्रह्म पुनरपि भरण्यासाठी अहम्‌ची योजना आहे. ब्रह्म हे विश्वातीत विश्वरूप असून व्यक्तीचे रूप घेते.

या व्यक्तीच्या अहंपूर्ण रूपात आपले विश्वातीततत्त्व व विश्वरूपतत्त्व घालून आपले व्यक्तिरूपी व्यक्तरूप पूर्ण करणे हा अहंचे बंधन पत्करण्यातील बंधनातीत ब्रह्माचा उद्देश आहे.

विश्वातीत, विश्वाधिशायी ब्रह्म हे स्वत: पूर्ण स्वतंत्र, सर्वसंबंधनिरपेक्ष, कालातीत, स्थलातीत आणि सान्त अनंत या मनोनिर्मित विरोधी कल्पनेच्या अतीत असे आहे. परंतु विश्वामध्ये ते साकार होण्यासाठी आपली स्वतंत्रता अर्थात् आपली माया उपयोगात आणून आपली अशी एक अविष्कार योजना तयार करते की, तिच्यात एकता आणि अनेकता शांती आणि समाधान मिळते, पण विश्व भ्रमरूप म्हटल्यावर मुक्त होतो. तो जीवात्मा व्यक्तीचा आत्मा खरा नसतोच मुळी, भ्रमरूप असतो. त्याचा बंध हाही भ्रमरूप, खरे अस्तित्व नसणारा हा खोटा बंध ज्या विश्वात त्याला बद्ध करतो ते विश्वहि भ्रमरूप, अस्तित्वशून्य, आणि खोट्या आत्म्याने खोट्या बंधनातून मुक्ति मिळविणे, हे त्या खोट्या आत्म्याचे परमश्रेय, परमश्रेष्ठ हित आणि या श्रेयासाठी त्या खोट्या आत्म्याने धडपड करावी हे त्याचे आध्यात्मिक कर्तव्य.

ज्ञानाचा शेवटला सिद्धांत असा आहे, 'कोणी बद्ध नाही, कोणी मुक्त होत नाही, कोणी मुमुक्षु नाही' याप्रमाणे विद्या ही अविद्येसारखीच मायाघटित घटनांत अंतर्भूत होते. आम्ही मुक्ति म्हणून जी मिळवितो त्या मुक्तीत ही माया आम्हास गाठते आणि हसून आमच्या 'जितंमया' म्हणणाऱ्या तर्कशास्त्राकडे बोट दाखविते.


मायावादानुसार, माझ्याखेरीज इतर जीवात्मे (माझ्याशी वस्तुत: एकरूप असलेले जीवात्मे) बंधनात सोडून माझे बंधनातून मुक्त होणे मी खरे मानतो.

विश्व आणि ब्रह्म किंवा आत्मा या दोहामध्ये अनिवार्य विरोध नाही. जे व्यक्त झाले आहे ते ब्रह्म एकमेव अद्वितीय आहे. त्याच्या व्यक्तिकरणात अनेकता, अनेकमुखता त्याने अंगिकारली आहे. जे ज्ञानमय सत् मूळ गूढ ठेवण्याची व्यवस्था केली आहे, त्या गोष्टी आम्ही एकमेकांपासून अलग का कराव्या ?

ईश्वर पूर्णपणे आपलासा करून घेणे असेल तर ईश्वराप्रमाणे आपण पूर्ण व्हावयास हवे. आम्ही अहंच्या आश्रयाने जे आत्मप्रकटन करतो त्यात मृत्यु आणि दु:ख यांचे साम्राज्य आहे, अहम्‌ची योजना तात्पुरती असते. जडाकडून ब्रह्माकडे अहम्‌मधून जावयाचे असते. अहम्‌चा अहंकारी आत्माविष्कार सुटून त्याची अध्यात्मिक प्रगती व्हावयाची ती अनेकतेच्या, अविद्यादृष्ट अनेकांच्या जीवनाशी क्रमश: संबंध येत राहण्याने होत असते. सर्वातीत, अजन्मा, निराकार ब्रह्मपुरुष आम्ही आपलासा केला म्हणजे खालच्या पातळीवरील जन्ममृत्यूपासून आम्ही मुक्ति मिळवितो. आणि ब्रह्माप्रमाणे स्वेच्छेने जन्म किंवा साकारता धारण केल्याने मृत्यूच्या प्रांतात आम्ही अमृत आनंद आणतो, व मानवतेत, मानवाच्या विश्वात या अमर आनंदाचा जाणीवपूर्वक आविष्कार करणारी प्रकाशमय केंद्रस्थाने होण्याचे भाग्य आम्हास लाभते. ('दिव्य जीवन' प्रकरण पाचवेच्या आधारे)

– माधुरी अरूण आचार्य,
एफ – १, 'गंगातीर्थ', टांगेवाला सोसायटी,
सहकारनगर नं. १, पुणे ४११००९
फोन – २४२१७०५३. मोबाईल – ९७६४५४२३९५

■ ■ ■



मानवातील दोन आत्मे

श्री. अरूण सदाशिव आचार्य

B.E. / सध्या मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी
श्रीअरविंदो यांचे साधक-अभ्यासक / पुणे सेंटरशी संबंधित

सच्चिदानंदाचे सच्चिदानंदत्व झाकणारे विश्व हे त्याचेच रूप आहे. विश्वनिर्मिती करणारे जे दिव्यतत्त्व, जो दिव्यपुरुष त्याची चार अंगे आहेत. अस्तित्व, जाणीवयुक्त शक्ति, आनंद आणि अतिमानस, सत्-चित्-तपस्, आनंद आणि अतिमानस अशी ती मूळ चार तत्त्वे आहेत.

- सत् (अस्तित्व) मधून जडतत्व (शरीर)
- चित् - तपस् मधून प्राण
- आनंद मधून आत्मा
- विज्ञान (अतिमानस) मधून मन

अशी चार तत्त्वे अवतरणांत अपरार्धात आली आहेत. परमात्म्याच्या अस्तित्वाची सत्, चित्, आनंद व विज्ञान ही अंगे आणि जीवात्म्याची शरीर, प्राण, आत्मा व मन यांचा अन्योन्य संबंध लक्षात घेता, आमचे जीवन (अस्तित्व) परमात्म्याच्या अस्तित्वाचे एक प्रकारचे परावर्तित स्वरूप आहे. जड तत्त्व, प्राण, मन आणि आत्मा ही आमच्या दिव्य अस्तित्वाची उपांगे आहेत. या प्रत्येक उपांगाची दोन प्रकारची रूपे अस्तित्वात असतात. बाह्य जडशरीर व आंतर सूक्ष्म शरीर, बाह्यप्राण व आंतरप्राण, बाह्यमन व आंतरमन आणि बाह्य किंवा वासनात्मा आणि आंतर किंवा खरा आत्मा (चैत्यपुरुष) अशी व्यवस्था असते. याठिकाणी आम्ही आमच्या दोन आत्म्यांचा विचार करणार आहोत. आमच्यामधील मूळ दिव्य आनंदाचे, प्रातिनिधिक उपांग जे आहे त्याला विशेष अर्थाने 'आत्मा' हे नाव आम्ही केव्हा केव्हा देतो. हा आत्मा एक आंतरिक तत्त्व आहे. आमच्यामध्ये वस्तुत: एक आत्मा नसून दोन आत्मे आहेत. बाह्य, स्थूल प्रकट आत्मा म्हणजे आमचा वासनात्मा आणि आंतर-खरा आत्मा किंवा चैत्यपुरुष हा अंतर्यामिन (Psychic being) असे दोन आत्मे असतात.

वासनात्मा, आमची जीवनाची भूक किंवा भुका, त्याच्या भावना त्याची सौंदर्यविषयक वृत्ती, सत्ता, ज्ञान, सुख यासाठी मनाची होणारी तळमळ या सर्व गोष्टी वासनामय आत्म्याचे विकार होत.

या बाह्य संलग्न आत्म्याच्या पाठीमागे आंतर, प्रच्छन्न चैतन्य पुरुष असतो. शुद्ध प्रकाशमय सामर्थ्य, प्रेम सात्विक आनंद व निर्मळ अति शुद्ध सत्तातत्त्व हे आंतरआत्म्याचे विशेष असतात. हा आत्मा साधनेद्वारा पुढे येणे याला 'पूर्ण योगाच्या संदर्भात अनन्यसाधारण महत्व आहे.' श्रीअरविंद लिहीतात, 'Psychic being coming to the front is a decisive step in sadhana of integral yoga.' आमचे बाह्य जड शरीर, प्राण, मन हे आमच्या आंतर अस्तित्वाशी तसेच विश्वरूप अस्तित्वाशी जोडलेले असते. आमच्या जीवनाची बाह्य रूपे ही आमच्या क्षुद्र अहंभावाच्या जीवनाची असतात. आंतर जीवनाचे व्यवहार आमच्या गुप्त अप्रकट अस्तित्वाचे व्यवहार असतात. या व्यवहारात आमचे व्यक्तित्व आमच्या विश्वरूपाशी सलग्न झालेले असते. आमचे उपरिस्थ बाह्य मन, प्राण, शरीर हे भाग विश्वव्यापक मन, प्राण, शरीर यापासून जाड भिंतींनी वेगळे ठेवलेले असतात. या जाड भिंतीतून निसर्गाला (विश्व व्यापक व्यवहाराला) आमच्यात प्रवेश करावयाचा म्हणजे फार कष्ट पडतात. आमचे आंतर, अधस्त व अप्रकट मन, शरीर, प्राण यांची गोष्ट निराळी असते. येथे जाड भिंती नसतात अगदी विरळ पडदे असतात. हे विरळ पडदे विश्व व्यवहाराचा आमच्यात प्रवेश करावयास मदत करतात. ही जशी मन, प्राण, शरीर यांची गोष्ट तसेच आमचा अंतस्थ, अप्रकट आत्मा (चैत्यपुरुष) ही विश्वात्म्याशी जोडलेला असल्याने त्या विश्वात्म्याच्या दिव्य सार्वत्रिक आनंदाचा भागीदार होऊ शकतो. हा विश्वात्म्याचा विश्वानंद उपरिस्थ बाह्य वासनात्मक आत्म्याला मिळू शकत नाही. कारण त्याच्यामध्ये आणि विश्वात्म्यामध्ये अहंभावाच्या जाड भिंती असतात.

वासनात्मा हे अंत:करणाचे विकृत रूप आहे. विश्वाचा स्पर्श या आत्म्याला झाला तर तो मूळ स्वरूपात न होता विकृत किंवा उलट स्वरूपात होतो. विश्वात व्यथा म्हणा व्याधि म्हणा ही आहे की, व्यक्तीला खरा आत्मा सापडत नाही.

आमचे अस्तित्व हे अधोमानसिक, मानसिक, अतिमानसिक या तीन क्षेत्रात आपला व्यवहार करते. आमचे पूर्ण अस्तित्व म्हणजे या तीनही क्षेत्रातील अस्तित्व होय. वास्तवात काहीही भेद वा विविधता असो, अतिमानसिक पुरुष हा विश्वाच्या आत्म्याशी एकरूप आहे. विशाल मानसिक जाणीव हे अप्रकट मनाचे स्वरूप आहे.

आमचा खरा आंतर आत्मा बाह्य स्थानी येऊन कार्य करू शकतो, आणि असे आमच्या आंतर खऱ्या आत्म्याचे बाह्य जीवनाशी नाते जोडले म्हणजे जेथे अहम्भावामुळे सुख आणि दु:ख अशी द्वंद्वात्मक प्रतिक्रिया उत्पन्न होते तेथे एकसारखी सर्वस्पर्शी व्यष्टि-समष्टि व्यापक, वैयक्तिक - अवैयक्तिक आनंदात्मक प्रतिक्रिया उत्पन्न होऊ शकते.

चैत्यपुरुष संबंधाने श्रीअरविंद विस्ताराने सांगतात ते असे -

अज्ञानमय मन प्राण-शरीरापलीकडे, यांच्या जाड पडद्याने झाकलेला असा आमच्यातील गुप्त खरा आत्मा हृदयाच्या खोल मंदिरात तेजाने तळपत असतो. ही ईश्वरापासून निघणारी एक ज्वाला असते, ज्योती असते, हा आत्मा नेहमी आमच्या हृदयाच्या हृदयात प्रकाश देत असतो, आमचा बाहेरचा प्राकृतिक भाग, आत्मविषयक गाढ नेणिवेने व्यापलेला असला, तरी या नित्यप्रकाशमय दिव्य ज्योतिरूप खऱ्या आत्म्याला त्या नेणिवेची बाधा होत नाही. ही आत्मज्योति या नेणिवेने विज्ञत नाही. ही ज्योती, अज्ञानाच्या क्षेत्रात तेजोमय रहिवासी असते आणि अज्ञानाला ज्ञानाचे औत्सुक्य उत्पन्न होईपर्यंत सारखी वाढत राहते. ही आत्मज्योति आमच्या सर्व अंतर्बाह्य कृतींची साक्षी, नियंत्रक, गुप्त मार्गदर्शक, साक्रेटिसाने डीमन् नाव दिलेला अंत:पुरुष, साक्षात्कारी पुरुषांना ज्ञात असलेला अंत:प्रकाश व अंत:शब्द होय. आमच्यामध्ये नित्य राहणारे असे हे तत्त्व आहे. मरणाचा स्पर्श या अंतरात्म्याला होत नाही, तो जन्मोजन्मी आमच्यामध्ये नित्य वसत असता, मलाचा किंवा क्षयाचाही त्याला डाग लागत नाही. हा अनश्वर असा दिव्य ज्योतिर्मय ईश्वरअंश आहे. हा विश्वरूप विश्वातीत आत्मा नसला, तरी त्याचा तो प्रतिनिधी आहे; निसर्गातील रूपांत कार्य करणारा असा त्याचा प्रतिनिधी, वैयक्तिक आत्मा, चैत्य पुरुष असे त्याचे स्थान आहे. मन-प्राण-शरीर यांना त्याचा आधार असतो; मनोमय, प्राणमय व सूक्ष्म भौतिक पुरुषांच्या पाठीमागे असणारा हा चैत्य पुरुष, त्यांच्यावर नजर ठेवीत असतो आणि त्यांच्या अनुभवाने आणि विकासाने आपले हित करून घेत असतो. मनोमयादि तीन पुरुष या चैत्य पुरुषांची अंगेच असतात. ही अंगे देखील पडद्याआड असतात. हे अप्रकट मनोमयादि पुरुष 'तात्पुरते पुरुष' (Temporary Personalities) असतात. आमचे बाह्य व्यक्तिमत्व या तात्पुरत्या पुरुषांचे बनलेले असते. या पुरुषांचे बाह्य संयुक्त कार्य आणि अस्तित्व याला आम्ही सामान्यत: आमचा 'आत्मा' म्हणतो. चैत्यपुरुष देखील असेच 'तात्पुरते पुरुष' पुढे करीत असतो. या पुरुषांत जन्माजन्मात बदल होतो, त्याची वाढ होते, त्याचा विकास होतो - हा प्रवासी चैत्यपुरुष, जन्म आणि मरण, मरण आणि जन्म असे मार्गावरचे टप्पे गाठतो व मागे टाकतो आणि आपला प्रवास सारखा करीत राहतो. निसर्ग त्याला जे मन आदि साधन पुरवितो, ते त्याच्या विविध प्रकारच्या व बदलणाऱ्या वस्त्राप्रमाणे असते. या चैत्यपुरुषांचे कार्य प्रथम प्रथम अप्रत्यक्ष असते, पडद्याआडून चालते, एकांगी असते; मनाच्या, प्राणाच्या व शरीराच्या द्वारा हे त्याचे कार्य होत असते; मन आदि निसर्गाचे भाग आपल्या स्वरूपाच्या आविष्काराची साधने म्हणून चैत्यपुरुषाला विकसित करावयाची असतात; या साधनांचा विकास नीट होईपर्यंत चैत्यपुरुष हा बंदीत पडल्या सारखा असतो; अज्ञानाच्या क्षेत्रात राहून, मनुष्याला त्या अज्ञानातून दिव्य जाणिवेच्या प्रकाशाकडे नेण्याचे काम त्याजकडे असते, अज्ञानक्षेत्रात जो जो अनुभव त्याला येतो, त्या त्या अनुभवाचे, एकंदर सर्व अनुभवांचे सत्त्व घेऊन त्या सत्त्वाने तो निसर्गाचे ठिकाणी आपल्या आत्मकेंद्राचे पोषण करतो; अनुभवांचा बाकीचा भाग, मन-प्राण शरीर या आपल्या साधनाची वाढ करण्यासाठी तो वापरतो; ईश्वरी तत्त्वाचे व कार्याचे प्रकाशमय साधन हे स्वरूप, या खटपटीने चैत्य पुरुष मन, प्राण, शरीर या त्रयीला आणून देतो.

गुप्त आत्मा, गुप्त अंत-पुरुष आपला प्रतिनिधी पुढे करतो व त्यांच्या द्वारा वासनात्मा करीत असलेल्या अहंनिष्ठ व्यवहारात बदल करण्याचा प्रयत्न करतो हे आपण वर पाहिले. हा अंत: पुरुष, आमचा खरा आत्मा, पूर्णतया पुढे होईल आणि वासनात्म्याला बाजूला ठेवून व्यवहार करील, पडद्याआड राहून थोडा हा, थोडा तो, असा तुटक व्यवहार करण्याऐवजी, पडदा दूर करून उघडपणे आणि समग्रतेने व्यवहाराचे शासन करील, बाह्य मन-प्राण शरीर या निसर्ग विभागाचे उघडपणे व समग्रतेने शासन करील, तर जे सत्य आहे, मंगल आहे, सुंदर आहे, त्याच्या प्रतिमूर्तीचे रूप, त्याच्या आत्मिक प्रतिमांचे रूप, मन-प्राण-शरीर यांना येऊ शकेल आणि अध्यात्मिक जीवनाच्या पायरीवर चढून जाणे हा जो आमच्या जीवनाचा खरा हेतू व सर्वोत्तम विजय आहे, त्या हेतूसाठी, त्या विजयासाठी आमचा सर्वच्या सर्व स्वभाव शेवटी क्रियाशील होईल अर्थात् आमचा वासनात्मा खऱ्या आत्म्यात सर्वथा विलीन होईल.


चैत्यपुरुष हा अज्ञानमय निसर्गाच्या महान क्षेत्रात एक लहानसा चैतन्य - केंद्र असल्यासारखा असतो; उपनिषदात याला 'अंगुष्ठप्रमाण' म्हटले आहे, असे हे 'अंगुष्ठप्रमाण' लहानसे चैतन्य - केंद्र, आत्म शक्तीच्या वाढत्या सात्मीकरणाने मोठे मोठे होत जाऊन, सगळ्या विश्वाला व्यापू शकते, आपले मन आणि हृदय विशाल करून, त्याच्या द्वारा सर्व विश्वाशी पूर्ण आंतरिक तन्मयता, एकात्मता पावू शकते.'

'दिव्य जीवन' प्रकरण तेवीस 'मानवातील दोन आत्मे'च्या आधारे.

- अरूण सदाशिव आचार्य,
एफ - १, 'गंगातीर्थ', टांगेवाला
सोसायटी, सहकारनगर नं. १, पुणे ४११००९
फोन : २४२१७०५३. मोबाईल : ९४०४२३५१३४

■ ■ ■

''१९१४ च्या काँग्रेस अधिवेशनानंतर 'हिंदू'च्या वार्ताहराला दिलेल्या मुलाखतीत श्रीअरविंद म्हणाले होते, ''आध्यात्मिक जागरण हाच आपल्या राष्ट्रीय महानतेचा निकष आहे. ईश्वरात मानवाचे एकत्व पहाणे आणि अंतर्बाह्य स्वरूपात, सामाजिक संबंधात आणि समाज व्यवस्थेतही त्याची अनुभूती घेणे ही सर्वोच्च भारतीय कल्पना इत:पर मानवी समाजाच्या विकासाची गुरुकिल्ली ठरणार आहे. भारताने मनात आणले तर तो साऱ्या जगाचा मार्गदर्शक ठरू शकेल.''



योगी श्रीअरविंद- वचने

सुमन गोविंद रोटीथोर

B.A. / निवृत्त / गृहिणी
श्रीअरविंदो सेंटर, पुणे यांच्या निवासस्थानी गेली ११/१२ वर्षे कार्यरत आहे.
श्रीअरविंदो यांची साधक-अभ्यासक

आपला भारत ही एक पवित्र संतभूमी आहे. येथील थोर संतमहात्म्यांनी सर्वसामान्य लोकांना परमेश्वरप्राप्ती व मोक्ष मिळवण्यासाठी भक्तिमार्ग व नामस्मरण हा साधा व सोपा मार्ग दाखवला. त्यायोगे प्रत्येक मनुष्यामात्राला वैयक्तिक लाभ होऊन परमेश्वरप्राप्ती करून घेता येते; परंतु श्रीअरविंदबाबूंना अखिल मानवजातीसाठी हे व्हायला हवे आहे. प्रत्येक मनुष्यात देव आणि दानव या दोन्हीही प्रवृत्ती वसत असतात. श्रीअरविंदबाबूंच्या पूर्ण योगाप्रमाणे प्रत्येक मानवाच्या मानसिक पातळीत बदल करून त्यांच्यातील दानवी प्रवृत्तींचा नाश होऊन, अतिमानसात जाऊन परमेश्वरप्राप्ती करून घेता येते आणि वैयक्तिकरीत्या मोक्ष मिळवून स्वर्गात जाण्यापेक्षा पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण होईल असा त्यांचा दृढ विश्वास आहे. सोप्या शब्दात हा श्रीअरविंदबाबूंचा पूर्ण योग आहे.

जेव्हा कोणतीही मूलसंकल्पना किंवा घटना ही, कथा, कीर्तने, भजने, भाषणे, संतमहात्म्यांची वचने, या स्वरूपात आमच्यासमोर येतात तेव्हा साहजिकच त्यांचा आमच्या मनावर परिणाम होऊन आमची मानसिक पातळी बदलत जाते. आम्ही सन्मार्गाची व पर्यायाने परमेश्वरप्राप्तीकडे वाटचाल सुरू करतो. अशाच एका थोर संतमहात्म्याची, श्रीअरविंदबाबू यांची काही वचने खाली देत आहे.

१) जडात चिन्मय आत्मा लपलेला आहे. दिसायला जो निसर्ग म्हणून दिसतो तो दडलेला ईश्वर आहे. निसर्गाचा मुखवटा घातलेला ईश्वर आहे.

२) मानवाच्या मर्त्य शरीरांत अनश्वर अमर सत्याकांक्षा व सत्यवास करीत आहे व त्यांची केव्हांना केव्हा प्रकट होण्याची निश्चिती आहे.

३) कर्ते ब्रह्म आणि अकर्ते ब्रह्म या वेगवेगळ्या वस्तू नसून एकाच अभेद्य ब्रह्माची ही दोन रूपे, एक विधायक व दुसरे अविधायक पण एकाचे दुसऱ्यावाचून चालत नाही. शांत ब्रह्मातूनच तो शब्द नित्य निघत असतो. जो शब्द विधात्याचे विधायक काम करून विश्वाची निर्मिती करीत असतो आणि ही निर्मिती करणारा शब्द म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शांत ब्रह्माच्या पोटी जे लपून बसलेले असते त्याचे स्वयमाविष्करण होय.

ब्रह्म विश्वात आहे, विश्वाच्या अनेकतेपलिकडे त्याचा पाया आहे आणि त्यापलीकडे विश्वनिरपेक्ष, विश्वाधार निरपेक्ष असेही त्याचे स्वरूप आहे.

हा आत्मा, ब्रह्म अविभाज्य आहे. विभक्त भासणाऱ्या सर्व वस्तूंत ते ब्रह्म अविभक्तपणे राहाते. कोणाच्याही इच्छेने या विश्वात काहीही घडो, त्या घटनेच्या मुळाशी अंतिम इच्छा ब्रह्माचीच असते.

असत् हा खरोखरी अस्तित्वाचा अभाव नसून त्या अभावावेगळा काही भाव, भावात्मक वस्तू आहे.

विश्वांत जी सुखदु:खे, मंगल, अमंगल, ज्ञान, अज्ञान आदि द्वंद्वे दिसतात ती आमच्या मर्यादित इंद्रियांच्या व मर्यादित मनाच्या संवेदनांनी व कल्पनांनी प्रतीत होतात.

सत् आणि असत् एकाच अज्ञेयाची एकाच क्षणीच्या दोन अवस्था दाखवणारी नावे आहेत.

एकाचे एकतेचे ज्ञान म्हणजे विद्या, विद्येने ईश्वराची ओळख होते 'विद्या' नाही आणि दुसरी 'अविद्या' म्हणजे मर्यादित अनेकदर्शी जाणीव आहे, असे असेल तर ही अविद्या अंधाराने भरलेली रात्र, अज्ञानाचा व्यवहारशून्य पसारा असल्याचे लक्षात येईल.

विश्वाच्या पोटी लपलेली एक ज्ञानशक्ति आहे. या ज्ञानशक्तीला विश्वाचा आरंभ आणि अंतिम ध्येय ठाऊक आहे. ही ज्ञानशक्ति मार्गदर्शक या नात्याने विश्वाची गति व प्रक्रिया निश्चित करीत असते. मूळ सद्वस्तु मानवी बुद्धीला शक्य असणाऱ्या सर्व ज्ञानाच्या पलिकडे ती मूळ सद्वस्तु आहे. ती स्वत:ला सच्चिदानंद म्हणून ओळखते. मानवी बुद्धीला अज्ञेय असणाऱ्या सच्चिदानंदाचा मानवी आत्म्याला अनुभव घेता येतो.

विश्व हे 'अनंत काल व आकाश किंवा अवकाश' यात पसरलेले सर्वरूप ब्रह्म व व्यक्ति हे काल आणि आकाश किंवा अवकाश यांच्या मर्यादात केंद्रित झालेले तेच सर्वरूप ब्रह्म होय.

जड द्रव्यांनी बनलेल्या पशुदेहांत वास्तव्य करणारा मननशील आत्मा म्हणजे मानव होय.

सर्वव्यापी जाणिवेने स्वत:ला मर्यादित करणे हा 'मी' चा स्वभाव व स्वरूप आहे. सर्वव्यापी खेळाचा थोडासा भाग जाणिवेच्या क्षेत्रात ठेऊन बाकी सर्व भाग बुद्धिपुर:स्पर जाणिवेतून काढून टाकणे हे 'मी' चे स्वरूप आहे. एका विशिष्ट रूपांत, आकारांत (बाकी सर्व विसरून) जाणिवेने

निमग्न होऊन राहणे हे 'मी' चे स्वरूप आहे. एका विशिष्ट रूपांत व विशिष्ट संघात शक्तीच्या एका विशिष्ट कार्यक्षेत्रांत सर्वव्यापी जाणिवेने स्वत:ला कोंडून घेणे हे मी चे स्वरूप आहे.

उर्ध्वगति विकासक्रम –

आम्ही आमच्या उर्ध्वगति विकासक्रमाला ज्या 'अर्धजागृत, अर्धमनस्क' सर्वांतून (Subconscient all) सुरूवात केली आहे आणि या विकासाची गती ज्या 'अतिमानसिक' 'सर्वांकडे' (Supereonscient all) आम्हाला घेऊन जात आहे, या दोन सर्वात्मक वस्तूंमध्ये मध्यस्थाचे काम आमची जागृत अवस्थेतील बुद्धि करीत आहे. एकच सर्वात्मक महावस्तूच्या दोन अवस्था, दोन साकारमूर्ति 'अर्धमनस्क सर्व' आणि 'अतिमानसिक सर्व' या वस्तू आहेत.

सान्ताचा पसारा अनंत अस्तित्वावाचून निराधार होतो. स्वयंभू, अनंतर सद्वस्तु-परमेश्वर सान्त दृश्याचा पसारा उभा करण्यासाठी अगदी अवश्य आहे.

चिन्मयशक्ती

मानवी जाणीव हा निसर्गाच्या जाणिवेचा एक प्रकार आहे. निसर्गात मनाचा उदय होण्यापूर्वी, जाणीव दुसऱ्या कमी अधिक गुप्त रूपांत काम करीत असते, नंतर ती जाणीव मानवांत मनाचे रूप घेते आणि मनाच्या नंतर मनापलिकडे श्रेष्ठ रूपेही ती धारण करणार आहे, कारण विश्वाची उभारणी करणारी आद्यशक्ति ही जाणिवशक्ती आहे. ज्ञानशक्ती आहे, आणि या विश्वांत व्यक्त होणारे आद्य अस्तित्व हे ज्ञानमय पुरूष आहे. विश्व म्हणजे अनंतर रूपांचा संसार, ज्ञानमय पुरूषाने आपल्या ज्ञानशक्तीच्याद्वारा हा जो संसार निर्माण केला आहे तो कशासाठी, याचा विचार केल्यास असे म्हणावे लागते की, त्या ज्ञानमय पुरूषांत जे जे काही बीजरूपाने आहे ते ते सर्व व्यक्त व्हावे, साकार व्हावे आणि ही साकारता सर्वथा पूर्ण व्हावी हा एकच, या आकारमय विश्वाच्या निर्मितीच्या, आविष्काराचा उद्देश आहे.

निश्चल, निराकार अस्तित्वात आनंद आहे, तसाच चंचल, साकार अस्तित्वात आहे म्हणून निश्चल ब्रह्म चंचल होते, निराकार ब्रह्म साकार होते.

आमचे जीवन विभक्तता, आत्मविषयक अज्ञान आणि 'अहम् परायणता यावर आधारलेले आहे, अर्थात् आमच्या जीवनाचा हा आधार दूर सारून अविभक्तता, आत्मज्ञान आणि विश्वात्मकता हा आमच्या जीवनाचा आधार आम्ही केला म्हणजे स्वभावत:च आम्ही अमर स्वयंभू, निरतिशय नित्य आनंदाचे स्वामी होऊ.'

आमच्या जाणिवेला कार्य करणारी शक्ती व विश्वद्रव्य भिन्न भिन्न आहेत, असे वाटते, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांच्यात काम करणारी शक्ती तो स्वत:च असतो, ही शक्ती जिचा साधन म्हणून उपयोग करते ती वैयक्तिक जाणीव तो स्वत:च असतो, जे द्रव्य ती वापरते ते द्रव्यही तो स्वत:च असतो आणि या शक्तीचा परिणाम म्हणून जे रूप, जो आकार बनतो, ते रूप तो आकार स्वत:च असतो.

विश्वव्यापी अस्तित्वाला ओळखणारी त्याला मार्गदर्शन करणारी शक्ती मन नव्हे अर्थात् विश्वाचे अस्तित्त्व निर्माण करणारी अथवा आविष्कृत करणारी शक्ती मन नव्हेच नव्हे.

विश्वाच्या कालस्थलनिष्ठ आविष्कारांत जे जे काही व्यक्त झालेले आहे किंवा होणार आहे ते ते सर्व कालस्थलातील अशा सच्चिदानंदाच्या पोटी पूर्णतया आत्मसमाविष्ट, आत्मकेन्द्रस्थित अशा मूळ स्वरूपांत असलेच पाहिजे. अगदी अचिन्त्य व अनिर्वचनीय असे अस्तित्त्व आरंभ सर्व काही आवरून आत्मकेन्द्रस्थ एकत्व रूपाने असते.

मनुष्य हा सान्त दिसणारा अनंत आहे, सान्तांत लपलेला अनंत आहे आणि अनंताची ओढ लागणे हे त्याला टळणारे नाही. केव्हातरी ही ओढ त्याला लागणारच.

मन हे अतिमानसाचे अर्थात् मूळ स्वसाक्षिक ज्ञानाचे गौण कार्य, कनिष्ठ क्रियाशक्ती आहे.

मानवेतर प्राण्यांची सजीव प्रयोगशाळा करून निसर्गाने मानव बनवण्याची योजना यशस्वी केली. 'मानव' हा स्वत: सजीव व विचारयुक्त अशी निसर्गाची प्रयोगशाळा असून त्या मानवामध्ये त्याच्या जाणीवयुक्त सहकाराने, निसर्ग, अतिमानव किंवा देवमानव बनविण्याची आपली योजना यशस्वी करू इच्छित आहे.

संशोधन करून भौतिकशास्त्र जेव्हा अशा निर्णयाला येते की, जड हे शक्तीने घेतलेले रूप आहे, शक्तीचे नानाविध आकार म्हणजे जड द्रव्य आहे, तेव्हा त्याला एक सर्वव्यापी मौलिक सत्य सापडले आहे असे म्हणता येते; तसेच तत्त्वज्ञान आपल्या संशोधनाने जेव्हा या निर्णयाला येते की, आमची जी जाणीव आहे त्या जाणिवेला द्रव्याचा देखावा दिसतो. त्या देखाव्याला आम्ही जडद्रव्य म्हणतो, वस्तुत: एकच एक सत्यवस्तु आहे आणि ती वस्तु म्हणजे आत्मा, चैतन्य, शुद्ध ज्ञानमय सत्ता होत अशा निर्णयाला तत्त्वज्ञान येते तेव्हा भौतिक शास्त्राच्या सत्यापेक्षा अधिक महान, अधिकपूर्ण, अधिक मौलिक असे सत्य त्याला सापडले आहे असे म्हणता येते.

'दिव्य जीवन' खंड पहिला वर आधारित

– सुमन रोटिथोर

४२, नित्यानंद सोसायटी, धनकवडी, पुणे ४११०४३


फोन : २४३७८१५४

■ ■ ■

योग साधनेने आपण चढून जातो–
असत्यातून सत्यामध्ये– दुर्बलतेतून सामर्थ्यामध्ये–
दु:ख शोकातून आनंदामध्ये– बंधनातून स्वातंत्र्यामध्ये–
मृत्यूतून अमरत्वामध्ये– अंध:कारातून प्रकाशामध्ये–
संकिर्णतेतून स्पष्टतेमध्ये– अपूर्णतेतून पूर्णत्वामध्ये–
आत्मविभजनातून– एकत्वामध्ये व मायेतून देवत्वामध्यें!

श्रीअरविंद

‘दिव्य जीवन’ ग्रंथातील ‘पुनर्जन्म विषयक तत्त्वज्ञान’



श्री. म. भि. ओंबळे

Diploma in Rly. Engineering
Retired Rly. Divisonal Engineer
श्री. अरबिंदो सोसायटी, पाँडिचेरीच्या पुणे सेंटरचे संस्थापक व सचिव म्हणून २००१ पासून कार्यरत. तसेच केंद्रामधील अभ्यासवर्गाचे मार्गदर्शक म्हणून काम बघतात. १९७६ पासूनचे श्री. अरबिंदो यांचे साधक - अभ्यासक.

नासदीय सूक्त (१०-१२९ - १ ते ५ मध्ये विश्व निर्मितीच्या पूर्वस्थितीचे वर्णन असे आहे -

‘तेव्हा सत् (अस्तित्व) नव्हते, असत् (अनस्तित्व) ही नव्हते, तेव्हा अंतरिक्ष नव्हते, आकाश नव्हते, त्यांच्या पलिकडे असणारे तेहि नव्हते; सर्व आच्छादणारे तेव्हा काय होते...’ हे अनस्तित्व म्हणजेच सत् - सच्चिदानंद तत्त्व, अव्यक्त, मूळ सद्‌वस्तु. मूळ सच्चिदानंदाला विश्व निर्माण करण्याच्या अनंत शक्यता उपलब्ध होत्या; त्यातून एक शक्यता सच्चिदानंदाने निवडली; जडाधिष्ठित विश्व, जडाच्या पायावर उभे असलेले व विकास पावणारे असे विश्व अभिव्यक्त करावयाचे असा संकल्प केला; एकाच्या पोटी अनंत रूपाने अनेक होऊन विश्व निर्मितीचा अनंत आनंद उपभोगावयाचा; आणि या संकल्पाच्या परिपूर्तीसाठी शुद्ध चैतन्याने क्रमवार अवतरण प्रक्रियेने अचेतनात उडी मारली. या प्रक्रियेत मूळ सद्‌वस्तु, मूळ चैतन्य अचेतनाच्या आवरणात लपते आणि क्रमविकास प्रक्रियेने अचेतनातून क्रमश: अभिव्यक्त होत मूळ सच्चिदानंद स्वरूप प्राप्त करून घेते; मूळ अस्तित्व अनस्तित्त्वांत लपते, सान्त आत्मरूपे घेत घेत शेवटी मूळ अस्तित्वाची जाणीव प्राप्त करून घेते; मूळ अनंत जाणीव नेणिवेच्या पडद्याआड लपते, उथळ जाणिवेच्या रूपाने व्यक्त होते, समग्र जाणिवेच्या रूपाने प्रवास करीत प्रकट मानसिक जाणीव, आंतर जाणीव, विराट जाणीव, विश्वरूप जाणीव, अतिमानस जाणीव, विश्वातीत जाणीव आणि शेवटी मूळ अनंत जाणीव प्राप्त करून घेते; मूळ अस्तित्वाचा मूळ अनंत आनंद, संवेदनशून्य भौतिक द्रव्यांत लपलेला आनंद प्राणमय अस्तित्वात भूक आणि वासना, मनोमय अस्तित्वात अज्ञान आणि विभाजन आणि शेवटी अतिमानसात मूळ अनंत एकत्व, वस्तुजाताचे समग्र ज्ञान आणि सुसंवाद प्राप्त करून घेते. हा विकासशील आत्म्याचा परतीचा प्रवास अचेतनांतून सुरू होतो; तिरोधान प्रक्रियेत हेतुपूर्वक लपविलेले अनंत अस्तित्व, अनंत जाणीव, अनंत शक्ति, अस्तित्वाचा अनंत आनंद, मूळ सच्चिदानंद व्यक्तिरूप, विश्वरूप आणि शेवटी विश्वातीत सद्‌वस्तु या क्रमाने आपले पूर्णरूप प्राप्त करून घेतो. अचेतनांत बुडी मारलेल्या, दडी मारलेल्या आत्म्याला ही विकास यात्रा एका जन्मांत पूर्ण करणे कदापि संभव नाही. अनंत अस्तित्वाच्या अनंत अनुभूतींचा अनुभव घेण्यासाठी त्याला अनेक जन्म घेणे अपरिहार्य आहे. पुनर्जन्माची अपरिहार्यता या एकाच संकल्पनेतून पटण्यासारखी आहे.

श्रीअरविंदांच्या ‘Life Divine’ या ग्रंथाचा मराठी अनुवाद सेनापति बापट यांनी केला आहे, ‘दिव्य जीवन’ या मराठी अनुवादित ग्रंथाचे खंड एक, खंड दुसरा, भाग एक आणि खंड दुसरा, भाग दोन असे तीन भाग आहेत. मूळ इंग्रजी ग्रंथ वाचून समजणे तसे सोपे नाही. त्याचा अनुवाद करणे त्याहूनही कठीण आहे. सेनापति बापट यांना पाँडिचेरी मुक्कामी असता अंत:प्रेरणेने संकेत मिळाला व माताजींच्या कृपेने अनुवादाचे कार्य त्यांच्या हातून संपन्न झाले. श्रीअरविंदांच्या मूळ ग्रंथाची भाषांतरे जगभरातील अनेक भाषात प्रकाशित झाली आहेत. मराठी अनुवाद हा सर्वोत्कृष्ट अनुवादापैकी एक आहे. मूळ ग्रंथातील इंग्रजीत स्पष्ट केलेल्या संकल्पना आणि मराठी अनुवादातील संकल्पांची स्पष्टता या खेरीज वेगळ्या शब्दांचा उपयोग करून त्या संकल्पना वाचकांपर्यंत पोहचविणे हे अगदीच अशक्यप्राय आहे. श्रीअरविंदांचे सर्वच लिखाण मनाच्या पलिकडे असणाऱ्या जाणिवेच्या उच्च स्तरांतून अवतरले आहे. उच्चमन, प्रकाशपूरित मन, अंत:स्फूर्त मन असे उच्च उच्चतर जाणीवेचे स्तर आहेत. मन हे या उच्च जाणीव स्तरांच्या खालचे अज्ञान व्याप्त साधन आहे. अतिमानसाच्या भूमीवरून मनाकडे पाहिले तर समजते की, ‘प्रकट मानसिक जाणीव’ ही अज्ञानमय जाणीव आहे. श्रीअरविंदांचे लिखाण मानसिक जाणिवेला समजणे कठीणच. श्रीअरविंद म्हणतात - ‘माझे विचार समजण्यासाठी तुम्हाला मनाच्या वरच्या जाणिवेत चढून जावे लागेल. श्रीअरविंदांच्या साहित्याचा अभ्यास करणाऱ्या मराठी भाषिक साधकांचा असा अनुभव आहे की, मूळ इंग्रजी ग्रंथ व त्याचा उपलब्ध असलेला मराठी अनुवाद साधनामार्गात मार्गदर्शन करण्यास फारच उपयुक्त आहे. या एकाच कारणासाठी अनुवादित मराठी ग्रंथातील भाषेत आम्ही आमच्या अज्ञानमय भाषेची भेसळ न करता मूळ संकल्पना वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करणे उचित होईल. श्रीअरविंदांच्या ‘दिव्य जीवन’ या अनुवादित ग्रंथातील एक प्रकरण ‘‘पुनर्जन्म विषय तत्त्वज्ञान’’ मधील संकल्पना संक्षिप्त रूपाने मांडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. तुम्ही स्वत: ‘सांतात लपलेला अनंत’ आहात, सर्वज्ञता, सर्व क्षमता अज्ञानाच्या पडद्याआड लपलेली आहे, तुम्ही ते ब्रह्म आहात, अशा तुम्हाला असंभव काहीच नाही. गरज आहे ती अभिप्सेची, व्यक्तिगत प्रयत्नांची, संपूर्ण समर्पणाची.

श्रीअरविंदांचे ‘पुनर्जन्म विषयक तत्त्वज्ञान’ संक्षिप्त रूपाने असे सांगता येईल -

भौतिक विश्वांत जीवाचा जन्म ही पहिली आध्यात्मिक गूढ गोष्ट आहे, अति भौतिक रहस्य आहे; जीवाचे मरण हे दुसरे तसलेच रहस्य आहे; परंतु जन्म हा जीवनाचा आरंभ, मरण हा जीवनाचा शेवट असेच नाही. जीवन ही गूढ प्रक्रिया आहे आणि जन्म व मरण या प्रक्रियेतील मधल्या अवस्था, मधले टप्पे आहेत. वर उसळणारी प्रबळ आत्मज्योति, चैतन्याचे पहिले प्रकट स्पंदन जीवनाच्या उदयांत जड तत्त्वाबरोबर, जडशक्तीबरोबर भाग घेत असते. आमच्या जन्मापूर्वी आमचे काही अज्ञात असे स्वरूप असते; तसेच आमच्या मरणानंतरही आम्ही कसल्यातरी अज्ञान स्वरूपात असतो.

अद्वैतवादाच्या उत्तरकालीन मांडणीत खरी आध्यात्मिक सद्‌वस्तु मानण्यात येते, पण तिचे व्यक्तित्व दर्शनी असते, विश्वमायेने निर्माण केलेले असते. तो आभास असतो आणि तिचा (व्यक्तीचा) पुनर्जन्म हाही आभासात्मक असतो असे मानण्यात येते.

बौद्ध दर्शनात आत्म्याला अस्तित्व नाही. अर्थात् पुनर्जन्म हा खोट्या काल्पनिक व्यक्तीचे या लोकांतून दुसऱ्या लोकांत जाणे व परत येणे असा प्रकार असतो.

अद्वैती मायावादांत किंवा मायावादी अद्वैतांत वैयक्तिक जीवात्मा मानतात आणि हा आत्मा खरा आहे असेही प्रतिपादन असते; पण या प्रतिपादनातील भाषा वैयक्तिक खऱ्या आत्म्याची असली तरी वस्तुत: वैयक्तिक खरा आत्मा, (जीवात्मा) या अद्वैतात नाही. काय आहे ते विश्वातीत सत्तत्त्व; नित्य, अज, अक्षर नामरूपात्मक परिवर्तन प्रधान व्यापारांनी अस्पृष्ट असे विश्वातीत सत्तत्त्व, आत्मतत्त्व आहे. जन्म चक्रगत व्यक्तीची सत्यता उपनिषदीय अद्वैतांत मानतात, पण ही सत्यता कालांकित असते, तिला कालातीत शाश्वत पाया नसतो. किंवा कालक्षेत्रांतही व्यक्ति नित्य ये-जा करीत नाही या अद्वैतातही अभिव्यक्तीचा हेतु आणि व्यक्ति यांच्या संबंधातून अनिवार्यपणे पुनर्जन्माचा सिद्धांत निघत नाही.

व्यक्तिरूप जाणिवेने अखंड सतत राहून लोकप्रवास शरीर-शरीरान्तर-प्रवास आणि आत्मविकास अनिवार्यपणे करीत राहवयाचा कार्यक्रम त्या पुनर्जन्म-उपपत्तींत अटळ असतो, ज्या उपपत्तींत आमच्या पार्थिव अस्तित्वाची अर्थपूर्ण सूत्रमय कहाणी, 'जडतत्त्वांत क्रमसंकोच प्रक्रियेने लपून बसलेल्या आत्मतत्त्वाचा जडाधिष्ठित क्रम विकास' या शब्दांत सांगितली जाते.

जड तत्त्वाच्या पायावर जो विकास चालला आहे, त्यासंबंधाचे श्रीअरविंदांचे स्पष्टीकरण असे आहे -

'भौतिक, अतिभौतिक विश्व ही निर्मितीची क्रिया आहे, सर्वोच्च सत्याच्या, आत्मतत्त्वाच्या, आत्मनिर्मितीची क्रिया म्हणजेच हे विश्व; अर्थात् सर्व वस्तूंचे सारतत्त्व आत्मतत्त्व आहे; आत्मतत्त्वाची अविष्कारशक्ती, आत्मतत्त्वाची प्रकटनाची साधने, प्रकटनाची रूपे हेच सर्व वस्तूंचे सत्यस्वरूप आहे. विश्वांत जे देखावे आहेत, त्यांच्या पाठीमागे गुप्तपणे हे सर्वोच्च सत्य आहे; अनंत अस्तित्व, अनंत जाणीव, अनंत शक्ति आणि संकल्पशक्ति, अनंत जीवनानंद (अस्तित्वानंद) असे चतुर्मुख एकमेव अनंत सत्य हेच सर्वोच्च आत्मतत्त्वरूपी सत्य होय. विज्ञान किंवा अतिमानस हे या परम-आत्मतत्त्वाचे कर्मसाधन आहे. या दिव्य कर्मसाधनाच्या साह्याने परम आत्म्याने विश्वसंसार थाटला आहे. मन, प्राण आणि जडतत्त्व या आम्हाला परिचित असणाऱ्या विज्ञानाच्या खालच्या पातळीवरच्या तत्त्वांच्या, मर्यादित व मर्यादाकारी दुय्यम तत्त्वांच्या द्वारा परम आत्म्याच्या अतिमानसिक विज्ञानाने विश्व संसाराचा गाडा उभा केला आहे व चालविला आहे. जड विश्व, भौतिक विश्व हे परमोच्च सत्याचे सर्वात खालचे आविष्कार स्वरूप आहे. आपल्या परमोच्च स्थानावरून आत्मतत्त्व हे खाली उतरत आत्माविष्कार करीत जाते; क्रमसंकोच प्रक्रियेने सर्व प्रकटित आत्मतत्त्व शेवटी आत्मनेणिवेच्या अचेतन तत्त्वांत प्रविष्ट होते; अर्थात् ही आत्मनेणीव, ही अचेतनता दर्शनीय असते. या अचेतनतेतूनच, या आत्मनेणिवेतून आत्मतत्त्वाचा क्रमविकास व त्याच्या द्वारा परत त्याची आत्मजाणीव क्रमश: सिद्ध होणे हे अपरिहार्य आहे. कोणत्याही तत्त्वांत जे दुसरे तत्त्व संकोच प्रक्रियेने प्रविष्ट होऊन गुप्त झाले असेल, ते दुसरे तत्त्व त्या पहिल्यातून क्रमविकासाने प्रकट होणे हा अटळ नियम आहे; जी शक्ति जडांत प्रविष्ट झाली, तिचा स्वभावच परत प्रकट होणे हा आहे; शिवाय जड अचेतन तत्त्वाचा स्वभावही त्याचा आत्मा शोधून काढणे हा आहे आणि या अचेतनांत त्याचा आत्माच गुप्त होऊन बसला आहे; अर्थात् आपला आत्मा प्रकट कसा होईल या एका तत्त्वावर या अचेतनाची सर्व हालचाल आधारलेली आहे. तेव्हा बाहेरच्या जडाची हालचाल आणि आतील आत्म्याची हालचाल, दोन्ही एकमेकांना पूरक होऊन, आत्मजाणीव क्रमश: प्रकट होणे शक्य होते. व्यक्ति, जाणीवयुक्त व्यक्ति ही आत्मजाणिवेच्या पुन:सिद्धीला केवळ उपकारक नव्हे, तर आवश्यक, अपरिहार्य अशी वस्तु आहे. विकासशील जाणीव या व्यक्तीच्या ठिकाणी सुसंघटित होऊन, आपले मूळ सत्यत्व अनुभवू शकते. आमचे विश्व आरंभी जाणिवेवाचून होते, व्यक्तिशून्यही होते, सर्वत्र एकसर नेणिवेचे साम्राज्य होते. या अशा विश्वांत अतिशय महत्त्वाची, लक्ष वेधणारी गोष्ट म्हणजे आताच निर्देशिलेली जाणीवयुक्त व्यक्ति होय. ही व्यक्ति जाणिवेच्या बाबतीत जसजशी वर वर चढत जाते, तसे तिचे महत्त्व अधिकाधिक होते; कारण तिच्या द्वाराच आत्मतत्त्व आपली मूळ प्रतिष्ठा मिळवू शकते. जाणीवयुक्त व्यक्तीचे वाढते महत्त्व, ती व्यक्ति 'मिथ्या' असेल तर समर्थन करता येण्यासारखे नाही - मूळ आत्म्याचीच, मूळ कालातीत नित्य आत्मतत्त्वाचीच विश्वात्मा व जीवात्मा (व्यक्तिगत आत्मा) ही दोन रूपे आहेत, आणि दोन्ही रूपे मूळ रूपाप्रमाणेच सत्य आहेत, मिथ्या नाहीत, असा पक्ष घेतला तरच वाढत्या आत्मजाणिवेने व्यक्तीला येणारे वाढते महत्त्व समर्थनीय ठरते. एरव्ही ते समर्थनीय ठरत नाही. व्यक्तीचा विकास होत जाऊन, तिला स्वत:च्या आत्म्याचा शोध लागणे ही गोष्ट प्रथम घडावी लागते आणि नंतर या शोधातून पुढे विश्वात्म्याचा, विश्व जाणिवेचा व नंतर व्यक्ति आणि विश्व दोहोंच्या पलिकडे असलेल्या मूळ परमोच्च अनंत सच्चिदानंदाचा शोध लागतो. याप्रमाणे अंतिम सिद्धीसाठी व्यक्ति विकासाची आवश्यकता आहे ही गोष्ट पटली म्हणजे व्यक्ति ही मूळ सच्चिदानंदाची स्वत:इतकीच सत्य अशी शक्ति आहे ही गोष्ट पटणे सुलभ होते. तेव्हा नित्य जीवात्मा सत्य आहे व तोच विश्वात्मा आणि मूळ कालातीत आत्मा होणार आहे, हे पटल्यावर पुनर्जन्म ही संस्था या

जीवात्म्याच्या आवश्यक विकासासाठी आवश्यक ठरते, अटळ ठरते; अनेक शक्य अशा विकास साधनांतील एक शक्य साधन असे तिचे स्वरूप राहात नाही. आमच्या अस्तित्वाच्या मूळ स्वरूपांतून, ही संस्था जीवात्म्याचे अटळ विकाससाधन म्हणून आमच्या पुढे येते.

मूळ एकच एक आत्मा विश्वाच्या विस्ताराचे रूप घेऊन, प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी वास करतो आणि या स्वत:च्या व्यक्तित्वरूपांत स्वत:चे मूळ एकत्व आणि विश्वत्व यांचा प्रत्यय घेतो. व्यक्तींमध्ये (खऱ्या पुरुषाचे ठिकाणी) तो मूळ एकच एक सच्चिदानंद आपले एकंदर विश्वव्यापक अस्तित्व, विश्वातील सर्व भूतांशी एकरूपता करून प्रत्ययास आणतो. याच नित्य व्यक्तीचे वा पुरुषाचे ठिकाणी तो आपले विश्वातीत शाश्वत केवळ स्वरूपहि प्रत्ययास आणतो. विश्व आणि त्या विश्वाची एकता या केवल विश्वातीतांत सुप्रतिष्ठित असल्याचेही तो प्रत्ययास आणतो. आरंभी अचेतनता, या अचेतनतेच्या पायावर मंद क्रमविकासाचा व्यवहार आणि या व्यवहारांतून जे प्रकाशमय दिव्यदर्शन प्रत्ययास येते, ते मूळ एकमेव परमतत्त्वाचे त्रिधा, तीन प्रकारे, आत्मप्रकटन; खरी आध्यात्मिक व्यक्ति, या व्यक्तीचे ठिकाणी विश्व पुरुषाची अभिव्यक्ति आणि तेथेच केवळ मूळ परमतत्त्वाची अभिव्यक्ति असे मूळ अद्वैताचे त्रिधा आत्मप्रकटन हे दिव्य दर्शन, अचेतनावर अधिष्ठित अशा मंद आत्मविकास व्यापारांतून अखेर आम्हांस घडते. अनेकत्व धारण करणाऱ्या एक तत्त्वाची ही महान लीला आहे.

आत्मशोधाची व आत्मलाभाची, मूळ एकमेव सच्चिदानंद आत्म्याला आपल्या मूळ स्वरूपाच्या शोधाची व लाभाची गरज नसती, केवळ आपल्या सच्चिदानंदी अस्तित्वाच्या विश्वलीलेचा नित्य उपभोग घ्यावा एवढेच त्याचे ध्येय असते, तर विकास आणि पुनर्जन्म या संस्था विश्व व्यवहारांत आल्याच नसत्या, आणल्या गेल्या नसत्या, आणल्या जाण्याची गरज नव्हती.

सच्चिदानंदाच्या क्रमसंकोच प्रक्रियेचा जेथे शेवट होतो, तेथे त्याच्या क्रमविकास प्रक्रियेचा आरंभ होतो. याप्रमाणे अचेतन जडाचा पसारा हे क्रमविकास प्रक्रियेचे आरंभस्थान आहे; अशा प्रकारच्या आरंभ स्थानामुळे विभक्तपणाचा, भेदाचा कारभार विशेष सुरक्षितपणे चालणे शक्य झाले आहे. एकतेची अभेदाची जाणीव परत प्राप्त होण्याला, स्वतंत्र भिन्न आकारांनी भरलेल्या या नेणिवेच्या आरंभस्थानाकडून फारच विरोध होतो. पण अचेतनाच्या, नेणिवेच्या पोटांत, तिच्या वरती, तिला आधार देणारे सर्वज्ञ आत्मतत्त्व (सच्चिदानंद) आहे, म्हणून ही नेणिव अद्वैती जाणिवेस परिणामकारक विरोध करीत असली, तरी ती केवळ दर्शनी असून शेवटी नष्ट होणारी आहे. कारण जडाचे, अचेतनाचे जे जडत्व, अचेतनत्व, नेणीवपण दिसते ते जाणिवेचे केंद्रीकरण असते; आकारजनक, निर्मितीशील भौतिक प्रक्रिया चेतनाच करते, जाणीवच करते, पण या प्रक्रियेच्या क्रियेत पूर्णपणे बुडून जाऊन, एकाग्रतेमुळे ती स्वत:ला पूर्णपणे विसरते. ही जाणिवेची क्रियासमाधीतील आत्मविस्मृति हे नेणिवेचे, अचेतनतेचे वास्तविक स्वरूप आहे. सच्चिदानंदाच्या खाली उतरून, क्रमसंकोच प्रक्रियेने जडांत प्रविष्ट होण्याच्या व्यवहाराने दृश्य विश्व अस्तित्वांत आले आहे आणि येथे विभक्त आकार हा या विश्वाच्या जीवन कार्याचा आरंभ आणि पाया बनला आहे. म्हणून नित्य असा जो पुरुष, वैयक्तिक आत्मा त्याला या जड भौतिक विश्वांत कोठला तरी आकार (देह) आधारासाठी धारण करूनच मूळ एकमेव परमात्म्याशी (सच्चिदानंदाशी) विश्व संसारातील आपली नाती बांधावी लागतात, निभवावी लागतात. शरीर धारण करून, त्या शरीराच्या पायावरच त्याला भौतिक अस्तित्वांत प्राणाचा, मनाचा, आत्म्याचा विकास आरंभापासून उभा करावा लागतो. आत्म्याने शरीर धारण करण्याच्या व्यापारालाच आम्ही जन्म घेणे म्हणतो; आणि भौतिक विश्वांत केवळ या शरीरांतच (सशरीर जीवनांतच) आत्म्याचा विकास होऊ शकतो. विश्व-पुरूषाशी व स्वत: खेरीज इतर जीवात्म्यांशी विविध नात्यांचा व्यवहारहि शरिरांत राहूनच जिवात्म्याला करतां येतो; शरीरात राहूनच (सशरीर जीवनातच) आपल्या जाणीवयुक्त अस्तित्वाची वाढ क्रमाक्रमाने करून, ईश्वराशी आमची एकता आणि ईश्वराच्या द्वारा त्याचे ठिकाणीच असणाऱ्या सर्व भूतांशी आमची एकात्मता आम्ही परत मिळवू शकतो. भौतिक विश्वांत ज्याला आम्ही जीवन म्हणतो, ते सगळे जीवन आत्म्याच्या प्रगतीच्या, विकासाच्या स्वरूपाचे असते आणि शरीरात जन्म घेऊनच विकासाच्या प्रवासाला आत्मा आरंभ करतो. आत्मविकास रूप ऐहिक जीवनाचा आधारबिंदू शरीर आहे, त्याचा व्यवहार-पाया शरीर आहे, त्याची अखंडित विकासभूमि शरीर आहे. हे विश्व संकोच आणि विकास यांचे क्षेत्र आहे, केवळ भौतिक आकाराचाच नव्हे तर जाणीव युक्त अस्तित्वाचाहि संकोच पूर्ण विकास येथे चाललेला आहे; जाणीवयुक्त अस्तित्व आणि भौतिक रूप जडते व उगम पावून प्राणमय, मनोमय अवस्थांतून आत्ममय अवस्थेत या विश्वात विकास क्रमाने जात आहे. एकंदर विश्व जीवन प्रगतीच्या, विकासाच्या नियमानुसार चालले आहे, त्या जीवनांत जी सुसंबद्ध हेतुपूर्वकता आहे, ती हेतुपूर्वकता, ती विकासपरता वैयक्तिक जीवनात असणे हेच न्यायसंगत आहे; अर्थात् वैयक्तिक जीवन हे विश्वजीवनाचा हेतु सिद्धीस नेणारे कायमचे साधन असणेच एकंदर विश्व व्यवस्थेला धरून होईल. विकासशील आत्म्याचे विकासक्षेत्र असे या भौतिक विश्वाचे स्वरूप आहे. येथे पार्थिव जीवन अगदी मंद गतीने विकास पावत आहे. मानवी जीवन काही एकुलते एक जीवन नाही. जीवनाची श्रेणी आहे, शिडी आहे, मानवी जीवन या श्रेणीतील एक पायरी आहे. गुप्त मूळ आत्मा (सच्चिदानंद) जो या भौतिक विश्वांत क्रमसंकोच प्रक्रियेने गुप्त होऊन बसला, तो जीवनश्रेणीच्या द्वारा आणि मानवी जीवनाच्या द्वारा आपले प्रयोजन क्रमश: सिद्धीस नेत आहे. मानव शरीरधारी आत्मजाणिवेच्या, वैयक्तिक आत्म्याच्या जाणिवेच्या, विस्ताराच्या आणि आरोहणाच्या द्वारा सच्चिदानंद आपले प्रयोजन अंतिम दृष्ट्या सिद्ध करतो. जीवनाची जी चढती श्रेणी आहे, त्या श्रेणीत, भौतिक शरीरात जन्मापाठीमागून जन्म घेऊनच मूळ गुप्त आत्मा आरोहण करू शकतो.

भौतिक विश्वात जेव्हा मानवाचा जन्म होतो, तेव्हा मानवात दोन आत्म-घटक, एकमेकांशी जोडलेले असे आलेले असतात; एक, आध्यात्मिक निर्व्यक्तिक पुरुष आणि दुसरा व्यक्तिरूप आत्मा.

आध्यात्मिक पुरुष हा मानव घटक, शाश्वत अपरिवर्तनीय अस्तित्वाचा असतो; दुसरा मानव घटक व्यक्तिरूप आत्मा हा विश्वगत परिवर्तनीय पुरुष असतो. मानव आध्यात्मिक निर्व्यक्तिक पुरुष या नात्याने सच्चिदानंदाच्या स्वभावाचा, स्वरूपाचा असतो. सच्चिदानंदाची स्वतंत्रता, मुक्तता या पुरुषाच्या स्वभावांत, स्वरूपांत असते; नेणिवेच्या, अचेतनाच्या क्षेत्रांत त्याने स्वत: होऊन क्रमसंकोच प्रक्रियेने स्वत:ला बंदिस्त, गुप्त केलेले असते; विशिष्ट आत्मानुभवासाठी हे बंदिस्तपण त्याने स्वीकारलेले असते; दुसऱ्या कोणत्याहि मार्गाने हा विशिष्ट इष्ट अनुभवसंभार मिळणे त्याला शक्य नसते; म्हणूनच अचेतनांतील बंधन, गुप्तपणे तो स्वीकारतो आणि याप्रमाणे अचेतनाच्या पोटी गुप्त राहून, त्या अचेतनाचा विकास-व्यवहार आपल्या नजरेखाली, नियंत्रणाखाली तो चालवितो.

मानववंशात मानवता म्हणून जी आत्मावस्था विकसित झालेली आहे, ती विश्वमनाने मानवतेच्या पोटांत बसून विकसित केली आहे. ही मानवता मानवतेच्या खाली असलेल्या जीवांच्या जीवनांतूनच विकास पावत आजच्या रूपाला आलेली आहे. मानवता (मानवी मन) आजच्या स्वरूपांत आहे, त्या स्वरूपात ती कायमची राहील असे नाही. ही मानवता, अतिमानसिक पातळी, शुद्ध आत्म्याची पातळी हळूहळू चढून जाणार आहे. विकास क्रमाने मानवगत ईश्वरत्व हे स्वरूप आजच्या मानवतेला येणार आहे. मानवता हे काही व्यक्तिरूप आत्म्याच्या विकासाचे अंतिम स्थान नव्हे. वनस्पति, प्राणी ही रूपे जशी व्यक्तिरूप आत्म्याने मागे टाकली आणि तो मानव झाला, त्याप्रमाणे तो मानवता मागे टाकून, मानवतेहून उच्च असे आत्मप्रकटन निसर्गाच्या उच्च पातळीवर चढून करू शकेल; तो काही मानवतेने कायमचा बांधला जाऊ शकत नाही.

नाम आणि रूप ज्याच्या रचनेत नाहीत, जो नामरूपातीत आहे तो आत्मा, अशीच आमची आत्म्यासंबंधाची कल्पना आहे. हा आत्मा अनेक भिन्न भिन्न नामरूपे धारण करतो, अनेक भिन्न शरीरे आणि मने धारण करतो. रूपांचा, जाणिवेच्या भूमींचा, स्तरांचा क्रमवार विकास करणे या गोष्टी क्रमबद्ध विकासाच्या अंगभूत गोष्टी आहेत. मनोयुक्त मानवता हा कांही विकासी आत्म्याला कायमचा बांधणारा जाणीव प्रकार नव्हे. व्यक्तिरूप आत्मा, एका देहानंतर दुसरा देह याप्रमाणे जन्म घेत घेत प्रकटित जाणिवेच्या मानवी पातळीवर येऊन पोचतो आणि ही मानवी जाणीव त्याला आणखी उंच चढण्यास मदत करते. निसर्ग एक पायरी, दुसरी पायरी याप्रमाणे चढत जातो, प्रत्येक पायरीवर पूर्वीची आपली मिळकत तपासतो, तिच्यात जरूर ते रूपांतर करून, पुढच्या पायरीची तयारी करतो. प्रत्येक नवी अवस्था जुन्या अवस्थेचे रूपांतर करून उदयास आणली जाते. मानवी प्रकृतीत मानवतेबरोबर मानवेतर प्राणी अद्यापिही उपस्थित आहे; अनेक जन्म घेतल्यानंतर मानवी जन्म ही अवस्था आत्म्याला येते. पृथ्वीवर जे जीवाचे मानवाखालचे मानवेतर प्रकार आहेत, त्या प्रकारांतून आत्मा क्रमश: जातो; भौतिक तत्त्वावर, शरीरावर मानवेतर जीवनप्रकार आधारलेले आहेत आणि मानवांत, मानवी शरीरांत आत्मा येण्यापूर्वी तो या सर्व शरीराधिष्ठित जीव प्रकारांतून जातो. पुनर्जन्म संस्थेच्या आश्रयाने अन्य जीव प्रकारांतून मार्ग काढीत, वर वर येत शेवटी मानवी शरीरांत तो येतो.

आत्म्याचा विकास अगदी खालच्या अचेतनापासून वर क्रमश: चाललेला आहे. या विकासाच्या कार्यक्रमात अनेक खालच्या दर्जाची शरीरे घेत शेवटी आत्म्याने मानवशरीर धारण केले आहे; हा विकासाचा कार्यक्रम, केवळ एक वेळ मानव शरीर धारण केल्याने पुरा होत नसल्यामुळे, हे मानव शरीर आत्म्याला पुन: पुन: धारण करावे लागते. मानवता अनेक अंगांची आहे, मानवतेत अनेक पायऱ्या आहेत; तेव्हा मानवतेच्या अनेक अंगांचा क्रमश: विकास होईपर्यंत, मानवतेच्या पोटांत ज्या अनेक पात्रतेच्या पायऱ्या आहेत त्या पायऱ्या क्रमश: चढून सर्वात उंच मानवता आत्म्याला प्राप्त होईपर्यंत तरी मानव जन्म त्याला पुन: पुन: घेणे अवश्यच आहे.

मनुष्य आज शरीर मनाने ज्या अज्ञानांत वावरत आहे, जे क्षुद्र जीवन जगत आहे, ते अज्ञान आणि ते क्षुद्र जीवन सोडून, आत्म्याच्या प्रकटनाने जे ज्ञान आणि दिव्य जीवन भोगणे त्याला शक्य आहे ते ज्ञान आणि दिव्य जीवन त्याने भोगावे यासाठी त्याचा पृथ्वीवर आत्मविकास क्रमांत उदय झालेला आहे आणि यासाठी त्याला पुन: पुन्हा येथे मानवी शरीर धारण करावे लागते. निसर्गाचा शेवटला शब्द ''पूर्ण मानव'' आहे, ''अपूर्ण मानव'' नव्हे; आणि आत्म्याचे शेवटले शिखर ''अतिमानव'' आहे ''पूर्ण मानव'' नव्हे.

मनाचा विकास मानवांत वाढत वाढत त्याचा परिणाम बुद्धि या तत्त्वाच्या उदयांत झाला आहे, बुद्धि हे मनाचे अंग आज मानवांत सर्वात अग्रेसर तत्त्व समजले जाते. बुद्धिपेक्षा श्रेष्ठ शक्ती मनाचे ठिकाणी आहेत, आजच्या सर्वोच्च मानवांतहि या श्रेष्ठ शक्ती अद्यापि अपूर्ण अवस्थेत आहेत. विकास क्रमाच्या गर्भांत मनापलिकडे अतिमानसही आहे. मनाच्या या सर्वश्रेष्ठ शक्ती मानवाने आत्मसात् केल्यावरही त्याला मानवशरीरांत पुनर्जन्म घेणे भाग पडेल. मानवांत मानसिक प्रकृति आहे, ती बदलून तिचे जागी जेव्हा अतिमानसिक प्रकृति स्थापन होईल आणि शरीरधारी अतिमानसिक मानव पार्थिव अस्तित्वात सर्व जीवांच्या अग्रभागी त्यांचा नेता म्हणून चमकेल तेव्हाच मानव शरीरांत आत्म्याचे पुन: पुन्हा जन्म घेणे समाप्त होईल.

पार्थिव निसर्गात जर विकासाचे तत्त्व असेल आणि विकासी निसर्गांत जन्म घेणारा व्यक्तिरूप आत्मा जर खरा असेल, आभास नसेल, तर तर्कपद्धतीने हा निर्णय अनिवार्य होतो की, या व्यक्तिरूप आत्म्याला पुनर्जन्म आहे. शरीर धारण करणारा जो अपूर्ण पुरुष आहे, त्या अपूर्ण पुरुषाला पूर्णता प्राप्त होण्याची आशा पुनर्जन्माच्या व्यवहारामुळे असते, जन्माला जे आध्यात्मिक महत्त्व येते तेहि पुनर्जन्मामुळेच येते.

दिव्य जीवन खंड दुसरा, भाग दुसरा, प्रकरण २० वर आधारित

- म. भि. ओंबळे
१५, आशियाना सोसायटी, मार्केट यार्ड,
पुणे ४११ ०३७. फोन - २४२६४४९३

■ ■ ■



मनी मरणाचे भय कशाला?

डॉ. नीलिमा चितळे

पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)

एस.एन.डी.टी. गृहविज्ञान महाविद्यालयात ४० वर्षे अध्यापनाचा अनुभव. गृहविज्ञानाशी संबंधित आठ पुस्तकांचे प्रकाशन. पालक बालक संयुक्त व्रतपंथ यासाठी संस्कारकुंभ या पुस्तकाचे लेखन

तेरा-चौदा वर्षांपूर्वी मी श्रीअरविंद आश्रमात पहिल्यांदा गेले. इतर धार्मिक स्थळांपेक्षा तिथला वेगळेपणा आश्रमाशी संबंधित स्थळांना भेटी देताना सतत जाणवत होता. भोजनगृहात शिरल्या शिरल्या प्रवेशद्वाराशी श्रीअरविंद आणि श्रीमाताजींचे फोटो लावलेले होते. त्या फोटोंखाली लिहिलेली वाक्ये अनुक्रमे अशी होती - ''तिच्याशिवाय मी अव्यक्त आहे.'' आणि ''त्यांच्याशिवाय मला अस्तित्व नाही.'' शिवपार्वतीचे वर्णन, श्रीज्ञानेश्वरांनी अमृतानुभव या ग्रंथात थेट असेच केले आहे. कदाचित ह्या विचाराशी परिचय असल्यामुळेच मला श्रीअरविंदांचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची गोडी वाटू लागली.

संजीवन मासिकाच्या कार्यालयात श्री. अप्पा लिमये आणि श्रीमती विमलताई भिडे यांच्याकडे विचारणा केली आणि दिव्य जीवन या पुस्तकाच्या प्रती घरी घेऊन आले. प्रत्येकवेळी आधी परिचित असलेल्या विचारांशी साम्य वाटेल ते कळायचे, बाकी सारे अनाकलनीय वाटायचे. पुढे ४-५ वर्षांनी 'ऑल इंडिया मॅगेझिन'मध्ये श्रीमाताजींनी लिहिलेले पुढील विचार वाचनात आले. ''श्रीअरविंदांचे साहित्य वाचण्यापूर्वी आपले मन कोरे करा. (म्हणजे सर्व संदर्भ बाजूला ठेवा) वाचलेले समजावे म्हणून शांत चित्ताने त्यांची प्रार्थना करा. नंतर स्थिर चित्ताने रोज थोडेच वाचन करा.''

आत्तापर्यंत वाचलेल्या साहित्यातून श्रीअरविंदांनी मांडलेल्या जाणिवेच्या विविध पातळ्यांविषयी माहिती झाली होती. ती पार्श्वभूमी लक्षात घेऊन, श्रीमाताजींच्या सूचनेचे पालन करून मग 'दिव्य जीवन' वाचायला पुन्हा सुरुवात केली. तसे वाचन केल्यावर माझ्या आकलनात फरक पडला. माझ्या मनात ज्या अनेक शंका होत्या त्यापैकी एका महत्त्वाच्या शंकेचे निरसन कसे झाले त्याबद्दल ह्या लेखात माहिती दिली आहे.

थोडी पूर्वपीठिका

वैज्ञानिक वाङ्मयात, वैश्विक जाणीव आहे तीच सर्व गुणांचे उगमस्थान आहे आणि जीवसृष्टीचा उत्क्रांतीक्रम याविषयी माहिती मिळते. पण ही उच्चस्तरीय जाणीव जडामध्ये कशी अवतीर्ण होते. (याला समावेशन - इन्व्होल्यून - किंवा तिरोधानक्रम म्हणतात) याचे वर्णन वाचायला मिळत नाही. आपल्या संत वाङ्मयातही (माझ्या मर्यादित वाचनात) याचे वर्णन आढळत नाही. त्याचे सविस्तर वर्णन 'दिव्यजीवन' या पुस्तकात वाचायला मिळाले. आपल्या शंका, समावेशनाच्या संदर्भात आहेत ती क्रिया कळली म्हणजे उत्क्रांतीची प्रक्रिया 'जाणिवेला' पुढे कोणत्या दिशेने जाण्याचा संकेत देत आहे ते कळू लागते.

ते सर्वसमर्थ, सर्वलक्षणसंपूर्ण असलेले चैतन्य 'एकोहम् बहुस्याम्' असा संकल्प करते. तो संकल्प होताच त्याची सिद्धी आकार घेऊ लागते. चेतना (सत्-चित्-आनंद यातील चित्) आपली कार्यशक्ती, सृजनशक्ती अशा सर्व सामर्थ्यांसह विश्वनिर्मितीच्या कार्याला लागते. एकजिनसी एक असलेले ते अमर्याद, स्वसंवेद्य चैतन्य हळूहळू कसे विभक्त होते, वैशिष्ट्यपूर्ण गुणसंच सामावलेला चैतन्यअंश अभिव्यक्तीसाठी कसा सज्ज होतो ह्याचे विवेचन म्हणजे समावेशनक्रियेचे वर्णन आहे. समाविष्ट गुणांचे क्रमश: व्यक्तीकरण होण्याची क्रिया म्हणजेच उत्क्रांती होय.

एखादा वैज्ञानिक 'मॅटर'चे वर्णन वैज्ञानिक परिभाषेत जसे तपशीलवार लिहितो तसेच अनुभवसिद्ध (प्रयोगसिद्धच्या धर्तीवर) वर्णन या पुस्तकात वाचायला मिळते. जाणीवेच्या विविध पातळ्यांच्या मर्यादा गुणवैशिष्ट्ये, कार्य याचे सर्व बारकाव्यानिशी वर्णन त्यात दिलेले आहे.

अभिव्यक्तीसाठी सज्ज झालेल्या चैतन्याच्या अंशामध्ये आपली अभिव्यक्ती कशी करायची आहे याचे ज्ञान असते. या अभिव्यक्तीसाठी अनुकूलता मिळावी म्हणून चेतना स्वत:भोवती मर्यादा घालून घेते. 'अभिव्यक्ती'साठी आवश्यक ते ज्ञान जतन व्हावे म्हणून त्या त्या पातळीवर ही मर्यादा आवश्यक असते.

हा मुद्दा अधिक स्पष्ट होण्यासाठी आपण एक उदाहरण पाहू. पृथ्वी वरवर एकसंध दिसली तरी पुढे निर्माण होणाऱ्या जीववैविध्यासाठी जितक्या विविध प्रकारच्या - माती, पाणी, तापमान, हवामान इत्यादींची कशी गरज भासेल त्या सर्व अनुकूलता ती पृष्ठभागावर उपलब्ध करून देते. पृथ्वीच्या अंतरंगात कार्यरत असलेली उच्चस्तरीय चेतना (earth consciousness) हा शब्द श्रीअरविंदांच्या लेखनात वाचायला मिळतो) - पृथ्वी किती अंशांनी कशी झुकलेली असावी? सूर्याकडून येणारे कोणते किरण पृथ्वीपर्यंत यावे, कोणते वरच्यावर परतवून लावावे? यासारखा एकसमयावच्छेदेकरून अनेक प्रकारच्या जीवांना आवश्यक ती अनुकूलता निर्माण करण्याचा जटिल प्रश्न हाताळण्यात मग्न

असते. पृष्ठवर्ती जाणीव ठिकठिकाणी विविध रूपे घेताना मर्यादा घालून विभागलेली दिसते. अशा प्रकारे सर्वज्ञ, स्वसंवेद्य चेतना पृष्ठभागावर निवडक संवेदनेच्या पातळीवर येते. मातीच्या आणि खडकांच्या सीमारेषा आपल्याला स्पष्ट दिसतात. चिरस्थायी असतात. दिवस-रात्र, ऋतुचक्र ह्यासुद्धा विविध प्रकारच्या अनुकूलतेसाठी निर्माण केलेल्या कमी टिकाऊ सीमारेषाच आहेत. साध्या संवेदनेचे अधिक विकसित जाणिवेत परिवर्तन कसे होते हे समजण्यासाठी आता दुसरे उदाहरण पहा.

लोह आणि लोहचुंबक यांच्यात नैसर्गिक आकर्षण आहे. सर्व धातू चुंबकाला असा प्रतिसाद देत नाहीत. म्हणजे लोहात कार्यरत असलेल्या जाणिवेचे हे वैशिष्ट्यपूर्ण संवेदन आणि प्रतिसाद आहे. पुढे वनस्पतींमध्ये लोह असले तरी त्या चुंबकाकडे आकर्षित होत नाहीत. त्यांना प्रकाश आणि पाण्याची ओढ असते. जड जाणिवेतून वर आलेली प्राणशक्ती आपला जुना प्रतिसाद बदलते आणि नवीन प्रतिसाद विकसित करते जो तिच्या विकासासाठी आवश्यक आहे. पुढे माणसाला रक्ताची ओढ असते. (आपले रक्ताचे नाते आपल्याच रक्ताकडे ओढ घेते. सगळ्यांच्या रक्ताकडे नव्हे) आता प्राणशक्तीमधून उन्नत झालेली भावयुक्त 'मानसिक चेतना' अधिक वेगळ्या प्रकारचा प्रतिसाद देते. अशा प्रकारे जाणिवेच्या परिवर्तित अभिव्यक्तीसाठी निम्नस्तरीय मर्यादा ओलांडल्या जातात. जडात असलेले सामान्य आकर्षण असे जाणिवेच्या पातळीनुसार वेगवेगळी रूपे घेते. एखादा ध्यास, ध्येय, प्रेम, कल्पना यांची ओढ माणसाला सामान्य आकर्षणबळाच्या पातळीहून वर नेऊ शकते. ही प्राथमिक माहिती घेऊन आता आपण मुख्य विषयाकडे वळूया.

मरणाचे भय

मरणाचे भय सगळ्यांनाच असते. मूल थोडे मोठे झाले आणि ताप आला तरी 'मी मरेन का?' अशी भीती त्याच्या मनात जागी होते. कोणाचा मृतदेह बघितला तरी आपले मन कातर होते. मोठेपणी 'जिवासवे जन्मे मृत्यू' यासारखे विचार वाचनात आले तरी मरणाचं भय संपत नाही. 'मरण' या घटनेबद्दलचे विचार सतावत राहतात. 'दिव्यजीवन' या पुस्तकाच्या वाचनानंतर माझ्या विचारात कसे परिवर्तन झाले ते एका रूपकाच्या सहाय्याने पुढे स्पष्ट केले आहे.

रेशमाच्या किड्याचे जीवनचक्र

एका छोट्या अंड्यातून अळी बाहेर येते. पाने कुरतडून खाणे एवढी एकच क्रिया ती करत असते. पानातून तिला मिळणाऱ्या जीवनरसाचे सात्मीकरण करून ती आकाराने मोठी होते. तिला ज्या अंतिम रूपात व्यक्त व्हायचे आहे त्यासाठी तिचा आतून जो विकास होणे आवश्यक आहे तो अजून पूर्ण झालेला नसल्यामुळे ती कात टाकते. जीवनरसाची प्राप्ती आणि सात्मीकरण करून अभिव्यक्तीच्या सामर्थ्याचा विकास होईपर्यंत ती ३-४ वेळा कात टाकते. आता ती कोष विणण्याच्या तयारीला लागते. ही क्रिया समजून घेण्यासारखी आहे. कोषाचा सगळ्यात बाहेरचा थर (स्तर) सगळ्यात आधी विणला जातो. नंतर अळी स्वत:ला त्यात कोंडून घेत त्याच्या आतले थर (स्तर) बनविते. सर्वात शेवटी पूर्ण बंदिस्त होऊन 'दृष्टीआड' होते. तिच्या अंड्यात समाविष्ट असलेल्या आराखड्याप्रमाणे तिचे रूपांतर पूर्ण झाले की ती पाखरू म्हणून नवीन रूपात पुन्हा व्यक्त होते.

ही अळी, हा प्राथमिक अवस्थेतील एक सजीव आहे. पाप-पुण्य, चांगलं-वाईट, वासना यासारख्या गोष्टी तिच्या जाणिवेला स्पर्श करत नाहीत. तिचा छोटासा जीवनक्रम स्वच्छ जाणीव (श्रीअरविंदांच्या भाषेत अंत:श्चेतना आणि श्रीज्ञानेश्वरांच्या भाषेत अनुहताकडून येणाऱ्या थेट सूचना) पार पाडते. निम्नस्तरीय प्राण्यांची जाणीवही प्रतिक्षिप्त क्रिया आणि निवडक प्रतिसादाच्या मर्यादेत वावरत असते.

मानवी जीवन खूपच गुंतागुंतीचे असते. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, बुद्धि, मन, सवयी, आवडनिवड, कल, वासना, षडरिपु, भावना, भावविश्व, समाज-जात-धर्म-पंथ, शिक्षणाचे संस्कार अशा विविध गोष्टींच्या संपर्काने निर्माण होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया आणि त्यातून होणारी आचारविचारांची जडणघडण यांचा आपल्या वर्तनावर परिणाम होत असतो. त्यामुळे पाखराच्या जीवनासारखी दोनचारदा कात टाकून आणि एकदा दृष्टीआड होऊन आपली अभिव्यक्ती पूर्ण होत नाही.

आता अळीचे कात टाकणे आणि दृष्टीआड होणे याचा मृत्युभय निरसनाशी असलेला संबंध पाहू. अळीचे कोषात दृष्टीआड होणे ही क्रिया देहत्याग सुचवते. तर अळीचे कोषात शिरणे ही क्रिया स्वसंवेद्य जाणिवेचे अचेतनात होणाऱ्या 'समावेशनाची' गोष्ट सांगते. त्या अळीप्रमाणेच चेतना एक एक बुरखा पांघरत, मर्यादित होत अचेतनात कोंडून घेते. ज्या क्रमाने आत शिरते त्याच्या उलट क्रमाने एक एक बुरखा फेडून टाकत तिला आपला स्वसंवेद्यतेचा उच्च स्तर गाठायचा असतो. तीच उत्क्रांती होय. कोषात शिरल्यावर जाणिवेला चैतन्याकडून येणाऱ्या जाणीवयुक्त प्रकाशाच्या उपलब्धीपासून मुकावे लागते. अंधारमय कोठडीतून अंधुक प्रकाशात वाटचाल करण्याची खडतर साधना करावी लागते. जडापासून निम्नस्तरीय प्राण्यांपर्यंतचे संवेदन-प्रतिसाद हे उच्च चेतनेच्या अधिपत्याखाली असतात. (आपले पोट दुखले तर कोणते गवत खावे हे कुत्र्या-मांजरांना हुकमीपणे कळते) ज्ञानेंद्रिये-कर्मेंद्रिये यांचा विकास त्यातून घडत असतो. माणसाचा देह आईच्या पोटात तीच चेतना घडवते. पण नंतरच्या जीवनात संवेदनक्षमता वाढविणे आणि प्रतिसादाचे स्वरूप बदलून जाणिवेला अधिकाधिक उच्च स्तरावर नेणे हे कार्य करण्याची स्वायत्तता माणसाला दिलेली आहे. त्यासाठीच नियती विविध परिस्थितीत पुन्हा पुन्हा जन्म घेण्याचे स्वातंत्र्य देते. आता कात टाकण्याची क्रिया कशी होते? किती पातळ्यांवर होते? याची गुंतागुंत समजण्यासाठी पुढील उदाहरणे वाचा.

★ एक १०-१२ वर्षांचा मुलगा त्याच्या आजीबरोबर पुण्यात मैदानावर फेरफटका मारत असतो. आजी म्हणते, ''हा बघ, समोरून हॉर्नबिल गेला.'' मुलगा म्हणतो, ''तुझी पक्षी ओळखण्यात चूक झाली असेल. हॉर्नबिल हिमालयाच्या जवळपास असतात.'' हा प्रतिसाद मर्यादित ज्ञानातून आलेला आहे.

★ 'पहा, दसरा आहे तर वाहनाला हार तर सोडाच, दाराला तोरणसुद्धा लावलं नाही. फॉरिन रिटर्नड आहेत ना!'

आपल्या मान्यतांच्या मर्यादाग्रस्त नजरेने दुसऱ्याच्या वर्तनाचे केलेले हे निरीक्षण आहे. त्यापेक्षा आपल्या वर्तनातील 'मुसळे' शोधणे जाणिवेच्या विकासाला पोषक ठरेल.

★ प्रगल्भ मन, उत्तम सामाजिक भान असलेली एक परधर्मीय व्यक्ती, पुनर्जन्माबद्दल बोलताना म्हणते "माझ्या धर्माला पुनर्जन्म मान्य नाही. पण असेल तर.... मला अमुक व्हायला आवडेल." धर्मसंकल्पनांची बीजं खोलवर रूजलेली असतात. जाणीव विकासातील त्या मर्यादा आहेत आणि आपण त्याच्या पलिकडे जायचं आहे हे मान्य होणं फार अवघड असतं.

★ पोषणशास्त्र विषयाची तज्ज्ञ महिला चेन्नईहून पुण्यात प्राध्यापिका म्हणून येते. चाळीशीच्या सुमारास तिच्या हातापायांवर सूज येऊ लागते. आतापर्यंत ती पुण्यात स्थिरस्थावर झालेली असते. तिच्या मैत्रिणीच्या 'वैद्य' नवऱ्याकडे ती नेहमीप्रमाणे औषध घ्यायला जाते. तिला आजार झाला आहे हे कळल्यावर तिच्या ओळखीचे दाक्षिणात्य कुटुंब तिला रविवारी भेटायला येते. त्यांच्यासाठी ती दाक्षिणात्य पदार्थ - इडली-वडा-सांबार-लेमनराईस बनवते आणि स्वत:साठी मुगाची डाळ घालून खिचडी बनवते. ते पाहून पाहुणे कुटुंब तिला इडली-सांबार खाण्याचा आग्रह करत. "तू हेच खाऊन लहानाची मोठी झाली आहेस. मग आज ते सोडून देण्याची गरज काय?" वैद्यांच्या दृष्टीने इडली-सांबार संधिवातासाठी त्याज्य आहे. तिच्या ज्ञानानुसार इडली हे उत्तम अन्न आहे.

तिने इडली खाणे सोडले असेल की नसेल, हे ती कोणत्या विचाराला मान्यता देते, प्राधान्य देते, कशावर विश्वास ठेवते, परिचितांच्या आग्रहाला त्यांचा मान राखण्यासाठी बळी पडते का? अशा अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. कुत्र्या-मांजरांना जी अंत:श्चेतना मार्गदर्शन देते ती आपल्यालाही देत असते. पण त्या सूचना आपल्या बुरखाग्रस्त जाणिवेला समजत नाहीत. मुळात आपले ज्ञान, शैक्षणिक, सामाजिक, भौगोलिक अशा विविध संदर्भातून निर्माण झालेले संवेदनाचे आणि प्रतिसादाचे ढाचे, याच आपल्या विकासातल्या मर्यादा आहेत हेच आपल्याला माहिती नसते आणि आपली अंत:श्चेतना आहे आणि ती या सर्वाहून उच्च पातळीवर आहे हे सुद्धा आपल्याला माहिती नसते. म्हणून अनेक प्रभावक्षेत्रांमध्ये एकत्रित वावरताना या गोष्टींकडे आपले पूर्ण दुर्लक्ष होते. यामुळे आपल्या शरीरस्वास्थ्यासाठी आणि जाणिवेच्या विकासासाठी आवश्यक असलेले कात टाकण्याचे काम आपण करू शकत नाही. परिणामी संवेदनक्षमता वाढणे आणि प्रतिसादात योग्य बदल होण्याची क्रिया कुंठित होते. आपले जड शरीर जिवंत राहण्यासाठी घडणाऱ्या विविध क्रिया करणारी प्राणशक्ती आणि मन, बुद्धी, चित्त या पातळीवर कार्यरत असलेली मन:शक्ती अशा तीनही पातळ्यांवरची जाणीव एकाच वेळी कार्यरत असते म्हणून हे काम खूप गुंतागुंतीचे होते.

★ आपण योग्य दिशेने बदललो नाही तर वेगवेगळ्या जन्मात पुन्हा तशाच प्रकारच्या समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागते.

व्यसनाधीन झालेल्या माणसांना व्यसनमुक्ती-केंद्रात ठेवले तर सगळे कायमचे व्यसनमुक्त होतातच असे नाही. जे व्यसनमुक्त होत नाहीत त्यांना धडा शिकण्याची संधी नियतीकडून पुन्हा पुन्हा उपलब्ध होते.

'माझं जगणं' त्या गोष्टीवर अवलंबून आहे किंवा विविध चौकटींच्या आतच माझं जीवन सुरक्षित आहे या भ्रामक कल्पनेची कात जोवर टाकली जात नाही तोवर आपल्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात. विविध अनुभवांना सामोरे जावे लागते. विविध प्रकारच्या मर्यादा ओलांडून कात टाकण्याचे काम अळीप्रमाणे देह असेपर्यंतच जाणीवपूर्वक करावे लागते. तरच आपले एक एक पाऊल स्वसंवेद्यतेच्या दिशेने पडू लागते.

असे अनुभव आणि पर्यावरणातील सर्व घटकांशी होणाऱ्या आंतरक्रियांमुळे आपल्या आत कार्यरत असलेल्या जाणिवेच्या विविध पातळ्यांवर आपला विकास होतो. संवेदनक्षमता वाढते, प्रतिसादामध्ये सकारात्मक बदल होतो. नवीन कमावलेल्या गुणवैशिष्ट्यांचे स्थिरीकरण होते. अंत:श्चेतनेला बाहेरचे वेष्टण निरूपयोगी वाटू लागले म्हणजे ती 'देह' दृष्टीआड करते. तोच मृत्यु होय.

झोपेत ज्याप्रमाणे शरीर, प्राण, मन यांच्या पातळीवर ग्रहण केलेले अन्न, औषधे, अनुभव अशा विविध गोष्टींचे सात्मीकरण होते. तसेच जीवनभर कमावलेल्या अनुभवांचे मृत्युनंतर सात्मीकरण होते. नंतर पुन्हा जन्म घेण्याची सिद्धता होते. उच्च जाणिवेच्या दिशेने जाताना अधिक प्रगत, सक्षम, परिपक्व गुणवैशिष्ट्ये व्यक्त करण्यासाठी कात टाकणे आणि मृत्यू हे चक्र सुरू राहते.

'जीवन का मतलब तो आना और जाना है।' या उथळ आणि अर्थहीन तत्त्वापेक्षा 'जीवन का मकसद तो चेतना मे परिवर्तन लाना है।' हे श्रीअरविंदांचे तत्त्वज्ञान मला अधिक भावते. ज्यात 'मनी मरणाचे भय कशाला? प्रगत करी जे जीवनाला' हा संदेश समाविष्ट आहे.

डॉ. नीलिमा चितळे
६१०, स्वागत रेसिडेन्सी, डी विंग, कुंबरे टाऊनशिप
कोथरुड डी.पी. रोड, पुणे ३८.
मो.: ९३२२८५८८३७

संदर्भग्रंथ : ★ श्रीअरविंद, दिव्य जीवन
श्रीअरविंद आश्रम पुडुचेरी


★ Harmony between Science & Spirituality
by Singh Sampurnanand
Vimal Prakashan, Ahmedabad, 1986

★ Art as Revelation by Wilson Frank
Centore Press Ltd., Fontwell 1981

■ ■ ■

Man is the creation of yesterday.
Sri Aurobindo came to announce the creation of to-morrow : the coming of supra mental being.

The Mother



Rediscovering Yoga

Dr. Alok Pande
M.B.B.S., M.D.
Retried as wing commander from Air Force Publication of various books poetry on Shri Ma.
Speeches on Purna Yoga in country & Abroad.

A hundred years back, Sri Aurobindo wrote prophetically:

We are in an age, full of the throes of travail, when all forms of thought and activity that have in themselves any strong power of utility or any secret virtue of persistence are being subjected to a supreme test and given their opportunity of rebirth. The world today presents the aspect of a huge cauldron of Medea in which all things are being cast, shredded into pieces, experimented on, combined and recombined either to perish and provide the scattered material of new forms or to emerge rejuvenated and changed for a fresh term of existence. Indian Yoga, in its essence a special action or formulation of certain great powers of Nature, itself specialised, divided and variously formulated, is potentially one of these dynamic elements of the future life of humanity. The child of immemorial ages, preserved by its vitality and truth into our modern times, it is now emerging from the secret schools and ascetic retreats in which it had taken refuge and is seeking its place in the future sum of living human powers and utilities.

SOY page 5

Yoga has indeed stepped out of the Ascetic's cave and entered the mainstream of human life. The rich and the poor, the small village and the busy metropolis, the sparsely furnished Ashramas and monastries as well as the rich and sprawling living rooms of the high and mighty names are all rife with Yogic symbols, be it in the form of popular books and music, pictures or icons. Yoga mats and self-help yoga techniques have become a part and parcel of human life. The reasons are of course very different, sometimes even poles apart. Those who have not been able to find a stable place in the flux ad flow of life often turn to Yoga to find some means of quick success. Matching their needs we find popular books on Yoga endorsing its power to help one achieve success and money. Whether the poor man practicing Yoga makes money or not, one thing is certain, the author of such popular series becomes rich fast enough to justify more books on Yoga as a quick road to success. On the other hand, there are others who have found what they have believed to be success in their life and yet that which they were looking for through that success continues to elude their grasp. They continue to be in the grip of fear and anxiety; agitation taking the place of peace that one often finds in simplicity; short momentary thrills of the flesh in place of an abiding joy that is the natural lot of those whose lives are touched by the breath of the Spirit. Yoga for them is seen as a panacea, at least the last answer to the final problems of life, a means for attaining peace and joy, a method to keep away diseases and suffering of various kinds at arm's length.

Both groups are keen to taste the fruits of Yoga but few are willing to pay the price. The price for Yoga is not just a coughing up of some money for a Rapidex course or an easy to do exercises of the body and mind, but something much more and far greater. Little does one realize that what is easily begotten is lost as quickly. Patience and perservance are indispensable qualities needed not only for success in any sphere of mundane life but also and even much more so in the pursuit of yoga. One needs to suspect the quality of diamond if it is being given at throw away prices. Yoga too has its price, but a price much more exacting than money, one that man is not yet fully ready to pay. As the saint-poet Kabir put it mildly, the price of sitting in the room of the Lord is to be paid by your head, referring to the ego-self that we carry as a thorny crown over our head. It is at this juncture that one remembers the other part of the prophesy or rather the word of caution given by Sri Aurobindo:

But it has first to rediscover itself, bring to the surface the profoundest reason of its being in that general truth and that unceasing aim of Nature which it represents, and find by virtue of this new self-knowledge and self-appreciation its own recovered and larger synthesis. Reorganising itself, it will enter more easily and powerfully into the reorganised life of the race which its processes claim to lead within into the most secret penetralia and upward to the highest altitudes of existence and personality. SOY Page 5-6

What then is Yoga? In Sri Aurobindo's words:

In the right view both of life and of Yoga all life is either consciously or subconsciously a Yoga. For we mean by this term a methodised effort towards self-perfection by the expression of the secret potentialities latent in the being and-highest condition of victory in that effort - a union of the human individual with the universal and transcendent Existence we see partially expressed in man and in the Cosmos. But all life, when we look behind its appearances, is a vast Yoga of Nature who attempts in the conscious and the subconscious to realise her perfection in an ever-increasing expresion of her yet unrealised potentialities and to unite herself with her own divind reality. In man, her thinker, she for the first time upon this Earth devises self-conscious means and willed arrangements of activity by which this great purpose may be more swiftly and puissantly attained. Yoga, as Swami Vivekananda has said, may be regarded as a means of compressing one's evolution into a single life or a few years or even a few months of bodily existence. A given system of Yoga, then, can be no more than a selection or a compression, into narrower but more energetic forms of intensity, of the general methods which are already being used loosely, largely, in a leisurely movement, with a profuser apparent waste of material and energy but with a more complete combination by the great Mother in her vast upward labour. It is this view of Yoga that can alone form the basis for a sound and rational synthesis of Yogic methods. For then Yoga ceases to appear something mystic and abnormal which has no relation to the ordinary processes of the World-Energy or the purpose she keeps in view in her two great movements of subjective and objective self-fulfilment; it reveals itself rather as an intense and exceptional use of powers that she has already manifested or is progressively organising in her less exalted but more general operations.

SOY Page 6

Yoga, in this sense is a methodized effort at bringing out the deeper possibilities, the latent potential that is concealed in every human being, unfelt and unused. While it is true that this deeper potential includes making our outer life and the external conditions in which we find ourselves better but that is not the prime focus of yogic endeavour. The outflowering of a human being must be as organic as anything else in Nature, which is from within outwards. An inner change gradually flowing outwards until it encompasses the outer as well is the general direction in which Yoga moves and not vice versa. Even it may be said that the inner change is primary, the basis of all the rest. A change of consciousness by changing or shifting the stress of our sense of 'I' leads quite naturally to a change of attitudes, values and perceptions, thought and cognition, feeling and emotion, the direction of our will and motivation. Finally this inner change percipitates itself sooner or later into observable external changes, a visible and perceptible difference in our way of life, our speech and actions, even in our outer body and being as if the glow of an inner lamp hitherto unlit in some secret cavern of our nature had begun to escape outside and radiate in our very enviorning consciousness. But as Sri Aurobindo reveals to us this process has two main stages involving a number of steps in each. The first stage is when the Yoga is going on subconsciously within us. Even when asleep we are still journeying towards some distant unseen shore. This phase, common to all thinking and awakened humanity is characterized by a seeking, albeit vague and indistinct, for an ideal state of being, an ideal world, an ideal condition of things. Almost as if in an opposite sense but also in a complimentary way there is also the sense of a growing dissatisfaction with who we are or believe ourselves to be, with what we have and want, with the world in general, not because we have not been able to come to grips with it but often because we have been able to wrestle with its forces well but feel something missing, something that is essential and crucial, something fundamental, even the most central. This is much like the chick being prepared inside the egg. But there intervenes another stage of human evolution when all that we have seen and felt and known and experienced and lived does not anymore hold its interest in us. We get flashes and glimpses of something from the Beyond, a feeling that we have never known upon earth, a thought that swims from some far off sphere of Beauty or a will seizes upon us attracted and drawn by some distant goal or an Ideal face which to us reveals the Godhead hidden within man and earth and becomes for us a symbol of the Eternal Truth. The Mother puts it so beautifully:

In fact, the vast majority of men are like prisoners with all the doors and windows closed, so they suffocate, which is quite natural. But they have with them the key that opens the doors and windows, and they do not use it... Certainly there is a time when they don't know they have the key, but long after they have come to know it, long after they have been told about it, they hesitate to use it and doubt whether it has the power to open the doors and windows or even that it is a good thing to open them! And even when they feel that "after all, it might be good", there remains some fear: "What will happen when these doors and windows are opened?...." and they are afraid. They are afraid of being lost in that light and freedom. They want to remain what they call "themselves". They like their falsehood and their bondage. Something in them likes

it and goes on clinging to it. They still have the impression that without their limits they would no longer exist.

That is why the journey is so long, that is why it is difficult. For if one truly consented to cease to exist, everything would become so easy, so swift, so luminous, so joyful - but perhaps not in the way men understand joy and ease. In truth, there are very few people who do not enjoy fighting. There are very few who could accept the absence of night, few can conceive of light except as the opposite of darkness: "Without shadows there would be no picture. Without struggle, there would be no victory. Without suffering there would be no joy." That is what they think, and so long as one thinks in this way, one is not yet born into the spirit.

CWM Vol 9: Page 430-431 26 November 1958:

Q) When can one say that one has truly entered the spiritual path?

A) The first sign (it is not the same for everybody) but in a chronological order, I believe, is that everything else appears to you absolutely without importance. Your entire life, all your activities, all your movements continue, if circumstances so arrange things, but they all seem to you utterly unimportant, this is no longer the meaning of your existence. I believe this is the first sign. There may be another; for example, the feeling that everything is different, of living differently, of a light in the mind which was not there before, of a peace in the heart which was not there before. That does make a change; but the positive change usually comes later, very rarely does it come at first except in a flash at the time of conversion when one has decided to take up the spiritual life. Sometimes, it begins like a great illumination, a deep joy enters into you; but generally, afterwards this goes into the background, for there are too many imperfections still persisting in you.... It is not disgust, it is not contempt, but everything appears to you so uninteresting that it is truly not worth the trouble of attending to it. For instance, when you are in the midst of certain physical conditions, pleasant or unpleasant (the two extremes meet), you say to yourself, "It was so important to me, all that? But it has no importance at all!" You have the impression that you have truly turned over to the other side.

CWM 4 page 103; 12 February 1951

The birth of this higher aspiration or to put it quite simply, the will for something higher, something more beautiful than all that we have realized and understood and experienced and lived so far, the urge to exceed the mere human formula and its routine life centered around the needs of the flesh, to go beyond even the mental formula revolving itself around concepts and percepts is the beginning of a more or less conscious yoga. Of course this start is obscure and what one calls conscious at one point of time appears unconscious at another point as we advance along the journey. Through Yoga we move from a state of unconsciousness (that is also a state of darkness and ignorance and death) towards a state of supreme consciousness. Quite naturally, when we start our journey we are identified with a certain state of consciousness and due to this limited identification we find it, due to the ego-sense the 'most luminous' state and everything else as dark compared to it. Much as a lamp knows not the sun since it is lit only in the night and anything other than what is around it is a shadow and darkness! Such is the state of our mental consciousness, an ill-lit small lamp amidst a heap of darkness around! But as Light grows and the arc of vision expands we discover what an immense darkness it was that we, in our ignorance, called light. Nevertheless, even this little light lifted towards the sky as a tongue of sacrifice, waiting for the dawn can be considered as the true starting of spiritual life, a life of yoga that would go far and deep from its modest starting point until it spreads forth and scattering all darkness within and around until nothing remains hidden and concealed under the folds of darkness and all becomes glad and pure and simple and spontaneous and free. This is the true initiation, the call and the aspiration for a greater and higher life. An outer ceremony of initiation is at best only an excuse, a concession given to man's too externalized a nature. Often it turns out to be simply an ostentatious ceremony, an excuse to sit and do nothing more than join a special cult or group of an elite humanity. But Yoga is serious work and in the end it is only a sincere aspiration to break free from the limited and limiting bounds of our nature that has the strength to persist despite the trials and tribulations offered to all seekers of a true yogic life. Heaven is not won by merely a technique followed blindly nor is God the slave of a fixed mechanical process or outer method!

"If you have a sincere aspiration to the spiritual change in your heart and soul, then you will find the way and the Guide. A mere mental seeking and questioning are not enough to open the doors of the Spirit."

(Sri Aurobindo: Letters on Yoga: SABCL Vol 22 : page 138)

Methods, Guidance, Techniques and processes are all helpful in their own place and each has its special utility but the doors of the Spirit do not open by a mere mechanical key but the will and the faith that we put behind the technique and the process. Yoga starts and works itself through the support of these two main powers in man, will and faith, and of these two, the central one is faith.

Sraddha, Sankalp, Samarpan, faith, will and surrender are the three main pillares on which the yogic life is built. On these three depends the quality of what will develop in us through the yoga. As is our faith so does the path of destiny begins to open up, and the whole universe and all the events and circumstances conspire to steer and align our life towards the direction of our faith. But where faith is supported by a one-pointed will and the efforts of our will supported by surrender to the Higher Will, then one can expect the rapid out-flowering of human into the divine. It is this Higher Will concealed within our own depths, unseen by our ego-ridden mind that puts on the human shape of a realized Master so that we may see with our mortal eyes what we cannot see otherwise except through a hard labour and hear Its voice and follow the divine leading. The Master brings us for a moment in touch with our own inmost flame by the shock of contact the hard crust of our thick outer nature parts awhile and we are face to face with the inmost Truth of our being. By letting the outer being also participate in the movement of our inner aspiration, the Master progressively helps the dense outer layer become thinner and thinner until it eventually melts and gives way to the bright and luminous body of the living Truth within us. He carries us in our journey by making it His journey. Extending beyond His being into ours and He accepts us as we are and making us part of His vast nature allows us to share in His liberty and pulled by His silent Power that is now yoked to our small and limited power of will and knowledge and love. It is even said that the Master and the Guidance appears in response to the spiritual aspiration and yearning for change, to help the spiritual endeavour which would otherwise seem like a vain and fruitless labour of Sisyphus. Mere following of a technique is not enough to unlock the doors of the spirit. We need a tangible help and few, the rarest of the rare can do away with it, of course at their own peril given the nature of yoga that often moves through unknown, dark and dangerous territories of our being. Even the luminous regions are not safe enough since they can lock the soul in their own splendor not allowing us to go beyond, dazzling us by their show of brilliant lights and power. It is only the Grace of the Master that can pull us out of such dark and bright abysses that await in ambush the seeker of the Highest.

This does not mean that there is no method in Yoga or that it is left to each one to do as he pleases and one day one will suddenly arrive by some miracle, simply by adhering to a band of faithful followers or a set of fixed unalterable rules of life. But here too one must understand and acknowledge the principle behind the method or the technique. A process or method is simply a device, tested and tried to help us navigate on the inner journey through the dense and wild jungle of our inner being. If we understand the principle then we can use it much more effectively and even be able to improvise upon it to suit our own unique conditions. But when we do not understand the main principle, then we may even land up in much error or rigidity, even bordering onto a religious fundamentalism. When in doubt we need to refer back to the principle. The principle is important and indispensable. It is the solid foundation ground on which the inner temple of life is built. The techniques are dispensable or at best only subordinate elements. When the focus is too much on the external element, then we are close to forming a cult or a religion but where the stress is on the inner principles then we nourish the true spiritual life.

In other words Yoga can be viewed at three or four different levels. The first and the most external, though in actual priactice less important is the technique, often termed as exercises or kriyas. Yet to the unchaste and the uninitiated this appeals the most. It is visible, concrete, externally observable and measurable. The physical mind of man often looks for some such outer support and given that often believes it is enough. Close behind it is the inner psychological operations of yoga, subtle and less easily comprehensible, often not understood or ill-understood by grosser minds and therefore ignored as if the outer technique were enough. The Mother puts it a bit humorously, that some people meditate as if they were paying a debt to God. When asked specifically about the issue, She clarified:


The number of hours spent in meditation is no proof of spiritual progress. It is a proof of your progress when you no longer have to make an effort to meditate. Then you have rather to make an effort to stop meditating: it becomes difficult to stop meditation, difficult to stop thinking of the Divine, difficult to come down to the ordinary consciousness. Then you are sure of progress, then you have made real progress when concentration in the Divine is the necessity of your life, when you cannot do without it, when it continues naturally from morning to night whatever you may be engaged in doing. Whether you sit down to meditation or go about and do things and work, what is required of you is consciousness; that is the one need, - to be constantly conscious of the Divine.

Q) But is not sitting down to meditation an indispensable discipline, and does it not give a more intense and concentrated union with the Divine?

A) That may be. But a discipline in itself is not what we are seeking. What we are seeking is to be concentrated on the Divine in all that we do, at all times, in all our acts and in every movement.

Dr. Alok Pande

■ ■ ■



ईश्वर

डॉ. ल. ग. चिंचोळकर
योगी श्रीअरविंदांचे अभ्यासक

श्रीअरबिंद तत्त्वज्ञानात अनेकदा 'ईश्वर' या संकल्पनेचा उल्लेख आलेला आहे. ईश्वराचे त्यांच्या तत्त्वज्ञानात कोणते स्थान आहे? त्याचे स्वरूप कसे आहे? त्याचा जीव व जगताशी काय संबंध आहे इत्यादीचा विचार या संदर्भात महत्त्वाचा आहे.

श्रीअरविंदांच्या मते 'ईश्वर' सर्वव्यापी, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे. विश्वातील सर्व घटक त्याच्याच शक्तिमुळे व्यक्त होतात. सर्वांचा निवास त्याचेच ठिकाणी असतो. तो शक्तीचे उगमस्थान आहे. त्यामुळे अर्थातच ज्याप्रमाणे तो विश्वातीत आहे त्याचप्रमाणे तो विश्वांतर्गतसुद्धा आहे. त्यालाच ब्रह्म वा श्रेष्ठ पुरुष असेही म्हणतात. तो अमर्याद, अनंत व सत्‌रूप आहे. तो अनेक रूपात व्यक्त होत असला तरी तो त्यामुळे बद्ध नाही. तो स्वयंपूर्ण व स्वत:सिद्ध आहे. तो आनंद, सौंदर्य व दिव्यरूप आहे. सर्व विश्वाचा रक्षणकर्ता व आधार आहे.

जर ईश्वराचे असे स्वरूप आहे तर भिन्न देवतांचा त्याच्याशी कोणता व कसा संबंध आहे? त्यांच्या मते भिन्न भिन्न देवता ईश्वराच्याच शक्तीची वेगवेगळी रूपे आहेत. विशेषत: अधिमानस चेतना देवतांचे निवासस्थान आहे. भिन्न भिन्न देवता त्यांच्या चेतनास्तरानुसार असतात. भौतिक, प्राणमय किंवा मनोमय भूमिकेवरसुद्धा त्यांचा निवास असतो. परंतु या कनिष्ठ देवता असतात. आपण पूर्वी उल्लेख केल्यानुसार अतिश्रेष्ठ देवतांचे निवासस्थान म्हणजे अधिमानस होय. या सर्व देवता अतिमानसाच्या भूमिकेतून एकात्मरूपच असतात. कारण अतिमानस चेतना एकात्मरूप असते. परंतु अधिमानस स्तरावर त्या भिन्न रूपात प्रकट होतात. कोणतीही देवता भौतिक स्तरावर अवतरीत होऊन उत्क्रान्तीक्रमामध्ये सहभागी होऊ शकते. अंतिम सत्य स्वरूप जीव, जगत् आणि ईश्वर या तीन रूपात व्यक्त होत असते. शिवाय जीव व जगत् ईश्वराच्या अंगभूत चेतना असतात. त्यामुळे जीव, जगत् वा ईश्वरामध्ये अंतिम चेतनेच्या संदर्भात केवळ एकात्मताच आहे. त्यात कोणताच विरोध नाही. परंतु याची प्रचीती मात्र आत्मसाक्षात्कारानेच होऊ शकते, कारण तर्काचे माध्यम या दृष्टीने अपुरे आहे.

ईश्वर व्यक्तिरूप किंवा धर्माधिष्ठित नाही कारण तो तसा असल्यास निरपेक्ष सत्य प्रकट करण्याच्या बाबतीत तो असमर्थ ठरेल. अर्थातच त्याचे कोणतेही निवासस्थान राहणार नाही. तो वैकुंठात किंवा कैलास पर्वतावर राहत नाही. तो सगुणही नाही किंवा निर्गुणही नाही. तो त्यांच्या अतीत आहे. तो त्याद्वारे काही प्रसंगी अभिव्यक्त होत असला तरी ते त्याचे मूळ स्वरूप नाही. अंतिम सत्य म्हणजे ईश्वरच होय. त्यालाच ब्रह्म असेही म्हणतात. तोच जगताचा निर्माता आहे. याचा अर्थ त्याची सगुण भक्ति करता येत नाही असा नाही. कारण त्याचा साक्षात्कार कोणत्याही रूपात होऊ शकतो. फक्त तो त्या रूपाने बद्ध होत नाही इतकेच. जे जे आहे ते ते सर्व त्याचीच अभिव्यक्ति असल्याने कोणत्याही प्रकारे साधकाने उपासना केली तरी अंतिमत: ती ब्रह्माचीच उपासना असते.

अनेकदा ब्रह्म सगुण आहे की निर्गुण आहे याबाबत भिन्न मते आढळतात. श्रीअरविंदांच्या मते सगुण वा निर्गुण ब्रह्मामध्ये विरोध असण्याचे कारण नाही, कारण दोन्ही त्याच्याच अभिव्यक्ती असतात. काही पंथ ईश्वराला व्यक्तिरूप मानतात. ईश्वराचे स्थान, देवदूत, त्याचे राजवाडे इत्यादिकांचे वर्णन आढळते तर काही अशा व्यक्तिरूप ईश्वराची संकल्पना मान्य करीत नाहीत. श्रीअरविंदांच्या मते दोन्ही दृष्टिकोन अविरोधी आहेत. कारण ईश्वर जरी सर्व गुण वा संबंधाच्या अतीत असला तरी साधकाच्या भक्तीनुसार तो सगुण वा निर्गुण स्वरूपात व्यक्त होऊ शकतो. मानवी मनाच्या मर्यादित चेतनेमुळे अशा प्रकारचे वाद निर्माण होत असतात. परंतु दिव्यतर चेतनेमध्ये उत्क्रान्त झालेल्या साधकाला असे वाद व्यर्थ आहेत असे जाणवते.

या संदर्भात हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे की श्रीअरविंदांच्या दर्शनानुसार ब्रह्म व ईश्वर भिन्न नाहीत कारण सगुण ब्रह्म म्हणजेच ईश्वर व असा ईश्वर निर्गुणाहून मूलत: भिन्न नाही. तो गुणातीत, मायातीत आहे. त्याचप्रमाणे तो निर्गुणातीतसुद्धा आहे. त्यांच्या मते स्थिर (Silent) ब्रह्माचे क्रियात्मकरूप (dynamic aspect) म्हणजेच ईश्वर. ईश्वर म्हणजेच अतिमानस. आदिशक्ति ईश्वराची शक्ति असून जीव व जगत् त्याचेच अंशभूत घटक आहेत.

ईश्वराची अनुभूती आपल्याला कशी होते? तशी अनुभूती शक्य आहे काय? श्रीअरविंद स्पष्ट करतात की कोणत्याही धर्माद्वारे (religion) किंवा बुद्धीद्वारे (Rationality) ईश्वराचे ज्ञान प्राप्त होत नाही. कारण बुद्धिनिष्ठ धर्मामध्ये भावनेची सखोलता आणि आध्यात्मिक वैशिष्ट्ये राहणार नाहीत. यादृष्टीने कोणताही धर्म वा बुद्धी ब्रह्माच्या अनुभूतीबाबत असमर्थ आहे. केवळ अनुभूती हाच मार्ग आहे. परंतु त्यासाठी बौद्धिक चेतनेच्या अतीत जाणे आवश्यक आहे. ते अशक्य नाही परंतु कठीण आहे. त्यासाठी दृढ इच्छा, पावित्र्य व अनुभूतीचा मार्ग अपरिहार्य आहे.

परंतु याचा अर्थ बुद्धीला अध्यात्मसाधनेत स्थान नाही असा होत

नाही. तिच्या मर्यादा आहेत इतकेच. त्यामुळे तिचे स्थान दुय्यम आहे. ती साधकाला गोंधळात टाकते. अर्धसत्य व भ्रमात्मक युक्तिवादात गुंतविते. बऱ्याच वेळा स्वतःच्या मर्यादांमुळे त्यांच्या उन्नतीला बाधक ठरते. म्हणून श्रीअरविंद साधकांकडून संपूर्ण शरणागतीची अपेक्षा करतात. कारण त्यामुळे ईश्वराचे साधन बनण्यात सर्वश्रेष्ठ आनंद आहे याची त्यास जाणीव होते. त्याचप्रमाणे संपूर्ण शरणागती बरोबरच निष्काम समर्पण-भावसुद्धा महत्त्वाचा आहे. इतकेच नव्हे तर साधकाने मुक्तिचीसुद्धा कामना करू नये. कारण मुक्ती वा मोक्षाची कामना हीसुद्धा एक कामनाच आहे. जे काम करावयाचे किंवा जे काही प्राप्त करावयाचे ते सर्व ईश्वरच ठरवेल अशी निष्कामवृत्ती महत्त्वाची आहे. श्रीअरविंदांच्या मते आत्मसमर्पण करणे हेच साधकाचे कार्य व तोच त्याचा मार्ग. जर त्याला हे शक्य नसेल तर त्याने अतिमानसाच्या अनुभूतीची आशा करू नये.

परंतु साधना करण्यासाठीसुद्धा कामना आवश्यक असते. त्याशिवाय साधना शक्य कशी होणार? यासाठी श्रीअरविंद वासनाशुद्धीचा उपाय सुचवितात. कारण वासनाशुद्धीशिवाय संपूर्ण शरणागती शक्य नाही व संपूर्ण शरणागतीशिवाय आत्मविलोपन शक्य होणार नाही. अशा आत्मविलोपनामुळे निष्काम साधना शक्य होईल. शिवाय त्याबरोबरच आत्मसमर्पण आणि वासनाशुद्धी आवश्यक आहे. आध्यात्मिक साधनेद्वारे ईश्वर प्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्यांसाठी अशी पूर्वतयारी अत्यावश्यक आहे. अन्यथा मनोसापेक्ष मर्यादांमध्ये साधक गुंतून राहण्याची शक्यता बळावते.

याबाबत असा प्रश्न निर्माण होतो की माणसाला भिन्न पर्यायातून निवड करण्याचे स्वातंत्र्य नसेल तर त्याच्या आध्यात्मिक उन्नतीत यांत्रिक अपरिहार्यता यापेक्षा भिन्न अर्थ राहणार नाही. म्हणजेच मानवाला इच्छास्वातंत्र्य आहे काय की तो केवळ नियतीवर अवलंबून आहे? जर संपूर्ण शरणागती साधनेमध्ये आवश्यक असेल व आदिशक्तीची कृपा हीच साधनेची फलश्रुती असेल तर मानवाने अध्यात्मसाधना का करावी? श्रीअरविंद मानवाचे इच्छास्वातंत्र्य स्वीकारतात की नाही असा प्रश्न निर्माण होतो.

श्रीअरविंदांच्या मते स्वातंत्र्य व नियतिवाद परस्परविरोधी नाहीत. एकाच शक्तिची ती भिन्न रूपे आहेत. किंवा एकाच शक्तीकडे पाहण्याचे ते भिन्न दृष्टिकोन आहेत. मनुष्यावर परिस्थितीचा परिणाम होत असला तरी तो तिचा दास आहे असे म्हणता येणार नाही. तो परिस्थिति बदलवू शकतो. स्वातंत्र्यसुद्धा समष्टीरूप ईश्वरी संकल्पाचे (All-will) एक रूप आहे. याची आपल्याला नेहमीच जाणीव नसते. ही जाणीव जेव्हा नसते तेव्हा आपण वासनांचे दास होतो. स्वातंत्र्यसुद्धा निरपेक्ष नसते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

असे असले तरीही ईश्वरकृपेवर विश्वास ठेवणाऱ्यांची अध्यात्म-साधनेत श्रीअरविंदांच्या मते लवकर प्रगति होते. कारण त्यामुळे त्याचा अहंकार मर्यादित होतो व त्याप्रमाणात समर्पणभाव विकसित होतो. त्यामुळे त्यांच्या मते अध्यात्मसाधनेत बुद्धीपेक्षा भावनेचे स्थान महत्त्वाचे आहे. आध्यात्मिक उत्क्रांतीसाठी संपूर्ण समर्पण आवश्यक असले तरी ते स्वेच्छेने होणे महत्त्वाचे आहे. कारण त्याशिवाय अतिमानस-चेतनेचे अवतरण होऊ शकणार नाही. याचसंदर्भात ते स्पष्ट करतात की निष्क्रियता म्हणजे मात्र समर्पण नव्हे. अध्यात्मसाधनेतील समर्पण ज्याप्रमाणे स्वेच्छेने व्हावयास पाहिजे त्याप्रमाणे ते परिपूर्ण (unreserved) असणे आवश्यक आहे.

श्रीअरविंदांनी स्वातंत्र्य व नियतिवाद यामध्ये अध्यात्मसाधनेच्या संदर्भात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. तरी त्यासाठी आदिशक्तिची कृपा-मानवी प्रयत्न नव्हे मोक्षप्राप्तीसाठी आवश्यक मानलेली आहे. भौतिक चेतनेच्या स्तरावर स्वातंत्र्याचे (Freedom of will) महत्त्व मान्य करण्यात आले असले तरी अध्यात्मसाधनेत त्याच्या मर्यादा त्यांनी स्पष्ट केल्या आहेत.


संदर्भ :

1) L.D.P. 172
2) "Ishwar is supracosmic as well as intracosmic; He is that which exceeds and inhabits and supports all individuality. He is the supreme and universal Brahman, the Absolute, the Supreme Self, the Supreme purush" (L.D.P.P. 417, 418)
3) "Ideal and Progress" P.P. 9-26
4) L.D.P. 331

डॉ. ल. ग. चिंचोळकर, नागपूर

श्रीअरविंद दर्शनमधून साभार (पुनर्मुद्रित)

■ ■ ■



श्रीअरविंद वंदना


लाभो पुनश्च तो मोद

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम. बी. एड.
सेवानिवृत्त शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय

वंद्य वंदे मातरम्। तुज राष्ट्रभूमि वंदना।
वेदांतगंगे माउलि दे स्तन्य! धृति पुरूषोत्तमा!
धन्य 'पराशर-व्यास-वाल्मिकी' ऋषि संस्कृति उद्गाते
देववाणी-गीर्वाणभारती विश्वभरी प्रिय होते।
ज्ञानयज्ञकर, संस्कृति प्रसार, मानवमनी उत्क्रांति,
ह्या कलियुगीहि विश्वप्रेम गुण 'पूर्णयोग' प्रचिती!
'अंतःशुद्धि' ध्यास मानवी अवतरू दे 'अतिमानस'
'अरविंदाश्रम' 'वेदपुरीत' त्या दिव्यशक्ति नितवास
सैतानी शक्तींचे तांडव महायुद्ध थरकवी जगता
तेव्हा राहुन अध्यात्मबले परतविला शत्रू पुरता
'अढळ ध्रुव' अध्यात्मगगनी, पथनिदर्शक ओज ते
निर्मिका, संवर्धका, संरक्षका, मनःशांति दे।
गुणगंभिरा, तेजोमया, विश्वात्मका तुज वंदना!
सत्य सुंदर मंगला 'अतिमानस' साधक वंदना!
भगवंताला प्रथम लाभला विश्वनिर्मिती आनंद
स्वप्न 'गुरूं'चे जगउत्थापन लाभो पुनश्च तो मोद!
।। तस्मै श्री गुरवे नमः ।।

■■■



ऑरोविल : एक उषानगरी

श्री. श्रीकृष्ण माधव दीक्षित

बी. कॉम., एल. एल. बी., निवृत्त शाखा - प्रबंधक, बँक ऑफ इंडिया
श्रीअरबिंदो आश्रम, दिल्लीशी २२ वर्षांपासून संबंधित.
स्वाध्याय शिबिरांसाठी समन्वयक म्हणून गेले ८ वर्षे कार्यरत.

महायोगी श्रीअरविंदांचे बालपणीचे टोपण नाव ऑरो असे होते. त्यांच्या या नावाने साधनालयाच्या स्वरूपात एक नगर वसवण्याचे स्वप्न माताजींच्या मनात होते. ही संकल्पना एका विशाल पायावर उभी होती. श्री माँना वाटले - एक अशी जागा असावी की जी कुणा एकाची, एका समूहाची वा एका देशाची नसावी, किंबहुना ते नगर साऱ्या विश्वाचे असावे. १९६५ साली आलेला हा विचार फेब्रुवारी १९६८ साली प्रत्यक्षात आला. पाँडिचेरी हा एक केंद्रबिंदू मानून त्याच्याभोवती एका नव्या जगाच्या उभारणीचा प्रारंभ झाला. २८ फेब्रुवारी १९६८ रोजी या अरविंदनगरीच्या पायाभरणीचे उद्घाटन झाले. त्यासाठी जगभरातील १२४ देशांचे प्रतिनिधी आपापल्या देशातील मूठमूठ माती घेऊन आले होते. या मंगल प्रसंगी श्री माताजींनी निवदेन केले होते, ''सदिच्छा बाळगणाऱ्या जगातील साऱ्या व्यक्तींना ऑरोविलकडून शुभेच्छा ! अध्यात्मिक प्रगतीसाठी तहानलेल्या आणि उच्चतर व सत्यतर जीवनाची आकांक्षा बाळगणाऱ्या साऱ्या मंडळींना ऑरोविलला येण्याचे निमंत्रण आहे !''

१९६८ साली सुरू झालेले हे ऑरोविलमधील कार्य २००८ मध्ये मातृमंदिर निर्मिती होऊन पूर्ण झाले.

ऑरोविलमधील शक्तीस्थल म्हणजे मातृमंदिर. या मातृमंदिरा-संदर्भात एक अतिशय हृद्य व तितकीच सत्य घटना सांगितली जाते. श्री माँ व श्रीअरविंद यांची शिकवण म्हणते की, प्रत्येक चल, अचल वस्तुमात्रात चैतन्य असते, अगदी गवताच्या पात्यापासून ते मातीच्या ढेकळापर्यंत, कारण जडातल्या या साऱ्या गोष्टी म्हणजे परमेश्वरी चैतन्य शक्तीचा आविष्कार आहे.

सदर मातृमंदिर उभारण्यासाठी जी जागा श्री माँनी निर्धारित केली होती त्या जागेपासून अगदी जवळच एक विशाल असे बनयनचे झाड (वटवृक्ष) अनेक वर्षांपासून उभे होते. मातृमंदिर उभारणीच्या संबंधातील तंत्रज्ञांनी श्री माँना सांगितले की या वृक्षाची मुळे लांबवर जात असतात. त्यामुळे मातृमंदिराचा पाया व त्यातील इमारतीला या वृक्षामुळे धोका पोहोचू शकतो, तेव्हा तो वृक्ष आपल्याला तोडायला हवा.

तंत्रज्ञांच्या मनातले हे विचार त्या वृक्षापर्यंत कसे पोहोचले कुणास ठाऊक पण ती कार्यवाही होण्याच्या अगोदरच तो वृक्ष श्री माँच्या स्वप्नात आला व त्याने श्री माँना विनंती केली की त्याच्यावर असे हत्यार चालविले जाऊन त्याचे जीवन संपवले जाऊ नये. त्यावेळेस मग श्री माँनी त्याला त्याच्या मुळांद्वारे वा इतर कारणांनी मातृमंदिराला धोका निर्माण न होऊ देण्याचे आवाहन केले व त्यानेही श्री माँना तसे अभिवचन दिले. जडातल्या चैतन्याने परमेश्वरी चैतन्याला दिलेले आश्वासन फोल कसे ठरेल? सत्य संकल्पाचा दाता परमेश्वर असतो. त्यानंतर मातृमंदिराच्या उभारणीचे काम सुरू होऊन पूर्णही झाले व श्री माँच्या आशिर्वादाने तो डेरेदार असा विशाल बनयानचा वृक्ष आजही दिमाखाने व नम्रपणे मातृमंदिराशेजारी उभा आहे. आजही ऑरोविल व मातृमंदिराला भेट देणारा प्रत्येक जण त्या बनयान वृक्षाकडे अचंब्याने पाहून त्याच्या शीतल सावलीचा अनुभव घेतो व परमेश्वरी चैतन्यापुढे नतमस्तक होतो.

अशा महत्तम घटना एक जाणीव निर्माण करतात, की जळी स्थळी काष्ठी पाषाणी जे तत्त्व भरलेले असते ते म्हणजे फक्त भगवंताचे अस्तित्वच होय !

या मातृमंदिराची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्याचे ४ भव्य खांब (pillers)/भाग म्हणजे दक्षिणेकडे महेश्वरी, उत्तरेकडे महाकाली, पूर्वेकडे महालक्ष्मी व पश्चिमेकडे महासरस्वती असे होत. या मातृमंदिराच्या सभोवताली १२ ध्यानकक्ष बनवले गेले आहेत. मातृमंदिर पुष्पाच्या १२ पाकळ्या - त्या म्हणजे Sincerity, Humility, Gratitude, Perseverance, Aspiration, Receptivity, Progress, Courage, Goodness, Generosity, Equality and Peace. (सत्यनिष्ठा, विनम्रता, कृतज्ञता, प्रयत्नशीलता, अभीप्सा, ग्रहणशीलता, प्रगति, साहस, शुभभाव, उदारता, समानता आणि शांती) असे हे ध्यानकक्ष होत.

या मातृमंदिराच्या सभोवताली १२ विविध अंतर्गत बगीच्यांची निर्मिती करून त्यांनाही अत्यंत समर्पक अशी नावे प्रदान करण्यात आली आहेत. ध्यानकक्षांची व बगीच्यांची ही समर्पक नावे आपल्याला आपल्या अस्तित्वाची यथार्थ जाणीव करून देत राहतात. घुमटाकार मातृमंदिरात मधोमध केंद्रस्थानी ७० सें. मी. व्यासाचे एक शुद्ध स्फटिक ठेवण्यात आलेले आहे. अवकाशातून त्यावर पडणारे आशीर्वादाचे सूर्यकिरण तुमच्या चेतनेला जागृत करून दिव्यत्वाची जाणीव सातत्याने करीत राहतात आणि तुमचे ध्येय निर्देशित करीत असतात.

पाँडिचेरीपासून सुमारे ८ कि. मी. चेन्नई रोडवर ही उषानगरी वसलेली आहे. या नगरीची एक वेगळी सनदपण (Charter) तयार

करण्यात आलेली आहे. ती अशी –


- Auroville relonges to nobody in particular, Auroville relonges to humanity as a whole. But to live in Auroville one must be a willing servitor of the Divine Consciousness.
- Auroville will be the place of an unending education of constant progress and a youth that never ages.
- Auroville wants to be the bridge between the Past and the future. Taking advantage of all discoveries from without and from within, Auroville will boldly spring towards future realisations.
- Auroville will be a site of material and spiritual researches for a living embodiment of an actual Human Unity.

मूळ संकल्पना श्रीमाताजींची असलेल्या या उषानगरीचे आरेखन रॉजर अँगर या वास्तुतज्ज्ञाच्या संचाने केले आहे. सुमारे २० चौ. मैल भूमीवर ही चक्राकार साधनानगरी वसवली गेलेली असून सध्या ४५ देशातील २५०० साधक त्या ठिकाणी कायम वास्तव्य करून असतात. ज्ञानाच्या माध्यमातून कर्मशील बनावे व कर्म ज्ञानवान व्हावे अशा प्रेरणेने ऑरोविलची वाटचाल चालू आहे. शून्यातून निर्माण झालेल्या व होत असलेल्या या अरविंदनगरीच्या संकल्पनेला युनेस्कोने मान्यता दिलेली आहे. भारताच्या भूमीवर निर्माण झालेले असल्यामुळे भारत सरकारने ऑरोविलला act of parliament च्या अंतर्गत स्पेशल स्टेटस प्रदान केलेले आहे.

ऑरोविल हे विविध सरोवरे व वृक्षराजींनी नटलेले असून मातृमंदिर हा त्याचा आत्मा आहे. कर्माच्या माध्यमातून साधना करण्याच्या संकल्पनेच्या अंतर्गत शेती, पुस्तकालय, संगीत, शिल्पकला, साहित्य निर्मिती इ. असे विविध उपक्रम येथे राबविले जातात. ऑरोविलची ही नगरी समग्रतेने निर्माण होऊन परिपूर्ण झाली की त्यामध्ये कमीत कमी ५०००० कर्मयोगी साधक सामावले जातील, अनेकांना रोजगार उपलब्ध होईल, अनेकविध शैक्षणिक तथा व्यावसायिक संस्था आकार घेतील असे उद्दिष्ट ठेवले गेले आहे आणि तरीही इथले सारे उपक्रम (activities) हे व्यावहारिक पातळीवर न होता पूर्णपणे आध्यात्मिक पातळीवर चालतील याकडे कटाक्ष असणार आहे, याच कारणासाठी ऑरोविलच्या या उषानगरीमध्ये सारेजण फक्त पदविरहित साधक-सेवक म्हणून कार्यरत आहेत.

एक सार्वदेशीय सांस्कृतिक उपनगर असणे एवढेच या उषानगरीचे मर्यादित उद्दिष्ट नाही. एकात्म जीवनाचा आराखडा करून जाणीवपूर्वक उत्क्रांती साधून जीवनाचे सर्वांगीण परिवर्तन करण्यासाठी/होण्यासाठीही भूमी तयार करण्याचे कार्य ऑरोविलमध्ये सातत्याने चालू आहे.

आंतरराष्ट्रीय ऐक्याच्या आसनावर मानव्याची मंगल पूजा बांधून, निरंतर शिक्षण, सतत प्रगती व अम्लान तारुण्य यांच्या माध्यमातून एक देवघर ऑरोविलच्या रूपात अवतरले आहे. १९७१ साली श्री माताजींनी ऑरोविलला एक symobol (संज्ञा) दिला.



यातील मधले टिंब एकात्मता दर्शवते तर आतील गोल निर्मिती व्यक्त करते. त्या बाहेरील ५ विभाग/पाकळ्या सर्वांगीण अभिव्यक्ती व जाणीव दर्शवतात.

गेली ४५ वर्षे कार्यरत असलेली उषानगरीची ही भूमी म्हणजे म्हटलं तर विशेष मान्यता असलेला एक वेगळा देश म्हटलं तर नाहीही. कुणाचे ही स्वामित्व नसलेली ही नगरी म्हणजे फक्त भगवंताची भूमी, जिथे फक्त उद्याची सत्ये शोधिली व सांगितली जातील, अशी दिव्य मानवांची दिव्य नगरी ! जिचे नाव ऑरोविल होय.

– **श्रीकृष्ण मा. दीक्षित**
एफ – ७०१, भास्करा, डि. एस. के. विश्व,
सिंहगड रोड, धायरी, पुणे ४१

■ ■ ■



श्रीअरविंद आश्रमातील विविध उपक्रम


संग्रहित माहितीवरुन...

सर्वसाधारणपणे आश्रम म्हटला की आपल्या नजरेसमोर एक विशिष्ट प्रतिमा बहुधा उभी राहते. पण अशा पारंपारिक प्रतिमेला छेद देत श्रीअरविंद- आश्रमात साधक भक्तांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जातात व क्रियाशीलतेचा एक आदर्श वस्तुपाठ जगासमोर मांडला जातो.

महर्षी श्रीअरविंद १९२६ साली पाँडिचेरीमधील आपल्या निवासगृहात साधना करण्यासाठी संपूर्ण एकांतात गेले. त्यावेळी आश्रमाची सारी कार्यसूत्रे श्रीमाँच्या हाती सोपवली गेली. जरी १९१० साली श्रीअरविंद पाँडिचेरीला आले होते तरी आश्रम स्थापनेची औपचारिक घोषणा नोव्हेंबर १९२६ रोजी केली गेली आणि साधकांचे सामाईक जीवन व आश्रमकार्य खऱ्या अर्थाने त्यावेळेपासूनच सुरू झाले.

जगाला न नाकारता, जगात राहूनच विविध कार्यांच्या माध्यमातून जीवन जगता जगता आध्यात्मिक प्रगती, उन्नती व उत्क्रांती घडवून आणणे यासाठी सतत कार्यरत राहणे ही शिकवण श्रीमाँनी साधकभक्तांना सातत्याने दिली.

पाँडिचेरीमधील ही अध्यात्मनगरी दोन विभागातून सदर कार्य करीत आहे. एक श्रीअरबिंदो- आश्रम व दुसरी श्रीअरबिंदो- सोसायटी, ज्याची स्थापना स्वत: श्री माँ यांनी १९ सप्टेंबर १९६० साली केली. श्रीअरबिंदो आणि श्रीमाँ यांची अध्यात्मिक साधनेची ध्येयधोरणे, त्यांच्या पूर्वयोगाचे उद्दिष्ट व पद्धती इ. गोष्टी सर्वसामान्यांना अवगत



व्हाव्यात यादृष्टीने श्रीअरबिंदो-सोसायटीची स्थापना केली गेली. श्रीअरबिंदो-सोसायटीने त्यासाठी लौकिक अर्थाने एक सर्व समावेशक असा कार्यक्रम (Agenda) आखला व त्यातील विविध उपक्रम गेली सहा दशके सातत्याने राबवण्याचे कार्य चालू आहे. सदर उपक्रम खाली उद्‌धृत केले आहेत.

- Integral Education (समग्र शिक्षण)
- Integral Health (समग्र आरोग्य)
- Integral Rural Development (समग्र ग्रामीण विकास)
- Integral Management (समग्र व्यवस्थापन कला)
- Indian Culture (भारतीय संस्कृती)
- Youth and Women (तरुण आणि महिला)
- Media, Arts & Communication (माध्यमे, कला व वार्तालाप)
- Sustainable Development and Science & Technology (विज्ञान तथा तंत्रज्ञानातील प्रगती व विकास)
- Business & Economic Development (व्यवसाय व आर्थिक विकास)
- Research & Training in Diverse Fields (विविधांगी संशोधन व प्रशिक्षण)
- Workshops, Seminars Conferences, Exhibitions (कार्यशाळा, चर्चासत्रे, वार्तालाप, परिषदा, प्रदर्शने इ.)
- Books, Audio-Visuals, Magazines & E-journals (विविध पुस्तके-ग्रंथ, दृक्‌-श्राव्य पद्धती, नियतकालिके, मासिके इ.)

वरील यादी बघता विविध क्षेत्रातील प्रगती व संशोधनाच्या शिकवणुकीची कल्पना आणि तीही भगवंत चैतन्याच्या जाणिवांचा अंगिकार करीत आपल्याला येते.

ज्या पाँडिचेरी नगरीत १९१० साली श्रीअरविंदांच्या समवेत फक्त ४ सहकारी-अनुयायी होते. त्या नगरीने आज अतिविशाल असे स्वरूप धारण केले आहे आणि आजमितीस आश्रमात कायमस्वरूपी व निवासी असे सुमारे २००० ते २५०० साधक अभ्यासक आहेत तथा शेकडो मुले व मुली तिथे शिक्षण घेत आहेत. छोट्या व मोठ्यांचे हे शिक्षण व कार्य हे शारीरिक, मानसिक, आत्मिक व आध्यात्मिक पातळीवर चालू आहे. आश्रमात विविध असे १५० विभाग कार्यरत आहेत व त्यामधून काम करणारे सारेजण साधक-स्वयंसेवक आहेत. कोणत्याही प्रकारची अधिकार वा पदांची शृंखला (hierarchy) कुठेही नाही. बेकरी, किचन, हार्डवेअर, कारपेंटरी, फोटोग्राफी, लॅमिनेशन, स्टेनलेस स्टील, फर्निचर, हॅंडीक्राफ्ट्स्, परफ्युम्स, नर्सरी, हातमाग, शेती, यंत्रविभाग, प्रिंटिंग, डेअरी, टेलरिंग, हॅंडमेड पेपर्स, मेणबत्त्या, अगरबत्त्या इ. अशा अनेक विभागातून साधक-स्वयंसेवक काम करतात व आवश्यक ते कौशल्यही मिळवतात. अर्थातच हे सारे भगवंताचे बोट पकडूनच केले जाते आणि सारे कार्य भगवंतालाच अर्पण केले जाते.

श्रीअरविंद म्हणत, हा आश्रम जगाचा परित्याग करण्यासाठी निर्माण झालेला नाही. स्वतःच्या शक्तीचा विकास करून आपल्यातील आध्यात्मिक चेतना उत्क्रांत करण्यासाठीची ही प्रयोगशाळा आहे व येथे आध्यात्मिक उन्नती अपेक्षिणाऱ्या सर्वांना मुक्त प्रवेश आहे.



पाँडेचरी आश्रमात श्रीमाताजी समवेत पंडीत जवाहरलाल नेहरू, कामराज, इंदिरा गांधी व लालबहादुर शास्त्री

आणि म्हणून आश्रमातील जीवन हे पराकाष्ठेचे कार्यव्याप्त आहे. कामे देताना कामे शोधून काढून करणेही आश्रमात साधकांकडून अपेक्षित असते. सर्वपंथीय, सर्वधर्मीय व सर्व प्रणालीचे लोक जगभरातून पाँडिचेरीला आश्रमात येतात, असतात वा आपले जीवन सेवा-साधनेच्या माध्यमातून व्यतीत करतात. भारतामधील उत्कृष्ट असे ग्रंथ-छपाईचे तंत्रज्ञान विविध प्रकाशन संस्थांच्या माध्यमातून लोकांपर्यंत अक्षर-वाङ्मयाच्या रूपात पोहोचवले जाते. श्रीअरविंद-आश्रम-प्रेस, ऑल इंडिया प्रेस, दिप्ती प्रकाशन, श्रीअरबिंदो सोसायटी. शब्द (sabda = Sri Aurobindo Books Distribution Agency) ही काही वानगीदाखल प्रकाशन संस्थांची नावे आहेत. की ज्यांच्या माध्यमातून – शहाणे करून सोडावे सकळ जन – या सूत्राचा अवलंब केला जातो.

पाँडिचेरी आश्रमात व त्यांच्या सेंटर्समधून शिक्षणाला अत्युच्च महत्त्व दिले जाते. अगदी बालोद्यानापासून ते उच्च पातळीवरील शैक्षणिक व आध्यात्मिक असे ज्ञानदान सातत्याने चालू असते व त्या माध्यमातून विविधांगी सर्वस्पर्शीय व्यक्तिमत्त्वे घडवली जातात. त्यासाठी सुसज्ज ग्रंथालये, प्रयोगशाळा, म्युझिक स्कूल्स, कला-विज्ञान, विविध खेळांसाठी आवश्यक त्या गोष्टी हे सारे जाणीवपूर्वक उपलब्ध केले जाते. श्रीअरविंदांच्या तत्त्वप्रणालींचा मागोवा व धांडोळा घेण्यासाठी Sri Aurobindo International Center of Education (SAICE) तथा Sri Aurobindo Center for Advance Research (SACAR) अशा प्रयोगशील शैक्षणिक संस्था गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत व जगभरातील विविध विद्यार्थी शिक्षण घेत स्वावलंबी बनत आहेत.

पाँडिचेरीपासून ८/१० किमीवर वसलेल्या ऑरोविल नगरीतही अशा प्रकारचेच विविध उपक्रम राबवले जातात. कर्मप्रधान साधनेची वाटचाल हे सूत्र ऑरोविलनगरीतही आहे. २० चौ.किमी. क्षेत्रातील मातृमंदिर या भव्य व कलात्मक ध्यानकेंद्राभोवतालच्या परिसरात अनेक निवासी, औद्योगिक, सांस्कृतिक व आंतरराष्ट्रीय अशा चार विभागातून मानवी एकता व कल्याणकारी कार्याचा प्रयोग संघटित करण्याचे कार्य गेली अनेक दशके चालू आहे. तेथील सावित्रीभवन या संस्थेत श्रीअरविंदांच्या सावित्री या महाकाव्याचा तेथे प्रामुख्याने अभ्यास होत असतो.

श्रीअरबिंदो सोसायटीच्या भारतात तथा परदेशात अनेक शाखा/सेंटर्सही स्थापन झालेले आहेत आणि त्या त्या देशातील सेंटर्समधून अभ्यास व सत्संग चालू असतो.

श्रीअरबिंदो-आश्रमाची मात्र साऱ्या जगातली एकमेव शाखा म्हणजे श्रीअरबिंदो-आश्रम, दिल्ली ही होय. तिची स्थापना १२ फेब्रुवारी १९५६ रोजी श्रीमाँच्या आशीर्वादाने झाली. त्यावेळी श्रीमाँ यांनी खालील संदेश पाठवला होता –

Let this place be worthy of its name and manifest the true spirit of Sri Aurobindo's teaching and message to the world!

दिल्ली येथील श्रीअरबिंदो-आश्रमाचे कार्य स्वतंत्रपणे चालू आहे. या आश्रमाच्या अंतर्गत असलेल्या नैनिताल येथील हिमालयन सेंटरमध्ये गेली २७ वर्षे श्रीअरविंद माँच्या तत्त्वप्रणालीच्या अनुषंगाने विविध विषयावरील ९ भाषांमधून ७/७ दिवसांची अभ्यास-शिबिरे संपन्न होत असतात. तसेच शाळा कॉलेजमधील तरुण मुला-मुलींसाठी यूथ-कँपचेही आयोजन केले जाते. गेली तीन दशके या अभ्यास-शिबिराचा संत-साहित्याच्या विविध अभ्यासक व व्यासंगी वक्त्यांच्या माध्यमातून शिबिरार्थी लाभ घेऊन साधनामार्गात सुस्थिर होत आहेत. दिल्ली आश्रमातही विविध विभाग कार्यरत असून लौकिक तथा आध्यात्मिक जीवन जगण्याची कला मान्यवर अभ्यासकांमार्फत लहानथोरांना शिकवली जाते.

स्वयंपूर्णता हे आश्रमाच्या विविध उपक्रमांचे सूत्र आहे. समाधीस्थळावरील फुलांची आरास असो वा प्रिंटिंग असो, अन्नपूर्णा विभागातील भोजन असो वा फर्निचरची गरज असो, साऱ्या आवश्यकतेची पूर्तता विविध विभागाच्या उपक्रमातील निर्मितीमधून होते. या साऱ्या लौकिक गरजा भागल्या की उरते ती अभीप्सा - भगवंतप्राप्तीची, त्यासाठी ही पुराणकालीन वेदपुरी (पाँडिचेरी) साऱ्या मानवजातीला सामावून घेण्यासाठी सज्ज आहे!

श्री माँच्या तत्त्वप्रणालीच्या अनुषंगाने विविध विषयांवरील ९ भाषांमधून ७/७ दिवसांचे स्वाध्याय तथा अभ्यास-शिबिरे संपन्न होत असतात, तसेच शाळा, कॉलेजमधील तरुण मुलां-मुलींसाठी यूथ-कँप्सचेही आयोजन केले जाते. गेली तीन दशके या अभ्यास-शिबिराचा संत-साहित्याच्या विविध अभ्यासक व व्यासंगी वक्त्यांच्या माध्यमातून शिबिरार्थी लाभ घेऊन साधनामार्गात सुस्थिर होत आहेत. दिल्ली आश्रमातही विविध विभाग कार्यरत असून लौकिक तथा आध्यात्मिक जीवन जगण्याची कला मान्यवर अभ्यासकांमार्फत लहानथोरांना शिकवली जाते.

नैनितालपासून साधारण ४० कि.मी. वरील रामगड येथेही श्रीअरबिंदो-आश्रम आहे. ३०/३५ एकरची ती विस्तीर्ण जागा एका साधक भक्ताने श्रीअरविंद व श्री माँच्या चरणी अर्पण केली. तिथेही अनेकविध अभ्यासशिबिरांचे आयोजन तथा स्थानिक विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम संपन्न होत असतात. जीवन जगण्याच्या कलेतील साक्षरता म्हणजे शिक्षण व जीवन उमजण्याच्या कलेतील साक्षरता म्हणजे योगसाधना या दोहोंची शिकवण येथेही दिली जाते.

एकूणात पाँडिचेरी, दिल्ली, नैनिताल वा इतर अनेक ठिकाणामधील कार्यरत असलेली ही सारी उपक्रमशीलता कोणत्याही कर्मकांडाच्या चौकटीत बंदिस्त नाही. या भूमीवरील लौकिक वा पार्थिवजीवन हे लोकोत्तर जीवनापेक्षा कोठेही कमी नाही अशीच शिकवण या विविध उपक्रमांच्या माध्यमातून साधक-अभ्यासकाला दिली जाते. त्यासाठी स्त्री-पुरुष समानतेचा अंगिकार करून कर्माच्या माध्यमातून भगवंताची प्रार्थना करीत राहणे व प्रगती करणे हे सूत्र साऱ्या उपक्रमांच्या मागे आहे.

■ ■ ■